कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व

संपादक
मु. वा. कांत



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व

संपादक संकलन

मु. वा. कांत

कविवर्य वा. रा. कांत

जन्म : ६ ऑक्टोबर १९१३ मृत्यु : ८ सप्टेंबर १९९१

कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व
काव्यसृजनाचा समग्र ग्रंथ

संपादन व संकलन
श्री. मु. वा. कांत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** 'कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व-काव्यसृजनाचा समग्र ग्रंथ'

➢ **संपादक :** श्री. मु. वा. कांत

➢ **प्रथमावृत्ती :** २०१७

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© **प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत : रु. १,०३४-००**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षांचे निवेदन

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हा निजामी राजवटीचा भाग होता. हैदराबाद राज्यात प्रशासनाची राजभाषा उर्दू होती. शिक्षणांचे माध्यमही उर्दूच होते. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील लेखक, कवी, अभ्यासक मायमराठीची सेवा आपल्या लेखनातून करण्याचा प्रयत्न करत होते. या लेखकांनी लिहिलेले साहित्य प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्रातील पुणे-मुंबईच्या प्रकाशकांवर अवलंबून राहावे लागत असे. यामुळे या काळातील मराठवाड्यातील साहित्य संवर्धनासाठी ज्या अनेक बुजुर्गांनी प्रयत्न केले ; त्यातील कविवर्य वा. रा. कांत हे एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांना त्यांच्या वडील आणि आजोबांपासून लेखनाचा वारसा लाभला होता. हा आनुवंशिक वारसाच वा. रा. कांतांनी पुढे जोपासला. नांदेड येथे जन्मलेल्या वामनरावांनी मराठी-उर्दूचा अभ्यास करत असताना काव्यलेखनास सुरुवात केली. सुरुवातीस काही वर्षे शेतकी खात्यात नोकरी केल्यानंतर हैदराबाद नभोवाणीवर नेमणूक होऊन औरंगाबाद आकाशवाणी केंद्राच्या मराठी विभागाचे कार्यक्रम संयोजक म्हणून ते रुजू झाले. या काळात त्यांना रसिक मित्रमंडळी भेटत गेली आणि त्यांच्या काव्यलेखनास ऊर्जा मिळते गेली.

वा. रा. कांत यांनी १९३० पासून काव्यलेखनास सुरुवात केली असली तरी पहिला काव्यसंग्रह 'रुद्रवीणा' प्रकाशित व्हायला १९४७ पर्यंत वाट पाहावी लागली. यापूर्वी त्यांच्या कविता प्रातिनिधिक संग्रहातून प्रकाशित झाल्या होत्या ; 'रुद्रवीणा'नंतर 'शततारका', 'वेलांटी', 'वाजली विजेची टाळी', 'मरणगंध', 'दोनुली', 'मावळते शब्द' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर या महत्त्वाच्या समकालीन कवींसोबत किंबहुना काही काळ त्यांच्या अगोदर त्यांनी काव्यलेखन केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील आंदोलन, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांसोबत अन्यायाविरुद्ध पेटून उठा, असा नाराही वा. रा. कांतांच्या काव्यलेखनाचा गाभा होता. पुढील काळात त्यांची कविता प्रगल्भ होत गेली. मुक्तछंदाचा वापर करत नवकवीचे वळणही तिने स्वीकारले. मराठीतील अशा एका प्रतिभावान, प्रयोगशील, स्वयंभू कवींचे अक्षरधन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ त्यांची जन्मशताब्दी उलटून गेल्यावर काही वर्षांनी प्रकाशित करत आहे, याचा आम्हाला आनंद आहे.

(बाबा भांड)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय		पान नं.
१.	आभार		(तीन)
२.	माझे काव्य : एक आत्मनिवेदन		(सात)
३.	कांतांचे कवितासंग्रह		(सत्तावीस)
	(१)	पहाटतारा	१
	(२)	फटत्कार	१५
	(३)	रुद्रवीणा	२९
	(४)	शततारका	९९
	(५)	वेलांटी	११७
	(६)	वाजली विजेची टाळी	१९५
	(७)	दोनुली	२६७
	(८)	मावळते शब्द	३११
	(९)	बगळ्यांची माळ	३९३
४.	कांतांची नाट्यकाव्ये		४३७
	(१)	मरणगंध	४४७
	(२)	गांधारी	४५५
	(३)	विसर्जन	४८७
	(४)	दुमार	५१७
	(५)	बासरी	५३७
	(६)	चुंबन	५५५
	(७)	पाषाणावरील तीळ	५७१
	(८)	सूर्याचं वाळवंट	६१३
५.	कांतांच्या काही अखेरच्या कविता		६५७
६.	जीवनपट व साहित्यसंपदा		६६७

➢ **पुस्तकाचे नाव :** 'कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व-काव्यसृजनाचा समग्र ग्रंथ'

➢ **संपादक :** श्री. मु. वा. कांत

➢ **प्रथमावृत्ती :** २०१७

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

© **प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत : रु. १,०३४-००**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षांचे निवेदन

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हा निजामी राजवटीचा भाग होता. हैदराबाद राज्यात प्रशासनाची राजभाषा उर्दू होती. शिक्षणांचे माध्यमही उर्दूच होते. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील लेखक, कवी, अभ्यासक मायमराठीची सेवा आपल्या लेखनातून करण्याचा प्रयत्न करत होते. या लेखकांनी लिहिलेले साहित्य प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्रातील पुणे-मुंबईच्या प्रकाशकांवर अवलंबून राहावे लागत असे. यामुळे या काळातील मराठवाड्यातील साहित्य संवर्धनासाठी ज्या अनेक बुजुर्गांनी प्रयत्न केले ; त्यातील कविवर्य वा. रा. कांत हे एक महत्त्वाचे कवी आहेत. त्यांना त्यांच्या वडील आणि आजोबांपासून लेखनाचा वारसा लाभला होता. हा आनुवंशिक वारसाच वा. रा. कांतांनी पुढे जोपासला. नांदेड येथे जन्मलेल्या वामनरावांनी मराठी-उर्दूचा अभ्यास करत असताना काव्यलेखनास सुरुवात केली. सुरुवातीस काही वर्षे शेतकी खात्यात नोकरी केल्यानंतर हैदराबाद नभोवाणीवर नेमणूक होऊन औरंगाबाद आकाशवाणी केंद्राच्या मराठी विभागाचे कार्यक्रम संयोजक म्हणून ते रुजू झाले. या काळात त्यांना रसिक मित्रमंडळी भेटत गेली आणि त्यांच्या काव्यलेखनास ऊर्जा मिळते गेली.

वा. रा. कांत यांनी १९३० पासून काव्यलेखनास सुरुवात केली असली तरी पहिला काव्यसंग्रह 'रुद्रवीणा' प्रकाशित व्हायला १९४७ पर्यंत वाट पाहावी लागली. यापूर्वी त्यांच्या कविता प्रातिनिधिक संग्रहातून प्रकाशित झाल्या होत्या ; 'रुद्रवीणा'नंतर 'शततारका', 'वेलांटी', 'वाजली विजेची टाळी', 'मरणगंध', 'दोनुली', 'मावळते शब्द' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर या महत्त्वाच्या समकालीन कवींसोबत किंबहुना काही काळ त्यांच्या अगोदर त्यांनी काव्यलेखन केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील आंदोलन, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांसोबत अन्यायाविरुद्ध पेटून उठा, असा नाराही वा. रा. कांतांच्या काव्यलेखनाचा गाभा होता. पुढील काळात त्यांची कविता प्रगल्भ होत गेली. मुक्तछंदाचा वापर करत नवकवीचे वळणही तिने स्वीकारले. मराठीतील अशा एका प्रतिभावान, प्रयोगशील, स्वयंभू कवींचे अक्षरधन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ त्यांची जन्मशताब्दी उलटून गेल्यावर काही वर्षांनी प्रकाशित करत आहे, याचा आम्हाला आनंद आहे.

(बाबा भांड)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व
काव्यसृजनाचा समग्र ग्रंथ

संपादन व संकलन
श्री. मु. वा. कांत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

कविवर्य वा. रा. कांत यांचे काव्यविश्व

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय		पान नं.
१.	आभार		(तीन)
२.	माझे काव्य : एक आत्मनिवेदन		(सात)
३.	कांतांचे कवितासंग्रह		(सत्तावीस)
	(१)	पहाटतारा	१
	(२)	फटत्कार	१५
	(३)	रुद्रवीणा	२९
	(४)	शततारका	९९
	(५)	वेलांटी	११७
	(६)	वाजली विजेची टाळी	१९५
	(७)	दोनुली	२६७
	(८)	मावळते शब्द	३११
	(९)	बगळ्यांची माळ	३९३
४.	कांतांची नाट्यकाव्ये		४३७
	(१)	मरणगंध	४४७
	(२)	गांधारी	४५५
	(३)	विसर्जन	४८७
	(४)	दुमार	५१७
	(५)	बासरी	५३७
	(६)	चुंबन	५५५
	(७)	पाषाणावरील तीळ	५७१
	(८)	सूर्याचं वाळवंट	६१३
५.	कांतांच्या काही अखेरच्या कविता		६५७
६.	जीवनपट व साहित्यसंपदा		६६७

माझे काव्यः एक आत्मनिवेदन

माझ्या काव्याचें आत्मनिवेदन मी आज आपणापाशीं सादर करणार आहे. मराठवाड्यांतील काव्यनिर्मितीच्या मुळाशीं कोणती मने कोणत्या प्रेरणेने धडपडत होती ह्याचा शोध यातून कुणाला घेता आल्यास त्यांनी अवश्य घ्यावा. कविता मी कशी व का लिहिली, काव्यप्रांतांतील माझी ही वाटचाल कशा स्वरूपाची होती व आहे, ह्याचा मागोवा घेण्याचा मी अल्प प्रयत्न करणार आहे. माझ्या काव्य–सौंदर्याच्या प्रयोगांचा मी आपल्याशी 'उघड' विचार करणार आहे. अर्थात् माझे हे स्वगत 'परगत' व 'परस्पर्शी' झाले, तर ते मला हवेच आहे. गेली तीस वर्षे मी मराठवाड्यांतील काव्यप्रवाहाच्या काठाशी उभे राहून तिची गति व प्रगति पाहिली आहे, तिची काव्यनिर्मितीची प्रक्रिया मी जवळून न्याहळिली आहे. माझे स्वत:चे भाव–जीवनहि, या काळात या निर्मितिप्रक्रियेच्या आणि परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर वाहत गेले आहे. ह्या प्रवाहातील वेग आणि वळणांशी माझा निकट परिचय झाला आहे. ह्या वेगवान प्रवाहाच्या आघात–प्रत्याघाताने माझ्या लेखनाचे रूप घडले आहे. तेव्हा या प्रवाहाचेहि स्वरूप माझ्या 'प्रवाहपतित्वामुळे' थोडेबहुत स्पष्ट व्हावे, स्वत:च्या लेखनासंबंधी बोलणे मोठे कठिण व जोखमीचे काम आहे. हा प्रयत्न फसण्याचाहि संभव आहे. स्वत:चे रूप पाहायला आरशाचे साहाय्य मिळते. पण स्वत:चे अंत:करण आणि त्याचे आविष्कार बघायला असा भरवशाचा आरसा कुठे मिळणार ?

नांदेडच्या या भूमीत मी आज उभा असल्यामुळे माझे मन सहजपणे भूतकाळाकडे धावत आहे. इथेच माझ्या पहिल्या कविता लिहिल्या गेल्या. या गावांची अनेक स्थळे, अनेक दृश्यें माझ्या दृष्टीपुढून सरकत आहेत. गोदावरीच्या पैलतीरावरील, कवठें खेड्यांतील चावडीवरचा पाण्यात वाकून पाहणारा तो दिवा (आज तो तुम्हाला दिसणार नाही), खडकाळीचें ते रम्य ठिकाण, तिथे गोदावरीच्या पात्रांत नैसर्गिक रित्या खडकावर ताट–वाट्या कोरलेल्या होत्या, हिवाळ्यांत तिथे आमच्या सहली आणि वनभोजने व्हायची, तेव्हा आम्ही या ताटवाट्यांचा मनसोक्त उपयोग केला होता. पुढे वाढत्या दळणवळणाच्या सोयीसाठी म्हणून, खडक फोडून, तिथे पूल उभारण्यात आला, खडक फोडला गेला आणि मेजवानीच्या पंक्तीसाठी निसर्गाने केलेली ती रम्य सिद्धता नष्ट झाली. हिरण्यकश्यपूचा वध केल्यानंतर शांतपणे ध्यानमग्न होऊन बसलेली नृसिंहाची ती पुरूषभर उंचीची शालिग्रामाची काळीभोर शांत उग्र मूर्ति, "मैं चिडियोंसे बाज लडाऊं" (या चिमण्यांना मी श्येन पक्ष्यांशी लढायला शिकवीन) या प्रतिज्ञेने आयुष्यभर मोगलांशी संग्राम करणाऱ्या गुरू गोविंदसिंहांची समाधि, पहिला पूर आला की गोदावरीच्या पुराची होणारी पूजा, महापूर आला की, सिद्धनाथपुरींतील माझ्या घरच्या पाठभिंतीला शिवणाऱ्या गोदेच्या लाटांच्या सोन्याच्या साखळ्या, शंखतीर्थांच्या त्या विलक्षण गायकाची कथा ('रागोद्गार' ही माझी कविता या कथेवरच आधारली आहे. ह्या गायकाने आपले गायन कधीच आपल्या पत्नीला ऐकवले नाही. ती तशीच त्याचे गायन न ऐकतां मेली, तेव्हा या गायकाने तिच्या पेटत्या चितेपुढे गाऊन तिची इच्छा मरणोत्तर पूर्ण केली).अशा अनेक दृश्यांचे व गोष्टींचे माझ्या मनावर खोल ठसे उमटले आहेत. त्यांनी माझ्या भावनांना चाळवण्याचे, जागृत करण्याचे काम केले आहे.

येथले माझे एक ज्येष्ठ स्नेही इतिहाससंशोधक श्री. विश्वेश्वर अंबादास कानोले यांनी वामन पंडित हे कवि नांदेडच्या शेष घराण्यांतील होते, असा शोध त्या वेळी नुकताच मांडला होता. ते या शोधाचे अत्यंत आवेशाने समर्थन करीत, आणि काही लोक त्यांच्या या तारूण्यसुलभ आवेशाची विनोदाने थट्टा करीत, मीहि कधीकधी तीत सामील होत असे, हे जरी खरे असले तरी आता सांगायला हरकत नाही की शेषांच्या त्या जुनाट चिरेबंद वाड्याभोवती, कुणास न कळत मी अनेकदा प्रदक्षिणा घातल्या होत्या. खरेच वामन

पंडित या वाड्यांत राहत असतील का? कुठे बसत असतील, कसे लिहीत असतील, असे प्रश्न माझ्या मनांत येत आणि वामन पंडिताबद्दलचे कुतूहल मला त्या वाड्याकडे ओढून नेई.

"हळु-हळू घन गर्जतसे नभीं
मुरलीहूनि चढेन म्हणून मी"

अशा ढगांकडे पाहणारे, मुरलीच्या नादाने धुंद झालेले वामन पंडितांचे धुंद डोळे तर तेव्हा त्या वाड्यांत मी शोधीत नव्हतो?

माझ्या कुटुंबांतील अनेक प्रेरक संस्कार माझ्या मनावर झाले आहेत. ते संस्कार मोठे उदार व विविधरंगी आहेत. त्यांनीच माझा कलात्मक पिंड बनला आहे. माझे वडील फारशीचे पंडित होते. आमचे काही कोठे थोडे चुकले की गुलिस्ताँ व बोस्ताँमधले उपदेशपर चुटके, "बैत" दिवसभर ऐकावे लागत, तर रात्री नित्य नेमाने हरिविजयाचा पाठ ऐकायला मिळे.

'कलम गुफता के मन शाहे-जहानुम'- मी या विश्वाची राणी आहे, ही लेखणीची प्रौढी जशी लहानपणीच मला कळली होती, तसेच-

"माझे सावळे कान्हाई। उभी गे राजसे कृष्णाबाई
तुजवेगळ्या दिशा दाही। ओस मज वाटती
पूर्ण ब्रम्ह सावळें। म्यां पायावरी घेऊन न्हाणिलें
आपल्या पदरें अंग पुशिलें। वैकुंठपतीचे नेणतां
ज्याशी वर्णितां भागलीं दर्शनें। त्याशीं येरे जारे म्हणे
ठकलें ठकविलें जगज्जीवनें। महिमा नेणें अद्‌भुत"

श्रीधराच्या अशा ओव्यातून मराठीच्या रसाळपणाचा आणि सुढाळ भाषेचा परिचय झाला. मला नीट वाचतां येऊ लागल्यावर हरिविजयाचा रोजचा पाठक मीच झालों, हरिविजय, रामविजय, शिवलीलामृत इत्यादि ग्रंथांची अनेक आवर्तनें घडून आली. या वाचनाच्या काळी काव्यांतला रस किंवा सौंदर्यग्रहण करण्याची दृष्टी मला आलेली नव्हती. केवळ भोळ्या भक्तिभावाने हे सारे वाचन झाले होते, पण या पौराणिक कथा मनात खोल रूजल्या होत्या. मनावर त्यांचे अदृश्य संस्कारहि झाले होते, परंतु ते मला जाणवले नव्हते. पुढे 'नागासाकीचे अंध' ही कविता लिहितांना, आपल्याच शापाने दग्ध होणाऱ्या विज्ञानी मानवाचे वर्णन करतांना 'कल्माषपाद' राजाचे प्रतीक जेव्हा माझ्या मनात स्फुरले, तेव्हा लहानपणी वाचलेल्या पोथ्यांतल्या कथांनी माझ्या मनाला किती श्रीमंत केले आहे, ते कळले.

आमचे घराणे तसे जुन्या परंपरेतले, कर्मठ होते. आमचे वडील एक पोलिस अधिकारी होते, त्यामुळे बड्या मुसलमान व इतर अधिकाऱ्यांची आमच्याकडे ये-जा असायची. त्यामुळे मोगली शाही 'अदब' राखण्याचे शिक्षण मिळाले, तशी त्यांची कलासक्ति नि जीवनासक्ति यांच्या रंगीत छटाहि मनावर उमटल्या. कधी कधी अधिकारपदाचा 'एजाझ' राखण्यासाठी कीर्तन-संगीताचे जलसे आमच्या घरी होत असत. त्यांत कलावंतिणीच्या बैठकीलाहि मज्जाव नसे. आमचे वडील गायनाचे दर्दी होते. ते सतारहि उत्तम वाजवीत. शिकारीस जात. पोलिसांची परेड, नेमबाजी, घोड्यावरून रपेट ह्या सर्व गोष्टी मी पाहिल्या होत्या, अनुभवल्या होत्या. नेमबाजीच्या अभ्यासांत एकदा मीहि भाग घेतला होता. सातआठ वर्षाचे वय असेल माझे तेव्हा. माझ्या लहान हातात बंदूक मावत नव्हती, पेलत नव्हती. त्यासाठी तोल सावरण्यासाठी मागे एक शिपाई उभा होता. मी घोडा ओढला आणि गोळी सुटली. नेम कुठे लागला ते कळले नाही, परंतु आवाज झाल्याबरोबर बंदुकीने मागे झटका दिला आणि बंदुकीचा 'कुंदा' माझ्या छातीवर आदळला. तो धक्का मात्र माझ्या पूर्ण लक्षात राहिला. लक्ष्यावर आघात करणारे संहारास्त्र लक्ष्यवेध्यावर देखील आघात करते, हे सगळे शस्त्राधारी कसे विसरतात?

एकदा अशीच आमच्याकडे कलावंतिणीची बैठक झाली. अशा बैठकींनार घरांतील स्त्री, पुरूष, मुले सर्व मंडळी एकत्र बसत. कुणालाहि मज्जाव नसे. स्त्रियांसाठी झिरझिरीत पडदा लावून एक वेगळी 'विंग' तयार करण्यात येत असे. सारे वातावरण मोठे निर्मळ व 'बा अदब' राखले जात असे. तेलंगणांतील एका कलावंतिणीचे गाणे होते. तिला मराठी गाणी मुळीच येत नव्हती, त्यावेळी त्यांची प्रथाहि नव्हती. ख्याल टप्पा, ठुमरी, गजल ती म्हणत असे. ख्याल टप्पा काही आपल्या पदरांत पडला नाही. वडिलांच्या शिफारशीवरून तिने एक फारशी गझल म्हटली. बोल होते:

"आहिस्ता बर्गे गुल बफिशों बर मझारे माँ
बस नाजूक अस्त शिश–अे–दिल दर किनारे माँ"

(हे वेलींनो), तुम्ही अगदी हळुवारपणे या थडग्यावर आपली पाने फुले ढाळा, इथे विश्रांति घेणारे हृदय काचेहूनहि नाजुक आहे. कदाचित् त्या कुसुमाघातानेहि ते फुटून जाईल.

हा अर्थ मला पुढे फार वर्षांनी कळला आणि त्यातले सौंदर्य आकलन व्हावयाला तर बराच काळ जावा लागला. परंतु त्या फारशी शब्दांच्या भरघोस, लोचदार उच्चाराने आणि त्या गोउ आवाजाच्या लयकारीने माझ्या मनाचा तेव्हाच ताबा घेतला होता. अर्थ न कळतांहि त्या ओळी मी घोळीत असे कित्येक दिवस. गझलेनंतर, त्या गायिकेने जयदेवाची अष्टपदी गायिली. संस्कृतचे नादमधुर दाणेदार शब्दोच्चार आणि जयदेवाच्या वाणीतले सारे लालित्य मुखर करणारा तो स्पष्ट सुरेल, कळीदार कोवळा आवाज आजहि माझ्या कानात घुमतो, तेव्हा ते क्षण नूपुरनादाने झंकारल्यासारखे वाटतात.

"जय जगदीश हरे
धृतवानसि वेंद
विहित विचित्र चरित्रमखेदं
मीनशरीरं माधवधृत मीनशरीरं
जय जगदीश हरे"

दशावताराचे वर्णन करणारी ही अष्टपदी ती गायिका 'अदा' करून (साभिनय) म्हणत असे. गौर वर्णाची, शेलाट्या अंगाची ती गायिका तरूण व सुंदर होती. तिचे मोठे मोठे टपोरे डोळे फुलांसारखे लवत आणि हिऱ्यासारखे तळपत. मीनावताराचे भाव दाखवतांना, पाण्यांतून फिरणाऱ्या मत्स्याचा अभिनय करतांना, त्या स्वर्णांगीने आपल्या शरीराची अशी काही डौलदार आणि रम्य हालचाल केली की, एक सोनेरी मासळी पाण्यातून पोहत आहे असा भास झाला. आणि डोळे– त्यांचे काय वर्णन करू! मीनाक्षीच होती ती. 'गोड आंबट उगीर' या कवितेतील "जळीं सोनेरी। तशी निघून गेलीस" या ओळीत, त्या सोनेरी मासळीची एक झलक पकडण्याचा प्रयत्न केला आहे.

हळूहळू गळणाऱ्या पानाफुलांच्या वृष्टीत उसासणारे गुलाबाच्या झाडाखालचे ते थडगे माझ्या मनात कुठे तरी घर करून बसले होते. ती सोनेरी मासळीहि खोल पाण्यांत उसळत होती. अगदी नि:शब्दपणे. मासळीच्या या सोनेरी खवल्यांबरोबर वाघाचे दोन धगधगते डोळेहि माझ्या मनात पेटतांना दिसत. लहानपणी रस्त्यावर एकदा वाघाचे दर्शन (पिंजऱ्यांतले नव्हे) घडले होते. जनगांवची गोष्ट आहे ही. त्यावेळी नुकतेच ते जिल्ह्याचे ठिकाण झाले होते आणि आमचे वडील तिथे बदलून गेले होते. गाव लहान, वसती थोडी व भवती घनदाट जंगल. संध्याकाळ झाली की, जंगली श्वापदे गावसीमेवर फिरत, वडिलांची कचेरी गावाबाहेर होती. त्यांना परतायला नेहमी संध्याकाळ टळून जाई. एकदा असेच परततांना मी त्यांच्याबरोबर होतो. बैलाच्या छकड्यांतून आम्ही घराकडे निघालो होतो. पुढे एक शिपाई कंदील घेऊन, तर मागचा शिपाई बंदूक घेऊन चालत होता. वडिलांच्या जवळहि एक 'दोजरबी' (दोन नळीची) बंदूक

होती. चालतां चालतां बैल एकदम थांबले आणि थरथर कापू लागले. गाडीवान आणि दोन्ही शिपाई थांबले, हलक्या आवाजांत कुजबुजले, "वाघ"!

आम्ही समोर बघितले. एक प्रचंड पितांबरी वाघ रस्ता अडवून बसलेला होता. चांदणे नुकतेच जमिनीला शिवू लागले हाते. त्या धूसर प्रकाशांत त्याचे काळे पिवळे पट्टे चमकत होते, हलत होते. तो शांत निश्चल बसला होता. त्याच्या शेपटीचे टोक तेवढे थोडेसे उडत हलत होते. आमची त्याला चाहूल लागली. त्याने आमच्याकडे रोखून पाहिले. त्याचे ते दोन डोळे. डोळे कसले, दोन ज्वाला, दोन टेंबे जळत होते. आम्ही हालचाल न करतां अगदी स्तब्ध उभे राहिलो. माझी तर भीतीने गाळण उडाली. वडिलांनी बंदुकीला हात घातला आणि मुळीच आवाज न करण्याबद्दल त्यांनी मला खुणावले. सारे अवकाश कसे गोठल्यासारखे वाटले. काळहि थांबला होता. त्या गोठलेल्या स्थलावकाशांत ते दोन डोळे पेटत होते, अशरिरी ज्वालांप्रमाणे. वडिलांनी बंदूक उचलली. पण इतक्यात तो वाघ उठला, आमच्याकडे त्याने एक तुच्छतापूर्ण दृष्टिक्षेप टाकला, आणि मग न बघतां, सावकाश रस्ता ओलांडून तो समोरच्या झाडीत अदृश्य झाला. तो गेला, पण त्याचे ते डोळे माझ्या मनात ज्वालांनी कोरले गेले. त्या डोळ्यांचे ज्वालाचित्र कधीच शब्दांत रेखाटतां येणार नाही. "चकमक झडली आहे" या कवितेत, सिंहाच्या " डोळ्यातील मृत्यूच्या टेंब्या" मध्ये त्या वाघाच्या डोळ्यांतील जळती रेघ थोडीशी उमटते, पण थोडीशीच. त्याच्या डोळ्यांतली ती अग्नि बाहुली मला अजून रेखाटतां आली नाही.

उन्हाळ्यांत घराच्या अंगणात बसले म्हणजे डोंगरांवरील वणवे पेटलेले दिसत. रात्रभर फडफडणारे आगीचे पदर इतके जवळ होते की, वाटे, आपण त्या ज्वाळांच्या जरतारी पदराखालीच झोपलो आहोत. पुढे 'युगचाहुली' या काव्यांतील 'आगलाव्या' या गीतांत ही आठवण जागली आहे. परसत्तेच्या कोर्ट-कचेऱ्या जाळणारा तो आगलाव्या अशाच पदराखाली वाढला असावा.

"नित वणव्याच्या पदराखाली
स्वप्नें साखर-झोप भोगिली
जरि पोटीं अंगार
तपोनिष्ठ शिव त्रिलोचनाचे
ज्वलत् स्वप्न मी प्रलयाग्नीचें
स्फुरे स्वैर साकार
सारी जाळपोळ करणार
दुरित जगाचं जाळित जाळित आम्हीही जळणार"

रात्री खाटेवर झोपलो असताना डोळ्यांवर, गवताच्या छतांत डोकावणारा साप एकदा पाहिला. त्यांचे गुंजाएवढे लाल रोखलेले डोळे, नि त्यानंतर छपरांतून सरपटत जाणारी त्याची वावभर सळसळ! त्याच्या सपरटण्याचा तो सर्र सर्र असा आवाज अजूनहि माझ्या कानाला नुकताच ऐकल्यासारखा वाटतो. "अर्धजागल्या पन्नगशिरिंचे रत्नमणी झळकले" (विराट जागरण), "त्या शलाकेंत सर्पमण्यांचे खुनशी तेज फुत्कारते" (चकमक झडली आहे) या कवितेत सापाचे ते डोळे डोकावले आहेत. ह्या डोळ्यांप्रमाणेच दीपविसर्जनाच्या रात्री, गोदावरीच्या प्रवाहाला पाण्याला-फुटणारे ज्योतीचे ते हजारो डोळे दशकांच्या कालप्रवाहावरून माझ्याकडे वाहत येतात. पाण्याला त्यांची प्रतिबिंबे पकडून ठेवतां आली नाहीत. तसेच माझेहि झाले आहे.

अशा अनेक आठवणी, दृष्यें आणि कथा माझ्या मनांत खोल साठल्या होत्या, पण कुठे तरी अडगळीच्या खोलीत पडल्यासारख्या त्यांचे अस्तित्व मी विसरूनहि गेलो होतो. कारण ह्या वस्तूंना, प्राण्यांना, क्षणांना, मनांत विरघळलेल्या स्मृतींचे, भावमूर्तांचे द्रवरूप प्राप्त झाले नव्हते. त्यांना शब्द फुटला नव्हता. सारे कसे नीरव, अबोध होते.

वस्तुजातांतले सौंदर्य आकलन होण्याचे ते वयहि नव्हते. त्यातली भव्यता, सुंदरता, भीषणता यांचा अर्थ मनाला उमगत नव्हता. तरीहि या सर्वांचे अपार आकर्षण वाटत होते. त्यांच्या भावमुद्रा हृदयावर कुठेतरी खोल उमटत होत्या. स्थिर होत होत्या. त्यांत कसला तरी आनंद जाणवत होता.

पुढे काव्य वाचतांना, या पाहिलेल्या वस्तुजाताच्या दर्शनांतील आनंदाचा स्पर्श मनाला होऊ लागला, आणि काव्यवाचनाकडे माझी प्रवृत्ति वळली. निसर्गाच्या दर्शनाने झालेल्या आनंदाचा पुनरानुभव काव्यें वाचतांना मिळू लागला. पण वस्तु-जातांतले विविध सौदर्य आणि काव्यानंद यांचा परस्पर संबंध अजून समजत नव्हता.

याच वेळी मी कविवर्य श्री. दे.ल.महाजन यांच्या सांन्निध्यांत आलो. त्या काळी या विभागात नांदेड हे वाड्.मयीन चळवळीचे केंद्र मानण्यांत येत असे. श्री. महाजनांचे घर, या सर्व चळवळीचे स्फूर्तिस्थान होते. कवि, कीर्तनकार व साहित्यिक या नात्याने महाजनांची कीर्ति सर्वदूर पसरली होती. मराठीचा एकनिष्ठ पायिक म्हणून तरूण पिढी त्यांच्याकडे आदराने पाहत होती. स्थानिक तरूण लेखकांचे व कलांवतांचे त्यांच्याभोवती नेहमी कडे पडलेले असे. बाहेरचेहि कवि-लेखक त्यांच्याकडे येत. त्यांच्या घरी रात्री काव्यवाचनाच्या बैठकी झडत. कधी श्री. महाजन स्वत:च्या कविता वाचीत, तर कधी इतर होतकरू कवि आपल्या कविता म्हणून दाखवीत. मग त्यावर चर्चा होई. सुधारणा सुचविल्या जात. वादविवाद होत. कधी नव्याने प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचे वाचन होई, केव्हा केव्हा कीर्तन-गायनांच्या बैठकी होत. श्री. महाजनांच्या प्रशस्त दिवाणखान्यांत किंवा गच्चीवर जागविलेल्या त्या रात्री माझ्या आयुष्यांतील अत्यंत मधुर आणि प्रेरणागर्भ रात्री म्हणाव्या लागतील. त्यांच्या आठवणीने आजहि रात्रीला एक नवा अर्थ येतो.

श्री. महाजनांकडे जमणाऱ्या व्यक्तींत कवि यादवसुत (श्री. रा. या. मुळावेकर), श्री. के.ह.कलंबरकर आणि दत्त किंकर ही मंडळी कविवर्यांकडून आपल्या कविता सुधारून घेत. श्री. महाजनहि प्रत्येकाच्या कवितेत लक्ष घालून आत्मीयतेने बदल सुचवीत. हे कवी त्यांना गुरूस्थानी मानीत असत आणि त्यांच्या सुधारणा स्वीकारीत. कवितेत त्यावेळी मला काहीच कळत नव्हते. (आता फारसे कळते असेहि नाही.) परंतु आपल्या कविता सुधारून घेण्याची ही गोष्ट मला विचित्र वाटे. एकदा तर मी

काय म्हणुनी शिकवील मला हो तो
आणि शिकवोनी काय कवी होतो
स्वयं नादब्रह्मांत गुंगणारा
स्वयं काव्यस्फूर्तीस पावणारा
शब्द-सृष्टीचा चतुर विधाता तो
जगन्मोहन या खगापरी गातो

ह्या चंद्रशेखरांच्या ओळी म्हणून या प्रकाराची थट्टाहि केली होती आणि अनेकांना रोष ओढवून घेतला होता. उर्दू काव्याच्या दुनियेत अशी प्रथा होती. प्रत्येक नवा होतकरू कवि, आपल्याला आवडणाऱ्या किंवा आदरणीय वाटणाऱ्या कवीकडे आपल्या कविता घेऊन जाई आणि त्याला गुरूस्थानी मानून, त्याच्याकडून 'इस्लाह' घेई. त्या प्रथेचा तर हा परिणाम नसेल? नक्की सांगता येत नाही, पण ही महाजनांच्या 'घरची खूण' होती. हिचा कवितेवर बरा-वाईट काय परिणाम झाला ते आज सांगता येत नाही. पण एक गोष्ट मात्र निश्चित की, त्यावेळी नांदेडांत, मराठी काव्यासंबंधी जी आवड, जो उत्साह निर्माण झाला होता, त्याचा झरा महाजनांच्या घरापाशी होता. काही तरी लेखन करावे असे मराठीची आवड असलेल्या प्रत्येक तरूणाला वाटत होते आणि ही सर्व मंडळी त्यांच्या घरी जमत असे. महाजनांच्या घरचा हा मेळावा पाहून, 'कुंभारटेकडीवर कवि आणि गाढवे राहतात' अशी काही लोक कुचाळ टीकाहि करीत असत. मराठी भाषेच्या सेवेची नवीन जाणीव, नवी जागृति, भाषेच्या रक्षणासाठी प्रयत्न करण्याची जी

झुंजारवृत्ति मराठवाड्यांत निर्माण झाली तिचे श्रेय बऱ्याच मोठ्या प्रमाणात श्री. महाजनांना द्यावे लागेल, ह्यांत कुणाचे दुमत होणार नाही. ह्या प्रेरणा पुढे सर्व मराठवाडाभर पसरल्या.

औरंगाबादचे नारायणराव नांदापूरकर, पद्माकर, डॉ. पुरवार व हरसूलकर, हैदराबादचे श्रीकृष्ण गाडगीळ, कोरेकल, दिवाकर कृष्ण, वा.दा. गाडगीळ, नांदेडचे सीतारामपंत मनाठकर, परभणीचे बी. रघूनाथ, हे कवि, लेखक त्या काळांत साहित्यसेवा करणाऱ्या प्रमुख व्यक्ति होत्या.

'आख्यानरत्नमाला', 'मंदारमाला' आणि 'विहंगमाला' ही अनियतकालिके त्यावेळी प्रसिद्ध होत होती. त्यांच्या मागेहि श्री. महाजनांची प्रेरणा होती. आख्यानरत्नमालेचे तर ते संपादकच होते. या अनियतकालिकांनी तरूण लेखक निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. 'आख्यानरत्नमाला' कीर्तनोपयोगी आख्यान वाङ्मयाला वाहिलेली होती, तर 'मंदारमाला' आणि 'विहंगमाला' यांच्या द्वारा विविध वाङ्मय प्रसिद्धीचे कार्य झाले. हैदराबादेस राजहंस मासिकाने आणि औरंगाबादेहून 'उदय' या मासिकानेहि मोलाचे कार्य केले.

वाङ्मयीन चळवळीच्या या वातावरणात माझ्याहि मनात साहित्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष लेखनापासून दूर होतो, तरी श्रवणभक्ति आणि वाचन मी मनापासून केले. महाजनांचे उत्तम ग्रंथालय होते. त्यात प्राचीन व अर्वाचीन काव्याची पुस्तके भरपूर होती. ती सर्व मी वाचून काढली. केशवसुत, बालकवि आणि गडकरी यांच्या काव्याने मी फार प्रभावित झालो. बालकवि आणि गोविंदाग्रज हे माझे अगदी आवडते कवि होते. शब्दांचा नाद, कल्पनांचे भव्य उड्डाण आणि त्यातले स्वप्निल सौंदर्यवेधी वातावरण, यांनी मी मुग्ध झालो.

वाचनाचे हे संस्कार घेऊन मी शिक्षणासाठी हैदराबादेस गेलो. कविवर्य तांबे यांच्या कवितेचा दुसरा भाग तेव्हा नुकताच प्रसिद्ध झाला होता. तिथे गेल्यावर तो वाचनांत आला. मी, कृष्णकुमार आणि कलंबरकर रात्रभर सारखे त्यांतल्या कविता वाचीत होतो. कित्येक रात्री आम्ही त्या संग्रहाच्या वाचनांत घालविल्या. दिवसादेखील त्या कवितांची धुंदी डोळ्यांवर घेऊनच वावरत होतो.

ह्यापूर्वीच्या काही वर्षात मी थोड्या कविता लिहिल्या होत्या. पण त्याला काही अर्थ नव्हता. कोणालाहि त्या मी दाखविल्या नव्हत्या. फक्त श्री. हरिभाऊ कुलकर्णी, पार्थिव यांना ते रहस्य माहित होते. त्यांनी मला उत्तेजन दिले. ते माझे पहिले चाहते सुहृद्. पुढेहि माझ्या काव्याचे ते रसिक व चोखंदळ श्रोते राहिले.

एके दिवशी–कसें आठवत नाही– "कां गाल फुगवुनी अशी बैसशी बाई" या ओळीने सुरू होणारी 'बाई कलिके' ही कविता मी लिहिली. शेवटच्या ओळी होत्या:

"हास्यांत तिच्या ब्रह्मांडें धवळुनि गेलीं
अश्रूंत तिच्या अन् अनंत काव्यें भरली"

ही कविता बहुतेकांना आवडली. 'मंदारमाले' त ती प्रसिद्धहि झाली. या कवितेवरील बालकवि आणि गडकरी यांची छाया उघडच आहे. आता एवढे आठवते की त्या कवितेपासून, शब्दकळा काय असते याची मला जाणीव झाली आणि गोड गोड अर्थवाहक शब्द वेचण्याची क्लृप्ति सापडली. परंतु आपल्या भोवतीच्या जीवनांतून अनुभूति शोधण्याची व ती पकडण्याची शक्ति मात्र मला अजून अज्ञातच होती.

जीवनानुभूतीचे भावानुभवांत रूपांतर करून स्वत:चे भाव व्यक्त करण्याचा पहिलां मोडकातोडका प्रयत्न 'दसरा' या कवितेत मी प्रथम केला असावा:

"पायीं बेडी वाजे तोवर गावें नाचून
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण"

त्या कवितेतल्या या ओळीमागे थोडा गमतीचा इतिहास आहे, तोहि इथे सांगितला पाहिजे, 'विचारविहार मंडळ' नांवाचे आमचे एक मंडळ होते. त्याचे आम्ही चारपांच सभासद होतो. दसरा हा स्वातंत्र्याचा सण आहे आणि जोपर्यंत आपण परतंत्र आहो, तोपर्यंत हा सण साजरा करण्याचा आपल्याला अधिकार नाही, असा प्रचार आम्ही करीत होतो, हा सण सुतकासारखा पाळावा असेहि आम्ही प्रतिपादीत होतो. अर्थात् आम्हांला अनुयायी नव्हतेच. सर्वांच्या कुचेष्टेचा मात्र आम्ही विषय बनलो होतो. दसऱ्याच्या दिवशी दंडाला काळ्या फिती बांधून आम्ही फिरत होतो. कुठे तरी आमच्या तीनचार माणसांची प्रचंड सभा आम्ही घेत होतो. ही सभाहि आम्हांला गुप्तपणे घ्यावी लागे. कारण त्या वेळी सभाबंदीचा कायदा होता. अशाच एका सभेला मी अध्यक्ष होतो. तेव्हा मी जे भाषण केले, त्याच्या शेवटी उपर्युक्त कविता म्हटली. या सभेची बातमी वर्तमानपत्रात आली आणि 'खुफिया' (सी.आय.डी.) चे शुक्लकाष्ठ आमच्या मागे लागले. ते बरेच दिवस पुरले. या कवितेपासून स्वत:च्या भावना स्वत:च्या शब्दात व्यक्त करण्याची शक्ती म्हणजेच खरी काव्यशक्ति याची जाणीव मनाला झाली.

१९३०-३१ साली (नक्की सन आठवत नाही) 'पहाटतारा' हा छोटा कवितासंग्रह प्रसिद्ध केला. त्यात पार्थिव, कृष्णाकुमार आणि मी अशा तिघांच्या कविता संग्रहित करण्यांत आल्या होत्या. पदराला खार लावून आम्ही हे पुस्तक प्रसिद्ध केले. हा खर्च आमच्या आवाक्याबाहेरचाच होता. पुस्तक प्रसिद्ध झाले, पण त्याचे गठ्ठे तसेच पडून राहिले. बिलासाठी प्रेसचा तगादा चालू झाला. तेव्हा बिल चुकवितां येईना म्हणून आम्ही तोंडे चुकवीत फिरत होतो. या वेळी दत्त प्रेसचे मालक श्री. सराफ यांनी अतीव सौजन्य दाखवून आम्हांला सांभाळून घेतले म्हणून निभावले. हे पुस्तक विकले नाही आणि वर्तमानपत्रांनीहि त्याची दखल घेतली नाही. आमची हौस मात्र पुरी झाली. प्रेसचे कंपॉझिटर आणि प्रेसमन हेच आमचे त्यावेळी एकमेव रसिक होते. अशा रीतीने आमच्या पहिल्या कविता खिळ्यावर चढल्या आणि एके दिवशी जेव्हा ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झालेला "पहाटताऱ्या" वरचा अभिप्राय वाचला, तेव्हा मात्र अक्षरश: आमची कविता खिळ्यावरच चढली असे आम्हाला वाटले. त्या अभिप्रायातले एक वाक्य मला आठवते, ते असे: 'या संग्रहाने पुस्तकांच्या संख्येत भर पडली असली, तरी काव्यांत मात्र मुळीच भर पडली नाही. या अभिप्रायाने आम्हांला वाईट वाटले हे सांगणे नलगे, परंतु त्याने आम्हांला अंतर्मुख केले हेहि तितकेच खरे आहे.

याच सुमारास कै. माधवराव पटवर्धन यांच्याशी माझा परिचय झाला. त्यांनी मला खूप प्रोत्साहन दिले. तुमच्या कवितांतल्या उणीवा तुम्हीच शोधू शकाल. कुणाच्या मार्गदर्शनासाठी थांबू नका, असेहि त्यांनी सांगितले. रावसाहेब र.लु. जोशी यांनीही मोठ्या ममतेने मला वागविले आणि उत्तेजन दिले. त्यांच्या बैठकीत त्यांच्या तोंडून ऐकलेल्या रे. टिळकांच्या आणि बालकवींच्या चरित्रांतील गोष्टीनी कवि आणि काव्य यांच्या संबंधीच्या माझ्या जाणिवा विस्तारल्या. डॉ. केतकरांनीहि 'पहाटतारा' या पुस्तकांचे छोटेसे परीक्षण 'विहंगमाले' त लिहिले. त्यांत त्यांनी म्हटले होते, 'तुमच्या कवितेवर मी टीका केली आहे, का की, त्यातल्या काही कविता मला आवडल्या आहेत.' ह्या दोनतीन अधिकारी व्यक्तीच्या उत्तेजनाने विझू पाहणारी ठिणगी पुन्हा जागृत झाली. १९३३।३४ साली फटत्कार हा आमचा दुसरा संग्रह आम्ही काढला. खपाच्या दृष्टीने हाहि आंतबट्टयाचाच व्यवहार ठरला, पण ह्या संग्रहाने आम्हाला प्रसिद्धी दिली. बऱ्याच वर्तमानपत्रांचे आणि साहित्यिकांचे लक्ष या संग्रहाने वेधले. ह्यात देखील पार्थिव, कृष्णाकुमार आणि मी अशा तिघांच्याच कविता होत्या. श्री. वि.स. खांडेकरांनी हा संग्रह वाचून मला आपणहून पत्र लिहिले आणि "ज्योत्स्नेसाठी" माझ्या कविता मागविल्या.

ह्या संग्रहांत ज्या कविता मी समाविष्ट केल्या किंवा त्यांच्या प्रसिद्धीच्या आसपास ज्या कविता लिहिल्या, त्यांना काही एक आकार, घाट येत होता, एक व्यक्तित्व येत होते, असे आता वाटते. "सूं सूं सुटुं दे बाण पारध्या" या कवितेची कल्पना मला 'ज्ञानप्रकाशां'तील प्रतिकूल टीकेमुळे स्फुरली, असे स्मरते.

परंतु त्या टीकेला उद्देशून कविता लिहिणे प्रशस्त वाटेना. तो दुबळेपणा होईल, असे वाटे. मग जीवनाची पारध करणारी जी नियति तिला आव्हान, अशी या कवितेची भूमिका कल्पिली. भूमिका, कल्पना, हे शब्द मी साभिप्राय वापरले आहेत. त्यावरून, त्यावेळी कवींची कविता रचण्याची पद्धति, सर्जनाची प्रक्रिया कशी होती, ह्याची तुम्हाला कल्पना येईल. कवि एखादा विषय, एखादी कल्पना अथवा एखादा विचार घेऊन, त्याला काव्यरूप देण्याचा प्रयत्न करीत असे. त्या विचाराला, उपमा-रूपकाने नटवून काव्यमय भाषेत मांडीत असे. मी देखील ह्याच पद्धतीने रचना केली. परंतु रचनेच्या आवेगांत आलेल्या आत्मनिष्ठेमुळे विचारांचे भावानुभूतीत रूपांतर होत गेले, हे जेव्हा मला आकळले तेव्हा माझ्या लेखनाला वेगळा मार्ग दिसला. एका कोंडमाऱ्यांतून, साचेबंदपणांतून माझ्या कवितेची मुक्तता झाली. 'कुछ और वसअत चाहिये मेरे बयां के लिये' असे "गालिबप्रमाणे" माझे हृदय आक्रंदत होते. व्यापक मुक्त आविष्कारपद्धतीसाठी धडपडत होते. त्याला वाट दिसली. 'गुन्हेगार', 'पदरंजन', 'ये चित्र कराया पूर्ण गडे' या कवितेतून हा आत्मनिष्ठ आविष्कार साध्य होऊ लागला. भावानुभूतीच्या आत्मनिष्ठ आविष्काराला कविवर्य तांब्यांनी वापरलेली गेय पद्ययोजना, मध्यवर्ती कल्पनेला चित्रित करणाऱ्या ध्रुवपदाची बांधणी अनुकूल आहे, असे दिसून आल्यावरून मी पुढे पुढे त्याच पद्धतीचा अवलंब करू लागलो. त्यांचा हा प्रभाव त्या पिढीच्या सर्वच कवीवर दिसून येतो. तांब्यांची कविता मला खूप आवडते. त्यांचे मी अनुकरणहि केले आहे. परंतु त्यांच्या घराण्याचे नांव माझ्या कवितेला लावता येणार नाही. तिचे केशवसुत-बालकवींच्या कवितेशीच अधिक नाते आहे, असे मला वाटते. कारण माझ्या कवितेचा प्रकृतिधर्म वेगळा आहे. प्रसन्न, कृतार्थ आणि तत्त्वचिंतक अशा भाववृत्तीतून तांब्यांची सर्व कविता अवतीर्ण झाली आहे, तर असंतुष्ट, आर्त, करूण आणि बंडखोर अशा वृत्तीतून माझी कविता लिहिली गेली आहे.

रचनापद्धतीविषयी, आकृतिबंधासंबंधाने मला असे म्हणायचे आहे की तांबे ज्या पद्धतीने रचना करीत, त्या पद्धतीने हिंदी, बंगाली, कर्नाटकी इत्यादि सर्व भाषांतील कवि त्या काळी रचना करीत होते. त्यांनी वापरलेल्या मात्रा, जाति भिन्न भिन्न असतील, पण सर्वाच्या रचनेचा 'पॅटर्न' एकच होता. हिंदी कविता ह्यावेळी माझ्या बरीच वाचनांत आली होती. निराला, सुमित्रानंदन पंत, मैथिलीशरण गुप्त, महादेवी वर्मा, बच्चन हे कवि-कवियित्री याच पद्धतीने कविता लिहीत. त्यांचाहि माझ्या रचनेवर परिणाम झाला असावा. उर्दू कवीहि या वेळी मी वाचले. अभिव्यक्तीच्या काही तऱ्हा, आवेश आणि मादक कल्पनाविलासाची नजाकत मी तिथून उचलली, गालिब, इकबाल, जोष, सरदार जाफरी, मखदूम हे कवि मला आवडले होते. रविकिरण मंडळांतील कवींच्या कविताहि मी वाचल्या होत्या. माधव ज्यूलियन आणि यशवंत यांच्या कविता मी आवडीने वाचीत असे. परंतु त्यांच्या काव्याशी मी फारसा समरसूं शकलो नाही. यशवंतांच्या रचनेची सफाई, त्यांची खडी वाणी आणि पारदर्शक भावना मनाला मोहीत असे. रविकिरण मंडळाने कविता सामान्य माणसापर्यंत घरापर्यंत नेऊन पोचविली, सामान्य माणसांत कवितेची आवड निर्माण केली हे खरे. पण ही सामान्यांची आवडच पुढे तिला मर्यादा ठरली असावी.

माझी 'मायभाषेस' ही कविता, मराठवाड्यांतील लोकांच्या एका विशिष्ट भावनेची आणि या प्रदेशांत चालू असलेल्या निजामी जुलुमाविरूद्ध त्यांच्या मनांत उसळत असलेल्या असंतोषाची निदर्शक आहे. मराठीची सर्व प्रकारे गळचेपी चालू होती. आमचे सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य तर हरण झालेलेच होते. उच्चार स्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्यहि हिरावून घेण्यात आले होते. सभाबंदीच्या कायद्यामुळे शब्द उच्चारता येत नव्हता तर प्रकाशनावर बंदी घालणाऱ्या कायद्यामुळे एक शब्द छापता येत नव्हता. मराठी वर्तमानपत्रे, नियतकालिके यांना परवानगीच देण्यात येत नव्हती. अशा प्रकारे गुलाम केलेल्या मराठी जनतेवर उर्दू ही राजभाषा म्हणून लादण्यांत आली. ह्यामुळे त्या जुलुमी राजवटीविरूद्ध जनतेत असंतोष निर्माण झाला होता. या जुलमाच्या प्रतिकाराचे प्रतीक म्हणून आमचा मराठी भाषेचा उद्घोष होता.

उर्दूबद्दल माझ्या मनांत इतका द्वेष निर्माण झाला होता की, उर्दू काव्य मला आवडत असतांना देखील मी उर्दू शिकण्याचे नाकारले. शिक्षणाचे माध्यम उर्दू झाले तेव्हा मी हैद्राबादेस गेलो आणि इंग्रजी माध्यमांतून शिक्षण देणाऱ्या शाळेत नाव घातले. त्या वेळच्या तरूण मराठी पिढीची प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठीच मी हे सांगितले आहे. ही सामाजिक चीडच त्या कवितेत व्यक्त झाली आहे. आम्हांला कितीहि दडपण्याचा प्रयत्न केला, आम्ही नष्ट झालो तरी आमची मराठी भाषा मरणार नाही, हे आव्हान तीत सशब्द झाले.

"बंदी अशा गायनातें करोनी गळे आमुचे कापिले हे तरी
गातील गाणीं मराठी कबंधें मराठी खुल्या माळरानावरी"

मराठी भाषेसंबंधी माधव ज्युलियन आदि कवींनी ज्या गौरवपर कविता लिहिल्या, त्यापेक्षा, ह्या भागांतील मराठी भाषेवरील कवितांत व्यक्त होणारी भावना अशी थोडी वेगळी होती. श्री. महाजन, नांदापूरकर यांनीहि मराठी भाषेविषयी कविता लिहिल्या आहेत. श्री महाजनांनी तर एका कवितेत स्पष्टच म्हटले आहे:

"इथे ही यावनी भाषा स्वरूपें पूतना झाली
विषाने वंश हा वाटे उरूं नेदी मराठीचा"

मराठी भाषेवरील अत्याचाराविषयीच्या चिडीबरोबर, सामाजिक व आर्थिक विषमतेबद्दलचा असंतोष, राजकीय दास्याविरूद्ध प्रतिकाराची भावना माझ्या मनात घुमसत होती. उदरभरणाच्या चिंतेने दीन होऊन या द्वेषविषय बनलेल्या राजवटीतच कारकुनी करून मी पोट भरीत होतो, त्यामुळे या लाचारीबद्दल स्वत:चीहि लाज, चीड वाटत होती. गुलामगिरीची ही बंधने तोडली पाहिजेत, आपल्याला काहीच करता आले नाही तरी या जुलुमाविरूद्ध आवाज तरी घुमविला पाहिजे, असे तीव्रतेने वाटत होते. धार्मिक बंधनांचाहि जाच मी पाहिला होता. ह्या सामाजिक जाणिवांतून, अनुभवांतून 'तव अग्निपंख नभि फडफडुं दे', 'मूर्तिभंजक' अशा कविता लिहिल्या गेल्या. एक सामान्य व्यक्ति या नात्याने जे मी अनुभविले त्याचाच कवि या नात्याने आविष्कार केला आहे. 'तव अग्निपंख' या कवितेत

"माणुसकीहुनी आत्मे ढळले
देव देवळांतून भटकले
न्यायावर उकिरडे माजले"

असे वर्णन करून, 'असंतोष पेटवी जनमनीं' असे क्रांतिदेवीला आवाहन १९३३ साली मी कवितेत केले. हे मी जाणतो की काव्याच्या विकासाच्या दृष्टीने कलासौंदर्यांच्या संदर्भात अशा गोष्टीला महत्त्व नाही. अशा आवाहनामुळे कवितेचे कलात्मक सौंदर्य वाढते किंवा नावीन्य येते असेहि नाही. या निकषावर काव्याचे मूल्यमापन करणे बरोबर होणार नाही, हेहि खरे आहे. परंतु हा आजचा विचार झाला. त्या काळी ही गोष्टहि काव्य-गुणांत गणली जात होती.

१९३३ ते १९४८ या काळांत मी जे लेखन केले, त्यातील बऱ्याच कवितांचा स्थायीभाव क्रांतिपूजनच होता. 'अमरज्योत', 'विराट जागरण', 'जयजयकार', 'निर्भय गान', 'नवे वर्ष', 'जा पिऊन घोटभर पाणी', 'जन्मठेप', 'मूर्तिभंजक', 'कवीस आव्हान', 'सांडितां कुणास्तव रूधिर तरी', 'युगचाहुली' इत्यादि स्फुट कविता आणि अग्निपथ व आशिया ही खंडकाव्ये, यांचा या संदर्भात उल्लेख करतां येईल. ज्या काळांत मी जगत होतो, ज्या मातीत आणि आकाशाखाली राहत होतो, त्यातून हे कविताविषय मला मिळाले आहेत, त्यासाठी मला निराळा प्रयत्न करावा लागला नाही. "बादलसे चले आते है मजनू मेरे आगे" असे एका उर्दू कवीने म्हटले आहे. एका वेगळ्या अर्थाने क्षितिजावर चढणाऱ्या ढगांकडूनच हे विषय

माझ्याकडे धावत आले. त्या वेळची परिस्थितीच तशी होती. सर्जनशील मुक्त मनाला जी बंधने जाचत होती, ज्या वेदना होत होत्या, मुक्तीसाठी त्यांची जी धडपड चालली होती, त्यांचाच तो उद्‌गार आहे. मराठवाडा ह्या शृंखला तोडण्यासाठी जो लढा देत होता त्याचाहि तो हुंकार आहे. धर्माधिष्ठित फॅसिस्ट झुंडशाहीचे आमच्या प्रदेशात थैमान चालले होते. या सरंजामशाही अत्याचाराला नेस्तनाबूद करण्यासाठी जो लढा येथली जनता देत होती, त्याचे क्रांतिगान मी माझ्या कवितांतून गाइले आहे. कवीदेखील इतर माणसांसारखाच जगतो, अन्न–पाणी घेतो, सुखदु:खे भोगतो, इतरांसारखाच तो शस्त्राने जखमी होतो आणि पुष्पाच्या स्पर्शाने पुलकित होतो. समाजांत राहून माणूस या नात्याने तो जे हे अनुभव ग्रहण करतो, त्यांनाच भावानुभूतीचे रूप देऊन, ते तो समाजाला पुन्हा दान करतो.

१९३८ मध्ये सुरू झालेला हैद्राबादचा सत्याग्रहसंग्राम ही एक ऐतिहासिक घटना होती, एक ऐतिहासिक शक्ति (historical force) होती. त्या शक्तीच्या वेग तेजांतून या माझ्या गीतांचा उगम झाला. आता त्या संग्रामाचे काही रंग फार फिके झाले असतील किंवा काही ठिकाणी अति गडद झाले असतील, हा भाग वेगळा, तो माझा दोष असेल– तो मी स्वीकारतो.

हैद्राबादच्या सत्याग्रहाचा तो दिवस मला अजून आठवतो. विवेकवर्धिनी कन्या–शाळेजवळच्या पटांगणांत हजारो लोक हा नि:शस्त्राचा संग्राम पाहण्यासाठी जमले होते. अलीकडे शस्त्रसज्ज निजामी पोलिसदल लॉऱ्या घेऊन खडे होते. लोकांची गर्दी मोडण्यासाठी लाठीमारहि मधूनमधून होत होता. परंतु लोक हटत नव्हते. त्या भीतिग्रस्त चकित गर्दीत एक दुबळा सावळा संन्यासी उच्चरवाने लोकशाही आणि मानवी अधिकाराची घोषणा करीत होता. त्याचे निर्लोम मस्तक उन्हांत चमकत होते. ते शब्द नीटसे ऐकायलाहि येत नव्हते. पण त्या उन्हांत, आकाशाला भिडलेली शतकानुशतकांची भीति एकदम निखळून पडली आणि काचेप्रमाणे भंगून तिचे तुकडे तुकडे झाले असे मला भावले. त्याचेच मनात चरण बनले:

"धन्य आज दिन भीती सुटली
प्रभा नवी रवि–बिंबा चढली
त्यागकांति ज्योतीत प्रगटली
जळतां शलभ अपार
करूं या अखंड जयजयकार"

ही गीते गातांना केवळ हैदराबादच्या मुक्त संग्रामाचेच दृश्य माझ्या डोळ्यांसमोर नव्हते, ही गोष्टहि येथे लक्षांत घ्यायला हवी. भारताच्या स्वातंत्र्य–युद्धाचा आणि मानवी स्वातंत्र्यासाठी चाललेल्या समराचा एक भाग म्हणून मी त्या घटनेकडे बघत होतो. माझा हा दृष्टिकोन, 'आशिया' या खंडकाव्याने आणि 'नागासाकीतील अंध' आणि '३८० अक्षांश' या काव्यांवरून प्रत्ययास येईल.

१९३० ते ४०–४५ हा काळ, मानवी स्वातंत्र्याला दडपणाऱ्या अत्याचारी शक्तींना प्रतिकार करणाऱ्या लोकशाही शक्तींच्या जन्माचा काळ होता. जगातल्या प्रत्येक देशात ह्या क्रांतिकारक शक्ती दमनशक्तींना प्रतिकार करीत होत्या. जर्मनीतल्या फॅसिस्ट डिक्टेटरशिपच्या संकटाने युरोपच नव्हे, तर सर्व जग हादरले होते. सोवियट रशियांतील स्टॅलिनशाही आपल्या पोलादी पंजाने मानवी स्वातंत्र्याचा खून करून आपले रक्ताळलेले हात साम्यवादी समतेच्या वस्त्राला पुशीत होती. स्पेनच्या यादवी युद्धांत लोकशाही कोसळून पडली होती. आणि आंतरराष्ट्रीय साम्यवादाच्या बुरख्यांत वावरणाऱ्या आणि मानवी स्वातंत्र्याचे अपहरण करणाऱ्या फॅसिस्ट व साम्यवादी झोटिंगशाहीचे खरे स्वरूप उघडे पडले होते. समाजवादी समतेच्या घोषणांचा दंभस्फोट झाला होता. इटलीत तिथल्या लोकशाहीच्या नरडीला नख दिलयानंतर मुसोलिनी, अबिसीनियाचे स्वातंत्र्य आपल्या लोखंडी टाचेखाली चिरडून टाकीत होता.

आशियांत जपानी फॅसिस्ट सर्व चीन पादाक्रांत करीत धावत होते. भारतात १९३०–३२ च्या कायदेभंगानंतरहि ब्रिटिश साम्राज्यशाही भारतावरील आपली पकड सैल करायला अद्याप तयार होत नव्हती. त्यामुळे सत्याग्रहाच्या मार्गाबद्दल शंका, अविश्वास लोकमनांत डोकावत होते आणि पुन्हा क्रांतिकारक कटाचे स्फोट होत होते. लांब, क्षितिजावर, दुसऱ्या महायुद्धाचे मेघ गडगडत होते. अशा धुमसत्या काळांत 'प्रतिकारा'ची कविता निर्माण होणे अपरिहार्यच होते. सर्व देशांत नि भाषांत अशी कविता ह्या कालखंडांत निर्माण झाली. मराठीतहि असे क्रांतिपूजक काव्य थोड्या फार प्रमाणांत अवतरले. कुसुमाग्रजादि कवींच्या काव्यांत या युगाच्या चाहुली ऐकू येतात. माझ्याहि कवितेत 'युगचाहुली' चे हे पडसाद उमटले आहेत:

"मी ऐकें त्या चाहुली
युगांच्या ऐकें त्या चाहुली
पायरवांनी ज्या बळीराजा दचके सागरतळी
शिरीं धुमारे अपमानाचे
तळीं निखारे पराभवाचे
अमृतघनांची स्वप्ने घेऊन मग कविता चालली
धरणी कांपे पदशब्दांनी
कळे न येई कोण कोठुनी
विजेपरी कडकडुनि खडावा वाजती दिड्.मंडळी "

मात्र भारतीय प्रतिकार काव्याला थोडीशी वेगळी मुरड पडली. हा महात्मा गांधीच्या अहिंसात्मक प्रतिकाराच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे. आमच्या क्रांतिकाव्यांत बलिदानाचे आत्माहुतीचेच गाणे सूरशिगेला चढले:

"विश्वाचिया अखिल मंगल कारणाला
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला"

हे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दोन दशकांपूर्वी दिलेले आव्हान, वेगळ्या अर्थाने प्रगट झाले होते. राजकारणापेक्षा, हे 'मंगलकारण' च अशा कवितेची खरी प्रेरणा आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि मानवतेचा विध्वंस करून एकतंत्री सत्ता चालवणाऱ्या सर्वाधिकाऱ्याला आणि अतिमानव Superman –बनण्याच्या उन्मादांत, जनतेला तुडविणाऱ्या झोटिंगशहाला नष्ट करण्यासाठी जनता कशी बद्धपरिकर होते आणि लोकक्रांति घडवून आणते याचेच चित्र मी 'अग्निपथ' या काव्यांत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. पुराणांतली वेनराजाची कथा आधारासाठी घेऊन लोकशाहीची समुदायभावना कथाकाव्य आणि नाट्यकाव्याच्या स्वरूपात त्यांत सशब्द केली आहे.

"करूं तिथे अघात पहिला करूं तिथे आघात
स्वर्गांतुन दुबळ्यांवर पडतो जेथे वज्राघात
शिव नयनांना बघूं न देती
सत्य वाणिला वदूं न देती
प्रगतीला शृंखला घालिती
मानवतेस्तव वळिती जेथे फास मानवी हात
पहिला करूं तिथे आघात
प्रतिकारा तृणपातें उठलें
आसन इंद्राचें हादरले
वज्राशीं झुंजण्या बाहुल्या मातीच्या सजवूं

ध्वज आज नवा उभवूं
राजाचें सिंहासन उलथें
धरणी फुटुनि तारांगण कलथे
ढासळलेले बुरूज जगाचे अग्निफुलीं फुलवूं
ध्वज आज नवा उभवूं "

तसेच 'आशिया' या काव्यांत मानवी स्वातंत्र्यासाठी झुंजणाऱ्या आशियांतल्या मानवतावादी शक्तींचे, अवध्य, अनंत क्रांतिपुरूषाचे दर्शन घडविण्याचा एक प्रयत्न आहे.

ह्यापूर्वीच्या, 'नवे वर्ष', 'मूर्तिभंजक', 'अरूण तरूण संगीत' इत्यादि कवितांत प्रलयाला, विध्वंसाला आव्हान केले आहे. राजदंड, यज्ञवेदि, स्वर्मंदिर, या प्रतीकांनी दमनयंत्र बनलेल्या धर्म आणि सत्ता यांच्या मूर्तींना फोडणाऱ्या मूर्तिभंजकाचे विचारानुभव रेखिले आहेत. 'नवे वर्ष' या कवितेत, दुसऱ्या महायुद्धांतील युद्धदेवाचे वर्णन केले आहे. जुने जग, जुन्या परंपरा यांचा नाश झाल्यावर, त्यातून आपोआप नव्या सर्जनशक्ति, नवे जग उत्पन्न होईल असा आशावाद व्यक्त केला आहे. प्रत्यक्षांत ही आशा अजून सफल झालेली नाही. राजकारणी मुत्सद्यांचे, तत्त्वज्ञांचे अंदाज जिथे चुकले, तिथे भावविवश कवीची आशा फसली असल्यास आश्चर्य किंवा खेद मानावयास नको.

ह्या कवितांत उणीवाहि फार आहेत. पुष्कळदा त्याच त्याच कल्पनांची पुनरावृत्ति झाली आहे. काही टीकाकारांच्या मते ती अति रक्तरंजित झाली आहे. काही ठिकाणी कृत्रिम वाटाव्या, घृणा यावी अशा भीषण कल्पनांचा अतिरेकहि झाला आहे. या सर्व दोषांची मला जाणीव आहे. परंतु मी ज्या परिस्थितीत ही कविता लिहिली आहे, तिचाहि हा अपरिहार्य परिणाम असेल. एकच गोष्ट सांगतो. हे माझे समर्थन नाही. फक्त वस्तुस्थितीचे निवेदन आहे, ही गोष्ट मात्र आपण लक्षात घ्यावी. ज्यावेळी 'रूद्रवीणा' या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ औरंगाबाद शहराच्या एका भागांत होत होता, त्या वेळी दुसऱ्या भागांत एका माथेफिरूने एका तरूणाचा खून केला होता. हा केवळ योगायोगहि म्हणतां येईल, पण ते रूधिरसिंचन माझ्या कवितेवर झाले असले तर ते अवास्तव म्हणता येईल का? असे का व्हावे हा मलाहि प्रश्न आहे. हाच प्रश्न मी एका रूबाईत विचारला आहे.

"आणिलीं देवि मी कविताकमळें काही
स्वप्नांची सुमनें दळें चांदण्याची ही
अर्पितां परी हा अनघ अंजलीभार
कमलावर दहिवर रूधिर बनुनि कां येई?"

प्रबोधन किंवा संदेश हे कवितेचे कार्य नव्हे, असाहि एक विचार काव्यप्रांतांत आहे. कलावादी, सौंदर्यवादी दृष्टीने तो बरोबर आहे. जेव्हा मी प्रबोधन काव्य किंवा प्रतिकार काव्य असे शब्द वापरतो तेव्हा कोणताहि सामाजिक किंवा राजकीय प्रचार मला अभिप्रेत नसतो. प्रचाराला माझा विरोध आहे. कवितेतील भाववृत्तीला, उत्कटतेला व सौदर्यालाच मी महत्त्व देतो. परंतु आधुनिक मराठी कविता केशवसुतांच्या वाणींतून अवतरली, ती प्रेषिताच्या आवेशांतच, उद्‌बोधनाचे शब्द घेऊन, ही वस्तुस्थितीहि दृष्टीआड करतां येत नाही.

"पद्य–पंक्तिची तरफ आमुच्या करीं जगानें दिली असे
टेकुनि ती जनताशीर्षावरि उलथुनिया देउं कसे?"

ह्या 'नव्या शिपायां' त काव्य नाही असे कोण म्हणेल? यांतले प्रबोधन आणि काव्य वेगळे करता येईल का? ह्या दोन गोष्टी इथे कशा एकजीव झाल्या आहेत. राजकीय व सामाजिक प्रबोधनाच्या तळमळींतून, अनुभूतींतून जन्मलेली कविता आनंदाबरोबर जाणिवांच्या कक्षाहि वाढवते. आपल्या अंतरंगांत

एक उत्कट भाववृत्ति जागृत कारणे हीच कवितेची अंतिम कसोटी असेल, तर अशा कवितांनाहि काव्यांत स्थान आहे, असे मला वाटते. अनिल, विंदा करंदीकर, शरच्चंद्र मुक्तिबोध या कवींनी अशा काही जिवंत प्रभावी कविता लिहिल्या आहेत, ही मराठी कवितेला अभिमानाची गोष्ट आहे. परंतु अशी कविता आज फार दिसत नाही. आजकाल अशा कविता लिहिणे कवीना कमीपणाचे वाटते काय? मग अशा प्रबोधनप्रेरित किंवा प्रतिकार-काव्याला काही भविष्यकाळ आहे का? सध्याच्या परिस्थितीत ह्या काव्यप्रकाराला विशेष आशा दिसत नाही. संघर्षाच्या काळांत आघाताच्या वेदनेत आणि आहुतीच्या धगीत ही कविता जन्मते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांत अशी कविता मराठीत लिहिली गेली नाही, त्याचे हे एक कारण असेल का? वस्तुस्थिती अशी आहे की, आज जीवनांतले आदर्श ढासळले आहेत. ध्येयाच्या शुद्धतेबद्दल, प्रामाणिकपणाबद्दल कोणाच्या मनांत विश्वास उरलेला नाही. शिवाय आजच्या परिस्थितीविरूद्ध बंड झाले तर त्यांतून चांगलेच निष्पन्न होईल अशी खात्रीहि देता येत नाही. त्यामुळे हे प्रतिकारकाव्य मंदावले असावे. तरीहि थोडी पलीकडे दृष्टि फेकल्यास असे दिसून येते की, अजूनहि मानवी स्वातंत्र्याची व मानवतेच्या मूल्यांची प्रतिष्ठापना झालेली नाही. वर्णभेद, दारिद्र्य, सत्तापिपासा यांनी माणूस गांजला-भरडला जात आहे. प्रलयकारक अणुशस्त्रांच्या छायेंत युद्धाच्या भीतीने मानव ग्रस्त झालेला आहे. विश्वशांति संकटांत आहे. या जाणिवा या प्रकारच्या कवितेला आज प्रेरक ठरणार नाहीत का? कोणत्याहि राजकीय प्रणालीला शरण न जातां, केवळ मानवतेच्या प्रतिष्ठेच्या ध्येयाने आणि व्यक्तिस्वातंत्र्य-रक्षणाच्या तळमळीने प्रस्फुरित होणारी प्रतिभा अशा प्रकारची सुंदर कविता आम्हाला देऊ शकेल,असे अजूनहि मला वाटते. पण काळच काय ते याचे नक्की उत्तर देऊ शकेल.

जीवनांतील नव्या वैयक्तिक व सामाजिक आदर्शाचा शोध घेतांना, जुने शिलाशेष झालेले आदर्श मोडण्याची, मूर्तिभंजनाची कामिगिरीहि आपाततः करावी लागते. माझ्या 'मूर्तिभंजक' या कवितेत हा विचारानुभव व्यक्त झाला आहे. लहानपणी मी देवादिकांच्या स्तवनपर कविता लिहिल्या होत्या. माझी पहिली कविता देव गजाननाला उद्देशून होती असे आठवते. पुढे १९४० मध्ये "खंड खंड करीन आज या पुराणमूर्ति" असे मी म्हटले आणि पुढे एका रुबांईत, 'मी एक मातीचा पुतळा असलो तरी हे ईश्वरा, मला जन्म देऊन तू तुझ्या कलेचा एक निर्दय टीकाकार निर्माण केला आहेस, हे लक्षांत ठेव', असे मी ईश्वराला बजावले आहे. मूर्तिपूजेपासून, मूर्तिभंजनापर्यंत झालेल्या या कल्पनेच्या प्रवासाप्रमाणेच, विविध जीवनाभूतीच्या आणि भावसौदर्यांच्या शोधांत माझ्या कवितेचा प्रवास चालला आहे. मी वाट चुकलो आहे की काय ते रसिकांनी ठरवावे. संकेतस्थल मला गाठता आले नाही तरी, प्रवासांत मी कसूर केली नाही एवढेच मी सांगू शकतो.

आतापर्यंत मी जे बोललो त्यावरून आपला असा समज होईल की 'संदेश', 'मानवता' असे शब्द ज्यांत आहेत त्यालाच काव्य म्हणावे असे काही सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. वस्तुतः तसे मला मुळीच म्हणायचे नाही, त्या दृष्टीने कला निर्हेतुक असते. कविता किंवा कला काहीच सांगत नाही. कवीला किंवा कलावंताला जे विविध अनुभव येतात, त्या अनुभूतींतील भावसौंदर्य आणि भावसंगति यांचे दर्शन घडविले की कलेचे व कलावंताचे कार्य संपते. कला काही सांगण्यासाठी नसते. जीवनांतल्या विविध भावानुभूतींचा ती फक्त आविष्कार करते. सुख, दुःख, निराशा, आनंद, प्रेम, द्वेष, सुंदरता, कुरूपता इत्यादि अनेक गोष्टींनी हे जग नटलेले आहे. ह्या भावभावनांच्या पुनःप्रत्ययासाठी त्याच्या आंतरिक संगतीच्या, सौंदर्याच्या प्रतीतीसाठी कलेचा किंवा काव्याचा सारा व्यापार असतो. निसर्गाच्या कणाकणांत आणि मानवी मनाच्या सूक्ष्मतरल हालचालीत अपार सौंदर्य भरलेले आहे. रंग, रूप, गंध, शब्द, स्पर्श, रस, आकार, गति यांच्या रूपांत विश्वांतील अनंत सौदर्य घडलेले आहे. या संवेदननांच्या अनुभतींतून एक नवीन भावसृष्टि कवि निर्माण करतो आणि त्या भावसृष्टीच्या दर्शनाने एका नव्या सौंदर्यप्रतीतीचा व आनंदाचा आपल्यास लाभ होतो. या प्रतीतीत खरे काव्य आहे. अशा काव्यांत तुमचा-आमचा पुनर्जन्म होतो आणि आपला

अनुभव नवा देह व नवे प्राण घेऊन अवतरतो. ह्या अपार सूक्ष्म भावानुभूतीच्या नव्या नव्या प्रतिमा, नवे नवे आकार निर्माण करणे हीच काव्याची अनंत क्रीडा आहे. ही असीम आनंदाची क्रीडा आहे. भावानुभूतींचे दान करण्याची प्रतिभावंताला, कवीला तळमळ असते. ही तळमळ, ही आर्त अपेक्षा, ही महत्त्वाकांक्षा, हेच त्याचे जीवनगीत असते, हीच त्याची व्यथा असते , तशीच शक्तीहि असते.

किरण आजच्या नयनांमधले
स्फुरण आजच्या हृदयामधलें
या विश्वासी कसें पोचवूं म्हणूनी हृदय व्यथीत
हें माझे जीवनगीत
उन्हें आजची तुम्हां न दिसतिल
फुलें आजचीं तुम्हां न मिळतिल
ऊब, गंध हे भरूनि ठेवुं मी केवि शब्दपंक्तीत
हें माझे जीवनगीत.

विचारानुभवाच्या शोधांत वाटचाल करणाऱ्या माझ्या कवितेला सौंदर्याची सादहि ऐकू येत होती. प्रीतीचें मोलहि तिला कळत होते.चांदणे प्यालेल्या क्षितिजांत, संध्याकाळच्या गावसीमेवरील सावल्यांत आणि पिकणाऱ्या फळांत, उत्तर ध्रुवावरील रात्रींतील प्रियालिंगनाच्या पहिल्या स्पर्शाची ऊब रंगलेली मला दिसत होती. नक्षत्रांच्या मेखलेंत त्याचेच गीत झंकारत होते. प्रीतीचे हे स्वप्न आणि ही रात्र आपल्या डोळ्यांतील दवांत सांभाळण्याची मी प्रीतिदेवतेला विनंती करीत होतो. प्रियेच्या स्मिताची चांदणी वाट अस्तित्वात आहे म्हणूनच ह्या दु:खी जगाला आयुष्याचा खडतर प्रवास सुसह्य होतो, ही जाणीव मनाला फुलवीत होती. या अलौकिक शक्तीचा अंत लागणे अशक्य आहे. प्रीतीच्या रहस्याने कधी मुग्ध, चकित होऊन, तर कधी हरखून, तर कधी विव्हळ होऊन, प्रीतीची विविध गीतें मी लिहिली आहेत. प्रीतीची हुरहुर, वेदना, उन्माद आणि तृप्ति यांची बेहोष गाणी मी गाइलीं आहेत. निसर्गाबरोबरहि रमलो आहे. लाकूड होऊन पडलेल्या वाटेबरोबर चाललो आहे. विजांची स्वप्ने घेऊन येणाऱ्या आषाढघनांच्या रंगाने रंगलो आहे, जलवंतीच्या फेनाचे चाळ लेवून नाचलो आहे. ओल्या हिरव्या दिवसांत फुलणाऱ्या विष्णुकांतीच्या फुलांत मला इंद्राच्या हजार डोळ्यांचा साक्षात्कार झाला आहे. मनांतल्या प्रश्नांप्रमाणे उभे राहणारे ताड मी पाहिले आहेत. पारिजाताच्या फुलेांत फुलणारे कालातील दुखरे स्मित मी टिपले आहे आणि क्षितिजावर उगवणाऱ्या चंद्राच्या अर्धबिंबांत, कालकूट पिण्यासाठी वाकलेल्या शिवाच्या अधरबिंबाचे दर्शन घेतले आहे. निसर्ग–सौंदर्य आणि प्रीतीची मधुर भावना यांनी विणलेल्या इंद्रधनुष्याचे तोरण माझ्या अंधाराच्या दारावर मी बांधण्याचा प्रयत्न केला आहे. या दारावर वाजणारी नक्षत्रांची टिचकीहि मी ऐकिली आहे. या प्रीतीनेच मला चंद्रा–अमृताच्या कथा सांगितल्या आहेत.

'त्या तरूतळी विसरले गीत' या कवितेच्या जन्माची कथा तुम्हांला गमतीची वाटेल. नसतेपणांतले हे असतेपण मोठे अद्‌भुत आहे. हैदराबाद ते हिमायतसागर या रस्त्यावर एक मोठे झाड होते. जमिनीशी लवलेल्या फांद्याचे आणि घनगर्द सावलीचे, त्याच्या घनदाट शीतल सावलीत उन्हाचे शेकडो सुंदर कवडसे उमटलेले मी एके दिवशी पाहिले, तेव्हा या झाडाशी, या कवडशांत, प्रियकराची वाट पाहत एकादी प्रणयिनी उभी असती तर या चित्राला किती पूर्णता आली असती, अशी कल्पना प्रथम मनाला स्पर्शून गेली आणि या मनोज्ञ निसर्गदृश्यांतून ती कविता स्फुरली. त्या कवडशांत हरवून जावे असे प्रथम मनात आले. त्यांतून हरवलेल्या गीताची जाणीव उमटली. प्रत्येकाच्या मनातले एकादे गीत असेच कुठे तरी विसरून राहते जीवनगीताचे चरण दुभंगतात आणि मग त्या विसरल्या गीताची आठवणच त्याचे जीवनधन बनते नाही का? 'ये चित्र कराया पूर्ण गडे' या कवितेचा उगम तर एका शब्दाच्या चुकीत आहे. "Come to fill your Pitcher" ही रवींद्रनाथ टागोरांची एक कविता आहे. एके दिवशी ही कविता मी एका मित्राला

आठवून सांगत होतो. सांगताना मी 'Pitcher' शब्दाच्या ऐवजी 'picture' असा चुकीचा शब्द उच्चारला. चूक माझ्या लक्षात आली. परंतु या चुकीने माझे माप वेगळ्याच सौंदर्यानुभूतीने भरले.

वेश्याजीवनाचे एक वेगळे दर्शन घडविणारी 'लोटूं दे मज दार' ही कविता एक सत्य प्रसंग पाहूनच सुचली. हैदराबादेंतील गौळीगुडा या शहराच्या मध्यवर्ती भागांतच तेव्हा वेश्याची वसती होती. या वसतीवरून माझ्या घराला वाट होती. एके दिवशी संध्याकाळी असाच जात होतो. त्या स्त्रिया पाराशीच उभ्या राहून गिऱ्हाईक पटवीत. प्रसंगी सावज हेरून, खुणा करीत, कधी कधी हाकहि घालीत. नित्याप्रमाणे त्या संध्याकाळच्या कुबट अंधारांत बाजार 'गरम' होता. बसक्या घराच्या एका दाराशी एक तरूण स्त्री उभी होती. पंधरा–सोळा वर्षाचा एक पोरसवदा तरूण तिच्याशी लगट करीत होता. ती रागाने त्याला म्हणत होती, "चल जा, बडा आया मोहब्बत करनेवाला! होटोंका दूध भी अभी नहीं सूखा. जा इस पैसे का चाय पीले जा!" तिच्या या रांगड्या शब्दांतून माझ्या मनांत त्या कोवळ्या मनाच्या गणिकेचे शब्द उमटले: "लोटूं दे मज दार". आणि त्या कोवळ्या तरूणाला त्या नरकापासून वांचवूं पाहणाऱ्या वत्सल वेश्येची मूर्ति उभी राहिली. तिने न उच्चारलेले शब्द ऐकू आले:

"नको आवळूं काया कवळी
ही फुसफुसती धामिण पिवळी
चुंबनरेखा उठेल तव मुखिं बनुनी जहर निखार
ओळख– छे, तूं विसरून मज चल
मृत्यूनंतर तुझ्या पथावर
उन्हांत छाया करीन तुजवरि होउनि नकळत घार
तरूणा लोटूं दे मज दार"

'सहस्त्राक्ष आंथरितो नेत्र धरेच्या पायांशी', ही कल्पना मला विष्णुकांतीची इवलीं रानफुले जमिनीवर पसरलेली पाहून स्फुरली. परंतु दहा वर्षे ती तशीच मनांत पडून होती. तिचा मला उपयोगच करतां आला नाही. तिचा मला विसरहि पडला. पण 'ओले हिरवे दिवस' या कवितेचे बीज मनांत फोफावले, तेव्हा ती कल्पना मला न सांगता त्या कवितेत शिरली.

इंद्राच्या सहस्त्राक्षांप्रमाणेच रमणीचे डोळे माझ्या कवितांत जागोजाग उमलले आहेत. डोळ्यांना आत्म्यांची गवाक्षें म्हणतात. विशेषत: स्त्रियांच्या डोळ्यांत, त्यांच्या हृदयाचे प्रतिबिंब मोठ्या नितळपणाने उमटते. हृदयांत उमटलेला तरंग लगेच त्यांच्या डोळ्यांच्या काठावर येऊन थडकतो. रमणीच्या नेत्रांवाटे तिच्या प्रीतीचें, भावनांचे सारे वैभव प्रगट होते. सारे विश्व तिच्या डोळ्यांच्या पलकांतून उमलते. रमणीच्या नेत्रांचे आकर्षण वाटते ते यामुळे. साऱ्या सौंदर्याचे जिव्हार आहेत ते डोळे. या नेत्रांचेहि किती प्रकार असतात, किती जाती असतात. त्यांचे रंग, त्यांचे तेज, त्यांची कोमलता आणि प्रखरता, त्यातले हसू, त्यातले आसू– सारेच काही मोहक, गूढ आणि अलौकिक असते. काही डोळे मी पाहिले आहेत, अन् काही कल्पिले आहेत. काहीचे भाव एक ठिकाणचे, तर रंग नि ठेवण दुसऱ्या ठिकाणची. कोणापासून रंग घेतले, कोणापासून भाव उचलले. कुठले हसू घेतले तर कुठले आसूं टिपले. कधी कधी या डोळ्यांतले भाव त्या डोळ्यांवर आरोपित केले. तपकिरी डोळे, निळे उखाणे घालणारे डोळे, जळाच्या हालचालीने बुजणाऱ्या मासळीचे डोळे, धूपछांवचा खेळ खेळणारे डोळे, चांदणे पिऊन हसणाऱ्या क्षितिजाचे शर्बती डोळे, चंद्रसूर्य जिथे अजून उगवले नाहीत,अशा आकाशाचे स्वप्न घेऊन उभे असलेले डोळे! खरे सांगायचे म्हणजे डोळ्यांचे ते विश्व पाहायला हे दोन डोळे पुरत नाहीत.

कवितेच्या उगमाचा विचार करू लागले म्हणजे मनाची मोठी विचित्र अवस्था होते. कवितेचे बीज मनांत कसे पडते, ते केव्हा रूजते आणि त्याला अंकुर फुटून त्याचे रसरंगाने हेलावणारे रोपटे कसे होते, हे

सांगता येत नाही. मनाचा किंवा प्रतिभेचा हा व्यापार अगम्य आहे. काव्यलेखन ही जन्माची कारागिरी आहे आणि दिव्य अपघाताने त्याची कला होते, हे अशा वेळी खरे वाटते.

आदर्शाचा उज्जवलतेची आणि सौंदर्याच्या साक्षात्काराची गाणी गातांना माझ्या मनांत पुष्कळदा असा विचार येई की, आपण जीवनाची एकच बाजू बघतो आणि त्याचीच गाणी गातो. या प्रकाशाच्या पलीकडे केवढा अंधार आहे. या सुखाच्या मागे केवढे दु:ख लपलेले आहे. सफलतेच्या क्षणाच्या पैलतीरावर केवढी अक्षुण्ण विफलता जगाला व्यापून उरली आहे. आनंदापेक्षा वेदनेचे जग किती विराट आणि भयंकर आहे! मानवाची उंची आपण बघतो, त्याचा खुजेपणा, क्षुद्रपणा आपण का बघत नाही? या क्षुद्रतेकडे, या विफलतेकडे पाहिले म्हणजे जीवनाच्या एकाच अंगाचे दर्शन घडवून आपण स्वत:ची व दुसऱ्याची वंचना तर करीत नाही ना, अशी शंका मनात येई. या दुसऱ्या वास्तवाकडे डोळेझाक करून आपण केवळ स्वप्नरंजन तर करीत नाही? स्वत:ला फसवीत तर नाही? की या जगाकडे पाहण्याचे धैर्यच आपल्याला नाही? असे प्रश्न मनांत उठत. पण एवढे मात्र खरे की, या जगांतल्या जीवनाची अनुभूति मनाला जाणवत नव्हती. दु:खमय, क्वचित् ओंगळ, जुगुप्सा, भीति उत्पन्न करणाऱ्या या जीवनांतल्या कलात्मक सौंदर्याची व सामर्थ्याची जाणीव मनाला उत्कटतेने स्पर्श करीत नव्हती. जीवन बघून त्यातल्या अनुभूतीचे भावानुभूतींत परिवर्तन होत नव्हते. पण काही तरी चुकत आहे असे सारखे वाटत होते. हस्तिदंती मिनारावरून सगळे दिसत नाही, कळत नाही.

या चुकलेपणाच्या धूसर काळांत, कै. मर्ढेकरांची वास्तववादी कविता समोर आली. त्यांच्या कवितेने मानवी क्षुद्रतेचे, पंगुतेचे, अगतिकतेचे आणि विफलतेचे जे दर्शन घडविले, त्यामुळे सारी मराठी कविता–सृष्टि हादरली. हादरली एवढे म्हणून काव्यांतील परिवर्तनांचे वर्णन पुर्ण होऊ शकत नाही. मराठी कवितेत एक नवा प्रवाह सुरू झाला. तिला नवे वळण व वेग मिळाला. पण या प्रवाहाची शक्ति आणि गति यांचा अद्याप अंदाज आला नव्हता. कवि, टीकाकार यांनाहि हा धक्का जाणवला. य.द. भावे, विंदा करंदीकर, शरच्चंद्र मुक्तिबोध या कवींनी या प्रकारची कविता लिहिली. त्यांच्या त्रुटित प्रतिमा, अबोध मनांतील भावमूर्ति आणि दुर्बोध शैली यांनी काव्याला जडलेल्या आत्मतुष्टीवर आघात केला. टीकाकारांनी या कवितेवर आवेशाने हल्ले चढविले. या काव्याविषयीची माझी आधीची प्रतिक्रिया प्रतिकूलच होती. मानवी विफलतेच्या व क्षुद्रतेच्या दर्शनामागे मानवाविषयीची क्षुद्र तुच्छता, घृणाच तेवढी आहे, असे मला तेव्हा वाटत होते. आता असे मला वाटत नाही. ह्या नवकाव्याच्या पहिल्या बहरांत, जी बरीच कविता निर्माण झाली तिची प्रेरणा या घृणेत व कृत्रिम अनुकरणात आणि कृतक प्रतिमांच्या अट्टाहासांत होती, हेहि खरे आहे. परंतु मर्ढेकरांच्या कवितेत वेगळीच शक्ति कार्य करीत होती. तिच्या उपहासामागे, निराशेमागे करूणा होती. परंतु या करूणेच्या झऱ्याचा थांग तिच्या दुर्बोध वाटणाऱ्या बाह्यांगावरून लागला नाही. 'फल्गु' नदी ही 'पालथी' वाहते असे म्हणतात. वरती रेतीचा तळ आणि त्याखाली तिचा जलप्रवाह. मर्ढेकरांची कविता ही ह्या फल्गु नदीसारखी आहे. अनेक कवींची व टीकाकारांची ह्यामुळेच दिशाभूल झाली. नवकवितेच्या टीकाकारांची व समर्थकांचीहि थोडीबहुत या बाबतीत फसगत झाली आहे. या कवितेला मी देखील तिच्यांतील विकृत विफलतेमुळे विरोध दर्शविला. या काव्यांतील अतिरेकी विफल वेदांताला आणि यांतील वांझ घृणेला अजूनहि मी विरोध करीन. परंतु करूणेच्या ओलाव्याने त्रिचित केलेल्या, विफल, क्षुद्र आणि अपरिहार्यपणे बीभत्स बनलेल्या जीवनांतील अनुभूतीला मी आज काव्यांत त्याज्य मानणार नाही.

दोन महायुद्धे झाली. राष्ट्रीयता, स्वातंत्र्य, लोकशाही ही मूल्ये सिंहासनाधिष्ठित झाली. तरी सामान्य माणसाचे भाग्य बदलले नाही. त्याचे दु:ख कमी झाले नाही. त्याच्या अगतिकतेचे निवारण झाले नाही. या दु:खाच्या जाणिवेने हुंदका दिला, दु:खाच्या तीव्रतेने वेडे होऊन हसले आणि निराशेने शेवटी या तपाचे हेच फळ काय म्हणून प्रश्न विचारला, तर त्यांत अनैसर्गिक असे काय आहे? यापेक्षाहि खोल असे या

विफलतेचे दुसरे एक कारण आहे. बुद्धीबरोबर भावना वाढली नाही. प्रगतिबरोबर मागासलेपणा हटला नाही, रानटीपणा सुटला नाही. विशालतेबरोबर मर्यादाहि वाढतात. सुख नव्या दु:खांना घेऊन येते. जीवनांतील या अंतर्विरोधामुळे जे दु:ख व जी अगतिकता माणसाला ग्रासते ती या विफलतेचे कारण आहे. मानवी जीवनाची ही शोकांतिका कविहृदयाला हलविल्याशिवाय कशी राहील? केवळ सुंदर, मधुर, आनंदमय तेच काव्यांत व्यक्त व्हावे आणि निराश विफल भावानुभूतींना त्यांत स्थान असू नये, असे कसे म्हणतां येईल? सुंदर फुलाच्या विकासदर्शनांत जे कलात्मक सौदर्य आहे, ते ठणकणाऱ्या जखमेच्या दर्शनांतहि प्रत्ययास येऊ शकते. उद्यानांत एक वेगळ्या प्रकारचे सौदर्य आहे, तर उजाड दग्ध माळांत, कुजक्या सडणाऱ्या तळ्यांत वेगळ्या प्रकारचे अनुभूतिसौंदर्य असते. आशा आणि निराशा, विशालता आणि क्षुद्रता, उत्थान आणि पतन, जीवन आणि मरण, हे सर्व काव्याचे विषय आहेत, अनुभूतीचे विषय आहेत. कवीने कशावरहि लिहावे, पण त्यांत त्याची प्रामाणिक अनुभूति असावी. दु:ख आणि दु:खाचें काव्य यांतला कलात्मक फरक मात्र कलावंतांनी जाणला पाहिजे. उकिरडा ओंगळ आहे आणि भागीरथी पवित्र आहे म्हणून भागीरथीऐवजी उकिरड्यांचे चित्र काढू नये असे बंधन कलावंतावर घालणे बरोबर होणार नाही. भागीरथीच्या प्रवाहाची वास्तवता आणि कुजणाऱ्या उकिरड्याची अगतिकता याला वेगवेगळा कलात्मक अर्थ आहे, संगति आहे. ह्या अर्थाचे ह्या संगतीचे आविष्करण चित्रांत व काव्यांत आले की नाही, हे महत्त्वाचे आहे. ओंगळ आणि पवित्र मानलेल्या वस्तूंत, ओंगळपणाच्या आणि पावित्र्याच्या पल्याड असलेली, त्या वस्तूंच्या स्वत:च्या अस्तित्वाची एक भावाकृति असते. ती त्या चित्रांत प्रतिबिंबित झाली आहे की नाही याचा विचार कलेत झाला पाहिजे असे मला वाटते. कुरूप आणि सुंदर, अंधार आणि तेज, जीवन आणि मरण यांच्या रसायनांतून एक तिसरी वस्तू कला सिद्ध करते. लाकूड आणि घर्षण दोन्ही संपल्यावर फक्त ज्वाला जशी शेवटी फुरफुरत राहते, तसे काही कलेने निर्माण केले पाहिजे. हीच कलात्मक सुंदरता.

आज ह्या कवितेचीहि लाट ओसरली आहे. विशिष्ट जीवनदृष्टि किंवा आशय यांना काव्यांत महत्त्वाचे स्थान नसून, आविष्कारच (expression) काव्याचा प्राण आहे असे काही कवि समजतात. या पंथांतले कवि सर्व भर आविष्कारावरच देतात. हा आविष्कार प्रतिमानुगामी व प्रतिमानिष्ठ असतो. भावानुभूतीचे नवे विस्मयकारक आकृतिबंध म्हणजे काव्य अशी यांची धारणा असते. केवळ आविष्करण पद्धतीच्या आकर्षणाने वाहणाऱ्या आजच्या कवितेत प्रतिमांचा अनिर्बंध उपयोग करण्यांत येतो. कवितेला साकार करण्यासाठी प्रतिमा वापरल्या जात नाहीत, तर केवळ प्रतिमेसाठीच पुष्कळदा कविता करण्यात येते. आत्मकेंद्रित आविष्कारावर लक्ष केंद्रित करण्यात आल्यामुळे त्यात निवेदनाला महत्त्व उरत नाही. आपला भावाविष्कार दुसऱ्याला आकलन व्हावा अशी अपेक्षा व गरज या कवींना वाटत नाही. तर्कसंगतीपेक्षा कवीच्या मनांतील भावनिक साहचर्याला येथे महत्त्व येते. वैयक्तिक भावनिक साहचर्याला एकांतिक महत्त्व दिल्यामुळे खाजगी प्रतिमा काव्यांत सवंगतेने वापरल्या जातात. त्यामुळे आजचे काव्य दुर्बोध होत आहे. वैयक्तिक खाजगी अनुभूतींतून कवि काही विशिष्ट भावनिक साहचर्य शोधून काढतो आणि या सहचर्यातून निर्माण केलेल्या प्रतिमांच्या साह्याने तो काव्यांतील कल्पनीयांचे चित्र रेखाटतो. हे चित्र वाचकांना दुर्बोध वाटते. कारण त्या कल्पनीयाविषयी कवीच्या मनांत जे भावनिक साहचर्य निर्माण झाले असते, ते रसिकांच्या वाचकांच्या भावनिक साहचर्यापेक्षा वेगळे असते. अनेकदा ह्या दोघांचा मेळ बसत नाही, संवाद जुळत नाही. परिणामी कविता दुर्बोध वाटते. कल्पनीयाच्या नावीन्यामुळे, अपरिचितपणामुळे येणारी काही दुर्बोधता अपरिहार्य मानली, तरी आत्मकेंद्रिततेच्या अट्टहासामुळे आणि अबोध मनांतील त्रुटित असंबद्ध व मुद्दाम विसंगत व भग्न स्थितीत ठेवलेल्या कृतक प्रतिमांमुळे येते, ती अनावश्यक व आगंतुक वाटते. आशयाची दुर्बोधता आपण समजू शकतो. परंतु केवळ आविष्काराची दुर्बोधता–आशयहीन दुर्बोधता – काव्यसौंदर्याला हानिकारक ठरते. जीवन थोडेच कळते आणि त्यातला

पुष्कळसा भाग अज्ञात असतो. असे जरी असले तरी अज्ञानाच्या, अपरिचिताच्या अंगावर काही परिचिताच्या खुणा असतात. पण इथे तसे काही आढळत नाही. प्रतिमानावीन्याच्या हौसेने जर उत्कट भावनांच्या आविष्काराला प्रतिबंध झाला, तर काव्य म्हणजे केवळ प्रतिमांची बौद्धिक कसरत ठरेल. स्वैर भावनिक साहचर्याचा अतिरेक काव्यातला जिवंतपणा नष्ट करून टाकील. पूर्वी अलंकाराच्या अतिरेकामुळे काव्याला जे जड चैतन्यहीन रूप प्राप्त झाले होते, तसेच स्वरूप औचित्यहीन प्रतिमांमुळे आजच्या काव्याला येईल. केवळ नवीन प्रतिमा मिळविण्यासाठी म्हणून काही कवि ज्योतिषाची पुस्तके, जादूची पुस्तके, रेसची परिभाषा, मटेरिया मेडिका इत्यादि वाचतात असे मी ऐकले आहे. प्रतिमांचा असा शोध भयावह आहे. अबोध मनांतील अर्ध्याकच्च्या असंबद्ध भग्न प्रतिमा यांचा उपयोग काव्याच्या अवकळेला कारण होईल. प्रतिमा ही काव्याला मिळालेली मोठी शक्ति आहे. पण तिचा उपयोग करणारा कवीहि तेवढाच समर्थ असावा लागतो. प्रतिमांसाठी निसर्गाचा आश्रय करण्याची, तीच तीच निसर्ग-प्रतिमाने योजण्याची इतकी सवय आजच्या कवींना झाली आहे की, Biological urge (कामगंड) प्रमाणे Botanical urge (निसर्गगंड) या कवीच्या मनाला बांधला आहे की काय असें त्या तोचतोचपणा मुळे वाटायला लागते. ह्या प्रकारची प्रतिमानिष्ठ व आकृतिनिष्ठ (Formalist) कविता स्वत:च निर्माण केलेल्या साच्यांत साचेबंद होऊन, आपल्याच आवर्तात आज फिरत आहे असे दिसते. हा आवर्त फोडला पाहिजे. सामाजिक न्याय आणि प्रामाणिक सौंदर्यवादी कलात्मक निष्ठा यांच्या मध्ये कुठे तरी हा मार्ग आहे. आणि हा मार्गच उद्याच्या काव्याचे आशास्थान ठरेल. कविता ही केवळ अनुभूति नाही, केवळ स्मृति नाही आणि केवळ शब्दप्रतिमाहि नाही. या सर्वाच्या मिश्रणाने निर्माण होणारे नवे वेगळे जीवन आहे. आपल्या वैयक्तिक अनुभूतीला व्यापक स्वरूप देऊन जेव्हा कवीची भावना आकार घेते, तेव्हा तिला काव्यरूप प्राप्त होते. टी.एस.इलियटने एका ठिकाणी असे म्हटले आहे की, प्रत्येक कविता ही एक नवा आरंभ असते. कारण संपूर्ण कविता लिहिण्याचे सामर्थ्य एका कवीच्या अंगी असत नाही. तेव्हा त्या पूर्ण कवितेची जागा भरून काढण्याचा सुसह्य प्रयत्न प्रत्येक नवी कविता करीत असते.

माझ्या काव्यांतील वळणाचा आणि वेगाचा मागोवा घेत घेत मी आजच्या कवितेपाशी येऊन उभा राहिलो आहे. मी केलेल्या काव्य-सौंदर्याच्या प्रयोगाची कथा, मी तुम्हाला सांगितली आहे. त्यात पूर्ण काव्याची जागा भरून काढण्याचा मी आपल्या परीने कसा अल्प प्रयत्न केला हेच सांगण्याचा माझा विनीत हेतु आहे. माझ्या भावानुभूति व्यक्त करण्याच्या आटाआटीत माझी अनेकदा फसगत झाली आहे. पुष्कळदा शब्द लटके पडले आहेत. तर कधी क्षितिजाचा भडका उडविणारी वीज एक लहानशी ठिणगी बनून उमटली आहे. काही वेळा जे सांगायचे होते ते मुळीच कागदावर उमटले नाही. आणि कधी ज्याची कल्पनाहि नव्हती असे काही अननुभूत सौंदर्य अक्षरात उमटले आहे. कवितेच्या निर्मितीच्या प्रक्रियेविषयी सांगणे मोठे दुष्कर आहे. या काव्यसौंदर्याच्या प्रयोगांत जे अपयश असेल ते माझे आहे. त्याला माझी असमर्थताच कारण आहे, आणि काही साधले असेल तर त्याचे श्रेय माझ्यावर लोभ ठेवणाऱ्या वाचकांच्या रसिकतेला, सहृदयतेला आहे, हे येथे कृतज्ञतेने नमूद करावेसे वाटते. तसेच हे निवेदन म्हणजे कोणत्याही प्रकारचे आत्मसमर्थन नाही. हा इशाराहि इथे देऊन ठेवणे अगत्याचे वाटते.

कविता ध्येयवादी असावी की तिने फक्त सौंदर्याचा वेध घ्यावा, की कुरूपतेचा नि ओंगळपणाचाहि शोध घ्यावा, आशेची गाणी गावीत की निराशेची शोकगीते म्हणावीत, तिने प्रतिमानिष्ठ बनावे की भावानुभूतीचा सरळ अकृत्रिम उत्कट उद्‌गार व्हावे, तिने भावसंगति साधावी की विसंगत, विस्मयजनक भावनिक साहचर्यावर भर द्यावा, अशा अनेक प्रश्नांचे एकच एक उत्तर कुणालाहि देता येणे शक्य नाही. कवितेच्या विकासाकडे आत्मीयतेने पाहणारा एक काव्यलेखक या नात्याने मला असे वाटते की खरी कविता लिहिणाऱ्याने या वादाच्या भोवऱ्यांत सापडू नये. त्याच्या प्रवाहात पोहावे.

कितीहि नवे प्रवाह आले आणि प्रयोग झाले, राजकीय तत्त्वज्ञान किंवा मानसशास्त्र यांचे काव्यकलेवर कितीहि आक्रमण झाले तरी निसर्ग, प्रेम, जीवन–मरण, पृथ्वी, तारे आणि त्यापलीकडील कालातील पूर्ण तत्त्व हेच कवितेचे चिरंतन विषय राहतील. म्हणून जे कवीला उत्कटतेने जाणवेल त्याचा प्रामाणिकपणे आविष्कार करावा. आपल्या उत्कट भावानुभूतीचे प्रामाणिक प्रगटन करताना एक अंतर्गत शक्ति इतकी प्रबळ व चपळ असते की, ती परिचित वस्तूंतून नवी अपूर्व वस्तू निर्माण करून दाखवते. त्या अनुभूतीच्या नि भावनांच्या वादळापुढे प्रचंड बुरूज हादरू लागतात. ह्या तुफानांतील विजेच्या तेजाने विचाराचे डोळे दिपतात. जुने वाक्संप्रदाय व शब्द मोडून पडतात. म्हातारे व्याकरण लटपटते आणि काना–मात्रांना अक्षर डोळे फुटतात. साधना मात्र निष्ठेने केली पाहिजे. आपण कलावंत आहोत, याची त्याने सतत जाणीव ठेवली पाहिजे. कोणत्याहि विचारसंप्रदायाची अथवा आविष्कारतंत्राची गुलामगिरी त्याने पत्करू नये. राजकीय किंवा सामाजिक संप्रदायाला शरण जाणाऱ्या कलेचा अध:पात होतो. कलेचे 'बराकीकरण' (Regimentation) होते आणि त्यात कलावंताचा देखील चुराडा उडतो. सूर्याशी संवाद करणाऱ्या रशियन कवि मायकोव्होस्कीला आत्महत्या करावी लागली, आणि बोरिस पॅस्टरनाकला, आपल्या कलेच्या श्रेयाचा त्याग करून, एकांतवासांत दिवस काढावे लागले.

एखादी विचार–प्रणाली किंवा विभूति कितीहि मोठी असली, तरी त्याच्या उद्गाराचे यंत्र होणारा कवि आणि कविता मला पसंत नाही. जीवनांतील सौंदर्याचा, सत्याचा आविष्कार करतांना एकाद्या विभूतीला किंवा विचार–संप्रदायाला शरण जाणे ही कलावंताची दुर्बलता आहे किंवा ढोंग आहे. कलावंताने, कवीने यापासून दूर, अलिप्त राहिले पाहिजे, तरच त्याच्या हातून खरी कविता निर्माण होईल. विभूतिमत्त्वाच्या किंवा संप्रदायाच्या आहारी केलेला कवि सुंदर कविता निर्माण करू शकणार नाही. कलाबाह्य गोष्टीचे आज काव्यावर आक्रमण होत आहे. त्यापासून कवितेला वाचवणे आणि राजकीय संप्रदायाच्या किंवा आविष्कारपद्धतीच्या जखडणाऱ्या बंधनांतून कवितेला मुक्त करणे हे कवीचे कर्तव्य आहे. कवि जसा रूझवेल्ट, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स यांना निर्मिण्याकरीता अवतरत नाही, तसेच महात्मा गांधी, कार्ल मार्क्स किंवा रूझवेल्ट यांनाहि कवि घडविता येत नाही. कवि हा एका देशाची, एका काळाची संपत्ति नाही. तो मानवी हृदयाचा नैसर्गिक हुंकार आहे. प्रीतीचा व सहानुभूतीचा नि:श्वास आहे. करूणेचा अश्रु आहे. आशा–आकांक्षांचा तो किरण आहे. त्याने निर्भयपणे आपल्या भावना प्रगट केल्या पाहिजेत.

कवींना जे शब्दाचे वरदान मिळाले आहे त्याचा उपयोग कवीने फार जपून आणि मोठ्या जबाबदारीने करायला शिकले पाहिजे. शब्द ही फार मोठी शक्ति आहे. ज्ञानदेवांनी या शब्दाचे सामर्थ्य फार सुंदरतेने व समर्थपणे वर्णिले आहे:

"आपण तंव खपुष्प। परी फळ दे जगद्रूप ... शब्दा मपतें अमप । कोण आहे"

आपण स्वत: खपुष्प – आकाशाचे फूल – असूनहि, तो शब्द या विशाल अनंत जगाचे फळ देतो. शब्द ज्याचे माप करू शकत नाहीत, असे जगात काय आहे? शब्दाच्या या शक्तीला ढळ पोचणार नाही याची कवीने प्राणपणाने काळजी घेतली पाहिजे. उर्दू कवि इकबाल याने जो इशारा दिला आहे त्याचीहि मला येथे आठवण होते.

अये तायरे लाहुती उस रिजक्से मौत अच्छी
जिस रिजकसे आती है परवाज में कोताही

हे अनंताच्या पक्षीराजा, जे दाणे टिपल्यामुळे तुझ्या पंखांतील उड्डाणाची शक्ति नष्ट होते, त्या दाण्यापेक्षा मृत्यू बरा.

कवीनीही आपल्या पंखांतले हे उड्डाण सदैव जपत राहिले पाहिजे.

कांतांचे कवितासंग्रह

पहाटतारा:

पहाटतारा:

सन् १९२० ते १९३५ हा पंधरा वर्षांचा कालखंड काव्यप्रकारात रविकिरण मंडळाचा मानला जातो. योगायोगाने कांतांनीही याच कालपर्वात आपल्या काव्यलेखनास सुरवात केली होती. कांतांच्या दृष्टीने हा एक वैभवकाळ होता. कांतांचे काव्यलेखन या काळातच सुरू झाले तरीही त्यांची कविता थोडीफार रविकिरण मंडळाच्या प्रभावापासून वेगळी होती. परंतू कांतांच्या कल्पना व काव्यविचार विश्वातील सौंदर्य हे तत्कालीन परिस्थितीचे संदर्भ घेवूनच शब्दांकित होतात. १९३० साली पार्थिव, कृष्णाकुमार व कांत या नवोदित कवींचा "पहाटतारा" म्हणून एक कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. या वेळेस कांतांचे वय होते अवघे सतरा वर्षे. कांतांच्या फक्त बारा कविता या संग्रहात आहेत. बहुतांश कवितांमधून स्वदेश व स्वातंत्र्य आणि देशाभिमानाची भावना उत्स्फूर्तपणे मांडलेली आढळते. माझे गाणे, अंगाई, दसरा या कवितांचा यासाठी उल्लेख करावा लागेल. कांतांनी दोन-दोन पारतंत्र्य अनुभवली व सोसली होती. मराठवाड्यात निजामी जुलमी राजवटीकरवी मराठी भाषेची व जनतेची गळचेपी चालू होती तर भारत वर्षावर इंग्रजांचं अधिपत्य अस्तित्वात होतं. कांतांनी आपल्या स्वातंत्र्याच्या भावना व आपल्या काव्यलेखनाचे प्रयोजन "पहाटतारा" मधील "माझे गाणे" या कवितेमध्ये स्पष्ट केले आहे.

"देशाच्या स्वातंत्र्याचे
यश, शौर्य, धैर्य-विभवाचे
हे गान मुखावर नाचे
अणूरेणूत भरली तान, हे गीत नूरविते भान
मेलेल्या जागृती देणे, त्यासाठी माझे गाणे-"

याच संग्रहातील दूसरी एक कविता "दसरा" मधूनही स्वातंत्र्याची तळमळ व्यक्त होते. सूरवातीच्या या पंधरा कवितांमधूनच कांतांच्या स्वतंत्र प्रतिभेचे अस्तित्व व सामर्थ्य नजरेत येते.

पहांट-तारा

तेज दिशांना चढे न अजुनी, सहस्त्रकर नच नभांत ग
निळ्या डोंगरी तेज फिकटतें परि झुळझुळ ये वहात ग
सहस्त्रकर कमळें न विकसलीं अजून 'पद्माकरांत' ग
कंपित सस्मित कळ्या डोलती गंधवाहकंपनांत ग
कवितेचा श्रीरंग सोडि नच लल्‌कारी अंबरांत ग
लकेर चुकली परी प्रभातीं घुमते गिरिकंदरांत ग
'वाग्विलास' सृष्टीस कळे नच वदे मुग्ध ती मनांत ग
'फुलें न माझीं' पडूं कशाला उगिच अहंभावनांत ग
सुमनसुरभिसंसार विरावा अनंत नभमंडलांत ग
रविकिरणांसह नको विहरणें सुरधनु-कुंजनवनांत ग
पहांटतारा डुलत फुलत ये विरल कृष्ण घन तमांत ग
सूर्यदूत पाहून हांसते रात कौतुकें घनांत ग

माझें गाणें

राष्ट्रीय शाहिरा! गाया । ये रसवंतीच्या रंगा!
बघ नसांनसांतुन माझ्या । स्फूर्तीची उसळे गंगा
ही वाणी अधिर जहाली । उधळण्यास कविता–रंगा
चल, झोंप जगाची भंगूं
ऐकून गान हें पंगू–
लागतील गिरिही लंघूं
हें गाणें माझें असलें। चल साथ करी बा! वहिले
धर खडा सूर बघ बसली। कडकडित डफावर थाप
ऐकोनी रव हे जागे। जग होइल आपोआप
वाहुंदे रंगरसपूर । धरणिचें धुवूं दे पाप
देशाच्या स्वातंत्र्यांचें
यश–शौर्य–धैर्य– विभवाचें
हें गान मुखावर नाचे
अणुरेणुंत भरली तान । हें गीत नुरवितें भान
मेलेल्या जागृति देणें। त्यासाठी माझें गाणें
या गानांबुदवर्षावें। फुलतील दगडही सुमनें
तो शौर्यनद जरी आटे । वाहेल पुन्हां वेगानें
जरि गुलाम झालों साचें
पदिं लंगर परदास्याचे
श्रवतांच सूर गानाचे
उसळेल रोमरोमांत । निज देशभक्तिची लाट.
जातील स्त्रियाही समरीं। ओझर त्या गीत:श्रवणें
देशार्थ रणीं स्वप्राण। त्यजितीलहि आनंदानें
स्वातंत्र्य भूषणासाठीं। निज सौभाग्याचें लेणें
निज मुखिंचे स्तन सोडून
बालकें रडें आवरून
झुलवीत डूल, नाचून
गातील गोड, प्रेमानें। देशाचें माझ्या गाणें
हा भूतकाल पट काळा। मम गान तुषारें धुवुनी
देशाचा उज्वल मग मी। इतिहास दाखविन नयनीं
भावना–प्रेम–रस भरतां। रिचवतील घन खळखळुनी
श्रृंगार कुठें नाचेल
कारूण्य कुठें रडवील
अन् वीरश्री स्फुरवील
चैतन्य नव्या गीतांत । मग सवेंच मृतदेशांत
हा अखंड निर्झर गाई। तें गान निजानंदानें

त्या गीत परागा नित्य । उधळिती भूवरी सुमनें
तें नभीं तारका खचित। ओजस्वी विलसें गाणें
उरलें जें विश्व भरून
नवलाचें माझें गान
नाचे ज्या काळ भुलून
गायातें असलें गाणें। मज जगती जगणें मरणें.

गोदा-गीत

शिवमनस्तरंगे! गंगे! धन्य मला केलें
पुण्यदर्शनांतें तुझिया, जीव हे भुकेले
जन्म तुझ्या तीरीं लाघे भजशि सुदैवानें
बाल्यसंगतीं तव अंकीं खेळलों सुखानें
खेळ विलोकोनी अमुचे हंसशि कौतुकानें
त्याच हास्यिं या जीवातें हवें तें मिळालें
तुझ्या वाळवंटी माझे स्वर्ग विखुरलेले
खडे गारगोटे तेथिल हिरे मला झाले
तव सुललित लहरिंत माझें काव्य-गान खेळें
तुझ्या तीरवातें सारे ताप मम निवाले
हलाहलें तप्त शिवाची तूंच शांति शोभा
आमुच्या महाराष्ट्राची तूंच गे यशोभा
महाराष्ट्र रसवंतीचा तूंच मूळगाभा
फिरून फुलवि तीरीं अपुल्या मधुर पुष्प-झेले
कसातरीं गातों मी जें लाडक्या स्वरांत
स्वताचे न, अवघे भरले भाव तुझे त्यांत
ताल, वृत्त, कांहीं नाहीं, नाद तुझा शांत
क्षमा करी त्वन्मधुगानीं स्वर मी मेळवीले
कौमुदी-धवल-जलवन्ती आस नसे आन
तुझ्या मंद लहरीवरचा हास्यशुभ्र फेन
करी, मीन अथवा गोटा जळीं हीन दीन
मग मिळेल माझें मजला सौख्य हरपलेलें
मोद सकल माझा तुझिया लहरिंतून वाही
होय मृत्तिकेची पाचू तुझ्या जलें बाई
दूर मज कधींही कोठें लोटुनी न देई
मरतांही मज निज पदरें झांक तूं दयाळे!

अंगाई

निज बाळा मी गाणें गातें तुजला,
आलिसे नीज डोळ्याला.
हा खेळाचा पुरें जहाला चाळा
अपरात्र लोटली बाळा,
तव वीर पिता छातींचा सरदार,
कळिकाळा कांपविणार
मी तव माता वीरसुता सच्छीला,
शोभे न हट्ट हा तुजला.
ही अफाट दौलत हिरवी
ते खडे कोट किल्लेही
तव बाळा येथुनि पाही
बघ निजलीं तीं, झोंप कसा तूं अपुला
आलिसे नीज डोळ्याला.
प्रिय नाथाचा आत्मा फिरतो भंवतीं
सोडी रे, नसती भीती
कां भिशी असा ऐकुन रणशिंगाला
हें उणें तुझ्या ब्रीदाला
हे दिवस असे, नेम नसे गनिमांचा,
घालतील छापा याचा
जे तुजभंवतीं खडा पहारा करिती
हे 'हुषार' ध्वनि त्या वदती
तव शत्रु येण्यापूर्वी
तद्रुधिरें न्हाइल ऊर्वी
तव वीरशरानें, हिरवी.
निज शयनीं तूं सुखें त्यजुन भीतीला,
आलिसे नीज डोळ्याला.
तिळ जीवाला उसंत नाहीं बाई,
करि आतां जो जो गाई.
रण–वाद्यानें झोंप तुझी मोडेल,
ती वेळ तुला येईल!
निज तोंवर रे, झोंपेंसरशीं तुजला
कर्तव्य पुढें करण्याला.
देशाच्या प्राणासाठीं
बहिणीच्या अब्रूसाठीं
तोडणें जिवींच्या गांठी–
तुज पुढति असे, घे विश्रांती बाळा,
आलिसे नीज डोळ्याला.

बाई कलिके !

कां गाल फुगवुनी अशी बैसशी बाई ?
आकांत कराया असें जाहलें कायी ?
हा मुलुखाविरहित रूसवा असला कसला ?
कां असा अबोला राग कशाचा आला ?
ही नयनीं झाली गरदी कां अश्रूंची ?
कां हिरे माणकें उगीच उधळायाचीं !
बोललें काय तुज कोणी सांगना
गांजिलें काय तुज कोणी सांगना
कां कष्टविशी ग काया सांगना
कां दु:खावेगें होय जिवाचें पाणी ?
की प्रणय भंगला ? जीव लागला झुरणी ?
एकदां हांसना गोड लतेच्या जीवा,
ओवाळुन टाकिल स्वर्ग आपणा तेव्हां.
लाजवी सुधेला वितरून सौरभ–हास्य,
ब्रम्हांड करिल मग वेडें होउन लास्य.
तव अर्धस्मित–कल्पना करोनी नुसती
शशि काळवंडला लपला पश्चिम–प्रांतीं !
मैत्रिणींसंगतीं फुगड्या खेळना
या लताखगांना ओव्या गाइना
घे वायूसंगें झोंके हांसना
भारीच गर्व तुज कळले बाई, झाला
हो,–श्रीमंताची बोलशील कशि मजला !
हट्टीच, समजवा विनवा तिजला किंतिही
ती खेळत नाही, हांसत, पाहत नाहीं
ये रविकर हांसत, सांगे कानी कांहीं
ते अश्रु पळाले, कलिका पुलकित होई
मधुगुंजारव ये वाहत वाऱ्यांतून
कां कुणास ठावें ? हृदय उडें तें श्रवुन
ये भ्रमर जिवाचा, कलिका हांसली
चुंबिलें तयें प्रेमें, ती लाजली
आसवें दोन प्रेमाचीं झिरपलीं
हास्यांत तिच्या ब्रम्हांडें धवळुन गेलीं !
अश्रूंत सृष्टिची अनंत काव्यें भरलीं !

शारदी सृष्टि

सुनील गगनीं डुलते, खुलते ही चंद्राची कोर
सुधाजलद हा बघुन नाचतो कवि सृष्टीचा मोर
अस्तगिरीवर मारूत बांधीं नव मेघाचा झोंका
झोंके घेते. ओव्या गाते अल्लड ही शशिलेखा
सख्या तारका मधेंच देती झोंके मोठे मोठे
हंसे शशिकला गद्‌गद तेव्हां पुष्पीं फुलले कांटे
संध्यागिरिवर तारांराणी 'फुगडीफूगं' खेळे
जाइजुईंचा गजरा शिरिचा चंद्रकलेचा वघळे
टिपुन फुलें ती दिशा आपुल्या वेणिंत हर्षे लेती
मेघावरती किती विखुरलीं, किती वायुनें उडतीं
तरूशिखरांहुन शांत वाहती सुधारसाचे पाट
काळ्या खडकीं उसळे कोठें सोनरसांची लाट
मंद मोडत्या लाटांवरती फिकट चांदणें नाचें
लाट मोडतां जळ झांकळुनी तुटती सर मोत्यांचे
हंसगामिनी गंगाबाई, पदर फडकतो वातें
मंद चालतां मौक्तिकमाल पदराखालुन रूळते

चंद्ररम्रे तळ नाहुन बसले ध्याननिष्ठ मुनि कोण?
जटाजूट शिरिं शुभ्र कधींचा? कधिचें धरिलें मौन
तपोधनांनों, निसर्ग दिव्यें अनंत पाहत आलां
गूढ तयाचें उकलुन दावा दुर्भक मानवतेला.
तारांगण हें काय बोलतें, सरिता गाते काय
चंदाराणी गीत कशाचें नभीं उधळुनी जाय
अंबर शोधी काय सारिखें, हरवें कसलें रत्न
कुठें लाविली दृष्टी, कसलें गिरिवर करिती ध्यान
पिसाट वायू झुलत चालतो धावे कधिं सैराट
कोणासाठीं एकसारखा घुमतो हा रानांत
पक्षि कूजितें काय सांगतीं, पुष्पें हंसती लाख–
अर्थ तयाचा काय वदाना? पुष्पित होइल राख!
दिनरजनीचा एकसारखा खेळ कोणता चाले
उषा अरूण कर करीं गुंफुनी हांसुन कोठें गेले?
उदयगिरींहुन अस्तगिरींहुन धडधड रविरथ जाई
कुठें जायचें, पथ मित्राला काय सांपडत नाहीं
फुलला तेजें पूर्ण चंद्रमा सृष्टि–फुलोरा हंसला
काळवंडला तोंच असा कां झुरूनी प्रेत जहाला?
अनंत युगिंचे साक्षी आपण निसर्ग गुंजन उकला
जगास कळतां शिलाधरेच्या होतिल तारकमाला

शांत निश्चला गोदामाई मुरडुन इकडे वाही
निजल्या लाटा हंसती पाहुन स्वप्नें कांहीं कांहीं
पैलतटावर चार घरांचे चंद्ररसानें न्हालें
हिरव्या हिरव्या तरूजाळींतुन गांव सानुलें वसलें
झाडांमधुनी वर्षत होता चंद्र सुधाधारांनीं
निजलें होतें खेडें सारें श्रमुनी शेतांमधुनी
नाहिं म्हणाया मधेंच पसरे वेणुनाद वाऱ्यांत
गाय, बैल वा कुठें हुंबरे त्या निजल्या गोठ्यांत
म्हणे 'ज्ञानबा तुकाराम' कुणि हो, टाळांचा गजर
'जी जी' संगें थाप डफावर चढते, 'तुण तुण' तार
श्वान ओरडे कुठें भयानक 'घू घू घुमवी राई'
पुन्हां नांदते सर्व शांतता, शब्द न कोठें कांहीं

खेडें तटिचें बिंबित झालें काळ्याभोर जळांत
गरिबाची द्वारका वसविली कोणी या पाण्यांत
दिव्य आसरा क्रीडा करिती लपत छपत डोहांत
चावडींतला दिवा पाहतो खेळ वांकुनी भीत
वीचिवीचिंतुन बाहिर उसळे अजब चांदणी–माया
जळांत झुलती तीरतरूंच्या हिरव्या काळ्या छाया
शारदीय चांदणे शांत, तें खालींवरती भरलें
चंद्रकांत का दगड तटींचे चंद्रकरें पाझरले!
त्याच रसीं मद्‌गान विरालें, उरले नुसरते शब्द
तिथेंच रमते कविता, ये हा केवळ पैंजण–नाद

आमुचा दसरा

पायीं बेडी वाजे, तोवर गावें नाचून
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण!
प्राण उडाले, प्रेत मिरविलें केवळ श्रृंगारून
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण!
शाखा तुटल्या, पानें जळलीं, छाया कोठून?
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण?
दिवस उगवुनी तेज न दिसलें, सुमनें फुललीं न
ऐसा झाला दसरा अमुचा स्वातंत्र्यावीण
धराकंप होतसे, कशाचे हिंदोले ते घेणें
दास्यीं दसरा म्हणजे आम्हा सूतकांत सण करणे.

वंचिता

मी वेडी भोळी अबला म्हणुनी फसलें
फसलें ती कायम फसलें
पेरिलीस साखर तेंव्हा कळलें नाहीं
येतील विषफळें त्या हीं
साधिलास कैसा दुष्टा, पुरूषी कावा
कोणत्या जन्मिंचा दावा ?
मज नादीं लावुन आधीं चेटक्या ! नेलें
आगीत लोटुनी दिधलें
मी कुलटा–जारिण ठरलें, जळतें बाई
झळ तुला न त्याची कांहीं !
जन चार टोचिंती वर्मि, जीव हा जाई
कुणी तोंड न काढुं देई
वंचुन मज मेल्या ! काळें केलें वदन
भोगशील याची पतनं
पाऊल पडें जरि चुकुन, ओढवें आमुचें मरण
परि पुरूष सर्वही करून
लोकांत मिरवती शुद्ध मूर्ति नीतीच्या
पापिणी अह्मी जन्माच्या !

दृष्ट कुणाली झाली ?

हरिला दृष्ट कुणाची झाली साजणी
दृष्ट कुणाची झाली ग
रडुनी रडुनी डोळे सुजले
वाहुन गेली लाली ग
चिमणीवाणी तोंड जाहलं
चंद्रकळा ती लपली ग
राजा माझा कणकण करितो
झोप तयाची अडली ग
द्रुष्ट गोपिका कृष्णा घेती
करणी त्यांनी केली ग
राखी अंबे ! कान्हा माझा
कोणति सेवा चुकली ग.

"तोडु नको लेकरू."

एकाएकी नको माउली, निष्ठुर मन तूं करूं
आइग! तोडुं नको लेंकरू
पाडस प्यालें, तृप्त जाहलें, वाहे तरि झुरूझुरू
कुठें तो प्रेमाचा पाझरू!
उपमन्यू जो तुझा लाडका पयोनिधिंत पोहला
थेंबही महाग तया जाहला!
मी तृषार्त फिरतों वणवण वेडापिसा
हृदयाचा प्याला रिताच पडला असा
पोटांत आग खालून जाळिते रसा
आजच माझा कसा आटला करूणेचा सागरू!
आइग! तोडु नको लेंकरू.
हांसत प्रेमें चषक आमुचा भरून जगानें दिला
अधाशी पिऊन मी टाकिला
'तृप्त' बोलुनी नाचुं लागलों, मोद मनिं न मावला
गद्‌गदा काळ तदा हासला
दचकलो, बोलला द्रोणशिशू जन खुळे
फसवून कृपीनें पीठपाणी पाजिलें
दारिद्रय, गायहिन दूध कुठुन मग मिळे?
मोकलिलें त्वा, जगें नाडिलें, अल्लड तव कोंकरू
आइग! तोडु नको लेंकरू
थेंब एक दे शपथ तुला गे तृप्त तयें होइन
जगाला काळाला दापिन
गाइन गाणीं, अमृत झरणी होइल दगडांतुन
जाइल सुधाखंड लाजुन
फुलतील तारका फुलांतून भूवरी
खेळेल चंद्रिका झोकं बा तरूवरी
बनवीन स्वर्गही पृथ्वीची पायरी
परी प्रथम घे पदराखाली, राग नको तूं धरूं
आइग! तोडु नको लेंकरू.

हूड पवन

भोंवरा
फिरवि गरगरा
धूळिचा, वात
धांवतो भरारा उंच उंच गगनांत
कुंजांत
वसे हा गात

केधवां नादीं
मग घटका घटका उतरेनाच समाधी
तरूवरी
घेइ घडिभरी
भिरभिरा झोंके
गडगडतां बादल भितरा पळतो धाकें
विनविती
लता त्या किती,
खट्याळच पवन
पदरास झोंबतो तरिहि 'फुलें दे' म्हणुन!
वायु तो
कधी डुंबतो
नदीच्या डोहीं
उधळीत मौक्तिकें लहरींत निघुनी जाई
खेळतो
कधीं हिंडतो
मेघ खंडांत
नवजलधारांचे दिव्य हार गुंफीत
झिमझीम
करी घनश्याम
खुलें मधु ऊन्ह
वाजवीत टाळ्या समीर नाचे भुलुन
मधुचोर
बनुनि गंभीर
नदीच्या तीरीं.
डौलांत फिरे ती रमत वायुची स्वारी
दुड दुडा
कड्यावर कडा
चढोनी अनिल
गिरि उतरे मग घालीत मुखानें शीळ
राईंत
थकुन ये बहुत
बाहि आईस
तिज उशीर होतां रडुन करी घाईंस
घे सृष्टि
निजांकावरति
चुंबि प्रेमांत
झुळझूळ हांसतो हूड पवन झोपेंत.

गीतमोहना

(कविता, बलवंत संगीत मंडळींतील, सुप्रसिद्ध नटवर्य मास्टर दिनानाथ यांना अनुलक्षून रचिली आहे.)

सल्लज पौर्णिमा झाली तुझ्या पाहून वदनातें
सुलोला ऊर्मिळा नेत्रीं शिके अन् वीज नृत्यातें
भ्रमें गंधर्व शापित कां कुणां अप्सरा येथे
बघोनी भूवरी तूंतें पडे संदेह इंद्रातें
विकासे नील घनमाला तुझ्या त्या भ्रूविलासांत
वरोनी मेघ-पुष्पांची तुझ्या गीतांत बरसात
नको तो दिल्‌रूबा संगें सतारीची तुला साथ
खुले का चंद्रज्योतींनीं नभीची चंद्रिका शांत?
तुझ्या कंपाकुलालापीं स्फुरे तो एक झंकार
तयानें तंतुवाद्यांचा गळे सारा अहंकार
लकेरी सोडितां एक फुले नाट्यांतुनी रंग
क्षणी बेहोश की होती जनाचे चित्तसारंग
तवालापास मोहोनी नभीं ही गहिवरे रात
पहा तूं भाव माझेही तिच्या त्या बाष्पबिंदूंत

माळ गुंफिल्यावर

तोडणार माळ अतां काय गुंफिल्यावरी
दंव नवाळले अजून
जाय गंधही न विटुन
तोंच चुरायास सुमन घाइ ही किती तरी
वन वन किती फिरफिरून
ऊंन्ह पावसांमधून
आणिलीं फुलें नि हाय! तुडवितेस यापरी
सांगायाचें तसेंच
होतें मजला अधीच
जाऊंदे, होय सुखी या जगांत तूं तरी
मृदुल रेशमीच दोंर
सावध परि पीळदार
कोमल कर तव चिरेल जपुन तोड सुंदरी
वीज लोपते न घनीं
तो बादल गडगडुनी
फाटे नभ वर्षती अशाच अश्रूंच्या सरी

फटत्कारः

फटत्कारः

कवी कांतांचा "फटत्कार" हा दूसरा काव्यसंग्रहही "पहाटतारा" या पहिल्या कविता संग्रहातील कवीत्रयींचा एकत्रीत संग्रह आहे. १९३३ साली प्रसिद्ध झालेल्या या कविता संग्रहात देखील कांतांच्या एकुण पंधरा कविता आहेत. त्याकाळी "फटत्कार" संग्रहास चांगली प्रसिद्धि मिळाली कारण कांतांच्या कवितांमधून राष्ट्रवाद, क्रांतीपूजन, प्रकाशपूजन व स्वातंत्र्याची तळमळ इ. भावना अत्यंत प्रमाणिकपणाच्या तळमळीने व्यक्त झालेल्या दिसतात. "फटत्कार" या शिर्षकाची पहिलीच कविता अन्याया विरूद्धचा प्रतिकार प्रतिबिंबीत करते. कांत म्हणतात–

"फडफडाट पंखांचे होती
अग्नी धूंदीच्या लहरी उठती
निखाऱ्यात मम पंख करपती
तरीही फुलवितो गान"

"सूं सूं सुटू दे बाण पारध्या" या दूसऱ्या कवितेत कांतांनी जीवनाची शिकार करणाऱ्या पारध्याला आव्हान केलं आहे तर "पुढे भिउन तूला नच पंख गाळीतो" असं म्हणून मनाची कणखर व ताठवृत्ती स्वाभीमानानं दाखविला आहे. शिवाय अधिक जमेची बाजू म्हणजे या संग्रहातील जन्मठेप, गुन्हेगार, पराभूत वीर, मजूर किंवा भारताचे दधिची इं. कविता वाचीत असतांना हे उलगडत जातं की कांतांना "फटत्कार" या संग्रहातूनच स्वत:च्या कवितेचा खरा मार्ग सापडला आहे. संग्रहातील बहूतांश कवितांमधून स्वातंत्र्यप्रेम, स्वदेशाभिमान, सामाजिक अन्यायाला वाचा फोडणारी भाषा इ. भावनांची उत्कटतेनं अभिव्यक्ती झाली आहे. मराठवाड्यासारख्या मागास व दुर्लक्षीत त्यातही निजामाच्या राजवटीत पीचलेल्या प्रदेशात कांतांनी क्रांतीचे सूर पेटवीले. स्वातंत्र्यासाठी बलीदानाची भावना जागविली. निजामी राजवटीत मराठी समाजाची व मराठी भाषेची सर्रास गळचेपी होत होती तर देशातल्या इतर भागात इंग्रजांच्या दडपशाहीत सर्वत्र स्वातंत्र्याची ठीणगी मनामनात चमकत होती. या सर्व परिस्थितीचे प्रतिबिंब कांतांच्या "फटत्कार" या काव्यसंग्रहात पहायला मिळते व कांतांची कविता एका कवीच्या बंडखोर आत्म्याचे चिरंतन गाणे होवून अवतरते.

फटत्कार

सूं सूं सुटुं दे बाण पारध्या, सूं सूं सुटुं दे बाण
पहा अंतराळांत, मोकळ्या मांडिलेंच उड्डाण!
पारध्या, सूं सूं सुटुं दे बाण!
तापे रवि वर, तेजोदीप्ति–
त्याच आमुच्या नयनीं भिनती
चढते हृदयीं अथांग भरती
उसळें गीत उधाण!

फडफडाट पंखांचे होती,
अंगिं–धुंदिच्या लहरी उठती,
निखाऱ्यांत मम पंख करपती
तरिहि फुलवितों गान!

भिऊन तुला नच पंख गाळितों,
तुझ्या बाण–संगतीच उडतों,
निर्भय उघडा ऊर धडकतो,
साधी शर–संधान!

ठाण मांडुनि, उभे राहुनी
ओढी दोरी बाण लावुनी
मम हृदयाचें लक्ष्य करोनी,
कर कर चढवि कमान!

पवनिं येउं दे तव शर नाचत
रक्त–पिपासा असो खवखवत
मृत्यु मुखावर तळपो हांसत
त्याचें काय गुमान!

घेउन रूतला बाण स्वांती
धुळींत पडतां पडतां अंतीं
एक तान फेंकीन तुला ती–
खचित करित बेभान
पारध्या, सूं सूं सुटुं दे बाण!

तूं ओ दिली कुणा ?

तुज काय होतसें क्षणा क्षणा
मम हृदया, तूं ओ दिली कुणा ?
कुणा पाहिलें ? कुणीं बाहिलें ?
कुठे कुठे तव नेत्र लागले ?
भाव मुखींचे किती डहुळले ?
कां नेत्रीं हा घाबरेपणा ?
मम हृदया, तूं ओ दिली कुणा ?

घडिघडि चाहुल कसली घेशीं ?
भिरी भिरी भोंताली बघशीं,
आपुल्याच दृष्टीला भीशीं,
निज नजर–जालिं गुंतशीं पुन्हां !
मम हृदया, तूं ओ दिली कुणा ?

कुठें सारखें कोण पालवी ?
ओढुनि पुढतीं कोण चालवी,
डुलवी, फुलवी, हंसवी, रडवी ?
हें काय झळंबे तुज सजणा ?
मम हृदया, तूं ओ दिली कुणा ?

उभा पाहशीं आतुर नयनीं
किती बोलशीं खोल रवांनीं !
ता हृदयाच्या धडकीमधुनी
तें ऐकूं येइल काय कुणा ?
मम हृदया, तूं ओ दिली कुणा ?

विश्वासामधिं कां तळमळशीं ?
आशेनेंची जाळ लाविशीं,
अंतरंगिंचा होम मांडिशी
कां पसायदानाविणें मना ?
मम हृदया, तू ओ दिली कुणा ?

जन्मठेप

आई, नमितों श्यामल चरणीं
अंतरती जे मज घडिघडिंनीं!

निघतां माते, पाउल नुचलें
प्रिय भूमिंत जणुं दडुनी रूतलें,
पाश पदीं परि जे करकचले
ओढिती फर फर तुजपासोनी
आई, नमितों श्यामल चरणीं!

बोट सागरीं निघे भरारा,
वेलावायू हा तव खारा
चोरूनि येउनि आंत शरीरा
निववी, प्रेमळ श्वासच जननी!
आई, नमितों श्यामल चरणीं!

काळें पाणी पुढें खळखळें,
विषार पवनीं लहर सळसळें,
पैलतटावर मरणचि बसलें
क्षितिजीं भीषण ढग पांघरूनी!
आई, नमितों श्यामल चरणीं!

राख न माझी पडेल येथे,
तव दर्शन मग कसलें घडतें!
म्हणुनि मातृभू, ही सांगते
नेतो मंगल माती इथुनी
आई, नमितों श्यामल चरणीं!

आशा वांछा एकचि चित्तीं,
मित्रांना शत्रूंना विनती
मातृभूमिची मुठभर माती
मरतां पदरीं द्या बांधोनी!
आई, नमितों श्यामल चरणीं!

चितेंतुनी मम राखेमधुनी
माझियाच जातीचा कोणी
निपजुनि, स्वातंत्र्याच्या यज्ञीं
आहुति देइल तो फिरफिरूनी!
आई, नमितों श्यामल चरणीं!

वांचुनि जरि मी तेथुनि सुटलों
समज माउली, धांवत आलों
तव चरणांवरि नमना नटलों
खड्ग पडें जरि, शिरीं वरूनी!
आई, नमितों श्यामल चरणीं!

पराभूत वीर

पराभूत झालो म्हणुनि कां उरलों नच वीर?
तरवारीसंगे आमुचे तुटले का धीर?
पराभूत म्हणुनी करावा कां मग उपहास?
पराभूत म्हणजें नच कुणी नरकाचे दास!
पराभूत म्हणजें फिरविलें इमान नच त्यांनी
टाकिली न कांहीं धारही त्यांच्या शरांनी
अम्हां जखडलेल्या मणांच्या अजस्त्र बेड्यांत
'मरण फिरे' म्हणतां 'आमुचें ' तुम्ही 'धूत्कारीत?'
छे खण खण नादे, विजय तो भावी कालाचा
बंधन फोडोनी घोष ये, हा स्वातंत्र्याचा!
क्षणैक शत्रूनों, होउं द्या अम्हां बंधमुक्त,
उघडें यश मिरवूं शिरासह या तळहातांत!
काय बोलतां हो, फाटुनी निशाणही गेलें?
ठाउक असूं द्या हे आमचें हृदय न परि मेलें!
देशप्रीतीने तनुंत तें जोंवर धडधडतें!
निशाण जयानी आमुचे तोवर फडफडते
त्याच निशाणासी घालुनी घाव रणीं येऊं
पराभवाच्या या कोटि मग उजळोनी घेऊं!
पराभवांच्या या आमुच्या माळांपुष्पांनीं
विजय उद्यांचे ते पूजितों अम्ही जीवनांनी!
हातघाइमाजीं घडूं द्या अपुली रणभेट
पराभूत, विजयी कोण तें दावूं या थेट!
यश हें वीरांच्या खड्गाचे तळपणार पाणी!
मरण यशाची त्या साउली शीतळ रण–तपनीं!

पदरंजन

रंगवू नको निजपद रमणी
रंगते धरा ही तव चरणीं!
आरक्तच तव गुलाब–तळवे
रंग तयांना कशास व्हावे?

रंग उषेमधिं काय भरावे
ये सुवर्ण उधळित जी गगनीं!
रंगवू नको निजपद रमणी

अंगराग अंगुलिन घेशीं
हांसत हांसत पदीं चर्चिशीं
स्वयेंच बघुनि मधुनि लाजशीं
तें रंगे काय मनीं वदनीं?
रंगवूं नको निजपद रमणी

सहज मृदुल तव पाउल पडतें
तरूण हृदय त्या तिथें चिरडतें
रक्त तेच तव पदीं लागतें!
ही कशास मेंदी मग वरूनी?
रंगवूं नको निजपद रमणी

मदभारें पद टाकित जाशी
पदरागाने मनें जाळिशीं
संध्योषा परि कधीं खुलविशीं
तूं प्रवेशुनी वल्लभ-सदनीं?
रंगवूं नको निजपद रमणी!

घट भरूनि निघालिस-

घट भरूनि निघालिस लगबगिंनीं
निज हास्यसरीपरि रूमझुमुनी?
बुडविलीस तूं कळशी जेथें
अजुन तिथें जळ ते खळखळतें
लहरीवरचें हंसूं न मोडतें
कां तोंच चाललिस तूं हंसुनी?
घट भरूनि निघालिस लगबगिंनीं
मनिंच्या सुखमय आठवणींपरि
तव सांचल जल चंचल हें करि
अवकाशांतुनि उत्कंठा भरि
जणुं गंधच पवनपटामधुनी!
घट भरून निघालिस लगबगिंनीं

भीति टाकि कां ही बावरूनी?
-थांबतांच तुज घोळ धरोनी-
विचारील ही हळुं निर्झरिणी
'तूं नेशिं हृदय कीं जळ भरूनी?'
घट भरूनि निघालिस लगबगिंनीं

कला जलांनी पूर्ण जाहला,
कोण तुझ्या मनिं नयनीं भरला ?
भरूनि ठाव अन् रिताच उरला
दर्पण तवमुख मधिं दिसुनी !
घट भरूनि निघालिस लगबगिंनीं

येशिं तूंच कां नित पाण्यासी ?
काय कमी घरिं पडल्या दासी !
अशी कशी संभ्रमीं परतशीं ?
तो रिताच घट शिरिं बघ रमणी !
घट भरूनि निघालिस लगबगिंनीं

गुन्हेगार

सोडणार काहो मज इथुनी ?
द्या सजा आणखी वाढवुनी !
गुन्हा एकदां घडला– केला
कलंक त्याचा माथां बसला
तो पुसता ये तुम्हां, न काळा !
मुक्तींत अर्थ मग काय जनीं ?
द्या सजा आणखी वाढवुनी !

चोरी केली ज्यांच्याकरितां
ओळखतिल नच तेही आतां
लाजतील मम नांव जोडितां
मी कैदी, नच माणुस कुणी !
द्या सजा आणखी वाढवुनी !

गुन्हेगार जगिं कुणीं निर्मिला ?
प्रमाद पहिला न जयें क्षमिला,
शिक्षेसाठी तुरुंग सृजिला,
माणुसकी अमुची हिरावुनी !
द्या सजा आणखी वाढवुनी !

प्रकाश मजला जग नाकारिल !
छाया–शांती तिथली जाळिल !
बसली जागा ठावहि सोडिल !
लागतील दारें मज बघुनी !
द्या सजा आणखी वाढवुनी !

बरी प्रभावळ ही पापांची
सोबत सारी अपराधांची!
पाप न येथें पापा ज्याची
दुष्कर्मभार निज विसरोनी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

भिंतींनों, मज कुशींत दडवा,
थंड शिळांनों, अंकीं निजवा,
बेड्यांनों, गाऊन जोजवा,
जग– वारा पडुं द्या नच चुकुनी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

मजूर

खेळतां नाच मधु–रंग
कधिं विचार ये का हाडें
नेसतां तलम वसनें तीं
किति दु:खदग्ध अंतड्यांचा
गृहिं सांठवितांना धान्य
कुणिं वाढविलें शेतांत
हां शेठ, जरासें थांबा
कितिकांची माती केली
नृपतिंनों, पृथ्विमोलाचे
किति युगानुयुग कोणाचें
हृणवितां तुम्ही रणगाजी,
या तुमच्या शस्त्रास्त्रांना
हे हेच मजूर पथींचे
या युगिंचे हे शिबिराज
ते म्हणती या येनांनों!
घ्या अपुलें भार

नभचुंबित रंगमहालीं
पिंचलींत कुणाचीं खालीं!
कल्पना शिवे कोणाला
पडलासे पीळ सुताला?
थबकलां असें वाटून?
ते घाम–अश्रु सिंचून!
मोजितां, द्रव्य–कोषांत
तैं सुवर्ण ये हातांत?
मुकुटांत जवाहिर जडिलें
तें रक्त गोठुनी बनलें?
करितसां कुणावर वार?
लाविली कुणी रे धार?
वाहती शिळांचे भार
निज यज्ञ ज्यां कुलाचार!
या सारे करूनी पाळें
तनु–लचके तोडून सगळे!

मधुराणी

सांडु दे फेंस! घे भरी भराभर बाले,
बस ठेवु नको तूं आज रिकामे प्याले!
फसफसुनी खदखद हंसु दे मधु पात्रांत,
खिदळुं दे तेच तूफान तुझ्या नयनांत!
मम जीवन–तळ मज दिसला तव चषकांत
लागला हृदयिंचा थांग तुझ्या डोळ्यांत!

कां संकोचुनि तूं बघशिं आंखल्या नयनीं ?
नारिंग उडवुं मधुलहरीवरती धरणी !
मधुराणी, कर पाजुनी जिवाला धुंद
बुडविले इष्क–प्याल्यांत लौकिकी छंद
भर प्रेमा, –भरिशी–भरूं दे चषक विषानें
टाकितों पिउन, हांसून, आण, तृप्तीनें !
परि नको निराशा प्रीतीची मज दावूं
प्रिय हास्या, हृदयीं सुरी नको रे होऊं !

ये पूर्ण कराया चित्र गडे !

ये पूर्ण कराया चित्र गडे
मम हृदय–चित्र अपुरेंच पडें !

स्तब्ध करीं निस्तब्ध कुंचला
रंग रंगदाणींत सजला
चित्रकल्पना चित्त चंचला
जड रंगांना या नच अंतुडे !
ये पूर्ण कराया चित्र गडे

ओढ्यामधुनी कळशी भरूनी–
घेतांना शिरिं, अंग तोलुनी
मीनाक्षी, जळिं टकमक नयनीं
ते मीन पाहती तुझ्याकडे !
ये पूर्ण कराया चित्र गडे

सांजरंगिं जळ निळें तळपतें
रूप तुझें त्यामधें झळकतें
लाट निजसुरी मृदु पुटपुटते
जणुं ओढ्याला तव स्वप्न पडें !
ये पूर्ण कराया चित्र गडे

कलावंत तो चित्रकार तो
झरा जळीं तव चित्र काढितो
चित्रकार अम्हि वृथा म्हणवितों
नव रंग खुले परि भाव दडे !
ये पूर्ण कराया चित्र गडे

भाव लोचनीं भिरभिरणारे
हृदयीं पदरीं फडफडणारे
श्वासामधुनी थरथरणारे
सुमरंगिं गंधसम करिं उघडे!
ये पूर्ण कराया चित्र, गडे

नववर्षास-

वत्सरा, वंचना किति करिशीं?
नभिं उदयरंग उडते भरिशीं!

नव्या पालविंत, नव सुमनांतुन
फसवी आशा देशीं झोंकुन
शुभारंभ नव वर्षा येथुन
परि अंतचि जवळी पालविशीं!
वत्सरा, वंचना किति करिशीं?

त्या प्रलंयकर जगदंताचा
नव आघातचि तूं रे साचा
वास वसंतीं तव शिशिराचा,
सुम-हंसितीं किति त्या लोपविशीं!
वत्सरा, वंचना किति करिशीं?

नवतेचें मुखिं गाणें गाशीं
नव सृष्टी तूं कसली रचिशीं
नव वर्षाच्या उकळीसरिशीं
मम जुनचिं दु:खें तडकविशीं!
वत्सरा, वंचना किति करिशीं?

'गत वर्षाला विसरा हंसुनी'
आग निवे कां अशा सांत्वनीं?
जखमा बांधिशिं फुलमाळांनीं!
स्मृति जाळी तव नव सुमराशी!
वत्सरा, वंचना किति करिशीं?

ज्योत

जागते कशास ज्योत देउळीं अजूनी
बडवतांच पवन कां न जातसे विझूनी!

दीर्घ रजनिही सरली,
दीप–कांति ओसरली,
तेवतांच कां न तमें टाकिली गिळूनी!
ज्या स्नेहावर जगली–
ज्योत, ती झरी अटली
वात जळे स्नेह सर्व दग्ध तो करूनी!

जळुनि जीवनांत हाय!
मिळविलेंस अंतिं काय!
काजळीच भोंवताली ठेविली भरूनी!

वैखरीस

आवेशें वदत्येस काय, कळतें कांही तुला वैखरी?
शब्दांची तुज धुंदि बुद्धि–चपले, उन्मत्त कैशी करी?
ओकावें विष कां? फणांतिल मणी लाभे जरी सर्पिणी!
जाळोनी इतरांस तूंहि जळशीं ज्वालामुखी लावुनी!

भारताचे दधीचि

(प्रायोपवेषण करून देहत्याग करणाऱ्यां हुतात्म्यांस समर्पण)

स्वतंत्र देवांना कराया अस्थि जयें दिधले
आज भारतीं तेच का दधीचि अवतरले!
स्वर्गा राखाया त्यागवर एकचि तो होता
हिंदतारणाला धांवले कितीतरी आतां!
त्या जड अस्थींनी दानवां चूर्ण तदा केलें
ज्वलज्जीवज्योती आज तर जाळिल जग सगळें!
घालशील वृत्रा! किती तूं सैतानी नाच
बघ पायाखालीं धुमसते असंतोष– आंच
जगांत कोठेंही पेटतां अशी त्यागज्वाला
सांभाळी जुलुमा! आपुल्या छत्रचामराला.
त्यागमूर्ति मुनिंनों, रक्त नच हें वांया गेलें

स्वराज्यभाग्य तुम्ही तयांनें हिंदभालिं लिहिलें!
निरहारें तुमचें रूधिर तें बिंदु बिंदु अटलें
पळा पळा जळुनी आंतडें तटतट कीं तुटलें!
ध्येयापासोनी तिळभरी मन न परी हटले
स्वातंत्र्यासाठीं याहुनी खडतर तप कुठलें!
प्राणविहग तुमचे वाहुनि निजपंखावरती
स्वतंत्रतादेवी आणितिल उद्यांच भूवरती!
तुमच्या मरणाने मढींहिं जिवंत होतील
ध्येयपूर्तिसाठी पृथ्विही सर्व उलथतील!

राष्ट्रघातपाती पातकी पूर्वज जे अमुचे
या मरणें त्यांचें जाहलें क्षालन पापांचें!
अमर-मृत-ऋषिंनों! वंदितो जागविला देश
शक्ति तया द्यावी सहाया तुमचे ते क्लेश

जलतरंग

अभंग.
रोजच्याच साऱ्या क्रूर आघातांनीं
झालें पाणी पाणी हृदयाचें
तयांनीं भरून आयुष्याचे प्याले
मांडून ठेविले तुजपुढें
करून त्यावरी कोमल आघात
स्वर लावी सात वादका रे!
होऊं दे कशीही जीवनाची गत
आपुलीच गत वाजवी तूं!
आघातें प्याल्यांत स्तब्ध जलावरी
उठवी लहरी मंद मंद
जीवन-भंगांत आणि भरपूर
काढी गोड सूर वाटती ते
माझ्या हृदयींच्या आघातें निर्मित
असें हें संगीत आलापी तूं!
पर्वा न घावांची, मृण्मय प्याल्यांची
माझ्या हृदयाची गीतासाठीं!

रूद्रवीणा

रूद्रवीणाः

रूद्रवीणा हा संग्रह "फटत्कार" नंतर तेरा वर्षांनी प्रसिद्ध झाला. "रूद्रवीणा" मूळे कांतांना कवी म्हणून आगळे वेगळे व्यक्तिमत्व मिळाले. प्रस्तूत संग्रहाला श्री. प्रभाकर पाध्ये यांची प्रतिकुल प्रस्तावना आहे परंतू ती कुठलाही किंतू मनात न ठेवता कांतांनी जशीच्या तशी प्रसिद्ध केली. या प्रस्तावनेत कांतांच्या प्रतिभेला मारक व अपकारक असे बरेच मुद्दे पाध्ये यांनी मांडले आहेत. कांतांच्या प्रतिभेवर कुठल्याही प्रकारची स्तुतीसुमने न उधळणारी व तीवर आघात करणारी प्रस्तावना असली तरी "रूद्रवीणा" मधील कविता म्लान झाली नाही व तिचं तेजही कमी झालं नाही.

"रूद्रवीणा" संग्रहात कांतांनी १९३२ ते १९४६ या चौदा वर्षांच्या काळात लिहिलेल्या एकंदर ८० कविता आहेत. कवी कांतांच्या प्रतिभेच्या नवोन्मेषाच्या काळातील या कवितांमध्ये रचनेची विविधता आढळते. त्यामुळे कांतांच्या विविधता असलेल्या स्वयंभू काव्यशैलीचं इथं प्रारूप प्रत्ययास येतं. ही काव्यशैली दुसऱ्या कुठल्याही शैलीचं अनुकरण व छाप यापासून मूक्त आहे. स्वातंत्र्यभावना व सामाजिक विषमते समोर बंडखोर मनोवृत्ती घेवून उभी असलेली कांतांची शब्दरचना पुढे लडिवाळपणाने प्रणयभावही तितक्याच प्रभावाने आकर्षित करते. रूद्रास, मूर्तिभंजक, अक्षरे तुम्हाविण कोण करील वज्रांची, सांडिता कुणास्तव रूधिर तरी, दुंदुमी आमच्या बनवा, अग्निपंख नभि फडफडू दे–इ. कविता स्वातंत्र्य मिळविण्याच्या उन्मादाचा जल्लोष करीत असल्या तरी दूसरीकडे "रमणी उदविशी निज कचभार, ये पूर्ण कराया चित्र गडे, मोगरा फुले तो थांब, तव नयन मुलायम हलले, त्या तरूतळी विसरले गीत, सखि शेजारीणी तूं हंसत रहा" इत्यादि कवितांमधून कांतांनी अस्सल प्रणयरस ओतला आहे.

यज्ञसंप्रदायाचा दाखला देवून अग्निसंप्रदायाचे कवी म्हणून उत्तरकालीन समीक्षकांनी नेम धरून कांतांची कविता बाजूला सारली तरी तत्कालीन परिस्थितीत लिहलेली ही कविता त्यावेळच्या कुठल्याही कवीच्या कवितेपेक्षा आपला दर्जा उंचीचा ठरवते आणि तसही पाहिलं तरी "त्या अमूक" संप्रदायाचा शीक्का मारू म्हटलं तर सांप्रत घाटणीच्या फक्त १२ कविताच "रूद्रवीणा" या संग्रहात आढळतील अन् हे जरी वरवरचं असलं तरी या संग्रहातील बहूतांश कविता सनातन मानवी भाव–भावनांना अधोरेखीत करतात एवढेच नव्हे तर कांत आपल्या कवितांमधून रम्यतेचे आकर्षण विविध भावरूपात व्यक्त करतात. या रम्यतेची साक्ष काही भावगीत रचनांमधून समोर येते. "त्या तरूतळी विसरले गीत, सखि शेजारीणी तूं हंसत रहा, रमणी उदविशी निज कचभार" ई. भावगीतांना कांतांनी स्वत:च्या काव्यप्रतिभेचा एक वेगळाच Romantic "टच" दिला आहे. यातील एक दोन भावगीतं तर आज पन्नास साठ वर्षानंतरही काव्यरसिकांच्या मनात घर करून आहेत.

प्रणयपर कवितांमधून "रूद्रवीणा" या संग्रहामुळे कांतांचे एक तरल भावकवी म्हणून रूप स्पष्ट होते. पुढे कांतांच्या काव्यप्रतिभेचे हेच एक मोठे सामर्थ्य ठरले आणि त्यांची सार्वकालीन प्रतिभेची कक्षा निश्चित झाली. या संग्रहातील "हे तूझेच गाणे"– या कवितेत कांत स्वत:च्याच कवितेला उद्देशून म्हणतात– "तुझे नी माझे नाते आता जूळले ते जूळले – मी मानवाचा प्रतिनिधी तर तूं दैवी शक्ती– तूझे स्मरण व स्तवन करतांना मी म्हणतो"–

"अकाल उन्मद बनूनी वेदना, रचितो स्वप्ने गं
हे तूझेच गाणे ग
युगायुगातुनि गात चालतो गातचि जाणे गं

कवितेशी जडलेली ही नि:सीम भक्ति कांतांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वापर्यंत जोपासली. "मावळते शब्द" या काव्यसंग्रहातही कांत आपल्या कवितेला तिचे उपकार मानतांना म्हणतात–

पन्नास वर्षांची आपूली सोबत
चाललो ही वाट तेढीमेढी ....
अमृतवर्षी तूं कुंडलीनी जागी,
असा भोगी योगी तुजमूळे

कवी कांत हयात असतांनाच "रूद्रवीणा" हा कवितासंग्रह महाराष्ट्रातील विद्यापीठांतून पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी नेमला गेला हा कांतांच्या प्रतिभेचा गौरवच.

रूद्रास

नेत्रानलि करूनी त्रैलोक्याची होळी
अन्याय–असमता रगडित पायांखाली
कर तांडव रूद्रा, विराट विश्वचितेत
किंकाटत खचता परि रविमाला खाली
हांसवी स्वप्न नव पार्वति अरूण कपोली!

मूर्तिभंजक

खंड खंड करिन आज सर्व दिव्य मूर्ति
करि चिद्घनचपलाघण
वस्तुजात हे भंगिन
युगयुगिच्या शेंदरल्या कल्पकोटि ह्या आकृति
चूर चूर करिन मी

मंदिर हे मुक्त करा,
द्वारपाल, उगि न मरा,
पूजकगण, दूर सरा
भिंत खचे, द्वार फुटे, श्रद्धेसह अंधांनो,
अडसरही भंगती खंड खंड करिन अता
सर्व देवमूर्ति

घाव किती चुकविताल,
कायकाय वाचवाल
झाकुनिया कृष्णगूढ भूतकाल–संपुटात?
भंवति बघा, चूर उडे दिक्कालांचा!

मानवांस तुडवुनिया,
रक्त–मांस–चिखल करून,
बसविल्यात धर्ममूर्ति त्या खूनी मातीच्या
चपल–भाव–पीठावरि,
रडवुनिया दुबळ्यांना
अश्रुंतून निर्मिलीत नीतिदेवी पंकजा,
अन्नाविण तडफडले
पथि सडसडुनी मेले
घालुनि माळा त्यांच्या, थिजलेल्या बुबुळांच्या
नाचतात मंदिरांत कोटि कोटि देवमूर्ति!

पूजा यांचीच करा बळि देउनि आम्हांला
लावा माथ्यास टिळा आमुच्याच रक्ताचा
हे न घडे!

पंथ पुढति किति पांथा, बघ अपार पसरला
का परंतु थांबलास?
तू इथेच श्रांतलास?
वाटेच्या पत्थरास ठेचाळुनि, अडखळुनि काय पडशी?–
तोच दगड आणि काय पूजेस्तव मांडिला!
अर्चिलेस ऊष्णऊष्ण मानवरूधिरांनी,
हे भोळे रक्त तुला शेंदुर कां वाटते?
धिक पंगू मानवा!

हे मंदिर बांधिलेस,
ती मशीद उभविलीस,
लववितोस मान इथे मिटुन नेत्र का?
का न कळे उभविलेस आपुल्याच हातांनी
तूच पराजयस्तंभ आपुलेच तुंग तुंग
बुद्धिशालि मानवा!

छिन्न छिन्न करिन आज मूर्ति या सुपूजिता
शकले ती फेकिन अन दाहि दिशा
मूर्ति एकही न विकिन मृदु भोळ्या भावांना
हा न मूर्ति–विक्रेता पाप–पुण्य–व्यापारी
क्रूर मूर्तिभंजक मी!

घणावर घण घालिन
हे असीम दिग्‌बंधन फोडूनिया,
धड धड धड कोसळवीन जीर्ण दुर्गाभिंतीपरि
कृष्ण रात्रिसम पुराण कालाचे वज्रपटल.

चूर्ण करिन घावघणी
स्वर्मंदिर!
स्वप्नदीप!
काय टिके मी बघतो, दिक्कालांच्या भंजनि–
या दुर्धर –घाव–घणी
खंड खंड करिन आज या पुराणमूर्ति!!

अमरज्योत

वज्र अस्थीचे दधीचि
दिव्य–ठिणग्या ज्या उडाल्या
निर्मितां संग्रामकाली
ज्योत त्यांची पेटताहे!

साहुनी अन्याय–भारा
त्यांत जो दावाग्नि जागे
गाळिल्या ज्या अश्रुधारा
ज्योत त्याची पेटताहे!

अर्धपोटी की उपाशी
दाबिला जो जाळ त्यांनीं
कष्टती कंगाल देशी
ज्योत त्याची पेटताहे!

ध्येयमार्गी झुंजतांना
प्राणज्योती ज्या विझाल्या
बंधने विध्वंसितांना
ज्योत त्यांची पेटताहे!

विराट जागरण

खारा वारा हेमंताचा दाहकपणि झुळझुळे
भुजंगमाच्या स्पर्शी शीतल जहर–लहर जळजळे
कधि देशसेवकां कड्याहुनी लोटिले
अन् रक्त तयांचे युगे दरित गोठले
ये वाहत वितळत आता मंदानिलें
विराट दे आळस, सोडी श्वास त्रस्त गांजले
खारा वारा हेमंताचा दाहकपणि झुळझुळे

शब्द कशाचा? काय खणखणे? कोंदुन अंबर उले
धराकंपघर्घरीत भीषण घनगर्जन मिसळले
का दिग्गजघंटा होय चूर्ण भंगुनी
वज्रसे पुरातन कालकवच फोडुनी
ये नवयुग जन्मा क्रांतिशिंग फुंकुनी
विराट जन हुंकारे, त्याची बेडी ही खळखळे!
शब्द कशाचा? काय खणखणे? कोंदुन अंबर उले

तेज कशाचे? लाल वारूणी सांद्र अरूण उजळले
अर्धजागल्या पन्नगशिरिचे रत्नमणी झळकले
होमानलि बलिचे काय रूधिर उसळले
अज्ञात हुतात्मा–सरण कुठे धडकले
त्याचाच निखारा का रसरसुनी फुले
विराट जनता जागे, घूर्णित नयन लाल उघडले
तेज कशाचे? लाल वारूणी? सांद्र अरूण उजळले

बघ गरूडांच्या पंखाघाते स्वर्ग काय हादरतो ?
तांडव चाले का रूद्राचे ? प्रलय-डमरू वाजतो
राहिले तृषार्तचि भागीरथि निर्मुनी
अन्नाविण मेले जे सोने पिकवुनी
सत्तेविण पडले धुळीत रण झुंजुनी
प्रतिकार-ध्वनि त्यांचा गर्जे, विराट जन जागतो
बघ गरूडाच्या पंखाघाते स्वर्ग अता हदरतो !

तारूण्य-संगीत

वाळतात ओढे
तुफान रूधिरी

वाळतील सिंधु
नवे चढे

विझतात दीप
माझ्या नेत्री तेज

विझतील सूर्य
प्रज्वलित

आपले सांडले
एकटा मी चाले

सांगाती पांगले
कालशिरीं

नसेल चाकरी
भूक आहे परी

नसेना भाकरी
सर्वंकष

आयु संपताहे
प्राण परी जागे

देह खंगताहे
देशोदेशी

नसे सत्ता, नाही
पूरे, मनी नाचे

स्वातंत्र्य कशाचे ?
बंडखोरी !

नवे वर्ष

वर्ष नवे प्रकटले
आज हे वर्ष नवे प्रकटले
प्रकटत असता स्वर्गधरेचे सात तळ हादरले

वाहटुळी घोंघावत फिरती
स्तंभ धुळीचे गगन वेधती
पिकली पाने मधि अक्रोशति
जुन्या जगाचे बंध आमुच्या देठासह उपटले !
आज हे वर्ष नवे प्रकटले

तोफांचा गडगडाट झाला
पश्चिमेस अन् पूर्व दिशेला
घोरंदर रणयज्ञ भडकला
समुद्र उकळे, शिसे नभाचे त्या आगित वितळले ?
आज हे वर्ष नवे प्रकटले

रणधुमाळिची धूळ मुखावर
पोट रिते, प्रक्षुब्ध हृदंतर
नेसुनिया असिपत्र भयंकर
विराट तृष्णेतुन संहारक संवत्सर उगवले
आज हे वर्ष नवे प्रकटले

कंठी नररुंडांच्या माळा
साम्राज्याचे भस्म कपाळा
प्रेतांवरती नाच मांडिला
ओल्या मानवचर्मांचे करि निशाण फडकाविले !
आज हे वर्ष नवे प्रकटले

अपलक नेत्री ज्वाळा फुलती
धूर लोळ केसांतुनि उठती
निश्वासी बारूद पेटती
स्फोट कुलुपी गोळे झेलित युद्धदेव पातले !
आज हे वर्ष नवे प्रकटले

ये नव वर्षा, प्रलय करित चल,
नगरे, राज्ये नांगरीत चल,
शिरे बलींची अन् पेरित चल,
मानवतेचे पीक नवे ये उद्या, सुगी ती साध बळे !
आज हे वर्ष नवे प्रकटले.

गुन्हेगार

सोडणार का हो मज इथुनी ?
द्या सजा आणखी वाढवुनी !

गुन्हा एकदा घडला, केला
कलंक त्याचा माथा बसला
तो पुसता ये तुम्हा, न काळा !
मुक्तीत अर्थ मग काय जनी ?
द्या सजा आणखी वाढवुनी !

चोरी केली ज्यांच्याकरिता
ओळखतिल नच तेही आता
लाजतील मम नाव जोडिता
मी कैदी, नच माणूस कुणी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

गुन्हेगार जगि कुणी निर्मिला?
प्रमाद पहिला न जये क्षमिला,
शिक्षेसाठी तुरुंग रचिला
माणुसकी आमुची हिरावुनी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

प्रकाश मजला जग नाकारिल!
छाया–शांति तिथली जाळील!
बसली जागा ठावहि सोडिल!
लागतील दारे मज बघुनी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

बरी प्रभावळ ही पापांची
सोबत सारी अपराधांची!
पाप न येथे पापा जाची
दुष्कर्मभार निज विसरोनी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

भिंतीनो, मज कुशीत दडवा,
थंड शिळांनो, अंकी निजवा,
बेड्यांनो, गाऊन जोजवा,
जग–वारा पडु द्या नच चुकुनी!
द्या सजा आणखी वाढवुनी!

सदरा

(राखी पौर्णिमेच्या दिवशी बहिणीने आपल्या हातच्या शिवलेल्या सदऱ्याचे वाण भावाला द्यावयाचा प्रघात उत्तर हिंदुस्थानात आहे. त्याने भावाचे आयुष्य वाढते, असा समज आहे. याच विश्वासाने फाशीच्या तक्तावर उभ्या असलेल्या आपल्या भावासाठी सदरा शिवणाऱ्या प्रेमळ बहिणीच्या मनातल्या तुफानाची कोण कल्पना करू शकेल?)

तुज असो औक्ष हे युगायुगाचे, भाई
अमृते नाहुनी घटका घटका येई
छळितात दूत तुज जुलुमी परसत्तेचे
सारेच भुकेले पशु भवती प्राणाचे
वळितात तुरूंगी दोर तुझ्या फासाचे
परि कुशल चिंतिते घरी आपुली आई
तुज असो औक्ष हे युगायुगाचे, भाई

रात्रीत पुशित मी डोळे निज पदराने
शिविला रे, सदरा हा आपुल्या हाताने
मृदु कवच फुटेल न हे अत्याचाराने
भारिले सूत हे प्रिय आशीर्वचनांही
तुज असो औक्ष हे युगायुगाचे, भाई

परि वाण तुज कसे हे माझे पोचेल?
नच अंतिम आशा फासावर पुसतील?
का सदराहि न तुज ते घालू देतील?
या तंतुतंतुंतुनी भगिनिहृदय हे गाई
तुज असो औक्ष हे युगायुगाचे, भाई

या बलोद्धतांना दया न शिवली काही
तव यज्ञ पाहुनी प्रभुही द्रवला नाही
तरि सदरा हा तव अंगी जोवर राही
तव प्राणहरण– छे! शक्य न देवांनाही
तुज असो औक्ष हें युगायुगाचे, भाई

अक्षरे तुम्हाविण कोण करिल वज्राची ?

येताच नाथ, ती
कावड श्रीखंड्याची
जलभरणी होते
प्रतिवरसी हाताची

परि रितेच जीवन
सारे दग्ध–उन्हाळा!
ही तहान सांगा
केव्हा संपायची?
* * *
या नाथ, सारूनी
मृदु पुष्पांची शाल
अजुनिही तप्त रणि
रडते अंत्यज बाळ
अमृतस्नात कर
बुद्धदयेचा तुमचा
येऊ द्या खालती
ओलांडुनि दिक्काल
* * *
अश्वत्थमुळ्यांचा
गळा लागता फास
केलेत मुक्त तुम्हि
नाथ, ज्ञानदेवास
अक्षरे तुम्हाविण
कोण करिल वज्राची?
प्रिय मायबोलिचे
बंधन तोडायास
* * *
शब्दांस रूजवुनी
या राकट काळीत
बसलात अमृते
नाथ, त्यास शिंपीत
शककर्ते गेले
तरिही आज अजून
ही फुले मराठी
नवी युगे फुलवीत

गाशिल का हे गान?

सखे, तू गाशिल का हे गान?
गळा कोवळा तुझा मंजुळे, चंद्रकिरण जणु तान

मधुर मदिर तू गीत गाइले
पंछि मनोनीडांत जागले
व्यथित चक्रवापरि घाली हृदय प्रीतिला आण
असे ऐकिले गान

रूप–यौवनी स्फुरे कल्पना
शब्द फुटति मधु कळ्याफुलांना
आलिंगनपाशापरि होती भावबंध निर्माण
असे ऐकिले गान

इथे न ती तारूण्य नव्हाळी
सर्व भुकेची आग भडकली
आसुड उडती, वाजति बेड्या, क्रंदे भूमि वितान
सखे, तू गाशिल का हे गान!

गरल दर्प फूत्कार फणीचे
कुंड धगधगे मनि सूडाचे
शब्द–निखारे ते खवखवती, हृदयी धूर भयाण
सखे, तू गाशिल का हे गान?

देशास्तव वनवासी झाले
न्यायास्तव फासावर चढले
अराजकांच्या अभिलाषांचे घुमते येथ तुफान
सखे, तू गाशिल का हे गान?

आशेने जे गेले श्रमुनी
त्यांच्या थिजल्या त्या बुबुळांतुनि
तेज घेउनी येई कल्पना तेजांळित अस्मान
सखे, तू गाशिल का हे गान?

सणसण सुटती गोळ्या पवनी
निरपराध ये रक्त उसळुनी
अरूण तयाचा गगनी धावे निर्माया दिनमान
सखे, तू गाशिल का हे गान?

अडवू जुलुमाचे रणगाडे
शिशु लोटिति निज तनुसांगाडे
त्यांच्या पिचल्या मऊ हाडांचे या ओळित आव्हान
सखे, तू गाशिल का हे गान?

बलशाली साम्राज्ये खचती
दलित करे दिक्काल बदलती
त्या समराचे, त्या क्रांतीचे स्फुरे इथे ध्वजगान
सखे, तू गाशिल का हे गान ?

लज्जारूपा विवस्त्र केले
यौवन-वस्त्रचि फाडुनि लुटिले
त्या लज्जेचे रंग वाहती जळतचि रक्तसमान
सखे, तू गाशिल का हे गान ?

त्रिनेत्र तांडव करितो ज्या क्षणि
झरे शशिसुधा, धडके अग्नि
त्या नाट्याचा अर्थ धराया शब्दपंक्ति गतिमान
सखे, तू गाशिल का हे गान ?

एक संवाद

मराठवाड्यातील धूळ-
भाले तोडित फाडित ध्वजपटा फोडीत सिंहासना
उत्पातापरि पातलास वरूनी ध्वंसू महाराष्ट्र हा
मातीला मिळवावयास झटला स्वातंत्र्य जेथील तू
सम्राटा! तिथल्याच धूळित पहा आता स्वये लोळशी

औरंगजेबाची कबर-
लोळे मातित मी, परंतु पणती ज्योती विझल्यावरी
माझा देह पडे सुशांत सिजदा अल्लास केल्यावरी
आलमगीरचि 'तुर्बतीतहि' अजीं साम्राज्य मी भोगिले
दासांचे उरलात दासचि तुम्ही येथे मला हे सले!

पुढचे चरण

रात जागवील
कुठवरती दीप तुझी रात जागवील

सूर्यतेजही न पुरे
म्हणुनि भवति रात्र उरे
क्षितिजातिल चंद्रकोर अवस बघ गिळील!

स्नेह ओतिशील किती
रक्तधारही कमती!
अधिकचि थरथरूनि ज्योत दिशा काजळील!

म्हण, तिमिरातचि कवना
दाम माग नच किरणा
अंधारातुनि तारा तुजशि हांसतील!

फोडुनि सतांध नयन
दीपकळी दे फुलवुन
त्या प्रकाशि लिहि पुढचे चरण स्फुरणशील!

भुकेची आग

का कलावंत साजणा, स्तब्ध तू असा?
रसहीन मेघ कष्टाने क्षितिजास टेकला जसा
तव भावस्वर मनि अजुन मधुन उमटती
ढग–जडावल्या क्षितिजात श्रावणी विजा चमकती
अर्धेच चतुरा, तुझे गान थांबले
पोळले भाव नजरेत सावलुनि तेज मंदले
रसिकतेस दुर्दम गान–तृषा लागली
तिज पुरे टिपुस ओलावा झरू देना गीतावली

मज, रसिका, ही कासया फुका विनवणी
अंतरी उमाळे जाती–जाउदे सुखे करपुनी
माझीच नसे ही सर्वकलांची गति
सहकला कलावन्तांची पडतसे नित्य आहुति
तुज न दिसे, नवख्या जिवा, कुंड पेटले
मज दिसे–दिसे का त्याचे चाटून जाळ चालले
बघ चित्रकारांची चित्रे ती पेटली
रंगवून निज रूधिराने आगीत आज होमिली!
सोसून घाव अंतरी मूर्ति घडविली
चारूता शिल्पकारांची त्या धगीत हा ! तडकली
शाहीर–अधरि येउनी शब्द जो हसे
तो करपुन त्याचे झाले बघ करात हे कोळसे!
पोटात भुकेची आग जधी पेटते
व्यापून हृदय चौफेर ती उभी गगन चाटिते
ती निवेल कशि काळजी अशी दिननिशी
अर्ध्याच गाइल्या ओळी, परि रहा तयावर खुषी
पोटात भूकेची आग जधी पेटते
जाळून कला संगीत ती उभी गगन पाटिते।

फितूर

चावून दुज्याला मी मरतो
माझेच घटघटा रक्त पितो

स्वार्थाला मी दुजे बळि दिले
भूत परि न ते तृप्त जाहले
मागी माझा घास ते बळे
त्या तृप्त अता ऐसे करतो
माझेच घटघटा रक्त पितो

माझे विष मम अंगी भिनले
त्या आगित मी रातदिन जळे
अश्रूतहि दावाग्न भडकले
गतकाल उभा पाठिस, गिळितो
माझेच घटघटा रक्त पितो

जेथिल प्यालो दूध तुझे मी
त्या हृदयाला केले जखमी
आई, तव क्षतरक्त पिउनि मी
अतृप्त पिशाच्चि जगि फिरतो
माझेच घटघटा रक्त पितो

खुशाल आता जळू द्या मजला
क्षमे, न सिंची निज अश्रुजला
आई, आवर तू ममतेला
जाळिता जगा अग्निहि जळतो
माझेच घटघटा रक्त पितो

मम फितुरीनें निष्पापांचे
रक्त सांडले जे भावांचे
उद्याच उजळिल कडे तमाचे
मी आज तमी यापरि बुडतो
माझेच घटघटा रक्त पितो

असेच मजला सडू द्या येथे
गृधांनो, स्पर्शा न तनूते
गळतिल तुमचे पंखचि उडते!
हा फितूर इथें कुजुनी मरतो
माझेच घटघटा रक्त पितो

पहा अंगुलि चिरून

पाहतोस काय शून्यी शून्य नजर लावून
शब्द गंभीर गर्जतो काय ऐक नसातून
रवि, अरूण कशाला आकाशाचे विसंबण ?
स्वर्णगर्भ रम्य दिन निर्मू आपला आपण !

पहा अंगुलि चिरून तुझ्या रक्त बिंदूतून
असे सख्या रे, झोपला तुझा उद्याचा अरूण !
जागवाया त्यास रोज माझे गायन चालले,
त्याच आरक्त प्रकाशा माजे नेत्र आसावले

नव्या नव्या तेजोन्मेषी विश्व फुलेल नवीन
परी जाईन तेव्हा मी तुझे क्षितिज सोडून
माझा दिन मावळेल, माझी फुले कोमतील,
रसरसलेली गाणी तीहि तेव्हा विटतील

परि आठवी एवढे कुणी गेलासे गाऊन
होता अरूण झोपला तुझ्या रक्तबिंदूतून !

तुज बोलवि देवगिरी

चल रे, तुज बोलवि देवगिंरि
यादव–गरूडध्वज पालवितो नभि तरूणारूणपटांतरी

गोलगोपुरे– भवती डोंगर
स्वप्नांचा थर नीळ तयांवर
त्या स्वप्नांना हसवू फुलवू वदवु उमलत्या कळ्यांपरी
चल रे, तुज बोलवि देवगिरी

काळी माती हीच येथली
जिची बाहुली भैरव बनली
हूण बर्बरास जिंकुनि जयगुढि जये उभविली घरोघरी
चल रे, तुझ बोलवि देवगिरी

ज्ञानेशाचे पाउल पहिले
रविबिंबासम इथे उमटले
तेज सुधा जिंकण्या पैज करि अजुनि धूळ या पथावरी
चल रे, तुज बोलवि देवगिरी

महाद्वार हे देवगिरीचे
इथे चर्म त्या हरपालाचे
लटकुनि सडले, गळले, गेले, वीज जागवित दिगंतरी
चल रे, तुज बोलवि देवगिरी

कथा सोलल्या ह्या कातडिची
गाणी पिळिल्या ह्या आतडिची
गाऊ ऐकू, नवयुग–दुंदुभि गर्जतील हे बनुनि गिरि
चल रे, तुज बोलवि देवगिरी

जन्मठेप

आई, नमितो श्यामल चरणी
अंतरती जे मज घडिघडिनी!

निघता माते, पाउल नुचले
प्रिय भूमित जणु दडुनी रूतले,
पाश पदी परि जे करकचले
ओढिती फरफर तुजपासोनी
आई, नमितो श्यामल चरणी!

'बोट' सागरी निघे भरारा
वेलावायू हा तव खारा
चोरूनि येऊनि आत शरीरा
निववी, प्रेमळ श्वासच जननी!
आई, नमितो श्यामल चरणी!

काळे पाणी पुढे खळखळे,
विषार पवनी लहर सळसळे,
पैलतटावर मरणचि बसले
क्षितिजी भीषण ढग पांघरूनी!
आई, नमितो श्यामल चरणी!

राख न माझी पडेल येथे,
तव दर्शन मग कसले घडते!
म्हणुनि मातृभू, ही सांगाते
नेतो मंगल माती इथुनी,
आई, नमितो श्यामल चरणी

आशा वांछा एकचि चित्ती,
मित्रांना शत्रूंना विनति
मातृभूमिची मुठभर माती
मरतां पदरी द्या बांधोनी!
आई, नमितो श्यामल चरणीं!

प्रकाश

चाल चाल, अंधारातचि, चाल एकटाची
पाहशील कुठवर तरूणा, वाट प्रकाशाची?
दीप, सोबती कुणी न
तम तुफान ये उठून
जणु हरील दृष्टि-प्राण आज एकदाची

कंटक वा शूल तेथ
जरि पथांत रोविलेत
भीति येथुनी कशास भावि संकटांची?

दमन, दैन्य हे बघून
मन रडेल पिळवटून
अश्रुने परी न विझव ज्योत तू मनाची

चमकति तव अस्थितून
तेच अग्निकण अजून
जागविली ज्योती ज्यांनी सूर्यमालिकांची!

श्रवुन पीडितांक्रंदन
धुपु दे तव हृदय तरूण
वाट ते प्रकाशिल तुझी जाळ पेटताची!

सांडिता कुणास्तव रूधिर तरी?

सांडिता कुणास्तव रूधिर तरी
ऊष्ण अर्घ्य अर्पिता कुणाला? देव न उरेल धरेवरी.

यौवनविक्रमरसि फेसळला
रसरस तुमचा जीवनप्याला-
क्षितिजी अमृतघन जणु लवला!-
दगड शेंदरी निज रक्ताने अजुनि लेपिता कोठवरी?
सांडिता कुणास्तव रूधिर तरी?

मंत्र, गीत तुम्ही स्वातंत्र्याचे
जयजयकारच लोकशक्तिचे
स्वप्न अमर तुम्ही तारूण्याचे
बंदिघराची भिंत उभविता का निज हाडांनीच वरी ?
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

अमुच्या अस्थिशिरांच्या केल्या
घोर फिरंगी लोहश्रृंखला,
फितुरांनी त्या पायि ठोकिल्या
तोडा त्या बेड्या नि उडू द्या ठिणग्या लोहातून वरी
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

पहा कापिले शिर 'तात्या' चे
नभि आव्हानित अजुनी नाचे
तुटले बाहू 'गोंकलखांचे'
उभे दिशांतुनि तडफड करिती खड्ग धरू देशार्थ करीं
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

'नाना' ची तनु 'तराई' तुनी
उठे थडथडत हिवतापानी
पुसे कुणास्तव तुम्ही उभे रणि
जळत्या गंजीतूनि विचारी 'लक्ष्मी' ज्वालामय नजरीं
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

खंडित शस्त्रे परजायाला
अस्थि ठेवुनी 'मंडाले' ला
'शाहे जफर' तो वृद्ध आंधळा
पुत्रशवांना शोधित फिरतो, काठीविण धडपड कबरी
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

चघळित बसला तुकडे कसले ?
पहा रोटिवरि काय कोरिले ?
'तुम्हि शतकाचे गुलाम सगळे'
फेका तुकडे, पोट उपाशी गडगडु द्या घनतडिद्स्वरी
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

कुठे निघाल्या फौजा तुमच्या ?
'कैवाराला मानवतेच्या' गुलामास अधिकार न त्याचा
तोडा आधी आपुल्या बेड्या, माय उपाशी मरत घरी
अर्ध्य तिला द्या निज रूधिरी
सांडिता कुणास्तव रूधिर तरी ?

अपुला पंथ निराळा!

अपुला पंथ निराळा साजणि,
सुमनचयन हे कशास मार्गी? रचल्या आंसव-माळा!

सुखसदनी नच आम्हा रमणे
नच हास्याच्या उन्हात फिरणे
'काट्यांच्या अणिवरच्या' गावी जाणे भाग आम्हाला
अपुला पंथ निराळा !

अंबर रंगे प्रकाश-किरणी
तापुनि तडके अंतरी धरणी
विषण्ण क्षितिजी, झिरपत झुरते खिन्न ग्रीष्मघनमाला
अपुला पंथ निराळा!

सुख न पसरि पथि घडी फुलांची
कीर्त करि न साउली उन्हाची
मृत्युनंतर स्वर्गसुखाची ना स्वप्निल पडशाळा
अपुला पंथ निराळा!

आग सुरेतुनि जी धगधगते
अश्रुमधुनि जी दया ठिबकते
मिश्रण त्यांचे अपुल्या रूधिरी उसळत बलिदानाला
अपुला पंथ निराळा!

दीप जळे, मधु तेज वितरते
शलभ जळे, तर राखचि उरते
म्हणतो कोणी जीवन राखचि, म्हणे कुणी ती ज्वाला!
अपुला पंथ निराळा!

जयजयकार

अखंड जयजयकार करू या अखंड जयजयकार
दलितांचे रणशिंग गर्जते असंतोष-टंकार

धन्य आज दिन! भीती सुटली
प्रभा नवी रविबिंबा चढली
त्यागकांति ज्योतीत प्रगटली
जळता शलभ अपार करू या अखंड जयजयकार

या दिवसाची आशा अपुली
युगायुगांतुन जी दडपियली
फोडुन कालकटोह उफळली
देत समर–हुंकार करू या अखंड जयजयकार

अडवितील नच तुरूंगार्गला
बांधितील नच अता श्रृंखला
उभा असे जनरूद्र कोपला
तोडुन बंधन पार करू या अखंड जयजयकार

अस्थीतचि यज्ञाग्नि जागला
भिडति नभी होमाच्या ज्वाला
वृद्ध तरूण आहुतीस सजला
सत्याग्रहि झुंजार करू या अखंड जयजकार

राज्यधरांनो, कुठली सत्ता
रूधिरमलिन ती अमुची मता
मदे हंसा नच बलिच्या रक्ता
फुले सजल अंगार करू या अखंड जयजयकार

निर्भय गान

('वंदेमातरम्' हे गीत गाण्याच्या जन्मजात अधिकाराच्या संरक्षणार्थ तेजस्वी लढा चालविणाऱ्या उस्मानिया विद्यापीठाच्या वीर विद्यार्थ्यांस .....)

गा, गा, निर्भय गान,
सख्यांनो, गा,गा, निर्भय गान
स्वातंत्र्याच्या मंत्रोच्चारी भरू द्या नभोवितान

व्यथित दिसे प्रकटाया भुवनी
नव पहाट ती तुमच्या नयनी
नसनसांतुनि पराक्रमाची खवळे लाट उधाण
सख्यांनो, गा, गा, निर्भय गान

गाणे गा, ते मातृभक्तिचे
पूजन–मंत्रचि निज मातेचे
भिजुनि रूधिरि स्वातंत्र्यऋचा ती होय दिव्य निर्माण
सख्यांनो, गा, गा, निर्भय गान

या गाण्याला कोण थांबविल
वज्र न त्याचे अक्षर मोडिल
मातृदुग्ध का पिउन विसरलिस सत्ते, भूल भयाण!
सख्यांनो, गा,गा, निर्भय गान

भरून अंगि दमनाचे वारे
निखळा गगनामधले तारे
हृदयज्योती मग ह्या विझवा उठवुन जुलुम–तुफान
सख्यांनो, गा, गा, निर्भय गान

हे माझे जीवनगीत

हे माझे जीवनगीत
बाल्य हास्यसम विखरूनि गेले
क्षण कांक्षांनी ज्वलिंत जहाले
अन् अश्रूपरि यौवन आले आर्द्रपणी जाळीत
हे माझे जीवनगीत

ज्योतीभवती फिरलो फिरलो
शापित शलभापरि तडफडलो
अपुल्या राखेमधीच निजलो, पोटी धग निववीत
हे माझे जीवनगीत

कधी स्वरापरि मी झंकारलो
पवनाघाती तोच भंगलो
गाणे झालो किंवा उरलो पुसू कुणा गरदीत?
हे माझे जीवनगीत

मी रूधिरे नच उषा रंगविली
श्रृंखला न पायिची तोडिली
स्वप्न बंदिच्या मनिचे मी, जे तुटे जुटे रातीत
हे माझे जीवनगीत

उषेमधि तुम्ही, निशेपलिकडे
मी संध्येच्या अजुन अलिकडे
येऊ कसा हे धूमिल अंतर काळाचे तोडीत?
हे माझे जीवनगीत

किरण आजच्या नयनांमधले
स्फुरण आजच्या हृदयांमधले
या निश्वासी कसे पोचवू म्हणुनी हृदय व्यथीत!
हे माझे जीवनगीत

उन्हे आजची तुम्हा न दिसतिल
फुले आजची तुम्हा न मिळतिल
ऊब, गंध, हे ठेवू केवि मी, भरूनि शब्दपंक्तीत!
हे माझे जीवनगीत

अरूणतरूणसंगीत

अरूणतरूणसंगीत गाउ या अरूणतरूणसंगीत
स्वरभावांचे लास्य पुरे, वरू कराल तांडवरीत

रसरसणाऱ्या तरूण हृदयिच्या–
बेगुमान मदमस्त धडकिचा
ताल द्या तुम्ही या गाण्याला आत्मार्पण–धुंदीत
गाउ या अरूणतरूणसंगीत

दुर्बल मनिचे रडुनी रडुनी
गाणे थिजले जे अश्रूंनीं
तुफान हृदये पुन्हा खवळवू चला गोठले गीत
गाउ या अरूणतरूणसंगीत.

भाव न शोधा पुष्पकेसरी
अनंततेच्या किंवा कुहरी
पिळलेल्या अतड्यांचा घुमवा नाद शब्द–पंक्तीत
गाउ या अरूणतरूणसंगीत.

श्रृंगाराचे दीप मालवा
चलनू पुरनटनाच थांबवा
युद्धी खचल्या प्रेतासंगे रडे मानवी प्रीत
गाउ या अरूणतरूणसंगीत.

नकोत शीतल सुधाशर्वरी
नको रवि, जरी जीवन वितरी
जाळू आधी दलित भीत जग असंतोष– ठिणगीत
गाउ या अरूणतरूणसंगीत

तुफान चढते हृदयी रूधिरी
नवयुग जागे उन्मद नजरी
जुन्या जगाची कुजगी दांडी तोडू क्षणि लववीत!
गाउ या अरूणतरूणसंगीत

दुंदुभी आमुच्या बनवा

(राणी दुर्गावतीच्या समाधीजवळ तिच्या रणदुंदुभीदेखील दगड होऊन पडल्या आहेत. त्या शिला रोज रात्री येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना गर्जून बोलावतात, असे म्हणतात. त्या शिलांचे ते आव्हान असेच असणार, नाही का?)

रण फिरूनी एकदा लढवा
दुंदुभी आमुच्या बनवा

कुणि या हो, आम्हा बलिचर्माने मढवा
दुर्गावति गेली इथे समर लढवून
ही तिची समाधि स्फुंदे रात्रीतून
रणभेरि आम्हि तिच्या पडलो दगड बनून
या हौस आमुची पुरवा दुंदुभी आमुच्या बनवा

दुमदुमवुनि पूर्वी दिक्कालहि भेरीने
लढविली कबंधे रणी क्रांति–घोषाने
श्रृंखला गळाल्या केवळ पडसादाने
युगनाद आज तो घुमवा दुंदुभी आमुच्या बनवा

आव्हान रणाचे ते दुर्दम ऐकून
खणखणली खड्गे कवळ्या गवतांतून
सणसणून सुटल्या गोळ्या मातीमधुन
पाण्यात पेटला वणवा, दुंदुभी आमुच्या बनवा

रणचंडी झाल्या रमणी त्या नादांनी
नभ तोलुनि धरिले, कोसळता भाल्यांनी
फडकले 'दुपेटे' ध्वजांवरी ज्वालांनी
ते निशाण फिरूनी चढवा दुंदुभी आमुच्या बनवा

बंदींनो, घडवा वज्रे निज बेड्यांची
श्रीरामे केली स्पर्शे रमणि शिलेची
तुम्हि भद्रकालि या करा आज दगडाची
प्रलयाचे पडघम सजवा दुंदुभी आमुच्या बनवा

जातात पथित किति रात्री रानातून
परि हाक शिलांची कुणी न घे ऐकून
घोंघावे वारा, उल्का पडती तुटून
कुजबुजति पांथ हा 'चकवा' दुंदुभी आमुच्या बनवा

मानवास

(राजकवी यशवंत यांच्या 'कुंपणास' या कवितेस उत्तर)

कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

परशु तुझ्या हातांमधि
अग्न तुझ्या नेत्रांमधि
खळखळोनिया नसात रक्त उसळता रे!
कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

पारतंत्र्य छेदाया
निर्दळण्या अन्याया
तू स्वतंत्र नी अजिंक्य मनुज जन्मला रे!
कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

नच लवशी तू दमनी
स्थिर म्हणुनी नभधरणी
सागरास तूच काठ आखुनी दिला रे!
कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

निश्वसनी तव तुफान
घाव निशाणास हाण
प्राण प्रज्ज्वलित करूनि चुडे पेटवा रे!
कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

वाऱ्याची वाट नको
नशिबाची मोट नको
येथुनीच कुंपणास जाळु आज या रे!
कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

कांट्यांवर तनु पडता
चिरूनि चिंधड्या होता
स्वातंत्र्यध्वज दिगंति फडकतील सारे!
कुंपणास पुसशि काय जाशि केधवा रे ?

कवीस आव्हान

दे शब्दांचे मोल
कवे, दे, दे शब्दांचे मोल
निज तनुखंड तराजुत ठेवुनि, अपुली भाषा तोल
कवे, दे, दे, शब्दांचे मोल

नसे भावना, ती खळखळती तव रक्ताची धारा
अर्थ कशाचा ? तुझ्या दृष्टिच्या नवतेजाचा तारा
आत्माहूति दे त्यासाठी, मग ध्येयावाणि निज बोल
कवे, दे, दे शब्दांचे मोल

तू स्वप्नांचे पंख लावुनी फुलव न अंध पिसारा
तुझी उद्याची दिव्य कल्पना जळता आज निखारा
घरकुल अपुले उधळुनि, नंतर बदल काळ भूगोल
कवे, दे, दे शब्दांचे मोल

कसा ठेवणे नातरि आम्ही तव शब्दी विश्वास
काय दाउनि नव्या जगाचा मधुमंथर आभास
ध्येयासाठी रक्त सांड, ती नव कविता अनमोल
कवे, दे, दे शब्दांचे मोल

अग्निपंख नभि फडफडु दे !

तव अग्निपंख नभि फडफडु दे
निजलेल्या चटका लव बसु दे

तुफानवाता बेडी पडली
वीज ढगातुनि स्वस्थ झोपली
गगनधरेला जडता खिळली
त्या प्रलय-घनांना कडकडु दे
तव अग्निपंख नभि फडफडुं दे

आत शांत जरि दिसते जगती
युद्ध- वैर-लाव्हारस कढती
धराकंपनी आग फुटुनि ती
चल जुनाट जग हे तडतडु दे
तव अभिपंख नभि फडफडु दे

माणुसकीहुनि आत्मे ढळले
देव देवळांतून भटकले
न्यायावर उकिरडे माजले
हे जाळ, अग्निगिरी धडधडू दे
तव अग्निपंख नभि फडफडु दे

क्रांतिदेवी, ये, विद्युचरणी
तव नयनीची ठिणगी उडवुनि
असंतोष पेटवी जनमनी
मग जुलुम कितिहि वर गडगडु दे
तव अग्निपंख नभि फडफडु दे

देवि येते घरा!

ही प्रकाशे धरा देवि येते घरा
पर्वताली डुले सिंधु आनंदले
हर्षुनी नाचती ती नभोमंडले
ध्वात कापे, पळे गिरीकंदरा
देवि येते घरा

लोहशूलध्वजा मस्तकालंकृता
प्राणपुष्पाचिया तोरणी मंडिता
शोभिता स्वागता राजरथ्या करा
देवि येते घरा

चलतडिद्वाहिनी, खड्गधनुधारिणी
रम्य रातोत्पले अंगश्रृंगारिणी
मर्दिनी, नंदिनी, दिव्यरक्तांबरा
देवि येते घरा

मुक्तकेशा निशा ती सुधावर्षिणी
नरकपाला करी येतसे घेउनी
दान मागे जिवाचे, पुढे व्हा, सरा
देवि येते घरा

रक्तधाराभरे पात्र तीचे भरा
त्यागतेजोबळे रंगवा अंबरा
आज स्वातंत्र्यमूर्ति प्रसन्ना करा
देवि येते घरा

मी आणि कवि

मी:
तुज गीती काय कवे, शांति लाभते
बहर झडुनि तो जाई
तोर हा नवा येई
स्वस्थ संथ अजुनि कसे गान चालते ?

तव देवी सुंदरता
जरठ जीर्ण होय अता
तरूण–अरूण–लहरि कशी कवनि उसळते

केश तुझे पांढूरले
स्वरतरंगही थिजले
अंगुलि तव वीणेवरि कम्प पावते

कवी:
देवीसौंदर्य ढळे
काळ, विश्व जरि बदले
गीत–चाहुली नव्याच हृदय ऐकिते
पुसशी मज समाधान
मज व्यथाही त्या प्रमाण
मम आंतर वेदनेत गीत उमटते
असु दे मज मदिय व्यथा
ऐक मधुर तू कविता
पाहू नभ अजुनि किती कात बदलिते!

तोंडू कडी चला

फोडू खडी चला तोडू कडी चला या
जुलमी तुरूंग–भिंती मोडू पुढे चला या

घालून श्रृंखलांना या मुक्त होऊ सारे
कैदी बनून अंती मानव्य घ्या चला या
ही थांबवाल केव्हा विक्री तनूमनाची
नाही गुलाम आम्ही रक्ते लिहू चला या
तोंडू कडी चला या

कोणी जगी न राही कल्पांतिचा गुलाम
मत्ता हुकुमशहांना गर्जू वदू चला या
तोडू कडी चला या

ही शांति दुर्बलांची शक्ती सहिष्णुतेची
क्रांती उभी करील, होमू तनू चला या
तोंडू कडी चला या

दग्धास्थिचे बलींच्या रणशिंगे गर्जताहे
आव्हान ते श्रवूनी जीवे लढू चला या
तोंडू कडी चला या

सोलून अंग केला झेंडा स्वतंत्र्यतेचा
पाडील कोण सत्ता त्यातें बघू चला या
तोंडू कडी चला या

क्षितिजापलीकडून येती अनंत बाहू
सांभाळण्या ध्वजाला आता तुम्ही चला या
तोंडू कडी चला या

मजूर

खेळता नाच मधु–रंग
कधि विचार ये का हाडे
नेसता तलम वसने ती
किति दुःखदग्ध अतड्यांचा

नभचुंबित रंगमहाली
पिचलीत कुणाची खाली!
कल्पना शिवे कोणाला
तो पडला पीळ सुताला?

गृही साठविताना धान्य
"कुणि वाढविले शेतात
हा शेठ, जरासे थांबा
कितिकांची माती केली

थबकला असे वाटून?
घाम–अश्रु सिंचून!"
मोजिता, द्रव्य कोषात,
तै सुवर्ण ये हातात?

नृपतिनो, पृथ्विमोलाचे
किति युगानुयुग कोणाचे
म्हणविता तुम्ही रणगाजी,
या तुमच्या शस्त्रास्त्रांना

मुकुटात जवाहिर जडिले
ते रक्त गोठुनी बनले?
करितसां कुणावर वार?
लाविली कुणी रे धार?

हे हेच मजूर पथीचे
या युगिचे हे शिबिराज
ते म्हणती, "या श्येनांनो!
घ्या अपुले भारंभार

वाहती शिळांचे भार
निज यज्ञ ज्या कुलाचार!
या सारे करूनी पाळे
तनू–लचके तोडून सगळे!

जा पिऊनी घोंटभर पाणी

(सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरात किती तरी विहिरी फिरंग्यानी स्वातंत्र्यवीरांच्या प्रेतांनी भरून टाकल्या होत्या. अशाच एका विहिरीचे हे गाणे आहे. नेहमी तृषार्त पाण्यासाठी तळमळतो, परंतु इथे स्वत: पाणीच तृषार्तासाठी तहानलेले आहे आणि ती व्याकुळ विहीर वाटसरूंना पाणी पिण्यासाठी हाका मारीत आहे.)

या तहानेल्यांनो, कोणी
जा पिउनि घोटभर पाणी
ओसाडित मी आड एकले

निराश क्षुधितांचे जणु डोळे
वाटसरूस्तव मी आसुसले

या, कुणीतरी या चुकुनी
जा पिउनि घोटभर पाणी
शतकांचे शेवाळे जमले
आटत तडतडते जल सडले
बुडबुड्यांतुनी विखार उठले
परि अमृत आत अजोनी
जा पिउनि घोटभरपाणी

भिंत न माझी दगडविटांची
तुमच्या पूर्वज–नर–रूंडांची
पहा सारूनी माती वरची
येईल रक्त घळघळुनी
जा पिउनि घोटभरपाणी

स्वातंत्र्यास्तव जे लढले रणि
त्यास रिपूंनी चरचर चिरूनी
भिंत बांधिली मुंडावळिनी
मी होय लाल रूधिरांनी
जा पिउनि घोटभर पाणी

त्या दिवसापासुनि मग नाचे
ह्या जळि, पाणी प्रलय–विजांचे
रस मत्युंजय सुधारसाचे
न्या 'गंगा' न्या ही इथुनी
जा, पिउनि घोटभर पाणी

जयकांक्षा अपुऱ्या तडफडती
बुडबुड्यात ह्या जाळ भडकती
शेवाळातून धूर दाटती
व्हा आगच आग पिउनी
जा पिउनि घोटभर पाणी

युगचाहुली

('युगचाहुली' या खंडकाव्याचे प्रस्तावना गीत)

मी ऐके त्या चाहुली
युगाच्या ऐके त्या चाहुली
पायरवांनी ज्या बळिराजा दचके सागरतळी
मी ऐके त्या चाहुली

शिरी धुमारे अपमानाचे
तळी निखारे पराभवाचे
अमृतघनांची स्वप्ने घेउनि मम कविता चालली
मी ऐके त्या चाहुली

धरणी कापे पदशब्दांनी
कळे न येई कोणी कोठुनी
विजेपरि कडकडुनि खडावा वाजति दिड्.मंडळी
मी ऐके त्या चाहुली

बंदिघराच्या भिंती खचती
बेड्यांतुनि स्फुल्लिंग धडकती
जुलुमाच्या वेशीतिल भेरी आव्हानी भंगली
मी ऐके त्या चाहुली

बद्धहस्त तळघरात सडुनि
यौवन मेले जे तडफडुनी
स्वप्ने त्याची दवाग्नपंखी फडफडून पसरली
मी ऐके त्या चाहुली

शुष्कस्तनि आईच्या रडुनी
दुधाविण पडे जे शिशु मरूनी
पत्थरल्या बुबुळातुनि त्याच्या आग ओकि बाहुली
मी ऐके त्या चाहुली

अन्नरास नित समोर बघुनी
उपाशीच जे मेले कुढुनी
मुक्या अस्थितिल त्या ज्वालांची वेताळे धावली
मी ऐके त्या चाहुली

छेदुनि निज शिर झेलित नाचत
ऊष्ण उसळते रक्त प्राशित
खंडित जयकांक्षाचामुंडा छिन्नमुंड प्रगटली!
मी ऐके त्या चाहुली

हिमालयास

('अग्निपथ' या खंडकाव्यातून)

निज असीम हिममय तप:शांति सोडुनी
हिमनगा, खवळ तू अग्निगिरी होउनी!

जडभरतापरि तू स्तब्ध किती बसशिल?
निर्लज्ज किति युगे उदास तू बघशिल
का पांडुर झाले रक्त तुझे गोठुनी?
हिमनगा, खवळ तू अग्निगिरी होउनी!

ह्या गंगायमुना अश्रुधार वाहुनी
तव व्यथाभार हलका नच करितिल कुणी
तू त्रिनेत्र उघडी, तुहिन-जटा अपटुनि
हिमनगा, खवळ तू अग्निगिरी होउनी!

शशितारामंडित भालावरि गिरिवरा
अरिलत्ता साहशि किती चंद्रशेखरा
तू प्रलय-तांडवा वीरभद्र, उठ झणी
हिमनगा, खवळ तू अग्निगिरी होउनी!

करू तिथे आघात

('अग्निपथ' या खंडकाव्यातील गीत)

करू तिथे आघात पहिला करू तिथे आघात
स्वर्गातुनि दुबळ्यावर घडतो जेथे वज्राघात!

'शिव' नयनांना बघू न देती
'सत्य' वाणिला वदू न देती
प्रगतीला श्रृंखला घालिती
मानवतेस्तव वळिती जेथे फास मानवी हात!
पहिला करू तिथे आघात!

ज्यांच्या श्रमजळी नभि घन भरले
धान्य जयांच्या तपनी पिकले
यश ज्यांच्या मरणात जन्मले
गुलाम त्यांना करिती जेथे तयांच्याच देशात!
पहिला करू तिथे आघात!

राजगृहांसह, धर्ममठांसह
नगरपुरांसह, साम्राज्यासह,
शत शत राजांसह देवांसह,
ब्रह्मांडाचा भार वाहि त्या शिरी मारिती लाथ!
पहिला करू तिथे आघात!

चला रे, करू तिथे आघात
स्वर्गांतुनि दुबळ्यावर घडतो जेथे वज्राघात!
पहिला करू तिथे आघात!

ध्वज आज नवा उभवू

('अग्निपथ' या खंडकाव्यातील जनतागीत)

ध्वज आज नवा उभवू
कपोत बाळे रक्तपिपासून श्येनाशी लढवू
ध्वज आज नवा उभवू!

रम्य भविष्याच्या स्वप्नापरि
केव्हा प्रलय-विजांच्या घडिपरि
ध्वज डोलू द्या, साउलीत त्या नव पाइक जमवू
ध्वज आज नवा उभवू!

वसन ध्वजांचे विश्वशांतिचे
रंग पदाहत आकांक्षांचे
असंतोष-ज्वालेपरि फडफड युग-पल्लव उडवू!
ध्वज आज नवा उभवू

राजाचे सिंहासन उलथे
धरणि फुटुनि तारांगण कलथे
ढासळलेले बुरूज जगाचे अग्निफुलीं फुलवू
ध्वज आज नवा उभवू!

प्रतिकारा तृणपाते उठले
आसन इंद्राचे हादरले
वज्रांशी झुंजण्या बाहुल्या मातीच्या सजवू!
ध्वज आज नवा उभवू!

क्रांतिपुरूष

('आशिया' या खंडकाव्यातील एक स्तबक)

चाळीस कोटी हे भारतीय वीर
निर्भय, कोमल
असिधारेपरी, श्वेतपद्मापरी
यांच्या हृदयात जान्हवीची धारा झुळझुळ वाहे
अरूणकालीचे उपनिषद्‌गान
संध्या समयीचे मंत्रजागरण
गाईंच्या घंटांची मंजुळ किणकिण
चांदण्या रात्रीचे प्रेमळ कूजन

ऋषिकन्यकांचे अंचलस्फुरण
अनंतयौवना उर्वशीउरींचे उन्मत्त स्पंदन
त्यांच्या मनामध्ये अजून जागते!
कुरूक्षेत्रीचे ते भीषण कंदन
चितांचे ज्वलन
स्त्रियांचे क्रंदन
युधिष्ठराचे ते निश्वास करूण
शांतीची वेदना
दाटे त्यांच्या मनी काठोकाठ!
कालिंदीकाठीचे मंद्र वेणुध्वनि
विणितात स्वप्ने तयांची अजून
द्रौपदीच्या मुक्त कृष्ण वेणीतील
अदग्ध फुलांच्या कथा तरळती त्यांच्या नयनात!
बुद्धांचे निर्वाण
अशोकाचे अश्रु
ताजमहालाचे सुंदर मीनार

आरस्पानी ते–
कुण्या प्रेमीकांचे हिमगौर बाहु
कृष अस्थिशेष
चिर पसरले आलिंगनासाठी

अनंत नभांत कापती हालती!
चित्रे ही अनंत त्यांच्या नयनात
जागती लोपती
रत्नांची पेरणी
मोत्यांची कणसे
दुधाचे निर्झर
फुलांच्या झोपड्या, सोनियाचा धूर
चांदीच्या रात्रींची सोन्याची ती स्वप्ने
स्वातंत्र्यांच्या उषा
मुक्तीची ती गाणी
जरीपटक्यांची विजेची पताका
आणि त्यात हाय!
फितुरी खंजीर मीर जाफराचा
घुसे पाठीतून विषारी दुधारी,
उडे चिळकांडी रक्ताची चौफेर
पायी खळाळती दास्याचे लंगर
ढासळले दुर्ग, पेटले बुरूज
चूर्ण सिंहासने
उध्वस्त महाल

मुकुटांची धूळ
उठे धूर त्यात दारूगोळ्यांचा तो
हासत जे गेले फासावरि वीर
तयांची शरीरे वृक्षास लोंबती
फुलेच क्रांतीची!
स्मरते हे सारे
सत्तावनींच्या त्या रक्तानी रंगल्या
रोट्यांचा तो घास
अजून घशांत घोटाळे देशाच्या
जालियनवाला बागेमधील त्या
रक्तचिखलाने
वस्त्रे मळलेली साऱ्या भारताची
अंदमानातील
अन् काळ्या पाण्याचे विखार डोळ्यात

वादळ मांडिती क्रोधाचे, लज्जेचे
आणि हुतात्म्यांच्या चितांचे निखारे
खवखवोनिया त्यात पेटतात!
नि:शस्त्रांचा तैसा शांत प्रतिकार
तापलेल्या लाल बंदुकीच्या गोळ्या
विझती स्मितात एक दयामय!
विफल कटांचा
क्रांतिकारकांच्या विजयघोषांचा नभी कोलाहल
होई मेघनाद गंभीर भीषण
प्रगटे त्यातून रूद्ररूपधारी
ऑगस्ट क्रांति ती!
क्रांती पथे चाले!
दिव्य आशियाचा पुराण पुरूष
पदोपदी त्याच्या खचे तारांगण
हादरे ही भूमि
उठे पाउलांच्या धुळीतून धूर!
दिग्गज नाचती त्यांच्या पाउलात
फुत्कारती नाग त्यांच्या मानसात
परशुरामाची परशूची ती धार
त्याच्या नेत्रामधी तळपे कठोर
होताच आज्ञा ती रेणुकेचा वध करील तात्काळ!
पुन्हा निज माता जिवंत करून
करील धरणी नि:क्षत्रिय सारी एकवीस वेळा
उन्मत अधीर ऐसा रणधीर
आशियाखंडाचा नव्या मानव्याचा
हा क्रांतिपुरूष,
अवध्य अनंत!
स्वातंत्र्यतिलक पूर्वेच्या कपाळी
रेखील उद्या हा मेळवोनी त्यात
रक्त अश्रु आग!

वीणावतीस

बघ दु:खाश्रूंनी वदन धरेचे भिजले
नभि फिरति चित्रघन रंगहि त्यांचे ओले
तू छेडुनि वीणा मंद मधुर झंकारी,
कर मुक्त गीत या चिरदु:खित हृदयांचे
वाहुनी आण अन् अमृत निज अंतरिचे!

ते तुझेच गाणे

ते तुझेच गाणे ग
युगायुगातुनि गात चाललो, गातचि जाणे ग
मला ते गातचि जाणे ग

विरह घडो वा मीलन घडु दे
जन्मोजन्मी तुटी पडू दे
अकाल, उन्मद बनुनि वेदना रचितो स्वप्ने ग
ते तुझेच गाणे ग

अथांग तव शर्बती लोचने
क्षितिज हसे जणु पिउनि चांदणे
तुझे नयन नित नवे घालिती निळे उखाणे ग
ते तुझेच गाणे ग

गावसिमेवरि तरूछायातुनि
मूक हालत्या निशातमातुनि
गूढ एकलेपणिची हुरहुर हृदयि थरारे ग
ते तुझेच गाणे ग

स्त्रर्गंगेच्या कमरपट्यातुनि
नक्षत्रांच्या अस्फुट किरणी
उरस्पंदनापरि जे काही धडकत येते ग
ते तुझेच गाणे ग

पडे ना पडे जे धरणीवरि
मुग्ध विजेच्या चंद्रकलेपरी
हास्यलकेरी बनुनि दिशांतुनि जे खसखसते ग
ते तुझेच गाणे ग

पाडा आल्या फळात खुपते
उमलू सजल्या कळ्यात सलते
रसिकास्तव जे रसगंधापरि पवनि उसासे ग
ते तुझेच गाणे ग

अग्न न ठावा ज्या हिमकाली
प्रियालिंगनी ऊब मिळाली
ध्रुवावरिल त्या स्पर्शापरि जे हळूंच शिवते ग
ते तुझेच गाणे ग

वसंत ये मी

वसंत ये मी, नवे अर्थ अन् नवे शब्द घेऊन
नवारूण मत्त पालवीतून
ह्या शब्दार्था, उधळ कोकिळे, नादब्रह्म करून
साजणी, मधुरमदिर गाऊन

आषाढाच्या सांद्र घनाचे विद्युत्स्वप्न सजून
उठे मी काळ्या रात्रिंमधून
पुनर्वसूच्या त्या स्वप्नाचे पावसगान म्हणून
नाच तू घनवर्षा होऊन
साजणी, मधुरमदिर गाऊन

मी खळखळता तुफान फेनिल दर्यावर ये पूर
मृद्‌गंध धुंदिमधि चूर
तू जलवन्ती, नाच चाळ त्या फेनाचे लेवून
पुराचे तरूण गान घुमवून
साजणी, मधुरमदिर गाऊन

स्वातंत्र्याच्या यज्ञी कोणी तनु देई होमून
रूधिर मी बळिचे ये उसळून
त्या रक्ताची उषा जागवी उष:सूक्त गर्जून
ठिणग्यांचे चरण रचून!
साजणी मधुरमदिर गाऊन

मधुराणी

सांडू दे फेस! घे भरी भराभर बाले,
बस ठेवु नको तू आज रिकामे प्याले!

फसफसुनी खदखद हसु दे मधु पात्रात,
खिदळु दे तेच तूफान तुझ्या नयनांत!

मम जीवन–तळ मज दिसला तव चषकात
लागला हृदयिचा थांग तुझ्या डोळ्यात

का संकोचुनि तू बघशि आंखल्या नयनी?
नारिंग उडवु मधुलहरीवरती धरणी!

मधुराणी, कर पाजुनी जिवाला धुंद
बुडविले इष्क–प्याल्यात लौकिकी छंद

भर प्रेमा,– भरिशीं– भरू दे चषक विषाने
टाकितो पिउन, हासून, आण तृप्तीने!

परि नको निराशा प्रीतीची मज दावू
प्रिय हास्या, हृदयी सुरी नको रे होऊ!

प्रीतीचं मोल

साजणी बोल, प्रीतिचं काय या मोल?
जीवन अपुले हे दोघांचे
श्वास वेणुतिल दो अधरांचे
नीरव असल्या धुंद सुरांची काय माधुरी बोल?
प्रीतीचं काय या मोल?

दोघे जुळलो वादळपुरे
एक नदीची दोन्ही तीरे
यौवनातले तुफान अंधळे चल अनुभवु घनघोर
प्रीतिचं काय या मोल?

स्वप्न सहस्त्रे जिथे उमलली
क्षितिजसहस्त्रे जिथे निमाली
त्या डोळ्याचं सांग, साजणी, पाणी किति ग खोल
प्रीतिचं काय या मोल?

अलिंगन हे एकचि बंधन
श्रेय जीवनी सायंमीलन
युगे देउनी क्षण ये घेऊ, बुडता हा भूगोल
प्रीतिचं काय या मोल?

त्या तरूतळी विसरले गीत

त्या तरूतळी विसरले गीत
हृदय रिकामे घेऊनि फिरतो इथे तिथे टेकीत

मुक्या मना मग भार भावना
स्वरांतुनी चमकते वेदना
तप्त रणे तुडवीत हिंडतो ती छाया आठवीत
त्या तरूतळी विसरले गीत

विशाल तरू तरि फांदी लवली
थंडगार घनगर्द साउली
मनिची अस्फुट स्मिते झळकती तसे कवडसे तीत
त्या तरुतळी विसरले गीत

हिरवळ–तृप्तीच जशी पसरली
फुले अनामिक त्यात विकसली
निळेभोर अव्याज गगन वर हंसते ढग पिंजीत
त्या तरुतळी विसरले गीत

जवळ टेकडित झरा झाकला
कसातरी वाहतो खळखळा
निकट जिवाची पुरति न कळली जशी संभ्रमित प्रीत
त्या तरूतळी विसरले गीत

मदालसा तरूवरी रेलुनी
वाट बघे सखि अधिर लोचनी
पानजाळि सळसळे, वळे ती मथित हृदय कवळीत
त्या तरूतळी विसरले गीत

पदर ढळे कचपाश भुरभुरे
नव्या उभारित ऊर थरथरे
अधरी अमृत उतू जाय परि पदरीं हृदय व्यथित
त्या तरूतळी विसरले गीत

उभी उभी ती तरूतळी शिणली
भ्रमणी मम तनु थकली गळली
एक गीत–परि चरण विखुरले द्विधा हृदय–संगीत
त्या तरूतळी विसरले गीत

ये पूर्ण कराया चित्र गडे!

ये पूर्ण कराया चित्र गडे, मम हृदय–चित्र अपुरेच पडे!

स्तब्ध करी निस्तब्ध कुंचला
रंग रंगदाणीत संचला
चित्रकल्पना चित्त–चंचला
जड रंगांना या नच अंतुडे! ये पूर्ण कराया चित्र गडे

ओढ्यामधुनी कळशी भरूनी–
घेताना शिरि, अंग तोलुनी
मीनाक्षी, जळि टकमक नयनी–
ते मीन पाहती तुझ्याकडे! ये पूर्ण कराया चित्र गडे

सांजरंगि जळ निळे तळपते
रूप तुझे त्यामधे झळकते
लाट निजसुरी मृदु पुटपुटते
जणु ओढ्याला तव स्वप्न पडे! ये पूर्ण कराया चित्र गडे

कलावंत तो, चित्रकार तो
झरा जळी तव चित्र काढितो
चित्रकार अम्ही वृथा म्हणवितो
नवरंग खुले, परि भाव दडे! ये पूर्ण कराया चित्र गडे

भाव लोचनी भिरभिरणारे
हृदयी पदरी फडफडणारे
श्वासांमधुनी थरथरणारे
सुमरंगि गंधसम करि उघडे! ये पूर्ण कराया चित्र गडे

तू ओ दिली कुणा ?

तुज काय होतसे क्षणा क्षणा मम हृदया, तू ओ दिली कुणा ?

कुणा पाहिले ? कुणी बाहिले ?
कुठे कुठे तव नेत्र लागले ?
भाव मुखीचे किती डहुळले ?
का नेत्री हा घाबरेपणा ?
मम हृदया, तू ओ दिली कुणा ?

घडिघडि चाहुल कसली घेशी ?
भिरी भिरी भोताली बघशी,
आपुल्याच दृष्टीला भीशी,
निज नजर–जालि गुंतशी पुन्हा!
मम हृदया, तू ओ दिली कुणा ?

कुठे सारखे कोण पालवी ?
ओढुनि पुढती कोण चालवी,
डुलवी, फुलवी, हसवी, रडवी ?
हे काय झळंबे तुज सजणा ?
मम हृदया, तू ओ दिली कुणा ?

उभा पाहशी आतुर नयनी
किती बोलशी खोल रवांनी!
तर हृदयाच्या धडकी मधुनी
ते ऐकू येईल काय कुणा?
मम हृदया, तू ओ दिली कुणा?

विश्वासामधि का तळमळशी?
आशेनेची जाळ लाविशी,
अंतरंगिचा होम मांडिशी,
का पसायदानाविणे मना?
मम हृदया, तू ओ दिली कुणा?

जलतरंग

रोजच्याच साऱ्या क्रूर आघांतांनी
झाले पाणी पाणी हृदयाचे
तयांनी भरून आयुष्याचे प्याले
मांडून ठेविले तुजपुढे
करून त्यावरी कोमल आघात
स्वर लावी सात वादका रे!

होऊ दे कशीही जीवनाची गत
आपुलीच 'गत' वाजवी तू!
आघाते प्याल्यात स्तब्ध जलावरी
उठवी लहरी मंद मंद
जीवन-भंगति आणि भरपूर
काढी गोड सूर वाटती ते
माझ्या हृदयीच्या आघाते निर्मित
असे हे संगीत आलापी तू!
पर्वा न घावांची, मृण्मय प्याल्यांची
माझ्या हृदयाची, गीतांसाठी!

आली मधुरजनि

('प्रश्नमंच' या नाट्य प्रवेशातील एक गीत. अहीची पत्नी चंद्रसेना श्रीरामचंद्राची वाट पाहत शय्यागारात उभी असून, प्रतीक्षेत खालील गीत म्हणत आहे.)

आली मधुरजनि
हास सखे आली मधुरजनि
छायाचे चाळ घोळ अन् तारांचे झळाळ
दावित लपवीत हसुनि नवजलदांवरूनी
आली मधुरजनि

निद्रेची ऊब पदरि स्वप्नांचे स्मित अधरी
यौवन निश्वासि भरित अवकाशांमधुनी
आली मधुरजनि

विकसन मम हृदयाचे पुलकन अंगागाचे
लवकंपन लज्जेचे फुलवित स्पर्शांनी
आली मधुरजनि

मावळता सांध्यरंग अतृप्तीचा तरंग
की अपुरा अंगसंग सलुनि जाय नयनी
आली मधुरजनि

रात्रीची ही किरकिर मज संकेताचे स्वर
यौवन–मधुमास मला हाक देई फिरूनी
आली मधुरजनि

भर, सखये, भर पुरती ओंजळ

भर सखये, भर पुरती ओंजळ मुशाफीर मी तृषात व्याकुळ

वाळवंट नी पठार तुडवुन
पाणोठ्यावर आलो लांबुन
उन्ह शिरावर करते रणरण
दावि न नयनीं तूही मृगजळ
भर सखये, भर पुरती ओंजळ

श्रमलिस जरि तू ओढुनि पाणी
परतायाची घाई सदनी
हसतिल–भीती–तुला मैत्रिणी
जळास कळु दे मासळिची कळ!
भर सखये, भर पुरती ओंजळ

पिऊ दे जळ मज अता पोटभर
कळे न केव्हा मिळेल नंतर
पथ पुढे वैराण भयंकर
स्नेहल स्मृति तव त्यास पालविल
भर सखये, भर पुरती ओंजळ

सजल आड, वटछाया शीतल
तव उर कंपित, खळखळते जळ
भिजत स्मित मुखि श्रमजलि चंचल
चित्र कल्पवर या मनिं राहिलं
भर सखये, भर पुरती ओंजळ

भाग्यवान हा कलश साजणी,
नाचे तव कटिखांद्यावरूनि
रित्या हृदयिची मूक कहाणी
तोच तुला सखि, कधिंतरि सांगिल
भर सखये, भर पुरती ओंजळ

खंजिरी

(ही देगांवची दंतकथा आहे. तिथला पाटील मोठा शिकारी होता. एके दिवशी त्याने एका हरणाची शिकार करून त्याच्या कातड्याची खंजिरी बनविली आणि त्या नव्या खंजिरीच्या साथीत आपल्या गढीवर नाचरंग मांडला. नाचण नाचू लागली. नव्या कडक खंजिरीचे बोल घुमू लागले. घुंगराच्या झंकारात मैफिल बेभान डोलूं लागली. परंतू इकडे गढीखाली त्या खंजिरीचा आवाज ऐकून आणि आपल्या प्रियकर काळविटाच्या कातडीचा नाद ओळखून हरिणी रडू लागली. गढीच्या पहारेकऱ्याने तिला विचारले.)

पहारेकरी

देशमुखांच्या गढिवर वाजे खंजिरी झंकारूनी
पाहशी का हरिणी दचकुनी?
ये चांदरात हळु धुंद स्वप्नापरी
कष्टातुनि, दिनिच्या स्फुरे गीत–माधुरी!–
वाऱ्यात थरारे एक मधुर शिरशिरी
नवथर उरिच्या मृदुल उबंस्तव जीव उठे फडकुनी
पांघरूण अपुरे वाट मनी

मृगबाले, उडते धडधड उर तव किती
अश्रूंत नयन तर तव विर्घळुं पाहती
छे! नसे रक्तपी शिकारिची हाक ती
देशमुखांची मैफिल रंगे, भरास ये लावणी
पाहशी का हरिणी दचकुनी?

नागीण नाचते धुंदफुंद हासुनी
ते तुझे शिकारी लोळति पदि झिंगुनी
त्या गमे नाचते उरीच जणु कंचनी!
'तोडा' संपे, थाप समेची बसे खंजिरीवरी
परी तू का हरिणी घाबरी?

हरिणी

"ती थाप समेची जीव हेलकावित
सोडवून चारापाणी मज ओढिते
नाचात न तुमची ती खंजिरि वाजते
मेले तरि ते मम हरिणांचे हृदय रडे फुंदुनी!
धावलें व्याकुळ मी होउनी
मम हरिण सखा ह्या देशमुखें मारूनी
खंजिरी बनविली प्रीति-हृदय सोलुनी
तव गीत स्फुरते आमुच्या आक्रंदनी!
थापे सरसी, खंजिरीत मज हरिण बाहि विव्हळुनी
रंगते परि तुमची लावणी!"

सापळा

रंगाच्या लहरी नव्याच भरती वायूसवे चंचल
रम्याशेपरि हा गुलाब फुलला, शाखेवरी मंगल
लज्जा या सुमनातुनी मधुरता घेवोनिया जन्मली
मोहाया, रमणीस गालि अधरी यानेच लाली दिली
झाला पूर्ण विकास हा, प्रतिदिनी उन्माद त्याचा भरे
अन् ती मादकताच एक गहिरी खालीवरी संचरे
गंधाची मधुवर्तुळे गरगरा वाऱ्यातुनी भोवती
त्या गंधोन्मदमंदसांध्यपवने हृदवृत्ति उन्मादती
पुष्पा त्या बघताच बोल उठती 'सौंदर्य हे वांछित'
मेलेले मधुभोगभाव हृदयी अतृप्तिची वेदना
गेलो पुष्प खुडू, निवेल म्हणुनी वांछा-व्यथा तापना
झाला स्पर्श न तोच, हाय! गळल्या संफुल्ल त्या पाकळ्या
हाती देठ उरे, कुण्या रमणिचा की अस्थिंचा सापळा!

दीपाचे मनोगत

जळतो मी नंदादीप देवि, तुझ्या मंदिरात
तुझ्यासाठी स्नेह प्रभा धग माझ्या अंतरात

मला माहित ना काही विराजशी सिंहासनी–
गेलीस वा कोठे दूर माझे राऊळ सोडोनी

तुला बघावयास डोळे दिले माझ्या न ज्योतीला
जळणारे तुझ्यासाठी एक हृदय ते तिला

वाट–पाहत्या डोळ्यांचे अनंताचे जागरण
वाट पाहावे, जळावे, दग्ध प्रीतीचे जीवन

परी अज्ञात देवते, खूणगांठ बांधी मनी
तुज करीन साकार अंती माझिया ज्वलनी

शेजारिणि, तू हसत रहा !

सखि शेजारिणि, तू हसत रहा
हास्यात पळे गुंफीत रहा

दीर्घ बदामी श्यामल डोळे
एक सांद्रघनस्वप्न पसरले
'धूपछांव' मधि यौवन खेळे
तू जीवनस्वप्ने रचित रहा
सखि शेजारिणि, तू हसत रहा

सहज मधुर तू हसता वळुनी
स्मित–किरणी धरि क्षितिज तोलुनी
विषाद मनिचा जाय उजळुनी
तू वीज खिन्न घनि लवत रहा
सखि शेजारिणि, तू हसत रहा

मूक जिथे स्वरगीत होतसे
हास्य मधुर तव तिथे स्फुरतसे
जीवन नाचत गात येतसे
स्मित–चाळ त्यास बांधून पहा
सखि शेजारिणि, तू हसत रहा

आलीस उशीरा

आलीस कशाला जीवनात मोहिनी
विसरल्या युगीच्या गीत लकेरीपरी
जाशील एक दिनि अशीच निघुनी दुरी
ढळतसे चांदणे जसे गवाक्षातुनी

अस्पष्ट बोलता श्वासे उर दाटुनी
गुंजले फुलांवर भ्रमर कुठे कातर
पाहिले श्यामले, आणि वळुनि जेधवा
दहिवरले डोळे, गहिवरले अंतर

तपकिरी डोळे किंचित गहिरे तुझे
उठविती भोवती मदिरेचे वादळ
बेहोश न पुरते मधुराणी मज करी
पाउला जाणवे अजुनी जीवन–तळ

पसरूनी बाहू का जीवनसरिते, अशी
येतेस शराबी भावलहरि फेकित
तव तरंग एकहि धरूनि ठेउ ना शके
निस्तब्ध भंगला माझा जीवन–तट!

आलीस उशीरा जीवनात, साजणी
वरदान त्यामुळे शाप तुझे जाहले
संपत्या रात्रि तू उजळलीस चंद्रिके,
ज्वालेत दिनाच्या तुझे चांदणे जळे!

रमणी, उदविशिं निज कचभार

रमणी, उदविशिं निज कचभार
मृदुल रेशमी कुरळ मोकळा कृष्णसघन विस्तार

जाळिदार नाजूक टोपले
शिर टेकुनि तू त्यावर अपुले
मदालसे, पहुडशी धरूनि कर उरी स्वस्तिकाकार
रमणी, उदविशिं निज कचभार

न्हाले ओले केश मोकळे
खांद्यावरूनी स्वैर पसरले
मोत्यांवाणी मधुनि चमकती, टिपुनिहि सलिल तुषार
रमणी, उदविशिं निज कचभार

धूर सुगंधी धूपदाणीतुनि
हळूच मिसळे कचपाशातुनि
अभिलाषा जणु तरूण जिवांच्या भ्रमति मंडलाकार
रमणी, उदविशि निज कचभार

सळसळती नागीणपिले ही
नयननीलिमा प्याली काही
धूर पाजुनी कशास करिशी अधिकचि धुंद विखार!
रमणी, उदविशि नज कचभार

अजिंठ्याच्या दाराशी

(पारिजाताच्या फुलांमुळे अजिंठ्याच्या चित्रकलेचे व तिच्या रंगकलेचे संरक्षण झाले असे एक शास्त्रज्ञ म्हणतात. मग या फुलातून अमर मानवी रसिकता तर कलेच्या रक्षणासाठी संचार करीत नसेल? आणि त्या संरक्षक देवदवतेच्या मनातले गाणे असेच काहीतरी असेल, नाही का?)

त्रिकाळातली तृषित रसिकता वणवण मी हिंडले
त्रिखंडी, वणवण मी हिंडले
या घाटावरि येता मजवरि अमृतघट वर्षले

सुकवित, फुलवित पारिजात मग बसले या डोंगरी
समाधित, बसले या डोंगरी
एक तृप्तिच्या क्षणि त्या सरली शतके अन् कितितरी

मधु मंथर भावांचे पहिले सुमन इथे रंगले
प्रीतिचे, सुमन इथे रंगले
गंध ते निश्वास जिवाचे एक इथे जाहले

यौवनांगाविक्षेपणि उन्मद अनंग साकारला
शिलातुनि, अनंग साकारला
जीवननर्तनि हृदय-धडकिचा ताल मधुर लागला

हास्याश्रूंना, आशास्मृतींना, रूप अरूपा दिले
कलाकरि, रूप अरूपा दिले
ज्वलन तेज दीपाचे रंगी कुणी फुंकुनि उजळिले

मृदुल वक्र रेषात असीमा सीमित केले इथे
अनंता, सीमित केले इथे
चलत क्षणा वरदान लाभले चिरंतनाचे इथे

स्वप्न साधिता कलोपासका, श्रमबिंदू सांडले
तुझे जे, श्रमबिंदू सांडले
कालप्रवाही चिरंतनाचे ते बुदूबुद जाहले

पारिजातदळि हिम नि आंसवे एक होति ज्यापरी
सकाळी, एक होति ज्यापरी
स्वप्न नि जीवन युगायुगांचे एक अजिंठ्यावरी

सुकवित फुलवित पारिजात मी बसते या डोंगरी
म्हणोनी, बसते या डोंगरी
एक तृप्तिच्या क्षणि ह्या विरतिल शतके अन् किती तरी!

दोघे

साजणि, गाया ये मजसंगे जीवनलहरी झळके संगे

सुवर्ण गोरजपटी झाकुनी
सांध्यदीप ये घेउनि रजनि
जीवनि तू तशि येगे साजणि, गाया ये मजसंगे

सघन घनावली गगनी दाटत
मधुर भावना हृदयी थाटत
मोडि न त्या भ्रूभंगे साजणि, गाया ये मजसंगे

शुक्रतेज हळुहळु मावळे
त्यात चंद्रिका कवळी मिसळे
यौवन शैशवसंगे साजणि, गाया ये मजसंगे

ताल धूसरित उभे नदिवरी
मनिच्या शंका दूर ज्यापरी
उन्मद हृदय तरंगे साजणि, गाया ये मजसंगे

नाचुनि नाचुनि रजनी थकली
चाळ वघळले, नभि तारावलि
नाचू तू मी संगे साजणि, गाया ये मजसंगे

पदरंजन

रंगवूं नको निज पद रमणी रंगते धरा ही तव चरणी!

आरक्तच तव गुलाब-तळवे
रंग तयांना कशास व्हावे?
रंग उषेमधि काय भरावे
ये सुवर्ण उधळित जी गगनी! रंगवू नको निज पद रमणी

सहज मृदुल तव पाउल पडते
तरूण हृदय त्या तिथे चिरडते
रक्त तेच तव पदी लागते!
ही कशास मेंदी मग वरूनी? रंगवू नको निज पद रमणी

मदभारे पद टाकित जाशी
पदरागाने मने जाळिशी
संध्योषा परि कधी खुलविशी
तू प्रवेशुनी वल्लभ-सदनी? रंगवू नको निज पद रमणी!

गानतृषा

का वाऱ्यावर टांगिले उगी मत्प्राण?
गा, पुन्हा गडे, ते तुझे एकदा गान
डोळ्यात गूढ नीलिमा, गळ्यामधि गोडी
ये स्वरे सोडवी शब्दा अवघड कोडी
गा कलावन्तणी, मंजुळ मंजूळ गाणी
त्या नादलहरि सळसळु दे रक्तामधुनी
तव सुरांमधे थरकतो नवा आनंद
त्या अनुभूतीस्तव हा होतो बेबंद
चल, तोडू तटातट हे शब्दांचे बंध
त्या असीम अर्था कशास हा निर्बंध?

* * *

जे हृदया दिसले, कळले, पटले, स्फुरले
शब्दी न उमटले शब्दासच अडखळले
म्हणुनीच गायिके, शब्दाशब्दांमधुनी
हृदभावांचे हे अंतर पडले तुटुनी
शब्दातुनि पडते जे अंतर भावांचे
ते भरूनि काढिती सूर तुझ्या गाण्याचे
शब्दांचे अंतर भरित छेड तू सूर
बुडवीत तटा तरंगिणी भरपूर

* * *

घे झुळझुळती मधु तान ओठ वळवून
पथचुकल्या तारा भ्रमती नेत्रातून

रागोद्धार

(नांदेडजवळच्या शंखतीर्थ या गावाची गोष्ट. फार पूर्वी तेथे एक गायक राहत असे. प्रसिद्ध कलावंत, पण त्याचे गाणे त्याच्या पत्नीला आजन्म ऐकायला मिळाले नव्हते, तिने पुष्कळदा विनविले, परंतु त्याने मनावर घेतले नाही नंतर एकाएकी ती निवर्तली. मग गायकाने मरणानंतर तिची इच्छा पूर्ण केली. तिच्या सरणांसमोर बसून गायकाने तिला गाणे ऐकविले.)

"हे जळत्या जीवा, गान ऐक तू कान जीवाचा करूनी"
आप्त रडती भोवताली
पुढति हासे ज्वालामाली
तो कलावंत निज मंजुळ वीणा बोले तव चढवोनी

वाटली जी तुज दुराशा
जीवनाची एक आशा
तव थिजल्या नयनी पुन्हा स्फुरो दे या गायन लहरींना

'ऐकवा' तू 'गीत' म्हटले,
मी कधी त्याते न गणिले
ते गान ऐकुनी अता घुमव तू जीवन्मरणामधूनी

गायनाच्या मोहिनीने
मोहिली मी रानहरिणे
परि आज मनोमृग विद्ध जाहला त्याच सुरांच्या बाणी

वल्लरी त्या वाळलेल्या
त्या प्रभाती फुल्ल झाल्या
त्या स्वरेच आता चिता भडकते दग्ध हृदय हे करूनी

दीप पूर्वी आळविता
भूस आली गगनसमता
हा! दोनच नेत्री अता तेवती दीप प्रीतिच्या किरणी

'मेघ' गाता मेघ वळले
अमृताचे पावसाळे
नयनीच घने जमलीत वर्षती अश्रू आज खळखळूनी

तुजमुळे जे गान झाले
तुजविणे ते आज नुरले
परि कलादेवते, तुझीच इच्छा गाते माझ्यामधुनी

वल्लभे, तो मृत्युराया
मजशि येता बोलवाया
त्यासवे तूहि ये प्रिये, गात हे गान तया शिकवोनी

रात्र घोरांदार दाटे
नीर वाहे खळखळाटे
धडधडुनि पेटते चिता, वाहतो वात नभी फडफडुनी

मी नाचत नाचत आले

('आम्रपाली' या खंडकाव्यातील एक गीत. आपल्या सौंदर्याने व नृत्याने सैनिकात प्रतिकारांचे तेज निर्माण करण्याच्या ईर्षेने नर्तिका आम्रपाली वैशाली नगरीच्या राजपथावर नाचत नाचत प्रवेश करते. नाचताना ती हे गीत म्हणते–)

मी नाचत नाचत आले
युगायुगाचे असफल यौवन मुरडित अंग निघाले

सौंदर्यकामना हसरी
मी अभिलाषांची लहरी
क्षितिजी मादक अरूणराग मज चुंबाया तान्हेले
मी नाचत नाचत आले

कंकणे करी किणकिणती
कटि मेखलाहि रूमझुमती
छुमछुमनी पदि पैंजण विणिती स्वरनादांचे जाळे
मी नाचत नाचत आले

मम नृत्यी करसंकते
लाटांचे तांडव उठते
भ्रूभंगावरि बघ तारांसह नीलांबर आंदोले
मी नाचत नाचत आले

मी तरूणांच्या हृदकमली
नाचणी नार अलबेली
गिर्कीतुनि मम जरीकिनारी स्वर्गंगा तेजाळे
मी नाचत नाचत आले

जै शिवपार्वती नाचती
फणिनुपूर झंकारती
विखार नी झंकार तयांचे, रूपी मम अवतरले
मी नाचत नाचत आले

अभिनय हा नाच पहाया
मजसंगे या नाचाया
जड दिक्काला नाचवावया चाळ आज मी ल्याले
मी नाचत नाचत आले

मोगरा फुले तो थांब

जिवलगा, थांब मोगरा फुलेतो थांब
उद्या पाकळ्या साऱ्या फुलतिल
साद जिवाला सुगंध घालिल
डोळे उघडुनि आंगण पाहिल
मधुमास हसतो थांब
मोगरा फुले तो थांब

पानांआडुनि गाई कोकिळा
तप्त नभाचा उर गहिवरला
माझ्याही उरि काटा फुलला
कोकिळा गाईंतो थांब
मोगरा फुले तो थांब

मध्यरात्रिचे मदिर चांदणे
स्पर्शुनि करिते जादूटोणे
जीव घाबरे हा स्वप्नाने
चंद्रमा बुडेतो थांब
मोगरा फुले तो थांब

बघ, अवकाळी घन गडगडती
गंध मातिचे वादळ उठविति
विजा चांदण्यामधि चमचमती
सर पडुनि जाइतो थांब
मोगरा फुले तो थांब

प्रवास अवघड, पंथ दूरचा
अरूण उद्यांचा लोळ अग्निचा
क्षण कुसुमित कर विश्रांतीचा
ये, घाम पुसेतो थांब
मोगरा फुले तो थांब
जिवलगा थांब

साखरझोप

झाकती नयन तव नीजभरे
जरि मंदिरि कवळे उन्ह शिरे

शेजेवर कर एक रोवुनी
बसशी स्कंधी मान टाकुनी
गळति फुले कचपाश सैलुनी
उघडति न मदालस नेत्र पुरे
झाकती नयन तव नीजभरे

पलकयुगुल भारावुनि लवले
प्रतिक्षेत का डोळे शिणले
मदिर अरूण रेखा मधि उसळे
जणु हृदय जाळुनि जाळ उरे!
झाकती नयन तव नीज भरे

स्वप्ने सुंदर निर्दय कुठली
तव अपुऱ्या निद्रेत उतरली
नेत्रदळे पदि रगडुनि गेली
ही लाली त्याची का पसरे?
झाकती नयन तव नीजभरे

विस्मृत जगसम अंचळ पडला
धडके उर निज रसेच भरला
जणु कुणि तेथे स्पर्शुनि गेला
मधु उत्कंठा डुकलीत भरे
झाकती नयन तव नीजभरे

न पाठविलेले प्रेमपत्र

पत्र लिहियले सखे, पत्र लिहियले
पोचले न तुजजवळी
राहिले न मजजवळी
पाठविले मी न कधी, तू न वाचिले
असे पत्र लिहियले

मथित हृदय तळमळले
शब्द जळत मनि घुमले
उमटले न बाहिर जे हृदयि नादले
मुके अधर हालले

जड शब्दा अडखळले
चंचल रंगा बुजले
भाव असे कंपाकुल मनिच राहिले
नयन सजळ वाकले

तू माझी दीपकळी
केवि कथू तुजजवळी
मेंदीचे अरूण रंग पर्णि झोपले
कधी सुमि न उसळले!

भाव मुके,हृदय मुके
नयनाचे नीर सुके
भ्रमत नजर, तनु पोळे, भान सांडले
किती दिवस लोटले

वाचिले न मी पुरते
दाविले न कोणा ते
लपवुनी उशास लेख अंग टेकिले
मृदुल अंक भासले!

आकांक्षांसह पवनी
लेख जाय तो उडुनी
बाभळिच्या काट्यावर हृदय टांगले
तुवा कधि न पाहिले

जलधारांनी भिजले
उन्हवादळी विटले
अभिलाषांसह धुळीत पत्र मिसळले
हसे गवत वाळले

त्या बाभुळ-तरूजवळुन
फिरतो मी रोज अजुन
मधुर भाव उशित न हृदयी मावले
नमे हसुनि पुशियले

नित उदास संकोचुन
रोमांचित तनु वठवुन
बाभळिपरि मी विषण्ण हासतो बळे
जरी अंतरी सले

तव लज्जेपरि पुलकित
अस्पर्शित अनाघ्रात
चिरतरूणा मधुसंध्या पैल नभि फुले
जिला कुणि न चुंबिले

उघडले न हृदय अधर
कळले नच मज अंतर
सांध्य-हास्य तव न विटो कधिहि मजमुळें
गळो हृदय वाहिले

बघु नकोस कधि वळुनि
मुरडत चल तू रमणि
तुज कळो न भामिनि, कुणि पत्र लिहियले
तुवा कधि न वाचिले
सखे, पत्र लिहियले

तू दार उघडशिल सांग कसे ?

तू दार उघडशिल सांग कसे ? निज मदिर गूढ नयनासरिसे

वर्षूनिया रसहीन घनापरि
शिणुनी येता मी तव दारी
मोहिनी, चुंबुनि मज संध्येपरि
भरशिल का अंतर सांध्यरसे ?
तू दार उघडशिल सांग कसे ?

मृदुल धवल शशिकिरण येउनि
उघडिति कुमुदा हसुनि मूकपणि
येशिल का गे, तूहि सजणी
स्वप्ने मधु पेरित निज हास्यें ?
तू दार उघडशिल सांग कसे ?

हसत हसत वा दीपशिखेपरि
उजळित सखये, तम माझ्या घरि
उभी राहशील उंबठ्यावरि
जाळीत स्नेह हृदयाश्रु तसे
तू दार उघडशिल सांग कसे ?

यज्ञज्वालेपरी वेदि तू न
करशिल मज वा तू आवाहन
बलिदाना, देशात चहूंकुन
यज्ञकुंड जव धडकतसे !
तू दार उघडशिल सांग कसे ?

जागविले

साजणि, जागविले
जलसिंचनि तू मज जागविले

विरळ निळीचा शेला ओढुनि
कुशित उषेच्या अन् मुरमुसुनी
निजली धरणी, तिज चाहुलिनी सळसळ वसनी चाळविले
साजणि, जागविले

कातळातुनी झरणि खळखळे
जागृतीच निद्रेतुनि खिदळे
कलश भरे तव, मम हृदयी परि, पाणी त्यातिल का उसळे ?
साजणि जागविले

गात परतलिस कलश भरोनी
ताल धरी जळ घटी हिसळुनी
येता दारी हळु तू मजवरि जलकण हसुनी शिंपियले
साजणि, जागविले

तुषारकणिं त्या तनु थरथरली
पुलकी गीतावलि झंकरली
निद्रालस मम नयनि कालचे चित्र बिंबुनी झिळमिळले
साजणि, जागविले

पीन उरोजी मम शिर घेउनि
बसलिस गाली गाल टेकुनी
मृदु हृदकंपन श्वसन ऊष्ण तव, धुंद निशीतिल आठवले
साजणि, जागविले

आलिंगनि त्या मला मिळाली
ऊब युगाची जीवनातली
अनुक्त गीतातले ताल मज तव हृत्कंपनि सापडले
साजणि, जागविले

अता उभी तू नव सुमनापरि
घेउनिया फल बीज अंतरी
दार लवे मम कल्पवल्लिनी, फळे बनुनि क्षण टपटपले!
साजणि, जागविले

पाषाण आणि मूर्तिकार

पाषाण :
"माझ्या मूर्तिकारा, स्तब्ध बैसलास
शीण का जिवास फार झाला ?
हातावेगळी ही हत्यारे केलीस
काय शंकाभास मनी येई ?
पाहतोस काय स्थीर लोचनांनी
तू टक लावोनी माझ्याकडे ?
जाणशी पाषाण मी तो तुझ्यापुढा
सर्वांगी वाकुडा कठिण की
रूप माझे सारे तुझ्याच स्वाधीन
म्हणशी ते पूर्ण नटेन मी
कल्पनेत लीन तुझ्या या डोळ्यात
निगूढ छायात पापण्यांच्या
कोण जी बिंबली, खेळली, हिंडली
हासली, रंगली अश्रुहास्यी
कलावंता, देई माते रूप वेष
तिचाच नि:शेष आवडीचा
चालू दे हातोडा तडावरी तडा
पडू दे कडाडा माझ्या अंगी
त्याच तड्यातून तुझी ध्येय मूर्ति
येइल वरती एक दिनी
याच आनंदाने उडत्या चिपात
राहतो हासत सारखा मी
छिन्न भिन्न माझ्या देहाच्या राशीत
देवि ती हासत उभी व्हावी
हीच तुझी माझी एक जीवनाशा
गोड स्नेहपाशा गळा घाली"

मूर्तिकार

"त्याच आशेने रे डोळ्यातली ज्योत
राहिली तेवत आजवरी
परि आज नेत्रा कैशी झाली गति
कुठे ध्यानमूर्ति दिसेना ती
घडवाया जिची बैसलौ मी मूर्ति
उठून जाय ती अंतरीची
जिच्यासाठी सृष्टि कलेची ही केली
तीच अशी गेली पुढोनिया

कुणाचे मी रूप देऊ तुला आता
पाषाण मी स्वत: झालो असे
घ्या हो कुणी माझी हत्यारे ही सारी
घाव माझ्यावरील घाला ऐसे .....
माझ्यातून घडे तीच दिव्यमूर्ति
जिचा ध्यास चित्ती घेतला मी"

मनिचे हेत राहिले

मनिचे हेत राहिले
स्फुरून भाव जिरले नी:श्वास राहिले
मिळत चार पाउलात
सांगाती जरि पथांत
एकाकीपण मनिचे क्षण न सोडले
मनिचे हेत राहिले
आलिंगनि तनु कवळी
अधर–सुधा चुंबियली
सौदर्य न मीलनात अजुन स्पर्शले
मनिचे हेत राहिले

कविता आजन्म लिहिलि
रसिकसभा डोलविली
जीवनात नच कधि परि काव्य उमटले
मनिचे हेत राहिले

पंख तनूचे उपटुन
काट्यांवर नीड रचुन
हृदय–पाखरू न आत शांत झोपले
मनिचे हेत राहिले

बहरली अनारकली
धुंदी क्षणि क्षणि भरली
परि जीवन रसरस डाळिंब तडकले!
मनिचे हेत राहिले

पारखे माझे मला

(गीतकाराची आत्मकथा)

गीत गाभाऱ्यात माझे भावमंथर चालले
मी उभा दारी परंतु, द्वारपाले लोटिले

पूजना मी ही, पुजाऱ्या, आणिली माळा–फुले
राहिली शेल्यात अंती कंटकांची का सले ?
सूर–मंडल भोवता डोले सभा का स्तंभहि
सूरनिर्माता परी हा बाहिरोनी तळमळे
बोलती त्या गीत–रंगी शैल मूर्ति विर्घळे
ठेच मार्गीची चुकेना हाय, माझी त्यामुळे
भाव माझे, गान माझे पारखे माझे मला
शेवटी अश्रूच माझे !..... तेही गाली वाळले !

तव नयन मुलायम हलले

तव नयन मुलायम हलले ग
हृदयभाव फुलले की दडले काहि न पुरते कळले

झुरेबावरे भुरके डोळे
पलकांच्या छायात तळपले
स्वप्न एक मधि झळकुनि गेले
चंचल जललहरींना बुजुनी मीन काय परतले, ग

स्मृती पापण्यावर थरथरली
असफल मीलनतृषा हासली
स्मिते न कळता तो दहिवरली
व्याकुळतेने मादक मदिरा अधिक नयनि फेसळे ग

बोलुनि शिणलो, हृदय न भरले
अंतरंग अकथिताची उरले
अता मुकेपणि विश्व दाटले
विष अमृत तव सद्‌गद कंठी एकमेळि हिसळले ग
तव नयन मुलायम हलले

मेंदीची पाने

पंथच मज ठावा नसे मज ठाव गाव जाया
परि निघालो मी यावया परत न या ठाया
उडे धुके क्षितिजी मुग्धतेपरि तुझ्या गहिरे
अन् विश्वात्माच्या तिमिर संकोचापरि पसरे
पैल हसे तारा सांडते तेज गूढ काही
परि तव नयनाची, राजसे, ओढ त्यात नाही
मज करू द्या घाई सांजले इथेच निघताना
दार लागलेले तुझे दे निरोप जाताना

रक्त नसांतोनी उसळले ऊष्ण झऱ्यावाणी
शब्द कधि न फुटला लोचनी आधण सांडोनी
स्तब्ध राहिली ही थरारूनि पुलकावलि देही
लाख जिभांचे या गीत कधि झंकारले नाही
काय वदू आता बोललो जे न आजवरती
मेंदीची पाने ठेविली बघ मेजावरती
हृदयरंग दडले तयाचे हिरव्या रंगात
हृदय शोध माझे वाटले तर या पानात
जिवा उधळल्या या जाचते झाकण ही काया
पंथच मज ठावा नसे मज गावठाव जाया

घाटावर

लगबग चढे घाट नार निथळे पाण्यानं
भरज्वानीचं कणिस चाले भिजून मद्यान

शिरी कळशी, चालते कोण गुलाबी नेसून
नार नागिण गव्हाळी चाले गुलाली न्हाऊन

हाती पूजाताट डोले, चंदेरीची सळसळ
कापे ज्वानीच्या वाऱ्यानं चांदण्याचं केळफूल

कोण प्रदक्षणा करी नदीपारी, कडे तान्ह
सुगी धरणीबाईची लखडली मोतियानं

अंगी धूता, शिळेभोती लाट भितरी नाचते
तिला आठवे घरात बाळ झोपेत हांसते

रात्री आणि आता

राया, तुझे रूप राती साठविले नेत्रातून
फुटे पहाट– क्षितीजी जाय चांदणे सांडून

नाही कळला हिवाळा तुझ्या मिठीच्या महाली
ज्वानि जाईची सकाळी दहिवरे काकडली

उशीवरी निश्वासांनी गेंद गुलाबी फुलले
गेल्या पाकळ्या गळून सल उरात उरले

तुझी नखक्षते, रात्री माझ्या उरी फुले झाली
सडा प्राजक्ताचा दिनी तुडविला पायदळी

एक्या उशी बोलताना रात आली हुरड्यास
सारी लटकी साखर सकाळता जोंधळ्यास

राज्य भोगिले पृथ्वीचे तुझ्या उघड्या बाहूत
उन्हे पसरता खाली सूके धरणीचे ओठ

लोटू दे मज दार

लोटू दे मज दार
तरूणा, लोटू दे मज दार
येथुनीच जा परत, राजसा, चुरड न पदरकिनार

वळवाची सर गेली पडुनी
अंग कसनसे गार झुळुकिनी
व्याकुळ करितो जिवा दडपुनी कुबट भिजट अंधार
तरूणा, लोटू दे मज दार

पहा न रोखुनि लालस नयनी
पदर गळे हा हृदयधडकिनी
अचपळ नेत्री तुझ्या सांडते तृषा किती अनिवार
तरूणा, लोटू दे मज दार

मिळेल तुज नच येथे प्रीति
मांसे मांडिली स्वरूपहाटी
प्रीतीची अम्हि मढी कोरिली, भवति श्वान-भुंकार
तरूणा, लोटू दे मज दार

शेज मलिन चुरडिली पसरली
जणुं नागिणिवरि कातच आली
ऊष्ण श्वासे तुझा फुलोरा करपवील ती पार
तरूणा, लोटू दे मज दार

नको आवळू काया कवळी
ही फुसफुसते धामिण पिवळी
चुंबनरेखा उठेल तवमुखि बनुनी जहर निखार
तरूणा, लोटू दे मज दार

कुठल्यातरि अज्ञात गवाक्षी
सखी जिवाची तुजला लक्षी
तिला नजर कर पहिला वहिला तव यौवनउपहार
तरूणा, लोटू दे मज दार

ओळख–छे, तू विसरूनि मज चल
मृत्युनंतर तुझ्या पथावर
उन्हात छाया करिन तुजवरी होऊनि नकळत घार
तरूणा, लोटू दे मज दार

विषकन्या

('तरूणा, लोटूं दे मज दार' या कवितेचे अन्य दर्शन)

आग जगा लावीन आज मी

करीन म्हटले मी दोघांचे
दिवस उद्यांचे सुमनदलांचे
फूलच माझे परि कुस्करिले फसवुनि रात्रीतून
आग जगा लावीन

घर होते मज हवे सानुले
धनी प्रीतिचा, चिमणी बाळे
प्रीतीची पडशाळा केले परि मज लज्जाहीन
आग जगा लावीन

भुकेस पशुंच्या मी बळि पडले
लाज काय मज वसन न उरले
फिरे वासना पिशाच्च माझे निज जखमा चाटीत
आग जगा लावीन

रोग–वेदना मम तनु जाळी
तांबारे ही नवति गव्हाळी
तारूण्याच्या फुला वसंता तीच कीड लावीन
आग जगा लावीन

तरूण धुंद निजसुखात चाले
बाळासह कुणि रमणी खेळे
जाईजुईची दुनिया त्यांची करपवून टाकीन
आग जगा लावीन

बहर फुलांचा मला न बघवे
मधुर चांदणी रात न सहवे
चांदण्यात पुष्पात दवातुनि विषकीटक पेरीन
आग जगा लावीन

कंपिताघरी गीत उमलले
असले माझे जीवन विकले
या सौदागर जगा ईश्वरा लिलावात फुंकीन
आग जगा लावीन

वेश्या कुलटा जगात ठरले
पुरूष कसे निष्कलंक उरले
विषकन्या मी अधरचुंबनी दैवदैत्य जाळीन!
आग जगा लावीन

रसभरा

तू बैस अशी रसभरा, मशि भिडवुनि डोळा जरा

तव नजर अशी या लोचनात बिंबते
जणु मदिर चांदणे प्रथम भूस स्पर्शते
मधु कुसुमगंधि की दिशाचक्र धुंदते–
चुंबिता वसंते धरा तू बैस अशी रसभरा

फळ रसाळ मन हे गाणे ओथंबते
परि सवेच ही वेदना मना टोचते
फळ फोडाया हे कुठे रसिक चोंच ते?
तुजविणे न ये रस भरा तू बैस अशी रसभरा

तू उबगशील परि बस सखये, तोवरी
मम थकली दृष्टी थिजेल ही लौकरी
मग जाताना, जा, सांगुन खोटे जरी
"मी बसले हं शाहिरा!" तू बैस अशी रसभरा

हेमंतपवनसम अखंड मग गाईन,
कधि वसंत येईल चिंता नच ही क्षण,
पिकलेली पाने ही सारी उडविन!
टाकील काय मग धरा! तू बैस अशी रसभरा

रुबाया

पानांचे पिकल्या विकट चाळ लेवून
ये तुफान वाता, गर्जत तिमिरातून
विझविशील सहजचि झोपडीतल्या पणती
नक्षत्रदीप पण पहा कधी फुंकून

**

रे, शेतकऱ्या, थांबवी तिफण थांबव ती
अन् सांडु नको ते मोती–दाणे पुढती
तमि नक्षत्रापरि असें काहितरि पेर
सिंहासन–मुकुटे कणसामधुनि पिकती!

**

जणु अधरबिंब! अर्धाच चंद्र वर आला
गिरितळातुनी अंधार साचला–हलला
जळजळत उसळले काळकूट जे क्षितीजी–
प्यायास काय ते अधर शिवाचा लवला!

**

किंचाळत खचते नभ, की खरते धरणी!
कुणि कळा देत आक्रोशे तमि तनु पिळुनी
ये गर्भ–कमल फोडून उसळुनी रूधिर
नवजीवन प्रगटे क्रंदन रक्तपथांनी!

**

अर्धेच राहिले गाता गाता गान
ती झोपे टाकुनि मम खांद्यावरि मान
निद्रेत हसे ती जसे चांदणे कलले
विश्रब्ध स्मिति त्या गीत होय अन् पूर्ण

**

गातोस मानवा, आशागीत कशाचे ?
नव विश्व तुझे नच येथे प्रकटायचे
रवि–गोल कधि तरी पडला, विझला, मेला .....
ही धरणी– छे! छे! थडगे त्या सूर्याचे!

**

वर्षतात उल्काफुले निळाईतून
जणु पारिजात निज अग्नि–देठ घेऊन
क्षणकांति हसे ती शिलीभूत होतांना
अमरता हीच घ्या शब्दांनो पाहून

**

माधुरी सांगु कशि मधु–घोटाची बाले
चुंबनापरी तव जी अधरी रेंगाळे
ते स्पर्श न दाहक तव आतुर अधरांचे
अन् दंश नागिणी उत्कट त्यात मिळाले

निष्पर्ण नाचती, शाखा, चाफा डोले–
जणु दग्ध अनंगचि अस्थिशेष हा हाले!
जंव शाखाशिखरी फुले फुलति एकेक
प्रीतिचे अपर्णा–तप कि कुसुमित झाले!

**

पापाचा म्हणशी उतरायाते भार
घेतोस प्रभो, तू युगीयुगी अवतार
परि पाप नवे ये नव अवतारासंगे
मग धर्मस्थापन कसले? का बडिवार?

**

धर्मास्तव किति हे सांडे रक्त पहाना
ये शोणितदर्पचि कर्पट या स्वर्मुवना
रक्ताने भिजली वस्त्रे ईश्वरतेची
प्रेषित तव आणिक तूहि खुनी भगवाना!

**

म्हणतात नभातुनि शब्द येइ जन्मास
मी शब्दांमधुनी निर्मिन नव आकाश
तपतील उद्यांचे कोटिसूर्य या गगनी
मी हसेन तेव्हा नीलिमेस मरणास

**

नाचात थकुनिया बसता तू, वेल्हाळे,
नवतिचा ऊर तव श्वासे पदरी हाले
फडफडुनि शोधिती पंछि उरीचे नीड
काहली वाढविशिं का पिउनी मधुप्याले?

**

कर्मानुसार जर मिळणे फळ आम्हाला
मग तुझी दलाली देवा, मधिच कशाला?
गणनाच करित तू रहा पापपुण्याची,
पतनीहि करू आम्ही सुंदर मानवतेला

**

तो जसा तुजकडे येइ तसा त्या भजशी
पुरूषार्थ कोणता प्रभो, यात मिरवीशी?
तुजहुनी बरे हे मनुज जुलुम साहून–
निजशूल वाहुनी नेति वधस्थानाशी

**

केलीस तूच ना कथा सुरू वद राणी
मग थांबलीस का? नीज दाटली नयनी
चांदणे उसासे मुके खिन्न क्षितिजात
अर्धीच राहणे का ही रात–कहाणी?

**

मारिली जयाने हरिच्या हृदयी लाथ
त्या भृगुलत्तेचे मी विप्लव-उत्पात!
तेव्हाच हदरले विष्णुलोक कैलास
कोसळतिल आता सत्तांधांचे तख्त

**

"तारूण्य दिले जरि ययातीस पुत्रांनी
तें सरले" कविता वदे स्वप्नि मम हसुनी
"परि तुला मानवा, चिरयौवन देइन मी
जे न ढळे, न सुके, युगे जाति जरि निघुनी"

**

पडताच मृगांचे थेंब उठे बेबंद-
तापल्या धरणिचा हा उत्मद मृद्‌गंध
हा वास, उद्याची आस अन्नदेवाची
स्पंदते तोडुनी मातीचे कण-बंध

**

मज ओढ तुझी, पाहिले जरि न तुज अजुनि
अज्ञात फळाचा फुला ध्यास दिनरजनी
चालले सुकत हे फूल गळाल्यावरती-
येशील काय तू फळापरी रसरसुनी?

**

खळखळत नदीच्या फेनिल लहरीवाणी
गीतांनो, जाता कुठे हृदया सोडोनी
तुम्हि असीम अंबर पुलकित काय कराल,
की निगूढ काळा रोमांचित स्पर्शांनी?

**

तुम्हि-अम्ही गाइली मिळुनि नवनवी गाणी
वाटले नवी गति दिली ग्रहा छंदानी
संपली रात, रवि उगवे पूर्वेलाच!
मग कळले, फिरलो स्वतांच अम्हि गुंगोनी!

**

हिसळता हृदया हे मधुकण काही पडले
मधुकुंभ तयाने रसिका, तव हे भरिले
कल्पना न रचि परि त्यावर मग हृदयाची
पिउनिही हलाहल जे अमृते मोहळले!

मायभाषेस

मातेचिया गोड दुग्धामृताची सवै आमुची तोडिल्यापासुनी
तूझ्याच दुग्धावरी मायभाषे, आम्ही वाढलो पोषलो जीवनी
ते दूध अंगातुनी गर्जताहि झळाळे विजांची प्रभा त्यातुनी
या पारतंत्र्यी अजूनही न मेली मने आमुची, या पहा डौचुनी

गोदा गभीरा निळी गूढ कृष्णा खळाळे तुझ्या काव्यगीतातुनी
स्वातंत्र्य हुंकारते ते अजूनी तुझ्या ह्या खड्या मायबोलीतुनी
देवत्व द्यावे तुवा फत्तराला तुझी थोरवी ही वदे पंढरी
टाकीत येशी चुळा अमृताच्या भराया नवे प्राण देशांतरी

माते, मराठे तुझे पुत्र आम्ही तुझी मृत्तिका नामरूपावते
गाणी तुला गावया, पूजकाचे हृदी रक्त हेलावते वाहते
बंदी अशा गायनाते करोनी गळे आमुचे कापिले हे तरी–
गातील गाणी मराठी कबंधे मराठी खुल्या माळरानावरी

शततारका...!

शततारका:

शंभर रूबाया असलेला "शततारका" हा काव्यसंग्रह कांतांनी १९५० साली प्रसिद्ध केला. मराठी काव्यलेखनात 'रूबाया' या प्रकारच्या काव्यलेखनासारखा दूसरा एखादा कुणा कवीचा मराठी रूबाया संग्रह अपवादात्मकच असेल. "रूबाई" हा मूळात फारशी भाषेतील एकश्लोकी मुक्तक असा काव्यप्रकार आहे. फारसी भाषेतला "रूबाया" हा छंद प्रकारही आहे. कांतांचे वडिल श्री. रामराव कांत हे निजाम दरबारी पोलिस अंमलदार होते. कांतांचे बालपण हैदराबादी गेले. या प्रदेशात त्याकाळी फक्त फारसी भाषेचाच वापर व दबदबा होता. त्यामुळे याच भाषेचे चलन-वलन असल्याकारणानं कांतांना फारसी व उर्दू या दोन्ही भाषा चांगल्याच अवगत होत्या. या दोन्ही भाषांचा अभ्यास व वाचन होत असल्यामुळे कांतांना "रूबाया" सारखा काव्यप्रकार सूचला असेल. एखाद्या क्षणाची अनुभूती मोजक्याच पण मनाला भिडणाऱ्या उत्कट शब्दात चार ओळींच्या बंदीस्त प्रकारात व्यक्त झाली पाहिजे हे "रूबाई"चे खरे गमक. पुढे हा काव्यप्रकार अस्तंगतच झाला परंतु "शततारका" या कांतांच्या रूबाया संग्रहामुळे भावकवितेचे काव्यपैलू समोर आले. प्रेम आणि त्यामुळे निर्माण झालेली निराशा व विफलता विषद करणाऱ्या २० ते २५ रूबाया या संग्रहात आहेत. तर दूसरीकडे काही रूबाया क्रांतीचे जाज्वल्य सांगणाऱ्या आहेत. अन्य काही रूबायातून सौंदर्यचित्रे, व्यक्तिचित्रे व इश्वरविषयक विचार व्यक्त झालेला दिसतो.

कांतांच्या स्फुट कवितांमधील प्रणय हा प्राण ओतणारा विषय खास "कांतींय" टच असलेल्या प्रेमाची आराधना करणाऱ्या "शततारका" मधील काही रूबाया पहा-

"हा पूर्ण चंद्र उगवता बघूनी एकांती
दाटतो गळा हा नयनी अश्रू भरती-"

किंवा

ठेविला चषक मी खाली अर्धा पिउनी
तूं त्यात बघत हंसलीस नयनकोनांनी
माणीकधार फेसळे तुझ्या डोळ्यांत
वद पिंउ कोठला चषक अता मधूराणी

प्रीतीभावना व मनाची हूरहूर व्यक्त करणाऱ्या खालील दोन रूबाया पहा-

"मज हीच आस जागवीत उरली नयनी
भेटेल प्रेमिका माझी मरणा अजूनी
विझवितोस नयन ज्योती ? विझव खुशाल
विझविता न येइल मीलन-आशा तिथली"

* * *

"मी गीत शोधितो तूझ्या धुंद डोळ्यांत
तू नीड शोधिशी अन् माझ्या बाहूत
सखि आलिंगन हे उन्मद अपूले असले
ना कळे विरे कि स्फुटे गीत शब्दात"

ज्या राजकीय व सामाजिक वातावरणात कांत वाढले त्या परिस्थितीचे प्रतिबिंब अगदी पहिल्या "पहाटतारा" ते अखेरच्या "मावळते शब्द" या काव्यसंग्रहातून प्रकर्षाने आढळते. राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय घटनांचे पडसाद कांतांच्या कवितेत उमटतात. आपल्या काव्यप्रतिभेचा कांतांना सार्थ अभिमान होता. अन् प्रतिभेच्या सामर्थ्यानेच आपण एक नवे विश्व घडवू असा विश्वास कांतांना होता.

प्रतिभेच्या माझ्या तेज रवीच्या किरणी
फळपूष्पी म्हणूनी फळते फुलते धरणी
मम मनश्चंद्रिका पिउन सुधाकरचंद्र
निर्मिते तृषा ही सुंदर निर्झरणी

"श्री एकनाथांच्या पायरीवर" व "श्री समर्थास" या रूबायांतून दोन्ही संतांना त्यांनी दिलेली हांक अर्थपूर्ण आहे.

अश्वत्थ मूळ्यांचा गळा लागता फास
केलेत नाथ तुम्ही मुक्त ज्ञानदेवास
अक्षरे मराठी आज करा वज्रांची
प्रिय मायबोलीचे बंधन तोडायास

'शततारका' या छोटेखानी काव्यसंग्रहातूनही कांतांच्या जातीवंत प्रतिभेचे रूप, तिचे मनोज्ञ विभ्रम, कल्पनेची भरारी, भावमृदू शब्दकळा व पुरोगामी दृष्टीकोन यांचा सखोल प्रत्यय येतो व वाचतांना मनावर कांतांच्या प्रतिभेचा वेगळाच ठसा उमटतो.

शततारका...!

शशिकिरण दीप्ति निशिगंध गंध घेऊन
कवितांनो, केव्हा याल दार लोटून?
नव उन्मद जीवनिं भराल शून्य क्षण हे
कीं जाल रात्रिंच्या स्वप्नांपरि परतून?

**

खळखळत नदीच्या फेनिल लहरीवाणी
गीतांनों, जाता कुठे हृदय सोडोनी?
तुम्हि असीम अंबर पुलकित काय कराल
की निगूढ काळा रोमांचित स्पर्शांनीं?

**

तारूण्य दिलें जरि ययातीस पुत्रांनीं
तें सरले, कविता वदे स्वप्निं मम हंसुनी
'परि तुला मानवा, चिरयौवन देइन मी
जें न ढळें न सुकें युगें जातिं जरि निघुनी।'

**

हा पूर्ण चंद्र उगवतां बघुनि एकान्तीं
दाटतो गळा हा, नयनीं अश्रू भरती
चांदणें पेटवी मनीं कशी हूरहूर?
अंतरीं प्रीतिविण रित्या सावल्या फिरती.

**

स्नेहाळ नयन हांसती लळा लावून
भेटते प्रीति नच परि त्या नयनातून
ज्वालेपरि मग हें जळें हृदय दिन-रात
आपल्यासवें निज सांगातीं जाळून

**

सरसावुनि वाती नयनीं, दीपिं, सदा
मी बघे वाट सप्तर्षि जाति अस्तास
तों कंकणसिंजित टिचकी वाजे दारीं
उघडितां दार,तो हृदयधडकिचा भास!

**

स्थलकालजवनिका जरि अपुल्यामधिं पडली
तरि दिसशी मज जशि बेगम बुरख्यामधली
परि मीलन केव्हां सांग अतां व्हायाचें,
जायाची किंवा अशिच जिंदगि अपुली?

**

मज हीच आस जागवीत उरली नयनीं
भेटेल प्रेमिका माझी मरणा, अजुनी
विझवितोस नयन ज्योती ? विझव खुशाल,
विझवितां न येइल मीलन–आशा तिथली !

**

दिनभरीं जळे आकाश रोज रविकिरणीं
निशिकालिं चांदणें हंसें परि खदखदुनी
मम हृदयाला लागणें अशिच जर आंच
मज हृदय असें दे हंसेल, जळुनी फिरूनी.

**

शशिकिरणिं नभिं घडे रोज सुधेची भरणी
तरी रितें शेवटीं पात्र अंबरीं फिरूनी
प्रतिपलीं पवनवटिं फुलें मधुर सुमगंध
निर्गंध झुळुक ये तरी अनंता मधुनी

**

क्षण येती जीवन–कुम्भ शिरीं घेऊन
मधु सगळा जाती या हृदयी रिचवून,
परि कळें न कुठुनी हृदय झिरपतें ऐसें
ये अशांत आही तप्त अंतरांतून !

**

धगवगित विखारी श्वासांनी मज कसुनी
तामसी, भुकेला अजगर ओढी कुठुनी
आकर्षित विहगापरि मी अदृश्यांत
मज कळें न पडतों भक्ष्य कुणाच्या वदनीं !

**

मज ओढ तुझी पाहिलें जरि न तुज अजुन
अज्ञात फळाचा फुला ध्यास दिनरजनी
चालले सुकत हें फूल, गळाल्यावरती–
येशील काय तूं फळापरी रसरसुनी ?

**

लाभलें जगच मज असे – रिकामा प्याला–
मधुराणी, ओतिशिं तूंहि न मधुधारेला
दुर्दम्य लागली तृषा इथे हृदयास
मनि पाजविणें नच, फोड तरी हा प्याला !

**

दोन तारा .....

तारा ..

पाहतों तुला तारके, किति युगापून
निज तेजोवलयीं फिरशीं मजजवळून

येंं तशिच जवळ आणखी, घडूं दे भेट
मी फिरें हृदयिं हा आस-जाळ दाबून

**

तारका

तुज भेटाया राहतें मीहि तरसून
मज येतां ये नच तेजोपथ लंघून
होईन शिला, लंघिता अग्नि-रेखा ती
परततें अशिच पसरले बाहु घेऊन!

**

नव तेजोन्मेषीं रमतां मी रंगून
मजसवें नाचलें छायेपरि जग हंसुन
परि आज सोबतीसाठि भटकतां तिमिरीं
छायाही गेली मज माझी सोडून!

**

गेलास लाउनी ज्योत भग्न हृदयांत
आरती करूं कीं, तिमिरीं उजळूं वाट?
या संभ्रमांत थरथरलें अंतर, तोंच
पालथी जाहली निरांजनें निमिषांत

**

काजव्यास...

तेज:कण इवला जों न मिळाला तुजला
तों पवन-लहरिवर नाचशिं किति अलबेला
या तेजीं उजळे तुझी तुला का वाट?
कीं पेटे ज्योती दुसरी या ठिणगीला?

**

पतंगास.....!

नि:स्फुरण मिरविशीं प्रकाशकण ना नुसतें
तूं ज्योति:स्फुरणीं होमिशिं सर्वस्वातें
काजव्यापरि न तुज दुबळें भूषण तेज,
तूं प्राण बळें फुलवितोस ध्येय-शिखेते.

**

श्वानास-

तूं कुजके तुकडे शोषित रस्त्याकाठीं
किति खाशिल लाथा श्वाना, पोटासाठी?
खवळून भुकेने मांसल लचके तोड
कर बंड, भिजव खा, भाकर मानवरक्तीं!

**

चंद्रिका पसरली अशी खिन्न दिक्-प्रांतीं
हिमशीर्ण दलांची पिकली पिवळी कान्ति
हें विश्वच भासें शिशिरीं झडतें पान
नवदलोन्मेष तों प्रिया-कपोलीं हंसती!

**

तुम्हि-अम्हीं गाइलीं मिळुनि नवनवीं गाणीं
वाटलें नवी गति दिली ग्रहां छन्दांनी
संपली रात, रवि उगवे पूर्वेलाच!
मग कळलें फिरलों स्वतांच अम्हि गुंगोनी !!

**

पानांचे पिकल्या विकट चाळ लेऊन
ये तुफान-वाता, गर्जंत तिमिरांतून
विझविशील सहजचि झोंपडींतल्या पणती
नक्षत्रदीप पण कधी पहा फुंकून!

**

वरसुं द्या साउली किंवा स्निग्ध प्रकाश
मज ओकें ओकें सारें गगन उदास
परि निळाईंत त्या धुंद नजर तव मिळतां
अमृतें हिसळुनी सांडे मज आकाश

**

जणुं अधरबिंब! - अर्धांच चंद्र वर आला
गिरितळांतुनी अंधार सांचला हलला
जळजळत उसळलें कालकूट जें क्षितिजीं
प्यायास काय तें अधर शिवाचा लवला!

**

एक संवाद

तो.....

त्या धुंद क्षणिच्या एक अश्रुबिंदुत
मी नाव सोडिली आली नाही परत
तव चपलाश्रूंना असें कुठे का तीर,
कीं कल्पवरी राहणें असेंच वहात?

तो.....!

तों खदखद हांसत म्हणती नयन गंभीर
एकाश्रुबिन्दु-वादळीं डळमळे धीर?
बघ जरा हांसुनी इकडे मम नयनांत
या अश्रुबिन्दुना तुझ्या स्मितांचे तीर!

**

ठेविला चषक मी खाली अर्धा पिउनी
तूं त्यांत बघत हंसलीस नयन-कोनांनी
माणीक-धार फेसळे तुझ्या डोळ्यांत
वद पिऊं कोठला चषक अतां मधुराणी ?

**

अर्धेच राहिलें गातां गातां गान
ती झोपे टाकुनि खांद्यावरती मान,
निद्रेंत हंसे ती जसें चांदणें कलतें
विश्रब्ध स्मितिं त्या गीत होय मम पूर्ण!

**

हिंडतां आठवे आज सांध्य छायांत
क्षण बसलों बोलत घेउनि हातीं हात
कविताच स्मरति तव अर्धे अर्धे बोल
गुंतलें दिसें अन् स्मित तव पानफुलांत!

**

मारिली जयाने हरिच्या हृदयीं लाथ
त्या भृगुलत्तेचें मी विप्लव-उत्पात
तेव्हांच हदरलें विष्णुलोक कैलास
कोसळतिल आतां सत्तांधांचे तख्त !

**

म्हणतात नभांतुनिं शब्द येई जन्मास
मी शब्दांमधुनी निर्मिन नव आकाश
तपतील उद्यांचे कोटिसूर्य या गगनीं
मी हंसेन तेव्हां नीलिमेंत मरणांस

**

आणिली देवि, मी कविता-कमळें कांही
स्वप्नांचीं सुमनें दळें चांदण्याचीं हीं!
अर्पिता परी हा अनघ अंजली भार
कमलांवर दंहिवर रूधिर बनुनि कां जाई ?

**

कुणि शिल्पी रचितो मन्दिर हें विश्वाचें
अन् मानव-जीवन चिरे घडवि बेताचे
कां मृत्यूचा जगिं विषाद मग मी मानूं ?
सौन्दर्य मन्दिरा जर मरणें यायाचें

**

नव जीव जन्मतां हर्ष घरांदारांशी
नवजीवन यें कां त्यानें जीर्ण जगांशीं ?
कंटाळवाणि जर पुनरावृत्तिच नुसती
कां व्यर्थ खेळतो विधि जीवनशक्तीशीं ?

**

गातोस मानवा, आशागीत कशाचें ?
नव विश्व तुझे नच येथे प्रकटायाचें
रवि–गोल कधितरी पडला, विझला, मेला,
ही धरणी, छे छे थडगे त्या सूर्याचें!

**

मृदु मूक चांदणें मम शेजेवरि पडलें
जागून देखतां नकळत मन गहिवरलें
जाहलें शब्द न गाणें ज्यांचें अजुनी
तें जीवन–क्षण कां व्याकळुनी उचमळलें!

**

माधुरी सांगुं कशि मधु–घोटाची बाले,
चुंबना परी तव जी अधरीं रेंगाळे
तें स्पर्श न दाहक तव आतुर अंधरांचें
अन् दंश नागिणी उत्कट त्यांत मिळाले.

**

वर्षतात उल्काफुलें निळाईंतून
जणुं पारिजात निज अग्निदेठ पसरून
क्षणकांति हंसे तो शिलीभूत होतांना
अमरता हीच घ्या शब्दांनों, पाहून.

**

निष्पर्ण नाचती शाखा, चांफा डोले
जणुं दग्ध अनंगचि अस्थिशेष हा हाले !
अन् शाखा शिखरीं फुलें फुलतिं एकेक
प्रीतिचें अपर्णा–तप कीं कुसुमित झाले !

**

थांबवू नको मज, पिउं दे प्याले भरूनी
अन् उंचावूं दे प्याला मधुलहरींनीं
फेंकून तमापरि वसन दिशांतुनि धुंद
मासळीच चषकीं नाच नयनिं मधुराणी !

**

नाचांत थकुनियां बसतां तूं वेल्हाळे,
नवतिचा ऊर तव श्वासें पदरीं हाले
फडफडुनि शोधिती पंछि उरींचे नीड
कां त्यांस चकविशीं पिउनि भूल–मधुप्याले ?

**

गुलमोहर फुलले लालगुलाल पथांत
जणुं कुंकुम रचिलें रमणीच्या भांगांत
तारूण्य–नव्हाळी अनाघ्रात धरणीची
उधळते खिदळते या उन्मत्त फुलांत

**

केलीस तूंच ना कथा सुरूं वद राणी,
मग थांबलीस कां ? –नीज दाटली नयनीं ?
चांदणें उसासें मुकें खिन्न क्षितिजांत
अर्धींच राहणें कां ही रात, कहाणी ?

**

पडतांच मृगाचे थेंब उठे बेबंद
तापल्या धरणीचा हा उन्मद मृद्‌गंध
हा वास उद्याची आस अन्नदेवाची
स्पंदते तोडुनी मातीचें कण बन्ध

**

चांदणें मुलायम धूसर धुंद टिपूर
ढग शुभ्र पिंजले उडति त्यांत भुरभूर
ही मध्यरात्र अतृप्ती भरी एकान्तीं
हे ढग न, छे! जळे चांदण्यांत कापूर!

**

मोहिती दूरचे दिवे न आदर्शाचे
अन् अमृत कुंभही नकोत अक्षयतेचे
क्षण पुरेत झडतीं फुलें त्यांत मी भृंग
मधुगान जागविन मी चिरचंचलतेचें

**

फेसाळ दुधाचा पुढे करूनिया प्याला
करि फेन–धवल ती हास्य साबडी बाला
धारोष्ण दूध कां हास्यि तिच्या फेंसळतें
कीं दुधांत अवखळ गीत शिवें हृदयाला ?

**

दळिं जळमट रांगे चरत जणुं किडा मंद
सरपटें रवि नभीं अभ्रामधुनी धुंद
जांभइ दे, हासें पिवळें रान उदास
शून्यांत मागती भीक उभे गिरी अंध!

**

तुजसाठी गायिलीं प्रीतीचीं गाणीं
तूं गेलिस त्यांना उपहासुनि फेंकोनी
होतांच प्रकाशित गीतें रसिकांसम कां–
हर्षसी तूंहि ही स्मशानयात्रा बघुनी ?

**

निज हृदयींचा तो कलंक जळता काळा
झांकाया वर्षे चंद्र सुधासुषमेला,
व्रण मानवतेचे असेच कां लपवाया
रचितोस कवें, तूं मधुगीतांची माला ?

**

पापाचा म्हणशी उतरायातें भार
घेतोस प्रभो तूं युगीं युगीं अवतार
परि पाप नवें ये नव अवतारा संगें
मग धर्मस्थापन कसलें ? कां बडिवार ?

**

धर्मास्तव किति हें सांडें रक्त पहाना ?
ये शोणितदर्पचि कर्पट या स्वर्भुवना !
अन् रक्तें भिजलीं वस्त्रे ईश्वरतेचीं
प्रेषित तव आणिक तूं हि खुनी भगवाना !

**

जो जसा तुजकडे येइ तसा त्या भजशीं
पुरूषार्थ कोणता प्रभो, यांत मिरविशी ?
तुजहुनी बरे हे मनुज जुलुम साहून–
निजशूल वाहुनी नेति वधस्थानांशीं,

**

कर्मानुसार जर मिळणें फळ आम्हांला
मग तुझी दलाली देवा, मधिंच कशाला ?
गणनाच करित तूं रहा पापपुण्याची
पतनींहिं करूं अम्ही सुंदर मानवतेला !

**

मज कळे जगाचा शिल्पकार तूं थोर
मी मूर्ति, मोडिशिल मलाहि, तुज अधिकार
परि, समज ईश्वरा, निर्मिलास मज घडुनी–
तूं तुझ्या कलेचा निर्दय टीकाकार !

**

चालली नार ती शिरिं गवताची मोळी
पाठीस लोंबते सान मुलाची झोळी,
मानवता चाले पदरीं जपत युगात्मा–
या अतुट कालपथिं, मुखिं अम्लान नव्हाळी !

**

बांधुनी पाठिशीं मूल हळुंहळूं गात
ती करी काम, भरि माती नव थडग्यांत
मृत्यूवर जगतें जीवन मृत्युंजय हें
दिन बांधुनि पोटीं म्हणुनी गाते रात !

**

सांवरीत भारा, तोल निघे शेलाटी
गरगरित पोटऱ्या तिच्या नितळ लवलवती
उर उभार हाले गतिंत चोळि जरि तंग,
पायांत नवतिच्या वाटहि घोटाळे ती !

**

ती घेउनि भाजी निघे, आज बाजार
पदरांत निजे शिशु उघडा स्तन भरदार
बघतात कुणाच्या नजरा तिज न गुमान
वात्सल्य धरेचे फिरे श्यामला नार!

**

घंटारव गर्जे महारूद्र पवमान
अभिषेक प्रभूला लक्ष घटांचें स्नान
कुंडांत गोमुखीं तीर्थ भक्तगण घेई
मंडूक शैवलीं उडुनी गाइ महिम्न!

**

चालला अधांतरि जो का रथ धर्माचा
स्पर्शला भूमिला वदतां अनृत वाचा!
जें घडवि जीवनीं धर्म-धरेची भेट
तें असत्य अनहत नाद न कां सत्याचा?

**

वर शांतीचा घे, दरित निजे मुचकुंद
भंगितां शांती ती जळला यवन मदांध
मुचकुंदा सरिता सांगे हीच कहाणी
जागतो प्रलय जई घडें शांतता-भंग
(हैद्राबादची मुसा नदी .....)

**

प्रतिभेचें माझ्या तेज रवीच्या किरणीं
फलपुष्पीं म्हणुनी फुलते फळते धरणी
मम मनश्चंद्रिका पिउनी, सुधाकर चंद्र
निर्मिते तृषा मम ही सुंदर निर्झरिणी!

**

पंजरी सुवर्णी हिरवे रावे वदती
मज तशी कवे, तव वाणी ऐकूं ये ती
दिक्कालिं फडफडे तुझा मुक्त गीतात्मा
गज काव्यपंक्तिचे, शब्दांचे त्या भंवतीं!

**

किंचाळत खचतें नभ, कीं खरते धरणी
कुणिं कळा देत आक्रोशें तमिं तनु पिळुनी!
ये गर्भकमल फोडून उसळुनी रूधिर
नव जीवन प्रगटें क्रंदत रक्तपथांनी

**

तें अग्नियान वर्षून निखारे गेलें
'तारका कोंभतिल मातिंत' भैरव बोले,
'हुरड्याला येतिल सुखशांतीचे चंद्र'
आशाळ मनुज जों बघे, भाजले डोळे!

घर्घरे कांपवित ढग, वन, गगनिं विमान
फूत्कारत धांवे आगगाडि खालून
कोलाहल शहरीं क्रंदन, हास्य अफाट
जग–कबंध लडतें जणुं जाणीवविहीन!

**

वैदेहि–कथा ती पुरे अग्नि दिव्याची
अन् कशास गाथा ज्वलंत जोहारांची?
वासना स्थंडिलीं पुरूषांच्या ज्या जळती
बघ राख निशातमिं उडते त्या रमणींची!

**

सोडून मायभू लक्ष जन निघती
जणुं कढत जळत दु:खाश्रु नयनिंचे तुटती?
उन्मळुनि कोसळे मानवता कां आज!
भारता, दिव्य तव या स्वांत्र्यापाठीं?

**

रे, शेतकऱ्या, थांबवी तिफण थांबव ती
अन् सांडूं नको ते मोती–दाणे, पुढती
तमिं नक्षत्रांपरि, असें कांहितरि पेर
सिंहासन मुकुटें कणसांमधुनि पिकती !

**

किरिटांतिल काढुनि कोहिनूर गर्वांत
सम्राट वदे ही अभंग शक्ति जगांत
श्रमबिंदु त्यावरी शिंपी हंसुनि मजूर
तें वज्र निमालें दंहिवर जेंवि उन्हांत!

**

श्री एकनाथांच्या पायरीवर

येतांच नाथ, ती कावड श्रीखंड्याची
जलभरणी होते प्रतिवरसीं हौदाची
परि रितेंच जीवन सारें दग्ध, उन्हाळा
ही तहान सांगा, केव्हां संपायाची!

**

या नाथ, सारूनी मृदु पुष्पांची शाल
अजुनिही तप्त रणिं रडतें अंत्यजबाळ
अमृतस्नात कर बुद्धदयेचा तुमचा
येउंद्या खालती ओलांडुनि दिक्काल.

**

अश्वत्थमळ्यांचा गळा लागतां फांस
केलेंत मुक्त तुम्हि नाथ ज्ञानदेवास
अक्षरें मराठी आज करा वज्रांचीं
प्रिय मायबोलीचें बंधन तोडायास!

शब्दास रूजवुनी या राकट काळींत
बसलांत अमृतें नाथ त्यास शिंपीत
शककर्ते गेले तरि ही आज अजून
हीं फुलें मराठी नवीं युगें फुलवीत!

**

वेंचिलीं फुलें पण गंध न आला हातीं
जल भरलें, घटिं नच गतिमय नदिधारा ती
रेखिले रंग परि त्यांत उन्हें ना ऊब
शब्दांतुनि निसटे असेंच जीवन अंतीं

**

करी हंस वेगळें, दूध आणखी पाणी
अन् गोचिड घेई रक्त, दूध सोडोनी
जल दुधांत, अंचलि दूध रक्त–पेशींत
ओळखी गोपिका चतुर गातसे गाणीं.

**

चंदेर तृप्तिची लहर स्मिताची धार
निर्झरिणी, जाशी वाहत क्षितिजापार
अतृप्त मूक परि तीर जवळ तान्हेलें
तुज कळे तटाची व्यथा काय अनिवार?

**

मोत्यांचें पाणी पुलकित काय करील
कीं तेज हिऱ्याचें हें मजला उबवील?
जा रूपगर्विते, टाक न मज मोहांत
तूं प्रमदवनांतिल तारूण्याची शीळ!

**

सणसणुनी सुटल्या गोळ्या ज्वाला जिथुनी
गीतस्वर निघति मधुर चांदणी तिथुनी
बन्दुकिची करूनी वेणु वाजवी गोप
जन्मेल नवें जग या स्वरकंपामधुनी!

**

श्री समर्थास–

देखिले समर्था, तुमचें जन्मस्थान
घन जांब, राघूचें पाचूचें उड्डाण
अन् जीर्ण त्यांत घर तुमचें–धूळ उसासे–
अर्धाच मनाचा श्लोक दिसे जणुं खिन्न!

**

शिव चिता भस्मिचे प्रलयभाव लेऊन
फूत्कार फणींचे, डमरूध्वनि घेऊन
शब्दांत उसळलें तव गोदाजल तेव्हां

ते शब्द उसळुं दे आतां गोदेंतून!
तुम्ही घार उठविली कथा ऐकिली कानीं
परि गरूड–मराठी दिसे पंखहत नयनीं
जळतात पिसांनी पिसें तयांचे पंख
संपाती दग्ध हा या, उडवा या गगनीं

**

तूं गमे विचारिशिं उभा इथे राहून
कां पद्मपत्रिं तुम्हि सडतां बद्ध बनून
क्रंदतां कशाला अंध चक्रवाकांनों,
मार्तंड जागवा तुम्ही या तिमिरांतून

**

निजसुरे निळे तव अर्धे उघडे डोळे
तांबूस उगवत्या उन्हांत हंसले, दिपले
परि बावरलिस तूं लाजलीस किति हरिणे,
जड पलकांतुनि तव निळें गुपित ओघळलें

**

जांभळ्या डोंगरीं तांबुस कवळें ऊन्ह
काकडे हिंवाने गमे सकाळीं अजुन
डंवरला जोंधळा हंसुन जांभई देई
हरभरा मिचकवी डोळे आंब पिऊन

**

पाण्यांत सोडुनी पाय उभा वड येथे
साउल्या तयाच्या नाचतिं लाटावरतें
न्यायास्तव म्हणती इथें कुणि सुळीं चढला
अभिलाषा त्याची जळांत स्वप्ने रचिते!

**

झोंपली वेस, परि पिंपळ जागे रातीं
चंद्रास्त, हिऱ्याचीं पानें अन् लखलखतीं
लागण्या झरा जो बारवेत बळि दिधला
तो वेडा हांसे म्हणति पिंपळावरती

**

'नानु' च्या डफावर मुरळी–जणुं नागीण–
नाचली विहिरिवर जी शेला टाकून
वध त्याचा होतां दिसलि न ती गांवांत,
रूमझुमति रात्रिं परि पैंजण विहिरींतून!

**

मी गीत शोधितों तुझ्या धुंद डोळ्यांत
तूं नीड शेधिशीं अन् माझ्या बाहूंत
सखि, आलिंगन हें उन्मद अपुलें असलें–
ना कळे विरे कीं स्फुरें गीत शब्दांत!

ज्वासंदी फुलली संध्याकाल प्रशांत
गिरणिचा मिसळतो धूर गुलाल–चुरांत
ना धूळ, मानवी भूक अतृप्त अघोर!–
सर्पीण लोळते सांज–गुलाब दळांत!!

**

ये दंहिवरशीतळ पहांटवारा गार
सरकतो थरकतो मृदु–मखमल–अंधार
लालिमा दिशांतुन नक्षत्रांकित उमटे
रसरसुनी पिकला तडके विश्व–अनार!

**

भिंतीशी देतें आळस तिरपें ऊन्ह
साउली खाजवी अंग हंसत टेकून
क्षण घुमुनि पारवा खिन्न उडोनि जाई
नभ–श्वान ठाकलें उभें अंग झाडून!

**

झांकली ढगांनीं धरा खिन्न काजळली
जणुं विश्वव्रणावर अवजड खपली बसली
निष्पर्णं तरूवर तों किंकाटे घार
लागला ढका, कळ अवकाशांतुनि उठली!

**

पाकळ्या उन्हाच्या येइ झुळुक उडवीत
हांसतो लिंब परि पिवळा पानझडींत
जणुं सोनसळ्या मासळ्या वांकडीं पानें–
भिरभिरति, हरवले मीननयन शोधीत!

**

सखि, काजळरेखा क्षितिजांतुनि ओढीत–
तव नयन दुरावति लावुनि मजला प्रीत
अनिकेतापरि मी म्हणुनि भटकतों रात्रीं
गाळिल्या दिनाची सुरा– नीलिमा पीत

दोन आवाज

१ ला–

जीवनी त्रुटित या हेतू शिणले शेण
व्हा नंगे नाचा 'पिस्टनगंड' चि प्रेम
पृथ्वीची तिरडी टिच्या बडवुनी बांधा
उरिं उलटें वाघुळ क्रंदे विफल भयाण

**

२ रा–

पिचला नच मानव कां गाशीं आंबून
तारांचे फुटती बोल तमाला अजुन
चांदणें कवे, दे मंथुनि अश्रु ज्वाला
अन् आण मृत्युंतुनि अमरपणाचें लोण!

**

रसिकांस

हिसळता हृदय हें मधुकण कांही पडले,
मधुकुंभ तयाने रसिका, तव हे भरिले
कल्पना न रच परि त्यावर मम हृदयाची
पिउनिही हलाहल जें अमृतें मोहळलें!

**

वेलांटी

वेलांटीः

सदूसष्ट कविता असलेला "वेलांटी" हा कवितासंग्रह १९६२ साली प्रसिद्ध झाला. "रूद्रवीणा" मधील कवितांपेक्षा वेलांटी मधील कविता अगदी निराळ्या बाजाच्या आहेत. मानवजीवनांत प्रीती, प्रेम, परस्पर आत्मबंध यांना एक वेगळं जीवनमूल्य आहे. "वेलांटी" मधील कविता स्त्री–पुरूषातील परस्पर प्रेमाबद्दल बोलतात. प्रीती अन् तिचं असफल होणं आणि या असफल प्रीतीतूनच आपल्या जीवनाचे श्रेय शोधणारा हळवा प्रियकर आणि त्याची असहाय्य प्रेयसी यांच्या व्यथीत भावनांना कांतांनी वेलांटी मधील बहूतांश कवितांमधून उद्‌गार दिलेला दिसतो. तो काळच तसा नाजूक होता. मूकपणे प्रेम करणे, एका क्षणमात्र मिळालेल्या तिच्या स्मिताला उरात कवटाळून त्याभोवती अलवार स्वप्नांचा कोष विणणे, प्रीतीचा उच्चार करता आला नाही तरी मूकपणे सर्व संवेदना मनात जपून आयुष्य कंठणे एवढेच नव्हे तर या आठवणींचा सुवास त्याची काल्पनिक धूंदी मनात फुलवून वास्तव जीवनातील रखरखीत वाळवंट तुडवित चालणे, अशा अनेक क्षणांनी भारलेली कविता "वेलांटी" मध्ये वाचायला मिळते. आपल्या मधूवदना प्रेयसीच्या मादक भिवईच्या वेलांटीत भोवंडून जातांनाचे शब्दचीत्र "वेलांटी" मधील पहिल्याच कवितेत दिसते. प्रियकर म्हणतो–

वाट अडू दे अशीच
रात्र इथेच पडू दे
तुझ्या देहाच्या दिव्याशी
तम गहिरे होवू दे
माझी सावली सरूं दे–

"वेलांटी" शिर्षकाची ही कविता सूरवातीसच कांतांच्या तरल भावनेचा नाजूक कोपरा समोर ठेवते. याच कवितेत कांत म्हणतात "अक्षरे मी आयुष्याची जूळविता तूझ्या डोळा उरे वेलांटीच अंती, तुझ्या वक्र भिवयीची," पुढे शारीरीक संदर्भ आले असतांनाही "वेलांटी" मधील कवितांमध्ये तरल मानवी भावनांची पेरणी केलेली पहावयास मिळते. कांतांच्या कवितेमधील नायिका घरंदाज, गंभीर अन् अल्लडपणे वावरणाऱ्या आहेत. त्यांचं रूप कविता वाचतांना डोळ्यासमोर उभं राहतं. "इतक्यात कशी झोप तुझी झाली, कातरवेळेला, आरसा हा नको नेउ, तूला झोपेत हंसू आले, वेलांटी ई. कवितांमधून या नायिका वाचकांसमोर उभ्या राहतात. "वेलांटी" मधील कविता सफल प्रीतीपेक्षा विरह वेदना, व्यक्त करतात. "कर मुक्तं गीत चिरदू:खीत हृदयाचे" असं म्हणणाऱ्या कांतांच्या कवितेतून पुढे विरह वेदना एकाकीपणाचं दू:ख, विरहकाल सहन करतांना प्रीतीस्मृतीचं जीवनात रूजवणं, जोपासणं, मनाचं एकाकीपण एखाद्या फुलासारखं मनातच जपणं, ही मनोवस्था कांतांनी सहज सुंदर शब्दात मांडली आहे. विरहाची भावना ही जगातील कुठल्याही वाड्.मयाच्या निर्मितीला पूरक मुळात्म म्हणून आवश्यक असते. त्यामुळेच कांतांच्या सफल प्रीतीगीतांपेक्षाही त्यांनी विरहगीतांतून व्यक्त केलेले संवेदनांचे आरोह–अवरोह अधिक मन:स्पर्शी वाटतात. विरह–वेदना, तिचं दू:ख एकाकीपणात अधिक पीडादायक होत असतांना हेच एकाकीपण कुरवाळण्यासाठी कांत शब्दांचं साह्य घेतात. शब्दांनीच सांत्वन करून घेतांना ते म्हणतात–

तुझ्या नकाराची भाषा
जाळ बने अक्षरात
आग जशी काटक्यात
अर्थ जळती शब्दात–
तूझ्या जाळिल्या पत्रांची

राख वाऱ्यात उडते
सखे काळ्या रेषांनी त्या
तरी अंतर जळते.

आत्मसमर्पणातच प्रीतीचं सार्थक आहे अशी धारणा "वेलांटी" मध्ये जागजागी दिसून येते. या शिवाय सामाजिक अपयशाचे विस्ताराने प्रगटन करणाऱ्या काही कविता या संग्रहात वाचायला मिळतात. उदा. नागासाकीचे अंध, धानराजा आला घरी, वाहते शतद्रूती, तर काही आदरणीय व्यक्तिमत्त्वांवर प्रभावीत होवून "टिळकांवरील" तू प्रलयाचा यात्रिक, "महात्मा गांधीवरील" तिमिरात उमटली तेजाची पाउले, "माधवराव पटवर्धनांवरील" मानसपूजा व्यक्त करणारी "अर्ध्य " ही कविता जीवनातील आदर्शांबद्दल कांतांच्या मनात असणारी ओढ सांगून जातात.

महाराष्ट्र शासनातर्फे उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीचा "कवी केशवसूत" पुरस्कार वेलांटी काव्यसंग्रहास देवून गौरवांकीत केले गेले तर मराठवाडा विद्यापीठातून पदवी अभ्यासक्रमात या संग्रहाची निवड झाली होती.

वेलांटी

"–एकाकी कबुतराची झोप मोडते
मिटल्या डोळ्यांत स्वप्न नाही
देखत्या डोळ्यात डोळेपण नाही
उरते वाऱ्यात फक्तं
रातांधळ्या पंखांची एकांत तडफड
जळती वेलांटी मारिते जिला सोनसळी वीज
चमकुन दूर तेढीमेढी"

******

"जुळविता तुझ्या डोळां
अक्षरे मी आयुष्याची
उरे वेलांटीच अंती
तुझ्या वक्र भिवयीची"

वेलांटी

पीत केशरी पातळ
चोळी हिरवी अंगात
नेसुनिया आपुलेच
हसू आलीस दारात

स्वागताचे तुझ्या शब्द
जन्मोजन्मी घोकलेले
भाग्य–उजरीच्या वेळी
कोसळोनी मौनी झाले

जुळविता तुझ्या डोळां
अक्षरें मी आयुष्याची
उरे वेलांटीच अंती
तुझ्या वक्र भिवयीची

पण उभी का तू अशी ?
सोड दाराची चौकट
तुझ्या ओठांच्या रेषांशी
माझी अडली ना वाट ?

वाट अडू दे अशीच
रात्र इथेच पडू दे
तुझ्या देहाच्या दिव्याशी
तम गहिरे होऊ दे
माझी सावली सरू दे

निळे कबूतर

उंच छतात
तापलेल्या पत्र्याच्या वळचणीखाली
सुस्त सावलीत
निळे कबूतर बसले आहे
एक मोरपंखी टिंब – मऊ पिसांचे!
सात ताळाच्या माड्यांवरून
दाटलेल्या मळक्या घामट ढगांत
उकाड्याने दिवस शिजतो आहे
सरत्या ज्येष्ठाचा घननीळ श्वास

(तडकत्या मातीसाठी जपून ठेवलेला)
त्या पारव्या उरात फुलतो आहे
धडधडतो आहे
निळे कबूतर बसले आहे.

उंच छतात
ओल्या पत्र्याच्या वळचणीखाली
कुबट अंधारात
निळे कबूतर झोपले आहे
पंख मिटून
चोच खुपसून, आपल्याच उरात
सात ताळ्याच्या माड्यांवरून
मध्यरात्रीचा
हलका, अबोल, पिसाट पाऊस
खिन्नपणे बरसत आहे
निळ्या निजल्या घरांवरून
भोगदीप्त पेंगत्या काचबंद खिडक्यांवरून
कलत्या पत्री छतावरून

अंग चोरून झोपलेल्या पाखराच्या पंखावरून
गळती धारा
अन् एकाकी कबूतराची झोप मोडते
मिटत्या डोळ्यांत स्वप्न नाही
देखल्या डोळ्यांत डोळेपण नाही
उरते वाऱ्यात फक्त
रातांधळ्या पंखांची एकांत तडफड
जळती वेलांटी मारिते जिला सोनसळी वीज
चमकून दूर तेढीमेढी–
निळे कबूतर बसले आहे.

उंच छताच्या पत्र्यावरून
सात ताळाच्या माड्यांवरून
थकल्या दिपल्या काचखुळ्या खिडक्यांच्या डोळ्यांवरून
रस्त्याच्या डांबरी ओठांवरून
पसरले आहे सकाळचे
उन्हाळ हसूं
वळचणीखालचे निळे कबूतर
वाळवीत पंख ऐटीत फिरते
शहाण्यासारखे काही टिपते

कलत्या मानेत आकाश तोलते
मध्येच चमकतो उन्हांत त्याचा डोळा

रक्ताचा थेंब
माणकाचा कोंभ!
परंतु
युगविरहीचे त्यात जागरण जळते आहे
निळे कबूतर बसले आहे

पुतळा

पाठीमागे
पश्चिम समुद्राचे महाद्वार जांभई देत आहे
समोर
शतकांच्या काळ्या कोसांवरून वाहात येणाऱ्या
लाटा आपटत आहेत
मध्ये पायरीवर मी उभा आहे
उदास एकाकी
आकाशाचे नाते
या सनातन लाटात फुटून गेले– खुळ्या फेसाप्रमाणे
पृथ्वीचे हिरवे पाश
गळून पडले– पिवळ्या पाचोळ्याप्रमाणे
मध्ये पायरीवर उभा आहे
रिता एकाकी मी–
धरित्रीचा एक श्वास
नियतीचा एक उच्छ्वास – विरणारा
शून्य निळाईंत एका क्षणाच्या
हजार डोळे भोवती बघतात
पण कोणीच ओळखत नाही
त्या वटारलेल्या डोळ्यांच्या चकित क्षणांत
बनतो मी प्राणहीन पुतळा–
केवळ वस्त्रांचे प्रदर्शन करणारा–
अनोळखी हाटांतला
प्राणहीन पुतळा

तुला झोपेत हसू आले

एका रात्रीत माझ्या बाहूंत तुला हसूं आले
सांगे शहारा पऱ्यांच्या देशी नीज–लतेला फूल आले

शांत झांकले टपोर डोळे
ओठ हासरे चुंबन–ओले
गोरट्या भाळी कुरळ गाली माझ्या नि:श्वासे मंद हाले
एका रात्रीत माझ्या बाहूत तुला झोपेत हसू आले

चंद्र पेंगतो स्तब्ध झाडांत
रात्र जांभळी पिके दर्यात
हे वारेही नीडबावरे पानापानात दुखरे झाले
एका रात्रीत माझ्या बाहूत तुला झोपेत हसू आले

मिठीत साऱ्या विरून व्यथा
उरल्या चंद्रा– अमृताच्या कथा
अरध्या रात्री शिणल्या गात्री सुखऽदु:ख फुला आले
एका रात्रीत माझ्या बाहूत तुला झोपेत हसू आले

कशी स्मिताची चांदणी वाट
इथे रात्रीला नसतो काठ
या वाटेने दु:ख जगाचे युगानुयुगे चालत गेले
एका रात्रीत माझ्या बाहूत तुला झोपेत हसू आले
तुला झोपेत हसू आले

चकमक झडली आहे

मातीच्या मनात चकमक झडली आहे
आज अंधाराच्या महाखंडात एक ज्योत जागली आहे
त्या शलाकेत
सर्पमण्यांचे खुनशी तेज फुत्कारते
सिंहाच्या डोळ्यांतील मृत्यूचे टेंबे लखलखतात
पण वाऱ्या, थांब,
असा रौरवत वाहू नकोस
कदाचित या ज्योतीच्या वेताळाच्या दिवट्या होतील
वणवे पेटतील सांबरांच्या शिंगातून
वाऱ्या, थांब,
चकमक झडली आहे मातीच्या मनात

विषुवृत्ताच्या कुशीत
सूर्याच्या वीर्याने हा देश जन्मला आहे
काळ्या जंगलापलीकडील शतकांच्या धुक्यात वाकून
कोण वाचीत आहे
गूढ पिरॅमिडस्‌ची तिरकस दगडी बाराखडी ?
रूद्ध श्वासांचा नि वाहत्या रक्ताचा अर्थ लावीत
कोण बसले आहे
स्फिंक्सच्या पापणीहीन डोळ्यांत!
साखळदंडांनी ओढीत नेलेल्या गुलामांच्या
वाळूवरील पदचिन्हांना
प्रतिकाराची लय सापडली आहे काय ?
चकमक झडली आहे मातीच्या मनात

वांझ वाळवंटातील रेती गर्भवती झाली आहे
घनदाट अरण्यात पेटलेल्या कटोहाभोवती
मस्तीत नाचत आहेत
अर्धनग्न काळी शिसवी अंगे
यौवनाचे काळे संगमर्मरी कडे
पावसाळ्या रात्रीतील आषाढघनांची काजळी स्वप्ने!
गवती घागरा गिरगिरतो आहे
क्षितिजाचा ढोल घुमतो आहे
त्यांच्या शंखांच्या कुंडलांत सागराची गाज आहे
पोवळ्याच्या माळांत सांडलेल्या सूर्याचे ओज आहे
आणि त्या कटोहाला फुटला आहे माणसाचा डोळा–
काळ्या पांढऱ्या कवडीसारखा
पाण्यानं भरलेला!
चकमक झडली आहे मातीच्या मनात

महंमदाचा उंट
तरवारीची पाने चावीत इथे आला
तान्हेलाच परत गेला
त्याच्या पाठीवरून उडालेली कुराणाची पानें
सागाच्या अरण्याने खाऊन टाकली
ख्रिस्ताचे कोकरूही इथे चरत आले
तागडी–तरवारीच्या भांडणात
क्रूस विसरून गेले
गंगेचे हात नि हिमालयाची सावली घेऊन
एक हाडकुळा माणूस इथे आला
आणि इथल्या मातीत त्याने प्रथम ज्योत उजळली

सत्याची शांत ज्योत– सत्याग्रही
(तप्त वाहत्या वाळवंटाचा जाळ हिमालयाच्या मनात उमटला)
गंगा–यमुनेच्या तीरावर
दक्षिण समुद्राच्या काठावर
तोच प्रकाश पसरला आहे
चकमक झडली आहे मातीच्या मनात.

सात समुद्रांच्या पलीकडे
आयनेदार 'इस्पाती' शब्दांच्या गगनवेधी महालात
जल्पितांचे भुईनळे उडविणाऱ्या,
आतषबाज खेळियांनो,
या मातीकडे पहा
वॉशिंग्टनने उपसलेल्या स्वातंत्र्यखड्गाचे पाणी
या इथे पणास लागणार आहे
लिंकनची समतेची शपथ
या कांगोच्या काठावर पूर्ण व्हायची आहे
महात्माजींची जखमी सायंप्रार्थना!
प्राणाहून मोठी होऊन
याच मातीतून सूर्यमंडलाचा भेद करणार आहे!
चकमक झडली आहे मातीच्या मनात!

गोड आंबट उगीर

ओल्या अभ्रकाचे ढग
रसरसले तेजात
ओसरल्या पावसाची
ओल अजूनी उन्हांत

हिरवट लवणांत
वाट शेंदरी वळली
पुढे धावे ऊन, मागे
नीलपाटल साऊली

तिथे जांभळीखालती
दुपारी तू भेटलीस
ओल्या पात्री बिंबलेले
गोड ऊन हासलीस

ओला शेव पावसानं
ओला खांदा, चोळी तंग
मारी लहरा ज्वानीच्या
त्यांत तुझा गोरा रंग

तुझ्या ओल्या गाली ओठी
स्मित लाजरे उठले
ऊन कालवता त्यात
खळे चंद्रम्याने केले

शिराळाच्या मनातले
झुरेबावरे तू गीत
ओचेपदर खोवून
का ग आलीस भिजत ?

माझ्या हाती ओच्यांतील
हळू जांभळे दिलीस
जळी सोनेरी मासळी
तशी निघूनी गेलीस

ओंजळीत ती अबोल
काळी जांभळे टपोर
क्षणे रात्रीची आपुल्या
गूढ गहन मदिर

काही किरमिजी हासे
सांद्र जांभळी दुपार
कुजबुजे अन् जांभूळ
गोड आंबट उगीर

ओले हिरवे दिवस

गिरिशिखरांवरूनी
सोगे सुटले ढगांचे
ओले हिरवे दिवस
येती जाती श्रावणाचे

मिटे फुले डोंगरात
फूल ऊन-सावल्यांचे
स्वप्न दिवसाच्या डोळां
तरळते चांदण्याचे

ओल्या चिंब अवकाशी
आर्त नाद पावश्याचा
पान फूल होऊ पाहे
कण कण मृत्तिकेचा

विष्णुकांतीच्या फुलांच्या
पसरल्या निळ्या रात्री
सहस्त्राक्ष आंथरितो
नेत्र धरेच्या पायांशी

गवताच्या पात्यापरी
भिजलेले माझे मन
इंद्रधनुष्याशी नाते
जोडी उन्मन होऊन

स्पर्शे केसाळ काळोख

काठाकाठानं गावाच्या
नदी वाहते वाकडी
रानराईला हिरव्या
नथ मोत्यांची फाकडी

लाल कौलारांवरून
पाने हिरवी हुंगीत
धूर आळसावलेला
चढे लोळत घुमत

उष्ण आतुर रेशमी
धरणीचा निळा श्वास
हिमे उलल्या नभाच्या
शिवे सांज-कपोलांस

सरे कापूस–वेचणी
हसे बोंड एखादेच
वेचताना गुंतलेल्या
शोधी पदराचे पेच

गुरे गेली घरोघर
खूण खुरांची पांदीत
चमचमती काजवे
दोन्ही बाजूंनी फांदीत

पारावरती मुंजाच्या
दीप जळतो विषण्ण
रेषा आपुल्याच वाची
वरी पिंपळाचे पान

स्पर्शे केसाळ काळोख
हळू येऊन मागून
वाट निर्जन भयाने
पडे लाकूड होऊन

मिठी

दूर टिटवीची साद
वाऱ्यामनी भरे काटा
होते पुळणी मनाची
हुरड्यास येती लाटा

क्षितिजाशी पाणरेघ
निळी पाऱ्याची हालते
कुंकुमाचे सूर्यबिंब
त्यात भिजतें, विरतें

संथ लाटात पायांशी
तेच बिंब उमटते
रिते जन्म सांधणारे
स्वप्न त्यांत उमलते

हातीं हात गुंफोनिया
उभे आपण पुलिनीं
तळी सरकते वाळू
मूक लाटांच्या ओढींनी

तुझ्या गुंफिल्या बोटांचे
सळ उठले वाऱ्यात
गीत माझे थरकते
ओल्या रेतीच्या ओठांत

लाट पुसे सागरास
फुटताना फेनखुळी
वेदुनीहि पृथ्वी कां रे
मिठी रितीच राहिली!

गोष्ट सांगतो एक फुलाची

ऐक फुला, तुज
गोष्ट सांगतो एक फुलाची
शुभ्र कापऱ्या स्पर्शदलाची
केशर–देठी उसासणाऱ्या गंधव्यथांची
एक क्षणाच्या दवबिंदूच्या बिलोर दर्पणिं
झिमिळणाऱ्या विरघळणाऱ्या
दुखऱ्या कालातील स्मिताची
ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो
झूऱ्या बावऱ्या एक फुलाची

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो:
रेशीम–धूसर पहाट होती
वाऱ्यावर हलकासा काटा
गवतावरती दवबिंदूतुनि
नक्षत्रांच्या हजार वाटा– स्वप्नभूमिच्या
कोण उभे या फुलवाटेवर ?
सावकार–कन्यका गोरटी
फुलांमध्ये ती फूलच केवळ
कळीच उठली देह धरोनी निशिगंधाची
उषेत न्हाउनि ती ओलेती किनाऱ्यास सावरी तनूला
उडतां पवनीं
आपुल्याच पदरास दचकते
निळ्या रेशमी विरळ सळसळिंत
चांदकेवडा तिच्या तनूच्या हळुच मदालस फुले, शहारे
झोकच न्यारा
परि हलक्या बारीक कटीचा
लववायला धनुष फुलांचे
त्या मदनाने

इथे शिकावे!
बुंद छातिचे दोन कबुतर
अधिर आर्त थरथरत्या उरिचे
शोधू खोपा
निळ्या नभामधिं उडूं पाहती
पदरांतच फडफडुनि राहती
अशी उभी ती
स्वप्न घेऊनी आकाशाचे व्याकुळ नेत्रीं
चंद्र-सूर्य जे अजुनी अनुदित

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो
एक फुलाची अन् सूर्याची
अनुदित?- छे, तो सूर्यदेवची येतो इकडे
रथ किरणांचा पैल सोडुनी
राईवर सोन्याचे पाणी
लाख फुलांचा शब्द फुटतसे मुक्या डहाळिस
परंतु वितळे
सांगायचे तिच्या मनीचे हृदयाच्या धडकीत धुक्यापरि
फक्त पापणिंत पाणी बनुनी
चढे प्रतीक्षा जन्मभराची
एक थेंब इवलासा झरता-
थेंबातचि त्या सूर्य बिंबला नभाएवढा.

नभाएवढे सूर्य हासला बघुनि तिजकडे
हास्य पेटते पेटवणारे
जरतारी तारांपरि शिरलें
नसानसांतुनि तिचिया जाळत
हवीहवीशी - तरिही जाळती - आग अलौकिक अनंत युगिंची
मान टाकुनी
कळीपरी ती लवे पुटपुटत,
"असेच देवा, मला जवळ घ्या
खुडा कळी ही जन्मजन्मिच्या देठापासुनि."

फिरूनि एकदा सूर्य हासला
आकाशामधि शब्दकवडसे
"स्पर्शी माझ्या दाहच केवळ
मिठीत माझ्या आग जागती
रात्र न माझ्या शयनमंदिरी, गूढ स्वप्नमयि

फेर धरी जी दिव्याभोवती
चिरप्रवासी मी काळाच्या ज्वलंत क्षणांचा
अस्मितेचिया आगीमध्ये आपुल्याच मी संतत जळतो
पुन्हा जन्मतो
याच अहंतेमधुनि जाळत्या
बनुनि हिरण्मय क्षण मी उद्याचा
या अवकाशी दोन क्षणांच्या!
स्थान प्रीतिचे तुझे कोठले
सांग प्रीतिच्या फुला, एकदा."
"या अवकाशी पानोपानीं
दवबिंदूंचे लाख आयने
त्या आयनेमहालांत साजणा
प्रीत नांदते – क्षण जळले जरि–
त्या प्रीतीची करा पूर्तता
जळत्या चुंबन क्षणांत एका
स्वप्नकळी ही फुलवा, फुलवा
कुसकुरूनी या देहपाकळ्या
सुगंधापरी मला जवळ घ्या
मला जवळ घ्या. "
किरणाच्या तेजाळ बाहुचा
तिच्या कटीला पडला विळखा
दबत शहारे तनु अंगांगी
ऊबदार त्या घट्ट मिठीमधि
ऊष्ण ओलसर मिटत्या नयनीं
उरात गुदमरत्या श्वासांतुन
प्रबंध फुलले नि:श्वासाचे, खोल प्रीतिचे
अधरी दाहक स्पर्शठसा तो
निर्मि खोलवर लहरी लहरी
पाऱ्यापरि सुख शरीरी धावे
फुलते शतदल कमल नाभिमधि
रक्तामधुनी फुटती लाटा
वेढुनि आत्मा
सुखद गुदगुल्यांपरी पसरती
चंद्रकोर मग तंद्राजड डोळ्यांत उगवते
अमृत स्त्रवते मनामनांतुनि
जरी गढुळली
क्लांत धुक्याची
विभावरी बावरी त्वचेची

त्या अलिंगनि
बाला होई
दुपार पांडुर सुस्त विवस्त्रा
धगधगीत बेहोष तृप्तपणिं

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो
दुपारची बेहोषपणाची
दुपार कलली ती भोगालस
आल्या रात्री गहिऱ्या बहिऱ्या
मुखि तारांचे गुपीत जळते
मुहूर तमाची तरिही ओठी
काळ्या मेघीं सांज विर्घळे आशेपरी त्या
तिच्या मनींच्या
थकली गळली वाट पाहुनी
सूर्य फिरोनी नाही आला
क्षण फुलली हुंदक्यात गद्‌गद
मुखीं कळ्यांच्या हसू फाटले जीर्ण वस्त्रसे
फुटले दवबिंदूंचे अयने
राखी हसला निष्ठुर पट्टा
त्या गवताच्या दूर मुडपल्या मानांवरूनी
क्षितिजाच्याही पैल-पलिकडे
मेघडंबरी कुंजामधुनी
उषागौर कंठात कुणाच्या
किरणांचा केसाळ बाहु तो ?

होय, तोच तो
डसला होता तिला एकदा
व्रण पुष्पाचा
रेखुनि अधरी
श्वास तिचा गुदमरला आजहि
त्या बाहुविण
चिरीत गेले चरचर कांही
शतदल कमला नाभीमधल्या
सलले तिजला तिचे नग्नपण- खोल कुठे तरि
असुनी वसने अंगावरती
उठुनि जाय तो उाव उधळुनी
भिंग खेळता फुटून गेले
कशास असले वंचित जीवन ?
चढता चढता

मधेच तुटली तार झऱ्याची
मुके तुणतुणे रसरंगाचे
नभांत फुटला डफ चंद्राचा
तोडे चुकले, चाळ विखुरले घुंगर घुंगर क्षणाक्षणाचे
पळांपळांतुन अग्न पेटला
उडी घेई ती
अशा फळांची चिता पेटवुन
ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो
एक फुलाच्या दग्ध चितेची
राखेमधुनी
तिच्या उगवले
हिरवे हिरवे झाड सानुले
फुलते रात्री लाख फुलांनी
केशरदेठी तो रक्ताचा रंग झाकळे
अन् अश्रूच्या शुभ्र पाकळ्या
देठी वेदना पाकळ्यांत हसु
ही नवलाची फुले आगळी
नक्षत्रांपरि तमी झळकती
सांगतात वाऱ्याच्या कानीं
प्रेमाची आपुली कहाणी
हसत रात्रभर
परी पहाटे सूर्य उगवता
शब्द मुके भयभीत फुलांमधि
कापे थरथर उभे झाड ते

अश्रु गाळिते
उतरूनिया शृंगार फुलांचा
उदासवाणे बघे दिशांतुनि
देत हुंदके देठीं देठीं
कुजबुज हिरवी पानोपानीं
"प्राजक्ता
हि फुले तळी ही हिच्या जिवाची
झडली रातिंत."

ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो
एक फुलाची– प्राजक्ताची
झडलेल्या घाबऱ्या दळांची
पहाटरात्री

दाराशी प्राजक्त बहरतो
वेचुनि दहिवर चांदण्यांतले–
माझ्या
तेव्हा
माझ्याही मनिं
फुले एक प्राजक्त रात्रभर
फुलीं डवरल्या डहाळ्या त्याच्या
पसरति माझ्या शिराशिरांतुनि
हलती वाऱ्याच्या झुळकांनी
टपटप झरते
गात्री गात्रीं
रास फुलांची
परि बघता मी आत वाकुनी
उरती डोळां फक्त आसवें–
आठवून मग

ऐक फुला, तुज
गोष्ट सांगतो एक फुलाची
शुभ्र कापऱ्या स्पर्शदलांची
केशरदेठीं उसासणाऱ्या गंधव्यथांची
एक क्षणाच्या बिलोर दर्पणिं
झिळमिळणाऱ्या विर्घळणाऱ्या
दुखऱ्या कालातीत स्मिताची
ऐक फुला, तुज गोष्ट सांगतो
एक फुलाची
प्राजक्ताची.

जाग आली पावसानं

मध्यरात्री अवचित जाग आली पावसानं
धनगर्जित लोळत दूर जाय क्षितिजानं
थेंब वर्षती टपोर
घरांवर दारांवर
छेडित ये जलधार
आर्त चांदणी केदार शहारते पानपान
जाग आली पावसानं

मघा नक्षत्र वेधूंन वीज करी वाकवीत
वारावादळ पिऊन भाद्रपद ये झिंगत
निळी मखमल मेघांची

शुभ्र फुले कुटजांची
यक्षगीतें विरहाची
तुडवीत भाद्रपद नाचे धारांत बेभान
जाग आली पावसानं
नागमोड सोनसळी वीज लखाखे पुढून
सुप्त पानें उजळता झाड उभे भांबावून
असे माझिया मनात
कोण ठाकले भिजत
स्वप्न तलम निद्रेत
रचू जाता तिचे गीत झोप मोडे वादळानं
जाग आली पावसानं

विजा तिच्या हासण्यात लोळे घन पदरात
धुंद उषा पावसाळी जांभई दे लोचनांत
सावलत्या चांदण्यात
वीज जाय लखाखत
तसे माझिया स्वप्नांत
येई जाई कुणी तरी निळ्या निद्रेच्या काठानं
जाग आली पावसानं

वर

ओठंगे आकाश
माझ्या गवाक्षास
बेड्यांनी भूमीस
खिळतां मी

शिंपांच्या संपुटी
सागर गर्जती
चतुर ऐकती
कान माझे

काजव्याच्या पोटी
सूर्य झळझळे
पाहतात डोळे
मिटूनीहि

माझ्या जखमांना
वर एवढा दे
जिव्हाळी लागू दे
अमृताची

बांग

एका तालात एका ठेक्यांत
हजारो पाय वाजत येतात
हवेत हजारो निशाणे फडकू लागतात
दिशांत घुमतात कोटि कोटि कंठांचे नाद
मी म्हणतो,
ही नव्या जगाची ललकार आहे
युगांतराची प्रभातफेरी चालू आहे
पहा, पहा हा नव्या पर्वाचा पुण्योदय
नव्या युगाचा नवा प्रकाश
करा, नव्या युगाचा जयजयकार करा.
माझे हे आवाहन ऐकून
रस्त्यावरील पडक्या भिंतीची खुजी सावली
पचकन थुंकते, म्हणते–
आज सकाळी
मागच्या खुराड्यांत
सुरीच्या सावलीत फिरणारा
कसायाचा कोंबडा
अशीच बांग देत होता
दिवस उजाडल्याची
नव्या पहाटेची!
काय तुमच्याही डोळ्यापुढे कोंबड्याची पिसें उडू लागलीत?

चांदणे हे डहुळेल

ऊन रेशमी पडता
डोळे फुलाचे दिपले
बिंब दवाच्या दर्पणी
सात जन्मांचे पाहिले

सात जन्मांचे संचित
तुझ्या हास्यात माळले
जपतात दु:ख पोटी
काळी डोळ्यांची वर्तुळे

साहिल्यास साऱ्या व्यथा
ज्योतीपरी तूं कापत
तेवलीस रात्रभर
माझ्या मातीच्या घरांत.

झोप आता, नको बोलू
फूलमिटू झाले डोळे
अर्थ जागविता ओठीं
शब्द माझे पेंगुळले

आता बोलू नको काही
निळाई ती गढुळेल
नि:श्वासही नको खिन्न
चांदणे हे डहुळेल

आरसा हा नको नेऊं

आरसा हा नको नेऊं

ठेव जिंदगी गहाण
सुखे घेई पंचप्राण
मागू नको भिंग पण
क्षण बिलोरी सुखाचा एवढा हा नको नेऊं
आरसा हा नको नेऊं

दिसा हास्याच्या धुळीत
रात्री अश्रूंच्या धगीत
स्वातीविण पापण्यांत
जपलेला दिठीतिल माझा मोती नको नेऊ
आरसा हा नको नेऊ
पहिली ती भेट–प्रीत
बिंबली या दर्पणात
तिच्या फुलून स्मितांत
काठी रात्रींच्या तरंगे तोच क्षण मेघमऊ
आरसा हा नको नेऊ
देत जांभई हसत
उभी केस विंचरित
काया पुनवेची श्रांत
कलणाऱ्या चांदण्यात पके हुरमुजी गहू
आरसा हा नको नेऊ

सखीविण आरशात
आज पुनवते रात
हसू फुटे कुंतलात
प्रतिबिंबी जगण्याचे माझे वेड नको नेऊ
आरसा हा नको नेऊ

ओल चांदण्याची

रित्या क्षणापरी वाके चंद्रबिंब डोंगराच्या काठी
वाळली रात्रीची ओल चांदण्याची धरणीच्या ओठी
धुके घरांवर हुंगते सुगंध साखरझोपेचा
उडता पाखरू गवाक्षी शहारा सुटत्या मिठीचा
ढगांच्या काठांशी धुक्याच्या लाटांशी चांदणे फेसळे
तिथेच उषेचा सोनेरी नारंगी प्रकाश हिसळे
अशा या प्रकाशी नहात उभी तू पुढे सौधावर
मला निरखून रोखिशी हसून दृष्टी नभावर
दिवा झाडाखाली तेवते ढगात चांदणी शुक्राची
जपे खूणगाठ ज्योतीच्या धाग्याची रेशमी रात्रीची
स्वप्नीं भारावून दोघांच्या व्याकुळ भिडल्या नजरा
मुक्त मनें झाली तुटला क्षणात जन्माचा पिंजरा
पुंजाळतो तुझा चाफेगौर स्पर्श उषेच्या रंगात
ओठाचिये देठी खुडिलेले शब्द पिकती मौनात
भरीतसे दोरा आपुल्या स्वप्नांना झाडांमधी रात
उसवे शिवण फाटकेपणाच सकाळपणात
रित्या क्षणापरी वाके चंद्रबिंब डोंगराच्या काठी
वाळली रात्रीची ओल चांदण्याची धरणीच्या ओठी

यक्ष

माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायात फिरत आहे झुरत आहे
निळा रामगिरि खिरला आहे छायांचे रेशिम वठले आहे
रडून थकल्या डोळ्यासारखे पुण्यसरोवर आटले आहे
शुभ्र हास्य ते कुटजफुलांचे मळक्या सावल्यात विटले आहे
बगळ्यांची माळ तुटली आहे प्रियेचे चित्र पुसले आहे
माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायात फिरत आहे झुरत आहे

वर्षभराचा शाप त्याचा युगे सरली तरी सरला नाही
मेघाचाही अजून हिरवा घाव विजेचा भरला नाही
फुले जिथे सुकत नाहीत जिथे चांदणे मावळत नाही.
आनंदावाचून नेत्रांमधून जिथे अश्रु झिरपत नाही
गोऱ्या लाजऱ्या गुलालमुठींनी शय्यादीप जिथे विझत नाही
रत्नांच्या दीपांचा अम्लान संध्येचा प्रियेचा तो देश दिसत नाही
थिजून पर्वत झाला त्याचा! शिवाचे हास्य राहिले नाही
स्वप्नभूमि ती लपली क्षितिजी दिशांचे बंधन तुटले नाही
माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायात फिरत आहे झुरत आहे

उंबऱ्यावरती दिनगणनेची फुलांची रास सुकली आहे
मोर नाचतो परी विरहिणी धरताना ताल चुकली आहे
अश्रूत तिचा स्वर भिजला आहे विणेची तार तुटली आहे
गळ्यात गाणे उरले नाही तनूची चंद्रकोर झरली आहे
स्वप्नसखीला अलकेमधल्या प्रतीक्षेचा शाप जडला आहे
चिरविरहाचा विकल प्रीतिचा यक्षाला वर लाभला आहे
त्याच्या नशीबी फुलांच्या प्याल्यात कडू अश्रूंचा घोट आहे
डोळ्यात आशा, दिशात धुके पायाखाली मोडली वाट आहे
माझ्या डोळ्यांत एक यक्ष तरीहि अजून जागत आहे
आषाढाच्या उद्या छायात फिरत आहे झुरत आहे

नागासकाकीचे अंध

नागासाकीचे आम्ही दीन अंध
चाललो पथाने
कबंध जयाचे मानवतेच्या
आम्ही जयघोष विश्वशांतीचे रक्तलांछित
शांतिनगरीचे आम्ही प्रजाजन
स्मशानवासी
निरपराधच बळी संहाराचे!

–तेव्हा
अश्रु पुसाया निरपराधांचे
ईश्वरापाशीहि नव्हता पदर
आम्ही वाळलेले डाग
धरणीच्या गाली

चाचपडत ठेचाळत आम्ही आमच्या शवांना
चाललो पथी
विज्ञानमनींच्या विफल आशांच्या

दग्ध छायांपरी
समोर उभे प्रार्थनामंदिर
हसत भयाण लाजिरवाणे
पडक्या भिंतीच्या जळक्या खिंड़ारी
निज लक्तरांनी
प्रभुकृपेची लाज झाकू बघे!
पडली पुढे कोसळोनी घंटा
शून्याला साद घालून थकली
आणखी हे झाड!
भरीत राख उषेच्या ओटीत

हसे वेड्यापरी रस्त्याच्या कडेला
वाकले आकाश
हुंदका बनून
–आणि ही माणसे घरी, दारी, पथी
बाजारहाटी
संज्ञाविहीन
मांसाचे गोळे बनून फिरती
चाटीत क्षते कण्हत क्रंदत
स्मृति हारवून ज्योत मालवून
मनाची युगाची!

त्या दिनी
प्रकाश पाहिला निळाजांभळा
येताना वर क्षितिज चिरीत
स्फोट मागोमाग भूगर्भातुनी
धरेची आतडी कापीत धावला
उठली धूळ
प्राशाया तेजाचे तेजाबपाणी निळेजांभळे,
परंतु स्वयेच
पेटली धूळ
जळत जाळीत स्थिरचरांना
क्षणी काळ्याकुट्ट होती दाही दिशा
गोठून उभे धरणी आकाश
राखुंडी बनून
–असा पाहिला प्रकाश अंबरी
जाहलो आंधळे तेव्हापासोनी
आंधळे न झालो आम्हीच तेवढे
फुलांचे डोळे

क्षणांचे लोचन
सारेच आंधळे नागासाकीचे!

अंधतमात
तरीहि आम्हांस धुक्यात दूर
सत्य दिसे,
लवे विद्युतरेखेपरी
धूसर रात्री हिमप्रलयींच्या
विज्ञानमत्त मानवांनो, पहा
बघा पुजाऱ्यांनो संहारशक्तीच्या,
भिंगामधून नक्षत्रवेधी दूरदर्शिनीच्या
येई धडधडा
जीवनरथी विनाश बसून!
मानव झालासे घोर रात्रिंचर
कल्माषपाद!
हिंडे किंचाळत निज अंतरात
अभिमंत्रुनी शापाचे उदक
विज्ञानी मानव
जाळाया सजला त्या करूणामय मानवतेला
निज हृदयीच्या,
परी बावरून
सोडिले तयाने शापाचे उदक
आपुल्याच पायी
स्वशापे दग्ध क्षते भगांकित जळत्या चरणी
व्यथेने पीडित
कल्माषपाद विज्ञानी मानव
आपुल्याच ध्वस्त भयाण अंतरी
हिंडतो क्रंदत!
चालता पथे
पाहतो हे दूर
आम्ही दीन अंध नागासाकीचे

स्वप्न रात्र ही सांभाळ

रात थंडीची सरती
विरे पहाटधुक्यांत
हारवल्या कला शोधी
क्षयी चंद्रिका ढगात

लावी पंचम विकल
असा झोपेत कोकिळा
रसगंधाच्या स्वप्नात
तिला काटाच बोचला

हिरव्या मौनास झाडांच्या
पाखरांचा कंठ फुटे
निळ्या नभाच्या ओढीने
सुख खोप्याचे उस्कटे

होई लाल हासतांना
देठी देठी पारिजात
व्यथा झाकळे अशीच
तुझ्या हासऱ्या ओठांत

निघे सोडून मी तुझा
चंदनाचा उंबरठा
ओढितात मज दूर
लांब काळ्या काळ्या वाटा

वाटांचा मी बांधलेला
नाही सुटायचे पीळ
तुझा डोळां दवातून
स्वप्न रात्र ही सांभाळ

दीपछाया

करिशी कां दु:ख
होता ताटातुटी
विलगता, ओठी
स्फुरे शब्द

वेगळाल्या तारा
करिती झंकार
निर्मिते अंतर
नादब्रह्म

तुझे तत्त्वज्ञान
सांग पाषाणास
मुक्ति पतंगास
दीपछाया.

ही दुपार

धगधगीत ही दुपार
नाही हिज अंत पार
वैशाखी हुंकारचि
धगधगीत ही दुपार

तापुनिया धुरकटले
आहळुनी चुरगळले
केळीचे पान निळे
कडकडते, फडफडते फाटायापुर्वी जणु
शुभ्र लोंबत्या ढगांत
गगन असे डोक्यावर
धगधगीत ही दुपार

गगन निळे तप्त शिसे
वितळुनीहि नच वितळे
साउलीहि त्यात जळे
गळलेल्या जळलेल्या पानांच्या राशींमधि
तरूतरूच्या हृदयातील
छायांचे गार स्वप्न करपुनिया लोळतसे
धगधगीत ही दुपार

मूक किती
किति नीरव
धगधगीत ही दुपार
छे छे, या आगीमधि नीरवताही उकळे
या पडक्या खिंडारी
त्या निर्जन बाजारी
कढ तीचे सर्व मुके
लव सुकल्या पानांची
प्रात:स्मित सुमनातिल
क्षणीक्षणी सुकणारा फळातील रसोद्रेक
नीरवतेमधि वितळे
या दुपारच्या उन्हात
धूमिल धूसर दिशात
धगधगतो मातीचा चिरविषाद
धगधगीत ही दुपार

नीरवता ही मूर्च्छा धरणीला जडलेली
चाळवली
वाऱ्याच्या झुळुकीने
धूळ दचकुनी उठली, वाऱ्यासह अन् गेली
फुत्कारून रस्त्यावर
हासत ती वेड्यापरि निज आंतर ज्वलनाला
स्तब्ध सर्व, सर्व शांत
खिन्न, क्षुण्ण अन् उदास
एकाकी ही दुपार
एकांतचि धगधगीत
किति अपार किति अथांग
दूर परी खिंडारी
शुष्क वृक्षशाखेवरि हुंकारे व्याकळुनी
एकटा सुतार पक्षि
'टक् टक् टक्'
कर्कश रव तो भीषण
चिरित जाइ बाणापरि
त्या दुपारच्या क्षणांस
तप्त दग्ध गहनतेस
अन् नीरव अनंतास
स्थलकाला कोरितसे 'टक्टक्' रव तो भयाण
धगधगीत ही दुपार

रणरणत्या रस्त्यावर
इवलेसे अनवाणी पाय कुणाचे पडती
पोर नागवे–उघडे रडत पळे
पदर धरूनि आईचा
सान पाय भाजतात, पोळतात
मातीने वाळतात
गळणारे अश्रु गालि,
करूणेच्या जखमेवरि
धरि खपली अतुट घृणा !
किंकाटे झाडावर क्रूर धीर
आईचे हृदय वळे
फाडुनिया पांघरता पदर करे
बांधि पाय बाळाचे
नच उरला पदर तिला–
लाज नभाची उघडी!
धगधगीत ही दुपार

सावरून पान–फुले
घाईने कोण निघे ?
नागिण ? –छे –
माळिण ती हो गव्हळी
लवत निघे शेलाटी
अडवी चिरि कुंकाची निटिलावर ओलावे
कानशिलावरूनि घाम डवरूनि ये सोनेरी
गोल नाचऱ्या नयनीं
ये उसासुनी तहान
अधरी स्मित रात्रीचे दवबिंदू प्यालेले
तिरपेने आहळले
पाटीतील पुष्पापरि
चरणचाल चपळ निघे
केतकिचे कणिस डुले
गोल छातिचा उभार तटतटल्या चोळीतिल
भिजलेल्या काठातुनि डोकावुनि सांगतसे
सूर्याला आकाशी,
"तू खुशाल आग ओक
बघ शितल चंद्रम हा उरि माझ्या
अमृत नित स्त्रवत असे
धगधगीत जरि दुपार !"

उठला बाजार सर्व
अन् ओक्या ओट्यावर
घनतृष्णा एकाकी बसुनि खिन्न
श्वानापरि चाटितसे
आपुलेच शुष्क ओठ
छायातुनि पेंगतसे निंब एकटा वरती
विस्फारूनि नेत्र बघे दाजीबा सावलीत
माल पुढे पडलेला
बाजारी नच विकला
विकला नच माल जरी नेऊ मी काय घरी ?
सांजेची काकणेहि
वाजतात उंबऱ्यात
दीप कण्हे खोपटात
जाळ फुरफुरे चुलीत
परि रिताच वरति तवा तो भकास
वाट बघे भाकरिची

फिरति मुले कोपऱ्यात
घार फिरे डोक्यावर
चोळुनिया नेत्र बघे दाजीबा
विस्फारित त्या नेत्री अग्निरेघ धगधगती
क्षितिजापर्यंत जाय
कापुनी दुपारउन्हे!
धगधगीत ही दुपार

धगधगीत ही दुपार
खोल मनी
जतन करी
चटके ते अनवाणी पायांचे
गरिबांच्या लज्जेचे जळ धरिते अंजुळीत
अमृतही हळु टिपिते माळिणिच्या हृदयातील
दाजीच्या व्यथित मनी
रंगविते आशेने बाजारहि पुढील नवा
जरि विखार
तरिहि मधुर
धगधगत्या अंतरात
ज्वालामय स्पंदनात
दग्ध तिच्या त्या करांत
पश्चिमेस क्षितिजावर –दूर दूर
मृदु गुलाबकलिकेपरि
मधु रसाळ द्राक्षापरि
अनाघ्रात अधरापरि आतुरपणिं थरथरती
अन् विरक्त भजनापरि
किणकिणती झंकरती
क्षीण एकतारींतुनि
दीपांतुनि थरथरती
गोठ्यातुनि हंबरती
माउलिमनिं सुमझूमती
करूणामय ओवींपरि
सांज अशी
सजे, फुलले तिज हातीं
धगधगीत जरि दुपार

काही काळ्या निळ्या रेषा

काही काळ्या निळ्या रेषा
उमटल्या कागदांत
रेघोट्याच शाईच्या त्या
जीव कापीत जातात

तुझ्या नकाराची भाषा
जाळ बने अक्षरांत
आग जशी काटक्यांत
अर्थ जळती शब्दांत

तुझ्या जाळिल्या पत्रांची
राख वाऱ्यांत उडते
सखे, काळ्या रेषांनी त्या
तरी अंतर जळतें

अश्रु नेत्रींचे देऊन
तेज स्मिताचे पाजून
फुलविले भावफूल
जायचे का आहळून ?

कंठांतून कोकिळेच्या
तप्त सूर वितळले
कां ग हासतां हासतां
रान पिवळें पडले ?

चंद्रकाराच्या स्पर्शाने
कापे ओठ क्षितीजाचा
असा जळता कापूर
नको करूं चांदण्याचा !

मजला ठाऊकः तुलाहि माहित

मजला ठाऊक
तुलाहि माहित
आकाशाचे आपुले नाते
काहुरकाळ्या पावससरिच्या
विद्युत–भोगी आर्द्र क्षणाचे
आकाशाचे अपुले नाते
मजला ठाऊक, तुलाहि माहित

सखे, परी त्या क्षणांत एका
मातीच्या मनिं
नक्षत्रांची फुले डहाळी
काळ्या करड्या निळ्या ढगांना
येई ओला गंध मातिचा
कसे घडे हे ?
थांब सांगतो
–लाजु नको पण–
चांदण्यात न्हालेल्या रात्रिस
सुगंध येतो तुझ्या तनूचा
मजला ठाउक, तुलाहि माहित

मजला ठाउक, तुलाहि माहित
क्षण तो सरतो
सरे न नाते
उरात लागे खोल जिभाळी
तेव्हा– त्या क्षणिं
नि:शब्दाला येइ शब्दपण
अर्थ झगटतो शून्य नभाला
सरतें, गळतें
सूर्यमुखीचे
कनकपात्र लखलखते, वंचक
लाख चंद्र मिटती, फुलती
नखाएवढ्या जिभाळीतुनी
आणि उसवत्या आभाळाला
व्यथा आपुली भरते दोरा
मजला ठाउक, तुलाही माहित

मजला ठाउक तुलाहि माहित
प्रतीक्षेत त्या एक क्षणाच्या
ग्रीष्मिं जन्मभर तपत रहावे
वेदनेस उरि जपत रहावे
जळत डसत
एकांति स्वत:ला
या धरणीचे आकाशाचे देणे द्यावे
मजला ठाउक, तुलाहि माहित
तरिही डोळां येति आसवे

पुसू नको तीं
पुसू नको तीं
आकाशाचे अपुले नाते
मजला ठाउक, तुलाहि माहित

ठिपके

झडीत भिजुनी
कुरकुरणाऱ्या म्हातारीपरि
रात किरकिरे बाहिर काळी,
घुसळुनी जाई रस्ते रानें
सुसाट वारा
सरसर धारा
जाती नाचत
पानापानावरी तरूंच्या
भिजलेला अंधार शहारून
सडसड झाडी
अजस्त्र अपुली तनु केसाळी
कण्हे शून्य एकांत रात्रिंचा

तनु माझी तापली पोळते
उठती त्यातुन
ओल्या अन् धगधगत्या वाफा
लाल जांभळे पिवळे काळे
मोरपंखि किति
ठिपके धावति
जळजळत्या मम डोळ्यापुढुनी
हलके होउन
शरीर सारे
जाइ तरंगत हवेत वरवर
पिसांपरी–पण
तोच स्पर्शते
काट्यापरि ? छे,
मृदुल फुलांच्या पाकळ्यांपरी ?
की श्वासापरि थंड कुणाच्या ?
फिरते काही
तिक्ष्ण सुरीपरि काळजातुनी
आदळते तनु खाली अवचित
मी बावरूनी दचकुनि उघडी
जडावलेले काही डोळे

मेजावरती
उंच वाढतो
उभा उभा काचेचा प्याला
फिरूनी होतो खुजा क्षणामधि
मोसंबी ती दोन पलिकडे
बघति न्याहळूनि
रसरशीत सोनेरी कांती
परस्परांची
सुस्त क्षणांच्या मुखी उगीचच
खट्टे मिठ्ठे सुटते पाणी
सफरचंद तो हिरवा शेंदरि
आपल्याच रंगात चमकतो
बिलोरकांती
दिवा जवळचा त्यात वाकुनी
उगिच पाहतो बिंब आपुले
आणि दचकतो
जाणवता निज एकाकीपण

तोच कोठुनी
पतंग येई
फेर धरी तो दिव्याभोवती
झिंगुनिया आपुल्याच वेगे
त्या वेगामधि
फिरत उमटते
धगधगीत सोन्याचे वर्तुळ
खळे दिव्याचें
गरगरते थरथरते चंचल
त्या सोन्याच्या मंडलातुनी
हळूच उठती
गोरे गोरे दोन हात मग
गोरी बोटी
लांबसडक निमुळती हालती
"लैला की उंगलियां
मजनूं की हड्डियां"
लाल नखें चमकती क्षणभरी
इवला इवला अधर हासतो
व्याकुळ दुसऱ्याच्या तृष्णेने
आणिक फुलती
कमानीत भिवईच्या सुंदर

टपोरकाळी मीनलोचनें
लांबुन बघती
घेउनि पदरी अथांग करूणा
धावत येती गूढ नयन ते
जवळी–जवळी
भालावरती
स्पर्श रेशमी मोरपिसांचा
झुळझुळत्या पापणिचा होई
तृप्तीने मग क्षणभर माझे
नेत्र झाकती
आणि उघडती
सोनेरी धगधगते वर्तुळ
फिरत राहते
जळत नि जाळित

माझ्या मनात उभी तू

माझ्या मनात उभी तू
माझे मनचि होऊन
नि:श्वासशी कवनात
माझी वेदना बनून

नामरूप तुझे घेती
अर्थ माझिया शब्दांचे
दग्ध पानास दिले तू
स्वप्न फुलत्या फुलांचे

ऊब तुझ्या श्वासांतील
शिवे मला एकांतात
गंध दर्वळे तयाचा
निळ्या रात्रीच्या कोषांत

तुझ्या व्याकुळ लोचनी
साकळले दहिवर
दूर क्षितिजी थरारे
खिन्न सागफुलांवर

मिटे उषेच्या ओठांत
रात–तारांची कहाणी
तुटे आनंदाचा क्षण
गुंफिलेल्या अलिंगनी

बाहु अतृप्त, आतुर
सारिलेले एकांतात
बिलगती, बिलगती
सखे अरध्या ओळीत

जन्मायचे नव्हते मला

जन्मायचे नव्हते मला
डाळिंबी केशरी अपरेच्या रंगाचे
प्रतिबिंब उमटे
पूर्वेच्या वदनी
धावत्या मांसल क्षणांच्या क्षितिजी
उमटलो तसाच मी
उगीच–उगीच
नसता मनात

दोन भावनांच्या जळत्या उन्हांत
दोन वासनांच्या घोर वादळात
रूजलो, भिजलो
अकल्पिताच्या रसार्द्र भूमींत
अनिच्छेच्या काळ्या– हिरव्या देठावर
थरथरत्या इच्छेच्या दळांनी
फुललो! अपघाताचे बावरे फूल!
हसतो आहे, डसतो आहे
माझ्या अनिच्छेला
जन्मायचे नव्हते मला.

कवच

सांगाया मग जीभ कशाला
रहस्य उघडे सर्व तुजपुढे
शब्द मोडू दे, ओठ मुडपु दे
खुले असे ना दार हृदयिचे

पुसट अक्षरे जरि भाळींची
वाच सखे, तूं माझ्या नयनी
लिही बाहुली जें रामायण
मृत क्रौंचाच्या आर्त रवांनी

उघडे माझें सारे जीवन
पिचले फुटलें आघातांनी
जखमच आता कवच जाहली
रक्षायाला सत्य जीवनीं

छाया चाफ्याची

छाया चाफ्याची अंगणीं
झोपेपरी चाळवते
देठांपाशी क्षणोक्षणी
स्वप्न फुलांचे तुटतें

खिन्न नि:शब्द चांदणे
दिसे केळीच्या पानांत
साद त्याची अवघडे
दूर धूसर नभांत

रंग पानांचा हिरवा
वाऱ्यातुनी उसासतो
उगी चांदण्यात अशा
डोळा पाण्याने भरतो

धानराजा आला दारी

सुगी येताच यायाचा
राया, तुझ्या वायदा ना ?
चाळ घेत बांधावरी
उभी तुझी 'राजी' ये ना ?

दीस सुगीचे चंदेरी
उगवती मावळती
सांजसकाळी आभाळी
चूर सोन्याचे सांडती

शेत आले हुरड्यास
भात पिवळा सोनेरी
मुठी भरून धान्याच्या
रोपे नाचती शिवारीं

दीस पुढे, ये तिरपें
सांजऊन शेतावर
दृष्ट लागेल, ये झाक
तुझे कुबेरा, भांडार

याच सुगीच्या दिसांत
याच पाऊलवाटेनं
निळ्या डोंगरी गेलास
'मल्लेचेरू' ओलांडून

दीस सुगीचेच, परी
पीक घरा नाही आले
सोनियाचे साळवन
उभे शेतात जळाले

बैल उपाशी दारांत
मुले भुकेली घरांत
दीन घरधनी पाही
धूळ उडे वावरांत

रिते पोट आवळून
ओठी हुंदका धरून
शेजी हिंडती घरांत
राख झोपे चुलींतून

वारा फिरे घोंघावत
झोपड्यांत झाडांतून
दूर दुष्काळहडळ
किंकाळते रानांतून

तोच 'लेव्ही' वसूलीला
आले सर्कार पुकार
गाव दचकले सारे
–आणि कापले शिवार

गडी नेले चावडीला
दैत्य शिरले घरात
बंड दिसले तयांना
भुक्या गावाच्या डोळ्यात

मोती पिकवी जो रानी
राजा माझ्या धरित्रीचा
पाठीवरती उघड्या
खाई मार आसुडाचा

जिच्या पदर–वाऱ्यानं
जख्ख भूमी ही तरणी
तिच्या नवतीची लाज
रडे लोळे बिदींतुनी

दगडाचा जीव तापे
फुटे अन्याय पाहून
लाल ठिणग्या उडाल्या
काजव्याच्या अंगातून

त्यात अग्निबाण राजा
उठशी तू खवळून
क्षण चमकले पाते
पडे कुणी उलथून

तोच पेटली चावडी
पाठीमागे उठे जाळ
खचे भिंत एक स्फोट
एक हाक–गदारोळ

सुटे गोफण भरार
मारूतीच्या लिंबाहून
गोळ्या झाडीत हवेत
पळे पोलीस भितीनं

उजाडता झुंजुर्काच
वेढा पडला गावास
जाळं संगीनींचं लागे
राजा तुला धरायास

कोट फोडून परी तू
गोळ्यांपुढून गेलास
'सुगी येता धानासंगे
येईन– तू म्हणालास'

लाल मातीत उठल्या
लाल तुझ्या पायखुणा
पुशिल्या मी पदरानं
माग लागो नच कोणा

कुणी म्हणे कायसे ते
भूमीगत तू झालास
मग बळीराजापरी
ये ना आता दिवाळीस

पाणथळीत भाताच्या
पहा फूल-ऊन नाचे
ऐक चांदीची चाहूल
चाळ वाजती सुगीचे

दीस सुगीचे, करावं
कसं काय एकटीनं
पुसूं कुणा ? मुका चाफा
पाहे नुसता हासून

उभा ताड सोबतीस
धीर यानं किती दिला
याच्या झापाची साऊली
माझ्या आसवाला शेला

तुझे हदग्याचे झाड
पाहे वाट मोटेखालें
शुभ्र वाकड्या चिमण्या
चंद्रकोरींनी फुलले

दीप कापत विचारी
केव्हा येशील तू घरी
तुरे सोन्याचे लेवून
धानराजा आला दारी

पायवाट ही तांबडी
येई वळणे घेऊन
कुजबुजे पावलांशी
'कधी येतो ग राजन ?'

विझव दीप साजणी

विझव दीप साजणी
मम सदनातिल तव नयनातिल ज्योति टाक फुंकुनी

तुझ्या उरींची चंदनलतिका झुरत मम अंतरी
स्पर्शाचा मम मोहर फुलतो तुझिया अंगावरी
या स्पर्शाचे, या लतिकेचे बहर टाक जाळुनी
विझव दीप साजणी

माझ्या मनिंचे निळे कबूतर घुमते तुझीया घरी
घरटे बांधी माझ्या नयनी तव चिमणी लाजरी
या चिमणीचे, या घरट्याचे पंख टाक उपटुनी
विझव दीप साजणी

माझ्या घरची वाट रेशमी तुझ्या घरी जोडिते
तुझ्या घराची खिडकी माझ्या दाराशी बोलते
या वाटेचे, या खिडकीचे पाश टाक कापुनी
विझव दीप साजणी

मम दु:खाची श्रावणसर तव अंगणात वरसते
उंबऱ्यात मम ऊन बसंती प्रिये, तुझे हासते
या दिवसाची, ऋतुचक्राची गति टाकी मोडुनी
विझव दीप साजणी

श्वासांचा मम अर्थ अधरि तव शब्दांतुनि जागतो
शब्द तुझा या मनीं अरूपा प्राणरूप अर्पितो
या प्राणाचे, या रूपाचे कणकण दे उधळुनी
विझव दीप साजणी

उभी मी सदनिं दीप लावुनी

उभी मी सदनिंदीप लावुनी
सख्या रे, सदनिं दीप लावुनी
उठुनि फुलातुनि ये जवसाच्या रात निळी रंगुनी

प्रभा नितळ सदनात पसरता
आंगणात, तिमिरात सांडता
ये मुसमुसुनी जीर्ण रात्रिच्या यौवन गात्रांतुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

निंब बहरला मोहर गळतो
सुवासात आपुल्या झुरे तो
बनुनि सुगंधित श्यामल क्षण हे भ्रमती शून्यांतुनी
उभी मी सदनि दीप लावुनी

दूर दूर या समयी कुठे तरि
आठवीत असशील तू घरी
जवसांच्या पुष्पात राहिले निशागीत विसरूनी
उभी मी सदनि दीप लावुनी

कातरवेळी रोज या क्षणी
दीप लाविता अपुल्या सदनीं
उजळायाचा दीप तुझ्या घरि आठवते मी मनीं
उभी मी सदनि दीप लावुनी

तिथे बसशि तू लिहीत गीते
रात्र जाहली नकळे तूंतें
तव मेजावर जाते नकळत दीप सख्या, उजळुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

जोगी

यातील तुझे घर वद कुठले ?
बुडता दिन हे नगर गवसले

फिरलो भ्रमलो बिदींबिदींतुनी
साद घातली सदनी सदनी
पडसादहि नच उठले फिरूनी
सुने सुने पथ नेत्रचि थिजले
यातील तुझे घर वद कुठले ?

धूसर काळी भयाण वसती
मुके गवाक्षी दीप उजळती
प्रतीक्षेत जणु हृदये जळती
बघ, पश्चिमेतुनी घन उठले
यातील तुझे घर वद कुठले ?

दिशा ढगे भारावुन गेल्या
गाव वादळी हलला फुटला
धरिला तरूही पथि उन्मळला
वीजपदर चाटून चालले
यातील तुझे घर वद कुठले ?

दिवा ही न घरी तुवा लाविला
खूण ठेविला नच फुलझेला
का शून्यी बोलविले मजला ?
परतता नगरदारही मिटले
यातील तुझे घर वद कुठले ?

आर्त डोळे शर्मिष्ठेचे

दूर आरवे कोंबडा
बांग तुरेदार त्याची
हिर्व्या पांडुर धुक्यात
धार लवते पट्टयाची

घंटारव आरतीचा
मंद मंद ये वाहत
घुमे नादाचा भोवरा
संथ निळ्या स्तब्धतेंत

ज्योत उषेची केशरी
जागे अंधारवडात
स्वप्न तारकांचे बिंबे
शुभ्र बिलोरी दवांत

देठी रूसे, दळी हासे
प्राजक्ताची न्यारी रीत
हास्य रूक्मिणीचे फुले
सत्यभामेच्या रोषांत

देवयानीच्या दु:खाने
खिन्न शुक्र नभी आला
क्रोधे शापुनिया जाई
ययातीच्या तारूण्याला

दग्ध जरेच्या छायांनी
जळे क्षितिजी ययाति
आर्त डोळे शर्मिष्ठेचे
फुलाफुलात लपती

गळे उन्हाचा धुळीत
साज पारिजातकांचा
भग्न मीलनरातीच्या
सडा माणिक–क्षणांचा

श्वास चांदण्याचे दोन

कळे निशिगंधाचे तू
माझ्या हातात ठेविले
श्वास चांदण्याचे धुंद
दोन साकार जाहले

अंध गंधर्व शापित
फिरे एक मी जगात
भूत–भविष्य दिसेना
सूर दावितात वाट

वायूसंगे जीवनाचा
सारा मोहर गळला
पायी वाजे सळसळा
जीर्ण पळांचा पाचोळा

मज मोहवाया मार्गी
थाट रूपसी, कशाला
का ग स्मिते आंथरिशी
आणितेस अश्रु डोळा

माझ्या स्वरांचा आधार
नको घेऊ हिरावून
मिटलेल्या कमळांत
नको कोंडू हे गुंजन

केवड्याच्या पानातून
चंद्रकिरण झरती
स्पर्शमात्रे तशी भासे
गौर तुझी अंगकांति

तुझी कातर कापरी
बोटे आतुर स्फुरती
मला हळूच शिवती
लाख जिभांनी बोलती

तुझ्या कंपितांगुलींचा
होता स्पर्श या हातास
वीज धावे तनूतून
जाग येई ग मौनास

उन्मादक बसंताची
पिऊनिया स्वरधारा
तुझ्या अरध्या बोलात
मारी चांदणे लहरा

रंगे 'फगवा' व्रजांत
गोफ सुटती विणती
मला जावयाचे दूर
हाक आवर बसंती

होती कुसुमे क्षणांची
गंध येई मातीतून
तुझ्या निशिगंधाची ही
सोबतीला आठवण

कळे निशिगंधाचे तू
माझ्या हातात ठेविले
श्वास चांदण्याचे खिन्न
दोन आर्द्र भारावले

कातरवेळेला

सांजतांना तू आलीस
किती धपापतो ऊर
जीवनाच्या आरतीचा
जळे नि:श्वासी कापूर

फुलतात गोकर्णीच्या
फुली सोनियाच्या ज्योती
का गं लपविशी त्यांना
मिटोनिया नेत्रपाती ?

पुसोनिया नेत्रदळे
लाल श्रांत सखे, झाली
धुंद धुकाळ का त्यात
सांज व्याकुळ दाटली ?

ओली हासरी नयने
खिन्न वाकलेली मान
आसवांनी भिजलेली
तू ग जोगियाची तान

भावगद्‌गद्‌ लाटांनी
तनु कापते मोडते
कोंडलेल्या हुंदक्यांनी
हिंदकळे, हादरते

काही उफाळे अंतरी
दिव्य मुक्त अनिर्बंध
तुझ्या उरीचे वादळ
तोडू बघे देहबंध

माझ्या भाळी आज एक
अश्रु तुझा ग सांडला
यमुनेच्या जळामाजी
ताजमहाल कापला

ताज शिळांचे शब्दांचे
आरस्पानी हे कशाला ?
कुणी जाउनिया सांगा
खुळ्या शहाजहानाला

जन्मोजन्मीच्या प्रीतीच्या
स्मृती अनंत अज्ञात
दवकणीं नभापरी
उभ्या तुझ्या आसवात

तुझ्या माझ्या डोळ्यातले
पाणी पिऊनि फुलेल
तुझ्या माझ्या अंतरीची
प्रीतीची पवनवेल

अंधारात तारकांचा
वेल मांडवाला गेला
तुझ्या –माझ्या नि:श्वासांच्या
त्यात मंजिऱ्या फुलल्या

तुझ्या माझ्या भावनांचे
घोस लागले नभाला
दूर –ओल्या नेत्री पाहू
रोज कातरवेळेला

चंदेरी रात्रीच्या निढळीं

मध्यरात्रिचे
अवचित पडले आज उशीवर
खिन्न मुके अरूवार चांदणे
श्वेत पद्मपाकळी कोवळी
आठवणीचे पान रूपेरी
वाहत आले
हारवलेल्या जीवनांतले
चांदण्यातल्या लहरबहरिवर.....

होते तेव्हा
असेच पडले
टिपुर चांदणे उशिवर अपुल्या,
हासलीस अन् धुंदपणे तू
चंद्रबिंब भेदून पाहते
तुझी दृष्टि पलिकडे कुठे तरि,
विरताना कापूर रात्रिचा
थरथरला रोमांच क्षणांवर
अन् हारवले तुझ्या स्मितामधि
उशीवरिल ते टिपुर चांदणे
उरला केवळ
आनंद मग
चंदेरी रात्रीच्या निढळी

तू प्रलयाचा यात्रिक

वीरा, तूं प्रलयाचा यात्रिक
तिमिरातून आलास अचानक
विद्युन्मय तव पदचिन्हांनी
रात्र जळत उजळते भयानक

वेदकाळच्या रम्य उषेची
प्रभा तुझ्या डोळ्यांत निथळते
व्यासाच्या नयनांतिल ज्योती
पुन्हा तुझ्या मानसी जागते

भार्गवरामाच्या परशूची
धार तुझ्या शब्दांत तळपते
युद्ध तुझे निर्वैर परंतु
जुलुमाच्या प्रतिकारापुरते

भृगुऋषिने जी लाथ मारिली
कौस्तुभमंडित प्रभुच्या वक्षी
ती क्रांती, तो प्रक्षोभच तूं
प्रकटलास पृथ्वीच्या कुक्षी

बहादुरशहाच्या थडग्यावरली
निराश पणती मिणमिणणारी
झाशीच्या स्वातंत्र्यलक्ष्मिच्या
आग चितेतिल नि:श्वसणारी

'तात्या'च्या डोळ्यांतिल आशा
झुंजुनि फासावर थिजलेली
तव लेखणीच्या ओल्या शाईत
ज्वालांचे घनवादळ बनली

घराघरांतून मने पेटवित
जाशी पेटत चकमकीपरी
तप्त मने अन निववित येशी
वत्सल नयानांतील अश्रुपरी

लक्ष लक्ष जागले दीनमणी
शब्दाशब्दांतुनि तव तिलका,
मानवतेच्या दास्यमोचना
अखंड चालशि प्रलययात्रिका

तिमिरांत उमटलीं तेजाची पाउलें

तिमिरात उमटली तेजाची पाउलें
जाहली जगाची सले क्षणांमधि फुले

प्रगटते उषा जशि अंध तमिस्त्रेतुनी
मुक्तात्मा स्फुरला दास्याच्या बंधनी
जागले बंड जे व्यथित जगाच्या मनी
ते रूप चिरंतन बापूचे आगळे
तिमिरांत उमटलीं तेजाची पाउलें

वज्राची दिधली धार तृणाला कुणी
वाकला काळही कुठे शस्त्र टाकुनी
प्राशिले विष कुणी जनमनिंचे हासुनी
कारूण्य चिरंतन बापूचे आगळे
तिमिरात उमटली तेजाची पाउलें

करि गुलामास जो मानव या भारती
प्रीतीस देह बळ क्रांतीचे भारती
करूणेत उद्याची करी भव्य निर्मिती
या महामानवचरणी उधळा फुले
तिमिरात उमटली तेजाची पाउलें

भेदोनि नभाला विश्वे शोधी पुढे
छेदोनि तुफाना स्वर हा मंजुळ चढे
भरि संजीवनिचे दग्ध जीवनी घडे
रविमुखिचे याने कनकपात्र सारिले
तिमिरांत उमटलीं तेजाची पाउलें

दीपकळित या

हास्य लाजरें तेव्हा फुलले
दीपकळित या फूल होउनी
ती मालवता चंद्र उगवले
स्पर्शकापऱ्या निळ्या क्षणांतुनि

परी बाहुवरी आज दिव्याच्या
ज्योत मनाची जळत झोपते
अन् दीपाच्या पदी सावलीत
चंद्रासह ती रात हरपते

माती

निद्रेच्या काठावरूनी
खुणविते स्वप्न मज एक
अन् दूर– पैल शब्दांच्या
मज गीत बाहते एक

परि रितें जागरण मनिंचे
जाळिते स्वप्न डोळ्यांत
कोसळे गीतयात्री हा
जड शब्दांच्या वाटेंत

टाकून फुलांचे हास्य
मग भवती नाचे माती
चमकते उन्हाचे सोने
काळाच्या दातावरती

टिचकी

वाजे हळु खिडकीवर वारा
पानांवर थेंबांचे पाउल
उतरे पाउस अंधारातून
मातीच्या मनि ओली चाहुल

काळ्या एकांतात रात्रिच्या
घड्याळ घुमते दूर कुठे तरी
नभा लपेटी मंद्र ध्वनि तो
चिंब रेशमी मउ वसनापरि

जडावल्या पापण्यात माझ्या
नीज नसे अन् जागहि नाही
सजल लोचनी फूल सुखाचे
फुलतही नाही, मिटतही नाही

बंदिवान मी अशा क्षणाचा
बंद कवाडे अंध तमाची
कोण निशेच्या या दारी पण
वाजवि टिचकी नक्षत्रांची!

मी आलें

तुज कळले का रे मी आल्यें
प्राजक्तापरि भाव लाजरे तुझ्या पंथात गळाले

घरास येता गमले तुझिया
फुले अश्रुंची होतील राया,
कोप शाप अपमान बांधुनी पदरी इथवर आल्यें
तुज कळले का रे मी आल्यें

झुरत्या श्यामल श्रावणसरिपरि
क्षितिजि फुंदत्या फूलउन्हापरि
आले, गेले, परि तव चाफा ना बोले, ना हाले
तुज कळले का रे मी आल्यें

मृगनाभीचे सगंध स्पंदन
तारांचे घेऊनि जागरण
दारि ठाकले उषा बनोनी, निशा करपुनी झाल्यें
तुज कळले का रे मी आल्यें

विस्मृत वचने अधरि कापती
धडधडत्या उरि गाणी पिचती
फुलांत सौरभ धूप होउनी पवनी जळत उफाळे
तुज कळले कारे मी आल्ये

फिरता पुलिनी उन्हात कवळ्या
मिळल्या अपुल्या क्षणिक सावल्या
मीलनस्मृति ती मनी साठवूनी
तुडवित जन्म निघाल्यें
तुज कळले कारे मी आल्ये

मेंदीच्या ताटव्याशी

मेंदीच्या त्या ताटव्याशी
क्षण थांबलो आपण
दरवळला अंधार
कस्तुरीच्या सुगंधानं

क्षणी एका त्या ही मनें
भूत–भविष्यी धावलीं
जशी कस्तुरिहरिणे
आत्मगंधे झळंबली

निळ्या सजल ढगांची
मध्यरात्र ही मखमली
काय जपून ठेवील
गूज आपुले सकाळी

दोन उरांचे स्पंदन
दहा बोटांचे कंपन
ज्यात गुंफिले आपण
तुटणार तोही क्षण

परी पुन्हा कधी येतां
मेंदीपाशी क्षणभर
कस्तुरीच्या सुवासानं
दरवळेल अंधार

पुष्कराज स्मितें

फूल मेंदीनं धरिलं
सखे, फिरूनी अंगणी
तम मोहरे सगंध
गूढ हास्याच्या तुऱ्यांनी

वाके दिशा घनभारे
भेटे धरा आकाशाला
उघडिला मृत्तिकेत
लाख नक्षत्रांनी डोळा

गंध मातीचा मादक
येई निर्लेप गगना
स्मरे तुज पाहिलेले
खिडकीत हासतांना

– आणि आज शोधितो मी
इथे खिन्न अंधारात
तुझी पुष्कराजस्मिते
मुद्रिकेतल्या खड्यांत

उघड उर्मिळे कवाड

उघड उर्मिळे, कवाड उजळतसे प्राची
सोनपावलें क्षितिजीं उमटती दिनाचीं

गंधवाह मंद मंद
शांतीचा जणु मरंद
गारवा पिऊनि येई धार अमृताची
उघड उर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

फुलते तरूलतांत
रांगोळ्या अंगणात
किणकिणते प्रेमळता त्यात कंकणांची
उघड उर्मिळे कवाड उजळतसे प्राची

गवत डुले केवी अता
प्राणमया जणु कविता
हिरवळते लसलसते तरूण जीवनाची
उघड उर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

लखलखते धगधगते
कनकचक्र नभि फिरते
रविबिंब न अनिरूद्धा गतिच युगायुगाची
उघड उर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

रात्रीचे तम पिऊन
ये पहाट ही हरिखुन
विष पचवुनि जयहसिते फुलती शंकराची
उघड उर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

धुक्यात रस्त्यावर

धुक्यांत रस्त्यावर थकलेले
दिवे जांभई देती पिवळी
आळसावुनी अंग मोडिती
निळ्या डोंगरी उंच नारळी

पहाट अजुनी फुटली नाही
आतुर आरूण गगनकिनारा
अपुऱ्या चुंबनि विकल स्फुरतो
अधर तुझा जणु सखे, लाजरा

मधुगंधाचे पाउल वाजे
वाऱ्याच्या मनि कळी हासतां
तळ्यात दचके संथ निळे जळ
चंदेरी मासळी उसळतां

अर्धोन्मीलीत गुलाब पिवळा
एकाकी घाबरा निज दळी
त्यात हसे सखि, गगनबावरी
तव मनिची पिवळी पाकोळी

शुक्राच्या चांदण्यात नाहुन
येशिल सखये, मला वाटले
माझ्या डोळ्यांतील जागरण
नक्षत्रांपरी जळत राहिले.

प्रभातरल गुदगुल्या

प्रभातरल गुदगुल्या मुलायम
हळुच नभाला केल्या कोणी
रात्र कुशीवर वळली हासुन
स्मित फुटले क्षितिजाच्या कोनी

नक्षत्रांच्या अबोल वेली
पूर्वेच्या दारावर सुकल्या
बोगनवेली धुंद शराबी
परंतु माझ्या दारी लवल्या

आग शोषुनी ज्वालांची ही
शीतल पानें कशी उमलली
रतिच्या अश्रुजलांनी भिजुनी
चितेंतुनी मदनाच्या फुलली

कुण्या जन्मिंची कुणास ठावे
एक वेदना अशीच सुंदर
माणिकपानांमधुनि सखे, या
स्पर्शुनि करिते मजला कातर

अशा वेळी जागे कोण ?

रात विरळ वस्त्राची
पीत पानकेवड्याची
शरदाच्या चांदण्याची
शहारते पानोपान
अशी वेळी जागे कोण ?

डोंगराच्या खांद्यावर
निळे तापले गगन
मान टेकिते श्रमून
उरे तारांचे स्पंदन
अशा वेळी जागे कोण ?

गिरी निळे स्तनाकार
उभे धुंद दिशातून
तटतटते यौवन
कळ निघे वाऱ्यातून
अशा वेळी जागे कोण ?

पाडा आलेल्या फळाची
निळी-गाभुळी ही रात
गाई आंब्याच्या कानात
साद जाईच्या रानानं
अशा वेळी जागे कोण ?

क्षितिजाशी चांदण्यात
शब्द विरे, हाले ओठ
पुरूरवा मध्यरात्री
काही उर्वशीलागून
अशा वेळी जागे कोण ?

कोजागरी

कोवळ्या चांदण्याची
दुधभरल्या धुक्याची
धुंद रात शरदाची

जोंधळ्याच्या शिवारात
घोट चांदण्याचे पीत
दाणा भरे कणसात

कापसाची सोनफुले
डोळा जांभळा मोडून
हासतात खुणावून

स्वप्न अधरगोडीचे
हासे उसाच्या तुऱ्यात
त्याच्या आंधळ्या डोळ्यात

मधुकलश घेऊन
येई रात कोजागरी
'कोण जागते ?' विचारी

जागे बीच कणसात
जागे भरारी पंखात
आणि काही तारकांत

-आणि वाहतें शतद्रुती मी

(वेदकालीन शतद्रुती म्हणजेच आजची सतलज नदी. ही तिची काही स्मृतिचित्रे. दुसऱ्या स्तबकांतील आठवणीला ऋग्वेदातील विश्वामित्र – नदी संवादाचा आधार आहे.)

।।१।।
शतद्रुती मी सलीलचरणा
फेनिल लहरी विधुकांतीची
सलज्ज कंपित मी स्मितधारा
मृडानिच्या चुंबिताधरीची!
आर्यांच्या भाग्याची सुंदर
रेखा विजयी मी जरतारी
प्रणयनर्तनी प्रमद्वरांची
नुपूर-झंकृति मी चंदेरी

इंद्राच्या वज्राचे पाणी
मी धरणीवर लहरत आले
मैनाकाचे पंख कापुनी
धुळीत पुष्पे फुलवित चाले

गोमाता जर धरा तिचा मग
वत्सल आंचळ मी अमृताचा
खिणखिणती उच्छृंखल हयिनी
स्फुरतो जेव्हा शंख रणाचा

शतद्रुती मी अशी वाहते
मंथर केव्हा, कधि वेगात
तटी थांबुनी काळ पुरातन
बिंब बघे निज, विमल जळात

।।२।।
शतद्रुती मी अशी निघाले
एका रात्री वर्षाकाली
भिजल्या पिवळ्या कमळदळांपरि
चांदरातिची क्षितिजे फुलली

तोच धडधडत रथ भरतांचे
माझ्या तटि येऊन थांबले
विश्वामित्र मुनि भरतर्षभ
रथांतुनी पुलिनात उतरले

हिमवंताचा पुराण अनुभव
हासे त्यांच्या शुभ्र जटातुनि
नयनी त्यांच्या ज्योत तपाची
स्त्रवे सोमरस वाणीमधुनी:

"तुम्हि इंद्राच्या परमेच्छेच्या
अखंड गतिमयजीवनधारा
स्नेहल वत्सल जलवंतींनो
हाक आमुची ही अवधारा

क्षणैक तुमचा वेग थांबवा
माउलिंच्या ममतेने बाई
तरूनि जाउ द्या भरत-संघ हा
इंद्र-कार्य संपादो विजयी."

"लवे पितृपदि कन्या प्रेमळ
माता वाके शिशु पाजाया
नमते तैशी मी नावेक
मुने, तुम्हाला वाट द्यावया."

भरत पोचले पैलपार अन्
विशाल भारत तये निर्मिला
दक्षिण सिंधूच्या मोत्यांतुनि
काश्मीरातील गुलाब हसला!

।।३।।
शतद्रुती मी गात चालले
अखंड गाणी जीवनगतिची
तरारती लहरींच्या नयनी
हिरवी स्वप्ने समृद्धीची

सम्राटांचे अभिषिंचनजल
पाणी मंगल संकल्पांचे
संध्यारंजित अर्घ्य अनर्पित
मनी उसळती आज–उद्याचे

उसळत फेसाळत किति शतके
माझ्या लाटांसंगे सरली
दास्याच्या शृंखला तोडिता
दुभंग भारतभूमी झाली!

मुक्तिदिनाची प्रथम उषा ती
क्षितिजी नि:श्वासे आहळली
प्रचंड द्वेषाच्या आघाते
हिमालयाची मान मोडली

गुढ्यातोरणे नभि धुरकटली
घरें नि नगरें जळती खाली
उभारिता ध्वज स्वातंत्र्याचा
मानवता उन्मळून पडली!

।।४।।
'सतलज' मी आजची अभागिनि
निराधार नयनींचे पाणी
दुभंगल्या देशाचे अंतर
रडते दोन्ही काठांवरुनी

शतद्रुती मी सीमेवरती
जखम वाहती उरिची झाले
एका रात्रित स्मितधारेची
एक करूण किंकाळी बनले!

दिवसा तापे पुलिनी वाळू
जळती छाती ती पुरूषांची
काळोखातिल जल कलकलते
दग्ध आसवे अभागिनींची

विश्वामित्रा वाट द्यावया
सहज वाकले मी त्या रात्री
आज परंतु माझी बाळे
तडफडती या तीरी, पात्री

जखमी पीडित मम संताने
त्या दिनि धावत आली तिरी
पैलतटी त्या नेउ न शकले
आग जाळिते हीच अंतरी

।।५।।
उन्हात पिवळ्या खिन्न रंगले
लोट धुळीचे उठती भवती
विश्वाची काचेची क्षितिजे
फुटुनी खळखळ जणु कोसळती

धुळीत थकले पाय वाजती
फुटति हुंदके, शरिरे कण्हती
डोळे–कवड्या रडती निर्जल
शब्द तृषित ओठीच करपती

'सुलेमानकी' पुलावरी मम
अजून रांगा दिसति चालती
मानवयात्रा करूण भयानक
पोखरलेल्या आत्म्यांची ती

दूर लांब ती रांग चालते
जणू मानवी वारूळ फुटले
की धुळीच्या प्रलयपुरातुनि
प्रेतांचे खच वाहत आले

असे चालले दिवसमास हे
घाशित ढकलित एकामेका
तुटली पाने उडती शोधित
अपुली देठे, अपुल्या शाखा!

माझी बाळे न ही माणसे
मनावीण सापळे पिढ्यांचे
स्मृतीवीण की मने तमोमय
पत्थरलेले नेत्र युगाचे

घरदारे, धन, भूमि सोडुनी
नात्याचे मृदु बंध तोडुनी
नीति रीति अभिमान तुडवुनी
क्रंदे जीवन रांगांमधुनी

प्राणासाठी भिउनि पळाले
पुत्रपत्निमातास सांडुनी
रांगा त्यांच्या इथे सरकती
कुले कुटुंबे पडली मोडुनि

उघडी पडली लाज सावडुनि
पतिव्रता रांगेत चालती
दगडादगडांमधुनि अहिल्या
लक्ष लक्ष उ:शाप मागती

दूध कुठे छातीतुनि फुटता
कुशीत मूल न पाजायला
बाळा पाजू बघे आइ जो
स्तनचि कापिले कळे तियेला

जवान कुणि 'रांगे'च्या काठी
व्यथित पडे तडफडे भुकेनी
धावत ये कुणि करूणा वेडी
जगवू त्या निज स्तन्य देउनी

वाकुनि शुष्क स्तन मुखि दे
लाज व्यथा हुंदके गिळोनी
उभे गगन तडकले सांधले
दिसे क्षण तिच्या गढुळ लोचनी

परंपरा, संस्कृती, नवयुगे
सर्वच भूकंपे कोसळली
निर्वासित हे त्यांची शकले
दिक्कालातुनि पहा पसरली

दिवसाच्या डोळ्यात हालले
स्वप्न अमानुष संहाराचे
हाहा:कारचि हे घोंघावति
ढासळलेल्या विश्वात्म्याचे

अशी अभागी यात्रा चाले
'सुलेमानकी' पुलावरूनी
दो तीरांवर दो राष्ट्रांचे
सैन्य उभे संगिनी घेउनी

–आणि वाहते शतद्रुती मी
सीमेवरती पुलाखालुनी
परकी झाली एकमेका
दोन्ही तीरे माझी असुनी!

केव्हा ?

ही किमया केव्हा घडली ?

नभी घनावळ खिन्न सावली
ग्रीष्मामधुनी झुरली जळली
तिच्या व्यथांना परि अमृताची, धार केधवा फुटली
ही किमया केव्हा घडली ?

शाखांमधुनी पानांमधुनी
देठादेठांतुनि पिळवटुनी
नवकोंभाच्या कळातुनी कधि सुमनसहस्त्रे हसली
ही किमया केव्हा घडली ?

अथांग मौनातून रात्रिंच्या
अलोम उरि निष्कंप नभाच्या
सांग साजणी, नक्षत्रांची चकमक केव्हा झडली
ही किमया केव्हा घडली ?

ती पवळ्याची वाट

लाल वाट रेशमी बाहुचा
कटिस गिरीच्या विळखा घालुन
वळते लाजत धुळित तांबड्या
अभ्रक हासे लाल खडीतुन

कर वाटेचा हळुच दाबितो
हिरव्या झाडीत हळवा डोंगर
पुलकित होते वाट, खड्यांची
फूलपाखरे बनती सुंदर

पायथ्यास आकाश पिंजले
तलाव फेनिल धुंद उसळतो
लाटेचा कोंबडा तटाला
निळसर नवखी बांग घालितो

तलम मलमली विरल शुभ्र ढग
रविबिंबावर भुरभुर उडती
हेमंताच्या उन्हात पिवळ्या
सोनकेवडे फुलती – खुपती!

उनसावलित अशा साजणे,
त्या एकांत प्रवाळपथावर
ते अपुले बेहोष भटकणे
स्मरते परतुनि घरि आल्यावर

तुझ्या नयनि अन् पुन्हा उमटते
ती पवळ्याची वाट शेंदरी
फूलपाखरांसवे हिंडती
मने आपली झुरींबावरीं

आणखी एक पान गळले

झुळुक आणखी एक – आणखी एक पान गळले

पानी फुलला सुमनि बहरला
माझ्या अंगणि जरि तरू वठला
शुष्क डहाळित अंग मोडिती कोंभ नवे इवले
–आणखी एक पान गळले

चंद्रकोर अंगांगी भरली
दिनदिन कणकण उजळुन खिरली
परि अवसेच्या प्रभात–ओटित सूर्यबिंब भरले
–आणखी एक पान गळले

चरण एक गीताचे सरले
स्वर अवसानी शांत जाहले
त्या मौनातुनि पुढिल चरण परि झंकारा सजले
–आणखी एक पान गळले

खुशाल गळता, गळा दळांनो
हसत सरा माझिया क्षणांनो
बघे क्षणांच्या पानझडित मी अक्षयपण उमले
–आणखी एक पान गळले

कुमारी

का अधीरता ? का सुखात सलते काही ?
उमलते झाकते हृदय साजणी बाई

सावळ्या सावलीत शीतलता निजसुरी
सखि, धुंद मदालस अंग अंग हे करी
अन् उन्हात काटा गोड उठे तनुवरी
मृदु यौवनांगिची ऊब शिवोनी जाई
उमलते झाकते हृदय साजणी बाई

उमलत्या फुलावर सदा कुणी हासते
त्या दळादळावर नवे स्वप्न उमलते
ढग–गूज मनीचे भिरभिरते धावते
यौवनास घाली शीळ अथांग निळाई
उमलते झाकते हृदय साजणी बाई

चांदण्यात धूसर गगन धरेला मिळे
कुणि गाढालिंगन मजहि गमे दे बळे
मग चांदणेही लज्जेत दिसे रंगले
कुस्करति चुंबनी गाल, झुळूक कशी ही ?
उमलते झाकते हृदय साजणी बाई

सख्या, कां गायिलेंस तें गान

सख्या, का गायिलेस ते गान ?
असह्य होतो विद्ध जिवा या तुझ्या स्वराचा ताण

सभेमधी तू गीत गाइले
सगळ्यांपरि ते मी ऐकियलें
वीज शरीरी शिरली कसली ? का गळले रे भान ?
सख्या, का गायिलेस ते गान ?

सभा डोलली तुझ्या गायनी
धरा उचलिशी तू शब्दांनी
मज एकाकिनि केले का परि– जळि कमळाचे पान
सख्या, का गायिलेस ते गान ?

शब्द मधुर तव वातावरणी
येती सांगत भावकहाणी
विसरे मीही तनुमन सारे, रोमांचाची आण
सख्या, का गायिलेस ते गान ?

पदर गळाला कसा आठवू
थरथरत्या उरि कसे साठवू ?
तृषित तटा स्पर्शून सागरा, परते तुझे उधाण
सख्या, का गायिलेस ते गान ?

संपंवुनी तू कविता जाशिल
किर्तिफुलांचे गेंद झेलशिल
हेहि सवें ने, उपसुनि देते मम हृदयातील बाण
सख्या, का गायिलेस ते गान ?

मज माझाहि न अधिकार

मज माझाहि न अधिकार
असुनी मी स्वामिनी भिकेस्तव बंद तुझे मज दार

जनवनिचे मी जाळ विझविते
स्वयंचंद्रिका अमृत वर्षते
परि जळते तव हृदय पाहणे शाप मला अनिवार
मज माझाहि न अधिकार

वागीश्वरि मी शब्दलाघवे
शून्यातही वदवीन पारवे
हाय शक्य नच मला छेडणे तुझ्या मनाची तार
मज माझाहि न अधिकार

हिरण्मयी मी प्रकाशधारा
विश्वाचा उजळीन उंबरा
सांजवात तव घरी कराया मी दुबळी लाचार
मज माझाहि न अधिकार

वासंतिक मी झुळुक चिरंतन
जळलेले हे फुलविन त्रिभुवन
हसविता नये तुझ्या मनीचे फूल खिन्न सुकुमार
मज माझाही न अधिकार

परक्याची मी झाले म्हणुनी
माझे परके मला जीवनी
नाकारावे सर्वस्वच मी हाच धर्म आचार
मज माझाहि न अधिकार

अर्घ्य

(कै. माधवराव पटवर्धन यांच्या स्मृतीस)

लेखणिची शाई अजुनि वाळली नाही
तो सारूनि कविता उठला, केली घाई
नव स्वप्नसाउली सरलि न नयनाहूनी
का नयन मुरडिले तोच जगापासूनी
नव 'छंदे' करि शारदा सुरू नटनाच
का असा अचानक ताल सोडिला तोच ?

यश मायबोलिचे तुवा दिगंती केले
'ही धन्य मराठी माय' सह्यगिरि बोले
तू जागविले बळ मातेच्या दुग्धीचे
नव उष:काल अन् सुप्त तरूण रूधिरीचे

हिम पडे जरेचे शिरी स्मित मुखी तरूण
तव मूर्ति उभी ती पुढे दिसतसे अजुन
तोलिलास वीरा, ध्वज रूधिरहि ओकून
रक्त तव पसरले अरूणोदय होऊन
हा त्रुटित ताल तव आपण काळ धरील
युगगान उद्याचे शारदाच गाईल

परि आज तुझ्याविण दीन मराठी वाणी
मधुचषक भंगला, खिन्न उभी मधुराणी.

भिजूनीहि पावसात

भिजूनीहि पावसांत
वीज विझे न गगनी
पालवते अशी ज्योत
आंत आंत माझ्या मनी

झोप मोडली तरीहि
स्वप्न माझे न मोडते
आत माझ्या डोळ्यापाशी
शीव त्याची न संपते

वेडी जीवनाची वाट
जरी संपली पुढती
तरी नवे नवे आज
पंथ पावला फुटती

तारापथाच्याही पुढे
वाटे चालत जाईन
डाग चंद्रबिंबावरी
माझ्या पावलांची खूण

परि आज मी एकाकी
मागे चालतो धुळीत
पाय थांबती थकून
वाट वळे फुत्कारत

पुढे लोंबे झाडावर
रिते मोहळ उदास
मध, मधमाशा गेल्या
हसे विषण्ण आकाश

'मधु क्षरंति सिंधवः'
कुणी दुरून बोलले
पाहिले मी वळोनिया
तुझे डोळे ओलावले

भिजूनीहि पावसात
वीज विझे न गगनी
पालविली अशी ज्योत
सांग कुणी माझ्या मनी

साजणी आज गातसे रात

साजणी, आज गातसे रात

चंद्रकराने मेघ रंगले
काजळकाठी अमृत भरले
तव सोनेरी नजरेमधली झळक फेसळे त्यात
साजणी, आज गातसे रात

सरल्या सरिचे साकळले जळ
पानांतुनि टपटपते अचपळ
उमटे स्पंदन तुझ्या उरीचे त्या अधीर सलिलांत
साजणी, आज गातसे रात

लपविलेस जे शब्दी हसुनी
प्रगटे ते लज्जेतुनि नयनीं
रूकार तो प्रीतिचा पसरला तृप्ति बनुनि गगनात
साजणी, आज गातसे रात

खोल व्याधशर घेउनि अंतरि
पुंज मृगाचा हसे अंबरी
असेच काही प्रकाशते अन् सलते या हृदयात
साजणी, आज गातसे रात

सौरभ सुमनामधूनिं निघाले
तंतुबंधातुनि स्वर सुटले
स्वप्ने अपुली निद्रेमधली विमुक्त अवकाशात
साजणी, आज गातसे रात

शिशिरगान

हलके हलके हसते गळते तरूचे पान न् पान
बाई, तरूचे पान न् पान
पानझडित या ऐकून घ्या ग शिशिरऋतूचं पान
बाई, शिशिरऋतूचं गान

हिवात राने पिवळी पडली
उषा धुक्यामधि ही काकडली
ओठच उलले संध्यालाली
नक्षत्रांची रात शहारे गारव्यांत हैराण
पानझडित या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

पर्णहीन तरूशाखा हलती
कृश विरही बाहूच पसरती
आतुर अलिंगना कापती
स्मरूनि विरहिणी महाल मिठिचा विकल पाखडी प्राण
पानझडित या एकुन घ्या गं शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

थंडगार किति पवन झोंबतो
उन्हाच्याहि उरि काटा उठतो
पानफुलांचा बहर झडपतो
गळेल वाटे चांदण्यात हे निळे नभाचे पान
पानझडित या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

फुले जळाली पाने गळली
फळांत जरि रसधार गोठली
सर्व सृष्टि जरि हिमे करपली
पिवळ्या पानांच्या मनि फुलते वसंतस्वप्न महान्
पानझडित या ऐकुन घ्या गं शिशिरऋतूचं गान
बाई शिशिरऋतूचं गान

चांदणे इथे अश्रु ढाळिते

चांदणे इथें अश्रु ढाळितें
सावल्यात कवडशात कोणी व्यथित मने हिंडते

जे नि:श्वासाने कधी न कोमेजले
आसवी कुणाच्या जे न कधी चिंबले
दु:खानले चुकुनी जे न कधी पेटले
तेच चांदणे सुरूतरूतुनि, गुलाबात स्फुंदते
चांदणे इथे अश्रु ढाळिते

जे ऊर्वशिच्या चिरतरूणस्मिति जन्मलें
विष पिउनि मिरेच्या भजनी ते गुंजलें
रतिनयनी मदनासवे जळुनि प्रकटले
तेच चांदणे पुष्करिणीतटि मुसमुसुनी क्रंदते
चांदणे इथे अश्रु ढाळितें

स्मरणात कुणाच्या कुणी शिल्प बांधिले
ती बेगम सुंदर, शहा न ते राहिले
सुखविलास त्यांचे फुलांपरी वाळले
शिलेत या परि अमर भावना त्यांची नि:श्वासते
चांदणे इथे अश्रु ढाळिते

पुंडरिक मिटले मूक उभा 'मुकबिरा'
हुंदका आर्त युगविरही हृदयातला
या आरस्पानी शिलातुनी उमटला
अमृते नाहुनि हृदय नभांचे गहिवरते, दाटते
चांदणे इथे अश्रु ढाळिते

निस्तब्ध शिल्प हे डोंगरास टेकले
विरहाच्या अंकी प्रेम स्थिर झोपले
की जीवनस्वप्नचि मृत्युमनी तरळले
स्मृतिविस्मृतिच्या सीमेवरती कविता ही बोलते
चांदणे इथे अश्रु ढाळिते

गीतांच्या पैलतिरी

निळ्या रात्रीच्या निष्पंद छायात
काटा सलतो
तुझेच साजणी विद्ध मनाने
मी गीत गातो

सूर गीतांचे माझ्या व्यथेतुनी
येती फुटोनी
दूर झळके क्षणाच्या शिखरी
सोन्याचे पाणी

पैलतिरी सखे, माझ्या गीतांच्या
तुझी वसती
नि:श्वासकोमल हे सूर तुला
शिवू पाहती

स्पर्श तुझा परि दैवी न माझ्या
होई काहली
उध्वस्त कुजी अंधाराचे पीस
फिरते भाळी

व्यर्थ शब्दांच्या ऐलतिरी तुज
साद घालितो
निळ्या रात्रीच्या निष्पंद छायांत
काटा सलतो

कवींद्रा ते गाणे दे

(एक रवींद्रस्मरण)

।।१।।
ते गाणे दे
कवींद्रा, ते गाणे दे
ज्याच्या लयीत ज्याच्या गतीत
गूढ घूसर धुक्यात फिरणाऱ्या
पृथ्वीच्या सोनेरी नारंगी कडा
असीमाला प्रदक्षिणा घालीत असतात–
ते गाणे दे
कवींद्रा, ते गाणे दे

।।२।।
अजूनही ही धरणी
त्या गाण्याची वाट पाहात आहे
वाऱ्यांतून, फुलांतून
आकाशाच्या रंगांतून, सागराच्या तरंगांतून
ते गाणे शोधीत चाललेल्यांना
आनंदाच्या मुशाफिरा,
तू गाणे दिलेस
अनुक्ताचा तो शब्द
त्यांना तुझ्या गीतात सापडला
तुझ्या ध्रुवपदात आढळला
शाश्वताचा तो सूर
शून्यापलीकडील नि:शून्याचा अनाहत नाद
त्या अनादाला नाद दे
कवींद्रा, ते गाणे दे

।।२।।
तुझे शब्द
चिरयौवना ऊर्वशीच्या
अंगकांतीत न्हाऊन आले
उपेक्षित ऊर्मिलेच्या डोळ्यांतील

दु:खाचे काजळ लेऊन आले
वंचित व्यथित देवयानीचा शाप
तुझ्या वाणीत उ:शाप झाला
संजीवनीचा मंत्र बनला
दुखऱ्या खुपऱ्या यौवनाला
विसर्जनाचे गाणे दे
वेदनेचे वेद दे
कवींद्रा ते गाणे दे

।।४।।
आजहि तेच वारे वाहात आहेत
तेच तारे जागत आहेत
तीच फुले तीच उन्हे
हासत आहेत, मावळत आहेत
नदी पुढेच धावत आहे
पाण्यावर नाव डोलत आहे
प्रश्नाकार!
नावाडी पण कुठे आहे?
ह्या नावेला वल्हवणं दे
नावाड्याला गीत दे
मुक्त नदीला काठ दे
काठालाही गाणे दे
कवींद्रा, ते गाणे दे

।।५।।
मानवतेच्या सागरतीरावर
तशीच यात्रा जमली आहे
वाळूत वेणु वाजत आहे
मरणाच्या दारी
सोन्याचा पिंपळ डोलत आहे
परंतु–
स्वरांना बहिरे
प्रकाशाला आंधळे बनून
आम्ही भटकत आहो
अणुगोलाच्या धुराने कोंदलेल्या क्षितिजांत
अश्वत्थाम्यासारखे!
शापित चिरजीवन घेऊन
मस्तकातील मणि हारवून
सूडाने हिंसेने कुष्ठी बनून
दिवसरात्रीच्या वाटेवर

।।६।।
संध्येच्या पलीकडे
तू अजूनही गात उभा आहेस
तुझ्या शब्दात
आनंदाचे उन्हे आहेत
फुलांचे रंग आहेत, गंध आहेत
सतेज ताजे
या शतकाच्या दवात भिजून
अश्रु पिऊन
कोंडलेल्या या दिशांना
उषेतल्या त्या आहाळलेल्या स्वप्नफुलांना
फिरून उन्हाचा स्पर्श दे
कवींद्रा, ते गाणे दे

इतुक्यांत कशी झोप तुझी झाली ?

शांत पाचुबंद डोंगरमाथा
रूपेरी दुपार हेमंत उन्हाची
रेशमी एकांत
सळसळणाऱ्या श्याम सावल्यांचा
बसलो आपण दोघे, तरूतळी
भर उन्हात अंधार पालवे पानांच्या जाळीत
रूळत हलत
एक कवडसा चंद्र होऊ पाहे तुझ्या मानेवर
काहीसे बोलून डोळ्यांत हसून
घेशी हाती हात–
नभवेडी वाट भोवळली पुढे
चढता वळता डोंगरावरती
स्तब्ध सागराचे नीजनिळे पाणी
दूर शुभ्र शीड
स्वप्नांचा ठिपका जळाचे लोचनी
मान लवे तुझी माझ्या खांद्यावर
निमीलित डोळे–
काय झोपलीस गुंफून हातात ऊनसावल्यांना ?
नाही मला झोप (येतच नाही)
तहान मात्र
मिटल्या डोळ्यांत निरंजनीच्या निगूड निजेची
अलिंगनस्पर्शे तुझ्या त्या क्षणाच्या
अर्धनारीनटेश्वर

झालो मी अनंत
क्षणाक्षणांवरी नाचत चाललो
डमरू माझ्या हाती
वाजतो, निर्मितो नि:शब्दात शब्द
तुझ्या मुखी स्मित चकित कोवळे
चांदणे अर्थाचे सृजनाच्या
उघडिलेस तोच हळू डोळे
दुपारचे गुंग ऊन प्यालेले
निथळत राहे
पैल उन्हावर त्र्यंबकाचे स्मित
उन्हाच्या मुशीत रसरसणारे नीजनिळे पाणी
स्तब्ध सागराचे
भर उन्हामधी वृक्षाच्या तळाशी
गर्भरेशमी अंधाराची पात हालत राहते
इतुक्यात कशी झोप तुझी झाली ?

मी वाट आहे

मी वाट आहे
गति नाही, लय नाही मला
पण वाटसरांनो,
तुमच्या पायांच्या धावत्या ढेचाळत्या चालीत
माझ्या प्रस्थानाचा
अनंताचा थाट आहे
मी वाट आहे.

।।२।।
पहा, माझ्या कुशीत
हा पाटीवाला झोपला आहे
उशालगत
टोपलीच सावली झाली आहे त्याची
आणि हा शेषशाई भगवान झोपला आहे उताणा
निद्रेशिवाय, अंधारी येऊन
थकण्याच्या – चमकत्या काजव्यांच्या – बेभान गुंगीत
त्याच्या स्वप्नात
झाडातला गाव – हिरवा दूर
कुडाची झोपडी
एक मोडकी खाट आहे .....
मी वाट आहे

।।३।।
उस्कटलेले चिरे माझ्या छातीचे
मध्येच जळती धगधगती शेकोटी
भोवती बसल्या आहेत
खडी फोडणाऱ्या चार काळ्या छाया,
काळ्या दगडाची पिकलेली घनभोर स्वप्ने
पण हे दगडही शहारतात
कारण तलम अंधारातून
दुरून येणारा
वाऱ्याच्या काळजालाही कापीत जाणारा
लवलवत्या ज्वानीचा
नखरेल घुंगरांचा
मस्त बेभान छुमछुमाट आहे
मी वाट आहे

।।४।।
पण ही कुजकी घाण कशाची ?
विसरलेच होते
पलीकडे कोपऱ्यात उकिरडा आहे
(काय म्हणालात– इथे कशाला ? वाटेवर आहे, टाळणार कसा ?)
तर काय म्हणत होते – उकिरडा आहे
पत्रावळीचा खच पडला आहे
काठाशी बसला आहे
एक वेडा– नंगा
डोक्याला गोणपाट गुंडाळून
ओढतो आहे एक उष्टी पत्रावळ
तोच पलीकडून
कुत्रे गुरगुरते तीच पत्रावळ ओढीत
वेडा खदखदून हसतो
फुटक्या मोरीतील सांडपाण्यासारखा
गॅसबत्तीच्या त्या वखवखत्या उजेडांत
उपाशी भणंगाच्या हास्याचा
भुकेल्या लुकड्या कुत्र्याचा
फसफसाट आहे, गुरगुराट आहे
मी वाट आहे.

।।५।।
आत संथ काळोख सरकत आहे मागे मागे
मीही पुढे चालले आहे
दोन्हीकडचे दिवे विझवून
तिथे पलीकडे–जिथे मी संपते–
निळ्याजांभळ्या तारांकित झुडुपापाशी
मध्ये केवढे हे अंतर ?
इतके, इतके की–
हे अंतरच स्वत:च्या दूरतेला भ्याले आहे
झाडे स्तब्ध उभी आहेत
आश्चर्याने हिरवी पिवळी पडून
आणि पुढे उंच
झुंजमुंजणाऱ्या गुलाबी अवकाशात
चैतन्याचा क्षण शोषून घेणाऱ्या
उमलणाऱ्या गर्भकळीसारखी
दवात न्हालेली
आतुर स्पंदित पहाट आहे
मी वाट आहे.....

सय

उडे झुळझुळ मळ्याच्या अंगानं
सोनेरी ताफ्त्याचे मुलायम उन
दूर पावरीचे सूर सारंगाचे
येती पसरीत सावल्यांची धून

स्वरांच्या काठाशी उभी तू बांधाशी
धरूनिया काडी चावीत दातात
पळसफुलांचे शिरी लाल राघू
तुला की स्वप्नांना शीळ घालतात

चाविल्या काडीची बांधिल्या माडीची
पिवळी पडली सय शिशिरात
गळल्या पानांची सोनियाची बिंबे
नि:शब्द उडती उन्हाच्या ऐन्यात

साठवाया सूर्य

"सूर्याच्या गतीत
किती मोडशील
किती फिरशील
सूर्यफुला ?"

"साठवाया सूर्य
माझिया उरात
फिरे उसवीत
पाकळ्या मी."

वाजली विजेची टाळी

आंध्र प्रदेश मराठी भाषिक संमेलन १२ फेब्रुवारी १९८९ मा. शरद पवार यांच्या हस्ते सत्कार, हैदराबाद

मराठवाडा साहित्य परिषदे तर्फे कविवर्य कांत यांचा सत्कार - १९८७

वाजली विजेची टाळी:

"वेलांटी" नंतर १९६५ साली हा कवितासंग्रह प्रकाशीत झाला. या संग्रहात आंतरीक प्रवृत्ती, संवेदनाविश्वाचा नवखा आवाका व रचनेचे सूचलेले नवे आंतरभान यामुळे प्रतिभेच्या वेगळ्या रूपाने कांत समोर येतात. संग्रहाचे नामकरण थोडे सूचक आहे. निसर्ग हा ब्रम्हांडाचा भाग तर आकाशात चमकणारी वीज ही निसर्गाचाच आविष्कार. वीजेचा आविष्कार प्रकाशपूर्ण असला तरी तो क्षणभरीचा प्रत्ययकारी व रोमांचक असतो. दूसरीकडे नादब्रम्हाचा व लयतत्वाचा कानोसा घेतला तर लयबद्ध वाजणारी टाळी संवादमयही होवू शकते. विजेच्या टाळीची लय धरतांना मनूष्य व निसर्ग यांच्यातील संवाद कांतांना अभिप्रेत होता असे वाटते. संग्रहातील दोन दीर्घकाव्यांव्यतिरिक्त इतर कवितांमधून कवीचा अन निसर्गाचा विविध रूपातला संवाद जुळून आलेला दिसतो. संग्रहाच्या शिर्षकाची पहिलीच कविता विजेच्या टाळीच्या नादलयीत आपल्या संवेदना अनुभवीत असतांना अवकाश व पृथ्वी यांच्यातील संवादामुळे माणसाच्या भयचकीत झालेल्या मनोवस्थेचे वर्णन करते तर स्वत:च्या प्राणांची सम सांभाळण्याची समजूतही काढते. निसर्गाच्या स्थिरचित्रातून साचलेल्या गुढ मौनावस्थेत कांतांना वेदना, संवेदनशून्यता व विमनस्कता दिसते. याच अवस्थेत मनाच्या कोषात मिलन व विरह यांची वीण घालतांना ... "टाळी" मधील कविता वेगवेगळ्या रूपबंधात परावर्तित होते. उदा. "निदान" ही कविता. फक्त इतक्याच भावना–संवेदनांमध्ये न गुंतता कांतांच्या कवितेतील भावभावनांची आसक्ती सामाजिक, राष्ट्रीय व जागतिक प्रश्नांनाही जाणीवपूर्वक उजागर करते. व्हिएटनाम येथील लोकांच्या मनात सतत ठसठसत असणारा अंगार वेदनेच्या वेगळ्या रूपात "घूमसते उन साळीच्या शेतात" मधून साम्राज्यसत्तेला आव्हान करते. सोबत स्वातंत्र्याचा जागरही जागवते. प्रणयभावनेची आसक्ती आणि संयमपूर्ण वास्तव व स्वप्नं यांच्या सीमारेषेला स्पर्श करणाऱ्या "गोरे पान उरी केळीचे फाटते, रक्ताची शीर्षरेघ का लागते, जळवंती धमार, उन्हाच्या मौनाच्या" या सारख्या कविता आपला उदासीचा सुर गुंजवतातच पण त्यातही वेदनेचे व कारूण्याचे कंगोरे दाखविणारे हिरवे गाणेही आहे. "गळलेली पीसे" या शिर्षकाच्या लहान लहान कणिकाही भावावस्थेचा एकेक किरण ढगाआडून चंद्रसूर्याचे क्षणभर दर्शन व्हावे तसा परिणाम देतात.

पुढे या संग्रहात दोन खंडकाव्ये आहेत अनुक्रमे "अंधार सूर्याने पाहिलेला" व "अग्निपथ". पहिलं खंडकाव्य महाभारतातील "ययाती" च्या आख्यानावर आधारीत आहे. या काव्याचा बंध पत्ररूप निवेदन स्वरूपात आहे. आपल्या पत्रातून पुरूला ययातीने आपल्या आयुष्यभरातल्या पापकर्माची व भोगाची कबूली दिली आहे. आजच्या दुभंगलेल्या उद्विग्न माणसाचे प्रतिक म्हणजे ययाती. सर्व भौतिक सूखे असूनही मनुष्य दु:खी आहे, अतृप्त आहे, अन् हेच सार्वकालीन सत्य आहे.

दूसरं "अग्निपथ" हे खंडकाव्य कांतांनी साधारण १९४१ साली लिहिलेले आहे. ७१२ ओळींचे हे काव्य भागवतातील चौथ्या स्कंधामधील चौदाव्या अध्यायातील वेनराजाच्या कथेवर आधारीत आहे. अंगराजपूत्र 'वेन' हा अनिर्बंध सत्तेच्या बळावर सत्तापिपासून होउन ज्ञानी महापुरूषांची अवहेलना करू लागला, प्रजेचा छळ करू लागला होता. वेन राजाच्या कथेतून कांतांनी लोकक्रांतीची ठीणगी पेटविली होती. योगायोगानं याच काळामध्ये कांतांनी निजाम राजवटीत मराठी व मराठी माणसाची होणारी निर्भत्सना व गळचेपी अनुभवली होती. कांतांनी आपल्या काव्य सर्जनाच्या काळात निजामांचे व ईंग्रजांचे असे दोन दोन पारतंत्र्य अनुभवले होते–

"करूं तिथे आघात पहिला करूं तिथे आघात
स्वर्गातूनी दुबळ्यावर घडतो जिथे वज्राघात–"

अशा कवितांमधून अन्यायाविरूद्ध उठाव करून मोठा मुक्तिसंग्राम उभा करावा, सामान्य जनतेतील प्रबल संघर्षोत्सूक शक्ति उभी करावी असा कांतांचा भावानुभव प्रतित होतो. निजामांच्या राजवटीत कांत औरंगाबाद येथे मराठी भाषेच्या जागरणासाठी एक "खूफिया" रेडियो स्टेशन चालवीत होते. त्या परिस्थितीत कांतांचा हा एक स्वातंत्र्यलढाच होता.

वाजली विजेची टाळी

ती. अम्मास
आणि
रत्नांच्या टिप्परी घेऊन येणाऱ्या तिच्या अंगाईगीतातील
रत्नकांत चिमणीस

१९६२ साली, माझ्या 'वेलांटी' हा काव्यसंग्रह, 'रूद्रवीणे' नंतर जवळजवळ पंधरा वर्षानंतर, प्रकाशित झाला. पण त्यानंतर अवघ्या अडीच–तीन वर्षांच्या आतच हा तिसरा संग्रह प्रसिद्ध होत आहे. रसिक वाचकांचे प्रेम, मित्रांचा स्नेह आणि श्री. पु. भागवंताचा आपलेपणाचा दिलदार आग्रह, यांच्यामुळेच हा संग्रह आज आपल्यासमोर येण्याचा योग आला आहे.

आनंदमेघ आभाळीं
वाजली विजेची टाळी

टाळी दाहकही असू शकते याची मला जाणीव आहे, सम चुकू नये ही तळमळ आहे, आणि चुकलीच तर तुम्ही सांभाळून घ्याल हा विश्वास आहेच.

वाजली विजेची टाळी

वाजली विजेची टाळी
आनंदमेघ आभाळीं
अवकाळीं घन खळखळला
धरणीच्या वाफा विझल्या
झिमझीम तीच रक्तांत
मातिचा गंध मोदांत
नभिं इंद्र तोरणें माळी
धडकींतुन टिपरी झडली
सम प्राणांची सांभाळी!
वाजली विजेची टाळी

वास

होई राईंत काजळ
मावळत्या चांदण्याचें
आले निद्रिस्त फांद्यांना
कळे शुभ्र बगळ्यांचे

मूक कौलारू छप्पर
वर वाढलें गवत
वास त्यांना विचाराचा
कधी येतो पावसांत

अशी लाट असा काठ

सांजवेळीं मी समुद्र
चार डोळ्यांनी पाहिला
अंध लाटांस काळाच्या
फुटे पाण्यामधी डोळा

जळीं झळके साडीचा
'ॲश कलर' पदर
तुझ्या उदभ्रांत स्मिताची
त्यास जरीची किनार

राखी झालें निळें पाणी
सांज उतरे सागरीं
खळें रूपेरी प्रभेचें
लाट क्षितिजाशीं करी

येते सागराची भाषा
काय बघशी जळांत
काय उकलती पीळ
जन्मोजन्मींचे लाटांत

शिलाखंडीं मिटे लाट
माझ्या हातीं तुझा हात
ज्यांत आभाळ माईना
अशी लाट असा काठ

निदान

एक क्षण असा येतो
– निदान यावा –
फांदीच्या पलीकडे चंद्र नसतो
नसतें झाड नदीपल्याड
पण तुझ्यामाझ्या दुरावत्या हास्याच्या काठांनी
अनेक चंद्र मावळत असतात
उगवत असतात
सुकणाऱ्या चांदकेवड्याच्या पिवळ्याधमक रात्रींत

तुझ्या खांद्याच्या चंद्रगौर गोलाईंचा
आधार घेऊन
–आठवतें तुला? –
उभा राहिला होता
आपल्या मीलनाचा तो पहिला क्षण
आकाशाला टेकून
जेव्हा मी
पहिल्यांदा टेकले होते हात तुझ्या खांद्यावर
(आणि तुझे उरोज थरथरले
झोपलेल्या आंधळ्या कबूतराप्रमाणे
धपापणाऱ्या छातीच्या श्वासांतील वळचणींत.)
पण जाऊ दे तें
एवढेंच सांग मला
इतक्या वर्षानंतर, अजूनही
गोरट्या कापूरगात्रांचा
पेटत्या रोमांचांचा
मोरपंखी आधार हवा का
आपल्या प्रीतीला
अर्थाला डसणाऱ्या अनुप्रासासारखा?

होय, तेव्हा– ?
तेव्हा होते अनुप्रास अधरांचे
ध्वनि लावण्य–रंगाचे
बाहूंची गुंफा
बोटांची वेणी: अमृताची डहाळी
आकाश, तुझ्या गोऱ्या खुज्या खांद्यावर उगवणारें
साऱ्याचा अर्थ फक्त तुझ्या डोळ्याएवढाच खोल

सारें सारें आठवतें ग
तरीहि वाटतें –
निरंजनांत – केव्हातरी–
आपण दोघें उरतों:
अनंग – दूर–
दिशांच्या दूरतेत भरणाऱ्या चांदण्याइतके जवळ
एखादा क्षण असा येतो
–निदान यावा

धुमसतें ऊन साळीच्या शेतांत

धुमसतें ऊन साळीच्या शेतांत
दूर पोखरितो आकाशाला भुंगा उंच पॅगोडाच्या घंटांच्या नादांत
सावरीचा मऊ कापूस धूसर – धुकें उतरतें खाली भुरभूर
झोपलेला रस्ता थोडा शहारून मोडुनिया अंग वळे कुशीवर
रात्रीच्या काठाशी निश्चल स्वप्नाचे उसासते गाव हिरवेहिरवेगार
ओला ओला रंग – भीती वाटे मनीं – नाही ना शिवताक्षणीं पुसणार .....
हातापायाविण केशरिया शेला जातो तरंगत निस्तब्ध निर्घोर
डोले लाटांवर नाव प्रश्नाकार, फेसाळ तरंग, प्रकाशाचें भिंग
फुटे खळकन् हिरव्या पाण्यांत
धुमसतें ऊन साळींच्या शेतांत .....

हारवून भान रबराचें रान झाकीत जखमा झरतें झुरतें
सुस्त हॉटेलाच्या काचेरी डोळ्यांत रात्रीची गुलाबी मस्ती तवंगते
रतिक्लांत गात्राची तृप्तीच्या डोलाची लवथव श्रोणींची हळू हारवते
'बुद्धं सरणं संघं सरणम्–' गप्प गोपुरांना प्रार्थना फुटते
सणाणतां गोळ्या प्रार्थनागीतांच्या मंद घोषांचा तो पाखरांचा थवा
उडे दचकुनी सैर आभाळांत
धुमसतें ऊन साळीच्या शेतांत.

चव्हाठ्यावरी ये केशरी कफनी 'बुद्धं सरणम्' गर्जत गर्जत
भरकन तेलाची बरसते धार जळते उन्हांत केशराची ज्योत
मदांध सत्ताही आपुल्याच गोळ्या पोटांशी धरून कोसळे राखेंत
काळाच्या दात्यांत रूते धर्मचक्र नभा हौतात्म्याचा अर्थ विचारीत
बुद्धाच्या दगडी वरद मूर्तीची फुटकी भिवई आशंकेने हाले
कशास मानवी अट्टाहास सारा बोधीवृक्षापोटी प्रश्न हा जळे
प्रज्ञा–करूणेचीं चकित हरिणें मृगवनांतील प्रवचनांतून
बावच्या दिशांत पळून जातात
धुमसतें ऊन साळीच्या शेतांत.

गाठोडें

(ऑर्थर सीटला अर्पण)
तुटलेला कडा काळ्या पाषाणाचा
अथांग दरीची पाताळ –जांभई
अपूट प्रकाश झिरपे पहाटे
दुधाळ ऊन अन् कुठे उतूं जाईं

हास्याचे तुकडे शुभ्र अभ्रखंड
येती तरंगत निळ्या धुक्यांतून
उन्हाने पेटती –हळूच तयांना
अवखळ मन गेलें का शिवून ?

सांजतां धुक्याच्या तलम लहरी
होऊन अजस्त्र लाटा उसळती
झाकुनिया रानें लपेटुनी दिशा
फुत्कारत लोळ धूसर धावती

लळ्लळ धुक्याच्या प्रलयाच्या जिभा
झाडाडोंगरांचा करूं येती घास
अंधारल्या दिशा घोंघावती वारे
पुसला सूर्याचा, आकाशाचा स्पर्श

सृष्टीचा पसारा आवरण्याची ही
कुण्या खेळियाला अशी त्वरा झाली ?
बांधून धुक्यांत पृथ्वीचें गाठोडें
कुठे त्याची स्वारी घाईत निघाली ?

एक अर्थ

कुणीसं म्हणालं, संपलं– मेली ती!
खरंच? अरेरे! कोण हो होती ती?
कुणास ठाऊक?
कुणाची बहीण, कुणाची प्रेयसी
कुणाची मुलगी, कुणाची आयशी
एखादें फूल कबरीवर मागे
सारवल्या जागीं एक दिवा जागे
नि:श्वास सुटतो एक आसू गळतो
मुर्दाड मनानं माणूस चालतो
डांबराची वाट–
कासवाची पाठ!
पाण्यांतली राख विर्घळली नाही
तोच यांना झाली विसरायची घाईं
–ईश्वर पुन्हा एक माणूस घडवतो
विश्वाचा नवा अर्थ लावीत बसतो.

गर्भ मी स्वप्नांचा

शिरींचें आभाळ
शिवतच नाही
पायाखाली भुईं निसटते

बिनचेहऱ्याची
गरदी घामट
आंधळ्या वाटांत लोटी मज

नियतीच्या काठीं
गर्भ मी स्वप्नांचा
कुमारी इच्छेचा सांडलेला

फूलपाखरू –टाचलेलें!

पाठीसारखा खारीच्या
काळा–पांढरा रस्ता चपळ
ऐट उन्हाची नायलॉनाची
कुठे लाचार हसे चिखल

उंच इमले दोन्हीकडून
दगडी छाया घसरत येईं
हसरा हिर्वा ओल्या पानांचा
कवळा स्पर्श तिच्यांत नाही

माणूस बोले, "आम्ही चालतों"
नेतो रस्ताच त्याला ओढून
"आम्हीच पाय आम्हीच गति"
फाटका जोडा म्हणे हसून

गाठ निसटे चेंगरे कोणी
रक्त पाण्याने धुवून जातें
आकाश तोलूं देवांसहित
अशा तोऱ्यांत क्रेन डोलते

धावती लोक कर्कश भोंगे
त्याला धुमारा फुटे धुराचा
मातीच्या ओठीं सिमेंट गच्च
चिणला हिरवा क्षण गवताचा

फुलपंखी वर निश्चल नभ
फुलपाखरू की टाचलेलें:
ओढ फुलाची तृषा मधाची
झेप प्राणाची हारवलेलें

शब्दांचा चिकटल्याप्रमाणे

नसतेपणाची निळाईं पिऊन
आकाश मस्त असतें
असतेपणाचा आव आणीत,
भणंग वारा
पानांच्या कातरसावलींत
कातरीत बसतो चुकलेले स्पंद
श्वासांमधल्या धुकाळ प्रबंधाचे,
ढगाळ तळें
प्रतिबिंबांत ओकूं पाहतें
काठावरचा न पचलेला अनुभव काळानिळा.

पण पलीकडे –
उन्हाच्या चतकोर तुकड्यांत
पाणवलयांच्या सोनसाखळ्यांत
त्यालाही अर्थ येतो:
नहात्या गोल वक्षाचा
मुसमुसणाऱ्या चाफ्यांचा
सूर्यावरील डागांचा

ओल्या वस्त्रांत हारवणारा
आपल्या नग्नतेसह: शब्दांना चिकटल्याप्रमाणे.

खोपा

जर्द शेवंती फुलली
तुझी आठवण गोरी वाऱ्यांतून मुसावली
कसे सायलीचे कळे
तुझें मौन मोडायाचें सांजेसाठीच धांबलें
चंद्र निंबोणीखालती
आली तृप्त नजरेची साय चांदण्यावरती
तुझ्या बासरीचा स्वर
येतो रात्रीच्या क्षणाला पिक्या द्राक्षांचा बहर
आलें तोंडावर ऊन
पडे निद्रेच्या काठाशीं खोपा स्वप्नाचा मोडून

मावळतां शब्द

मावळतां शब्द वाघुळें उडालीं
पिसें काळोखाचीं अर्थास फुटलीं
चंद्राच्या फळाला किड झळंबली
तुटलें जांभूळ झाडास लागलें
तेव्हाच तुटलें
लावण्याचें फळ सत्याच्या देठीचें
सल द्रौपदीचे उरांत लपले
कुंकू पांघरून,
अन् ओढ्यावरी
यमास सत्याचें वाण मागणारें
सावित्रीचें मन
पाऊसधारांत
वडाच्या पानांत
भिजतें, भिजतें.

गोरें पान उरीं केळीचें फाटतें

जळाच्या नाजुक सोनसाखळ्यांत
रंगीत रेशमी धुक्याच्या शेल्यांत
स्वरांच्या बाहूंत
मादक स्पर्शांच्या रोमांचपाशांत
दुखरें अपुऱ्या कहाणीसारखें
मर्मांत सलतें
गोरें पान उरीं केळीचें फाटतें.

तांबडेपिवळे गुलाब फुलले
निरशा उन्हाच्या दुधांत नाहले
आक्रोशतें कोण ?
पुष्पदळांमागे काय अजराजा ?
इंदुमतींचे का फुलांचें मरण
पाकळ्यांच्या काठीं
उन्हांत फिरतें ?
गोरें पान उरीं केळीचें फाटतें

कीर्तीचें निशाण नक्षत्रां भिडलें
सोन्याचें कणीस मोत्यांनी पिकलें
स्वातंत्र्यदीपाने युगान्त उजळे
परी पलीकडे ज्योतींच्या रेषांच्या
स्वरांच्या पल्याड विजयगीतांच्या
अज्ञात बळीच्या विझत्या चितेची
जळत्या रक्ताची
उग्रगंध धग
नव्या तोरणाला जगाच्या शिवते
गोरें पान उरीं केळीचें फाटतें

रक्ताची शीर्षरेघ कां लागते

रक्ताची शीर्षरेघ कां लागते
अजूनही काळ्या अक्षरांना ?
मिसिसिपीच्या पाणरेघेच्या भांगेत हा गुलाल कसा उधळला ?
पुळणींतील मगरीच्या हिंस्त्र हिरव्या डोळ्यांत
हे कसले प्रतिबिंबाचे भोवरे गरगरत आहेत ?
व्हिस्की पिऊन ओकत आहेत
शंभर इमल्यांचे काचबंद झिंगले महाल
झेपावत आहे धगधगता अग्निबाण
आकाश झळाळीत, नक्षत्रांच्या गर्दीतून:
कधी रमणीच्या स्मितासारखा
तर कधी मरणाच्या मेण्यासारखा
काळें नग्न प्रेत, झाडाला लोंबणारें
वटारलेल्या डोळ्यांत जळालेलें स्वप्न गौरांगीचें
एकांतांत फुटणारा रेशमी झग्यांतला गोरा हुंदका:
चंद्रकोरीसारखा
फुलांच्या डोळ्यांची हसणारी वाट
पांढरेशुभ्र विद्यामंदिर

पाद्रयांच्या परीटघडीच्या झग्यासारखें
बंद फाटक संगिनींच्या गजांनी
समोरून आंत डोकावणारीं दोन काळींसावळीं मुलें
बाजूस उभे खिळ्याचे बूट, पोलादी टोप्या
चकचकते बिल्ले, शिसवी दंडुके उगारलेले
भिरभिरत बघती भोळे डोळे
(काळ्या बदामाचे) चाचपीत दप्तरें
परंतु त्यांना कळत नाही
'ए बी सी' चीं अक्षरें सॉक्रेटीसाने प्यालेल्या विषाने काळवंडलीं आहेत
बीजगणिताच्या आंकड्यांतून
गॅलिलिओला जाळणाऱ्या चितेचा जाळ भडकला आहे.....
कुंडींतील फुलांतून गोळ्या पेरल्या आहेत.
पाटीदप्तरें (त्यांना कळलें नाही)
त्यांच्या काळ्या देहांसह कुरळ्या केसांसह उधळलीं आहेत
रक्त पसरलें शाळेच्या वाटेवर
अर्भकासारखें निष्पाप,
आणि क्षितिजावर
तळपत्या उन्हांत
बर्फाच्या भुरभुरल्या मोतीचुरांत
फिरतो आहे, लोंबतो आहे एक तुटका अंगठा:
एकलव्याचा!
ज्ञानलालसेचा कापलेला लसलसता अंकुर
अपमानित वंचित आकांक्षेचा कोवळा कोंभ
खंडित बुद्धीची शोककथा
रक्ताने ठिबकणारा
क्षितिजावर लोंबणारा
एकलव्याचा अंगठा!
त्या पांढऱ्या शुभ्र विद्यामंदिरासह
मिसिसिपीतील मगरीच्या हिरव्या डोळ्यांत बिंबला आहे
अन् विचारून राहिला आहे:
अजून काळ्या अक्षरांना रक्ताची शीर्षरेघ कां लागते?

कैलास

शहारतां सांज गुलाबी ढगांत थंडीच्या दिसाची
स्तब्ध रंगखुळी गोरीमोरी खाडी बिलोर ऐन्याची
'कॉजवे' भाबडा शेवाळी हासत जरा जळीं जाई
आरशासमोर थबकल्यागत उगा उभा राही
लपवी नवोढा नवीन उभारी ओढून पदर
उठे-न-उठेशी घडी रेशमाची निळ्या जळावर

टेके सूर्यबिंब: सोन्याची ताटली पाणरेघेवर
पोलादी मिन्याचें शिल्पित छायेचें झाड सूर्यांवर
पाहतां ही नक्षी डोळे झाले साक्षी कशाला–कशाला ?
चाविलेली शेंग दिलीस – एवढें आठवे मजला
तेव्हा त्या शेंगेने कोरिला कैलास श्वासनि:श्वासांत
मीठ आसवाचे रंग अबोलीचे सांजती ढगांत.

कांदा

अंकुरला
एक कांदा विसरलेला
प्लॅस्टिकच्या परडींत
लवलवती पात
इवली धारदार:
हिरवागार उंच सूर विलासखानी तोडीचा
दुखत्या हृदयगोडीचा,
असा टाका उसवणारा
समेवरती डोलवणारा कफन तानसेनाचें!
लसलसता कोंभ
प्लॅस्टिकच्या परडींत–
मातीची कूस त्याला लाभली नाही
आभाळाने सावली धरली नाही
पाण्याची ओल शिवली नाही
तरी तरारून
"पण असाच फुटतो
अनंताचा कोंभ
मरणाच्या उलट्या पिंपळाला"
कुणी बोलला
अकलेचा कांदा विसरलेला!
तेव्हापासून
वाळली पात
सापाची कात
हालते उघड्या वारूळाच्या तोंडीं

संबोधित

तारांवरून धावती
थेंब सरीचे नि:शब्द
त्यांना जीवनाची धारा
कधी सापडली नाही

घुमे पारवा कोनांत
उडे काळोखाचा रवा
त्याच्या शब्दीं 'संबोधित'
कधी गवसलें नाही

हिरवें गाणें

हिरवेंहिरवें रान माझें हिरवेंहिरवें गाणें
हलतीं–झुलतीं हिरवीं पानें शब्द कापरे रूमझुमणारे
लालकेशरी अर्थ फुलांचे सगंध हासत हारवणारे
निळा स्पर्श वाऱ्यांत नभाचा गवतांतुन संतूर–तराणे
हिरवेंहिरवें माझें गाणें

फुलपंखी दे उन्हांत ठिपके पिसांत डोळे उघडी मोर
झाडावरती गातो पक्षी चोचिंत त्याच्या पिकतो सूर
मधुकण झुरते त्या गाण्यांतिल धरूनि ठेविती दवांत रानें
हिरवेंहिरवें माझें गाणें

पिवळीं पानें धुरकट रानें मोहर सगळा गेला जळुनी
पिसें गळालीं चोचहि झडली गेला पक्षी गाणें ठेवुनि
त्या गाण्यांतिल मीठ अश्रुचें पानझडीमधि जपती पानें
हिरव्या जखमा हिरवीं रानें
हिरवेंहिरवें माझें गाणें

जखम निळी

उडे उन्हाचा पदर जरीचा
जलधारांतुनि कसा
जागृतींतुनी स्वप्नामधलें
हास्य तुझें राजसा

दबकत येती तव आठवणी
व्याकुळल्या अंतरीं
खिन्न तमीं जणु रात्रीं वाजे
पाउस पानांवरी

–आणि पहाटे दचकुनि उठतां
साखरझोंपेतुनी
रित्या घनाचें विकल सुनेपण
जखम निळी करि मनीं

किती वाजले ?

समुद्राच्या काठांनी रात्र उतरते
झाडांत टॉवर डोळे उघडतें
फिरवीत काटे टुकटुक बघतें,
जवळून कुठे
आठ पस्तीसची लोकल धावते
उडतें वाघूळ तिला विचारतें
किती वाजले ?–
आणखी उंच झाडावरती
फिरून स्वत:ला टांगून घेतें,

'किती वाजले ?'
सावरीत पदर ती हळूच पुसते
समुद्राची लाट पायाशी फुटते
तो तिच्या बोटांत बोटें गुंफतो
दोघांच्या डोळ्यांत समुद्र चढतो
कुलफीसारखी विरघळत गोड
मुकाट वाळू खुसखुस करते

'किती वाजले ?'
टिकटिक घड्याळ काय वेळ सांगेल ?
झुऱ्याबावऱ्या हृदयाच्या धडकींत
समुद्रपोहत्या काळजाच्या ठोक्यांत
नावहाकारत्या वल्ह्याच्या ठेक्यांत
शिंपल्याचे क्षण
अपारांत गाजत्या समुद्रतेचे क्षण
चंद्रांत कोरतें
वाळूंत लोळणारें कलंदर मन.....

उगीच वेडे फिरवीत काटे टॉवर विचारतें
किती वाजले ?

बुरशी

पावसाळ्याची एक दुपार
वारा गार
पाण्याच्या मनांत ढगांचा भार:
ताडमाड मान डोलते
काचबंद लाट फुटते

फसवेंफसवें ऊन हसतें
सूर्याचें फळ पिकून गळतें–समुद्रांत पडतें!
वाऱ्यांत पृथ्वी भरकटत जाते
कुठे ? कशाला ?
विचार घुम्या ध्रुवताऱ्याला!

गरगर गरगर दिवस फिरतात
रात्री फिरतात
या दोहोंच्या फिरत्या पाळूंत तारे राहतात
मग त्यांचें पीठ
कां नाही होत ?
अनंततेची ती जाहिरात:
'निऑन' लाइटच्या जळत्या अक्षरांत

दिवसा आभाळ खोटें बोलतें
अंधारात रात खरें पुटपुटते
तेव्हा कोणीच जागें नसतें
दिवस उगवतो
माणूस उठतो
कांहीतरी स्वप्न पाहिलें म्हणतो
आंबल्या अंगाने जांभई देतो
पृथ्वीसारखी गोल गोल!

आंबलेलें मन मात्र म्हणत राहतें
ढगाळलेल्या आभाळाला
भिजून भिजून बुरशी आली
पावसाळ्याच्या या दिवसाला

जळवंती धमार

लोहचुंबकाची पाण्याला ओढ!
डळमळे नाव सुंसाट धारेंत
वेगांत वल्हीं मारिशी नावाड्या,
दोन्ही बाहूंत वळूनिया बळ
साऱ्या प्राणाचें,
मोडते न लाट, तुटतें न पाणी
बलदंड बाहू पिळती वळती झुंजतां लाटांशी,
निथळे घामाने तुझें ओलें अंग,
आदळती मोती हिरव्या फेसाळ शिळंधार लाटा–
चिंबल्या जिवांचा घाबरा गलबला
भीतीची किंकाळी कोंडलीसी गुहेंत: हिरवी हिरवी!

हालती फक्त तुझे दोन हात
वल्हीं वाजतात
एका कोपऱ्यांत गातों मी उदास डोलत्या नावेंत ....

कां रे हासतोस नाविका, असा ?
कापऱ्या कंठांत उमटला सूर:
चाफ्याच्या वाळल्या डहाळ्यांतुनी
सुगंधी सोनेरी फुलांची लकेर
हासतोस कां रे ?
अरे हेच सूर (कुणास माहीत ?) रेशमी दोऱ्यांनी
बांधीत असतील
ओढीत असतील
तुझ्या या नावेला
दूरच्या अदृश्य अक्षय काठाशी
पुरापलीकडे –पैल वादळाच्या,
मुक्त कलंदर आळशी माझ्या गळ्यांत उगीच
सुरावतें गाणें, घुमे घुमघुम
वल्ह्याचा तुझा पाण्यांत मृदंग:
जळवंती धमार !

मत्स्यावतार

कोरडा अंधार
चौपाटीवर उडतो भुरभूर
मऊ काळ्या वाळूसारखा कोरडा अंधार
कोरडा अंधार !
पुळणीवरती अफाट शहर
देवमाशाचें विद्ध कलेवर
डोकें त्याचें 'मलबार हिल' वर

घारापुरीच्या त्रिमुर्तीवर
शेपूट उडतें–
असें अजस्त्र विद्ध कलेवर
पाण्यावेगळें तडफड करतें
दिव्याचे पट्टे पाऱ्याचा प्रकाश
नवलाएवढे
पोटावरचे चांदीचे खवले !
चमकत राहतात
ठणकत राहतात–
धपापणाऱ्या त्या खवल्यांत

उजळणाऱ्या खिडक्याखिडक्यांत
हजार हसतात हजार रडतात:
वेड्यासारखी
काळोख फिस्कारीत!
सोन्याची धार दारूच्या प्याल्यांत
खुर्चीचे पाय सत्तेच्या कैफांत
नाचतात 'जाझ' हॉटेलच्या आरशांत
घरें गिरक्या घेतात गोऱ्यागोऱ्या पिंढऱ्यांत
किरणोत्सर्गी लपली आग
रंगीत-संगीत दिव्यांच्या झोतांत
'बटाट्याची चाळ' कोसळते हास्यांत
फूटपाथवरचीं प्रेतें झोकांत
तिकिटे घेऊन हा खेळ पाहतात!
विदूषक मात्र शेपटी हालवीत
देवमाशाच्या हसतो पोटांत
उधळत येतो या सर्वांवर
कोरडा अंधार
कोरडा अंधार

कविता घ्या हो कविता घ्या!

कविता घ्या हो कविता घ्या
युगायुगाचा गीतविक्या मी 'सबकुछवाली चीजें' घ्या.
काव्यकलेला मोल हवें ना
सत्यालाही ढोल हवे ना
नसल्यालाही बोल हवे ना?
पहा वाणिचा तुकेल बागी गरम वाणिचा हुरडा घ्या
कविता घ्या हो कविता घ्या

नवें वाण इष्काचें बघतां? भावगीत घ्या गजला घ्या
यांत कालचे हुंदके फुटती
शपथा ओठीं पुसून जाती
लिपस्टिकचे अन् रंगच उरती
स्वेदकणांनी न्हालेलीं हीं फळें 'शरीराबादी' घ्या
कविता घ्या हो कविता घ्या.

क्रांतिगीत का हवे? पहा मग गरमगरम हीं गाणीं घ्या
सत्तेच्या पदिं जीभ वाहिली
शब्दांतुनि बंडें रसरसलीं

शहीदसरणीं भाजूं पोळी
येळकोटभंडार उधळला हळदीचीं रणगीतें च्या
कविता घ्या हो कविता घ्या.

शब्दांचा मी भोप्या गर्जे ढाक–पवाडा लावणि घ्या
धर्मगृहांतुनि, राजपथांतुनि
परमार्थाच्या पेठेमधुनी
विकिला आत्मा, विकलीं गाणीं
पोत करांमधि गळ्यांत कवड्या गोंधळ घ्या गणगवळण घ्या
कविता घ्या हो कविता घ्या.

✳ या ठिकाणी वेगळ्यां संदर्भात आलेल्या एकनाथी भारूडातील जिवाजी कुळकर्णी कसबे कायापेठ याची आठवण व्हावी. मौजे 'शरिराबाद' त्याच्याजवळच कुठेतरी आहे, हे तो अध्यात्मिक भूगोल जाणणाऱ्यांना सांगणे नलगे!

उन्हाळ्या मौनाच्या

चांदण्यावरती
दोन काळ्या रेषा वाळल्या फांद्यांच्या
डहाळ्या मौनाच्या!–
शब्द–पान–पान लुंचून हातांनी
विरक्त उभ्या शून्याच्या कांठाशी,
स्पर्शतो, हर्वतो
अदृश्य अर्थ
फडफडत्या तडफडत्या वाऱ्यासारखा
वाऱ्याच्या संगती
बोडख्या झाडांत,
मुळाशी मात्र
दगड झालेला फुलाचा अनुभव
पुटपुटे पिवळा मातीच्या ओठाशीं:
बरें झालें देवा
बडबडगीतें पानांचीं झडलीं:
उरल्या केवळ चांदण्यावरती
दोन काळ्या रेषा अनादि मौनाच्या
अंकुरण्यापूर्वी शब्द–
आकाश!–

मी मस्त कलंदर गायक आहें

मी मस्त कलंदर गायक आहें
रित्या जगाचा रित्या क्षणाचा मी मस्त कलंदर गायक आहें.

मनचें माझ्या आभाळीं उडालें
म्हणे तारामंडळ त्याचेंच झालें
रित्या क्षणाला प्राणाचें ओज देत शिंपल्यांत मोती घडवीत आहें.
मी मस्त कलंदर गायक आहें.

झाडांना रानीं फुलें लाललाल:
लाखलाख देठासकट उष:काल
हजार पाकळ्या शोधीत त्यांच्या दिवस रात्रींत चालत आहें.
मी मस्त कलंदर गायक आहें.

डोंगरांत झरे खळखळत आले
त्यांत माझें मन ओघळून गेलें
ओढ्याच्या ओढीने वाहतां वाहतां समुद्राच्या काठीं लागत आहे!
मी मस्त कलंदर गायक आहे.

पायाखालची वाट तर संपत नाही.
नक्षत्रांनी झोळी कांही भरत नाही
रितेपणा मात्र वाढत वाढत आकाश पोटांत साठवीत आहे!
मी मस्त कलंदर गायक आहे.

प्रकाशाचा पदर पाण्यांत फिटतां

शुभ्र निळें कांही
काचेचें भांडें
तृप्तसें होतें जांभई देत
पाण्याने भरून,
पन्नास वर्षाच्या सुस्त लाकडी मख्खपणाने
उभें सावरीत
टेबल आपलें वेडें अष्टकोण!
वर विजेच्या दिव्याच्या झोतांत
संथ पाण्याच्या काचबंद कुयरींत
गोल जांभईच्या काठाकाठांनी
फिरत होती
इवलीइवली सोनेरी मासळी:
धरीत होती जाळबुंदी फेर
आरूणी माणिक-कोंभासारखी

विझत पेटत!
उठवीत लाटा अंगासरशीं
तलम सोनसळ्या,
गरगरत होती
फिरत होती तिच्याबरोबर माझीही नजर
धुंद लालसर–
जास्वंदी रेघ: फुलांची शराब प्याल्यासारखी–

पाहतां पाहतां
प्रकाशाचा पदर पाण्यांत फिटतां!
थोडा पलीकडे
माझा देह माझ्याच समोर
सोनेरी कापूरज्वालेसारखा
उभा राहिला पेटून थेट!–
अन् तसाच विझला.....

माझी नजर (वेढून अंतर)–
टेबलावरच्या अकलंक पात्रांत
मीच ओढून टाकलेल्या थंड
सिग्रेटच्या राखेंत–
शोधीत बसते, चाचपून पाहते
पन्नास वर्षांचे उद्ध्वस्त अरूण!

इकडे मात्र काचेच्या भांड्यांत
इवलीइवली सोनेरी मासळी
सारी रात्र फिरत राहते
गरगरत राहते गोल गोल
जांभईच्या झिळमिळ सुस्त काठाने
ओल्या माणिक –कोंभासारखी
विझत पेटत.

ढळत्या रात्रीं वाकुडी बासरी

ढळत्या रात्रीं वाकुडी बासरी, शब्दांच्या तीरीं मी घुमवीत आहें
अन् मस्त गाणें रित्या क्षणांचे छेडीत वर्षे तुडवीत आहें

खडखड गाडा
धुळीचा वेढा
वाळला ओढा:
गाणें ओढितो घसा कोरडा
मध्यरात्रीच्या चांदण्यांतले मृगजळ लहरा मारीत आहे
रित्या क्षणांचे अन् मस्त गाणें छेडीत वर्षे तुडवीत आहें

बासरी माझी वीतभराची
अशाच एका रित्या क्षणाची
अन् त्यास भोकें सात सुरांचीं
माझ्या रोजच्या साती दु:खांची
फुंकुन मी प्राण त्याच सुरांतून आनंदाची धून भरीत आहें
रित्या क्षणांचें अन् मस्त गाणें छेडीत वर्षे तुडवीत आहें

हे सूर माझ्या श्वासांमधले
शोधीत अर्थास दूरांत गेले
घेऊनिया मींड परत आले
फिरून मलाच शोधूं लागले
मी मात्र माझ्या गाण्यांत आता मिठासारखा विरत आहें
रित्या क्षणांचें अन् मस्त गाणें छेडीत वर्षे तुडवीत आहें

गळालेलीं पिसें

उत्तर

हीच काय सखे
प्रीतीची अखेर
असें कुठवर
जळायाचें

उत्तरांत तिने
खट्याळ हसून
दीपच फुंकून
मालविला.

खाणी

एकच तूं सूर्य
सहस्त्र वर्षांत
आकाशा, शून्यांत
निर्मिलास

परी ती धरित्री
निर्मि मातीतुनी
नित्य नव्या खाणी
रविचंद्राच्या

अब्रू

प्रियेचा उंबरा
असो देवद्वार
लवतांच शिर
अब्रू गेली

टिच्या

चिखलाच्या टिच्या
वाटे घळतील
सांभाळून चाल
गजगमने

कृपा

जळे फुलबाग
कृपा ही काळाची
उरांत हारांची
सलें झालीं

बरें झालें

मशीद, मंदिर
उध्वस्त बघून
जिवा समाधान
वाटलें गा.

बरें झालें देवा
तुमचेंही घर
मोडलें लाचार
माझ्यापरी.

फोड

व्याकुळलों बापा
फोड आले पायीं
अंग झालें लाही
चालतांना

परि पुढे वाट
काट्याची पाहून
मोहरलें मन
आनंदाने

राख

हृदयाची राख
झाली रे जळून
मज ये कळून
एवढेंच

नाही मी पाहिला
जाळ पेटलेला
धूर उठलेला
कधी डोळा.

वेदना

वेद वेदनेचा
होईलच कधी
समर्पण आधी
जन्म व्हावा

होण्याआधी स्पर्श
तुझ्या कुंतलांचा
श्वास संपायाचा
कुडींतील

सावली

क्षुद्र मूर्ख मना
कसे दिन आले
नवल वर्तलें
उन्हामाजीं

इवलालीं खुजीं
माणसें जहालीं
सावली लांबली
त्यांची काळी

पवित्र

अधिक पवित्र
तुझा दारवंटा
किंवा माझा माथा ?
सांग देवा.

अंधार सूर्याने पाहिलेला

महाभारतातील ययाति–आख्यानाच्या कथेवर हे काव्य आधारले आहे खरे, परंतु ययातीची व्यक्तिरेखा रंगवण्याच्या बाबतीत, महाभारतकारांकडून मी मनसोक्त स्वातंत्र्य घेतले आहे. ययाती जसा मला दिसला, भावला, आकारला, तसा मांडला आहे. मला तो ययाती मुक्तपणे, निर्भयपणे जीवन जगू न शकणाऱ्या, आपल्या भावनांशी, अनुभवांशी आणि श्रद्धांशी इमान राखू न शकणाऱ्या आणि भीतीने व आगतिकपणे घरंगळत जाणाऱ्या माणसाची प्रतिमा भासला. कदाचित हे ययातीचे चित्रण नसेलही– त्याने मनावर केलेल्या परिणामांचेही ते चित्रण असू शकेल. दुसरे: पौराणिक प्रतिमा (Mythical Image) कोरण्याचाही हा खटाटोप नाही, कारण हे चित्रण केवळ प्रतिमेत गुंतत नाही. त्या प्रतिमेचा भेद करून ते पुढे जाते, त्यासाठी धडपडते, असे मला वाटते.

काव्याचे निवेदन पत्ररूप आहे. खाजगी पत्रात माणसाच्या अंतरात्म्याची खरी कुजबुज ऐकू येते असे काही लोक म्हणतात. ती कुजबुज पकडावी असा 'घाट' रचून पाहिला आहे. साधला की नाही हे रसिकांनी ठरवायचे.

प्रिय पुत्रा, पुरू,
हे आलेंच संपत– पत्र नव्हे– तेल
या सुवर्णदीपांतलें कुसुमगंधित
निशिगंधाच्या स्वप्नसुवासें,
विझूं पाहे वात जागून शिणली रात्रभराची
देई जांभई म्लान ज्योतीची, श्रांत हळदिवी
थकलों मीहि, आली मलाही हलकीशी जांभई
रसमत्त गात्रें सहस्त्र वर्षाचीं – जुनींच तशीं हीं–
फेसाळलेल्या माणिकधारेच्या लवथवत्या काठाशी बेहोष क्षणांच्या
दुखती कधी, कधी ठणकती
चिरतारूण्याच्या वरदानाने
तेल संपतें
या माधवीच्या डोळ्यांवरली
उडते नीजही
सरते सावली रात्रीची रेशमी: श्वासासारखी
जळांत झोपल्या नीलकमलांहुनी
संपले पाहिजे हें–
संपण्यापूर्वी तेल दिव्यांतील
झोप डोळ्यांतील माधवीची.

माधवी कोण ही ?
स्मिताची रेखा मृत्युच्या ओठींची !
माधवी म्हणजे– पण थांब, पुरू
सारेंच सारेंच सांगायचें आहे
ऐक आधी परी–
गळाली आहे माझी सारी भीति

गळाल्या वर्षाच्या फूलपाकळ्यांत
जात आहें मी सामोरा मृत्यूला
मृत्यूच्या पुढ्यांत गळे सारी भीति:
रतिसमयींच्या ओघळणाऱ्या वस्त्रासारखी

लिहित आहें मी मृत्यूच्या दारांत
उल्कापाताच्या हसऱ्या भाषेंत
पानझडीच्या पिकल्या शब्दांत:
सरतें आहे माझें सारें भय
भय मरणाचें, वार्धक्याचें भय
सरतें परतें सिंधुवेलेपरी, हास्याचीं फुलें तरंगभंगांत
उरीं तडकला चंद्र हासताहे
कलंकरेषेंत
पौर्णिमेच्या रात्रीं क्षयाच्या क्षणीं:
अमृतवेळा ऱ्हासाच्या मुहूर्तीं!
तसें सरो भय, म्हणून वत्सा, लाडक्या पुरू
नको विचारूं कांही कांही आता
परत दे रे माझें वृद्धपण
स्वीकार आता माझें तारूण्य
वार्धक्य माझें परत दे मला.
शुक्राचा तो शाप
वर्षो मजवरी झंझावातापरी
थंड शिशिराच्या हिमलाटेपरी
पानांचें लावण्य, फुलांचें तारूण्य खुडून नेणारा
यौवनरसकुंभ सांडीत जाणारा
झडपीत येवो शिशिरवारा दुर्धर शापाचा
स्वागत करी हा जीवनवृक्ष
पसरून बाहू सहस्त्र वर्षांचे,
स्वागत स्वागत.
वत्सा पुरू, पत्राच्या घडींत
पोचवीत आहें निरभ्र ठेव तुझ्या तारूण्याची
क्षमा करीं मला
भीरू लंपट निर्लज्ज पित्याला
भ्यालों मी जरेस, भ्यालों मरणास
भ्यालों सौंदर्यास, भ्यालों मी प्रीतीस
भ्यालों कर्तव्यास, भ्यालों जीवनास
दिलें नि भीतीस विलासाचें रूप
प्रीतीच्या प्याल्यांत जीवनाचा रस
होतो कालकूट–कळलें नाही
कळलें नाही.

पडेल पत्र जेव्हा तुझ्या हातीं
झाकील मृत्यू माझी लाज, भीति
बाळा, वाच पुढे
नको अडखळूंस
खोडिलें घाईंत नको तें अक्षर
परंतु काळाच्या भूर्जपत्रांतला कोण रे खोडील
जीवनाचा माझा अभद्र लेख ?
शापाने वराने शुक्राचार्याच्याही नाही पुसणार
क्षण, मात्राही !

पहा तो कूप
दाहक विषाचा की अमृताचा–
कशाला हा प्रश्न आता अंत्य वेळीं ?
दिसते अजून, लालस डोळा:
भरतें नीर निर्जल कूपांत
रातोत्पलापरी ऋषिकन्यका ये जळामधून
फेनिल लाटांचा पुष्पांचा झूला
अवतरे लक्ष्मी उधाण सिंधूच्या आनंदलहरींत
तशी देवयानी आली कूपांतून.
मंतरलेल्या माझिया बाणाच्या हिंदोळ्यावर
झालीं त्या क्षणीं बाणांचींही फुलें–
लाजे पुष्पधन्वा !
उडी घेई खाली कविकन्या ती
माझ्या हाताचा घेऊन आधार हासत हासत:
उतरे मनांत अर्थ शब्दांतून
होऊन हासू फूल देठांतून–

"नाही दिला हात असा सोडायास."
बोलली सस्मित जास्वंदी लाजत
हात सोडितां मी
दबतां अंगुली, तनु लहरली
उंच उसळती रक्तोष्ण लाटा
पायतळीं धरा सरकत जाते
ठिबके मनांत चंद्राचें चांदणें
फुलती हृदयांत लक्ष लक्ष फुलें
थरथर कापे रोमांचित कर
परंतु कांही बोलला नाही तो
धुंद रासवट पालवी स्पर्शाची

करकंपनीं फक्त:
नव्हती भाषा, नव्हते त्याला शब्द
कांहीच नव्हतें मनांत माझ्या.
अगाध विस्मय चकित मनीं सौंदर्यस्पर्शाचा
विद्युत्पुष्पांची दाहक उमलण, पोळता परिमळ
अद्भुत ओढ गात्रांची गात्रांस
नसांनसांत पद्मपाकळ्यांचें सुखद मऊ प्रचंड वादळ
उडवून नेणारें देहास देहापासोनी
अबोध भय दाटलें मनांत रूपप्रलयाचे देहस्विनीचें
परी माझ्या ओठीं एकही शब्द उमटला नाही
भीतीची या प्रीती झालीच नाही–
कधीच नाही.

नकाराची भाषा मनींच राहिली
आकाशमिठी मातीला जडली
भृंग पद्मकोषांत विजेच्या गुंतला
घालूं लागला रूंझी अंधारांत, स्पर्शकोमल
असोनी भोवती देवयानीच्या देहाचा उजेड!
शरांस भीती शुक्राच्या शापाची
क्षणांस भीती देवयानीच्या कोपसंतापाची
शय्यादीपा भीती
भीती शेजेच्या हासऱ्या फुलांस
मद्याने न्हालेल्या चुंबनक्षणास
भीती हट्टाची, लहरबहरीची
मंत्रमत्त दैत्यगुरूकन्यकेच्या अहंकाराची
प्रीतीची साद प्रेमखंडितेची: विद्ध अहंकार
आपुल्या जखमा झाकीत जाणारा,
देवयानीने मजवरी प्रेम केलेंच नाही
भग्न प्रीतीची समाधि बांधाया
माझ्या सुखाचे चिरे केले तिने
कचाचें प्रेम जिणतां नाही आलें
चिणिलें मला, लपवाया हा घोर पराभव
कचदेवाचा घ्याया प्रतिशोध
आली देवयानी माझ्या जीवनीं वधूवेश घेऊन
स्वामिनी बनून माझ्या सर्वस्वाची
आपुल्या जखमी अहंकाराच्या परिपूर्तिसाठी
प्रदर्शन की हें प्रेमसाफल्याचें ?

तृप्तीची हिरवी ओल श्रावणाची स्मितांत तिच्या नाही चमकत
चिंब पानांतील गोड उन्हापरी
शय्यादीपांतील रत्नज्योतीपरी विजयाचें हासू
जळे तुच्छतेने थंड कठोर
लवेना, विझेना कधी फुंकरीने.
खुपती खोल स्वामित्व-अधिकार रूपगर्वितेचे
करिती विद्ध केवड्याचे काटे धुंद आपुल्या रंगगंधामधी
दहिवरकातर, प्रियेची प्रीत समर्पणातुर
मिठींत तिच्या शिवली नाही.
सहस्त्र दासी सेवेसाठी तिने आणिल्या सांगाती
अंत:पुरांतून वृषपर्व्याच्या
त्यांतलाच कुणी मीहि एक दास कटाक्षांनी तिच्या बांधलेला:
जशी बांधलेली शर्मिष्ठा दासी
आपल्या पित्याला शरणागतीला
विकली त्याच्या स्वर्गलोकाच्या सत्तापिपासेला
शर्मिष्ठा दासी आपल्या पित्याच्या सत्तालालसेची
मीही गुलाम भोगलालसेचा
बांधितो दोघांस -काय असा- एकच हा पाश ?
परंतु पाश कसें म्हणू त्याला ?
अबोध भावाचे हे मर्मबंध:
फुलांमधे ओढ फुलपंखींना लोहचुंबकाची
राजीवदलांत चंद्रकराचे धागे गुंततात
ऋतुचक्राचा संमोहनस्पर्श
दिवसरात्रीच्या धरित्रीच्या गालीं
चंद्रिका पिऊन झिंगल्या सिंधूच्या
अथांग खोल जळबुंदी मनास
वाडव व्यथा मातीच्या स्पर्शाची-
असें कांहीतरी स्पर्शलें मला तिच्या डोळ्यांतुनी
पाहिलें मला जेव्हा शर्मिष्ठेने

एक क्षणाच्या सलज्ज सस्मित उघडझापेंत
हासले ओठ हासले अधर
पालवी फुटे दगडी खांबांस
आली हंसास हाक मानसाची
जन्मांतरींचें असे कांही नातें
सूर्यमालेसंगें ओवी जें धरेस
एकाच अनादी अदृश्य सूत्रांत!
म्हणतां येईल पाश कसे त्याला ?
नोहे दासपण,

बंधन माझें उलट गळालें
देवयानीच्या रूपराशीचा तुटून पडला देहाचा पिंजरा
गळून पडले
शय्यागृहांतील रत्नज्योतीचे धगधगते पाश
शिवे हृदयास
दळींचे दव समर्पणातुर पारिजाताचें

भोगिलेल्या रात्री भंगूनिया गेल्या
करींच्या निसटत्या मद्यपात्रापरी
जेव्हा देवयानी निघूनिया गेली
एका मध्यरात्रीं लोटून मला, चंदनी दाराला
संतापें जळत अभिमानें वळत
कठोर शब्दीं निर्भर्त्सना करीत
पाडीत घरें माझ्या मनास
अभिमानास–

"असह्य असह्य चुंबन मला मद्यपी ओठांचें
सांगितलें मी शतवार तुम्हां
देवयानीचा शब्द कां मोडिला ?
भंगिला मान शुक्रकन्येचा ब्राह्मणतेजाचा,
दुर्गंध आरक्त दुर्मुखलें मुख
पुन्हा न घेऊन यावें शय्यागारीं
पाहिजे मदिरा किंवा देवयानी
यावें ठरवून पुन्हा शय्यास्थानीं
छायाही असह्य मला मद्यप्याची."
गेली निघून शयनागाराचें लोटून दार
ओढीत ओढीत रेशमी शेला
लोळत जातसे भूमीवरून तो
लोळच कोपाचा !
मला जाळणारा जाळ तुच्छतेचा.

उघडे दार
दाराशी जळतो गर्विष्ठ दीप
गर्वितेच्या शुभ्र कंबुकंठापरी
पैल क्षितिजाशी रात्रीचा शेव, नील तारांकित
किंचित् आर्द्र नीहारकणांनी
रेशमी वसन जसें शर्मिष्ठेच्या कातर कंपित वक्षावरलें–
सावरलें तरी पुन्हा उडणारें
बोटांमधुनी कोमल गोरट्या
कोण ही उभी कुंजाशी –शर्मिष्ठा ?

पण या उद्यानीं ?
हें काय, कानांत रथचक्राचा घुमे गडगडाट
धावत्या अश्वांच्या घामाचा कसा ओला ऊष्ण गंध
प्रतोद हातांत
मीच का रथ आणिला दौडत ?
केव्हा कसा आलों कुंजापाशी या मृगांकवनांत
मनाच्या वेगाने ?
शर्मिष्ठाच उभी जाईच्या कुंजांत
काळींहिरवीं अंधाराचीं पानें, इवलीं शुभ्र फुलें
नक्षत्रांची जाग जाग्रणाची आग थेंबली रात्रींत
उभी अंधारीं जागत शर्मिष्ठा दृष्टि खिळवून
पाहते काय अंधारापलीकडे ?
वृषपर्व्याचा – आपल्या ताताचा – विजयी देश, असुर प्रांत
ज्याच्यासाठी तिने स्वीकारिलें दास्य जन्मभराचें
बळी देऊनि देवायनीपदीं
आपुल्या जीवनस्वातंत्र्याचा
अंत:पुरांत दासीच्या वेषांत येऊन करी
अग्निप्रवेश जीवंतपणीं ती
दैत्यदेशाच्या पित्याच्या सुखार्थ.

शर्मिष्ठा उभी रात्रीच्या एकांतीं
तें सुख, ती तृप्ती पाहते काय गूढ अंधारांत ?
तारांगणांत किंवा मोजिते चटके आपुल्या आत्मदहनाचे ?
शोधिते किंवा स्पर्शाचे झंकार
गुंजतात जे माझ्या मानसांत, भ्रमर बनून
तेव्हापासून–
जेव्हा तिने दिला
मधूचा प्याला माझ्या हातांत भरून एकदा
स्पर्शली किंचित् अंगुली तिची माझ्या बोटांना
नाचलें थोडें डोळ्यांतले स्मित मधुपात्रांत–
वळवून नेत्र अन् लगबग गेली निघून शर्मिष्ठा,
फूलपाखरें आरक्त नखांचीं सवेंच उडालीं
नाचती तींच तिच्या शेल्यावर
या महालाच्या खांबाखांबावर
त्याच क्षणांचे भ्रमर रूंझती माझ्या मनांत
दिवसरात्रीच्या दुरंगी दलांत
ऐक शर्मिष्ठे,
भ्रमरगीत ऐक त्या क्षणांचें
अर्थ तयाचा नाकारूं नकोस.

आपण दोघें–
सूर्य–सूर्यफूल दोन्ही अंगें झालों!
"ऐक शर्मिष्ठे,"
नकळत शब्द फुटला मुखीं माझ्या
वळे दचकून ती मृगनयना:
भरली तहान ज्यांत काठोकाठ
निघाली जाया, शरास भ्यालेल्या हरिणीपरी
"शर्मिष्ठे, थांब."
होऊन पुढे धरिला मीं हात
कोसळे ती पायीं स्फुंदत स्फुंदत

"क्षमा महाराज,
व्रत हें माझें असें मोडूं नका
दैत्यकुलाला बोल लावूं नका
शपथेला माझ्या तडा पाडूं नका
शुक्राचा कोप देवीचा मत्सर चेतवूं नका
या महालांत, सुखाच्या फुलांत आग लावूं नका
फुंकर माझ्या मना घालूं नका.
"किती साहशील किती जाळिशील
कपूरज्योत गोरट्या अंगाची ?"
"आरती आहे ती माझ्या देवाची.
दैत्यांस कैची आरतीची रीत ?"
देव की दैत्य मी नाही जाणत
जाळिते स्वार्थ माझ्या आरतींत
एकच अश्रु दोन्ही लोचनांत.
"त्याच अश्रूची तहान ओठांत"
"अमृताची ओल नाही त्या थेंबांत"
"गारवा हवा पाण्याचाच मला
मृगजळांत हा जीव पोळला"
"तान्हेली मृगी मी, मृगजळापाठी
फिरे आपुल्याच काजळकाठीं"
"थांब या नेत्रीं, संपेल फिरणें "
"तिथूनच झालें सुरू भटकणें
असेंच राया, फिरूं द्या झुरूं द्या
मनीचें आर्त मनींच राहूं द्या
मी पथदीप– दीपच असूं द्या
तुमच्या मार्गी पथिका, जळूं द्या."
"त्या ज्योतीवर मलाही जळूं दे

जळण्याचें सुख मलाही कळूं दे."
"नका राजसा, असें बोलूं नका
कांहीबाही हें मला पुसूं नका"
"झळ ना लागो तुला माझ्या फुला.
म्हणून डोळा पाण्याने भरला."
"कोरडे शब्द ओठीं माझ्यासाठी
उरांत प्रीति फक्त पित्यासाठी
एकादा कण मला भिकाऱ्याशी ?– "
"माझ्या कुबेरा, कां रे छळतोशी ?
उरलें काय आता माझ्यापाशी !
सर्वस्व माझें तुला अर्पिलेलें
देतां न येई सारें शापिलेलें
स्पर्शाचे तुझ्या रोमांच लेऊन
राहून दूर आनंदें जळेन."
"मीही आगींत सुखाच्या जळालों
जवळी तुझ्या दु:ख मागूं आलों."
"या जन्मीं दासी झालें तातासाठी
पुढील जन्म सारे तुझ्यासाठी
नको रे गुंतूं गुंतवूं मोहांत"
"जळूं दे देहाच्या तुझ्या चांदण्यांत."

मग हुंदक्याची चंद्रकोर ती ! गद्‌गद् हालली
कोसळून पडली माझ्या बाहूंत
गहन झाली अधिकच रात मिटल्या नीलकमलापरी
त्यांत कोंडलेलें भ्रमरगुंजन
दिशांचे बंध तोडून पसरे
देहांत, देहाच्या मर्मबंधांतून
धावती दुखरी एक वेदना बनून दाहक:
उपशम जिचा
दोन देहांच्या स्पर्शाच्या पिसांत
उष्ण आवळत्या सघनगहन विजेच्या विळख्यांत
फुलांच्या, स्वेदाच्या, सगंध श्वासाच्या
ओल्या धडकीच्या, श्रांत उरींच्या गोऱ्या वर्तुळांत
गहन होतांना उत्तररात्र
मखमली क्षणांची
गंधाने जड झालेल्या तारांची
हारवती देह आपली सावली
तारे आकाश बसती हारवून !

अशा त्या रातींत
संपली रात
झोपेंत काजळ पुसल्यासारखी
झाकल्या डोळ्यांत
विश्रब्ध प्रीतीचा असीम विश्वास
गात्रांत तिच्या
तळीं गळालेल्या प्राजक्तपुष्पांचा उद्भ्रांत शीण
विलग ओठाशी स्मिताची कोर–
कुठे खोलखोल पोटाच्या खळग्यांत, बेंबीच्या देठाशी
चकित कळीच्या हालत्याफुलत्या सावलीसारखी–
रेंगाळणारी स्मिताची कोर,
झोपेंत धरून तिने ठेविलेला
अन् माझा हात
सुटूं पाहणारा प्रीतीचा क्षण!

राहिला हात तसाच हातीं
सुटला क्षण पद्मकोषांतल्या भ्रमरासारखा
अर्थासारखा
यमकामधून दोन शब्दांच्या–दोन देहांच्या.
देहाचा अर्थ बुजला मानसीं
रात्रीचा अर्थ भ्याला उजेडाशी
वत्सा, पुरू, रागावूं नकोस
सोडून कुंजांत निद्रिस्त शर्मिष्ठा
आलों मंदिरांत देवयानीच्या
प्रतारणेचें हासू पांघरून
विझला होता दीप शय्यामंदिराचा
माझ्याही मनाचा
किरली होती सोन्याची समई
येईल रात, उजळेल वात
परी इथे माझ्या प्राणाची ज्योत
पेटणार नाही–
पडूं दे देहाचा उजेड नग्न
उजळूं दे चंद्रांनी कटाक्षशलाका देवयानीची.

तिला आली जाग फुलत्या फुलांची
फुलांतील हाक अदृश्य फळाची
हाकेचा त्या अर्थ उराशी जपत
चाले ती दिवसा
दुरूनदुरून सूर्यमंडलांत

फिरते पृथ्वी अशीच नि:शब्द
समुद्र दु:खाचे धरून पोटीं
नव्हता ओठीं शब्द निषेधाचा
आठी भिवईंत अधिक्षेपाची
वंचित विरही रात्रीच्या धाग्याची
धावत्या नदीची समर्पणधारा
अवघ्या नेत्रीं, अवघ्या गात्रीं

बाळा पुरू,
सोडून तुला दूर आश्रमांत बाळपणींच–कसें सांगूं?
पुत्रप्रेमाचाही बळी दिला तिने
या ययातीच्या क्षुद्र प्रेमासाठी
भीरू भूपाच्या यशाच्या पोगर कीर्तिमुखासाठी
दुष्ट ययातीच्या किरीटामधल्या
झगमगणाऱ्या गारांचें तेज निर्मळ राखाया
आपल्या चंदिर भालबिंबावरी, कलंकाचा भार
साहिला सारा तिने एकटीने
मातेचें मनही नाकारिलें तिने
अमृतधारा निजवात्सल्याची
आटविली तिने उरींच्या उरींच
फांदीवरल्या वाळत्या फळाचें तप आचरून.
दैत्यजयासाठी
घेऊन दारूण दास्याचा वसा
या महालांत आली शर्मिष्ठा
आणि आज इथे जाळिते प्राण
वंचक भीरू एका प्रीतीसाठी:
अदृश्यपणे असेच जळती कुसुमगंध
हासऱ्या दळांत होऊन धूप
दिवसा उन्हांत विरतें जेव्हा दहिवर रात्रीचें,
माझे गहिवर असेच जिरले
शपथांचें दव शब्दांत वाळलें
पेटूं लागली कुपित मत्सरी
धगधगती दृष्टि देवयानीची
शय्यादीपांत, रात्रीं शर्मिष्ठेच्या मालवलेल्या
क्रंदन तुझें कधी ऐकूं येई
मर्मरघोषांत एकांत रात्रीच्या
स्मरे कधी तो तुझा बाळहट्ट
मुकुटासाठी यदुमस्तकींच्या
देवयानीचे धगधगते शब्द:

"धारिष्ट्य पहा या दासीपुत्राचें."
शर्मिष्ठेची मुद्रा
अपमानाच्या ज्वाळांत जळणारी
क्रोधाने पेटत, दु:खाने फुटत
तुला आवेगाने ओढीत नेणार
तिची हालचाल
वणव्याची रेषा वळत जाणारी
स्तब्ध रात्रीच्या निळ्या डोंगरांत–
स्मरतें हें सारें
टाकितां पाऊल शर्मिष्ठेच्या दारीं
उठते जेव्हा दचकून रात्र
आभाळीं चंद्र ओला होतांना धर्मबिंदूंनी
तेव्हा वाटे भय:
भय माझिया चोरट्या मनाचें
भय शर्मिष्ठेच्या निश्चल प्रीतींचे
तिच्या अतर्क्य अथांग मौनाचें
अनामिक भय–
काठ नसलेल्या अंधाररात्रीचें
काळें ओलें भय अतळ जलाचें!

भ्यालों मी प्रीतीचा कराया स्वीकार
भ्यालों मी प्रीतीचा कराया उच्चार
हृदयाचा होकार
गोठवतांना चुंबनठशांत
दाठरणाऱ्या बोटांच्या स्पर्शांत
दहिवरत्या तमाच्या क्षणांत
परका झालों आपण आपणा:
नाकारलेला प्रीतीचा स्पर्श!
आपल्या डोळां लाजूं लागलों मी
शर्मिष्ठेच्या डोळां बुजूं लागलों मी
तिच्यापासोनी लपूं लागलों मी
निज पायतळीं छाया होऊनी मध्यान्हीची दग्ध.

दग्ध छाया? होय, दग्धच असे
शुक्राच्या शापांत
अन् यौवनाच्या पल्लवारूण तुझ्या उ:शापांत
वंचित संतप्त देवयानीने
पाचारिलेला पुढे शुक्रदेव
पेटला मंगळ क्रोधाच्या ज्वाळांनी
शेजारी शर्मिष्ठा कापे चळचळा

स्तब्ध देवयानी बाजूला विझून
सोन्याची समई भग्न राउळींची
वादळ फुटे नि:शब्द पानांत: गर्जे शापवाणी
"जराग्रस्त हो स्त्रीलंपटा तूं
विश्वासघातक्या."
पिवळें पान, पिकली कातडी
थंड बर्फापरी केस पांडुरले
दृष्टींत धुकें जमलें वयाचें
भोगभाराने वाकलें शरीर, कापे थरथरा
ठणके अभिलाषा सांध्यासांध्यातून
रक्ताचे तीरीं अतृप्त इच्छांचे नाचती टेंबे
किरकिरे वासना नसानसांतून होऊन रात्र
भयाण काळी.
अंधारातुनी त्या
हिरव्या डोळ्यांचे नाग वळावळा येती, आवळती
कंठाभोवती, हृदयाभोवती
काचत जाती पाठींत, कण्यांत
थंड आगीच्या ज्वाळांचे दोर
कोसळलों मी गुडग्यांत मोडून
पिकल्या पानांची मस्तकांतून उठे वाहटूळ
गर्गरा त्यांत फिरत उडालां
यदु, पुरू तूंही–
उडून चालली शर्मिष्ठा कोमल
देवयानी ती सुवर्णतप्त रूपगर्वासह,
उडती त्यांत
लक्षलक्ष किती झुरेबावरे वदनचंद्र अन्
कुठे लक्षमाळा राजीव नेत्रांच्या
सुवर्णकुंभ कुचयुगुलांचे त्यांत भ्रमतात
इंद्रधनुष्यें सहस्त्र शेल्यांचीं, उडती वाऱ्यांत
सहस्त्र तनूंचे घेऊन गंध,
त्या वातचक्रांत माझाही देह
भिरभिरूं लागे
पेटत शुभ्र केसांच्या टोकांनी!
"वाचवा, धावा, पेटलों जळालों."
लागलों पायीं उ:शाप मागाया
पुरूराजा, वत्सा,
देऊन बळी तुझ्या तारूण्याचा
जिंकिली जरा मीं, टाळिलें मरण
केवढी भीति जरा–मरणाची!

सुटली नाही उशना कवीलाही.
फळाचे मनीं
पिकलेपणाचें असतें का भय ?
थरथरलें तें परी एक क्षण
तपस्वी शुक्राच्या वज्राच्या मनांत,
हाळी दिली जेव्हा
कचाने बसून सुरेच्या थेंबांत
राखेच्या कणांत
मालवणाऱ्या मद्याच्या कैफांत,
संजीवनीचा द्रष्टा दचकला
मृत्युच्या केवळ विरळ तरळ क्षण कल्पनेने
निज मरणास भिऊन त्याने
दिली संजीवनी
पोटीं लपल्या शत्रूच्या पुत्रास
(उष:कालीं शांत
जागतां मनांत संजीवनीमंत्र
देवांचा प्रिय
देवयानीचा प्रियकर कच
आला असता ना जिवंत होऊन
उदर फाडून शुक्राचें बाहेर ?
अन् कदाचित् नसतें दिलें
पुन्हा संजीवन शुक्रास त्याने.
संजीवनी मंत्राच्या उद्‌गात्या ऋषीचें
अपेशी मरण!
घोर विटंबना, दारूण मृत्यु– ह्यालाच भ्याला तो.)
शापितो मला तोच शुक्राचार्य
स्वता भ्यालेला
भीरूच मीहि!
शापिते अशी भीतीच भीतीला.

भोग सारे माझे भीतीने भोगिले
भीतीनेच मीं साऱ्यांस सोडिलें
आपलेपणाही सलतो एखाद्या भयाण क्षणीं
काठ्यासारखा.
शर्मिष्ठेच्या ओल्या अश्रूंनी भिजल्या
नेत्रदळांचे कोमल केसर
असेच खुपले
माझ्या हृदयाला,
पुरून घेतलें आपणास मी

रूपवतींच्या रूपकोषांत
सहस्त्रसहस्त्र रूपदर्पणांत भग्न वासनांच्या
बिंबून अडकून
जगतों जीवन शतखंडित हें
प्रतिबिंबाचें बद्ध परकें
स्वताचें असून
नित्य नवीन स्त्रीदेहाच्या अनोळखी आयन्यांत
पाहत स्वताला भंगलेपणांत
विसरूं बघतों ओळख स्वताची
विसरूं पाहतों स्वताला ना फक्त
विसरूं पाहतों
शर्मिष्ठेची प्रीति
देवयानीची सत्ता नि संताप
उग्र अहंकार शुक्राचार्याचा
कोपशापांतील त्याचा भीतिगंड
आणि वत्सा, तुझी– क्षमा करी मला–
ती पितृभक्ति, तो दिव्य त्याग
डोळ्यांतली तुझ्या निर्भयता ती
सारें सारें मला
विसरायचें आहे– माझ्या भीतीसह.
चिणूं पाहतों मी
मत्त प्रमदांच्या आरस्पानी त्या चिरेबंद देहांत
फुलांच्या वक्षांत
खोल स्वप्नडोंग्या काजळकाठांत
जीवनांतील विफलतेचें भयानक सत्य,
घोर रितेपण
कातडीचा ठाव
डोळ्यांचें पाणी
किती खोल सारें ?
या माधवीच्या निद्रेइतकें ?

अजून कशी झोपलीच आहे
कमळाचें निष्पाप मिटलेपण घेऊन !
उसवलीं आहेत
माझीं कांही वर्षे: जखमेसारखीं.

असेच होते झाकलेले डोळे
माधवीचे ? नाही. आईचे तिच्या– पद्मिनीचे त्या–
झोपली होती ती, प्राशून विष
माझ्या शय्यागारीं पुष्पशेजेवर

पाहण्याआधी फुलांचें मरण
चुरगळण्याआधी
डोळ्यांतलें स्वप्न अनवांछित चुंबनदंशांत
मोडण्याआधी
प्रीतीचा भास देहाच्या घडींत!
रात्रीच्या पहिल्या जाईच्या प्रहरांत
विनवीत होती ती
डोळ्यांत अश्रु आणून एकांतीं
मोडत मिठींत–
"नका हो माझा धर्म मोडूं नका
संसाराची घडी विस्कटूं नका."
ऐकून ते शब्द हासलों खदखदा
नग्न कट्यारीच्या मुठीवरील
आरक्त पिवळ्या रत्नासारखा– थंड कठोर
(दुसऱ्याने आज इथे आली होती
असेंच तेव्हा बोलली होती ती
पहिल्या वेळीही.)

दुसऱ्या चंदेरी विवस्त्र प्रहरांत
पडली होती ती बेभान बेशुद्ध
गोल उरोजांत कोंडलें होतें
उद्ध्वस्त पद्मींचें भृंगांचें क्रंदन
गोंदीत होता अन् चंद्र चांदण्या
उघड्या अनाथ तिच्या मांड्यांवर–

चौथा प्रहर विरळ रात्रीचा:
चंदनगंध कुचतटींचा वाहून नेणाऱ्या
शीतळ जळाचा,
वाळूवरती तिचा मृत देह
लाटांच्या रेशमी शेल्यांत झाकला
विर्घळलें होतें पापण्यांशी मीठ
फुलांच्या शेजेवर जमलेलें,
नखक्षतांचा
नव्हता आता दाह
नव्हती सुर्कुती मोडल्या घडीची
कुठे देहावर,
विमुक्त आता विसावली होती
चाफ्याची मूस
निज नग्नतेंत,

नाकारून दृष्टि
स्वप्न नाकारून
मिटल्या होत्या हट्टी पापण्या त्या
आनंदनिद्रेंत आत्मघाताच्या–
आनंदनिद्रा ? –हो–स्मरतां आज ती
जीवन वाटे
काळाच्या गतींत एक अकस्मात
उठलेली कळ तीव्र वेदनेची
आशयहीन
मरण तें मग आनंदनिद्रा होय सहजचि–

पण तशी नव्हे
आनंदनिद्रा मुग्ध माधवीची
तिच्या मिटल्या नेत्रदळांमधी
कुंकुमरेखा उद्याची आरूणी
उमलूं पाहते
नव्या विश्वासाच्या सहस्त्रदलांनी
मीं दिलेल्या वचनांमधून.
झोपण्यापूर्वी किती रडली ती
"कोण तूं ? पद्मिनी ? "
"नाही. माधवी. मुलगी मी तिची."
उधळून गेली
माझ्या मनांतली रात्रीची कस्तुरी
हुंदके तिचे, जाईचीं फुलें शुभ्र सुकुमार
अडविणारीं
कुस्करणारे हात, हिमें घडिलेले
विलक्षण तिचें रडणें असे
स्वत:साठी ?
नव्हे, माझ्यासाठी.
"बाबा, वाचवा, वाचवा स्वताला
अध:पातांतून, मला वाचवून
नका हो करूं कन्येशी व्यभिचार–
माझ्या आईच्या मृतदेहावर
जळता डाग पुन्हा देऊ नका.
कलंक तिचा पुसला एकदा
नदीच्या लाटांनी–
त्या पद्मिनीची– तिचीच कन्या मी."
"तिची कन्या तूं ? कोण ? माधवी ?"
शब्द तिचे ते:

खिळा लोखंडाचा छातींत शिरला
चिरली रात्र नक्षत्रमंडित भर्जरी वस्त्राची
सोलली त्वचा सौंदर्यभोगाची!
"दया करी रे
सोड सोड राजा, जाऊं दे मला
नकोत तुझे ऐश्वर्यविलास
रत्नांची रास
त्यांस येतो वास
माझ्या आईच्या बुडाल्या देहाचा–
गेला तिचा आत्मा
उरलें केवळ प्रेत तिचें मी
वांछिशी कां सुख प्रेतसंभोगाचें?"

ऐकतांना हे माधवीचे बोल
गळाले पंख फूलपाखरांचे
उडाले नभांत धूर होऊन फुलाचे रंग
उरली हातांत वेळूची काठी
मावळून सूर–
सुरांचा तरी अर्थ काय पण?
वीतभराचा तुकडा वेळूचा
भोकें त्यास कांही
कांही तार–मंद्र स्वरांच्या त्या जागा
वादी–संवादीचा म्हणे कांही मेळ
भावांचा कल्लोळ
कशाचा अर्थ? माधुर्य कशाचें?
कशाची संगती?
असाच नाही का
स्त्रीपुरूषांच्या नात्यांचा मेळ?
मुलगी, माता, बहीण हीं नातीं
आधी कुठे होतीं?
कुणास माहीत
उद्या कदाचित् विरून जातील
स्त्रीपुरूष हा एवढाच भेद उरेल शेवटी
प्रलयानंतर उद्ध्वस्त गुहेंत
निबिड वनीं.
गोऱ्या भुजांच्या वक्र रेषेपरी
अबोल तीरीं वाहत्या नदीच्या
यमीने भोग मागितला भावास
लागला पाठीस सरस्वतीच्या

वेडा ब्रह्मदेव पेटून मांड्यांत,
मस्तक एक समाजविन्मुख तुटून पडलें
चतुर्मुख झाला
सृष्टीचा निर्माता,
सत्ता हारवून बसला आपुली
आपण रचिल्या सृष्टीवरली
आपल्या सुंदर निर्मितीवरली!
जाहला विष्णू विश्वाचा नियंता
तोही झोपला शेषशय्येवर,
मस्तकीं त्याच्या नाचती जागती
सहस्त्र प्रश्न दाहक विषारी शेषफणांचे
फणांवरी त्या फिरते धरणी
त्या धरणीच्या क्षुद्र कणावर
मर्त्य माणूस, कीटक तो क्षुद्र
रचितो शेणांत स्वप्नें स्वर्गाचीं अमरत्वाचीं
काय त्याचा केवा? कुणास काळजी?
तरीहि बिचारी
पापभाराने गांजली पृथ्वी
प्रार्थिते प्रभूला गाय होऊन
परित्राणासाठी धर्माच्या, साधूंच्या
परी प्रभूची योगनिद्रा कांही
भंगत नाही –
साधु कोण परी?
अन् पापी कोण?

किती वेडे सारे विचार माझे
एखाद्या वेड्या कवीसारखे!
कवि नाही मी
आणि जीवनही काव्य नव्हे तें!
जीवन म्हणजे? – म्हणजे – अंधार?
अंधार सूर्याने पाहिलेला– तसेंही नव्हे– पण
नकोच विचार–
परंतु विचार फुटती काय
झाडांना का कधी
हजार वर्षे जरी तीं भिजलीं
पाऊसधारांत?
(अश्रूंनी भिजल्या मानवाप्रमाणे)
विचारांना तरी अर्थ काय अंतीं?
अर्थ काय साऱ्या मानवी जीवना?

सुखदु:खांना ?
भोगविलासांना ?
सुवर्णकमल उत्फुल्ल सुंदर
सहस्त्रदळें वेचून लुंचून
गावतो न गंध कधी अंजुळींत,
उरते पोकळी निरर्थ अदृश्य
–जाणवते फक्त
आपल्या अनादि रितेपणाची:
एक धुगधुगी मृत्यूंत विरणारी
सर्वच असें संपणार आहे निरर्थपणांत
सनातन अंधारीं.

पहा हा प्रकाश मावळत्या चंद्राचा
गवाक्षांतून माझ्या दिसणारा
तें चंद्रबिंब
विर्घळत आहे काजळक्षितिजीं
कलंक, मृगांक–म्हणा कांहीही
शुभारंभ त्याच्या विरघळण्याचा!
–ह्या सूर्याचीही
होईल अशीच एके दिनीं राख!
प्रचंड थर, राखेचा डोंगर
धगधगणारा, नभा भिडणारा,
परी त्याच क्षणीं असेंही वाटतें
ह्याच राखेंतुनी वेचितां येतील
नित्य नवे सूर्य!–
जेव्हा पाहतों ना मी तुझ्या डोळ्यांत–
अक्षय तारूण्य मला देणाऱ्या
शापास वराचें रूप अर्पिणाऱ्या
त्या तुझ्या डोळ्यांत,
निद्रिस्त निष्पाप मृगनयनांत:
कुणाच्याही दु:खें
मेघवृष्टीने भरून येणाऱ्या
या माधवीच्या नभनील नेत्रांत,
कधी शर्मिष्ठेच्या आर्त लोचनांत
आरक्त देठाच्या पारिजाताच्या पलकदलांत:
कोमल बावऱ्या
विश्वासएवढ्या अथांग जळांत
त्वचेच्या पैल तेवणाऱ्या त्या देहाच्या दिव्यांत
निरांजनाच्या शांत ज्योतींत
पाहतों मी जेव्हा

वाटतें असें–
आजच पहा
जाईजुईच्या फुलांच्या जाळींत शेजेवरच्या
लपवून मुख स्फुंदणाऱ्या या मुग्ध माधवीला
विचारिलें मीं,
"काय करशील
मुक्त केलें तर
ढका न लावतां तुझ्या कौमार्याला
अलंकारूनी वस्त्रांभूषणांनी
घरीं तुझ्या तुला पाठविलें तर
असें अनाघ्रात,
काय करशील ?"

"परत आता घरीं न जाईन
घर मोठें झालें कोसळून भिंती
वस्त्रेंभूषणें शृंगार कशाला ?
माझी लाज आता झाकील माझा शेव करूणेचा
आपंगितांचा,
तीर्थयात्रा मी करीत हिंडेन
मागीन आयुष्य मुक्तीच्या दातारा
या माझ्या पित्याला,
पडतां पडतां एकदा तरी– सावरलेल्या
दु:खी पतिताचें
कल्याण मागीन."

"सावरलेला ? कशाचा ? कुठे ?
सावरिलें तूं, पडलों जेव्हा हृदयव्यथेने
गडबडा लोळत बेशुद्ध बेभान,
तूंच सावरिलें नराधमाला या
तुझें शील जाळूं निघालेल्या या दुष्ट दानवाला
केलेस तूंच शीतल उपचार–
अत्याचारी दुष्ट पाप्यासाठी तूं
आसवें भरून आणिलींस डोळां."

"आसवें आलीं तुमच्याही नेत्रीं,
कुठे काळजांत खुपल्याशिवाय, दुखल्याशिवाय
व्यथेवाचुनी फुटती न अश्रु,

त्या वेदनेंत जीवनांचे नवें
फुटतें पातें हिरवहिरवें:
लेऊन जिभाळी रोज अमृताची."

डोळ्यांत तिच्या
हास्याचें ओलें असें ऊन सांडे,
पाहिलें होतें जें तुझ्या डोळ्यांत
सहस्त्र वर्षांपूर्वी एकदा मी
आज या रात्री पाहिलें फिरून
आणि वाटलें–
राखेंतून सूर्य वेचिता येतील!

शृंगारून माधवीस आधी
शिबिकेमधून घरीं बोळवीन–
खरेंच नाही
साजेशी तिला सुवर्णशिबिका ही,
पालखी हवी
सुंदर कशी तिला या दिव्य अरूणोदयापरी!
–जाऊं दे
नंतर–
जेव्हा तूं येशील
येथे माझा देह दिसेल तुला शांत पडलेला
सुवर्णदंड
विसरून साऱ्या यातना–तृषा
अन् मी स्वता
क्षितिजाच्या पैल
गेलों असेन वेचण्यास सूर्य
राखेमधून!
–असलाच तर!!
असो. आशीर्वाद अनेकोत्तम
अनृणी तुझा
पिता.
ययाती

अग्निपथ

भागवताच्या चौथ्या स्कंधातील चौदाव्या अध्यायात वेनराजाची एक लहानशी कथा आहे. त्या कथेवर प्रस्तुत काव्य आधारले आहे. वेन हा एक आत्मपूजक व प्रजापीडक दुष्ट राजा होता. यज्ञ बंद करून, विष्णूऐवजी स्वत:चीच पूजा करण्याची त्याने ब्राह्मणांस आज्ञा केली आणि प्रजेचा छळ आरंभिला. ऋषि–ब्राह्मणांनी त्याला या मार्गापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्या राजाने कुणाचाही उपदेश ऐकिला नाही. म्हणून क्रुद्ध झालेल्या त्या तपस्व्यांनी त्या अधर्मी राजाचा हुंकाराने वध केला, अशी मुळात कथा आहे.

यज्ञ ही एक आर्यांची सामाजिक संस्था होती आणि फार प्राचीन काळी भारत वर्षातल्या काही भागांत लोकनियुक्त राज्यपद्धती अस्तित्वात होती, या दोन गोष्टींचा समन्वयाने विचार केल्यास, कथेतल्या या घटनेमागे कोणते विचार, कोणते विकार व कसल्या भावना आंदोलन होत्या, याची कल्पना येण्यासारखी आहे. या धार्मिक असंतोषाच्या घटनेमागे एक लोकक्रांती जागृत झाली होती, व्यक्तिस्वातंत्र्याचा नि मानवतेचा विध्वंस करून, एकतंत्री सत्ता चालविणाऱ्या सर्वाधिकाऱ्याला, अतिमानव होण्याच्या भयंकर महत्त्वाकांक्षेच्या धुंदीत जनतेच्या इच्छांना तुडविणाऱ्या झोटिंगशहाला झालेला मानवतेचा तो पहिला प्रतिकार होता, ते एक युगांतर होते.

रूपकाचा आश्रय करून हुंकारातून ध्वनीत केलेली ही क्रांती ज्ञात असलेल्या मानवी इतिहासातली पहिलीच जनक्रांती ठरेल. इतिहासातला हा पहिला मानवी प्रतिकार हिमालयाच्या कुशीतच प्रारंभी जागृत झाला– या काव्यदृष्टीने मी या खंडकाव्यातल्या कथावस्तूकडे पाहिले आहे.

हे झाले काव्यवस्तूविषयी. आता रचनातंत्रासंबंधी थोडेसे सांगतो. या काव्यात कथन व नाट्य या दोन्ही रचनापद्धतींचा उपयोग व संयोग करून कथावस्तूचा विकास व परिपोष करण्याचा प्रयत्न मी केला आहे. पूर्वार्धात लोकस्थिती व प्रजेने राजावर केलेल्या अभियोगाचे वर्णन कथनपद्धतीने केले आहे, तर उत्तरार्धात, राजाच्या अत्याचारामुळे निरनिराळ्या व्यक्तींच्या व्यक्तित्वाचा कसा कोंडमारा झाला, त्यांच्या भावनांच्या वादळात क्रांतीचे वारे कसे वाहत होते, आणि असंतोषाच्या हुंकारामागे मानवतेचे व स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची तळमळ कशी उफाळत होती, हे कांही प्रतिनिधिक पात्रांच्या द्वारे वदविले आहे. येथे नाट्यपद्धतीचा उपयोग केला आहे. आत्मनिवेदनाच्या पद्धतीत जगातल्या अतिगहन व कोमल सत्याला न कळत वाचा फोडण्याचे सामर्थ्य असते. या दोन पद्धतींचा संयोग काव्यवस्तूच्या विकासास किती उपकारक झाला आहे, ते रसिकांनी ठरवावे.

व्यासवंदन

भगवान व्यास, तुज ही प्रणती
अर्णव तूं अम्हि तुझे लाडके चलतरंग तीरावरती
प्रतिमा तव, रविमाला उजळे
मंथर भावचि, सागर उसळे
तव पदपंक्ती, जीवन सगळें!

अजर अमर तूं मानवतेचा स्वतंत्रतेचा कवि जगतीं
भगवान व्यास, तुज ही प्रणती

हिमालय, तुझें धवलोन्नत शिर
हृदय तुझें भारत हें सुंदर
मंत्रघोष तव, गंगामर्मर
दिक्कालांवरि बाहु उभारूनि, वरदान द्या मुने, आम्हांप्रति
भगवान व्यास, तुज ही प्रणती

पूर्वपथ

हिमगिरिची धवलोन्नत शिखरमालिका
पूर्व हिंद-यशोहास्य राशिभूत का?
मानवतेचें की जड व्यथित हृदय हें
स्वर्गकपाटें फोडुनि क्रंदतसे हें!
युगनिद्रेमधि भारतराष्ट्र झोपलें
वज्र तयाच्या उशास हें पडलेलें!
छेदाया पारतंत्र्यपाश, कधीची
वाट बघे निद्रित नव इंद्रकरांची!!

कल्पने, कशास उगी पंखभरारी
सांग कथा, जी जागे या हिमकुहरीं

ती प्रभात हिमधूसर, नुजळली प्रभा
शांत हिमालय, असाच टेकुनी नभा
स्कंधीं शिरिं ढगमाळा विरळ पसरल्या
मिळति त्यांत रात्रीच्या खिन्न सावल्या
या छायांतून अरूणराग उसळती
पदर धुक्याचे वरूनी धवल पसरती
पिंजुनि कापूस पडे बर्फ मधोनी
जाई कलहंस एकटाचि उडोनी
फडफडाट तो त्याचा पवनिं नादतो
अर्धसुप्त गगनाचा श्वास वाटतो!

नक्षत्रें लपति, जाय रात्र संपुनी
अजुनि पूर्ण तम न सरे परि दिशांतुनी
रात नीळ हिमराशीवरति वरसते
एक शेष चंद्रकला क्षितिजिं झळकते
छायांतुनि फुटत नभीं अरूणरक्तिमा
खाली हिमगिरि अफाट, स्फटिकनिभ कमा
अचल हिमाचल भासे ध्यानमग्न की
तुहिनधवल दीर्घ जटाभार मस्तकीं
प्रलंयकर शिव का तप करित बैसला

अरूणोदय तो त्रिनेत्र ध्यानिं झाकला!
ध्याननिमीलित का हो तो त्रिलोचन?
की उघडुनि अपलक करि अग्निनर्तन?
शिखरें तीं उतरूनि या, पहा खालती,
या भूवरि तरूण अरूणकिरण संगतीं
दशदिशांत पसरतात आरूणी छटा
त्या प्रकाशिं पेटतात कृष्णघनघटा
पथिं, हिमांतही ज्वाला आर्द्र जागती
जीवनधन हिमराशींमधिहि निर्मिती
घन धुक्यांत, जें कुहरीं झाकलें दिसे
नगर हिमाचलकुशींत 'श्रीपुरी' वसे

चोहिकडुनि तुंग तुंग ही गिरिमाला
हरित असित तीमध्ये घन वनमाला
ये जलप्रपात हसत पर्वतांतुनी
धरणीचा पहिला प्रतिकार जीवनीं!
शैलखंड गिरिकपाट चिरून चालला
नच विकास बंधनांस भिउनि थांबला
गात झरा येउनिया या वनस्थळीं
जीवनकासार निर्मि पर्वतातळीं
त्या जळांत तें धूसर नगर बिंबलें
शोधिते भविष्य राजधानि आपुलें

अरूणरागरंजित जळिं नगरगोपुरें
तळपति, किती उंच उंच राजमंदिरें
उज्ज्वल प्रकाश किती– लाट आरूणी!
हें न तेज, उठति जाळ गोपुरांतुनी
तरूगृहांवरूनि कसा धूम दाटला
पसरे युग–असंतोष काय साचला!
मंगल प्रभातदुंदुभी न वाजती,
मंद्र सामगायनसुस्वर न गुंजती,
श्रवणिं एक कोलाहल ये भयंकर
क्षुब्ध लहरिवरि डळमळ दिसत 'श्रीपुर'!
मुक्त पहा श्रीपुरिचें महाद्वार हें
काळाचें चकित थकित मुखविदार हें!
प्रहरि धनुर्धर दारीं, शर गुणासनीं
लखलखती भालेही ते पथांतुनी
स्नेहहीन विश्वचक्र किरकिरे कुठे!
कोलाहल राजबिदींतुनि असा उठे

राजपथीं दिसती जन क्षुब्ध धावते
दोरीहुनि सुटलेले शर ताडित ते
धनुषकोटिंनी सैनिक त्यांस अडविती
क्षण थांबुनि फिरूनी संमर्द लोटती

पौर रमणि सौधावरि गवाक्षीं किती
मृगनयना समयोत्सुक उभ्या, पाहती
नीरांजन, आरती न, तेवते करीं
पुष्पें नच तबकीं, नच मोद अंतरीं
राजमंदिराकडेच लोक चालले
मधुनि कुठे मार्गावरि ऊन पसरलें
स्कंधीं धनु पाठीवरि कसुनि तुणीरें
क्षात्र वीर, राजपुरूष निघति समोरे
खिणखिणती हय त्यांचे धूळ उडवुनी
किंकाटति गज शुंडादंड उभवुनी
रूद्राक्षें कंठिं, अंगिं भस्म चर्चुनी,
पांघरूनि व्याघ्रांबर, मृगाजिन कुणी
ऋषि, मुनी, तपस्वि, मनस्वीहि चालती,
उडति जटा, नेत्रीं अभिशाप पेटती!
ललना त्या संमदीं कितिक मिसळल्या
किरणापरि जलक्षोभिं त्या चकाकल्या!
ग्राम्य, दीन, पीडित किति जीव त्यांतले
अस्थिशेष, तनुवरचें वस्त्र फाटलें
पांघरवुनि पृथ्वीशीं वसन भर्जरी
राखाया लाज ज्यां न चिंधिही पुरी
पुरूषभरी अन्नरास नित्य घालुनी
क्षुधित राहिले दिनांतिं सतत जीवनीं
निवारा न वैजयंत रचुनि ज्यां मिळे
पांघरून धूळ, शिलाखंडिं झोपले,
अर्धमुक्त, अर्धसुप्त, अर्धझाकले
स्फुल्लिंगचि येती ग्रामीण त्रासले!
नेत्रीं आरक्त दिसे भूक युगाची!
पिचल्या हाडांत दिसे शक्ति नगाची!
लटपटती क्षीण पाय ते पथावर
पायचलीं याच येई तें युगांतर!!

कोलाहल,धूळ उडे त्या पथांतुनी
धूमलोळ येति राजमंदिरांतुनी

"पुत्राच्या अत्याचारांस त्रासुनी
अंगराज निर्वासनिं जाय ज्या दिनीं
त्या दिनींच आजचें भविष्य अंबरीं
रक्ताक्षरिं तप्त लिही सूर्य निजकरीं!"
मुनि म्हणती, एक वलित जटा सारूनी,
राजपुरूष, नाचवीत शर, वदे कुणी–
"क्रूर नृप असाच, बाळपणापासुनी
नर्मकलहिं, प्रिय मित्रा वधित हासुनि
विद्ध शरीं कोणाच्या प्रश्नमृग, पडे
युवराजक्रोधा अन् मित्र बळि पडे."

"चौदा भुवनांत अम्ही 'अंग' शोधिला"
वृद्ध राजकारणि तों एक बोलला:
"शोध न त्या नृपतीचा परि कुठे मिळे
अगतिक नि:श्वास! मंत्रि परत लोटले
व्यक्तिला विचार, दृष्टि–तेज लोचनां
नेता राष्ट्रास तसा प्रगतिजीवना,
म्हणुनि विप्र मंत्री मग अराजकभयें
राज्यावर या वेना स्थापिती स्वयें
हेंच शस्त्र परि टाकुनि मूठ उलटलें !
पथदर्शक दिवटीने पथिक जाळिले! "

"अधिकार न हा, दहना पवन लाभला"
अग्निहोत्रि सुप्ताग्निच वृद्ध बोलला,
"मी नरेश, अग्रमान सर्व मज असे
दास तुम्ही तनुमनिं मम,' भूप वदतसे
'अर्पा मज हविर्भाग यज्ञपुरूष मी!
प्रजापाल, धरापाल, विश्वपाल मी!
आश्रम जाळून, हवनकुंड तुडवुनी
विध्वंसी यज्ञ, वेन मग तपोवनीं
अपमानित यज्ञानल तो भयंकर
होइ क्रव्याद! जळे नृपतिमंदिर"

"उपेक्षिली ही माझी आग भुकेची
धग माझ्या लत्ताहत श्रमिक करांची!"
त्या विप्रा, श्रमिक वदे कर उभारूनी
तप्त धरणिधूलि उडे श्रमिकलोचनीं!
यथाशक्ति कर घ्यावा प्रजेपासुनी

वर्ते ही राजनीति भूप सोडुनी
धन देउनि, ही उपाशि तनुहि देउनी,
करभार न पूर्ण होय अजुनि जीवनीं
मानवस्वातंत्र्य दान मागतो बळी
सत्ते, नच पचतो परि कधिहि नरबळी!"

"सृजनशक्ति श्रेष्ठ ती स्वतंत्रतेहुनी
स्त्री हें तिचें प्रतीक थोर महिहुनी
क्रोध तिचा हा जागे राजगोपुरीं!"
ऋषिकन्या गर्जे मग चव्हाठ्यावरी
"भोगमदीं दारूची चूळ समजुनी
स्त्रीशक्तिस दासी करि भूप वंचुनी,
प्रत्यंचा ताण सहुनि ती तुटे क्षता
बंड करी दासांची ती सहिष्णुता!
परित्यक्त राजलक्ष्मि ती पहा पुढे!
सांगूं ये, राजा भरलेच तव घडे"
तापस आरक्तवदन करूण सुंदरी
त्यक्ता ती रमणि उभी चौपथावरी
उडति मुक्त केश मुखीं, निटिलसिंदुरीं
धुम्रलोळ ज्योतीच्या जणु शिखेवरी!
आकांक्षा जनतेची दलित ती दिसे,
का फनिल प्रलयलहरिभंगिमा असे!
राजमंत्रि जवळ उभे, शांत बाहिरी
मंत्र राजनीतीचे गुप्त ज्यापरी
निष्कोषित खड्ग जसें किरणिं लवतसे
सेनापति तो अधीर पुढति फिरतसे,
राजकवी स्तब्ध उभा, गीत जागतें
नवयुगिचें उदयगान की निनादतें!
अंगारचि भस्मराशिंतील उजळते
भार ऋषींचेहि उभे राहिले तिथे,
त्यामागे लोक असंख्यात पसरले
पुलक पुलक, पृथ्वीचें काय जागले!
दशशतजनचलनि असें नगर लहरतें!
दशशतकलकंठिं असें नगर गर्जतें!

सिंहद्वारासमोर राजसभेच्या
भव्य त्या पटांगणांत नगरवीथिच्या
स्तंभाशीं बद्ध वेन चरणिं शृंखला,
राजदेह रक्तचंदनें विलेपिला

रक्तपुष्पमाळाही कंठिं लोंबती
रक्तछटा घूर्णित नयनांत चमकती
आव्हानें स्वीकारूनि जनक्रांतिचीं,
शांत उभा वेनराज नग्न खड्गची
अनुताप न, दीनता न, भीति लोचनीं
पंखहत गिरीच उभा खवळल्या जनीं
राजगृह दृष्टिपुढे जळत धडधडा
स्वर्णकळस कोसळती पुढति कडकडा
जाळलोळ लाललाल वेंघती नभा
चाटुं येति जणु कराल नियतिच्या जिभा,
उत्तेजित लोक उभे क्रुद्ध भोवते,
जणु अशांत भद्रकालि बळिच मागते!
राजध्वज खंडित किती पडति खालती
तुकडे नृपसत्तेचे धुळिंत लोळती
पुलक न परि नृपतीचा एक कापतो
विरघळे न हृदय, न मुखिं धर्म थरकतो

या असंख्य दीप्त तप्त लोकलोचनीं
वेन बघे निज निर्भय दृष्टि भिडवुनी
बाहुदंड आघातातुर प्रचंड हे!
धरिं, दारीं, पिडीं, ब्रह्मांडिं बंड हें!
राजमंत्रि, सेनापति, राजकवी हे
सैनिक हे, क्षुद्र तसे भालदार हे
रमणि कोण,पैल उभी हरिणलोचना?
अपमानित, निर्वासित नृप-कुलांगना

नाव-गाव ज्यांचे कानीं न कधि पडे
पुरजन ते क्षुब्ध उभे त्यापलीकडे,
सर्व आज न्याय करूं येथ पातले!
त्वेषें नृप हसुनि अधर खंडि आपुले
दंतव्रण कितिहि असो तीव्र नृपा, तो
या अजस्त्र कालचक्रिं काय उमटतो!
नवघटिका घणघणती तों दिशांतरीं
भालदार येइ पुढे, दे ललकारी:

भालदार

भालदार ललकार देई भालदार ललकार
महाराज श्रीवेन, जगिं असो तुमचा जयजयकार
देई भालदार ललकार

न्यायदंड दो हातीं धरूनी
जन–आशीर्वच–संमति घेउनि
बैसलास तूं या सिंहासनिं
पुष्पें उधळित अम्ही गर्जलों, तेव्हा जयजयकार
महाराज 'श्रीवेन'! जगिं असो तुमचा जयजयकार
देई भालदार ललकार
राजपथीं शृंखलाबद्ध तूं
उभा जनप्रक्षोभिं आज तू
जळ, ये, ज्वलनीं सुवर्ण हो, तूं
प्रजाघातकी आरोपी तूं, उठते आज पुकार!
महाराज 'श्रीवेन'! जगिं असो तुमचा जयजयकार
देई भालदार ललकार

"प्रजाघाति प्रजाघाति" हाक तों उठे
"सूड सूड" दशशतमुखिं गर्जना उठे.
"शांत, शांत" म्हणत जनां, कर उभारूनी,
उच्चस्वरिं मंत्रि म्हणे नृपतिलागुनी,
"मंत्र्यांचा बंदिंत तुम्हि न्याय ऐकिला,
जनतेचा, राजन्, अभियोग ऐकिला,
स्वेच्छेने निजराज्यत्याग करोनी
मान्य करा निर्वासन, जा तपोवनीं
हितमंत्र न मंत्र्यांचे ऐकिले तुम्ही,
क्षेम प्रजेचें न कधी राखिलें तुम्ही.
सत्ता हें दिधलें वरदान प्रजेचें!
परिवर्तन केलें दमनांत तियेचें
प्रजाघातिं राजदंड हा नियोजिला,
अधिकार न सत्तेचा तुम्हां राहिला.
मानवतेचा घे अधिकार जर बळी
दडपावा लागे तो बळि रसातळीं!
भिउनि प्रजा दमना जर मूक राहते
तेजोबल–बुद्धि तिची ऱ्हास पावते!
म्हणुनि आज हा नृपते, न्याय मांडिला
जुलुम पाहिजे असाच तो विभांडिला
तेजस्वी अन् स्वतंत्र राहशील तूं!

हे मनुष्य, मानवता प्रथम राख तूं!
दास मानवासं करूनि राज्य नच करीं
रोवीं नच विजयध्वज तूं शवांवरी!
क्षुधितांना द्याया, तव कोष सधन हे
उघड्यांना झाकाया, राजवसन हें
आपदानिवारणास, तुज शरधनु हे
अनिकेता आश्रय, तव सिंहासन हें
दंडाया दुष्ट, राजदंड हस्तकीं
गौरविण्या दीनां हा मुकुट मस्तकीं!
नर नच तूं पाळिलेस, नृप न तूं अता
दंड राजसंन्यासचि एक तुज अता
मान्य न करशिल न्याय अजुनि तर पहा
प्राणदंड आज्ञापी अखिल लोक हा!

अभिभाषण मंत्र्यांचें सर्व ऐकुनी
स्तब्ध क्षण वेन राहि नेत्र झाकुनी
खदखदुनी राजा मग विकट हासला
संघर्षी खड्गपुंज जणु खणाणला
घनगर्जित-शब्दीं मग वेन बोलला,
"प्राणदंड! प्राणदंड! भिववितां मला?
प्राणदंड कितिदा दुसऱ्यांस अर्पितां
अनुभव तो घ्यावा, मज वाटलें, स्वतः
इच्छा ती पूर्ण होय दिसत या दिनीं,
खुपलें नच कधिही मज मरणभय मनीं
जगणें मीं जाणियलें जगुनि दाविलें!
मरणें मीं जाणियलें विक्रमें, बळें!
सत्तेचा मी केला, दास नच असें
राजा मी, नच भिकार जन कुणि असें
हे मानव!- यंत्रें हीं! मम करांतलीं
योजिन वा मोडिन त्यां, इष्ट त्या स्थळीं
माझ्या ध्येयास लोक सर्व साधनें
नुसती तनु, नच जिवंत मज तुम्ही मनें!
इच्छीं मी, तुम्हि तें केलेंच पाहिजे,
आज्ञापीं, तुम्हि अनुसरलेंच पाहिजे,
सिंहासन तुमच्या तनुचें रचीन मी
अश्रुजळीं तुमच्या मज अभिषेचिन मी!
शय्या ही माझी स्त्रीजात सुंदर
शृंखला परि प्रभातिं जागल्यावर!

राजदंड बनविन जनअस्थि मोडुनी!
मद्य पिइन मी तुमचें रक्त घुसळुनी!
बुबुळांची तुमच्या जयमाळ घालिन!
फडकवीन ध्वज तुमचें चर्म लावुन
नीति काय? भीति असे, भीरू मी नसें

मानव शब्दास अर्थ कांहिही नसे
अस्तित्व न मानवांस मम जगीं कुठे
मन, कांक्षा, इच्छा, स्वातंत्र्य मग कुठे?
दुबळ्यांनो, दमन-जुलुम कांहिही म्हणा,
बळ एकच दिव्य! विफल सर्व त्याविना
राजा हें रूपच अधिकार-बळाचें!
सेवेचें अधिष्ठान, यज्ञहवीचें
नच कुणास म्हणुनी जगिं अग्रमान हा
जिष्णु विष्णु मी, पूजा मजचि, धर्म हा
पत्नी माझीच, मला येइ वधाया,
सेवक तुम्हि सजलां नृपघात कराया
हाच काय धर्म? कधी मी न पुसे हें
सत्तेचा धर्म हाच, मान्य मला हें!
पराभूत जीवनांत आज मी जरी,
ध्येय, रक्त बदलतें न, आज हें तरी
जन-क्रांति ज्या म्हणतां, बंड तें मला
सत्तेविण निज जीवन मरण तें मला
प्राणभयें जीवनगति मी न बदलितों
'काल-कारण' स्वत:स अजुनि मानितों! "

उत्तर हें ऐसें उद्दाम ऐकुनी
उकळुनिया रक्त जाति लोक खवळुनी
"प्राणदंड, प्राणदंड" हाक एक ही
नभ भेदुनि हालवुनी सोडिते मही
प्रीति, भीति, शांति मनीं कांहिही नुरे
दमनाचा सूड हाच भाव नभिं भरे
उच्चारिति न्याय मंत्रि 'प्राणदंड' हा
हुंकारत, जन धावे तो प्रचंड हा!

उत्तरपथ

उच्चारिति न्याय मंत्रि प्राणदंड हा
हुंकारत, जन धावे तो प्रचंड हा!
श्रीशिवास सर्व जसे त्रिदळ वाहती
लोक नृपा दगडांनी चिणुनि मारिती
फुत्कारति सूडाचे सर्प नभिं जसे
सणसणती दगड पवनिं वाजती तसे
अतिकराल विप्लव जें जनमनीं उठे
हें तुफान त्याचें क्षितिजांतुनी फुटे

राजकविः

झेल, झेल पाषाण
नृपा, हे झेल, झेल पाषाण
सहा प्रशस्तीपरी, कवीचे आज तुझ्या वाग्बाण
नृपा, हे झेल, झेल पाषाण

स्तुतिसुमनांच्या सुरभित माळा
तुजला, राजन्, अम्हीं अर्पिल्या
आहळुनी निर्माल्य जाहल्या!
फुलें वाहिलीं मींच, प्रथम अन् मीच फेकिं पाषाण
नृपा, हे झेल, झेल पाषाण

भावभक्ति ती तुझ्या प्रजेची
मुखरित अभिलाषा मी त्यांची!
केली अवहेळणा तयाची
फुलां लागते धार शरांची, होय गीत रणगान!
नृपा, हे झेल, झेल पाषाण!

'राजकवी' बिरूदावलि त्यजिली,
छत्री अब्दागिरी मोडिली,
कवी न कविता आता उरली
प्रणवशब्द क्रांतिचा करितसे दिशांतुनी थैमान!
नृपा, हे झेल, झेल पाषाण!

नृपति लोककल्याणा साधन
दमनयंत्र तो बनतां दारूण
जनपददुर्बलता त्या कारण
रूद्रविणा ही वाजे, जागे दिशांतुनी आव्हान
नृपा, हे झेल, झेल पाषाण

असंख्य राज्यें, नृपवंशावलि
अघोर काळानलीं जळालीं!
चिरंतनचि परि जनता उरली!
तिचा कवी मी, या शब्दांतुनि तिचे गर्जती प्राण
नृपा, हे झेल, झेल पाषाण!

राजलक्ष्मी:

प्रिया,नच रमवाया आलें
स्वप्निल तारांकित यामिनीचे रंग नितळ बघ झाले.

पल्लवांत नच वसंतनर्तन
सघन उरोजीं नच मृदुकंपन
व्याकुळतेचे सूर न अधरीं,ताडित हृदय खळाळे
प्रिया नच रमवाया आलें

सुमनहास उल्हास न कुंजी
नच मधूपांची उन्मद रूंजी
मदिरेची ती चूळ न क्षितिजी ज्वाला अरूण उफाळे
प्रिया, नच रमवाया आले

कंकणनूपुर नच रूणझुणती
मधुकलशांमधि रस न हिसळती
पथिंच्या बळिचें रक्त पदीं हें! अंगराग नच ल्यालें.
प्रिया, नच रमवाया आलें

दहिंवर–भिजली रजनी सरली
तृषा–प्रतीक्षा नयनीं विझली
मी यज्ञानल खंडिताधरीं फुंकरावया आलें
प्रिया, नच रमवाया आलें

राजलक्ष्मी:

शीळ नच कुंजांतुनि नादते
बावरूनी ऐकशी काय? नच पैंजणझंकार ते

नदींत ना व्याकुळा उर्मिळा
साद वसंता दे न कोकिळा
संकेतापरि संध्याकाळ न ढगांतुनी हासते
शीळ नच कुंजांतुनि नादते

लाज न सांडे पलकीं–गालीं
यौवनपीडा नच कुचयुगुलीं
पथिं अवगुंठनिं नवपल्लवसम तनु ही नच थरकते
शीळ नच कुंजांतुनि नादते

चुंबनांत संजीवनि न मिळे
स्त्री नच आलिंगनीं आकळे
बाला अभिसारिका मी न तव, विश्वशांति क्रंदते!
शीळ नच कुंजांतुनि नादते

राजलक्ष्मीः
आठवू नको ती रात!
स्वर्णकिरणशर सहा, पहा तूं होत विराट प्रभात!
छाया–स्वप्नें विरति, विरूं दे
दहिवर त्यांवर पडति, पडूं दे
मिलन–रात्रिची तृषा न बिंबे सरत्या रातदवांत!
आठवूं नको ती रात!

वक्षीं तव पद कुचीं चुरोनी
म्हटलें मी तुज 'देव' गदगदुनि
आत्मार्पण तें विसर, विसर ती ऊब, मृदुल हृत्प्रांत!
आठवूं नको ती रात!

श्रांत तुझ्या करपाशीं पडलें
स्कंधिं, बाहुवर केश विखुरले
निटिलघर्म चुंबुनि तूं म्हटलें 'देवि' मला उद्भ्रांत
आठवूं नको ती रात!

हृदयीं झुलवित तुला गाइलें
अश्रु दिले, निःश्वास वाहिले
प्रेमपूजनीं कळलें नाही ती वैऱ्याची रात!
आठवूं नको ती रात

राजलक्ष्मी
हें दुःख न मज तूं त्यजिलें
नदीपुरावरि आलें मी, अन् नदीपुरावरि गेलें
उच्छृंखल प्रावृषीं लहरलें
फेंनिल लाटांवरी वाहलें
असीम रत्नाकर निर्माया जीवन अजुनी उरलें!
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

मधुर अधर–हास्यापरि आलें
चांदणीपरी झळकूं म्हटलें
परि गालावरि मूक अश्रुपरि पलकांतुनि ओघळलें
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

होते तव अभिलाषापूर्ती
झालें सुटुनी, सोज्ज्वळ प्रीती
होमज्वाला बनुनि जीवनिं विद्रोहें फुरफुरलें!
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

आलिंगनपाशांतुनि सुटतां
चुंबनांतुनी अधर निसटतां
कणिंकणिं मधुघट, क्षितिजीं नवकर मज आधारा उठले!
हें दुःख न मज तूं त्यजिलें!

राजलक्ष्मीः

जागतो सूड बघ आज मनीं
प्रलय–जागरण नभीं नृपा, हें प्रातिबोध नच तव वदनीं
ऋषिकन्या मी आश्रमहरिणी
हरिलें मज तूं यज्ञामधुनी
उन्मत्ता, मम करिचें दिधलें होमपात्र तूं भिरकवुनी
जागतो सूड बघ आज मनी
यौवनधन दो हातीं लुटुनी
भोगदासि मज केलें वंचुनि
यज्ञवेदि विध्वंसुनि जाता जळशिल नच का तूं ज्वलनीं?
जागतो सूड बघ आज मनीं

मधु सेवुनि, मधुकलश फोडिले
नव रमणीस्तव मजला त्यजिलें
घोर घृणा अपमान साहिले पदर ओढुनी मूकपणीं
जागतो सूड बघ आज मनीं

जीवनधन जनतेचं हरूनी
त्रासिलीस तूं आज मेदिनी
कैवारास्तव स्त्रीच्या आली क्रांतिच बघ ही स्त्री बनुनी!
जागतो सूड बघ आज मनीं

चंद्र नयनिंचे मम मालवले
जराकंप तूं मनिं जागविले
कादंबिनि ती वर्षुनि गेली, तडित्–ज्वलन उरलें गगनीं!
जागतो सूड बघ आज मनीं

बलिरूधिरांनी किती रंगले
किती अश्रुधारांनी भिजले
त्वचुंबित या करीं फेकिले दगड पहा हे सणसणुनी
जागतो सूड बघ आज मनीं

ऋषीः (हिमालयास उद्देशून)

निज असीम हिममय तपःशांति सोडुनी
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी!

जडभरतापरि तूं स्तब्ध किती बसशिल?
निर्लज्ज किति युगें उदास तूं बघशिल?
कां पांडुर झालें रक्त तुझें गोठुनी?
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी!

ह्या गंगायमुना अश्रुधार वाहुनी
तव व्यथाभार हलका नच करितिल कुणी
तूं त्रिनेत्र उघडीं, तुहिनजटा अपटुनी
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी

शशितारामंडित भालावरि गिरिवरा,
अरिलत्ता साहशि किती चंद्रशेखरा
तूं प्रलयतांडवा वीरभद्र, उठ झणीं
हिमनगा, खवळ तूं अग्निगिरी होउनी!

ऋषीः

यज्ञाग्नि अखंडित जागृत हा!

भागिरथीचे स्त्रोत सोड तूं
ओत अश्रु तूं, वर्ष रक्त तूं
ज्वाला हिमालयाच्या कुशिंतिल विझे न ही कल्पांतिं पहा
यज्ञाग्नि अखंडित जागृत हा!

असंतोष धुमसते प्रजेचे
शाप मूक ते दलित जनांचे
यज्ञवेदिंतुनि जागतात, त्यां राजा, वंदुनि नमुनि रहा
यज्ञाग्नि अखंडित जागृत हा!

शांतिगिरा ऐकिली न ही तूं
ये विद्रोही, आहुति हो तूं
होण्यापूर्वी भस्म, फुलविला नृपा, तुझा अंगार पहा
यज्ञाग्नि अखंडित जागृत हा!

सेनापतिः

उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी!
घाव घेइं क्षत्रिया, छातिवरि, उरे धैर्य जर कांही उरीं

प्राण आपुले खरूनी खरूनी
समरधीर असिलतेलागुनी
धार तुझ्या लाविली जयांनी
त्या शूरांवर वार काय? छे, खड्ग लाजतें पहा करीं!
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी!

जिवंत तनुच्या अस्थि अर्पुनी
वज्र दिलें तुज ज्या दधीचिंनी
महेंद्र केलें ज्या मनस्विंनी
वज्राहत त्यांनाच करिशिं तूं! घे मग हे अभिशाप शिरीं
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी!

ध्वज केला अम्हिं अंग सोलुनी
रंगविला तो निज रूधिरांनी
दिला तुझ्या करिं 'रक्ष' म्हणोनी
मानवतेचा स्वातंत्र्याचा ध्वज तो बुडविशि पायदळीं!
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी!

रक्षक जोवर मानवतेचा
तोवर तूं अधिराज आमुचा
सेनाधीश्वर या सेनेचा
फितुर समोरी आज उभा तूं लाथाडुनि जनपदा दुरीं!
उलटलें शस्त्र तव तुझ्यावरी!

मंत्रीः

संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार
देश अराजकिं रक्षायाला
राजा आम्ही केलें तुजला,
प्रजेवरी तों तूंच उलटला
सहन करील न राजनीति ही अशी भयंकर हार!
संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

श्यामल धरणी, हरित शस्यधन
महार्णवींचें अनर्घ्य मणिधन
दुर्बल दीनांचें जीवनधन
प्रहरी यांचा राजा, लुटिशी तूंच स्वता भांडार!
संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

जोवरि जनता हेतुसिद्धि तूं
सहस्त्रबाजू, सहस्त्राक्ष तूं!
करितां परि विश्वासघात तूं
जीर्ण दलासम उडविल तुजला क्षुब्ध प्रजाहुंकार!
संहारक तूं बनशि नरेंद्रा, जनपदपालनहार

मंत्री

तूं अग्निपथींचा पंथी
राजन्, अग्निपथींचा पंथी
सतत चालणें धर्माश्रूंनी रूधिरीं भिजल्या पंथीं
तूं अग्निपथींचा पंथी

उंच रूखावळि मार्गी असतिल
सघन तयांच्या छाया शीतळ
एकपत्र छायाहि कुठे तूं परि न मागणें, पंथीं!
तूं अग्निपथींचा पंथी

असतिल मनमोहन पडशाळा
सुधामधूच्या पथिं रसशाळा
एक बिंदुचा परी न तेथे तूं अधिकारी, पंथी
तूं अग्निपथींचा पंथी

धरा–गगन तुज दिधलें उसणें
नवें विश्व तूं त्यांतुनि रचणें
देवाचाही ऋणि न रहा, हो तूंच विधाता, पंथी
तूं अग्निपथींचा पंथी

ध्येयमार्ग हा तूं चुकलाशी
ज्वालामुखिविवरीं पडलाशी
तप्त शैल–लाव्हारस–वर्षा सहा, भटकत्या पंथी
तूं अग्निपथींचा पंथी

रथकार ✲
क्षणभर जुलुमा बसूं न देऊं अमुच्या जीवनरथीं
नृपति तो ओढा रे खालती

या कालपथावरि लंघुनि युग–योजनें
ओलांडुनि क्षितिजें अनंत तारांगणें
नव विश्व, भविष्यें नवीं अम्हां शोधणें
रोधितो कोण परि गती ?
नृपति तो ओढा रे खालती

अनिरूद्ध गतीचा रथ हा ज्योतिर्मय
त्या आकांक्षांचीं चाकें विद्युन्मय
निज जीवनमार्गे धावतसे निर्भय
स्वातंत्र्यकेतु फडकती
नृपति तो ओढा रे खालती

दलितांच्या दु:खें मिळे रथा या गती
दिक्काल रथाच्या गतींत मग बदलती
अन् धुळींत याच्या स्वर्गंगा उधळती !
चाकांत जुलुम रगडती !
नृपति तो ओढा रे खालती

"प्राणदंड ! प्राणदंड !" लोक गर्जती
चौपथांत चोहिंकडुनि शिला वर्षती
गर्जत जन उधळत ते स्वैर पसरले

✲ त्या काळी सिंहासनारूढ होताना राजाला रथकाराची देखील संमती मिळवावी लागत असे, तेव्हा जुलमी राजाला पदच्युत करताना, त्या रथकाराचे उद्‌गारही असेच काहीसे असतील नाही का ?

दिग्गज–पदलंगर जणु आज भंगले!
त्राहटि कुणि शंख, कुणी शिंग फुंकिती,
सिंहनाद करित कुणी वीर धावती
अग्निगिरीस्फोटांतुनि शिला उसळती
पुरजन संतप्त तेवि दगड फेकिती

स्त्रिया पळति सांभाळित आपुल्या मुलां
संतापुनि म्हणति, "पडो नृपशिरीं शिला."
मुखिं त्यांच्या क्रुद्ध व्यथा अशी उमटते
धरूनि तप्तरस कुशींत धरणि कापते!
गर्जत जन, उधळत ते स्वैर पसरले
दिग्गज–पदलंगर ते आज भंगले!
राजतनू झाके त्या शिला–वर्षणीं
स्तंभ पडे तो चतुष्पथांत कलथुनी
गुडघाभर शिलाखंडराशि ती अता
कैलासाहूनि उंच दिव्य भारता
प्राणज्योत एक जरी येथ लोपली
मानवता स्वातंत्र्या येथ जागली!

राजगृहांतूनि अजुनि जाळ उसळती
अग्निरसीं मंद सांध्यरंग मिसळती
नक्षत्रें एक–एक नभीं उगवती
धरणीवर शुभ्र रत्नतेज वितरिती
दिवसा जे राजांवरि दगड फेकिले
तारे ते रात्रीं गगनांत जाहले!
निष्ठुरता दिवसाची अस्त पावुनी
माउलिच्या पदरापरि रात्र ये जनीं!
आशीर्वच द्याया कर कुणी उभविले
तारांकित तळहातचि गगन पसरिलें!

आशीर्वादापरि अन् देवि सुनीथा
पुत्रशवा शोधाया ये चतुष्पथा
छिन्नभिन्न झालेला पुत्रदेह तो
अंकिं घेइ सारूनिया शिलाभार तो
मृतमुखिंचें रक्त पुशी ती हळू करें
रोधिल परि कोण तिचे नेत्रिंचे झरे ?
देवांनो, स्वर्गाहुनि दिव्य ही मही
मानवता देवत्वाहूनि कठिण ही!
कर्तव्या बळि देउनि पुत्र सकाळीं
अश्रु माय वत्सावरि रात्रिंत ढाळी!

त्या अश्रुंत करूण आर्द्र गीत लहरतें
दग्ध पृथ्वी चिरजीवन त्यांत पावते!

सुनीथाः

बाळ नीज कल्पवरी, नीज सुखें घेई
अंत्यवसन आईचा पदर तुला होई

दमनांच्या ईर्षांनी
पापांच्या स्वप्नांनी
आघातीं वा व्यजनीं
चाळवुनी झोप अता भंगणार नाही!
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

अत्याचारां बघुनी
तव हनना ही जननि
दगड करीं ये घेउनि
शोकभरें गोठुनि परि हृदय शिला होई!
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

तव रूधिरांनी भिजुनी
होय वसुमती धरणी!
बघ न, नयन उघडोनी,
जीवनिं तुज दुग्ध दिलें, मरणिं अश्रु घेई!
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

मरण वरूनि, अभिमानी
वाचविली तूं जननि
उन्नत मी पृथ्विहुनी!
मुक्त कराया भू, मी पुत्र बळी देई!
बाळ, नीज कल्पवरी, नीज सुखें घेई

गर्भभार वागवून
प्रसववेदना सहून
जडदेहीं प्राण भरून
विश्वा या आश्वासन नित्य देइ आई
नीज, बाळ,कल्पवरी, नीज सुखें घेई

स्थिर राही तूं धरणी
तळप नभा, सूर्यांनी
सिंधु, हास रत्नांनी!
हे मनुष्य, अनिरूद्धा, तूं स्वतंत्र राही!
नीज, बाळ, कल्पवरी, नीज सुखें घेई.

राजगृह पैल उभें धडाधडा जळे
जाळलोळ गोपुरांमधूनि भडकले
ज्वाळा त्या लवलवती, चढति वरिवरि
आहळलें तारांगण दिसत अंबरीं!
सांद्र अग्निरसचि, भवति तेज पसरलें
तम दिशांत रक्तांनी काय नाहलें?
घोंघावत वाऱ्याचा झोत ये जसा
ज्वालांचा तेजोध्वज नभिं डुले तसा!
ठिणग्यांचीं अग्निफुलें उडति भोवती
गुल्मोहर आगीचे मार्गि बहरती

त्या प्रकाशिं आर्द्र रक्त चमकतें कुठे
दिसती करचरणखंड पसरले कुठे
राजमुकुट वेनाचा लोळतो कुठे
खड्ग कुठे, मणिभूषित बाहुही कुठे
छिन्नभिन्न भ्यासुर प्रेतांमधी कुठे
अर्धमृतचि जीव कुणी विव्हळुनी उठे!

सोसाटत वारे फिरफिरूनि वाहती
अग्निपताका ज्वलंत गगनिं फडकती
पुष्पवृष्टि ठिणग्यांची सतत चालते
रक्ताळित वाट निखाराच तळपते!
ज्वालेपरि पसरत मुरडूनि वळतसे
क्रांतिचाच जणु असीम अग्निपथ असे!
या पथिंचे पथिक पहा येति चालत
नवयुगिचें उदयगान गात गर्जत
क्षिति नच त्यां रूधिरांची सांडल्या असे
चिंता नच जखमांची त्यां मुखीं दिसे
जखमांतुन बिंबित जय भावि पाहती!
बांधुनि पाठीस मृत्यु मार्ग चालती

जनताः

सर्वः

करूं तिथे आघात
पहिला करूं तिथे आघात
चला रे, करूं तिथे आघात
स्वर्गातुनि दुबळ्यांवर घडतो जेथे वज्राघात
पहिला करूं तिथे आघात!

पहिलाः

'शिव' नयनांना बघूं न देती
'सत्य' वाणिला वदूं न देती
प्रगतीला शृंखला घालिती
मानवतेस्तव वळती जेथे फास मानवी हात!
पहिला करूं तिथे आघात!

दुसराः

ज्यांच्या श्रमजळिं नभिं घन भरले
धान्य जयांच्या तपनीं पिकलें
यश ज्यांच्या मरणांत जन्मलें
गुलाम त्यांना करिती जेथे तयांच्याच देशांत!
पहिला करूं तिथे आघात

तिसराः

राजगृहांसह, धर्ममठांसह
नगरपुरांसह, साम्राज्यांसह
शत-शत राजांसह, देवांसह
ब्रह्मांडाचा भार वाहि त्या शिरीं मारिती लाथ!
पहिला करूं तिथे आघात!

सर्वः

चला रे करूं तिथे आघात!
स्वर्गांतुनि दुबळ्यावर घडतो जेथे वज्राघात!
पहिला करूं तिथे आघात!

क्रांति-पुरूष तेच आज या पथाहुनी
दग्ध राजसभास्थानीं जाति धावुनी
लाथेने राजपुरूषतुन झुगारून
रडत्या नृपमातेला पैल सारूनी
जळत्या त्या महाद्वारगोपुरावरी
जनसत्ताध्वज उभविति लोक निजकरीं
ज्वालेसह ज्वालेपरि नव निशाण तें
फडफडतें, भासे नवयुगचि अरूणतें!

भ्यासुर निज पुत्रदेह कवळुनी उरीं
दीन राजमाय रडे चौपथावरी!
श्वान कुठे विव्हळे प्रेतास फाडुनी
घुत्कारे घुबड वृक्षसावल्यांतुनी
जीर्ण जगत् हें रडतें त्यास रडू द्या!

पोखरलें कुजकें ब्रह्मांड फुटूं द्या!
जून जगाची दांडी तुटे वाकुनी!
कोसळते जीर्ण धरणि अक्षभंजनी!

हा विनाश, क्रंदन हें कोण पाहतें
नवयुग या प्रलयरात्रिमधुनि दिवसतें!
ध्वस्त गोपुरीं ध्वज जन म्हणुनि उभविती
संहारक्रंदनिं युगगीत गर्जती

जनता:

ध्वज आज नवा उभवूं
कपोतबाळें रक्तपिपासू श्येनाशीं लढवूं
ध्वज आज नवा उभवूं

निशाण जुलुमाचें, दमनाचें
चिन्ह आमुच्या परवशतेचें
बलोद्धतांच्या गर्वपताका पायदळी तुडवूं
ध्वज आज नवा उभवूं

रम्य भविष्याच्या स्वप्नापरि
तेव्हा प्रलयविजांच्या घडिपरि
ध्वज डोलूं द्या, साउलींत त्या नव पाइक जमवूं
ध्वज आज नवा उभवूं

वसन ध्वजाचें विश्वशांतिचें
रंग पदाहत आकांक्षाचे
असंतोषज्वालेपरि फडफड युगपल्लव उडवूं!
ध्वज आज नवा उभवूं!

राजाचें सिंहासन उलथे
धरणि फुटुनि तारांगण कलथे
ढासळलेले बुरूज जगाचे अग्निफुलीं फुलवूं!
ध्वज आज नवा उभवूं

प्रतिकारा तृणपातें उठलें
आसन इंद्राचें हादरलें
वज्राशीं झुंजण्या बाहुल्या मातींच्या सजवूं!
ध्वज आज नवा उभवूं

'दोनुली'

(माझ्या दिवंगत पत्नीस अर्पण)

दोनूलीः

हा काव्यसंग्रह म्हणजे कविवर्य कांतांच्या साठ दशकांच्या काव्य प्रवासातील उर्जस्वल प्रतिभेच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. "दोनूली" मधील जोडकवितांना स्वतंत्र परंतु एक द्वयार्थक स्वयंभू अर्थ आहे. मराठी काव्यसृष्टित हा काव्यप्रयोग अपूर्व व अभिनव आहे. दोनूली मधल्या अनुभूतीचा कांतांनी आपल्या अर्थगर्भ प्रस्तावनेत उहापोह केलेला आहे. साधारण १९६६ ते १९७८ ह्या दीर्घ काळातील फक्त २५ काव्यरचनाच संग्रहात आढळतात. मनुष्याचं जीवन हे अनेकविध आहे, द्वंद्वरूपही आहे. द्वंदात्मक सृष्टीमधील अनुभवही द्वंद्वात्मक असतो अस कांतांच परिमाण आहे. वास्तव व कल्पनीय या दोन भिन्नधर्मी घटकांचं अस्तित्व काव्यात असतं. वास्तव हे जीवनातील घटना प्रसंगातून अनुभवातून हाती येतं तर कल्पनीय चिंतनातून जन्माला येतं पण ही दोन्ही तत्त्व जीवंत व उन्मेषशाली असतात. काव्यानुभव साकारतांना हे दोन्ही अनुभव स्व–अतीत होतात तेव्हा त्यांना अनुभवाचं एक आणखी तिसरच परिमाण लाभतं. "दोनूली" मध्ये बहूतेक कविता निसर्गपर आहेत असं पाहिलं तरी त्या मधून मानवी जीवनाचे, विश्वाच्या गुढ अनाकलनीय रचनेचे, स्थलकालाचे अनादि–अनंत तत्वाचे चिंतन दिसून येते. रान, उन, वारा, तळं, कमळं, अंधार, समुद्र इ. कविता निसर्गावर लिहिलेल्या असल्या तरी त्यात निसर्ग नसतो. एकदोन कविता मधून ऐतिहासीक स्थळांचा उल्लेख आढळतो. परंतु त्यात इतिहास नाही. शब्द, अस्तित्व, वारा, दू:ख प्रेम हे विषय केवळ निमित्तपात्र, हे सगळे विषय अमूर्त तरी ते विषय तिथं नसतात. अनेक आशय व अनुभवांचे अंकुर हे "तूस" फोडून उगवू पाहतात, पान कोंभू पाहतात. तसेच रस्ते, स्तन, पूत्र या कवितांमधून कथात्मक वर्णन असली तरी त्यातली कथा ही कथा उरत नाही तर या अनुभवांमधून जीवनाचं वेगवेगळं दर्शन कांत इथं मांडतात. कांतांच्या म्हणण्याप्रमाणे कलावंत करीत असलेला वास्तवाचा शोध मनाला खोलवर आनंद तरी देतो किंवा दू:खाची मनस्पर्शी जाणीव करून देतो. अर्थात या जाणीवा कलात्मक शोधाच्या वाटेनेच जातात. ५/६ कविता संग्रह प्रकाशीत झाल्यानंतर स्वत:च्याच कवितेवर "दोनूली" सारखा नवा चिंतनगर्भीत प्रयोग करावा हे धाडसाचे होते. पुढे कांतांच्या "दोनूली" सारख्या काव्यप्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले हे "अलाहिदा", परंतु "दोनूली" मधील कविता ही वास्तववादी असून आदर्शवादी आहे. जीवनवादी असूनही ती कलावादी आहे. कलावादी आहे म्हणूनच ती चैतन्यस्वरूपी आहे. समाज, निसर्ग, व्यक्ति, इश्वर, कला या सगळ्यांच्या पलिकडे जावून तिच्यातलं एक वेगळं चैतन्य वाचकाला जाणवंत चैतन्याचं हे तत्त्वज्ञान सांगतांना कवी कांत म्हणतात–

"जळात, उन्हांत पाखरांच्या माळा
बिंबांचा सोहळा प्रतिबिंबी
सहज गळावे देहाचे या भान
पिकलेले पान तळ्यामध्ये
बिंबतात झाडे तीरीची पाण्यात
तसे कवितेत नांदो आम्ही–"

मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा "दोनूली" हा फक्त काव्यसंग्रह नसून जीवनातील भावानुभूतींची तरलता सांगत असतांनाच एका नव्या चैतन्याकडे झेप घेवू पाहणाऱ्या क्षमतेची एक संवाद–अभिव्यक्ति आहे.

'दोनुली'
देठाचं मनोगत

'दोनुली' हे या काव्यसंग्रहाचं नुसतं नाव नाही. त्यापेक्षा काही अधिक आहे.

वेगळ्या ठाणमाणाच्या पंचवीससव्वीस कविता यात संग्रहित केल्या आहेत. ते 'ठाणमाण', भावानुभूतीचं ते भान या शब्दातून सूचित व्हावं. या कवितांचं स्वरूप द्विदलात्मक आहे असं मला प्रथम वाटलं होतं. पण त्या शब्दानं या काव्याचं यथार्थ आणि संपूर्ण रूपांकन होत नाही, असं नंतर लक्षात आलं. खरं म्हटलं तर ते रूप उगवत्या रोपासारखं आहे. खाली एकाच देठानं जुळलेलं, परंतु दोन दिशांनी झेपावणाऱ्या आपल्या दळदारपणानं त्या रोपाला एक वेगळा आकार देणारं, त्याच्या अस्तित्वाला जपणारं. रोपाच्या अस्तित्वाचं हे भान अन् दळाचं 'दोघुलेपण', जे या कवितेत व्यक्त होतं, त्याची कल्पना देण्यासाठी 'दोनुली' हा शब्द योजला आहे. दळं दोन असली रोपाला, तरी देठ एकच असतं. त्या देठाचं हे मनोगत.

अर्थात शब्द इथं महत्त्वाचा नाही. त्या शब्दातून सुचविला जाणारा अस्तित्वधर्म महत्त्वाचा आहे. असं असले, तरी शब्दालाही त्याचं एक स्थान असतं. तो अर्थाचं वहन करतो, तशीच त्याची जडणघडणही करतो. संकेतानं, सवयीनं आणि व्यावहारिक वापरानं नादाच्या एका विशिष्ट संघटनेला जेव्हा विशिष्ट अर्थ प्राप्त होतो, तेव्हा त्याचा शब्द होतो. या शब्दाभोवती जसं एक अर्थवलय असतं, तसं एक नादवलयही असतं. नादाच्या व अर्थाच्या या दोन वलयांच्या संयोगातून अर्थाचा बोध निश्चित होतो. अनेकदा त्याच्यामुळं शब्दाच्या मूलार्थाच्या कक्षाही रूंदावतात, बदलतात. नादातही अनुभूतीचं एक रूप असतं. म्हणूनच महाकवी आणि तत्त्वज्ञ ज्ञानदेव उदगारतात, 'आम्ही नादासी रूप देखिलें.'

मी काही भाषाशास्त्रज्ञ नाही. तेव्हा शास्त्रपूत असं काही मला सांगता येणार नाही. परंतु कवितेच्या निमित्तानं शब्दांचं चालणं-डोलणं जवळून पाहिलं आहे. तेवढंच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सान-सानुली, सोन-सोनुली असे शब्द आपण बनवतो. त्याप्रमाणेच हा दोन-दोनुली. 'सान' शब्दाचा मूळ अर्थ लहान एवढाच होतो. पण त्याला 'ली' हा प्रत्यय लागताच, त्यातून लघुत्वदर्शक अथवा लाडिकपणाच्या, जवळकीच्या भावाचाही बोध होतो, असं मला वाटतं. कारण शब्द वापरणाऱ्या मनाचा भावही त्यात प्रतिबिंबित झालेला असतो. सोनुली या शब्दानं सोनेरी वर्ण सूचित होतो. शिवाय, त्याबरोबरच त्या शब्दातून चाफेगौरपणाचा, रंगसौंदर्याचा जो एक अनुभव मनाला जाणवलेला असतो, तोही त्या आवडत्या संबोधनातून व्यक्त झालेला असतो. तसंच तो शब्द प्रेमानं उच्चारणाऱ्या मनाची निर्भर स्थितीही त्यात ध्वनित होते. विशेषतः त्या शब्दाचा पुनःपुन्हा उच्चार करताना नादाची जी लयबद्ध आंदोलनं होतात, त्यांतून या शब्दाच्या अर्थकक्षा आणि भावाची सांद्रता वाढायला साहाय्य होतं. नादाच्या या शक्तीचा काव्यात अधिक उपयोग निरनिराळ्या प्रकारे करून घेण्यात येतो, हे तर सर्वांनाच माहीत आहे. एक पाश्चात्य चित्रकार तर म्हणतो की रंगालाही नाद असतात. चित्रकाराला ते कुंचल्यातून रंगरूपात व्यक्त करायचे असतात.

'दोनुली' या शब्दाचंही असंच आहे. दोन हा मुळात संख्यावाचक शब्द. पण मौज अशी, की त्याला 'ली ' हा प्रत्यय लागताच संख्येचं गुणात रूपांतर होतं. संख्या स्व-अतीत (transcend) होऊन गुणात, सौदर्याच्या आणि सर्जनाच्या अनुभूतीत प्रवेश करते. ज्ञानेश्वरांनी अशा शब्दांचे प्रयोग विपुलतेने केले आहेतः दोघुले, दोघुलेपण, दादुलेपण, मीपण, दंपत्यपण इत्यादी. इथं ही गोष्ट मान्य करायला पाहिजे की ही चर्चा भाषाशास्त्रापेक्षा मानसशास्त्रीय व वाङ्.मयीन अधिक झाली. एका दृष्टीनं हेही बरोबरच म्हटलं पाहिजे. मानसातलं उचंबळणं जेव्हा शब्दांच्या पात्रामधून दुथडी खळाळत येतं, तेव्हाच त्याची काव्यवाहिनी होते.

शब्दाचा असा मनमोकळा विचार चालू असतानाच, 'दोनुली' संबंधानं काही रसिक मित्रांच्या प्रतिक्रियाही ऐकायला मिळाल्या. एका मित्रानं असा प्रश्न केला, की दोन तपांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या तुमच्या शततारका या संग्रहातील रूबायां (कणिका)–सारखाच हा प्रकार नाही का? तर दुसऱ्या काही मित्रांनी असं विचारलं, की या कवितांना काही वेगळा रूपबंध आहे, असं तुम्हांला वाटतं का? पहिल्या प्रश्नातला गभितार्थ मला मान्य नाही. 'शततारकां'च्या पुढं बरीच वाट चालून आलो आहे मी. शिवाय, रूबायांचा तो प्रकार आहे सूक्तीसारखा– सुट्या, त्रुटित कल्पना–विचारांसारखा, ठिणग्यांप्रमाणे तडतडत अंधारात विरणारा. त्या त्रुटित अनुभव–कल्पनाकणांना भावस्थितीचं (mood) रसपूर्ण, अनुभवसंपन्न स्वरूप आलेलं नसतं. ते रूप येण्यापूर्वीच त्यांच्या अभिव्यक्तीची धाव (range)संपलेली असते. एखाद्या जीवनानुभवाचा सखोल, उत्कट आविष्कार तिथं अभिप्रेत नसतो.

१. हा शब्द मनात घोळत असताना एकदा तर मला आमच्या घरातल्या 'दोनाळी' बंदुकीची आठवण झाली. मनाचे व्यापार मोठे विचित्र, विसंगत असतात. त्यांत उदात्त व क्षुद्र, अपेक्षित व अनपेक्षित, आणि हवंसं व नकोसं यांचं अनाकलनीय मिश्रण असतं. माझे वडील पोलिस अधिकारी होते. त्यामुळं त्यांच्याकडे बंदूक असणं जितकं स्वाभाविक, तितकं त्याची आठवण मला होणं हेही स्वाभाविक. पुढं,पडत्या काळात, ती बंदूक विकण्याची पाळी वडिलांवर आली, तेव्हा त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. हाडामांसाचा माणूस घरातून गेल्याइतकं त्यांना वाईट वाटलं. ती घटना माझ्या मनात खोल रूतून बसली. उर्दू भाषेत दोनाळी बंदुकीला 'दोजरबी' (द्वयाघाती) म्हणतात. दोन नळ्यांतून दोन वेगवेगळ्या गोळ्या सुटतात, पण त्यांचं लक्ष्य एकच असतं. अनुभवलक्ष्याची ही एकता, तिची आवड मनात नकळत लहानपणापासून दडून बसली असावी. तिनं या आविष्काराला काही प्रमाणात प्रेरणा दिली असावी. या मानसिकतेतही या आविष्काराचं बीज असेल कदाचित.

रूपबंधासंबंधीच्या प्रश्नाचं उत्तर देण्यात मला फारसा रस नाही. काव्याच्या रूपबंधासंबंधीची ही चर्चा अनेकदा भ्रामक ठरते. आपल्या काव्यशास्त्राच्या परंपरेत पुष्कळदा बाह्य रूपबंधाशीच तो विचार जास्त निगडित झाल्यासारखा वाटतो. याचा थोडासा विचार पुढं येईल. इथं इतकंच सुचवून ठेवतो, की कवितेला एक आंतरिक रूपबंधही असतो, आणि ही आंतरिक संघटना फार महत्त्वाची आहे. तिच्या आकलनाला केवळ, कोरडा बाह्य रूपबंधाचा विचार अपुरा पडतो. इतकंच नव्हे तर काही वेळा काव्याच्या अंतरंगाकडे जाण्यासाठी स्वीकारलेली ही वाट तिची मर्यादा ठरते. तिच्यामुळं शोधाची वाटच बुजून जाण्याची शक्यता निर्माण होते. रूपबंधाचा संबंध मुख्यत: आंतरिक संघटनेशी असतो, असावा. ही संघटना 'मनसिज' आहे, सर्जक आहे. तीच रूपबंधाला आकार देते.

बाह्य रूपबंधातच रसिकांची दृष्टी नकळत कशी गुंतू पाहते, हे दर्शविण्यासाठी या प्रतिक्रियांचा मी उल्लेख केला. आजचे काही समीक्षक या आंतरिक रूपबंधाचा विचार करू लागले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. समीक्षकांची दृष्टी बहुधा विश्लेषणात्मक असते. परंतु त्याबरोबर हेदेखील मान्य करायला पाहिजे, की सत्याचा, सौंदर्याचा शोध अनेक अंगांनी, अनेक स्तरांतून आणि माध्यमांतून घेण्याची गरज आहे. आत्मशोधन, आत्मनिवेदन हीदेखील सत्याकडे पाहण्याची एक दृष्टी आहे. समीक्षक कलाकृतीकडे टीकेच्या, भाष्याच्या दृष्टीनं पाहतो, तर कवी तिच्याकडे अनुभव जोगवण्याच्या दृष्टीनं, पोसण्याच्या दृष्टीनं बघतो.

'तो संकल्पु लावी दिवा। वाचेचा गा' असं ज्ञानेश्वरांनी एके ठिकाणी, मन आणि क्रिया यांच्या संदर्भात, म्हटलं आहे. कवीचा संकल्प, कल्पना ही वाणीचा दिवा अशाच प्रकारे उजळते. शब्दामागे कवीचं कल्पनीयही (idea) उभं असतं. त्याचा शोध घेणं कलावंताच्या कार्याचा एक भाग आहे. कारण ती

प्रक्रिया त्यानं अधिक जवळून पाहिलेली असते. ज्ञानेश्वरांसारख्या महान प्रतिभावंतानं ती पाहिली आहे. त्याला ते 'कुलालमतीचे गर्भ' म्हणतात. मी 'दोनुली'च्या निर्मितिप्रक्रियेकडे अशाच दृष्टीनं पाहतो. कवितेच्या निर्मितीपूर्वी, निर्मिती होत असताना आणि निर्मितीनंतर मला काय वाटत होतं, या प्रत्येक अवस्थेत मनाची कशी कशी आंदोलनं होत होती, हे सांगण्याचा मी यत्न करणार आहे. अर्थात हे असंच घडलं, घडतं असं मला म्हणायचं नाही. आठवेल तितकं, जमेल तसं आणि मला जाणवलं त्याप्रमाणं हे निवेदन करणार आहे. त्यावरून तुम्ही काय ती अनुमानं बांधावीत. ती बांधायला तुम्ही स्वतंत्र आहात. मी मात्र माझ्या कवितेला बांधलेला आहे. ती बोलते तेवढंच मी सांगेन. त्यातही कवितेप्रमाणं निवेदनाच्या काही पायऱ्या सुटलेल्या असतील. वाचकांनी लक्षात घ्यावं की निर्मितिप्रक्रियेचं हे एक धूसर स्मरणचित्र आहे. त्यापलीकडेही काही अदृश्य, अगम्य असेल, असतं, पण ते सांगायला माझ्याजवळ शब्द नाहीत. म्हणजे त्यात काही गूढ अज्ञेय आहे, असं मला म्हणायचं नाही. मनाच्या वेगाबरोबर माणसाला धावता येत नाही, त्याच्या तळघरात खोलखोल उतरता येत नाही, इतकंच.

कविता लिहिताना मनात एक अस्फुट आनंद फुलत असतो. तसाच आनंद आपल्या पूर्ण केलेल्या कलाकृतीकडे वळून पाहताना कलावंताला व्हावा. हाही एक सर्जनाचाच आनंद असतो, आणि पहिल्या आनंदापेक्षा काहीसा सुजाण. पण त्यात आत्मतृष्टी नसावी, अतृप्ती असावी. असमाधान शिलगत असावं. तरच ते कलावंताचं खरं मागं वळून पाहणं, सिंहावलोकन. या दोन्ही अवस्थांत येणारी आनंदाची प्रतीती हीच कलावंताच्या दृष्टीनं महत्त्वाची, असं मला वाटतं. त्यातून काही शोधलं गेलं, काही गवसलं, तर उत्तमच. एरव्ही हा आनंदही काही कमी नाही. या दृष्टीनं या निवेदनाकडे पाहावं.

बारा वर्षापूर्वी मी या कविता लिहायला सुरूवात केली. बारा वर्षात फक्त पंचवीस-सव्वीस कविता लिहून झाल्या. रचनाकालाच्या दीर्घतेचा हा उल्लेख वडिलकीचा दाखला काढण्याच्या उद्देशानं केलेला नाही. 'फुलाचं वय विचारायचं नसतं.' या गडकऱ्यांच्या वाक्यावर माझं मन पोसलेलं आहे. या संग्रहातली पहिली कविता ३० ऑगस्ट १९६६ या दिवशी लिहिली आणि सव्विसावी कविता २७ डिसेंबर १९७८ या दिवशी. परंतु या कवितेचं काही वेगळं 'आपलेपण' आहे, 'स्व-त्व' आहे, हे बरेच दिवस माझ्या लक्षात आलं नाही. ता.२१.१.६७ ला 'वारा' ही कविता अलिबागला जाताना लिहिली. प्रवासात माझे मित्र प्रा.डॉ. व दि. कुलकर्णी आणि प्रा. गंगाधर पाटील यांना ती वाचून दाखवली. दोघांनाही ती आवडली. पण माझं समाधान झालं नव्हतं. वाऱ्याचा मला भावलेला अनुभव पूर्णपणे त्यात अवतरला नव्हता. सुंदरीचं रूपलावण्य एकाच बाजूनं पाहिल्यासारखी मनाला चुटपूट लागून राहिली होती. त्या अनुभवाचं दुसरं रूप माझ्या मनाच्या तळघरात अडकलं होतं. तिथून मुक्त करून त्याला शब्दांत वसवायचं होतं. मी त्यांना एवढंच म्हणालो, "वाऱ्याचा काही एक अनुभव इथं व्यक्त झाला आहे. त्याचं दुसरं, समग्र रूप अजून रेखाटायचं आहे. त्याखेरीज ही कविता पूर्ण होणार नाही." यावर कुणी काही बोललं नाही. अनुभवाचा तो दुसरा तुकडा मांसात रूतलेल्या भागासारखा मनात खुपत होता. मुंबईला परत आल्यावर, दोनतीन दिवसांत, वाऱ्याची दुसरी कविता पूर्ण झाली. ते खुपणं संपलं. अंत:करणात समाधानाचे, तृप्तीचे थेंब ठिबकले. दोन्ही कविता मिळून वाचताना असं जाणवलं, की या दोन कविता वेगळ्या असल्या, आणि वेगवेगळ्या वेळी रचना गेल्या असल्या, तरी त्यांच्यातला अनुभवबंध एकच आहे. पाहून चकित झालो. दोन्ही कविता द्विदलासारख्या एकाच देठाशी गुंतल्या होत्या, अनुभव-केंद्राच्या एकाच गाठीशी बांधल्या होत्या.त्या दोन असल्या तरी परस्परोपजीवी होत्या. त्यांच्या दळदार आकारानं, आधारानं एक अनुभवाचं रोप लसलसत होतं. त्यातून आकारणाऱ्या जीवनानुभूतीचं आणि त्यातून निर्माण होणाऱ्या भावस्थितीचं (mood) रूप एकच होतं. त्या दोन कविता वेगळ्या केल्या, तर त्यांच्या सलगतेला, एकात्मतेला ढका लागेल. माझी ही प्रतिक्रिया मी कुठं व्यक्त केली नाही, तरी मनाशी अशी खूणगाठ बांधली, की अनुभव ग्रहण करण्याची व त्याचा आविष्कार करण्याची ही प्रक्रिया काहीशी निराळी आहे. असे अनुभव, अशा

स्वरूपात जेव्हा येतील तेव्हा त्यांना जपलं पाहिजे, जोगवलं पाहिजे. मात्र या कवितांचं 'दोनुली' हे नामकरण फार उशिरा झालं. संग्रहरूपानं या कविता एकत्र प्रकाशित कराव्या, असा विचार जेव्हा मनात घोळू लागला, तेव्हा एके दिवशी हे नाव सुचलं.

या बारा वर्षांतल्या माझ्या काव्यरचनेचा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा मनाला त्याचं मोठं कुतूहल वाटतं. या काळात विविध स्वरूपाची कविता मी लिहिली, भाव कविता (lyrics) लिहिली. गीतं लिहिली. दीर्घकाव्यांचं, खंडकाव्याचं लेखन केलं. नाट्यकाव्यांची रचना केली. इतक्या विविध प्रकारचं काव्यलेखन करूनही माझं मन आत्माविष्काराच्या बाबतीत असामाधानीच राहिलं, भुकंच राहिलं. उर्दूचा महाकवी गालिब याने कलावंताच्या या सर्जक मनोवस्थेचं मोठं समर्पक वर्णन केलं आहे:

बकदर-ए-शौक नहीं जर्फ-ए-तनगुना-ए-गज़ल
कुछ और वसअत् चाहिए मेरे बयाँ के लिए

"गजलची ही लय माझ्या जीवनोत्सुकतेला अपुरी वाटते. अजून थोडा अवकाश हवा आहे माझ्या आविष्कारासाठी." इथं एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. गालिबनं गजलऐवजी दुसऱ्या रूपबंधाची (Form) मागणी केली नाही, केवळ अवकाश मागितला. माझ्याही आविष्काराच्या उड्डाणाला थोडं अस्मान हवं आहे. कशाचा आकार असतो त्या आस्मानाला, अवकाशाला?

असं शब्दांच्या अवतीभोवती फिरण्यापेक्षा, 'दोनुली' तल्या काही कविता घेऊन या प्रश्नाचा विचार केला तर-

तर हा संग्रह चाळताना, कवितांच्या मथळ्यांवर नजर पडताच, स्थूल मानानं प्रथम आपल्याला असं दिसून येतं, की पंचवीस-सव्वीस कवितांपैकी बारातेरा म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक कविता निसर्गपर आहेत: रान, ऊन, वारा, तळं, कमळ, अंधार, समुद्र इत्यादी. म्हणजे या कवितांत निसर्गाला महत्त्वाचं स्थान आहे असं वाटते. निसर्गदृश्यांतून या कविता स्फुरतात हे खरं, पण त्यांत निसर्ग नसतो. त्यांत पानाफुलांचं सुगंधी सळसळणं नाही, की झऱ्याचं शीतळ अवखळ झुळझुळणं नाही, त्यांत पाकळ्यांकडून सुगंधाकडे जाणाऱ्या मनाची गती आहे. दोनतीन कविता ऐतिहासिक स्थळांविषयीच्या आहेत, पण त्यात इतिहास नाही. स्थळांचं वर्णनही नाही. आतापर्यंत उल्लेखिलेल्या कवितांचे विषय प्रत्यक्ष, समूर्त होते. परंतू इतर सहा कवितांचे विषय अमूर्त आहेत: जसे शब्द, अस्तित्व, वार्ता, वाद, दु:ख, प्रेम इत्यादी. हे विषयही नुसती निमित्ते. म्हणजे ते विषय तिथं नसतात. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगायचं, तर केवळ 'बोलांची वालिफं'. अनेक आशय-अनुभवांचे अंकुर ते 'तूस' फोडून उगवू पाहतात. पानं कोंभू बघतात. तीन कवितांचा चेहरा कथात्मक आहे: रस्ते, स्तन, पुत्र. त्या कथाही कथा राहत नाहीत. महाभारताची कथा सांगताना त्या व्यासाच्या मनात शिरतात आणि वेगळंच राखेचं महाभारत घेऊन बाहेर पडतात. उरलेल्या दोन कवितांचे विषय जड वस्तू आहेत: आरामखुर्ची, दाणे. 'हे दु:खप्रिया' आणि 'म्हणजे-म्हणजे' या कवितांच्या बाबतीत कोणत्या विशिष्ट जीवनानुभवाला शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला आहे हे चटकन सांगता येत नाही. अनेक प्रकारच्या फुलांचे व काट्यांचे अनुभवस्पर्श तिथे पालवू पाहत आहेत. आशय-विषयांच्या विविधतेची किंवा वैशिष्ट्यांची कल्पना देण्याच्या हेतूने ही मथळ्यांची यादी दिलेली नाही. त्या फक्त पथदर्शक पाट्या आहेत, संकेतस्थानं नव्हेत. माझं हे म्हणणं पुरूरव्याच्या मिथित कथेनं अधिक स्पष्ट होईल. उर्वशीसाठी वेडा झालेला पुरूरवा तिला साद घालीत रानोमाळ फिरत असतो. त्याच्या हाताला कुठंतरी संगमनीय मणी लागतो. सभोवती वृक्षवेली असतात. तो विरही, उद्भ्रांत मनोवस्थेत वृक्षवेलींना उर्वशीबद्दल विचारीत असतो. त्यांना आलिंगन देत असतो. मण्याच्या स्पर्शानं कुठल्यातरी वेलीतून उर्वशी प्रकट होते. त्या मण्यापेक्षा, त्या वृक्षवेलींपेक्षा ती निराळी असते. कविताही तशीच विषय-आशयापासून, रूपबंधापासून वेगळी असते- स्वतंत्र, सुंदर! तेव्हा वाचकांनी कविता वाचून आपलं मत बनवावं. त्यासंबंधी माझ्या मनात उत्सुकता अवश्य आहे.

आता एक-दोन कविता घेऊन या प्रश्नाचा आणखी थोडा मागोवा घेऊ. 'वाऱ्या'च्या कवितेचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. आधी त्यासंबंधीच थोडं अधिक बोलू. वाऱ्यावरील कवितेच्या पहिल्या कवितेत त्यातला 'मी' वाऱ्याचं वर्णन करतो. नेहमी झाडांच्या पानांवरून, त्यांच्या सळसळण्यातून वाऱ्याचं अस्तित्व जाणवतं. परंतु शिशिरात वारा झाडांत शिरतो, तेव्हा त्याच्या स्पर्शानं पानंच गळून पडतात. ते पाहून, तो 'मी' म्हणतो:

"पानांचा खोपा बांधायचा होता-
अचानक झाडच निष्पर्ण झाले"

त्या विफलतेनं प्रक्षुब्ध झालेल्या वाऱ्याचं वर्णन करून कवी शेवटी सांगतो, हा वारा नव्हे, हा आहे-

"नष्टनीड आत्मा
मोजीत रेषा पानांच्या, दैवाच्या!"

परंतु वाऱ्याचं हे वर्णन स्वत: वाऱ्याला मान्य नाही. मग तो स्वत:च आत्मकथन करू लागतो. (तृतीय पुरूषी, त्रयस्थ निवेदनाचं प्रथम पुरूषी स्वगत होतं. कारण अनुभवबंधाच्या अभिव्यक्तीची ती गरज असते.) तो म्हणतो, "वेळूच्या वनात मला सूर म्हणतात, फुलांच्या गावात मला सुवास म्हणून ओळखतात, आणि वादळी समुद्राच्या क्षितिजकाठावर, करकरा विजेचे दात खात उभा राहणारा विक्राळ कृतांतही मीच असतो." पण क्षणभराच्या अशा अहंकारानंतर त्याचं त्यालाच वाटतं, छे, हे काही खरं नाही." मग लीनपणानं तो सांगू लागतो:

"अजूनही मी मला पाहिलेच नाही
बघून हजारदा डोकडोकावून
प्रचंड आरशात युगांएवढाल्या
दिसली फक्त पिवळी पाने,
सुकलेल्या पाकळ्या
उन्हाच्या ऐन्यात."

आणि शेवटी स्वत:शीच पुटपुटल्यासारखा बोलतो:

"असेन, आहे मी,
तरीही सारखे वाटते, वाटावे,
बरे असते ते
सुवासाचे मरण जगणाऱ्यांसाठी."

अशा रीतीनं झाड, वारा, खोपा, वेळुवने, फुलबाग, समुद्र या साऱ्याच वस्तूंचा लय होतो, आणि त्यानंतर काय उरतं ते वाचकांच्या संवेदनेवर व अनुभूतीवर अवलंबून राहतं.

उन्हाच्या कवितेची गोष्ट यापेक्षा थोडी निराळी आहे. पावसाळ्यातल्या सकाळच्या उन्हाची ही आठवण. ऑगस्ट महिन्यातल्या त्या दिवशी स्वैपाकघरात सकाळचं ऊन पडलं होतं. तसं ते रोजच पडत होतं. परंतु त्या दिवशी सकाळी माझं लक्ष त्याच्याकडे वेधलं. शेणामातीनं सारवलेली लालसर चूल, त्या लालीतूनही फुटून दिसणारं काजळलेलं अवेलं (मुंबईत राहूनही तोपर्यंत आमच्या घरात बर्शेन आला नव्हता. त्याच्या अभावानंच ही कविता देणगी म्हणून दिली असं आता मला वाटतं.) खिडकीतून आलेलं कोवळं, गुलाबी, ओलसर ऊन चुलीवर पसरलं होतं. ती चूल आज अजून पेटली नव्हती. त्यावर भांडंही नव्हतं. त्यामुळं ती मला एकदम कशी ओकी-बोकी,खिन्न, उदास भासली. एकाएकी मन व्याकुळ झालं. काही महिन्यांपूर्वीची चूल आठवली. तेव्हा, याच वेळी ती अलवार पेटली होती. केशरी जाळांनी फुलली होती. माझी पत्नी स्वैपाक करीत होती. आवेल्यावर दूध मंद तापत होतं. दुसरीकडे चुलीवर काहीतरी

शिजत होतं. आत बारीक जाळ जपून, सावधपणानं शिलगत होता. जणू काय तिच्या धाकातच वागत होता तो! माझी पत्नी, डोक्यावरचा पदर सावरीत, त्याच्याकडे पाहून आपल्याशीच हसत होती– असं की जणू त्या जाळाचीही ती प्रेमळपणानं वास्तपुस्त करीत होती. आज ती या जगात नव्हती. त्यामुळं का ही चूल इतकी उदासवाणी दिसत होती या सकाळच्या उन्हात? दु:ख गिळलेल्या ओठांवर, शांत लयीत या ओळी आल्या:

"काजळलेल्या अवेल्यावर,
शेवाळलेल्या भिंतीवर
उन्हे पडली घटकाभर
तेव्हा कळले त्यांनाही स्वप्ने असतात:"

कसली स्वप्ने?

"उतू जाणाऱ्या दुधाची, ऊन ऊन तूपभाताची,
टोपपदरी स्मिताची,
नथेतल्या स्नेहाळ पाचूची,
मोत्यातला थबकल्या वादळाची,
पुन:पुन्हा पडणारी"

मृत्यूनं नष्ट केलेली ही घरगुती, साधीसुधी स्वप्नं माझ्या मनात जिवंत केली होती त्या घटकाभर पडलेल्या उन्हानं. त्यातून पहिल्या चार ओळी जुळल्या. परंतु 'उन्हे पडली घटकाभर' असं म्हणताना, त्या उन्हाच्या गर्भरेशमी स्वप्नांची कल्पना मला आली नव्हती. त्यांच्या काही छाया तरळत होत्या. ऑफिसची वेळ झाली होती: लगबगीनं ऑफिसात निघालो. तिथल्या कामात गढून गेलो. परंतु, दिवसभर, त्या नैमित्तिक व्यवहाराच्या पडद्यामागं पार्श्वसंगीताप्रमाणं त्या पहिल्या चार ओळी झंकारत होत्या. कामं आटोपून परत येताना, सायंकाळच्या उन्हाच्या स्पर्शानं, पुढील चार ओळींत उमटलेल्या स्वप्नांच्या आकृती झळाळल्या. पहिली कविता तिथं पूर्ण झाली. परंतु त्या ओळींत घर अंगणांत बंदिस्त झालेल्या उन्हाची स्वप्नंच तेवढी प्रतिबिंबित झाली होती. पृथ्वीआकाश कोंदून उरलेल्या उन्हाचा संपूर्ण अनुभव त्यांत शब्दांकित झाला आहे, असं वाटेना. मन अशांत, उत्सुक बनत होतं. उतावीळपणानं उन्हावरच रेघोट्या ओढीत होते. लोकल भराभर स्टेशनं घेत, धावत होती. रूळांच्या दोन्ही बाजूंची दृश्यं झरझर पालटत होती. ऊनदेखील गाडीबरोबर वेगानं धावत होतं. जोगेश्वरी मागं पडली, गोरेगाव येत होतं. त्या सोनेरी उतरत्या उन्हात, कुठंतरी ताडाच्या उंच झाडाची लांब सावली सरकून गेली. झाडांच्या माथ्यावर मावळती उन्हं तळपत होती. डोंगरकाठांनी पांढरेकाळे ढग फेसाळून उतू जात होते. ते पाहता पाहता मनात एकदम ओळ चमकली (त्याआधीच्या काही ओळी नंतर सुचल्या):

तेव्हा काळ स्तब्ध होतो, उभा राहतो,
ताडाचे झाड होऊन,
उंचच उंच, आश्चर्याच्या सावलीसारखा!

त्या सावलीनं, त्या ओळीत, उन्हाच्या एका अपार रूपाचा साक्षात्कार झाला. जोडकवितेतली दुसरी कविता सशब्द झाली. सगळाच्या सगळा उन्हाचा अनुभव प्राशन केल्यासारखं मनाला तृप्त वाटलं. मीच सर्वांगानं ऊन झालो. सारी सृष्टी, हे जगणंच ऊन होऊन गेलं. आणि या उन्हाचं नातं कनकपात्रानं झाकलेल्या, उपनिषदातील सत्याच्या सूर्यमुखाशीही जोडलं गेलं. त्याबरोबर माझ्यासमोरचं ऊन, ताडाचं झाड, ढग, उतू जाणारं चुलीवरचं दूध, सारं सारं क्षणात मावळून गेलं, अन् मनात भरून राहिली उन्हाकार झालेली मनोवस्था– एक भावस्थिती!

कविता लिहिताना मला जाणवलेला आणि आता आठवणींनी व कवितांच्या ओळींनी जोडलेला हा अनुभव आहे, त्या कवितेचा अर्थ नव्हे. कदाचित दुसऱ्यांना आणखी काही वेगळं त्यातून जाणवेल. या कवितेच्या आधाराने मी माझी निर्मितिकाळातली मनोवस्था, भावानुभवाची रूपं आणि सर्जनाची मला जाणवलेली प्रक्रिया रेखाटण्याचा यत्न केला आहे. मघाशी गाडीबरोबर धावणारी उन्हे पाहून, उन्हाचं दुसरं स्व–अतीत रूप झटकन मनात जागं झालं, असं मी म्हटलं. पण ते तसंच झालं असेल असं निश्चितपणानं सांगता येणार नाही. तितकं निश्चित ते नसतंच. माझ्या असंज्ञ मनाच्या (unconscious mind) तळाशी बऱ्याच काळापासून अशा प्रकारच्या अनेक समान, सहचारी संवेदना साठत आल्या असतील आणि त्यांनी या क्षणी ही प्रतिमारूपं धारण केली असतील, कुणी सांगावं? कवीचं मन म्हणजे जीवनाच्या निखाऱ्यावर उकळणारं एक मृत्तिकापात्र असतं. त्यात अनेक अनुभव, संवेदनरस उकळत असतात. अतर्क्य पद्धतीनं कोणत्या अनुभवसंवेदनेची कोणती मूस अनपेक्षितपणे तयार होईल, काही सांगता येत नाही. या कारणानंच "मोहिनी" स बघून, बालकवी निर्भर होऊन गातात:

"सौंदर्यभरी भरलेलें तारूण्य चढे रंगास
अलवार कोंवळें अंग जशि काय फुलांची मूस."

या सृष्टीत अलवार अंग असतं. फुलंही असतात. पण फुलांची मूस मात्र कवीच्या मनातच तयार होते. कवीच्या मनातलं कल्पनीय वास्तवात अशा रीतीने प्रवेश करतं तेव्हा काव्याची सृष्टी होते. ही काव्यवस्तू जीवनातल्या वास्तवापेक्षा वेगळी असते. त्या वस्तूची ती प्रभा असते.

वास्तव आणि कल्पनीय या दोन भिन्नधर्मी घटकांचं अस्तित्व काव्यात असतं, याचा उल्लेख वर आला आहे. वास्तव हे जीवनातील घटनाप्रसंगांतून, अनुभवांतून हाती येतं, तर कल्पनीय चिंतनातून जन्म पावतं. ही दोन्ही तत्त्वं जिवंत व उन्मेषशाली असतात. एक काव्यानुभव साकार होत असताना, हे दोन्ही अनुभव स्व–अतीत होतात आणि त्यांना अनुभवाचं आणखी एक तिसरं परिमाण लाभतं. 'तळे' या कवितेच्या आधाराने या रूपाचं नेमकेपणानं वर्णन करता येईल. माझ्या घरासमोर एक तळे आहे (आता होते म्हणायला पाहिजे). या तळ्यात पूर्वी सकाळ–संध्याकाळची शोभा सांडत असे. सूर्योदयाची, दिवसाची व रात्रीची, त्याच्या पाण्यात बिंबलेली शोभायात्रा पाहत मी तासचे तास घालवीत असे.

एका सकाळी उगवतीचे तांबूस रंग तळ्यात बिंबले. ते मला कसे जाणवले?

"कोवळी तांबुस लव प्रकाशाची पाणभुईवर..
त्यांतूनच उमलतो काळ
झुळझुळत्या रेशमी जळाच्या कळ्यांत
स्फुरण्या–विरण्याची निळी लयकारी साधून,
पांढऱ्या कमळांचा गंध घेऊन,
त्याचा रंग लेऊन,"

ही केवळ सकाळ नव्हे. उगवता काळच सारं अवकाश व्यापून उरला आहे, आपल्या विजयपताका फडकावीत.

पण संध्याकाळी अंधार पाण्यात उतरला तेव्हा–

"अवकाशात काळाचे खडक
पाण्यात थिजलेले वारे
दिशांचे श्वास रूद्ध झालेले
पांढरे कमळ पाण्यात बुडालेले:
स्तब्ध उभा काळाकभिन्न, निगूढ अवकाश

काळाच्या मस्तकावर पाय देऊन

नक्षत्रांचा."

आता काळोखात काळाची गती, त्याचं स्फुरण संपलं आहे. काळा अपार अवकाश त्याच्या मस्तकावर पाय देऊन उभा आहे, नक्षत्रांकित. दिवसाची आणि रात्रीची तळ्यात बिंबलेली दोन साधी दृश्यं ही. परंतु, कल्पनीयानं त्यात स्थळकाळांची रूपं निर्माण केली. त्यांची सनातन झुंज दाखवली, एवढंच नव्हे तर त्या एकाच दृश्याच्या रूपरंगशोभेनं काळाची व अवकाशाची रूपं धारण केली त्या पाण्यात. जळात काळ अवकाशरूपात बदलून गेला, आणि ज्याला आदि–अंत नाही असा अपार अवकाश, काळाच्या जन्मापूर्वीचा जड, अचल अवकाश, प्रत्यक्ष झाला. या आदिअंतरहित अवकाशाच्या, अज्ञाताच्या जाणिवेनं वृत्ती भयकातर होते. एक शून्यता हृदयावर राज्य करू लागते. कवितानिर्मितीच्या प्रक्रियेतली एक वेगळी अवस्था इथं जाणकाराच्या लक्षात यावी. कवी सकाळच्या व संध्याकाळच्या निसर्गसौंदर्याचा वास्तव अनुभव शब्दांकित करीत असतो. त्यात कवीचं कल्पनीय स्थळकाळाचं दर्शन घडवू पाहतं. परंतु हे दोन्ही अनुभव एका विशिष्ट बिंदूवर स्व–अतीत होतात आणि कवीला, निसर्गाला बाजूला सारून, भयकंपित करणाऱ्या काळाच्या व अवकाशाच्या द्वंद्वातून, संघर्षातून, त्याच्या पलीकडे उभी असलेली जगाची अर्थहीनता, आदि–अंतहीनता, भयाण उजाड रितेपणा, यांचा अनुभव शब्दांत व्यक्त करतात. इथं कवीचा पराभव होतो, पण कवितेचा विजय होतो. तिला आणखी निराळं परिमाण लाभतं.

ह्या निवेदनावरून आणखी एक गोष्ट स्पष्ट व्हावी. माझ्या मनात कवितेसंबंधीची काही पूर्वकल्पना तयार नसते. तिचा शेवट कुठं, कसा करायचा हेही ठरलेलं नसतं. उत्कटतेनं व्यक्त होऊ पाहणारा अनुभव जी भावरूपं घेऊ पाहतो, त्याला ती रूपं मी स्वच्छंदपणानं घेऊ देतो. ती रूपं धारण करण्यासाठी हवे असलेले शब्द तेवढे मी त्याला पुरवतो. दुसरं, दोन भाग किंवा दोन कविता कल्पून रचना करावी, असं नियोजनही त्यामागं नसतं. जाणवलेल्या अनुभवानं सांगितलेलं ते फक्त शुद्धलेखन असतं. एखादा अनुभव स्पंदित होतो. काही ओळींत तो आविष्कृतही होतो. त्याचं रूप त्याला मिळालेलं असतं. काव्याचं स्तबकही तिथं पूर्ण झालेलं असतं, तरीही तो अनुभव अजून थांबलेलाच असतो,– आपल्या काही पाकळ्या विकसित होण्याची वाट पाहणाऱ्या गुलाबपुष्पाप्रमाणं. अशा स्पंदित, अस्वस्थ क्षणी त्या अनुभवस्पंदातून दुसऱ्या कवितेचा जन्म होतो. मग द्विदलात्मक जोडकविता तयार होते. अनुभवांतर्गत असलेल्या ह्या अवस्थतेत, अपूर्ततेत त्या दुसऱ्या कवितेचं स्फुरण असतं. पहिली कविता लिहीत असतानाच, त्या द्वंद्वात्मक स्पंदांतून दुसरी कविता आकार घेते. त्या वेळीच किंवा त्यानंतर बहुधा त्या दिवशीच ती लिहिली जाते. काही काही वेळा दुसरी कविता लिहायला दोनतीन दिवसांचा अवधीही लागतो. परंतु तिचं बीज मात्र त्याच दिवशी मनात रूजू लागलेलं असतं. पण असे प्रसंग क्वचितच आले आहेत. बहुतेक कविता एकाच दिवशी लिहिल्या गेल्या आहेत. नंतर त्यात मी सुधारणा केल्या आहेत, पण मूळ संहिता स्थूलपणे त्याच दिवशी तयार झालेली असते. दोन कवितांच्या मधला काळ मात्र फार अस्वस्थतेत जातो. ते असो. मला वाटतं, माझं हे सांगणंदेखील उपरंच आहे. दोन कवितांतील अंतर्गत संगती ही स्वत:च फार बोलकी असते.

काव्याचा रूपबंध त्याच्या आंतरिक संघटनेनं मुख्यत: साकार होतो. त्याला साकार करणारी ही शक्ती म्हणजे अनुभवाचं सौंदर्यात्मक स्पंदन. हे स्पंदन मानसिक व सौंदर्यरूप असतं. त्याच्यापासून कोणत्याही काव्याचा किंवा कलेचा घाट अथवा रूपबंध वेगळा करता येत नाही. माझ्यापुरतं मी एवढंच म्हणेन की रूढ आविष्कारापेक्षा काही वेगळ्या, काही जास्त अवकाशासाठी माझं कविमन उत्सुक होतं, अस्वस्थ होतं, आणि हा अधिक 'अवकाश' (बसअत्) माझ्या अनुभवबंधाला या कवितांत मिळाला आहे असं मला सध्या तरी वाटतं, एवढंच मी इथं नम्रपणं सुचवू इच्छितो.

या संदर्भात मराठी भावकवितेच्या रूपबंधाचा विचार केला, तर तो अप्रस्तुत ठरू नये. सध्या आपल्या काव्यक्षेत्रात रूपबंधाचे पुढील प्रमुख प्रकार रूढ आहेत : १) भावकविता, २) नाट्यगीत, ३) रूबाई/कणिका, ४) सुनीत, ५) दशपदी. यांतील शेवटच्या तीन प्रकारांना ओळींचं बंधन आहे. रूबाईला चार ओळींचं, कणिकेला पाच किंवा सहा ओळीचं, सुनीताला चौदा ओळीचं, तर दशपदीला दहा ओळीचं. अशारीतीनं ओळींचं बंधन रूढ झाल्यामुळं तेच सामान्यत: रूपाचं (Form)व्यवच्छेदक लक्षण मानण्यात आलं. सुनीताच्या बाबतीत मात्र थोडा भेद करण्यात आला आहे. त्याच्या रूपबंधामागील कल्पना प्रगतिदर्शक आहे. कारण ती तिथं अर्थानुगामी झाली आहे. तरीही ओळींचा काच सुटलेला नाही. या ओळींचे १२+ २ किंवा ८ +६ असे आशयानुगामी दोन भाग कल्पून सुनीताची रचना करण्यात येते, आणि मुळातल्या अनुभवाला पुढल्या दोन किंवा सहा ओळींत वेगळी कलाटणी देण्यात येते किंवा मूळ भावनेचा उत्कर्ष साधण्यात येतो. दशपदीत दहाच ओळी असतात, पण दहा ओळींना लागेल एवढाच आशय-अनुभव प्रतिभाचंचूनं कविमनातून टिपला जातो, असं सांगण्यात येतं. मला हे दोन्ही प्रकार थोडेफार कृत्रिम व कोष्टकी वाटतात. पहिल्या प्रकारात रचनेची पूर्वनियोजित कल्पना मनात असते, तर दुसऱ्यात अनुभव मोजण्याचं माप कवीजवळ असावं असं मानावं लागतं. प्रतिभाशक्तीला केवळ मापाचं किंवा ताजव्याचं रूप येतं. कवीजवळ अशा प्रकारचं माप असतं, असं मला वाटत नाही, असूही नये. त्यामुळं प्रतिभाप्रेरित, मुक्त व सर्जक अनुभवसंवेदनेला गौण, जड, चैतन्यहीन स्थान प्राप्त होतं. कलाविष्काराला रूपाचं असं बंधन नसतं. प्रत्येक कविता, कलाकृती आपला रूपबंध घेऊन येते, असंच मला वाटतं.

थोड्या वेगळ्या अंगानं काव्यरूपाचा विचार करताना मला असंही जाणवलं की अनुभवाचं स्फुरणच मुळात द्वंद्वात्मक आहे. त्याचं रूप द्विदलात्मक असतं. हे विश्वदेखील मुळात एक द्वंद्वात्मक स्फुरण आहे. काही तत्त्वज्ञानी त्याला द्वंद्वात्मकच मानतात. प्रकृति-पुरूष, स्थल-काल, पृथ्वी-आकाश, जन्म-मृत्यू, प्रकाश-अंधार, चेतन-अचेतन, स्त्री-पुरूष, सत्-असत् अशा द्वंद्वांनी हे जग नटलेलं आहे. श्वासावर जगणाऱ्या जगाला नि:श्वास अपरिहार्य होतो. तेव्हा अशा जगाच्या अनुभवाचं स्वरूप आणि त्याचा कलात्मक आविष्कार द्वंद्वरूप असणं नैसर्गिक नाही काय? उठणं-पडणं, फुलणं-सुकणं, श्वास-उच्छवास, उत्पत्ति-विनाश, अशा द्विविध गतीनं, पण एकाच मंडलात, या विश्वाचं चक्राकार भ्रमण चालू असतं. स्वाभाविकपणंच त्याच्या अनुभवाच्या स्पंदनाचे पडसाद जीवनात तसेच उमटतात. उत्कट, एकजिनसी परिणाम साधावा म्हणून, आपल्या सोयीसाठी, कवी काव्यात अनुभवाचं एखादंच रूप निवडतो. वस्तुत: अनुभवाचा द्वयस्पंदी आविष्कार माणसाला सत्याच्या, सौंदर्याच्या अधिक निकट नेणारा असतो. निदान त्याला ते शक्य व्हावं अशी अपेक्षा आहे.

खरं पाहिलं तर अनुभव हा बहुमुखी व सहस्त्ररूपी आहे. तो कामरूप आहे. क्षणाक्षणाला, पळापळाला, इच्छेनुसार तो अनंत रूपं धारण करतो. "सहस्त्रशीर्ष: पुरूष: सहस्त्राक्ष: सहस्त्रपाद" असाच तो आहे: पुरूषसूक्तातील आदिपुरूषासारखा. त्याचं हे रूप काळापेक्षाही अधिक चैतन्यमय व गतिमान आहे. तेव्हा मानवी बुद्धीला व कल्पनेला आणि त्यातल्या बापुड्या कवीला अशा अनुभवाच्या वेगाबरोबर धावणं- आणि तेही शब्दांचा भार डोक्यावर घेऊन, तो सांभाळीत धावणं- अत्यंत कठीण आहे.

या विराट अनुभवाचं आकलन व्हावं म्हणून या विश्वाच्या द्वंद्वरूपाचं रहस्य समजावून घेतलं पाहिजे. या द्वंद्वातच त्याच्या अस्तित्वाचं आणि सौंदर्याचं स्फुरण असतं. या स्फुरणाच्या स्वरूपाचं वर्णन ज्ञानदेवांनी किती सूक्ष्मतेनं, किती सुकुमार शब्दांत आणि कसं उत्कट व बहारदार केलं आहे, ते पाहण्यासारखं आहे.

"उठणें कीं पडणें । कुचभाराचें कोण जाणें
फाकणें कीं सुकणें। जाउळांचें ।।"

उठणं आणि पडणं, फाकणं आणि सुकणं, यांच्या स्पंदनात जाईच्या फुलांचं आणि स्तनांचं सौंदर्य स्फुरण पावतं. स्तनांच्या प्रतिमेनं कामिनीचं आणि कवितेचं सौंदर्यरूपच नव्हे, तर स्त्रीरूपधारिणी सृजनशक्तीचं, विश्वाच्या अखिल अस्तित्वाचं सर्जनशील रूपही अभिव्यक्त झालं आहे, त्याचे स्फुरण, स्पंदन प्रतिमित झालं आहे. 'दोनुली' तल्या काव्याला अशा स्पंदनाची स्पृहा आहे, आणि ही स्पृहा म्हणजे केवळ आविष्कारबंध नाही, तर एक अनुभवबंधही आहे. अपरिहार्य आविष्काराच्या द्वंद्वरूपात त्याचं रूपसौंदर्य आहे, पण आत्मा त्याच्या अनुभवबंधाच्या एकात्मतेत आहे. हे 'दोघुलेपण' 'दोनुली'ला अभिप्रेत आहे. गंगा-यमुनासंगमाच्या प्रतिमेच्या साहाय्यानं ज्ञानदेवांनी या द्वंद्वमय जगाचं आणि त्याच्या अंतरीच्या अद्वैताचं मोठं सुंदर, साजुक वर्णन केलं आहे. मला वाटतं, ते वर्णन मला अभिप्रेत असलेल्या रूपबंधाच्या कल्पनेलाही समर्पकपणे लागू पडतं. म्हणून ती ओवी इथं उद्धृत करण्याचा मोह मला आवरता येत नाही:

'गंगा यमुना उदक। बोध बगे वेगळीक
दावी होऊन एक। पाणीपणे ।।'

सूक्ष्म दृष्टीनं या कवितांतल्या अनुभवस्पंदांकडे पाहिलं, तर त्याचे आणखीही काही पैलू नजरेला येतील. काही स्पंदने समवर्ती, समांतर असतात, तर काही व्यावर्तक असतात, काही परस्परविरोधी, तर काही परस्परपूरक. ही स्पंदनं अमुक एका रीतीने व अमुक एका रूपात निर्माण होतील असंही सांगता येत नाही, तरीही अनुभवांमागील जाणिवांची कक्षा वाढावी, हीच अपेक्षा त्याच्या तळाशी होती असं, ह्या कविता लिहून झाल्यानंतर, आज मला जाणवते. मात्र लिहिताना काहीही अपेक्षा नव्हती. अनुभवसौंदर्याच्या दर्शनाची केवळ उत्सुकता होती.

ही दर्शनं कवी किंवा कलावंत सौंदर्यानुभवाच्या माध्यमातून अनुभवतो, आणि तिथं तो अनुभव आविष्काररूपच असतो. या ठिकाणी ही गोष्ट स्पष्ट करायला हवी, की काव्याच्या, कलेच्या सृष्टीत सुरूप-कुरूप, क्रूर-अक्रूर, भयाण-भयंकर, बीभत्स अश्लील या जीवनातल्या सर्व गोष्टी सुंदरच असतात. कारण वास्तवाचा शोध हाच स्वयमेव एक सुंदर अनुभव असतो. या वास्तवाच्या प्रदेशातूनच कलात्मक शोधाची वाट जात असते. त्यातून कविता हा तर स्वत:चाच शोध असतो. कवीच्या बाबतीत हा शोध त्याच्या अस्मितेचा, स्वातंत्र्याचा शोध असतो. तरीही कशाचा शोध घेतला, काय गवसलं हे कवी किंवा कविता कधी सांगत नाही, सांगू शकत नाही. कविता शोधाच्या प्रेरणेला फक्त चालना देते. गती देते. समाधान,तृप्ती हे कवितेचं साध्य नाही. उलट, एक अथांग, अपार अशांती, अस्वस्थता निर्माण करणं, जीवनाच्या अनंत शक्यतांचा शोध घेण्यासाठी माणसाला छळणारी चिरंतन अतृप्ती त्याच्या अंतरात जागवणं, हेच कवितेचं कार्य असतं. असा शोध माणसाच्या जीवनाला अर्थपूर्ण अनुभूतीचं स्वरूप देऊ शकतो.

या शोधात मला असं जाणवतं, की इथल्या अर्थाला अर्थहीनतेचे किनारे आहेत, आनंदी हास्याच्या फुलांवर अश्रूंचं दव साचलं आहे, जीवनप्रकाश देणाऱ्या सूर्यबिंबावर अंधाराची अथांग जळती विवरे आहेत, इथल्या चांदण्यातही माणसावर जळण्याची पाळी येते. हा माणूस कालबद्ध आहे. अवकाशात कोंडला आहे. माणूस असूनही त्याला माणूस होता येत नाही. त्याची प्रीती, सौंदर्य यांनाही कलंकाचा स्पर्श झाला आहे. 'क्रौर्यानं' त्यांना पायदळी तुडविलं आहे. समाज आणि सत्ता या दोघांनी, प्रत्येक काळात, या माणसाची वाणी डागून सीलबंद करण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही तो अजून मुक्तपणे गाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या गाण्याच्या लय-छंदात, चिंतनात, स्थळ-काळाची, वास्तव-अवास्तवाची बाह्यरूपं,

ठराविकांची चित्रं अदृश्य होतात आणि चिंतनच चित्रमय होत जातं आणि त्या क्षणी उरते वस्तूची प्रभा– त्या त्या क्षणांची त्या त्या अनुभवस्पंदाची भावस्थिती होऊन, भावस्थितीचा क्षण बनून! हे क्षण पकडण्याचा अल्प प्रयत्न, काही धडपड या कवितेनं केली आहे, एवढंच प्रामाणिकपणे नमूद करण्याची शेवटी मी परवानगी मागतो. ही धडपड 'सार्थ' की लागली की नाही ते रसिकांनी ठरवावे.

शेवटी ज्या मित्रांच्या प्रेमळ शब्दांनी गेली बारा वर्षे एका धुंदीत या कवितांचं लेखन मी करीत राहिलो, त्यांचे मला आभार मानले पाहिजेत. या कवितेचाही मी फार फार ऋणी आहे. कवितालेखनाच्या त्या धुंदीनं अनेक आपत्ती व मनस्ताप सहन करण्याची शक्ती मला दिली आहे. तिनं त्या व्यथावेदनांत मला जगवलं आहे. 'शिवेतरक्षतये' असं कवितेच्या ज्या मंत्रशक्तीचं मम्मटाचार्यांनी वर्णन केलं आहे, तिचा वेगळ्या व मर्यादित स्वरूपात मला प्रत्यय आला आहे, हे सांगताना मला मुळीच संकोच वाटत नाही.

गेली दोन तपं माझ्या अल्पस्वल्प लेखनाचं प्रेमानं स्वागत करत आलेले माझे सहृदय मित्र प्रा.श्री.पु. भागवत यांचाही मी फार आभारी आहे. त्यांनी या कवितेत रस घेतला आणि मौज प्रकाशनातर्फे अल्पावधीत आणि सुंदर स्वरूपात तिचं प्रकाशन केलं याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ही उपचाराची भाषा त्यांना आवडत नाही हे मला माहीत आहे. 'उपसाहिजो' जी एवढीच विनंती मी त्यांना करतो आणि थांबतो.

रानः १

उभे ताड उंच टेकडीवर
हजार हजार:
हिरवीहिरवीगार प्रश्नचिन्हे
उठलेली डोंगराच्या अनंत शंकांची
जन्मापासून भ्रमिष्ट पृथ्वीच्या.
उत्तरे त्यांची स्फुरणारी, विरणारी
घुम्याशा धुक्यात,
सोनेरी उन्हाच्या वेड्या चौकोनांत.

रानः २

हिरवेगार रानः
सांडलेले भान,
पलीकडे डोंगर, मधे चंद्रकार, खोल, तुटलेला
तिरपा खोवलेला त्यात
आभाळाचा तुकडा, निळा निळा,
जिथे वर्तमान
हरवून बसला
पायथ्याच्या पाखराची
सकाळची शीळ.

पाणी:१

ओढ्याची ओढ तोडून थांबलेले,
खिन्न, शेवाळलेले,
हिरवे-निळे पाणी:
पिवळ्या पानजाळीत
तारवटलेला डोहाचा डोळा:
साचलेली झोप उजाड रानाची,
निष्पर्ण झाडांची,
फडफडत जाणारे त्यात दिवास्वप्न
पांढर-कवड्या पंखांचे.

पाणी: २

क्षितिजाशी कधी पाकळीगत मिटते
वादळलाटांनी गिळून आकाश,
पुन्हा उगळते
समुद्राचे पाणी, उन्हात मोहरते,
चांदण्यात पिकते पुनवेच्या रात्री,

मोत्यांच्या दाण्यांनी.
शेवटी उरते नुसते मीठ
चंद्र-चांदण्याचे, भव्य अनंताचे,
विश्वात भरलेल्या ब्रह्मानंदाचे
नुसते मीठ: आसवांतल्यासारखे.

वारा: १

पानांचा खोपा बांधायचा होता-
अचानक झाडच निष्पर्ण झाले.
चढला वारा आभाळात वादळ होऊन
प्रमत्त, पृथ्वीची वळकटी करणारे,
धुळीचे स्तंभ पेटले, खचले,
प्रक्षोभांचा मनोरा निवारा न झाला.
फुलांनी लोटल्या सुगंधासारखा फिरतो रानीवनी
नष्टनीड आत्मा
मोजीत रेषा पानांच्या, दैवाच्या!

वारा: २

वेळूच्या बनात मला म्हणतात सूर:
कंठावाचून, ओठांवाचून स्फुरणारा षड्ज-गांधार.
फुलांच्या गावात ओळखतात मला सुवास म्हणून
झुरणारा, वेडा, कुणा सुनास चाफेकळीसाठी.
लाटांचे ओठ, फेसाचे हसू, क्षितिजाशी ढगांत विजेच्या दाढा,
समुद्रपणात खिदळणारा, रगडीत करकरा धरणी-आकाश.....
पण खरे सांगू?- अजूनही मी मला पाहिले नाही
बघून हजारदा डोक-डोकावून
प्रचंड आरशांत युगांएढाल्या.
दिसली फक्त पिवळी पाने,
सुकलेल्या पाकळ्या

उन्हाच्या ऐन्यात.
असेन, आहे मी,
तरीही सारखे वाटते, वाटावे,
–बरे असते ते–
सुवासाचे मरण जगणारांसाठी.

ऊन: १

काजळलेल्या अवेल्यावर,
शेवाळलेल्या भिंतीवर
उन्हे पडली घटकाभर
तेव्हा कळले त्यांनाही स्वप्ने असतात:
उतू जाणाऱ्या दुधाची, ऊन ऊन तूपभाताची,
टोपपदरी स्मिताची,
नथेतल्या स्नेहाळ पाचूची,
मोत्यांतल्या थबकल्या वादळाची,
लवलवत्या मखमालीची,
मातीच्या उगण्याची, सूर्याच्या नात्यांची,
पुन:पुन्हा पडणारी
निद्रेविणा, डोळ्यांविना.

ऊन: २

ओल्या हिरव्या पानापानांत उन्हे दाटतात,
डोंगराशी उतू जातात,
क्षितिजाच्या काठांनी, शुभ्र ढगांनी भरभरून,
तेव्हा काळ स्तब्ध होतो, उभा राहतो,
ताडाचे झाड होऊन,
उंचच उंच, आश्चर्याच्या सावलीसारखा!
– जिथे रिते अवकाश वितळते
रानामधल्या सोनसावल्यांत.
त्या क्षणी काही कळत नाही, काही शिवत नाही,
उरते एक अपारपण
मनामनाच्या भेटीचे,
विचुंबित मुखाच्या श्रांत तृप्त कांतीचे,
तरीही अस्पर्शित राहणारे,
गवताच्या पात्यावर थरथरणारे,
गवसून न गवसणारे,

उनासारखे, ऊनच होऊन
साऱ्या साऱ्या जगण्याचे,
सत्यमुखीचे कनकपात्र दूर सारणाऱ्या सूर्याचे.

तळे:१

निळेभोर तळे,
उज्ज्वल आकाश प्रभातरल,
कोवळी तांबूस लव प्रकाशाची पाणभुईवर,
नि:शब्द निश्चल जळबंदी अवकाश:
त्यांतूनच उमलतो काळ
झुळझुळत्या रेशमी जळाच्या कळ्यांत
स्फुरण्या–विरण्याची निळी लयकारी साधून,
पांढऱ्या कमळांचा गंध घेऊन,
त्यांचा रंग लेऊन,
सकाळच्या उन्हात.

तळे:२

सांजावले आभाळ
सांजावले तळे
गंजून गेली, काळी पडली सकाळची धुंद
अंधार भरला तळ्यात
अवकाशात काळोखाचे खडक
पाण्यात थिजलेले वारे
दिशांचे श्वास रूद्ध झालेले
पांढरे कमळ पाण्यात बुडालेले:
स्तब्ध उभा काळाकभिन्न, निगूढ अवकाश
काळाच्या मस्तकावर पाय देऊन नक्षत्रांचा.

चांदणे:१

उगवता चंद्र:
गोल खांदा तुझा गोरा गोरा,
पाठमोरा.
स्वच्छ चांदणे: तुझ्या मनासारखे
निकट असून किती दूर–दूर,
स्पर्शूनही पुन्हा अस्पृष्ट,
हरवलेले त्वचेच्या रानात.

चांदणे: २

तलावले चांदणे
जळ आकाशले
तरंगावला वारा हळुवार, काठाकाठाने,
झाडांच्या स्तब्ध हिरव्या–काळ्या छाया:
प्रगटले जळात पृथ्वीचे मनोगत,
दिवसाच्या कोलाहलाचा झाला आत
अबोल रंग,
मौन, चंद्रभोगी रात्रीचा प्रहर:
चांदण्याचा बिंदू जड, अचल
तरीही अनिवार:
अवघा काळ जिथे स्थिरावतो
आणखी जिथून कोसळतो पुन्हा
चंद्रकिरणांनी, अनंत, धूसर,
वाहू लागतो अवकाश
चांदणी रात्र होऊन.

कमळ: १

पापणी मिटते,
प्रकाशही मिटतो,
डोळ्यांत, डोळ्यांपुरता,
बाहेर अफाट उजेड असतो
पसरलेला क्षितिजापल्याड,
हे कमळाला कळते तेव्हा
ते उमलते.

कमळ: २

पाण्यात वेल उगवते,
पानांनी पिऊन टाकते सारे पाणी
तळ्यातले.
आक्रोशते जीवन
पानांखालच्या बंदिस्त काळोखात.
कुठे तरी तडा जातो हिरव्या अंधाराला:
फुलते, लवते पांढरे कमळ
अजाण प्रार्थनेसारखे, मौन, एकाकी नमस्कारासारखे.
आरस्पानी जळात
हासते, खेळते त्याचे लवलवते प्रतिबिंब:
तेवढाच आनंद

फुलणारा, बुडणारा
आपल्या चतकोर बिलोरी चौकोनात,
समुद्राएवढा.

अंधार: १

जळात साचणारा
तारांत थरकणारा
संध्याकाळचा तलम अंधार,
अजून ज्यातून शिवत असतो
मावळलेला दिवस:
धुंद रेशमी उबारा फेडलेल्या वस्त्रातला,
श्वासगंधी, देहस्वी.

अंधार: २

दोन बाहूंच्या, दोन देहांच्या
गच्च आलिंगनात घुसमटणारा,
गात्रागात्रांतून फुटू पाहणारा,
ऊन ऊन श्वासांत घामेजलेला, अस्ताव्यस्त अंधार:
दिवसरात्रीच्या मांड्यांतला अंधार
मध्यरात्रीचा, केसाळ, स्पंदणारा,
जीवन–मरण शोषून घेणारा,
धुक्याच्या पांघरूणात जिथे
सूर्य हालतो आहे
तेजाच्या साळीसारखा, रेत:कणासारखा,
अथांग अवकाशाच्या योनिकमलात.
वाकलेले आकाश तसेच: ऊर्ध्वरेता,
खाली धरणी थरथरणारी, मोहरणारी:
ऋतुसंहारिणी!
बिलगणारे देह, बिलगणारी मने:
दोघांत पहिल्यासारखाच
अलक्ष अंधार, अनोळखी,
नि:संग.

तारा: १

हा एक तारा, तो एक तारा:
दोन टिंबे तेजाची,
त्यांना जोडणारी, त्यांचे अस्तित्व जपणारी
एक रेषा अंधाराची,

तळपत्या किरणांची, जांभुळत्या आभाळाची,
काजळत्या ढगांची, जळत्या विजांची,
जडावल्या डोंगराची, उसळत्या समुद्राची,
हालत्या हिरव्या झाडांची, वळत्या वक्र किनाऱ्यांची,
पानांतील पिवळ्या शिरांची, देहातील निळ्या नसांची,
नसांतील ऊन ऊन रक्ताची
रेषा, रेषा– रेषांचा गुंता नुस्ता!
ही सारी सृष्टी, हे ब्रह्मांड, तो ईश्वर–
सारे अजस्त्र 'डिझाईन' रेषांचे! अनाद्यनंत रेषाकृती!
एक भूमिती आनंदघन,
प्राचीन ईश्वरापेक्षाही –ईश्वरापूर्वीची:
दोन टिंबे तारांची
अन् एक रेषा अंधाराची .....

तारा: २

अनादी संकोचासारखा,
गलबलत्या अनामिक हुरहुरीसारखा
भुरभुरता अंधार.
त्याच्या मनात चमकत होत्या
पहाटरात्रीच्या मंद तारा:
तुकडे फुटक्या आरशांचे,
ज्यांत कधीच पाहता आले नाही
माणसाला वा ईश्वराला
आपले रूप.

समुद्र: १

समुद्र: एक साखळी काळ्याभोर लाटांची,
अनोळखी, अपार,
क्षितिजापलीकडून येणारी–
आदळणारी
पृथ्वीच्या काळ्या कातळकाठावर,
फोडीत साऱ्या स्मृती, साऱ्या खुणा
मागील विश्वाच्या, भूतकाळाच्या
उन्हाने तळपणाऱ्या भविष्यासह,
खळखळा हासत माडांच्या छायांत,
रत्नांच्या चुरात उगवतीच्या,
–आणि पुन्हा
शोषीत आपणच आपल्याला,

प्राशीत आपलीच तहान
तृप्तीने परतणाऱ्या लाटा,
ओंजळीत घेऊन निर्माल्य, करवंट्या,
मावळते सूर्य,
मिटत जाणारे हे सुकतीचे कळे.
अवघा समुद्रच एक अगाध, अद्‌भुत क्षण
जांभळा-जांभळा, अंतर्मुख.

समुद्रः २

डळमळणाऱ्या आकाशासारखा
समुद्र आरपार, वर आकाश
ढगांनी भरभरून उतू जाणारे, समुद्रासारखे,
मध्यभागी एक इवला पडावः
शुभ्र ठिपका पाऱ्याचा
उन्हाच्या झोतात तळपणारा,
नाखवा गाणाराः
हातातले वल्हे थांबलेले, विसरलेले,
भोवती सुरांनी मंतरलेला समुद्र
-गाणेच झालेला,
त्या गाण्यात पुन्हा एक समुद्र,
समुद्रात एक पडाव गात चाललेला,
पलीकडे सुरांनी बांधलेला किनारा
सूर्य-चंद्रांची स्वप्ने रूजविणारा,
अलीकडे सुरूंचा काठ, घनदाट,
पाखरांची शीळ उरात जपणारा,
भर समुद्रात दूर दूर जाणारा,
पाऱ्याचा ठिपका, नाखवा खुळाः
निर्वासित झालेला सत्यापासून,
स्वप्नापासून.

औरंगाबादः १

सरत्या रात्रीच्या डोंगरमाथ्यावर
अंधार निवळताना, धुके तरळताना,
ढगाला केशरी धुमारा फुटताना
क्षितिजावर ते लख्कन उमटते
तळपते अग्निकंकणः
थरथरती, धगधगती प्रकाशाची पाकळी.
झाडांमधून, उतरत्या किरणांवरून

वाहत येते सोन्याचे पाणी
हलके अधांतरी,
किलबिलती वारे इवलाल्या पंखांनी,
होते पानफूल शहारत्या अंगांचे,
गालांवर, डोळ्यांवर भुरूभुरू उडतात
मोरपिशी म्हाताऱ्या सोनेरी किरणांच्या,
दिपलेल्या नजरने बघतो जेव्हा
डोंगरावरती सूर्यनारायण:
उगवते आश्चर्य, हिरण्यगर्भ
सनातन सकाळचे.

औरंगाबाद: २

प्रकाशाची अजून उन्हे झाली नसतात,
ओस घरे, अवघडली झाडे कुशीवर वळतात,
दारांना टेकून रिकामे रस्ते आळोखे देतात,
जख्ख वाकल्या, मख्ख तटबंद्या पाहत बसतात,
रात्रीपासून, पळताना इथून हजार हजार पाय
फुटलेले भीतीच्या मुक्या गाठोड्यांना
रंगमहालाच्या भिंतींनी कण्हत,
हुंदका दाबून पडल्या असतात म्हाताऱ्या झोपड्या,
चोरी असते ज्यांना सांगण्याची नावे
आपल्या कुशीच्या मेलेल्या पोरांची,
मारो, काटो, जला दो शहर– रात्रीच्या वल्गना
लोळतात धुळीत आता, विझलेल्या मशालीसारख्या.
चिरेबंद अचरज: 'काळा दरवाजा' उभा पाहतो:
मुक्त शहर, भारतीय जवान, हिरव्या हेल्मेटी,
वळत्या गाडीवर बसलेली तोफ लेऊन शेंदूर,
उन्हासारखा उधळलेला गुलाल चौकाचौकांत,
जिथे सांडले होते काल रक्त, अश्रू.
एक अद्‌भुत सूर्योदय मनामनाचा:
हरपालाच्या[१] ओल्या कातडीचा,
मुनी वसिष्ठाच्या सहिष्णू छाटीचा,[२]
ज्याला मुजरा करीत होती
एक सकाळ सप्टेंबरची.[३]

दुपार: १

हिरवेपान तळे, झाडे हिरवीशीळ,
हिरव्यागार सावल्या हिरव्या बिलोर पाण्यात
या हिरव्या क्षणात, या हिरवेपणात
फडफडते प्रतिबिंब शुभ्र, निरालंब:
आपल्याच कंठातील चीत्कार बनलेला
एक मुका पक्षी
नष्टनीड, आकाशवंचित,
दुपार–उन्हाच्या पिवळ्यापान मनात.

दुपार: २

शिशिराची दुपार.
डबके हिरवे–पिवळे:
जीर्ण पिकले पान उन्हात गळालेले
आभाळातून, काळ्याभोर म्हशीसकट,
तेलिया तकतकीत ओल्या कातडीत तिच्या
तळपतो किरण
मृत्यूच्या चकण्या डोळ्यातील बाहुलीसारखा.
मृत्यू? –होय, मृत्यू–
सावित्रीच्या दु:खमलिन डोळ्यांतल्या त्या जीवनोत्सुक दुपारला
आयुष्याचा अर्थ विचारणारा मृत्यू–
सनातन वडाखाली ....
.....
ही दुपार पाण्यातली, निर्मनुष्य, उदास,
रवंथ करते स्वस्थ, डोळे मिटून
म्हशीसारखी.

शब्द: १

नव्हतेच काही तेव्हा शब्द होता
शब्दरूप, सत्ता नव्हत्याची
शब्द जगाआधी शब्द जगाअंती
शब्द चंद्र स्वांती अमृताचा
शब्द माझा धर्म शब्द माझे कर्म
शब्द हेच वर्म ईश्वराचे

शब्द:२

शब्दालागी शब्द चतुरा, दिलास
काय अनुभवास अर्थ आला ?
केवळ शब्दांचा झाला गुणाकार
वजावे आकार वेधलावी
तरंगाची माळा उठते जळात
पाण्याचा तो अर्थ म्हणो ये का ?
अनादी अंधार व्हावे मावळून
नसत्याची खूण उमगाया
अर्थ प्रकाशाचा भोगावा जळून
सुखे उजळून ज्वालेमध्ये.

अस्तित्व:१

उशीर का आता पेटवाया चिता
आधीच पुरता जळालो मी
मरणाचे नाव जीवन ठेविले
जळता वाटले सूर्य झालो
चेतला दु:खाचा चंद्र अंतरात
भस्म चांदण्यात देह झाला
आता सांगो लोकां राखेचे ते ज्ञान
उपनिषद्गान अस्तित्वाचे.

अस्तित्व:२

साठविता डोळा सूर्यनारायण
उडावे हे प्राण अवचित
जळात, उन्हात पाखरांच्या माळा
बिंबाचा सोहळा प्रतिबिंबी
सहज गळावे देहाचे या भान
पिकलेले पान तळ्यामध्ये
बिंबतात झाडे तीरीची पाण्यात
तसे कवितेत नांदो आम्ही.

आरामखुर्ची:१

पाकळ्यांचे फूल हवे पुन्हा ह्यांना जोडून
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून
दिवस ढळून गेलाय समोरच्या माळात
फुलफांद्या हाडांच्या काकडल्यात हिवात
थोडा बर्फ केसांत, थोडे कण डोळ्यांत

विरजलेल्या उन्हाची कवडी द्या ना फोडून
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून

गालीची कुजबूज गुलाबांत बघतात
खिदळणे मुलांचे खळाळात शोधतात
गळालेल्या फुलांत मधूनच हरवतात
सृष्टीत दृष्टीचा पुन्हा दोरा द्या रे ओवून
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून

उंबरठे मोडले, वाटा बुजून गेल्या
पांघरल्या शेल्याच्या धांदोट्या झाल्या
भोगल्या चेहऱ्याच्या रेषा–रेषाच उरल्या
निषाद–निळ्या आभाळाला
पानगळीचा षड्ज पिवळा
द्याल का रे मिळवून ?
आजोबांना आरामखुर्ची द्या जरा आणून

आरामखुर्ची: २

पाहिलीत तुम्ही
व्हॅन गॉफची आरामखुर्ची ?
–म्हणजे त्याने रेखाटलेले चित्र.
पण ते असो.
तशी खुर्ची असते प्रत्येक एकान्त खोलीत
एकाकी, रिती, जांभईसारखी,
बाजूला उभे असतात उंच बूट, अचल,
पायाविणा,
त्यांतले पाय बाहेरे गेले असतील,
नाहीतर येतील इतक्यात
लोटून दार,
कदाचित येणारही नाहीत– कधीच,
ती आरामखुर्ची मात्र वाट पाहत असते
कुणाची तरी
बुबुळे झडलेल्या डोळ्यांच्या खोबण्यांमधून:
अवघडलेली एक जांभई:
सरत्या रात्रीचे क्षितिज: दुसरी जांभई
आळसावलेली,
आणि लुकलुकतात नक्षत्रपुंज, जिथे
असाव्यात मोत्यांसारख्या दंतपंक्ती,
तरीही ती एक जांभईच.

सारे अथांग, आरपार...
तर ही व्हॅन गॉफची आरामखुर्ची
पाहते समोर खिडकीत
पेटलेले सूर्यफुलाचे वणवे.
तुम्ही पाहिलेत का?
पाहा, पाहा एका फुलात तर
चक्क तुटका कान दिसतोय,
त्यावर 'बोर' झालेल्या
वेश्ये[१]च्या टिंगलखोर डोळ्यांतले अश्रू
आता बावरलेले आपल्याच चेष्टेने
आणि त्यांत बिंबली आहेत पुन्हा
जंगले सूर्यफुलांची[२],
व्हॅन गॉफने पाहिलेली, न पाहिलेली,
त्याची लाल सोनेरी दाढी
अन् दोन पिसाट डोळे,
झपाटलेले!

रस्ते: १

पारूला पोलिओ झाला होता, अब्दूल्लाला क्षय.
एक हात लुळा, एक पाय वाकडा तिचा, तो थुंकत होता रक्त बेडक्यांतून.
निसर्ग बेदरकार: ती मुसमुसली तारूण्यानं
फुलांनी फुलणाऱ्या वाकड्यातिकड्या डहाळीसारखी, त्याच्याही मनात
पालवली वासना दगडावर साचणाऱ्या शेवाळ्यासारखी,
ज्यावरून तो स्वत:च घसरून पडत होता कित्येकदा.
तिच्या बांधावरील फुलं कुस्करली मळा शिंपताना
उसाच्या धुंद आंधळ्या डोळ्यांनी, चालवीत होता तो
साचा खोकत खोकत, गिळीत धुरोळा कापसामधला.
हाकललं आईबापांनी, पोलिसांनी डांबलं अनाथालयात
शेंदून तिला विहिरीतून, त्याला कोंबलं इस्पितळात दयाळू गिरणीमालकानं.
बेंबीचा देठ खुडल्यावर आली ती आरोग्यकेंद्रावर,
आला कामावर तोही, गमावून दोन फासळ्या.
ती केंद्रावर दूध विकीत होती, तोही यायचा तिथं,
ओतताना दूध त्याच्या ग्लासात उतू जात होतं तिच्या मनात काहीतरी, उगीच,
आणि दुधापेक्षा तिच्या नजरेची धारच प्यायचा तो भरभरून.
तो म्हणत होता, 'काठ वाकडा झाला म्हणून नदीचं पाणी
थोडंच वाकडं वाहतं? ' ती सांगत होती, उगाच नीट करून डोईचा पदर,
'माझ्या राजाचं काळीच कित्ती शाबूत आहे,
मोठ्ठं आहे, दोन फासळ्या काढल्या तरी.'

बाहेर मात्र दोन गटांत लाठ्या चालल्या होत्या, फुटली होती डोकी
हिंदु-मुसलमानांचं हे लग्न कुणी लावलं म्हणून
-आणि कुत्र्याच्या बाहेर आलेल्या जिभेसारखा लळलळ
दिसत होता गल्लीतला रस्ता लाल, निर्मनुष्य.

रस्ते: २

एक काळी कुत्री पडली होती रस्त्यावर डोळे मिटून.
भकाळी गेलेल्या तिच्या पांढऱ्या पोटाला लुचीत होतं पिल्लू
दुसऱ्याच एका मेलेल्या बांड्या कुत्रीचं, जी काल
चिरडली गेली होती मोटारीखाली: अन् हे आपलं
या काळीच्याच थानाला लागलं येऊन केकाटत, तिच्या
इतर चार पिल्लांबरोबर, तेव्हा तिनं दिला नाही नकार.
फुटपाथवरची भागी हे सारं पाहत होती टुकूर टुकूर.
भेदरलेल्या वेडसर डोळ्यांत चमकला गर्भ तिचा
पोटातल्या पोटात चेचलेला तिच्या आई-मामांनी मिळून.
'वाचवा, वाचवा माझ्या बाळाला' कित्ती रडलीभेकली ती,
द्रवले नाही कुणी, मात्र वाहिलं पांढरं पाणी अंगावर,
रक्ताच्या धारा, नंतर कोसळला मांसाचा कोथळा एक,
उंदराच्या आकाराचा, पायापासल्या थारोळ्यात.
हादरली झोपडी किंचाळ्यांनी तेव्हा, जरी मामानं
मुस्क्या बांधल्या होत्या तिच्या, पोटातून, कमरेतून
कळा उठत होत्या ज्वाळेसारख्या, आतडी फाडणाऱ्या
त्या आगीतच ती जळून गेली, बाहेर सांडली त्यातून
ही सावली, करपलेली, वेडीविद्री, भ्रमिष्ट.
कुठे कुठे भटकली ती शोधीत उकिरडे गावोगावचे.
ह्या पिल्लाएवढाच होता ना तो तिचा गोळा..
खदखदा हासत कवटाळलं तिनं त्या पिल्लाला,
घट्ट घट्ट, 'पी रे, पी ना आमा वेड्या, चोळी भिजली बघ-'
तेव्हा समोरचा हसन्या तिला डोळा घालीत होता
खाजवीत मांडी. खदखदा हसत ती वेडी ओरडली,
हसन्या, कुत्रा आहेस मेल्या! अन् ती पळत सुटली.
कुत्रीचं पिल्लू कुशीतलं तिथंच पडलं गळून.
संध्याकाळचा फुटपाथ शांत पसरला होता कुत्रीसारखाच:
झोपड्या तिला लुचीत होत्या, चुलींनी उजळलेल्या,
झापांचे डोळे मिटून.

दाणे: १

कसे असते मरण ?
आकाशासारखे अथांग निळे
की नि:स्तब्ध काळ्या समुद्रासारखे
जीवनखोल ? पण
त्याच्या तळाशी मासे पोहतात,
समुद्रफुले फुलतात,
वर निळेपणात
भिरभिरतात पाखरेही:
खोपा दिसतो का त्यांना पलिकडे ?
की दाणे नक्षत्रांचे असीमाच्या अंगणातले ?...
'दाने दाने पर लिखा है खानेवाले का नाम',
'मरावे परी कीर्तिरूपे उरावे,'
शब्द शब्द नमकहराम !
भोवती सारा अंधार काळाकुट्ट
डोळ्यांत बोटे खुपसणारा.

दाणे: २

पसाभर ज्वारी मागत फिरताना
कोसळला तो भिकारी
ठेच लागून निपचित,
तळतळत्या उन्हात, निर्जन रस्त्यावर.
टुळूटुळू बघत आहेत
दोन अजाण चिमण्या टिपीत
त्याच्या झोळीतून उधळलेले दाणे.
ते दाणे चैतन्याच्या उन्हातले
की मरणाच्या सावलीतले ?

वार्ता: १

मोझांबिक, दि.२७: चौकात
लटकत होते एक प्रेत झाडावर
वाळून, जुनाट फांदीसारखे.
'झिंदाबाद, शहीदे आझम झिंदाबाद'
गर्जत होते लोक गर्दी करून,
'स्वातंत्र्याकरिता प्राणाचा बळी दिला त्याने,
पसरतो असाच संस्कृतीचा, मानवतेचा
जीवनवड.'

त्याचे बसके घर दूर स्तब्ध होते
दाबलेल्या हुंदक्यासारखे
बाजूच्या गल्लीत, पलीकडे,
उत्तुंग इमारतींच्या दिगंत गर्दीत.

वार्ता:२

मुंबई, दि.२७: शहरात,
रस्त्यात
कितीतरी दिवसांपासून
दिसली नाही ती
घरी,दारी लायब्ररीत.
कोणी म्हणतात, 'तिला अटक झाली.
फारच कडक बोलली हो ती
विचारस्वातंत्र्याच्या प्रश्नावर.'
कुणी म्हणतात, 'अशी एक अफवा आहे,
जीव दिला तिनं समुद्रात, त्यानं नकार दिला म्हणून,
जो असह्य झाला तिला,
त्याच्या नकाराचं स्वातंत्र्य मान्य असूनही.'
चौपाटीचं गदळ पाणी चरचरा फाटत होतं
जुन्या वृत्तपत्राच्या पिवळ्या पानांप्रमाणं
जिरवीत या दोन्ही बातम्या आपल्या पोटात.

वादु तो मी- गोविंदु: १

पाण्याने स्वच्छ धुतलेले मांसखंड:
रक्तपेशीचे स्पंदन नाही, की जिभाळीही नाही तिथे,
शिवाय कोंबडीच्या उच्चारामधला
अर्थ कधीच हरवला आहे
तिच्या पंखांच्या फडफडाटांसह.
त्याला साक्ष आहे आता फक्त सुरी:
जीवनवादी मरणाची धार, नि:शब्द,
सांजेचा वाळला वातड तुकडा
काळा-शेंदरा.

वादु तो मी- गोविंदु: २

स्टेनलेस ताटलीतले हे माशाचे मुंडके:
जबडा इवला, किंचित वासलेला,
चमचमत्या दातांची सुईची अग्रे,

त्यांवर एक वेंधळे हसू, ओले, मरणाचे
सुळकन तरंगताना खोल डोहात. तेव्हा
माणसे मरतात पाण्यात
श्वास कोंडून, गुदमरून,
पण ती श्वासोच्छवास करू शकतात
मरून, पाण्याबाहेर, मोकळ्या वाऱ्यात,
या सत्याची जाणीव नव्हती तिला
(हे महद्भाग्य त्या मासळीचे)
त्या मीनाक्षी टिकल्यांतून काचेच्या
शराब ठिबकत नाही,
आभाळही हिनकळत नाही पूर्वीसारखे
आपल्या अथांग निळेपणात,
त्यांत दिसते फक्त मरण एका सौंदर्यवाद्याचे,
जो म्हणत असतो विजयानंदात:
'ऐसा प्रतिपादनामाजी वादु
तो मी म्हणे गोविंदु,'

मच्छीकमान:१

हैदराबादची ही मच्छीकमान.
मच्छी नाही इथे, नाहीत इषारेही
मादक मीनाक्षीचे,
चिलमनच्या हिरव्या-श्याम आडोशातले,
फक्त उभ्या आहेत देवड्या
जीर्ण, ओसाड, पडू पडू करणाऱ्या,
मोडक्या नवाबांच्या:
भिंतींना कुबट ऐतिहासिक गबंध वटवाघुळांचा.
चारमिनारपाशी मात्र भिकारी ओरडत आहेत:
'जुम्मेरात, भरी मुराद-जुम्मेरात भरी मुराद.'
'फुर्र फुर्र' शिट्या किंचाळत नव्हत्या पूर्वीसारख्या
रस्त्याची एक बाजू लुळी पडली नव्हती आज[१]
निर्मनुष्य होऊन, अंगावरून वारे गेल्यासारखी,
शहर-कोतवालच्या आलीशान मोटारीमागून
धडधडत येत नव्हती जुनी फोर्ड निजामाची,
तरीही 'मक्का मशिदी'[२] च्या हौदाभोवती
'वजू'[३] करीत होते
मगरिबच्या नमाज़ाकरिता, सवईने, फकीर-
अंगांत कफन्या, गळ्यांत माळा:
हिरव्या-पांढऱ्या माश्या
शिळ्या बिर्याणीवर घोंगावणाऱ्या!

मच्छीकमान: २

मच्छीकमान उभीच होती
दिव्यांच्या लखलखाटात:
रिती, पोखरलेली,
बुबुळं झडलेल्या माशांच्या डोळ्यांसारखी
शुभ्र, हाडबंद. रात्र निर्मनुष्य.
तडाखेबंद खपत होती मिठाई
शाही हलवायांच्या दुकानांतली,
हारे भरभरून नेत होते उंचच उंच म्हातारे:
शुभ्र कफन्या फडफडत होत्या
बगळ्यांच्या पंखांप्रमाणे,
दाढ्या हालत होत्या
कबरेवरील चवऱ्यांसारख्या,
अन् दहा पावलांतच सारे हरवत होते–
ते हारे, ते म्हातारे
निस्तब्ध रात्रीच्या अंधारात.
'ते जिन[१] आहेत'
कुजबुजत होती पोरे हलवायांची,
हिरव्या माश्या गणगणत होत्या
रित्या बुट्यांवर,
दिवस फटफटत होता मुसेच्या काठावर.
मच्छीकमान उभीच, अवघडून, घुमी,
हरवलेली,
जीवन आणि मरण दोन्ही हरवून बसलेल्या
भुतांच्या जगात.
उघड्या नालीच्या काठाशी बडबडत होता
पिऊन पडलेला पोलीस शिंदीच्या धुंदीत:
'सच्ची, जिन्ननोंकाच्च शहर है यह– अयय्यो–
नी अम्मा, [२]
एक संन्यासी भी आ मिला है उसमे:
बडा जिन्न वो– सत्यागुरू'[३]. ...
तेव्हा रस्ता जागा होत होता
'शंकरशेर'[४] च्या चहाच्या कंपातून
'खड्या'[५] चमच्यांच्या खणखणाटात.

अमलताश: १

निळेभोर आकाश वर,
खाली अमलताश.
सोनेरी घोस फुलांचे, स्तनाकार
डहाळ्याडहाळ्यांवर:
निद्रिस्त हिरवेपणाला आलेली
तप्त सुवर्णी जाग, यौवनमंथर.
किती दिवसांपूर्वी लावले होते हे झाड?
आज ते चैतन्याने बहरते आहे,
फुलांनी फुलते आहे,
सळसळते आहे वाऱ्यात
रंगगंधाची सतार होऊन,
झंकारते आहे निळाईचे बोल खुडून.
हे चलनवलन, हे जीवन
मीच दिले ना त्याला?
'अहं वृक्षस्य रेरिव:।'

अमलताश: २

अमलताश:
हा सोनेरी विश्वास फुलांचा
पाकळीपाकळीने गळत आहे
माझ्या अहंकारासंगे.
अन् मातीचे चुंबन घेणाऱ्या फुलांत
कुजबुजत आहे अमलताश:
माणसा, जेव्हा तू हे झाड लावलेस
तेव्हा मीही उगवलो तुझ्यात
आपली हिरवी 'पाली' भाषा घेऊन.
(नाही तरी माणसांआधी झाडेच होती ना?
जेव्हा झाडे लावली जातात,
तेव्हा झाडाझाडांतून माणसेही
पेरली जातात.
त्या माणसांतून उगवतात पुन्हा झाडे,
ज्यांची मुळे जमिनीत नसतात,
छाया असतात आभाळावर. मात्र
आरण्यकाच्या सकाळधुक्यात
झाडे पठण करीत असतात, दूर,
'अहं मनुष्यस्य रेरिव:।'

हे दु:खप्रिया: १

–हे दु:खप्रिया,
मी आहे सनातन दु:ख.
जन्मलो तुझ्या, या जगाच्या प्रसववेदनेतून
पाठीला पाठ लावून.
नाही ओळखलंस मला ?
–ओळखलं.
तुला कसा विसरेन
माझ्या अनामिका ?
तुझाच वेध लागलाय.
पाहिल्यापासून तुला बिंबलेला
माझ्या आसवांत:
पांचालीने नाकारलेल्या
कर्णाच्या मत्स्यवेधासारखा, अवेध्य !
–का, वाईट वाटतं
मत्स्यवेध झाला नाही म्हणून ?
काळंभोर काजळबिंब, अच्छेद्य,
जडलेलं असतं ना
फुलत्या–खिरत्या चंद्रकोरीला ?
दिसते का कधी तिची व्यथा
कालवलेली चांदण्यात ?

हे दु:खप्रिया: २

–या चांदण्याचं काही सांगू नकोस.
ते असतं चोराच्याही मनात.
मी पाहिला आहे आज
सूर्य माझ्यात बुडताना.
माझ्यातच उगवेल तो उद्या
तुला माहीत आहे का
माझ्या अनामिका ?
–खरंच का रे दु:खप्रिया,
खरंच ?

म्हणजे–म्हणजे: १

–कशाला आठवण करून देतेस
आता त्या क्षणांची ?
क्षण म्हणजे पक्षीच:
गेले उडून पंख फुटल्याबरोबर.....

–आणि प्रेम म्हणजे तरी काय?
एक दु:ख!
–छे, दु:खही नव्हे.
अश्रू त्या दु:खाचे फक्त:
कसे पलकांत धरता येतील
एकदा सांडल्यावर?
–सांडल्याचं काय!
अश्रूंची फुले
फुलांवर दव
दवावर ऊन
उनाचं काय!
आभाळाची साय
पुसून तर पहाय

म्हणजे–म्हणजे: २

–थांब, पुसू नकोस ती आसवं:
पुसत्या पदरालाही
डाग लागत नाही त्यांचा.
–डाग पडतो काळजावर
कावळा कोकतो झाडावर!
–खरं नसतं तसं काहीच प्रेमाचं:
त्वचेइतकंच तात्पर्य त्याचं.
खरं फक्त रजोदर्शन!
–म्हणजे– म्हणजे?
–म्हणजे जाऊन चंद्राला विचार,
चंद्रावरच्या कावळ्याला विचार
–तरी पण?– म्हणजे?
–वाघाचे पंजे!

स्तन: १

..... ओढून खर्रकन
खाली सोडला पदर तिनं, काचोळीही नव्हती अंगात:
उघडे भरदार स्तन, गोल गरगरीत, गोरे गोरे पान.
धडधड उरात, आसवं डोळ्यांत,
गालावरची लाज आली सांडून सरसरत खाली स्तनांपर्यंत,
अधिकच आरक्त दिसू लागली जांभळी कुचाग्रं
मुखाच्या विवर्ण चांदण्यात. 'ए, पाहा ना वर–'
ती म्हणाली हुंदके देत, 'घे, पाहून ठेव चांगले डोळे भरून

ही सूर्य–चंद्रांची अतिथी जोडी, अमोरसमोर,
दक्षिण सागरावर, कन्याकुमारीच्या काठावर, अन् सांग,
आहेत की नाही दोन सुडौल गोलार्ध पृथ्वीचे
स्थल–कालाचा संदर्भ हरवलेले ?'
फाटली माझी दृष्टी विटक्या वस्त्रासारखी.
'जेव्हा मी नाचू लागते, हे हलू लागतात, थिरकू लागतात
थक्थय थक्थय–डळमळते भूमंडळ, नभमंडळ अवघे.
मीही होते बेभान पाहताना ह्या हालत्या, गरगरत्या वक्ररेषा–
काळाला येते भोवळ या सोनेरी रेषांची! घे पाहून,
उद्या दिसणार नाहीत, कधीच दिसणार नाहीत पुन्हा.
कापून टाकणार आहेत ना हे – ते उद्या– हो.
तूच शेवटचा पुरूष आहेस
हे पाहणारा. देवा, कोण पाहील माझं नृत्य त्यानंतर ?
सांग उद्याला किती सुंदर होते ते. पाहा, स्पर्श करून पाहा,
चुंबून घे ही गोलाई– आ –ई–गऽ'
ऊन ऊन सोनेरी अश्रू सांडत होते स्तनांवरून सुवर्णमण्यांप्रमाणं.
आली तशीच गेली ती– आशा नर्तकी, बुडालं सूर्यबिंब बंद दारात.
अंधाऱ्या इस्पितळात पडलोय, काल कापलेल्या माझ्या पायासारखाच,
एकटा, आवाक् मी– मी नामा.[१]

स्तनः२

हे स्तनच नसते तर ?
किंवा तेव्हाच कापून फेकून दिले असते तर ?
या वेदना तरी उरल्या नसत्या म्हणते मी– मी उर्वशी.
नाचते आहे आज इंद्रसभेत. माझे गोल उभट स्तन
हालताहेत, थरकताहेत तालावर– सुवर्णकलश अमृताचे!
बसलाय देववृंद भान हरवून थरथरत्या वक्ररेषांत,
त्यांना वाटतंय, काळच स्थिर झालाय इथं भोवऱ्याच्या घुमाऱ्यासारखा,
म्हणूनच आपण अमर आहो, या नृत्यक्षणापुरते– हूंऽ
या कुचभाराखाली ठणकणारी वेदना कळत नाही कुणालाचः
जन्म देताच परत आले मी सोडून बाळाला पृथ्वीवर.
म्हणे शापकाल संपला– तो तर आत्ता सुरू होतोय.
कळा लागल्यात स्तनाला अन् कौतुक होतंय कलेचं, नृत्याचं
दूध जिरवून, वात्सल्य गोठवून नाचावं लागतंय–
काय करायचेत स्तन, स्तन्याचं सार्थक नसेल तर ?
कुणी ओढीत नाही दूध चुरूचुरू इवल्या कवळ्या ओठांनी,
निघताहेत दुधाच्या सिलका अंगभर. हे देव–
(ज्यांची सावली नि आसवं कधीच सांडत नाहीत भुईवर)
आईची आठवण विसरलेलेः धुंद बसलेले मायावी राक्षस हे!

ही स्वर्गभूमी– मृत्यूचं भय नसलेली, फुलांची स्मितंही इथं गोठलेली, संगमर्मरी!
नको, नको, जावं पुन्हा शापित बनून मृत्युलोकात,
जिथं जन्म आहे, इवलंसं बाळ आहे, स्तनांत दूध आहे, अन्
पलीकडे उभं आहे मरण, फूल बनून, आईचे डोळे होऊन,
हसरे, न्हालेले अश्रूंनी, दुधांनी–

पुत्रः१

–हो, तोच मी प्रख्यात कवी सुबोधचंद्र 'प्रशांत.'
असिधारा, प्रेममंडप, प्रीतिगंध– माझेच काव्यसंग्रह गाजलेले:
प्रीतीच्या इकारानं तर म्हणतात वेलांटी मारली सूर्यचंद्राला.
पुरस्कार मिळाला शारदापीठाचा, झालो पुढे कवीचा गॅझेटेड क्लास वन,
भोगला, राबवला अधिकार काश्मीरी शालीच्या सुखवस्तू शैलीत.
दरवळला 'सुगंधु सोनियाचा'– वृत्तपत्री शाईच्या उसन्या दर्पात.
आणि–
एके दिवशी आला दारात मागत भीक एक भिकारी
दिसणारा माझ्या परागंदा मुलासारखा, पुढे करून
भिक्षापात्र माझ्याच घरच्या चोरलेल्या भांड्याचं.
उडू लागली राख माझ्या आनंदाच्या, अहंकाराच्या पाकळ्यांत,
मानवतावादी काव्याच्या माझ्या उद्ध्वस्त शब्दांत,
स्वप्नाळू डोळ्यांत.
व्यासाच्याही डोळ्यांत उडाली असेल अशीच राख:
त्या राखेचं महाभारत केलं त्यानं!
माझ्या डोळ्यांत मात्र असहाय पाणी
त्याच्या पात्रात टाकताना पैसा, आसवाएवढा.

पुत्रः२

'पुत्र म्हणजे नरकापासून वाचवणारा की त्यातच पचवणारा?'
काकाजी मार्तंड विचारीत होते प्रश्न, जखमेएवढे खोल आकाशाला.
काकाजी म्हणजे– ते – ते गेले होते बापूजींबरोबर दांडीयात्रेत, जागले मिठाला,
सत्तापदे नाकारून बसले जाऊन आश्रमात, जिथे पुढे विनोबा विकले सत्तेला:
बोलले, 'आणीबाणी म्हणजे अनुशासनपर्व' – गढूळले पाणी पवनेचे,
निघाले काकाजी धिक्कारून ग्रहणग्रस्त सर्वोदयाला, शिरले सत्याग्रहात
गोळ्यांच्या वर्षावात, भीरूंचे पाप धुण्यासाठी आपल्या पंचासारखे.
त्या वेळी गृहमंत्री असलेला त्यांचा पुत्र बाळासाहेब कलंडला होता मखमली खुर्चीत,
समोर रूजाम्यावर गळत होता भुसा पेंढाभरल्या वाघाच्या पोटातला,
मिटल्या नजरेच्या प्याल्यात, थरथरल्या सोनेरी फेसात, निळ्या निळ्या वेलीत धूम्रवलयांच्या,
नाचत होती रात्रीची लवथवती गोरी गोरी अंगे शोधीत आपले पदर
गोळीबाराच्या हुकुमात मिसळलेले, फोनच्या आवाजात अडकलेले, मात्र

काही ऐकत नव्हते, पाहत नव्हते बाळासाहेब: एक चक्षुश्रवा!–
कात आलेला, फुंफाटणारा मखमालीच्या लवेत.
काकाजी कडाडून विचारीत होते,
कोसळताना धुळीच्या लोळात, अश्रुधुराच्या कल्लोळात,
'कोण येत आहे चालत खुर्चीच्या लाकडी पायांनी?– कोण?'
'मी– बाळा... ' 'चूप. नाही. नसते नातं किरणांचं मातीतल्या फुलांशी.
परंतु– कोण किरण? –कोण माती?– कुठली पानं? – कुठल्या मुळ्या?'
'काकाजी, खरंच, मुळ्याच कुजवतात लवलव हिरव्या पानांची–'
'हरामखोर: पानंच सडवतात मुळ्यांना– पालवीला अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या मुळ्यांना.
खोटं बोलतोस बापाशी तू– सापाचा वंशज तू– सापच[२] आहेस तू:
विनतेची वंचना करणारा, पाताळअश्वाच्या शेपटीला चिकटणारा साप!
बाळा, बाळा, चल नीघ इथून–'
तरीही खुर्चीचे पाय पुढेच सरकत होते वाघाच्या पंज्यांनी.
दिसत होते काकाजीच्या विझत्या डोळ्यांना
फांद्यांत कापत होते आभाळाचे मौन, नियतीच्या शाईसारखे,
सारवलेले.

कवीचे झाड: १

आळीमिळी घेऊन बसलेले
निळे निळे तळे, रत्नजडित,
मध्यभागी, गावाच्या बेंबीसारखे.[१]
पाण्याला टपोर खळी हास्याची,
लाजलालस सांजेची,
या साऱ्यांना पाठमोरे
लोक येणारे–जाणारे, आपल्यातच बुडालेले,
काठावर आंब्याचे झाड, हरवलेले
आपल्याच सावल्यांत,
त्याला आठवतो एक कवी
तिथे लिहीत बसलेला
ही सृष्टी आपणच निर्मिली अशा मस्तीत.
म्हणतो,
'तों मज गमलें विभूति माझी[२]
स्फुरत पसरली विश्वामाजी'
जळलेल्या मोहराला शब्द फुटतात:
'अरे कवन दिले मी तुला
ज्वलन ठेवून आपल्यापाशी.
ही सृष्टी सारी माझीच कविता
असंग्रहित, असंपादित.'

हिरवे हिरवे डोल
जळात खोल:
कवीच्या मनात राहिलेली ओळ.

कवीचे झाड: २

मौन उभे तळ्याकाठी आजही
शंभर वर्षाचे ते झाड, पाहत
आपल्या पिवळ्या पाचोळ्याकडे.
डोंगराआड सूर्य
शब्दांमागील अर्थाप्रमाणे: मावळणारा, उगवणारा.
झाडाखाली एक मुलगा खेळतोय
खेळ भाकरीचा पाण्यावर, गात गात:
'गाठ मारूनी वैराला गोफण केली छान[३]
कठिण शब्द या धोंड्यांनी करितों हाणाहाण.'
दिसत होता उद्याचा कवी त्या मुलग्यात
आपल्या आतड्यांची गोफण करणारा
हृदय फाडून ....
दचकलो एकदम, खड्डा पडला माझ्या पोटात.
आतड्याच नव्हत्या तिथे गोफणीला
वैराची गाठ मारायला!
बांधावर माणसे मख्ख बसलेली,
काळानं शिटलेली, पसरत्या अंधारात
गोठलेले झाड:
आळीमिळी घेऊन बसलेले
मध्यभागी, गावाच्या बेंबीसारखे.

खुल्दाबाद रोजा: १

करपल्या काळ्या पाषाणाची भिंत चिरेबंद:
कुढणे काळाचे, शतकांचे गोठलेले,
पायऱ्याही चोपड्या काळजाच्या,
त्याही काळ्याच, दुव्यासारख्या, त्यावर
उभे दार कमानदार:
इतिहासाची जांभई कोरलेली दगडात,
आत कबर हिरव्या चादरीने झाकलेली,
चारी कोपऱ्याला चार 'मुतक्किये'[१] संगमर्मरी,
वर हिरवा चांदवा मखमली, भर्जरी,
दोन्ही बाजूला मोर्चेल, मागे उभा सज्जादा:
त्याचेही डोळे मोरपिसाचे, भूतकाळात रंगलेले,

रंगांधळे, मध्ये टपोर अंडी शहामृगाची:
शुभ्र, आरस्पानी, अपारदर्शी, दैवासारखी,
शहेन्शाह औरंगजेब आलमगीर झोपलेला इथे
पांघरून आपल्या महत्त्वाकांक्षेची माती,
मक्केतल्याइतकीच पवित्र.
खुल्दाबाद रोजा:
किंचित् ठेंगणा दरवाजा
कंगाल खोपटांनी वेढलेला, चितकबऱ्या ढगात हरवलेला,
उदासीन, वाकलेला 'सिज़द्यां'[२] साठी
आपल्या पराभवात.

खुल्दाबाद रोजा:२

खुल्दाबाज रोज़ा–
खिन्न उघडा दरवाजा:
ऐतिहासिक म्यान एक रिती, पोकळ,
आपला खंजीर शोधणारी.
खाली पायऱ्यांवर फकिरांच्या पोरांची गर्दी:
मळके कुडते, फाटक्या सलवारी, विटक्या ओढण्या
(सर्वांवर पसरलेला उदास हिरवा रंग कर्बल्याचा[१])
कलकलत होत्या: धुळीत भांडणाऱ्या चिमण्या:
'देना एक पैसा अल्लाके नामपर.'
त्यात उभी ती पोरगी, फाटक्यातून डोकावणारं तिचं गोरेपण
पिवळं, कळंजलेल्या सोन्याच्या पत्र्याचं.
डोळे गाईचे गोल, थीर, काळेशार, भोताली पांढरं वलय, खिन्न
चकचकीत कवड्याचं, धारदार, चांदण्याला चरे पाडणारं.
'हीच ती पोरगी' कुजबुजला तो, शंभुराव जहागिरदाराची पोर.
आपल्या मुलीचं कुवारपण सांभाळण्यासाठी आणून सोडली इथं,
वाढतेय फकिराघरी साबण्या खात भिकेच्या पैशानं.
गणगणतात माश्या तिच्या हातातल्या चिकट तुकड्यांवर,
शेजारी उभे शंभुराव– लपवीत होते, ती शोधीत होती,
ओळख, नाते: एक विपरीत जननांतरसोहृद!
खुल्दाबाद रोजा:
ठेंगणा खिन्न दरवाजा,
ज्यावर पसरले होते एक पोरकेपण
अपहृत देवलदेवीच्या[२] विशाल नयनांपासून
ते या अश्राप डोळ्यांपर्यंत वाहत येणारे पोरकेपण, मृगनयनी अपार,
शहामृगाच्या अंड्याइतकेच शुभ्र, खिन्न.
आरस्पानी, अपारदर्शी, सोसून शंभर पाठलाग,
पिऊन हजार वादळे वाळूची.

परिशिष्ट

लेखनाचे स्थल-काल आणि टिपा

१. रान-१: मुंबई, ३०-८-६६
रान-२: मुंबई, ३०-८-६६

२. पाणी-१: मुंबई ८-१०-६६
पाणी-२: मुंबई ८-१०-६६

३. वारा-१: मुंबई अलिबाग समुद्रप्रवास, २१-१-६७
वारा-२: मुंबई, २४-१-६७

४. ऊन-१: मुंबई, १९-८-६७
१. महो हुवा है गुहरमें इजतेराब दर्याका- गालिब
ऊन-२: मुंबई,१९-८-६७

५. तळे-१: विलेपार्ले, मुंबई,५-१०-६९
तळे-२: विलेपार्ले, मुंबई, ५-१०-६९

६. चांदणे-१: मुंबई,२५-१०-६९
चांदणे-२: मुंबई,२५-१०-६९

७. कमळ-१: मुंबई, २२-९-७०
कमळ-२: मुंबई,२२-९-७०

८. अंधार -१: मुंबई,१७-२-७१
अंधार-२: मुंबई,१७-२-७१

१. तम आसीत् तमसा गूळहमग्रे-
ऽप्रकेतं सलिलं सर्वमा इदम् ।
तुच्छयेनाभ्वपिहितं यदासीत्
तपसस्तन्महिनाजायतैकम् ।।
तिरश्चीनो विततो रश्मिरेषा-
मधः स्विदासीदुपरि स्विदासीत् ।
रेतोधा आसन् महिमान आसन्त्-
स्वधा अवस्तात् प्रयतिः परस्तात् ।।

-नासदीयसूक्त

९. तारा-१: मुंबई, २९-११-७१
तारा-२: मुंबई, २९-११-७१

१०. समुद्र–१: मुंबई ११–२–७२
समुद्र–२: मुंबई, ११–२–७२

११. औरंगाबाद–१: मुंबई, १५–२–७२
औरंगाबाद–२: मुंबई, १५–२–७२

१. सुलतान मुबारक खिलजीने देवगिरीवर स्वारी करून यादव राजा हरपालदेव याचा पराभव केला आणि त्याची कातडी सोलून दुर्गाच्या महाद्वारावर लटकविली. तेव्हापासून देवगिरी आणि त्याचा परिसर मराठवाडा सात शतके पारतंत्र्यातच राहिला.
२. सूर्याने उगवायचे नाकारले तेव्हा वसिष्ठ मुनींनी आपली छाटी काठीला अडकवून दिली आणि ती सूर्याचे काम करू लागली. ही छाटी म्हणजे सहिष्णू त्यागाचे, तेजाचे प्रतीक.
३. ता. १३ सप्टेंबर १९४८ च्या सकाळी औरंगाबाद शहर भारतीय सेनेने निजामाच्या जोखडातून मुक्त केले. त्या दिवशी, सातशे वर्षानंतर मराठवाडा खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला.

१२. दुपार–१: मुंबई, २७–१२–७३
दुपार–२: मुंबई, २७–१२–७३

१३. शब्द–१: मुंबई, २७–१–७४
शब्द–२: मुंबई, २७–१–७४

१४. अस्तित्व–१: मुंबई, २७–२–७४
अस्तित्व–२: मुंबई, २७–२–७४

१५. आरामखुर्ची–१: मुंबई, १६–१०–७५
आरामखुर्ची–२: मुंबई–औरंगाबाद प्रवास, २०–१०–७५
१. व्हॅन गॉफच्या एकाकी जीवनातील एक प्रसंग.
२. व्हॅन गॉफचे सूर्यफुलांचे प्रसिद्ध चित्र.

१६. रस्ते–१: मुंबई, २९–१०–७५
रस्ते–२: मुंबई, २९–१०–७५
१७. दाणे–१: मुंबई, २७–१०–७६
दाणे–२: मुंबई, २७–१०–७६

१८. वार्ता–१: मुंबई,३०–१०–७६
वार्ता–२: मुंबई,३०–१०–७६

१९. वादु तो मी–गोविंदु–१: मुंबई १९–११–७६
वादु तो मी– गोविंदु–२: मुंबई २०–११–७६

१. अगा बोलतियांच्या ठायीं। वादु तो मी पाही
जो सकलशास्त्रसंमतें कांही। सरेचिना
जो निर्वचूं जातां वाढे । आइकिलिया उत्प्रेक्षे सळु चढे
ज्यावरी बोलतियांचे गोडें। बोलणें होती
ऐसा प्रतिपादनामाजीं वादु। तो मी म्हणे गोविंदु
अक्षरांआंतु विशदु। अकारू तो मी

– ज्ञानेश्वरी, अध्याय १०

२०. मच्छीकमान–१: हैदराबाद,२२–११–७६

१. पूर्वी निजामाची स्वारी निघाली म्हणजे माणसांची ये–जा एका बाजूने चालू ठेवून रहदारीचे नियंत्रण करण्यात येत असे.

२. हैदराबादची शाही मशीद. तिथला निजाम दर गुरूवारी–शुक्रवारी या मशिदीत नमाज़ासाठी जात असे. त्याच्या पूर्वजांच्या कबरीही या मशिदीत आहेत. त्यांचे दर्शनही घेण्याचा त्याचा रिवाज होता.

३. नमाज़ापूर्वी हातपाय धुण्याचा धार्मिक विधी.

मच्छीकमान–२: हैदराबाद– मुंबई प्रवास, २३–११–७६

१. यक्ष–पिशाचे (मुस्लिम समजुतीप्रमाणे) हे जिन रात्री शाही हलवायांकडून मिठाई खरेदी करतात अशी एक दंतकथा हैदराबाद शहरात प्रचलित होती.

२. आयला (तेलगू शिवी).

३. सत्याग्रही

४. त्या काळचे एक प्रसिद्ध हॉटेल.

५. कपात इतकी साखर टाकायची की त्यात चमचा रोवला तर तो खडा (उभा) राहिला पाहिजे.

२१. अमलताश–१: मुंबई,८–१२–७६

१. उपनिषद.

अमलताश–२: मुंबई, ८–१२–७६

२२. हे दुःखप्रिया–१: मुंबई,२१–१०–७७
हे दुःखप्रिया–२: मुंबई,२१–१०–७७

२३. म्हणजे–म्हणजे–१: मुंबई, ७–२–७८
म्हणजे–म्हणजे–२ मुंबई, ७–२–७८

२४. स्तन–१: मुंबई, ३०–४–७८

१. सोल्झेनित्सीन याच्या 'कॅन्सर वॉर्ड' या कादंबरीतील एका प्रसंगातील कल्पनेवर आधारित.
स्तन–२: मुंबई,३०–४–७८

२५. पुत्र–१: मुंबई,१–५–७८
पुत्र–२: मुंबई,१–५–७८

१. पुत् नामक नरकापासून रक्षण करणारा तो पुत्र.

२. पाताळात बांधलेल्या घोड्याची शेपटी पांढरी की काळी यावर विनता आणि तिची सवत कद्रू यांच्यात वाद झाला. पैज लागली. जो हरेल त्याने दास्य पत्करावे अशी पैज ठरली. कद्रूने आपल्या पुत्रांना– सर्पांना– सूक्ष्म रूप धरून घोड्याच्या शेपटीला चिकटण्याचा गुप्त आदेश दिला. घोड्याची शेपटी काळी भासली आणि विनतेला कद्रूचे दास्य पतकरावे लागले. पुढे गरूडाने स्वर्गातून अमृतकुंभ आणून आपल्या आईची–विनतेची– त्या गुलामगिरीतून मुक्तता केली. सर्पांच्या त्या कपटाचा सूड घेतला.

२६. कवीचे झाड–१: मुंबई, १२–६–७८

१. हे तळे सावंतवाडीचे. त्याच्या काठचे ते आंब्याचे झाड अजून उभे आहे. त्या झाडाखाली कविवर्य केशवसुत कविता लिहीत बसत होते अशी आख्यायिका गावातले लोक सांगतात.

२. सतार–केशवसुत

कवीचे झाड– २: मुंबई,१२–५–७६

३. गोफण– केशवसुत.

२७. खुल्दाबाद रोज़ा–१: मुंबई,२५–१२–७८

१. चादर उडू नये म्हणून ठेवलेली संगमरवरी वजने.

२. नमाज़ पढताना गुडघे टेकून घातलेले लोटांगण.

खुल्दाबाद रोज़ा–२: मुंबई, २७–१२–७८

१. अरबस्तानातील रणांगण, जेथील युद्धात हसन इमाम व त्यांचे कुटुंबीय यांनी बलिदान केले.

२. खुल्दाबादजवळच्या वेरूळच्या लेण्यातूनच अल्लाउद्दीन खिलजीच्या सैनिकांनी देवलदेवीचे अपहरण केले.

१९८८ अमृत महोत्सवी प्रसंगी तत्कालिन अर्थमंत्री मा. श्री. सुशीलकुमार शिंदे सोबत

१९८८ कविवर्य कांत अमृत महोत्सव निमित्तानं श्री. सुशीलकुमार शिंदे अगदी
डावीकडे संगीत दिग्दर्शक श्री. यशवंत देव

मावळते शब्द

मावळते शब्दः

१९८८ साली कविवर्य कांतांच्या वयाचा अमृतमहोत्सव. त्याच साली त्यांचा "मावळते शब्द" हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. पण त्यातच कांतांवर अर्धांगवायुचा आघात झाला. १९९१ साली त्यांना दूसऱ्यांदा अर्धांगवायुचा आघात झाला अन् ८ सप्टेंबर १९९१ साली त्यांचे दू:खद निधन झाले. "मावळते शब्द" हा कांतांचा शेवटला काव्यसंग्रह ठरला. संग्रहातील काही कविता वाचल्यानंतर या संग्रहाचे नामकरण "मावळते शब्द" असे कां ठरले या संभ्रमाचा उकल होतो. कांतांच्या अंतर्मनाला आपला अंतकाळ जवळ आला आहे याची रूखरूख लागून गेली किंवा मृत्युच्या चिंतनात ते आपली कालक्रमणा करीत होते याची प्रचिती "मावळते शब्द" मधील बहूतांश रचना करून देतात. "मी पंगू झालो म्हणून माझ्या शब्दांनो तुम्ही अपंग बनू नका" ही कविता कांतांनी इस्पितळात असतांना माझ्याकडून लिहून घेतली होती. कवितेतील कित्येक सुधारणा करतांना मी कंटाळून गेलो होतो पण तशाही परिस्थितीत कांत कंटाळले नव्हते. "अरे! मी पंगू झालो म्हणून का माझे शब्दही पंगू होणार आहेत"?- असं ते हसून म्हणत. संग्रहातील कवितांमधून प्रकट होणारे काव्यतत्त्व व कांतांची मानसिकता ही मृत्युशी मैत्री करणारी होती असे जाणवते. या सर्वच कवितांमधली कांतांची काव्यशैली स्तिमित करणारी आहे, ही कविता एकदा वाचली की कळाली अशी नाही. पुन्हा पुन्हा हळूहळू मनात वाचल्यानंतरच कांतांच्या कवितेतील अलौकिक ब्रम्हांडाचे दर्शन होते. या संग्रहातील कवितांमध्ये कांतांच्या साठ दशकांच्या अथक काव्यप्रवासाचं जीवनचिंतन आहे. अन् हे चिंतन म्हणजेच कांतांना मिळालेली आयुष्यातली अलौकिक दीक्षा होती, काव्यनिष्ठेची पूर्ती होती. आपल्याच कवितेशी संवाद करतांना कांत म्हणतात-

"पन्नास वर्षांची आपूली सोबत
चाललो ही वाट तेढीमेढी
एकांती गर्दीत, फुलांत काट्यात
तुझी माझी साथ सदोदीत
गोळा झाली नाती सर्व तूझ्या ठायी
कांता, कन्यकाही मला तूच
मऊ बोटे तुझी भाळी थरारती-
गाणी झंकारती रोमरंध्री
अमृत वर्षी तू कुंडलिनी जागी
असा भोगी योगी तुजमुळे"

आपल्या साठ वर्षांच्या शब्दपूजनाशी कांत अत्यंत प्रामाणिक राहिले. जीवनात शब्दांचीच साथ संगत त्यांनी वफादार व पवित्र मानली. पण जीवनात ज्या अज्ञात अंतीमाचा त्यांचा शोध चालला होता त्यालाही कांत पूर्णपणे शब्दात पकडू शकले नाही याची खंत प्रांजळपणे व्यक्त करतांना म्हणतात

जे शोधीत होतो जीवनात दिन-रात,
नाही ते सापडले कधीही शब्दात
शब्दातूनी शब्दच फिरूनी हाती आला
दोन्हीतूनी अंती अर्थ घळूनिया गेला
कविताही काय अंती एक निसटणे
लाटांची लिला गळ टाकोनी बघणे

साठ संवंत्सरांच्या अलौकिक प्रतिभासर्जनानंतरही गळातून कवितेचे निसटणे कबूल करीत असतांना मात्र कांतांची कविता मृत्युकडे गाढ मैत्रीचा हात पुढे करीत होती. मृत्युविषयीची भीती अंतीम व अटळ असली तरी या संग्रहात अशा बऱ्याच कविता आढळतात ज्यात मृत्युविषयक गुढगंभीर पण तितक्याच सहजपणे कांतांनी आत्मचिंतन केलेलं आहे. "मरणाचे नाव जीवन ठेवले, न जळता वाटले सूर्य झालो" असा नम्र अभिमान व्यक्त करतांना ते मृत्युचे ऋण मानतात व म्हणतात– "शतजन्म मृत्यो ऋणात राहीन, असा एक क्षण देई पुन्हा"– आपल्या आयुष्याच्या मावळत्या वर्षांत कांत मृत्युच्या चिंतनातच जीवनगाणी रचीत होते. या त्यांच्या चिंतनाची साक्ष म्हणूनच की काय या संग्रहाचे नामकरण "मावळते शब्द" झाले. कांतांच्या मृत्युनंतरच्या एका शोकसभेत एका सर्वज्ञ लेखिकेनं म्हणलं होतं कि सर्व लौकिकातील क्षूद्र वस्तूंपासून दूर गेलेला व अलौकिकतेची पूजा बांधणारा मराठीतील एक उत्तम कवितासंग्रह म्हणजे "मावळते शब्द". या संग्रहालाही महाराष्ट्र शासनाने उत्कृष्ट काव्य निर्मितीसाठीचा पुरस्कार जाहिर केला. पण कांत हयात नव्हते. हा पूरस्कार माझा मुलगा व कांतांचा लाडका नातू चि. अभिषेक याने स्विकारला. आपल्या कवितेची ध्वजा येणारी पिढीही पुढे फडकावेल अशी कांतांची मनेच्छा होती. हे पिढ्यापिढ्यांचे नाते अगतिकतेन मांडतांना ते म्हणतात–

आपल्या या घराण्यात / असा गाण्याचा पाण्याचा
पुढे अभि तू सांभाळ / दूवा माझ्या कडव्यांचा

पिढ्यांचं नातं जपतांनाच कांतांना स्वत:च्या कवितेचा आत्मविश्वास होता आणि म्हणूनच ते म्हणून गेले–"शंभर वर्षानंतर कोण माझी कविता वाचीत आहे"

मावळते शब्द

हिर्व्या अबोली रंगाचे
दिवस ते उजेडती,
सूर्य पक्व फळांपरी
झाडांमागे मावळती.

पानेंफुलें चुंबूं वाके
निळें आकाश अधीर,
मासोळीची थरथर
जळीं घायाळ नजर.

झाडें येतात पानांत,
कळ्या येतात पणांत:
अनादी त्या लावण्याचा
उडे पदर वाऱ्यांत.

त्याच रूपाच्या वेधांत
गाणीं गातों सुंदराचीं,
जड अक्षरें चालती
जशी भिंत ज्ञानोबाची

असें बोलतां हासतां
गेले निघून दिवस,
आता उरलीसे मागे
पिक्या फळांची मिठ्ठास.

कांही गुंजतें फुंजतें
पानाफुलांच्या आडोनी
उगवायासाठी पुन्हा
मावळत्या शब्दांतुनी.

लाटांच्या चुरांत, फेनाच्या तुऱ्यांत

पानसावल्यांची रात पावसाळी
श्यामल कवळी वाकली जळाशीं,
गोरट्या भिजल्या गोल वक्र रेषा
विझती पेटती चिकट प्रकाशीं.

नरम थेंबांची उडे कलाबतू:
यक्षाची वेदना, स्वराचा शहारा,
दाटक्या छत्रींत वेढिती विव्हळ
गव्हाळ अंगाचे नाग परस्परां.

पाउलें चाफ्यांचीं, बोल अबोलीचे
शोधीत कालचे गेली लाट दूर,
सुके कुल्फी हासू उडतें माशांचें,
नि:शब्द एकाकी पुळणीचें ऊर.

ओल्या आरशांत वाळूच्या, राजसे,
आताच बिंबून गेलीस वाटतें,
लाटांच्या चुरांत, फेनाच्या तुऱ्यांत
खोविलेलें पीस नजर धुंडिते.

नखचित्रें: १

सरत्या रातीं चंद्रबिंब
पश्चिमेस ओठंगलें:
पद्मराग जांभईला
फूल लाजरें फुललें.

आपल्या स्वप्नांना वाटा आहेत मातीच्या

आपल्या स्वप्नांना वाटा आहेत
तांबड्या मातीच्या, आभाळी छायांच्या,
(खरे ना रे राजा?)
आणखी भोवती सुरेल झुळुकांनी डहुळलेले
किर्र हिरवे जंगल, भ्रांत
झुरीबावरी मोडलेली झोप मध्यरात्रीची:
त्यातून धावणाऱ्या
मातीत रंगणाऱ्या
अर्ध्याच जागणाऱ्या
विचारांसारख्या वळणाच्या वाटा,
जशा आपल्या भाळीच्या रेषा
अतर्क्य गूढ!
(भाळीचे कुरळ नको सारूस पण...)
पाहतोस काय अशी टक लावून?
तो तर– पुढे –
हिरवा बिलोर आरसा तळ्याचा:

पूर्वजन्मीचा: उडाल्या पाऱ्याचा,
तरी कसे त्यात बिंबून जातात,
आकाशरंगांशी मिसळून जातात
झाडांच्या निश्चल प्रतिबिंबांतून

अनेक जन्म तुझे नि माझे?
गोरटी पावले मातीत मळलेली,
उद्याच्या क्षणांत बोटे गुंफलेली,
स्वरवेल वेणूची देही फुललेली!
मावळवीत ये व्यथेचा दिवस सोन्याची सांज
–(कुठल्या जन्माची?)–
घेऊन रंगांच्या ओंजळीमध्ये
जन्मोजन्मीचे ठसे चुंबनांचे,
घामओले धुंद चांदणे त्वचेचे,
आलिंगन–गंध जुईच्या मिठीचे,
गाणे ओठांतील खुडिल्या शब्दांचे.
जळी फुलतात.
(कळले का तुला?)
पुन्हा मिटतात सारे स्थलकाल
झाकलेल्या माझ्या एका पापणीत
वक्षाशी तुझ्या: चाफ्याच्या मुशीत,
उरते पैल हिरवेगार रान
–झाडांस ना भान–
फक्त पानोपानी गोंदलेले ऊन!

हे गीत नव्हे

हे गीत नव्हे,
नाही रे, हे गीत नव्हे.
आपल्यातले अंतर शहारताना,
रेताड रितेपण डोळा दवताना,
मौनाला मोहर असाच उगा येतो,
तो शब्द नव्हे, नाद नव्हे, अर्थ नव्हे,
नाही रे, हे गीत नव्हे.

नक्षत्रांची गाठ दिवस रात्रीला देतो,
अंधार–उजेडांचा तरी गुंताच होतो,
उकलताना प्राणांचा तुटतो धागा धागा
हे तुटणे त्या असण्याची धून नव्हे,
हे गीत नव्हे,
नव्हे रे, हे गीत नव्हे.

माझ्या गात्रागात्रात तू गातो आहेस

माझ्या गात्रागात्रात तू गातो आहेस:
मी ऐकते आहे
शब्दांनी भरून,
चांदण्यांनी भिजून,
रोमारोमातून
आभाळासारखी निथळते आहे,
चाफ्याच्या रानात हरवते आहे.
मी ऐकते आहे,
माझ्या गात्रागात्रातून तू गातो आहेस,
मी ऐकते आहे.

पण ऐकताना राया,
शब्द शब्द फुटतो,
अर्थ पिंजून पडतो,
तरी सुकती आत ओढते आहे,
रक्तात ताल धरते आहे.
मी ऐकते आहे,
माझ्या गात्रागात्रात तू गातो आहेस,
मी ऐकते आहे.

झाडांत, गालांत
लाख फुले फुलतात,
सुवास वेगळे अदृश्य राहतात,
दोघांनाही काही जोडते आहे:
तसेच, तेच तुझे माझे नाते आहे.
मी ऐकते आहे,
माझ्या गात्रागात्रात तू गातो आहेस,
मी ऐकते आहे.

पाहिलेस हे सूर

पाहिलेस हे सूर ?
म्हणजे, तसे नव्हे ग,
सूर सारेच ऐकतात,
पाहणारे थोडे असतात,
फार विरळा, उदाहरणार्थ:
तू नि मी, दोघेच फक्त.
जाऊ दे–

पहा ते सूर आसावरी–तोडीचे,
पहा कसे उतरत आहेत,
धुवांधार बरसत आहेत,
शेवाळल्या फांद्यांतून, हिर्व्या झाडाझाडातून
धुके लेऊन, दहिवर पिऊन,
पिवळी कवळी उन्हे बनून.
तिथेच त्या सुरांत: डोळ्यांतल्या उन्हात,
त्वचेच्या रानात
अर्धांगी भिजत, अर्धांगी पेटत,
हाती हात गुंफून,
डोळा आभाळ घेऊन
–आठवते का?–
जन्म जन्म उभे होतो दोघे आपण
सुखाच्या फांदीखाली, फांद्यांसारखे,
फांद्याच होऊन एकमेकांना फुटलेल्या.
होय, फांद्याच: मौन, निश्चल,
ज्यांच्या मनांत
पानझडीच्या चाहुलीचा धाक नाही,
पावसाच्या हाळीची भाक नाही,
फक्त सूर आहेत:
तलम निळ्या धुक्याचे,
लागीर करणाऱ्या उन्हाचे,
उसात लागणाऱ्या पानाचे,
आसावरी–तोडीचे!
पाहिलेस ते सूर?

अंधाराला प्रकाशाचा बुडबुडा फुटला नव्हता

तेव्हा अंधाराला प्रकाशाचा बुडबुडा फुटला नव्हता,
अवकाशाला काळाने छेद दिला नव्हता,
नीरवाला शब्दाचा तडा गेला नव्हता,
होते केवळ काळोखपणी अतळ, निश्चळ,
नव्हता वारा, आकाश नव्हते,
कण नव्हते, क्षण नव्हते, जन्म नव्हता म्हणून मरणही नव्हते,
होते सारे स्तब्ध, एकाकी,
काळे गहन भयाण ओझे
छाती दडपून टाकणारे.
तो अनादी एकाकीपणा
आदिपुरूषाच्या मनात दाटला होता.

श्वास घुसमटला, प्राण तळमळला
सृष्टीपूर्वीच्या रित्या एकान्ताच्या त्या अजस्त्र भाराने.
त्याने व्याकळून, विव्हळून साद घातली:
'एकोऽहम् एकोऽहम् ।'
अन् अकस्मात्
त्या एकाकीपणातून हे अनंत अपार विश्व जन्मले.
तोच अनादी एकाकीपणा कवे, तुला झळंबला आहे का?

नऊ महिन्यांच्या रात्रीचे

नऊ महिन्यांच्या रात्रीचे
गर्भवासातील भ्रूणाचे
अंधारवाणे एकाकीपण
घडीघडीने कुडीत प्राण भरते,
अरूपाला रूप देते,
कणाला क्षणात बदलते,
– पण हे एकाकीपण
मला नुसतेच गुदमरून टाकते,
ओढून नेते अधांतरी
नवसृष्टीच्या नक्षत्रांच्या दाराकडे,
जे प्रसववेदनांनी उघडते
(गर्भाशयाच्या पारदर्शक पडद्यासारखे)
जन्ममृत्यूंच्या पोकळीत.
कुठे? कुणीकडे?
कुणास ठाऊक!
मग कशाला मला छळते आहे,
जाळते आहे
हे भ्रूणाचे रात्रिल एकाकीपण?

चाफेगौर

रानीं चाफा फुलीं आला
अशी तेव्हा हासलीस,
क्षण गळे तो फुलांचा:
नसे चाहूल फांदीस.

आता झिम्मड हिरवी
सरी प्यालेल्या पानांची,
स्मितें जिथे हारवलीं
चाफेगौर आठवांची.

स्वप्नांत मी तुझ्या रे

ती: स्वप्नांत मी तुझ्या रे, येऊन रोज जातें,
तो: असतील पाय थकले, देऊं चुरून का ते ?

तो: स्वप्नांतल्या जगाच्या वाटाच लांब लांब,
संपून स्वप्नवाटा अन् पाहणें रहातें.

ती: तुज निष्ठुरा प्रवास कळतो न वेदनांचा,
मी अश्रुच्या खुणाही मार्गी पुसून जातें,

तो: हातीं न दान येई स्वप्नांत तूं दिलेलें
निथळून चांदण्याचे नभ कोरडें रहातें.

ती: अदृश्य पुष्पगंध नाही फुलानिराळा,
समजून घे सख्या रे या मर्मबंधनातें.

तो: प्रेमांत का मिळावा मज गाव वेदनेचा ?
ती: रात्रीमधी अशा या जखमांस फूल येतें.

भोवळ

झुले चांदण्याचा झोका
चांदण्यांत फिक्या शांत,
देहीं स्पर्शाच्या लाटांत
चंद्रबिंब ये वहात.

छाया निष्पर्ण फांद्यांच्या
तळीं झाडांच्या हालती,
अर्थ दिवस–रात्रींचे
चांदण्यांत मावळती.

अर्थ हारवे काळाचा
मंद हालत्या झोक्यांत,
शब्द जातो वितळून
धडधडत्या उरांत.

अंगलगींत उत्कट
असें नि:संग होतांना
गाठी दु:खांच्या सुटती,
गीत फुटे नि:श्वासांना.

तूं मी दोघें झुलताना
असे बसोनी जवळ,
होतों आपणच झूला
त्याची मस्त अन् भोवळ

पुढल्या जन्मी भेटलीस तर ?

आपलाच प्रकाश वेढून
वेड्या आशेसारखा
ढगाढगातून चंद्र धावत आहे,
ठिबकत आहेत चांदण्यांचे थेंब:
झुलत्या डहाळ्यांतून
की भरल्या डोळ्यांतून,
नाही कळले, पण शब्द मात्र ऐकले:
"जाते मी."
तूच म्हणालीस ना ? किंचित् लाल होऊन
आपल्याच वेणीतल्या मावणाऱ्या सायलीप्रमाणे,
"जाते मी, विसरून जा मला."
मलाही वाटते हे हृदय कापून फेकून द्यावे,
विसरावे सारे– पण–
वेलीला तुझ्याच हास्याच्या लडी उमलतात,
रात्रीला फुटतात तुझेच थकलेले मदालस डोळे,
ऐकू येते रानच्या झऱ्यात
तुझी माझी कुजबूज
मावळत्या शब्दांची,
ओठातल्या ओठात उगवत्या, अर्थाची,
पद्मगात्र रात्रीच्या भुक्त पौर्णिमेची !
ढगांत चांदण्यांचा आता चुना झाला,
चंद्राचा फाटका पतंगच उरला.
माणसाला करताच येत नाही का
फळासाठी सुकणाऱ्या फुलाचे प्रेम ?
जा तू, खुशाल जा,
शब्दांचे अर्थ मोडून जा,
कालच्या रात्री फाडून जा, तुझे माझे जन्म तुडवून जा.

मीही मला नाकारून निघतो,
प्राण प्राण उधळून टाकतो मरणाच्या डोहात.
मरणाच्या डोहात ? मरणानंतर–
पुढच्या जन्मी भेटलीस तर ?
तर मी तुला तात्काळ ओळखीन,
फिरून तुझ्यामागे धावत येईन,
कारण तुझी माझी ओळख आहे तशीच गोडीची
हजार हजार वर्षांची:
अगदी अनादी, सृष्टीपूर्वीची:
उमेच्या त्या अनुपम पहिल्या स्मिताची *
आठ डोळ्यांच्या आश्चर्यब्रह्माची!

* ("उमेति मे तत् तपसा निषिद्धा पश्चात् उमाख्या सुमुखी जगाम")

पुळणीशी दुपारी तो आला होता

पुळणीशी दुपारी तो आला होता,
वाट पाहून पाहून परत गेला होता,
तरी तिचा पाय वाळूत रूतला होता
भुईचाफ्यासारखा,
पाण्यात दूरवर
एकाकी नावेवर
उन्हाचा तुकडा उगी उडत होता
शुभ्र शीड होऊन,
जळत्या ठिपक्यासारखा
कोरलेल्या दुपारच्या!

कातरवेळी

कातरवेळी
खोपा चुकलेली चिमणी उडते,
शून्यात फिरते,
तुझी नजर माझी नजर
चोरून लपून एकमेकापासून
भेदरून बघते
फसलेल्या आत्महत्याऱ्यासारखी
टांगून घेण्यासाठी ढगांच्या चिंध्यांनी
स्वत:लाच कुठे अफाट आकाशात!
आकाशात ?
आकाशात ठोकलेला खिळाच नाही,
वळून नजरेचे सूत होत नाही.

तुझी नजर माझी नजर
म्हणून खाली कोसळून पडते,
अश्रूंत पसरते,
आपल्याच दुखऱ्या पापणीच्या काठी
तलावात पडलेले चांदणे लेऊन,
खिन्न, नि:शब्द.
धरित्रीचे काठ आभाळाला शिवतात,
नुसतेच राहतात हातांत हात,
डोळे डोळ्यांत,
परंतु तेही आपले नसतात:
कातरवेळी
खोपा चुकलेली चिमणी उडते तेव्हा.

मावळतां दृष्टी

सूर्य–चंद्रांचे ते लक्ष उदयास्त,
स्फुरणें अनंत नक्षत्रांचीं.
लक्ष लक्ष फुलें, लक्ष गंध त्यांचे,
आनंदघनाचे लक्ष रंग.
रमणीचे डोळे गूढ, काळेनिळे
ज्यांत सिंधु खेळे आभाळाशीं.
षड्ज लागताहे वेळूच्या वनांत:
शब्द फुटतात ऋतुचक्रीं.

सौंदर्यधनें हीं अपार पाहिलीं,
नित्य साठविलीं हृदयांत.
खंत नको जिवा, तुजला यांतलें
कांही न दिसलें उद्या जरी.
मावळतां दृष्टी संचितें मनींचीं
ठेव आनंदाची निरंतर.

गिरी, घनें, वनें फुलांचे संभार–
तेजाची अपार उधळण.
भरती–ओहटीचा उगीच हा शीण,
जळें तीरहीन समुद्राचीं.
सांधा धरित्रीचा स्वर्गाशीं न मिळे,
सारें खिळखिळे क्षितिजाशीं.

ईश्वरा, तुझी ही सृष्टी अस्ताव्यस्त,
संदर्भरहित, अर्थहीन.
सौंदर्याचे अर्थ आम्हीं तिला दिले,
जोडिलें आगळें परिमाण.
माझी कलासृष्टी भव्य तुझ्याहुनी,
एकदा येऊनी पहा देवा.
गभस्तीचीं झाडें, चांदण्याची वेल,
आनंदाची ओल मातींत या.

ऊन तिशीपस्तिशीचे

वितळत्या चांदीची धगधगती पाणरेघ
लाटांना फुटणारी,
क्षितिजाला कापणारी,
गाणारे ऊन साळुंकी पंखांचे,
दुपारकेवड्या रंगाचे
अभ्रांत उडते,
पाण्यात पडते आणिक चंद्र होते:
तोच चंद्र कुणी उरात जपत बसते
तळपत्या खाडीच्या एकान्त काठावर
काळा गॉगल लावून,
घामाघाम होऊन,
अन् मासळ्या बनून
झळकतात आठवणी पाण्यात पायाशी,
कुरळांत कानाशी
एक रूपेरी केस वेदनेने पिकून
हालतो झिळमिळून
जेव्हा लकेरत येते ढगांतून गाणारे ऊन
साळुंकी पंखांचे,
दुपारकेवड्या रंगाचे,
तिशीपस्तिशीचे,
मध्यान्हीचे
त्वचेच्या!

जवळीक तेव्हा शहारते

जेव्हा पहाटवाऱ्याला फुलांची जाग येते,
खिडकी धुंद उषेची गुलाबी जांभई देते,
तुझी माझी जवळीक तेव्हा शहारते:

अंगागांत शेवंती गोरा बार देते.
तेव्हा तू हसून उघडतेस डोळे
(ज्यांत अजून मावळली नसतात मध्यरात्रीची नक्षत्रे),
पुन्हा डोळे मिटतेस उगीच चादर ओढून.
केवढे एकाकीपण मला वेढून जाते एका उघडझापेत!
तेव्हा मला वाटते, असेच उघडावेत तुझ्याबरोबर डोळे
आणि मिटावेत एकाच क्षणी एकाच उशीवर.
झाकताना रात्री तू आपले थकलेले डोळे
फुलत्या फुलांचे आश्वासन देत देत
स्वप्नातली उन्हे उतरत असतात
पापण्यांच्या सावल्यांत,
न येणाऱ्या झोपेच्या डोंग्या काठाकाठाने!

शरदाच्या आभाळाचा

शरदाच्या आभाळाचा
रंग किती निळा, ओला,
ऊड जपून विहंगा,
डाग लागेल पंखाला.

शीळ साळुंकीची आली
लाल कर्दळीमधून,
हळदिव्या स्वरामधे
उभा सूर्यनारायण.

निळा निळा भोर क्षितिजाचा शिंपला

निळा निळा भोर क्षितिजाचा शिंपला,
मोतिया मेघांची भुरभुरती झाक,
गोकर्णीचे फूल:
हरिणाक्षी भूल शुष्क कुंपणावर,
कुडाची झोपडी:
तृप्त आईसारखी
कुशीतल्या मुलाला पाजीत बसलेली
सकाळच्या उन्हात:
स्तनांत तुंबलेले मातीचे वात्सल्य,
रिकामे सूप: ओसाड वावर पुढे
खिन्न भेगाळलेले.

अरे पाहुण्या

"कोण तू? फुलांच्या पायांनी येतोस,
नक्षत्रांच्या डोळ्यांनी बघतोस,
जाताना मात्र मागे ठेवतोस
अरे पाहुण्या,
दग्ध पाऊलखुणा
विझत्या वणव्याच्या!
कोण तू?"
आकाशाने अंधाराला विचारले
तेव्हा
तारे पाण्यात कापत होते,
चंद्रबिंब डोंगरात झिजत होते
चंदनासारखे: मनातल्या
तथागताच्या.

अंधाऱ्या फलाटावर

अंधाऱ्या फलाटावर प्रकाशाच्या चौकटी,
त्यांत तुझी सावली:
मेघाची माउली,
अन् दोन डोळे हिऱ्याच्या गाभ्याचे
धावत्या खिडक्यांच्या बरोबर धावतात,
वळून मागे हसतात
पापणीतली आसवे लपविण्यासाठी,
क्षणांतली आग विझविण्यासाठी.
तरी हालत्या हाताची वेदना चमकते,
निरोपाचा शब्द बोलता आला नाही,
फूल, जात्या नजरेचे, तोडता आले नाही.
हलली गाडी डोंगरात वळली,
आभाळे पाण्याने भरभरून आली
पाहता पाहता चालता चालता
सांजल्या वाटांवर.
ती नजर आता फूल होऊन येते:
पाकळ्यांत स्वप्नांचा दिवा लावून जाते.

माझ्या मातीच्या घराची

माझ्या मातीच्या घराची
भुई सुंदर फुलांची,
दारावर अंधाराच्या
पडे थाप चांदण्याची.

शिळ्या चिंध्या झाल्या

शिळ्या चिंध्या झाल्या
उघड्या अंगाने भोगलेल्या उन्हाच्या,
पुष्पांगी सावल्यांच्या
आणि राणी,
आपण गाइलेली गाणी
जिरली जमिनीतल्या पाण्यासारखी
वखवखत्या लाल–केशरी रंगांतून
मावळतीच्या.
सूर सूर, शब्द शब्द झडले
पिवळ्याधमक पानगळीत दिवस–रात्रीच्या.

काल–संध्येच्या काठावर
तरी हा उभा निष्पर्ण चाफा:
शुष्क डहाळ्यांतून
नक्षत्रे माळून
पाहतो अजून उलत्या सालीतून
गात्रागात्रातले फुलांचे बहर,
चांदण्याची किंचित् दबलेली पाने,
धपापत्या उरीचा गोरा कवडसा
तृप्तीने चंद्र होऊ पाहणारा
लिंबोणीमागचा– विस्कटल्या केसांत,
जेव्हा तू उगीच पुटपुटत होतीस
सावरत्या रेशमी सळसळीसारखी:
"काहीच नव्हते माझ्या मनात–
काहीच नसते माझ्या मनात."

सूर्यार्त काळोखातून

फटफटत्या पहाटेच्या सूर्यार्त काळोखातून,
एकान्त रात्रीच्या चंद्रभोगी शब्दांतून,

अमावास्येच्या अतृप्त रित्या क्षणांतून
(जिथे मावळतात सूर्य-चंद्र आलिंगनातच, भेटता भेटता)
तू आलीस कवितेची ओळ होऊन
हिरव्यागार उरातून फुटणाऱ्या गुलमोहरासारखी
रंग घेऊन,
शब्द हरवून.
तेव्हा
तुझी ती लय पकडता आली नाही
माझ्या रक्तातील बडबडत्या लहरींना.
आता मात्र, या संध्याकाळी,
निर्मनुष्य पुळणीवर-
भिजलेल्या, खचलेल्या, नि:स्तब्ध 'कॉजवे' वर-
हे अंतर्मयी,
तुझी ती ओळ उमटते आहे
अंधारत्या समुद्राची गाज होऊन:
काठ पुसून, सांज मालवून,
अलिप्त, एकाकी, तरीही
आताच बुडाल्या सूर्याला पोटात साठवल्यासारखी.

बगळ्यांची माळ

बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत:
भेट आपुली स्मरशी काय तूं मनांत ?

छेडिति पानांत बीन थेंब पावसाचे,
ओल्या रानांत खुले ऊन अभ्रकाचें,
मनकवडा घन घुमतो दूर डोंगरांत,
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत.

त्या गाठी, त्या गोष्टी नारळिच्या खाली,
पौर्णिमाच तव नयनीं भर दिवसा झाली !
रिमझिमतें अमृत तें कुठुनि अंतरांत ?
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत.

हातांसह सोन्याची सांज गुंफतांना,
बगळ्यांचे शुभ्र कळे मिळुनि मोजतांना,
कमळापरि मिटति दिवस उमलुनी तळ्यांत,
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत.

तूं गेलिस तोडुनि ती माळ, सर्व धागे,
फडफडणें पंखांचे शुभ्र उरे मागे.

सलते ती तडफड का कधि तुझ्या उरांत ?
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरांत.

कळ्यांची लय साधून

जेव्हा रात हुरड्याला येते,
चंद्रबिंब पिकते नारळीच्या मागे,
तेव्हा मी तुझ्या बाहूत मिटत असते
चांदण्यातल्या आकाशगंगेसारखी,
त्या वेळी तू माझ्या मिठीत रूजत असतोस
खोल खोल धरणीत
फुले ढाळणाऱ्या निष्पर्ण चाफ्यासारखा,
आपल्या अस्तित्वाचा अर्थ न्याहळीत
माझ्या देहाच्या अंगणात.
मी मात्र तेव्हा शहारत असते झाडांच्या पानांत.
परस्परांना भेदून छेदून जाणाऱ्या दोन देहांच्या मिठीत
ओळखू पाहतो, पूर्ण करू पाहतो
आपण एकमेकांना,
फुले होणाऱ्या कळ्यांची लय साधून.

अरे आनंदा !

थवा मुक्त चिमण्यांचा
चिवचिवतो अंगणांत:
क्षण भारले घुमती
निरर्थकाच्या नादांनी.

अर्थ काय त्यांना कधी
अरे आनंदा, पुशिला ?
भुर्र थवा तो उडाला:
पंख पंख अर्थ झाला.

हिरवी-पिवळी चांदण्याची गवते

हिरवी-पिवळी ओलसर चांदण्याची गवते
अंगाखाली किंचित् दबलेली,
वर झाडांतून उतरणारे चंद्रकिरण
कोवळे हिरव्यागार तृणपात्याचे,
भोवती तुझे बाहू स्थळकाळापलीकडून आलेले

वाट पुसत माझ्या डोळ्यातील बाहुलीला.
तू बोलत होतास: माझ्या रक्तात
पारिजाताचा सडा पडत होता.
वर सरकत तुझ्या मिठीतून
डोकावले मी तुझ्या धुंद गढूळ डोळ्यांत,
तिथे एक नवी धरणी उमटत होती:
ओली ओली, पूर ओसरून गेल्यानंतरची.
रोमांच फुलले माझ्या अंगाखालच्या जमिनीला
अन् माझ्या अंगाला फुटले तृणांकुर
सूर्य भोगणारे दवाच्या थेंबाथेंबातून,
खोळीसारखी गळून पडली
डोईवरल्या झाडांची सावली, त्यांची पाने:
एकान्तातल्या देहासारखी झाडे नग्न झाली,
झाडांचे आकाश, त्यांवरील चांदणे
पेटत्या कापरासारखे उडाले:
जळून गेले त्यात सारे भूत-भविष्य,
उरला फक्त वर्तमान, गोऱ्या गोऱ्या ह्या
शिणल्या गात्रांसारखा, गवताच्या पात्यासारखा वर्तमान:
त्यात कसली खंत नव्हती, आग्रह नव्हता,
होती फक्त तृप्ती, एक शांती - पानावर गोंदलेल्या थेंबाची!

फुलातली पाकोळी

पानाफुलांवर तू हसतोस
सकाळच्या दवात सूर्याएवढा मोठा होऊन,
मी पिवळी पडत्ये फुलातल्या पाकोळीसारखी:
दळादळावर थरथरत्ये,
उन्हात केशराचे दिवे लावत्ये,
तुला एक मधाचा क्षण मागत्ये,
रोमांचांची आण घालत्ये,
तेव्हा तू हसत म्हणतोस, "अग, पिवळ्या नारी,
तुझ्याच हृदयामधून चोरले आहेत मी
हे सूर्योदय, झोपलेली असताना तू
व्यथेने थकून."
मी आणखी पिवळी पडत्ये,
फुलांत हरवून जात्ये
फुलातल्या पाकोळीसारखी.

परस

काळा अंधार, पाऊस
पडे मुक्याने रात्रीचा,
दूर जवळ बुडालें,
दिवा गोठला उशाचा.

चिंब परस उसासे
जाई–जुईंचा नि:श्वास,
कधी फुटेल असा रे,
माझ्या दु:खाला सुवास ?

दोडकीच्या फुलासारखी

पश्चिमेला दिवस गळून पडतो
डहाळीवरील फुलासारखा, फुलांबरोबर,
पूर्वेला कालचाच चंद्र उगवतो,
त्याच्याही दोन पाकळ्या झडलेल्या असतात,
खोपा शोधणाऱ्या हजार चिमण्यांनी चिवचिवते
कातरवेळेचे अंधाराचे झाड:
"डहाळीला फुलांची गरज उरली नाही,
आभाळालाही चंद्र नकोसा झाला आहे."
असाच पुटपुटला होता विझताना काल एकान्तात
खोलीतला दिवा, पाहून
माझ्या देहाच्या नग्न ज्योतीकडे:
"विश्वाला आपल्या अस्तित्वाची गरज उरत नाही,
तेव्हा तो क्षण उगवतो –झडलेल्या चंद्राचा,
विश्वाच्या नकोसेपणाचा तो क्षण. म्हणजेच मरण! "

माझा देह विझला तुझ्या पेटत्या मिठीत.
उद्या मीही तुला अशीच नकोशी होईन का रे ?
पण तू माझ्याकडे असा का पाहतोस
आटत जाणाऱ्या, चांदणे शोधून घेणाऱ्या
पडक्या विहिरीच्या खोल, उद्ध्वस्त नजरेने ?
बघ, तुझ्या डोळ्यांत थरथरतो आहे
मरणाचा, नकोसेपणाचा तो अटळ क्षण:
सोललेल्या अंधाराचा, नक्षत्रांनी डागलेला!
तो एकाकी क्षण! पण नको रे असा पाहूस!
मला भीती वाटते, तुझ्या बाहूंत असूनही
मी एकटी, रिती राहत्ये, पिवळी पडत्ये

सांजवेळच्या दोडकीच्या फुलांसारखी!
अन् चिवचिवत राहते हजार नष्टनीड चिमण्यांनी
कातरवेळेच्या सावल्यांचे ते झाड
नाकारून आपल्या फांद्या, आपले आकाश!

नाळ

सोन्याचे हातवे मारीत होते पुराचे पाणी
घराच्या पाठभिंतीवर,
ओल्या अभ्रकाचा भाद्रपदातला सूर्य धडपडत होता
बाहेर पडायला पूर्वेच्या घननीळ गर्भपटलातून,
त्या वेळी – असे म्हणतात – मी जन्माला आलो.
तेव्हा आत्या सुनेशी भांडत होती
पाण्याची एक लगड कमी आणली म्हणून,
बाबा देव पाण्यात घालून बसले होते
विमनस्कपणे गालिबची गजल गुणगुणत:
"बाजीचा–ए–अतफाल है दुनिया मेरे आगे",
आणि गंगी गजगे मांडून खेळत होती,
आईच्या डोळ्यांपुढचे जग क्षणभर पुसून गेले होते.
डोळे मिटून रडत होतो मी अंधाऱ्या खोलीत.
प्रकाश मला दिसलाच नाही.
तेव्हा मी स्वत:च होतो प्रकाशाचा अंश.
इतकी वर्षे झाल्यावर आजही – अजून–
प्रकाश मला दिसलेला नाही,
कारण माझ्या प्रकाशाचा नाळ केव्हाच कापला गेला होता.
गंगेच्या पैलतीरावरून झेपावत होता आज अनादी अंधार
ज्यातून प्रकाश जन्मला होता
–आणी मीही.

ही उगीचता

उगम–विलयांचे भान नसलेल्या
नि:संग निळ्या समुद्राच्या लाटा, आशयहीन,
उगाच खळखळत गर्जत येतात,
आदळतात, फुटतात उगाच खडकावर,
उगाच उधळतात शुभ्र तुषार,
शंख, शिंपले, रंगीत गारगोट्या,
उगाच तळपतात आपल्याच मस्तीत
रत्नांचे कोंभ फुटलेल्या खडकात.

हजार धारांनी उगाच बरसतो बेहोष पाऊस,
रुणझुणत वारा उगाच वाहतो हिरव्या पानांतून,
उगाच देठापासून खदखदून हसतात सुरंगी फुले,
उगाच हरवते अंतर्मुख आकाश आपल्या निळाईत
निळ्या अबोल फुलपाखरासारखे.

साऱ्या अवकाशाला व्यापून उरलेली
आनंदावर दाटलेल्या सायीसारखी,
जमिनीला शिवणाऱ्या चांदण्यासारखी,
ही अथांग उगीचता– आशयहीन सुंदरता!
तिचे आंदुळणे, डहुळणे म्हणजेच काल!
काल सनातन, चंचल:
नर्तिकेच्या गोल हलत्या स्तनांच्या वक्र रेषांचा,
निषादाच्या आकाशनिळ्या स्वरांचा:
उंच, तिन्ही सप्तकांतून फिरणारा,
मातीतून लसलसणारा,
सूर्यावर किंचित रेलणारा.

काल जिथे सूर्योदय मागायला आली होतीस

काल जिथे सूर्योदय मागायला आली होतीस
ते हृदय साजणी, आज सांजावले आहे,
पसरल्या आहेत उदास संध्याछाया
उसवलेल्या आकाशावर.

भरून आलेल्या आषाढदिशांत
शुभ्र पंखभरारी सरसरते,
एकाकी हृदय खाली उरते
नांगरलेल्या वांझ जमिनीसारखे.

सांग, मी बासरी कशी वाजवू?
त्याच्या मखमाली स्वरांत डसते ना
लसलसत्या कोंभाचे हिरवेगार गाणे
पानगळीत हरवलेले!

द्यावा

गीत देतें मी तुला रे, सूर तूं गीतास द्यावा,
रात्र होतां या तमाला चांदण्याचा स्पर्श द्यावा.

चालतां वाटांमधोनी हृदय जेव्हा फाटतें हें
तूं सुवासाचा फुला रे, हासरा विश्वास द्यावा.

वेदनेचें करूनि आळें रोप दारीं लावियेलें,
मांडवाला गगन द्यावें, तारकांचा बहर द्यावा.

दूरदेशीं मोजतांना क्षण वियोगाचे कुठे मी
मेघ तूं होवोनि अंतीं आसवाचा थेंब द्यावा.

मी शब्द शोधीत असतो

मी शब्द शोधीत असतो, तू हसत असतेस,
तू हसत असतेस अन् मी शब्द शोधीत असतो.
खळखळत्या झऱ्यात,
झुळझुळत्या वाऱ्यात,
सळसळत्या रानावनात
मी शब्द शोधीत असतो अन् मायाविनी,
तू हसत असतेस
नभाच्या सुरंगी बिलोर मौनात.

मी शब्द शोधीत असतो.
मला अर्थ हवा असतो
या साऱ्या सौंदर्याचा:
तुझ्या चाफेगौर बाहूचा,
अर्थाप्रमाणे भरून येणाऱ्या
या सघन उठत्या-पडत्या कुचभारांचा,
ताऱ्यांच्या, फुलांचा,
एका नजरेत आभाळ गिळणाऱ्या
तुझ्या या अथांग डोळ्यांचा,
मला अर्थ हवा असतो, आणि देहस्विनी,
तू हसत असतेस
वाऱ्यात उमलणाऱ्या पंखांच्या कळ्यांत.
मी शब्द शोधीत असतो,
तू हसत असतेस,
माझ्या बाहूंत मिटत असतेस,

तरीही दूर दूर जात असतेस,
तेव्हा मला भीती वाटते या असतेपणाची.
हे अंतर्मयी,
तूही होशील का
असाच एक शब्द: एक नवे दु:ख.

चहाच्या कपात, पलीकडे समुद्रात

चहाच्या कपात गरम गरम वाफा उठत होत्या,
पलीकडे समुद्रात लाटा उसळत होत्या.
मावळत्या उन्हात
कितीतरी दिवसांनी भेटली होतीस तू– दूर जाण्यासाठी.
समोरासमोर बसलो घडीभर आपण
एका टेबलावर, संगमर्मरी क्षण होऊन:
गरम गरम वाफांचा,
सोनेरी लाटांचा,
अलीकडे त्याच्या रात्रिल रहस्ये अनेक गुंफलेली
मोगऱ्याच्या कळ्यांनी,
विजांच्या ज्वालांनी,
पलीकडे भविष्यात भयाण एकाकीपण
गुरूत्वाकर्षण हरवून बसलेल्या रित्या माणसाचे,
वाहती जखम घेऊन फिरणाऱ्या अश्वत्थाम्याचे.
आठवते तुला ती वादळी रात्र ?
खालची वरची धार एक झाली होती,
गडगडाटात धरणी खिळखिळी बनली होती,
समोर पडकी विहीर भरून आली होती:
निघालो होतो आपण तीत जीव द्यायला
हातात हात घालून,
असह्य होऊन
आपले जिणे, आपल्या वेदना:
दूरात तडफडत होतो, जवळकीत जळत होतो.
आजही तशीच, तीच व्यथा होती,
चांदण्याची ज्वाला तीच पेटत होती.
झाली होतीस तू पण खूप सहनशील –निश्चल तडाग:
उमटलेले ओठी जादूगार हसू नि:शब्द चांदण्याचे,
क्षितिजाशी समुद्रात मूक शुभ्र लाटांचे
अनोळखी, दूरचे.
हा क्षण वाफांसह संपणार होता,
उन्हात कमळासारखा मिटणार होता.
जाणार होतो दोघे दोन दिशांना.

अढळ प्रेमाची शपथ न घेता,
पुनर्भेटीचे बंधन न घालता:
प्राजक्ताचे झाड जरा न हलवता.
नजरेला नजर मात्र ती भिडत नव्हती:

आपल्याच अश्रूंची का भीती त्यांना वाटत होती ?
चहाच्या कपात गरम गरम वाफा उठत होत्या,
पलिकडे समुद्रात लाटा उसळत होत्या
तांबुस फूल-उन्हात.

डोळा

निळेभोर तळे:
वाऱ्याने लवलेला, पाण्याने भरलेला,
झाडांच्या सावल्यांचे काजळ ल्यालेला,
किंचित तारवटलेला,
पुरातन पृथ्वीचा तरणा डोळा.
बिंबेल तितके बघणारा,
सारे आभाळ पापणीत साठवणारा,
तरीही
जागेपणी एक स्वप्न पाहणारा.
एक पाणरेघ ओढीत चाललेला-
शिणल्याभागल्या बदकांच्या युगुलाची पाणरेघ, पांढरीशुभ्र
ऐन दुपारच्या उन्हात.

चिंब शब्द

एकवार आज फिरूनि मेघ भरूनि आले,
ऊनपावसांत प्राण पापणींत न्हाले.
हरवले धुक्यांत ताड,
भान विसरले पहाड,
ऐकुनिया हाक गगन मोरपिसें झालें.

थर-थरकत ये वारा,
रिमझिमती जलधारा:
धारांतुनि तृप्त सूर धरणिचे मिळाले.

रान चिंब, ऊन चिंब,
पक्ष्यांचे पंख चिंब,
चिंबपणीं शब्द नभीं बनुनि खग उडाले.

रंग

झडलेल्या रानांत,
झिजलेल्या डोंगरांत
विस्मृतीच्या काठावर,
रंग रंग उगवतात,
उदयास्त हरवतात.
काळाच्या मनांत.

भूतकाळाच्या फांद्यांवर,
भविष्याच्या डहाळ्यांवर,
ऊनसावल्यांच्या पानांआड
रंग रंग पाडा येतात,
चोची हरवून बसतात
राघू आनंदवनांत.

देणें

सरी श्रावणाच्या येती:
शेला पाण्याचा उडतो,
पंखा उन्हाचा मधून
थोडा थोडा उमलतो.

चिंब भिजून कर्दळ
लाल फुलांनी पेटते,
ओल्या आगींत फुलांच्या
शीळ साळुंकी पेरते.

मग कलत्या उन्हांत
होतें आभाळाचें गाणें,
जेथे संपून उरतें
उभ्या जन्माचें या देणें.

पावसाळी किरण

अंतरींचा अर्थ खोल विखुरला, जखमी झाला
सतारीतून निखळलेल्या स्वरासारखा, तेव्हा
पावसाळी सूर्यकिरण एकाकी मनाला कापून गेला.

उठली कळ वाऱ्याच्या रित्या वादळी उरांत,
निस्तब्ध ढगांच्या राखुंडी सावल्यांत उदास मनें,
हिरवे नि:श्वास सावल्यांचे घुसमटले वाऱ्यांत

ही जखमही कधी उरीं उगी भरून येते–
कुण्या दूरस्थानी विव्हळ नजर मरणविभोर
तेव्हा क्षितिजाशीं पाऱ्यावाणी दूर दूर तरते.

खवला

सूर्यहीन मेघ–मेदुर सकाळ काळीशार श्रावणाची:
क्षितिजावर सांडलेली स्वत:चीच सावली,
पडछाया नि:शब्द निळ्या आभाळाची
असा काळानिळा निष्पंद जलाशय,
हिरव्यागार छाया त्यात स्तब्ध झाडांच्या,
गढूळ पांढऱ्या सावल्या फुलत्या कमळाच्या,
भिरभिरत्या बगळ्यांच्या,
जाळ्यात धरण्यासाठी उभा एक कोळी नागडा अस्थिपंजर:
तोही एक सावली अस्वस्थ भुकेली
त्या संथ, शांत, रेंगाळत्या, निरामय सावल्यांत.
इतक्यात लख्कन उडाला एक चांदीचा तुकडा:
प्राणभयाने उसळलेली मासळी–
चंदेरी खवला स्वप्न–सावल्यांचा!
तेव्हा उगवला सूर्यनारायण:
भक्षक सकाळचा तटस्थ साक्षीदार!

रक्तचंदनी सांज

डोईवर घेऊन काटक्यांच्या मोळ्या
लगबगा बाया बाजारांत गेल्या,
विकतां विकतां स्वत:च मोळ्या झाल्या
रक्तचंदनी सांजेच्या वेळा.

भेटणें आपुलें रे

भेटणें आपुलें रे, फुलांचे हसणें
गंध हरवलेलें,
खिन्न स्तब्ध उभें बकुळीचें झाड
सावली विसरलेलें,

भेटतां डोळ्यांत ओसाड कोसाचे
माळ भाजलेले,
बोलांचे वादळ, यौवन–पाकळ्या,
सारें झडलेलें,
डोंगरी जांभळें स्वप्नांतले ऊन
ऊब नसलेलें,
कर्दळी–फुलांत साळुंकीचे शब्द
पिवळे झालेले.
घेतां हातीं हात ओठीं हसतात
लक्ष अस्तमान,
हजार साळुंक्या मौनांत गातात
निखळतांना गान.

समाधी

हंस झोपेंत पोहतो
चोच खोवून पंखांत:
आनंदच समाधीचा
वाहे निस्पंद तळ्यांत.

घार

तापल्या चांदीची तळपती दुपार:
डोंगरमाथ्यावर वितळती नीळ,
रानात रखरखत्या
लाकूड झालेली निश्चल झाडे
निळसर राखी,
हिरवी झांज ओढ्याच्या काठाला,
आकाशात उंच फिरणारी घार
काळी–कबरी,
धुंद, एकाकी, ऊन प्यालेली,
कोरीत चाललेली
तप्त एकान्त, राजवर्खी मौन निळेनिळे,
ब्रह्मरंध्रापर्यंत.

सूर कां त्या संपल्या शब्दां बहाती ?

कां कळेना आज माझे प्राण गाती,
सूर कां त्या संपल्या शब्दां बहाती ?

बोललों जे शब्द सारे दु:ख झाले,
फूलशीं सोशीक मौनें हासताती.

केशराच्या या सकाळीं कां प्रकाशे,
मावळे तारांसवे जो अर्थ रातीं.

तूं दिलें मज प्रीतिचें हें दु:ख ऐसें,
वेदनाही त्या कळ्यांनी डोलताती.

वेच हलके वेच बकुळीचीं फुलें हीं,
हृदय बघ येईल चुकुनी त्यांत हातीं.

सोबतीला गीत माझें चालतें

एकला मी, सोबतीला गीत माझे चालतें,
साउलीही ज्या क्षणाला साथ माझी सोडते.

येथवर आलीस दैवें खूप हें झालें मला,
आज येती आसवांचे थेंब संगें जाणते.

झोपलें पुळणींत पाणी: त्यांत जागे चंद्रमा,
तृप्तिची ती रात ऐशी आज डोळां दाटते.

अंबरींचा सूर्य तापे, धूळही तापे पथीं,
पळसपुष्पांची डहाळी लाजलाजत बाहते.

पांढरा संन्यस्त चाफा गाळितो पानें उभा,
जीवनीं निष्पर्ण त्याच्या फूलपण आंदोळतें ?

पंथ फुटती पावलांना वाट जेथे खुंटते,
सूर विझते चेतवाया प्रेम माझें पेटतें.

नखचित्रें: २

श्वासें धुकट आरसा:
ढगीं ऊन झाकोळलें,
हिरण्मय बिंब त्यांत
जगत्कारण आंदोळे.

प्रीत तूं मागूं नको

आज राणी, पूर्विची ती प्रीत तूं मागूं नको,
कालचे वेड्या फुलांचे रंग तूं मागूं नको.

सांज–धूसर पानजाळी, चौभुजांच्या चांद्रधारा,
थिरकला हा जन्म सारा, ये नभालाही शहारा,
त्या तनूचा सोनियाचा गंध तूं मागूं नको,
आज राणी, पूर्विची ती प्रीत तूं मागूं नको.

हर्ष माझे, स्पर्श तूझे: पाकळ्यांचे शब्द झाले,
वाजती गात्रीं सतारी, सूर ओठांतून आले,
त्या स्वरांचे, त्या क्षणांचे गीत तूं मागूं नको,
आज राणी पूर्विची ती प्रीत तूं मागूं नको.

उघडती डोळे फुलांचे लोचनें मिटतां पहाटे,
ऊन कवळें केवड्यांचें त्यांत स्वप्नांतील दाटे,
त्या उन्हांतिल मीलनाचें स्वप्न तूं मागूं नको,
आज राणी, पूर्विची ती प्रीत तूं मागूं नको.

रोखुनी पलकांत पाणी घाव सारे साहतांना
अन् सुखाच्या आसवांचें मीठ डोळां साचतांना,
राजहंसी, मोतियाचा घास तूं मागूं नको,
आज राणी, पूर्विची ती प्रीत तूं मागूं नको.

बोल हलके बोल: श्वासें चांदणे डहुळेल ना?
ऊर उलतो, उमलतांना सुखहि सोसेना फुलांना,
नित नवीं मरणें मराया जन्म तूं मागूं नको,
आज राणी, पूर्विची ती प्रीत तूं मागूं नको.

तृषेचेंच गीत मी गात आहें

तृषेचेंच गीत मी गात आहें:
तृषेचा कवी मी, विश्वच भवती तृषाक्रांत आहे.

आज स्वातंत्र्याची रजतजयंती,
गीतांच्या उडवा लक्ष चंद्रज्योती,
परंतु जपा व्यथेची जाण जी पिचलेल्या तारांत आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

भरतीच्या किती लाटा-लाटा आल्या,
सूर्य चंद्र झेलीत धुक्यांत विराल्या,
पहाटे रूपेरी झांजरवेळेला तान्हेलाच अंधारकाठ आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

घागरी घरीं तोंड वासून पडल्या,
उतरंडी रित्या डुलल्या, ढळल्या,
चुलीवर तवा नुसताच जळतो, उपाशी वाटी-ताट आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

युगंधर मेघ आकाशांत उठले,
हृदयाची धार वरसले सरले,
रक्ताची उधळण, सुधेची शिंपण, कोरडाच ओठांचा काठ आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

आजही पाताळीं अश्व बद्ध आहे,
सहस्त्र सर्पांनी तसाच विद्ध आहे,
सुधाकलशाची एका सुपर्णाची अदितीला अजून वाट आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

ओठांत अद्याप सूर चढत नाही,
शब्दांना कुठे लय मिळत नाही,
गाण्याचा आग्रह कशाला करतां ? छंदच पोटीं धीटपाठ आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

स्वातंत्र्याला इथे बंधन फुटतें ?
पाण्याला इथे तहान का लागते ?
सवाल असा पंचविशीतला थरथरत्या या ओठांत आहे.
तृषेचेंच गीत मी गात आहें.

कळ्या-फुलांचे झुरती डोळे

कळ्या-फुलांचे झुरती डोळे तुला पाहण्यासाठी,
नक्षत्रांचे नेत्र जागती तुला शोधण्यासाठी.

दिनरात्रीचे पडदे सारूनि
तुला शोधिलें सुरासुरांतुनि,
किती जन्म ओलांडुनि आलें: पडल्या नाही गाठी.

झुळझुळ रात्रीं झरा वाहतो तुझ्या बासरीपाठी,
'अताच इथुनी गेला', म्हणते रंगमळ्यांची दाटी.
फुलाफुलाला नाव विचारित,
निळ्या जळाला ठाव विचारित,
फिरली हरिणी, बसली थकुनी अपुल्या काजळकाठीं.

सांग माधवा, किती दूर तूं या डोळ्यांपासोनी,
घुसमटणारे श्वास तुला हे आणितील ओढोनी.
कशास अंतीं परि माझ्यावर
पांघुरविशि हा हरि, पीतांबर ?
हसतिल गोपी या कुब्जेला वळवुनि गोऱ्या पाठी.
कळ्या-फुलांचे झुरती डोळे तुला पाहण्यासाठी.

लक्ष्मी-नारायण

लिंबा आला तोर: फेसाचीं फुलें
भरघोस इवलीं हळुवार हलतात,
सांजेच्या उन्हांत चांदीचीं पानें
वेड्या पिंपळाचीं मस्तींत झुलतात.

सुतवलीं झाडें, बुंध्याला पंचा,
त्यावर हिरवा धारवाडी खण,
पुराणी कहाणी अज्ञात गावाला.
वृक्षांचे मेहूण लक्ष्मी-नारायण.

"कार्तिकी पुनव आजची", गुरव
कणकेचा दिवा लावीत म्हणतो,
हा उभा गाव वृक्षांचा जोडा
शंभर वर्षे असाच पाहतो.

पुनवेच्या रात्रीं पिंपळांत डफ,
लिंबाच्या पानांत बांगड्या वाजतात,
शिंपायाला अमृत या वृक्षांवरती
लक्ष्मी-नारायण स्वत:च येतात.

परदेशी इथे जोगी कुणी मेला
पावसाळ्याचा देवळांत येऊन,
मूर्छित पडल्या देशमुखीणबाई
त्या जोग्याला पाहायला जाऊन.

बुडालें स्मशान: झिम्मड पाऊस,
ओढ्याला पूर आलेला तुफान,
आभाळाच्या गळां गावाचा आवंढा,
जाळलें दोघांना इथेच आणून.

पिंपळ रूजला जोग्याच्या चितेंत,
राखेतलीं काकणं लिंबाच्या फांद्यांत:
जोडीने वाढले ते ऊनपावसांत
कंकण–ओट्यावर तारांच्या छायेंत.

कोणी म्हणतात: जोगी, देशमुखीण
एकाच गावचीं लेकरें होतीं,
झाडाला चांदणें लखडताना
दोघेंही बेभान पाहत होती.

लग्नानंतर पुन्हा या दोघांची
जन्मांत भेट कधी झाली नव्हती,
मृत्यूच्या क्षणींही त्यांच्या डोळ्यांना
डोळ्यांची ज्योत भेटली नव्हती.

जमिनीखाली जगापलीकडे
गूढ, कालातील, तलम एकान्तांत
मुळ्या ह्या झाडांच्या वाढत– गुंतत
एकमेकांना मिठींत घेतात.

मरण–घडी ती अकल्पित त्यांची
झाली मंगल घडी मीलनाची:
नव्हती असोशी, स्पर्शाचा जाळ,
फक्त भेट होती पूर्णाशीं पूर्णाची.

विरला गुरव चांदण–वाऱ्यांत,
कणकेचा दिवा थरथरत विझला,
पहिल्या रात्रीच्या स्तब्ध एकांतांत
सळसळे नुसता झाडांचा पाला.

काकपद

आता लिहायचे नाही
नवीन पान, नवा परिच्छेद,
वाढवायचे आहेत एकदोन शब्द
फक्त
सुटलेले किंवा सुचलेले
पूर्वीच्या ओळीत आयुष्याच्या,
तरीच काळाने काढला आहे
तुझ्या डोळ्याच्या कोपऱ्यावर
काकपद!
आरशातला चेहरा सांगत होता
स्वप्नात.
दचकून पाहिले मी बाहेर:
रात्रीच्या चौथ्या चरणात
(नक्षत्रांच्या ओळीत)
तळपत होता
काकपद
तिकांड्याचा!

पावसाला फुलें

सर वरसे जळाची
फांदी उन्हाची अन् झुले,
त्यांत पाखरें उडतां
आली पावसाला फुलें.

पावसाळ्याच्या कविता

।१। आभाळदाणी

भादव्याची लहरी आभाळदाणी:
पावसाळी आभाळा मोत्याचें पाणी.
आळसावलें रान हिर्व्या झोपेंत,
अभ्रकाचा सूर्य ढगांत–मनांत.
पाचूचा उभा पलीकडे डोंगर,
उजेडाचा चुरा जांभळा त्यावर.
दुपारच्या ढगाळ ह्या एकान्ताला
उडत्या पंखाचा शुभ्र तडा गेला.
बगळ्यांच्या पंखांची झुलते झूल:
एकाकीपणाला चाफ्याचे फूल.

।२। उघाड

साळुंकी पंखांची दुपारची सर
भिर्भिरत गेली आभाळभर.
हिर्वे ओलें रान: पोपटाचे पंख,
कर्दळीच्या फुलां थेंब–ओला डंख.
डोंगरांत निळ्या धुक्याच्या पल्याड
नि:स्तब्ध ढगांत पाऱ्याची उघाड.
मोहरीच्या रानीं मेघ मोहरला:
पाठीवर गोऱ्या केशभार काळा.
साळुंकीचा सूर चाफ्याला खुपतो,
सरीवीण आता भिजतो भिजतो.

।३। सांजेची स्वर

सोनेरी भिंगाची सांज मेघ–ओली,
सर झिम्मा घालीत पावसाची आली.
खेळतांना थोडी भिजते रंगांत,
ऊन सोनटक्का काळ्याभोर केसांत.
कपाळींचं भिंग जरी गेलं फुटून्,
सर मोठी हटेल जात नाही उठून्.
पुन्हा झाडामाडांत अंधारून येतें,
पाखरांची धुक्यांत वाट बुजून जाते.
एक–दोन बगळे नि:शब्द उडतात:
चुकलेले जन्म आनंद–शोधांत

।४। रात्रीची सर

रात्रीची ती सर ओल्या कस्तुरीची मौन वरसते:
त्यांत भोगिलेल्या कुंतलगंधाचें धुकें कालवते.
विजेचा पेटतो ओला ओला जाळ काजळी मेघांत,
आर्त झोंबताहे विराण्यांचा सूर पाऊस–धारांत.
थांबत्या सरींत वाहतें चांदणे ढगाच्या काठाने:
पदराखालती झाकल्या दिव्याचें वाटुली पहाणें.
पडका ओसाड आड पावसाने भरून वाहतो,
वर कोनाड्यांत एकलाच पक्षी स्वप्नांत कापतो.
गिळिते नक्षत्रें ओली काळी रात– फूत्कारे नागीण,
दूर एकतारी मीरेची, झंकारे राधेचें कंकण.

।५। आरण्यक

मोरपिसाऱ्यांची पहाटेची सर:
ढगांत केशर भिजलेलें.
धुकाळ रानांत मुकें झाडपान,
साकळलें गान पाखरांचें.
सोन्याचा प्रकाश डोंगरीं कोंडला,
सूर्य चोळामोळा मेघांमधे.
सूर्यमुखा झाकी पात्र हिरण्मय:
रूप का तें होय मरणाचें ?
आर्द्र शंखनाद आरूणी मेघांचा:
घोष पावसाचा आरण्यक.

।६। पहाटदर्पणीं... राधेपरी

ढगांत उघडीं दिशांचीं कवाडें,
आनंदाची झाडें पलीकडे.
हिरव्या रानांत ऊन झिरपतें:
मनचि दुहतें कवीचें की.
तळ्यांत हिरव्या झाडांची साउली
तटस्थ आपुली हिरवेपणीं.
धुक्याच्या वाटांत, उन्हाच्या पाऱ्यांत,
माणसें दूरांत अदृश्यती.
धुकें मरणाचें जीवनाच्या वाटे
घननीळ दाटे पावसाळी.
धूसर तमाच्या अंगांतून पुन्हा
प्रकाशाच्या खुणा निथळती.
सृष्टीची ही शोभा गूढ पाहतांना
वाटलें मरणा जाणिलेंसें.
लोपे राघेपरी पहाटदर्पणीं
बघतां लोचनीं निजरूप.

।७। दर्शनें

आकाशाचें तेज सांडतें पाण्यांत,
लावण्य नभांत जळाचेंच.
प्रकाशाच्या रेखा: पावसाच्या धारा
रेखिती अपारा क्षणीं एका.
खोप्यासह फांदीं पाखरांचे शब्द
नित्य नवा छंद बांधितात.
पर्जन्या, तूं रूप, आशय सृष्टीचा,

गूढ ऐश्वर्याचा आविष्कार.
दृश्यच सहज डोळिया काजळ,
दर्शनें बहळ आनंदाचीं.

निथळली उन्हे अंगांगातून

होतो बसलो व्हरांड्यात,
तृप्त होते डोळे सुखदु:खाची रात्र पिऊन
गवतावरील दवासारखे,
गर्दी पाहिली गुलाबाच्या डहाळ्यांत
पिवळ्या पानांची.
आठवले:
पिकले होते माझेही केस राखी–पांढरे
सुंठीच्या फुलांसारखे!
(सुंठीची फुले! कुणी पाहिलीत?)
एवढे मात्र सांगतो:
आठी नव्हती क्षितिजाच्या कपाळावर,
नव्हती सुरकुती भाळी आभाळाच्या,
हजारहजार वर्षांच्या डोंगरावर
ढगांतून फुलला होता लाल जर्द जास्वंद!
त्याची डहाळी लवली होती
माझ्याही मनात.
रोमांच फुटले वठलेले साठ वर्षांचे!
देहावरची
गळाली पिवळी पाने,
जुनी हाडे झंकारली पुन्हा
किरणांनी.
पेटलो आनंदाने:
निथळली अंगांगातून माझ्या
कोवळी उन्हे– तृणाला गोंजारणारी,
नक्षत्रांकित करणारी मरणाला.

काळ्या गुलाबाचीं फुलें

उन्हामध्ये मखमाली
थवा पाखरांचा झुले,
वारियाच्या डहाळीला
काळ्या गुलाबाचीं फुलें

काळ्या गुलाबाचीं फुलें,
धुकें केशरी दिशांत,
येतें किरण–काठांनी
पाणी सोन्याचें वाहात.

पाणी सोन्याचें वाहतें:
वाटा मातीच्या बुजती.
झाडें चालतां चालतां
भांबावोनिया थांबती,

थांबतात स्थलकाल:
सर्व रंगांत मिटतें,
रंगरेषेच्या पल्याड
फूल नि:शब्दाला येतें.

नखचित्रें: ३

पानें– हिरव्या रेघोट्या:
झाड सुरूचें डोलतें,
अनंताच्या निळ्या भाळीं
दैवरेषाच कोरितें.

इथे सकाळीं सकाळीं

माझ्या घराच्या अंगणीं
निळें पोवळेंसें तळें,
तरंगांत प्रकाशाचे
कळे कोवळे पाटोळे.

इथे सकाळीं सकाळीं
गंध प्रकाशाला येतो,
निळ्या धुक्याच्या मौनांत
सूर आनंदा लागतो.

चांदीचीच–चमकते–
पैल निर्मनुष्य वाट,
अनाहत पायरव
गाजे मुंगीच्या कानांत.

पाण्यावर पंखशुभ्र
फेर पाखरें धरिती:
अर्थहीन मंडलांत
विश्वसुंदराची गती.

नखचित्रें:४

यौवनाचे कमंडलू
अशा कामिना चालती:
डोळा घाली फुलां वाट,
भाळ आभाळें चुंबिती.

टाके

माळावर,
पिकल्या केसांच्या काठावर
मी उभा आहे
आपल्या स्वप्नांचा सूर्यास्त पहात,
सांभाळीत जीर्ण अनुभवांचे अस्थिपंजर,
देहाबरोबर सावरीत, गोंजारीत
नव्या-जुन्या कवितांची लक्तरे.
पुढे धुके माझ्या मनातले,
मागे पायवाट विझलेली, बुजलेली
-वाऱ्यावरच चालत होतो ना जन्मभर!-
समोर हिरवी-काळी झाडी उसवल्या पानांची,
ज्यांना हळूच मावळते किरण
घालीत होते टाके भूत-भविष्याचे, सुखदु:खाचे:
निसवल्या अर्थाला दोरा भरणाऱ्या
शब्दांसारखे!

काठ

नभाचा किनारा पाण्याने पेटला
सूर्य पश्चिमेला कलतांना.

माडाच्या हिरव्या ओळींत एकटी
पाऱ्याची रेघोटी धगधगे.

माझिया एकाकी हृदयाचा काठ
पाहतो दूरांत जळतांना.

पाऱ्याच्या वाटेने कशाची चाहूल:
वाजतें पाऊल निष्पादाचें ?

चांदणे ओलें तुझ्या कां पापणीशीं जाहलें ?

बोल ना फारा दिसांनी चार डोळे भेटले,
चांदणें ओलें तुझ्या का पापणीशीं जाहलें ?

स्तब्ध होता काठ, पाणी, गगनही भारावलें,
झाड डोहीं आठवांच्या पुष्पभारें वाकलें.

कालवे पानांत त्याच्या हासणें कुठल्या उन्हाचें:
मखमली रात्रीतलें का स्वप्न तें नक्षत्रलें.

पाहशी दचकोनि कां गे ? वाजला वारा वनीं,
शब्द मोहर जाळणारा, हे ऋतू ना बोलले.

शुभ्र कलिका मोगरीच्या, जांभळी रसभोर द्राक्षें:
दिवसरात्री स्वप्न नेत्रीं– भोगिलें ना भोगिलें.

उगवलीं मातीत गाणीं

उगवलीं मातींत गाणीं पेरिले नि:श्वास जेथे,
पंथ झाले धाम जेथे पोचलों येऊन तेथे.

त्या विनाशाच्या गड्यांनो, सांगतां गोष्टी कशाला ?
जाहल्या प्रलयांत लाटा त्या स्वयें वटपत्र तेथे.

दग्ध अर्धे झाड विझलें, पेटलें अर्धे फुलांनी,
वृक्ष एकाकी असा मी, पान झडतें भान तेथे.

मी तुझ्या वेणींत राणी, खोविलें गे फूल होतें,
सय फुले ती धुंदगंधी होउनी चाफाच तेथे.

खुणेचे अभंग

।१। भान

साठवितां डोळां सूर्यनारायण
उडावे हे प्राण अवचित।।
झुलतां उन्हांत पाखरांच्या माळा
जळाचिया गळां दिशांतुनी ।।
सहज गळावें देहाचें या भान:
पिकलेलें पान तळ्यामध्ये.
बिंबतात झाडें तीरींचीं पाण्यांत
तसे कवितेंत नांदों आम्ही.

।२। ज्ञान

उशीर कां आता पेटवाया चिता:
आधीच पुरता जळालों मी ।।
मरणाचें नांव जीवन ठेविलें,
जळतां वाटलें सूर्य झालों ।।
चेतला दु:खाचा चंद्र अंतरांत,
भस्म चांदण्यांत देह झाला।।
आता सांगों लोकां राखेचें तें ज्ञान,
उपनिषद्‌गान अस्तित्वाचें।।

।३। खूण

निराकारा मिळे आकाराची वाट,
निरर्थांत अर्थ सुरवाडे ।।
दिवसाच्या पोटीं रात्रीची काजळी,
नक्षत्रांची जाळी अंधाराला।।
भाजून बी लाही होतें परब्रह्म
लसलस कोंभ हारवतां ।।
कलतांना काळ गतीची जाणीव,
शांतीची राणीव शून्यामध्ये ।।
जळतें चांदणे उरतें अंजन:
एवढीच खूण चंद्रबिंबीं ।।

ओळ अनोखी

कोण तूं आलिस अवचित घरीं:
ओळ अनोखी कधि कवितेची रूमझुम ओठावरी.

उरांत दिवसा माळ पेटते,
रात्रिं रेघ वणव्याची फिरते,
सांद्र सावळी सर अवकाळीं लवलिस जळ–बावरी.
कोण तूं आलिस अवचित घरीं.

कोवळीक विसरली फुलांची,
स्मरे न शीतलता चंद्राची,
उदास बघतो, फुलें वाहतो चांद उंबऱ्यावरी,
कोण तूं आलिस अवचित घरीं.

सहज विजेच्या काड्या वेचुनि
बांधिल खोपा प्रलयघनांतुनि
असें विलक्षण घुमे पाखरू तुझिया डोळां तरी.
कोण तूं आलिस अवचित घरीं.

टिकल्या

डोळ्यांत
मोत्यांच्या दोन टिकल्या
सुईच्या अग्राएवढ्या.
त्याने पुसले जात आहेत
आभाळातले सूर्य,
पुसला जात नाही
आभाळाचा अर्थ
मोत्यांची अक्षरे पुसट होताना
या कागदावर,
हे का सांगावे लागते
या देखण्यांना ?

ऊन

छायांत मलमली आर्द्र ढगांच्या ऊन:
उघडते झाकते अर्थच शब्दांतून,
वर निळसर डोंगर अन् हिरव्या रानांत
जांभळें मौन शिरिं फुटूं बघे रंगांत.

बाहती तळाशीं निळे धुराचे हात,
उधळतो तरोटा सोनस्मितें वाटांत,
ही प्रभा कशी या पावसाळि मेघांत
झाकळे उजेडच सजळ खोल हृदयांत.

हालती दूरवर संथ पंख बगळ्यांचे,
नभ वेची तुकडे उदास भग्न मनाचे.
छायांत मलमली आर्द्र ढगांच्या ऊन:
उघडते झाकते अर्थच शब्दांतून.

कळंगुटच्या किनाऱ्यावर

।१।
उपनेत्र माझे पुलिनीं पडले:
नातेंच तुटलें दृष्टादृष्ट.

सूर्यबिंबासवें मीही विरघळें
जिथे जळ मिळे आकाशाला.

उजेड उद्याचा गोळा माझ्या डोळां:
पाखरू खोप्याला परतलें.

अशा सांजवेळीं मीही झाड होतों,
झुडुपें पाहतों माणसाचीं.

टिंबें झुडुपांचीं, टिंबें माणसांचीं:
रांगोळी विश्वाची अपुरीच.

झिंगल्या नारळी, वारा शेंड्यावरी,
छेडितो सतारी किरणांच्या.

।२।
सूर्य उतरला क्षितिजीं लाटांत,
रेतीच्या ओटींत जागे दुजा.

नि:स्तब्ध नारळी सावल्या फेडून,
पाखरें झाडून पंख, गाणें.

उभे पिती सांज वाळूत पेटून
फिरंगी नाग दोन वासनांचे.

भगवे चर्चचे घंटानाद दूर,
आर्द्र निळे सूर सोहनींचे.

उसवल्या मना मधाळ स्वरांचा,
फिक्या किरणांचा एक टाका.

मरण माझ्याभोवतीच असते

मरण माझ्याभोवतीच असते,
माझ्या पोटातूनच उगवते:
गुलाबाबरोबर काट्यावाणी,
वसंतात पिकणाऱ्या शिशिरावाणी
जीवनाबरोबर.

कधी ते भाटी होऊन येते:
लोकराचा गोळा, काळा काळा,
मऊ हळुवार
डोळे हिरवेगार.

कधी पायांत अडमडते,
कधी अंग घासते,
आडवे जाते:
अपशकुन करते.

कधी गुरगुरते संध्याछायांत,
तर कधी
पिले हरवलेल्या मांजरीसारखे बसते
घराच्या छपरावर

रडत रात्रभर.
सकाळी आभाळभर
होतात त्याची गाणी
कशी कोण जाणे.

नको

छान सूर मिळाले,
शब्द फुलांस आले,
गाऊं दे, ऐकूं दे,
गाण्याचें पैलतीर शोधूं नको.

केसामधी चांदी:
नक्षत्रांची फांदी,
पाहूं दे, शिवूं दे,
दरीमध्ये फार खोल वाकूं नको.

डोळे विश्वाएवढे,
विश्व डोळ्यांएवढें ?
असूं दे, नसूं दे–
पापणी ओली झाकूं नको.

कोण जाणे

जिण्याची शर्त काय ?
गाण्याचा अर्थ काय ?
प्रेमाची आर्त काय ?
कोण जाणे.

वाऱ्याचा ठाव काय ?
नक्षत्राचं नाव काय ?
नदीचं गाव काय ?
कोण जाणे.

मरणाचं भय काय ?
अंधाराचं वय काय ?
फुलाची सय काय ?
कोण जाणे.

गातें कोण मनांत ?

गातें कोण मनांत, कळेना गातें कोण मनांत ?

जरी शतावधि कविता लिहिल्या,
शंभरदा वाचिल्या गाइल्या,
शब्द कुणाचा, सूर कुणाचा, अजुनि मला अज्ञात.
कळेना गातें कोण मनांत ?

पुशिलें त्याचें नाव फुलाला,
गाव तयाचें उषे–निशेला,
मिचकावुनि कुणि डोळा जातो काळ्याभोर जळांत.
कळेना गातें कोण मनांत ?

अभिमानाने कधी दाटतां
"रचिलें मी हें गाणें" म्हणतां,
"गीतच रचितें नित्य तुला रे"– फुटे शब्द हृदयांत.
कळेना गातें कोण मनांत ?

पक्षी

क्षणिकाला फुटले पंख:
खग आकाशाचे यात्री,
पंखांत व्यथा वेगाची,
आनंद नभाचा नेत्रीं.

तेलवात

तेलवातीला रोजच्यासारखी त्या दिवशी मी देवळांत गेली,
कशानं की काय माय हातची अचानक पणती विझली.

मी मन्‌लं अंधारीं मारूतीरायाच बाई छाताडावर येऊन पडला,
दगडाचा देह परंतु त्याचा इतका मऊ बाई कामून झाला ?

काळजामधी खोल भीतीनं आडवीतिडवी सुरीच फिरली,
धग्‌धगत्या पोटीं अशी कशी ती बर्फाचं गार गार पातं झाली ?

दारांत येतांना हातांत पाहिले चांदीचे मोठ्ठाले देवाचे डोळे,
डसल्यासारखे झाडले हात, तळव्यांत इंगळ तरीही पोळे.

वटारलेले ते देवाचे डोळे पुन्हा दिसले नाहीत मला,
धडकीचाही जोर जातांना देवळांत पोटांतल्या पोटांत जिरून गेला.

खोटं कशाला सांगायचं बाई, तेलवात कांही सोडूं नाही वाटली,
आणखीन् तशी सुखाची साय मनांत माझ्या कधी नाही दाटली.

काही दिवसांनी चोरलेल्या डोळ्यांचा गावांत फार गव्गवा झाला,
माझंच नाव पुजाऱ्यानं घेतलं, देवही गिळून मेला मूग बसला.

नको नको म्हणतां चावडींत रात्रीं देहाचा माझ्या उजेड सांडला,
पोलिसांनाही टाकोटाक तेव्हा खऱ्या चोराचा पत्ता लागला.

खरी खरी किंमत देहाची तेव्हा नागड्या रात्रींत आली कळून:
जातात माणसं, देवही वाहत एकाच मोरीच्या सांडपाण्यांतून.

सांबराची शिंगे

दु:खालाच कारण होतात त्याच्या
सांबराची शिंगे,
तसेच माणसाचे संबंधही.
मीही एक शिंग त्यांच्यांतले
तुझ्यासाठी. पण
तू तरी सांबर आहेस, की–
की तूही एक शिंगच ?
शिंगांना नसते समज,
सांबरालाही हे कळत नाही
फांद्यांत शिंगे घुसेपर्यंत,
शिंगांचाही नाइलाज असतो:
त्यांना दिसत नाहीत झाडे, फांद्या:
सांबरालाही स्वत:चाच वेग असहाय बनवतो,
वर तळ्यातल्या प्रतिबिंबाने केलेला असतो
त्याचा 'नार्सीसिस'.
प्रतिबिंब तळ्यात राहते,
सांबर झाडात अडकते,
तडकतात आरसेही तळ्यांचे उन्हाळ्यात.
ते असो.
तू सांबरशिंगाचा लेप लाव
आपल्या जखमेवर,
पहा, वेदना कमी झाल्या तर!

साक्षी

चालत ठेचकाळत चढणी–उतरणीवरून
शब्दांच्या
किती लांब आलो मी!– किती?
शब्दापासून शब्दापर्यंत!
चालता चालता गुणगुणलो काही
पावलांच्या नादात, छायांच्या रायांत.
वाटले, जुळली कविता जीवनाची
झऱ्याच्या पाण्यात, अधरांच्या पाकळ्यांत,
ताऱ्यांच्या जाळ्यांत– कुठेतरी.
गायलो जोसात, धुंदीत कवित्वाच्या,
पाहत असताना उडून जाताना
त्यातला अर्थ सुवासासारखा.
आता उभा आहे रिता, उदास,
शब्दांच्या अंतिम कड्यावर.
पलीकडे दिसते आहे कविता
झपाटलेल्या डोळ्यांतील मद्याच्या ज्वालेप्रमाणे
आणि कंठातून उमटत आहेत खगकूजिते
चिमण्या–साळुंक्यांची, अर्थहीन!
तेव्हा वाटत होते गावे मुक्त चंडोलासारखे,
आता कळते आहे: मीही एक पक्षी,
केवळ साक्षी नि:शब्दाचा, निरर्थकाचा.

पौष–पक्षी

।१।

इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी,
काळे पौष–पक्षी:
काळ्या काळ्या पाकळ्या
काळ्या काल–कमळाच्या
प्रकाशाच्या जळात.
अलक्ष्याचे लक्षी
काळे पौष–पक्षी.

इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी,
काळे काळे पंख, पोटे पिवळी पिवळी,
काळेच हसू ऊनवंतीच्या गोऱ्या गोऱ्या गाली.

असत्याचे साक्षी
काळे पौष–पक्षी.

।२।
इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी.
दिवसामासांनी वर्ष झडत आले,
रात्रीचे दिवे दूर विझून गेले,
सकाळचे क्षितिजावर लाल–निळे–पिवळे
शिलगले किरण
–आणि उडाले
आदिम देवळीतल्या काजळक्षणांप्रमाणे.
नसत्याची नक्षी
काळे पौष–पक्षी.

इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी,
खोल सूर मारतात पाराजडल्या वाऱ्यात:
अर्थामध्ये शब्द जशी बुडी घेतात,
पण–पण माझ्या पाखरांनो,
माझ्या काळजाच्या टिकटिकत्या विद्युत्–टिंबांनो,
तुम्हांला माहित आहे काय?
वाऱ्याला सळ नाही,
अर्थाला तळ नाही.
अरे सूर्यकिरणभक्षी!
काळे पौष–पक्षी.

इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी:
सूर्याचे अंडे फोडून निघालेले,
उन्हाच्या काठी जरा विसावलेले,
अज्ञात जीवनाचे उदास मोने शब्द:
काळे शंख मरणगूढ, निर्वासित,
निर्वासित पक्षी
सरत्या हिवाळ्याचे:
नसत्याची नक्षी,
असत्याचे साक्षी
काळे पौष–पक्षी.

एकलेंच हे फुला, गळायचें

एकलेंच, एकलेंच हे फुला, गळायचें,
एकलेंच सुख न काय भोगिलें फुलायचें ?

दे प्रकाश नभ वरूनी,
ओल लळे ही धरणी:
या ऋणांत नसत्याच्या कुठवरी बुडायचें ?

गंध निघे दिशदिशांस,
ओस पाकळ्या उदास,
डोंगरांत सूर्याचें फूलही झुकायचें.

पान-फुलें गळल्यावर,
सौंदर्यच ढळल्यावर
का शाश्वत सत्याचें झाड-खोड व्हायचें ?

तोलित देठीं पहाट
नवकलिका उमलतात,
तूं मिटून मातीचें सांजगीत गायचें.
एकलेंच, एकलेंच हे फुला, गळायचें.

नखचित्रें:५

लांब भाजल्या रानांत
उभा मस्त गुल्मोहर:
सांजमेघ मध्यान्हींच
झुले कसा झाडावर ?

पुन्हा पौष-पक्षी

पहाटेचे आभाळ:
शिंपला मोत्यांचा रिता उघडलेला,
शेवग्याच्या फांद्यांवर
पांढराशुभ्र बर्फाचा तुरा,
मोत्यांचा चुरा,
उघडझाप पानांत काजळी पापण्यांची,
परत आले ते
इवले काळे पक्षी,
पुन्हा पौष-पक्षी.

परत आले ते
आसन्नमरणाच्या परतल्या वाणीसारखे
काळे थंड शब्द:
तुळक, अडखळणारे, धास्तावलेले.
अंधारवाडा पाहून आलेले

इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी:
काळे जळते डाग सूर्यावरले,
सौर फडफडाट अज्ञात पहाटेचे:
धगधगत्या अनंत सूर्यविवरातली
रहस्ये सृष्टीची उत्पत्ति-विनाशाची
पंखुटली वाऱ्यात.
सांगा, सांगा कशी येते
ही काळी पालवी जीवनाची
मरणाच्या डहाळीला ?
इवले इवले पक्षी,
काळे काळे पक्षी,
काळे पौष-पक्षी

स्वच्छ आठवतो

स्वच्छ आठवतो मला तो दिवस
इतक्या वर्षांनंतरही-जाळाच्या चटक्यासारखा.
तू म्हणाली होतीस, "पहा ना,
हाक मारतंय कुणीतरी,
दार वाजतयं केव्हापास्नं.
उघडा ना."
दाराशी थबकली होती
नि:शब्द सावली लिंबाची उदास पिवळी,
परकी, अबोल:
वर कोकत होता कावळा.
कुणीच आले नाही दारातून,
उडून गेली दोन पाखरे मात्र प्राणांची
तुझ्या डोळ्यांतून- मग एकच आक्रोश.
फाटक्या केळपानांची फडफड अंगणात,
वाऱ्यात काठच्या मासोळ्यांची तडफड.
त्या गदारोळातही तुझ्या थंड चेहऱ्यावर

ओघळले एक स्मित– नव्हे,
स्मित होऊ पाहणाऱ्या ओठांची नुसती थरथर
गोठलेली: एक शुभ्र पीस
मघाशी उडालेल्या पाखरांचे जणू
पाषाणात कोरलेले.

कोंडलेलें गीत

कशीं प्रकाशाची घरें,
त्याला अंधाराचीं दारें,
पायीं दु:खाचा अळिता,
गीत माझें येरझारे.

रोज दारीं अबोलीचें
उषा बांधते तोरण,
सात सूर झोपलेले
सतारीच्या तारांतुन.

सूर जागतां तारांत
बोल अबोलीचे झाले,
उभा बाहेर ऐकतों
गीत आंत कोंडलेलें.

एक निसटणें

मित्रांनो, सोबत आता संपायाची,
धरूं नका राग, समजून घ्या खंत मनाची.

जें शोधित होतों जीवनांत दिन–रात,
नाही तें सापडलें कधिहि शब्दांत.

शब्दांतुनि शब्दच फिरूनी हाती आला,
दोन्हीतुनि अंतीं अर्थ गळुनिया गेला

कविताहि काय ही अंतीं एक निसटणें,
लाटांची लीला गळ टाकोनी बघणें.

आम्हा फुलांस ठावें !

आगीविणा जळावें, पाण्याविणा भिजावें,
जा सांग त्या शठाला तुज काय प्रेम ठावें.

मागूनही मिळेना, ओळे न मागतांही
तें बरसणें मनाचें कांदबिनीस ठावें.

डोळ्यांमध्ये जळावें, जळुनी पुन्हा उरावें,
हें गुपित चंद्रभोगी जळत्या दिव्यास ठावें.

पाण्यांत कुमुदिनी ही पाहोनि तृप्त चंद्रा,
चोरोनि इंद्रियांना तुज भेटणे न ठावें.

कां रे उगाच भ्रमरा शपथा गळेपडू या,
विजनीं कसे गळावें आम्हां फुलांस ठावें.

हिमलिंग

आकारे हिमलिंग यात्रिका, अमरनाथ–गुंफेंत,
कविता जैशी रूप अकल्पित धरी शब्दरचनेंत.

गिरिकंदरिं षण्मास कपाटें बंद असति बर्फाचीं,
मनापलिकडे वाचा राही गोठुनिया हृदयाची.

आत्मलिंग तें योगी पाही केव्हा एकांतांत,
आत्मकळेचें कवि घे दर्शन ह्या प्रस्तरखंडांत.

सावधान ! उजळेल पौर्णिमा या बर्फाळ नभांत,
तोवर चालत रहा यात्रिका निगूढ गिरिमार्गांत.

मौन

मौन हिरवें रानांचें,
निळें मौन आभाळाचें,
मौन काजळी जळाचें,
लाल–पिवळें फुलांचें.

खडें मौन पहाडांचें,
मौन धावरें उन्हाचें,
तारापद चंद्रमौली
मौन गहन रात्रीचें.

मौन भरती, ओहोटी,
मौन संध्येच्या संपुटीं,
ज्योत रातीं जळे मौन,
मौन भरारी पंखुटीं.

कुठे जाऊं द्या रे तडा,
काहीतरी कुणी बोला,
घाव घाला कुठेतरी,
छळी अनादी अबोला.

मौनच सारें जन्मापासुनि,
मौन मृत्युच्या काठालागुनि.

नवलाचे घर तू बांधलेस

नवलाचे तू घर बांधलेस,
वसवून मला निर्वासित केलेस.
खिडक्यांना लावलीस तावदाने चांदण्याची,
कवडशांत उजळतात ज्यांच्या काचा
अंतरात्म्याच्या हालत्या सावल्यांतून.
नवलाचे तू घर बांधलेस.

नवलाचे तू घर बांधलेस:
खोलीच्या कपाटांतून
ठेविलीस रचून पुस्तके,
ज्यांतून जागलेली झाडे
बोलत बसलीत माझ्याशी जुन्या मित्रांसारखी
विस्मृत कवठबनात गंगेच्या धूसर काठावर.
नवलाचे तू घर बांधलेस.

नवलाचे तू घर बांधलेस:
एक खोली रिकामी ठेवलीस.
कोपऱ्यात फक्त पलंग,
त्यावर झोपलेली कुणी रमणी:

रितेपणाची मूस, आकाशी डोळे,
हातांत सुगंधी गजरे वायवी फुलांचे.
स्पर्शताच सारे विरले, उरलो मी
एक आकाशस्थिती होऊन.
नवलाचे तू घर बांधलेस.

नवलाचे तू घर बांधलेस:
आभार, आभार शिल्पकारा,
आभार.
घरात बसतो तेव्हाही मी बाहेरच असतो
सुगंधासारखा,
दृष्टीसमोर थिजतात राने, रस्ते
बर्फाच्या धुवांधार वर्षावात:
यांत माझे घर कुठे आहे?

नवलाचे तू घर बांधलेस,
वसवून मला निर्वासित केलेस.

नाही, नव्हतें प्रेम तुझ्यावर

नाही, नव्हतें प्रेम तुझ्यावर,
नाही– शप्पथ!– काजळओली डोळां थरथर.

सांजवेळ ही अशीच छळते,
तमीं एकलेपण हें डसतें,
मनीं फुलांचे केसर भिजतें,
जीव टांगतो नक्षत्रांवर.
नाही, नव्हतें प्रेम तुझ्यावर.

कुणी न हुरहुर वाट पाहते,
'काउ' कोकतां उर धडधडतें,
स्मरे, चमेली तुज आवडते:
दुष्टच गजरे हे रस्त्यावर.

सावल्यांत एकटीच फिरतें:
गाल तापती, उरांत दवतें,
कांही पानांतुनि सळसळतें,
गंध उदाचा भरे अंगभर.
नाही, नव्हतें प्रेम तुझ्यावर .

कशाला

डोळ्यांच्या डोळ्यांत हासशी कशाला ?

रूळे पाठीवर मुक्त केशभार:
काळा धबधबा धुंद धुंवाँधार
कोसळत्या धारेंत वळून वळून पाहशी कशाला ?

वेणींत फुलें माळून आलीस,
ओठींचे शब्द खुडून गेलीस.
अनाहत नाद ओसाड मनांत ठेविशी कशाला ?

सोनेरी स्पर्शाच्या रानांत आलेले
राघू मुशाफिर हरवून गेले.
दूरच्या गावचे पापणींत दिवे लाविशी कशाला ?
डोळ्याच्या डोळ्यांत हासशी कशाला ?

अक्षरे पुसट

अक्षरे पुसट पुसट होतात,
अर्थ तर अदृश्यच असतात,
प्रतिभेची पावले रक्तात रूजतात,
अनुभव डोळ्यांत डोळे घालून बघतात,
जलाशयात डोकावणाऱ्या तारांगणांसारखे.
हे डोकावणे खरे असते,
नसतेही,
तरीही ते सुंदर असते:
आंबेवनात घुमणाऱ्या कोकिळेच्या
गंधधुंद पंचमाइतके.

अखेरचे वादळ

आहेत त्या लिफाफ्यात
तू दिलेल्या गुलाबाच्या पाकळ्या.
होय,–वाळलेल्या, विखुरलेल्या,
पश्चिमेवरून ढळणाऱ्या
काळसर गुलाबी सांजसावल्यांसारख्या.
ह्या अस्ताचलचुंबी ऊनसावल्या
ढकलीत नेत आहेत मनाला मागे

त्या सकाळच्या उन्हाकडे.
त्या कोवळ्या उन्हाचा का तू तेव्हा
गुलाब केला होतास
दिलास मला जो, दळदार, दवदार,
आरक्त सहवासाच्या सुवासाने भरलेला,
थरथरलेला अनुभूतीने मीलनाच्या:
स्वयंतृप्त गेंद तुझ्याच अधरबिंबाचा.
सूर्यबिंब त्या दिसाचे
साक्ष आहे याला.
ठेविली आहेस तू त्यात अजून
आपली चोरटी स्मिते
आसुसत्या आठवणी,
सुखदु:खाची स्पंदने: गळत्या पाकळ्या
हजार दिवस-रात्रींच्या,
खुपऱ्या सावल्या भेटीगाठींच्या,
आठवणीच्या झाडातळी.

तुला जपून ठेवता आली नाहीत,
राखता आली नाहीत मलाही
ती फुलांची दळे,
सुवासाच्या पाकळ्या,
तुझ्यामाझ्या
प्राणांच्या मर्मबंधात.
मी पडलो आहे
उद्ध्वस्त हृदयाच्या किनाऱ्यावर
आकाश वेढणारा एकाकीपणा घेऊन,
मुकाट विखरत आहेत त्या पाकळ्या
अखेरच्या वादळात
माझ्याच श्वासनि:श्वासांच्या.

जायला निघालीस

जायला निघालीस इतुक्यातच ?
मावळले नाहीत तारे आकाशांत,
कोमेजली पहाट बोलांतल्या फुलांत.

अंधारताना अशी लगबगा आलीस,
खोलींत दिवाही नव्हता लावलेला,
सांजेशीं परंतु उभा देह पेटला.

येतां येतां घाईंत फाटलें पातळ:
रडवेली झालीस, झालीस मनीं कष्टी,
चंद्र होता डोळ्यांत जरी ठिगळासाठी.

वाटेंत पुसटल्या पाऊलखुणांवर
चांदणें उदास सांडतें आहे,
विझत्या सांजेंत परंतु कांही पेटतें आहे.

नदीपात्रीं माझ्या गात्रीं

अंग वाळविती मेघ
उगवतीच्या उन्हांत,
रातभराच्या झडीचा
शीण भरला देहांत.

विझलेल्या ढगांमध्ये
दग्ध गुलाबाची कांती,
मिटलेल्या पापण्यांत
कांही झोप, कांही भ्रांती.

तरळतें तुझ्या डोळां
मेघांचे तें रितेपण,
उजेडतां निघालीस
वीज देहांत झाकून

ऊन असतां आलीस,
होता पळस फुलला,
डोंगराच्या वणव्यांत
चंद्र रात्रीचा भ्रमला.

अंगणींच्या मंडपांत
आला बहर जाईला,
झिम्मा फुलांच्या मुशींत
दोन देहांचा रंगला.

"यथा काष्ठं च काष्ठं च
जाती प्रवाहाचे यात्री,
आता पुन्हा येणें नाही
चंद्र जरी आला रात्रीं."

अशी पुटपुटत जाशी
सुकवीत अश्रु नेत्रीं,
काष्ठें जळती अजून
नदी–पात्रीं, माझ्या गात्रीं.

दृष्टी होते मंद

दृष्टी होते मंद, अंध, तरि सूर्य जागती नेत्रीं,
डळमळती जरि पाय, चालतां गति पृथ्वीची गात्रीं.

शक्ती सरते, शरीर थकतें, तळीं संपते वाट,
सागर गर्जे शिंपल्यांतुनी त्याला कुठला काठ ?

नाव लोटिली, तीरहि सुटलें, तमीं बुडाली धरती,
स्वर्गंगेच्या पैल दिसे मज नक्षत्रांची वसती.

शब्द न ऐकूं येती कानीं, ठोके हृदयीं चुकती,
रविबिंबापरि गाणीं अलगद उगवति अधरांवरती.

सावित्रीच्या गाण्याची मी वाट रोज चालतों,
संहारक मृत्यूच्या डोळां तेंच गीत शोधतों.

चंद्रकान्त की साकी– बुडला सूर–लयींचा काठ,
खवळे मनिं गाण्याचें वादळ: लाटेवरती लाट!

तारकांचा उंबरा

तारकांचा उंबरा मी लंघुनींया चाललों,
पाश गाण्यांचे, सुरांचे सारूनीयां चाललों.

शब्द हे प्राणांस चिणिती का नव्या व्यर्थांमध्ये,
आज मी मौनांत भिंती मोडुनीयां चाललों.

गंध मी उन्मुक्त पडलों कोंडुनी पुष्पांतुनी,
पाकळ्या त्या कोवळ्या मी लुंचुनीयां चाललो.

मी जिला सर्वस्व दिधलें, पेटली होऊन ज्वाला:
त्रिपुर तो मी डोंगरांतुनि जाळुनियां चाललों.

वाट पाहुनि होय वृंदा मुत्तिका वृंदावनीं,
तीच माती मी कपाळीं फासुनीयां चाललों.

नाही रात्रीचा निवारा

नाही रात्रीचा निवारा नष्टनीड पाखरांना,
झोपती ती झाडांमधी लोंबकळत फांद्यांना.
निळ्या रानाच्या देशांत जाऊं फुटतां पहाट:
जागे झेप पंखांतली मिटलेल्या पापण्यांत.
तोच वादळ सुटलें, फांदी कडाड मोडली,
नीडें पाखरांसहित खाली धुळींत मिळालीं.
कोण पेरितो वादळ मंद गार झुळकांत ?
पक्षी वेचितात दाणे मरणाच्या अंगणांत.

ताल व्यथेचा धरून

तुझ्या नेत्रीं माणकें वा
ठिणग्या जन्मींच्या जळती,
माझ्यावाणी तुझ्या मनीं
दु:खें काय रे, तेवती ?

धुमतोस पारव्या तूं
खिन्न एकला बसून,
बाण उरींचे आपुले
काढिशी का उपसून ?

बाण राहूं दे असेच:
दु:खें सहज सोसावीं,
ताल व्यथेचा धरून
गाणीं आनंदाचीं गावीं.

ऐल जीवनाच्या काठीं
जरी दिशा अंधारती,
अंधाराच्या शेतामधी
पैल किरणें कोंभती.

वेणांत अंगाई

कधी कधी असें वाटे:
आता पुरे हें जगणें,
व्यर्थ काळज्या म्हाताऱ्या
व्यथा वांझोट्या सोसणें.

रित्या क्षणांचा हा भार
आता झेपतां झेपेना,
कुठे कणवेचा डोळा
एक थेंबूट दिसेना.

सुखासाठी जे जोडिले
पाश गळा आवळिती,
जाई–जुईच्या नजरा
डोळा पाण्यांत सुकती.

शून्य एकला जिवाला
खुपे दुरावा सख्ख्यांचा,
माझ्या भाळीं लाविती ते
टिळा आपल्या स्वार्थाचा.

पर्केपणा घरींदारीं
मला भेटतो, विंधितो,
मोरपिसाऱ्याच्या स्पर्शा
जीव आता घाबरतो.

निळ्या हाका आकाशाच्या,
झाडें जीव हे लाविती,
स्वच्छ फुलांच्या हास्यांत
गप्प मनें उकलती.

मनमोकळा हा वारा,
आप्त शब्द पाखरांचे,
सरीपाठच्या उन्हांत
स्पर्श कोमट हातांचे.

पानें कानांत पुसती:
"घृणा नको जीवनाची,"
कुणी वेणांत अंगाई
गाई नव्या सृजनाची.

पेरून मृत्यू, गाण्यांत जीवन उगवीत होतों

उन्हेरी रानाचें हिरवेपण नेसून आलीस,
मुग्ध फुलांचे अंगीं फूलपण लेऊन आलीस.
विस्कटे रात्र कालची तुझ्या ह्या मोकळ्या केसांत,
पाखरांचे गाणें हरवलेलें कंपित ओठांत.
पाहिलें वाटे कधीमधी पण तुला कुठेतरी,
बोलवाया तुला कापरी हाक उठते अंतरीं.
नांव काय?– पण नेमकें आता आठवत नाही,
साजणी! तुझें रूप डोळ्यांमधे मावतच नाही.
थोडेसें हसून,
गेलीस वळून:
बासरीची धून,
हरवलीस समोर गर्दीत उतरत्या उन्हांत.
देखिलें तुला मीं धुक्याच्या वाटांत, छुप्या आरशांत.

गातसे साळुंकी जर्द कर्दळी–फुलांच्या बेटांत,
स्वरावशी तूं मारूबिहागाच्या सांजसावल्यांत.
दूरच्या मेघाचें काजळ तुझ्या स्वप्निल डोळ्यांत,
श्रावणसर कुठे कुठे झुके उन्हाची झोकांत.
ज्वानीची लहर,
कट्यार नजर,
ठुमरी कातर,
असा जन्मभर तुलाच का मी हुडकीत होतों,
पेरून मृत्यु, गाण्यांत जीवन उगवीत होतों.

फल्गू

माझ्या घरीं मी झालों बहिष्कृत,
सुतादिक आप्त परके सारे.
बोलतों वागतों बाहेर साजिरें,
कोसांचीं अंतरें मनामाजीं.
हृदयाचें तसें उघडें कवाड,
परंतु पहाड उभे मध्ये.
म्हणे, फल्गू नदी वाहते पालथी:
वाळू लागे हातीं तापलेली.
सांगती शीळ तळीं वाहे जळ,
कशी जळजळ संपणार?
अयोध्येचा राम बुडे या नदींत

दु:खें आक्रोशत, "सीते! सीते!"
वाहते अशीच तेव्हापून नदी,
किडे झऱ्यामधी सूर्यशापें.
ग्रामवासी अशी कथा सांगतात,
प्रत्यय मनांत येतो कांही:
सीताराम मूर्त प्रेमाची दंपती:
विरही जळती जन्मभर.
चिणली जिवंत सीता धरणींत,
बुडाला फल्गूंत रामचंद्र.
प्रत्येक प्रीतीच्या हेंच दैवीं अंतीं:
पालथी वाहती, 'फल्गू' एक.

गाण्यांच्या पायांनी गेलीस ग

उभी अवचित तूं माझ्या दारीं निळ्या नभाचा शालू नेसुनि,
सांजकांचनी सुरंगिचा सर कृष्ण केशपाशांत माळुनी,
जरठ दिशांवर हास्य पांघरित:
फुलांच्या पायांनी आलीस ग,
गाण्यांच्या पायांनी गेलीस ग.

पल्याड नदिच्या पडक्या बुरूजीं झाडे वाकलें वार्धक्यापरि,
चंद्र उगवतां चाळ वाजति छुमछुम नकळत वृद्ध उरिं,
क्षणांत पैजंणरव पेरित तूं
नादाच्या पायांनी आलीस ग,
गाण्यांच्या पायांनी गेलीस ग.

छेडित तारा 'छोड गये तुम' ठुमरीचे स्वर आळविशी,
फूल एक हळु पडतां वरूनी लाजुनि दचकुनि उभी अशी,
धीर आज आठवांत होउनि
शब्दांच्या पायांनी आलीस ग,
गाण्यांच्या पायांनी गेलीस ग.

ओठीं गाणें मधुर कंकणें दारीं घडिघडि किणकिणती,
प्रतीक्षेपरि दीपज्योती कातर नयनीं थरथरती,
या अंधारीं स्मरतें आता
ज्योतीच्या पायांनी आलीस ग,
गाण्यांच्या पायांनी गेलीस ग.

जळापरि भरलीस आतुनि घट डोईवरि देतां उचलुनि,
गेलिस वळुनी हसुनि साजणी पांदीमधला चिखल तुडवुनी,
कां घेउनिया फिरूनि रिता घट
मातीच्या पायांनी आलीस ग,
गाण्यांच्या पायांनी गेलीस ग.

माझ्या डहाळीला

माझ्या डहाळीला कांहीतरि फुलतंय ग:
कां ग कोंभांत फूलपण सलतंय ग ?

येतो मातीचा खमंग वास,
उतूं उन्हांत ये उल्लास.
कुणि सूर्याचं बी कुठं पेरतंय ग.

तरू वादळांत खडखडती,
मेघांत विजा कडकडती,
जमिनींत खोल कांहि उलतंय ग.

ओठांशी शब्द थरारे,
घुंगरू तनुंत झंकारे,
गाणं मनांत कसं रूमझुमतंय ग.

'धिमकिटि धिम' घुमत मृदंग,
स्वरतात नसांत तरंग,
पैंजणीं मरणभय सरतंय ग,
माझ्या डहाळीला कांहीतरि फुलतंय ग.

नखचित्रें:६

नभ ढगांनी झाकोळे,
ऊन कोंदतें त्यांतून:
स्मित फुलाचें उजळे
मुग्ध पाकळ्यांमधून.

निदानींचे अभंग

।१।
त्याचिया कृपेचीं हालतात पानें,
वृक्ष वारियानें डोलतांना.
येती तरंगत मेघ आकाशांत:
स्वप्नेंच पंखांत अज्ञाताचीं.
पर्वतांचीं मौनें बोलती नभांत,
पानांचा रानांत झिम्मा झडे.
सृष्टीचे रहस्य मुकें वृक्षमूळीं,
बोलों येतें फुलीं फांद्यांतोनी.
अंधारास डोळा फुटतो सूर्याचा,
अर्थ मरणाचा उगवतो.

।२।
मंद मंद सांज भूवरी उतरे:
लालिमा पसरे काळिमेंत
दूर समुद्रांत परतती होड्या,
वाऱ्यांत उडती शुभ्र शिडें:
अलौकिकाचीं हीं हास्येंच काठास
येती माहेरास फेसाळत.
उडत चालल्या बगळ्यांच्या माळा:
पंखांचा सोहळा दिनान्ताचा.
चढे अस्मानांत अजाँ नमाजाची:
हाक आंधळ्याची बहिऱ्याला.
शंख-घंटानाद मंदिरांत दूर,
जळे ना काहूर आरतींत.
निरंजनींच्या विझणाऱ्या वाती
डोळां तेवताती सांजवेळीं.

।३।
समुद्राची गाज गर्जते दिशांत
नित्य घुमे कांही तसें या मनांत.
अहर्निश पाणी कल्लोळतें काठीं
तसे अंतरांत शब्द येती जाती.
कशाचा कशाला अर्थ ना लागतो,
प्राण स्वर-लयीं परी हा नाहतो.
वेड हें मजला पुरो जन्मवरी,

शब्दांपैल गाणें गातसे वैखरी.
उषेपलीकडे ऐल या संध्येच्या
ऐक कुणी गातें आनंदाच्या ऋचा.
तुजला डोंगरीं सूर्य बाहताहे.
बुलबुल फुलांत तुला पाहताहे.
वाहे तुझ्यासाठी तृषार्त हें पाणी,
थांबलीं नभांत तारकांची गाणीं.
खगा, बघ वर आकाश मोकळें:
थोडा कंठ, थोडें मन करी खुलें.

।४।
सोनियाचे पंख रोज दे अरूण
दिगंत लंघून जाण्यासाठी.
खगा, कां हिंपुटी झुरशी मनांत
टेकाया नभांत दांडी नाही.
पाखरा, हें सारें विश्वच पिंजरा,
मुक्त येरझारा अनंताच्या.
नभाचा गाभारा गाण्याने भरावा,
चोचीने झेलावा मृत्युडंख.

।५।
उड्डाणाचें बळ देईं पंखांमधे,
नीड नभामधे असो नसो.
गाण्यासाठीं सूर देईं या कंठांत,
वसंत वनांत असो नसो.
वाहत्या जळाची धार दे झऱ्याला,
काठाशी तृषित असो नसो.
जिण्याचें आव्हान देईं या प्राणांत,
संनिध प्राणान्त असो नसो.
वादळ–रात्रीस देई चंद्रकोर,
तिला पैलपार असो नसो.

।६।
आणिलें उधार मरणा मागून
दोनचार क्षण जीवनाचे.
दोन शब्द झाले, दोन झाले सूर,
पाहती चतुर अर्थ त्यांत.
शोधितांना अर्थ शब्द हरवले,
सूरही निमाले निळाईंत.

आता फक्त डोळां आनंदाचें पाणी,
कंप गात्रांतुनी करूणेचे.
उमटतो ओठीं स्मिताचा ओंकार,
अनादी झंकार पैंजणांत.
शतजन्म मृत्यो, ऋणांत राहीन
असा एक क्षण देईं पुन्हा.

।७।

आनील आनंद आभाळ उमले,
झऱ्यांत आनंद निळा झुळझुळे.
आनंद हिरवा वाहतो पानांत,
सकाळे आनंद केशरी उन्हांत.
आनंद काजळे: रात्रीची कांबळी,
फाटका आनंद: तारकांची जाळी.
प्रलयाचा हर्ष कल्लोळे सागरीं,
मुकें इंद्रधनु कमान त्यावरी.
जीवनाचा रंग म्हणा असा तसा:
किर्र रानामधे कंप शुभ्र ससा.

।८।

पाउस का वर्षे तुला विचारून ?
सूर्य का पुसून उगवतो ?
सहर्ष फुलें हीं फुलती रानांत,
कोण त्यां कानांत सांगे, "हसा" ?
झरा खळखळा वाहे मुक्तपणे,
अंधारीं शिंपणें चांदण्याचें.
स्वच्छंद सृष्टीचें स्फुरणें विरणें:
गाण्याचें फुंजणे तसेंच हें.

।९।

मंदिर डुलतें हिरव्या झाडाचें:
कळस सोन्याचे झळकती.
ऊन सोनसळा उभा पांघरूनी
बकुळ अंगणीं पांडुरंग.
कर घरकटी शुभ्रहास जाई,
गाई रखुमाई सुगंधाची.
झुलणारें झाड, हासणारी वेल:
देव नि देऊळ दोन्ही मला.
झाडावरी पक्षी कुठे उतरले,
विश्वंभर झालीं उन्हें डोळां.

एक दुपार

फांदीवरील सोन्यास
इथे आलेंसें मार्दव,
फुलांवरी कांचनाच्या
जरी सुकलें गे दव.

पैल गुल्मोहर असा
ओला निखारा फुलला,
होतां स्पर्श तुझा जसा
माझ्या रक्तांत पेटला.

भस्मांकित निळाई ही
उष्ण उन्हाच्या श्वासांत,
मिठी सैलतां शिवाची
उमा तृप्त की विरक्त ?

जेव्हा एक कवी फासावर चढतो

आफ्रिकेच्या कठोर नागव्या डोंगरावर,
काळ्या-हिरव्या गच्च कुमारी रानांवर
उतरली दु:खजळांनी भरलेली आभाळे
धुवांधार पावसाची,
डोंगर-खोऱ्यांतील प्रचंड वादळ-वाऱ्याबरोबर
दिशा हंबरू लागल्या विजेच्या नद्यांच्या कल्लोळातून
कण्हणाऱ्या, वेणा देणाऱ्या
धरित्रीबरोबर
चक्कीत भरडल्या जाणाऱ्या काळाच्या
निधड्या गात्रांत-
अशा जालीम मुहूर्तावर
मृत्युंजयाचा वसा घेऊन
जन्मला एक कवी

जन्मला तो अनादी गाण्यासारखा:
कापलेल्या जिभांच्या
अगतिक कैद्यांच्या
नि:शब्द कंठांत
त्याचे गाणे गर्जू लागले,
लहरू लागले
कड्यासड्यांवर तांबडे फुटल्यावाणी,

स्वातंत्र्याच्या ललकारीसंगे
ते घुमू लागले, झुलू लागले,
जंगलांत नाचणाऱ्या पोरींच्या
हेलावत्या झग्यांच्या
मोरपिशी किनारींबरोबर,
फुंजू लागले:
यौवनविभोर स्वप्नांच्या काजळत्या छायांत,
झोपड्यांतील गवती घागऱ्यांच्या नग्न आक्रोशात,
दंडाबेड्यांच्या पोलादी खणखणाटात,
कडेकपारींतून घुमणाऱ्या घारींच्या चीत्कारांत.

तो कवी म्हणत होता:
श्यामल कातळावरून उडणाऱ्या
मुक्त पाखरांनो,
तुमच्या कंठांतील गाणे संपले तर
माझ्या गळ्यातील गाणी घेऊन जा.
अरे, सूर्यमंडळ भेदणाऱ्या संपातींनो,
तुमचे पंख जळाले तर
माझ्या शब्दांचे पंख घेऊन जा.

दचकले तुरूंगाचे रखवालदार:
पांढऱ्या पायांचे सत्तेचे संगीन ठेकेदार.
त्या भेकडांनी चढविले त्याला फासावर:
त्या बलदंड स्वराला,
काजळ–कातळ धबधब्याच्या
व्याघ्रगर्जनेला.

दोरखंडाच्या
एका हिंस्त्र हिसक्याने
कवीच्या गुदमरत्या श्वासाबरोबर
कोळसा होतो त्याच्या प्राणांचा,
त्याच्या ज्वलंत शब्दस्वरांचाही
कोळसा होतो.
तेव्हा विझलेला आभाळातला सूर्य
त्याला निखारा मागायला येतो,
कोळसाच घेऊन जातो:
काळोखात त्या कोळशातून
आभाळातला सूर्य पेटत असतो
मृत्युंजयी क्षितिजावर.

इकडे कवी फासावर चढत असतो,
तिकडे कोळशामधून,
विझलेल्या निखाऱ्यांतून
सूर्य पेटत असतो.
सूर्य पेटत असतो,
शब्द उजेडत असतो,
तेव्हा
कवी फासावर चढत असतो.

पाऊस जरि बाहिर पडतो

पाऊस जरि बाहिर पडतो
आतून कुणितरी भिजतो,
ढग काळे क्षितिजीं उठती,
ते कसे मनीं गडगडती ?
दचकून कुणितरी उठतो
पाऊस जरि बाहिर पडतो.

मेघांत विजा लखलखती,
पाकळ्या कळ्यांतुनि फुलती,
पलकांत अश्रु थरथरतो
पाऊस जरि बाहिर पडतो.

अंधार भरे झाडांत,
सावल्या फिरति हृदयांत,
अंतरीं चंद्र विरघळतो
पाऊस जरि बाहिर पडतो.

दारांत दीप लावूनी
ती उभी भिजे अंगणीं,
परि पतंग डोळां जळतो
पाऊस जरि बाहिर पडतो.

तेव्हा होतें आभाळ पायापाशीं

आपल्या पायापाशीं तेव्हा होतें आभाळ
आठवतें तुला ?
धुक्याच्या पदराने टिपलें गोरें भाळ
आठवतें तुला ?

आठवणी किती अशा:
ऊनपावसाचें फूल
कधी गालाहुनी मऊ,
कधी कड्याहुनी खोल!

गळा भरून यावा ना, तसें
धुकें दरींत, मनांत,
सय गुंफल्या बोटांची:
सोनकवडसा त्यांत.

गुलाबाच्या पाकळ्यांनी
दिशा दिशा उमलते,
अंगलगीची ती ऊब
इथे गोड ऊन होते.

आपल्या पायापाशीं तेव्हा होतें आभाळ
आठवतें तुला?
धुक्याच्या पदराने पुसलें ओलें भाळ
आठवतें तुला....

आज ऊन पडलें

आज ऊन पडलें, फुलांगी, आज ऊन पडलें:
स्वप्न सृष्टिचें सहज तुरुंबुनि निळाईत हललें.

कृष्ण घनांनी दिशा दाटल्या,
धूर-धुक्यांनी त्या घुसमटल्या,
किती दिसांनी अवघडलेल्या दिशांत हसुं उमले.
फुलांगी, आज ऊन पडलें.

निळे पारवे मेघ पांगती,
रजतरसांनी काठ झळकती,
प्रावृष नर्तनिं गौरांगाहुनि शेले ओघळले.
फुलांगी आज ऊन पडलें.

ऊन फुले फुलपंखि दिशांतुनि,
फूलपाखरें रमति फुलांतुनि,
ऊन पिउनि पावश्या गातसे: स्वर गवता फुटले.
फुलांगी, आज ऊन पडलें.

पावसांतल्या सुखांत भिजले
पंख वाळवित पंछी बसले,
ये, आपणही शेकूं तन–मन दु:ख–चिंब अपुलें.
फुलांगी, आज ऊन पडलें.

एक गुलमोहर

ढग ढग गुल्‌मोहरे
ओल्या पहाट–उन्हांत,
झाड सरींनी पेटून
अरूणावलें फुलांत.

फुले गाभुळत्या स्मितीं,
रूद्ध आसवांत जळे :
असा एक गुल्‌मोहर
माझ्या अंतरांत झुले.

आता वसंताला पुन्हा
साद नका घालूं कुणी:
खरी वाटेना राखेला
माझ्या फुलांची कहाणी.

नखचित्रें:७

आज दांडीयात्रा निघे
अंगरक्षक घेऊनी,
महात्मा ना प्रतिकार:
झालें मीठही अळणी!

रान आणि गान (चि. अभीसाठी)

वाटी ठेविली चांदीची जेव्हा आज तुझ्या ताटीं,
चंद्र हासला घरांत तुझ्या दूध–ओल्या ओठीं.

आशीर्वाद जिचे हात आई देते खीर बाळा,
फूल–पाखरांच्यासाठी सूर्य जागा ठेवी डोळा.

उगवलीं तुझ्यासाठी बघ नक्षत्रें कुंडींत,
खीर–कण वेचण्यास आल्या चिमण्या दारांत.

घास घास त्यांना देईं जाया लंघून दिगंत,
तेज नभींचे लुंचून गात येतील परत:

गाणें हिरव्या रानाचें, गाणें मातीच्या मनींचें,
गाणें चंदेरी उन्हाचें, गाणें जांभळ्या छायांचें.....

असें गाणें खीरगोड त्यांच्या कंठांत फुटेल,
पुन्हा त्यांच्या त्या गाण्यांत रान दुसरें उठेल.

नखचित्रें: ८

आषाढाचें ऊन कसें
स्मित ओठाशीं फुलतें,
हात धरून मेघाचा
हिर्व्या रानांत चालतें.

भोगी योगी

पन्नास वर्षांची आपुली सोबत:
चाललों ही वाट तेढीमेढी.

एकान्तीं, गर्दीत, फुलांत, काट्यांत
तुझी माझी साथ सदोदित.

गोळा झालीं नातीं सर्व तुझ्या ठायीं:
कान्ता–कन्यकाही मला तूंच.

भुकेस गाउली, उन्हांत साउली,
दु:खांत माउली बहिणाई.

सहचारिणी तूं, अनुरागिणी तूं,
कादंबिनी तूं तप्त जिवा.

मऊ बोटें तुझीं भाळीं थरारती,
गाणीं झंकारती रोमरंध्रीं.

अमृतवर्षी तूं कुंडलिनी जागी,
असा भोगी योगी तुजमुळे.

निरोप

जातो पाऊसकाळ हा
जड थेंबांच्या पायांनी,
सांजे कर्दळ दारांत
देते निरोप लवोनी.

परिमळे गंध देवगिरिवरी

बेदरांत मी सख्या, दुपारीं वाळवितें कस्तुरी:
परिमळे गंध देवगिरिवरी.

महालांत वारे झुळझुळती,
सदरेवरती राव दचकती,
देती फेकुनि माळा, गरजे खिडकीतुनि बाहिरी.
परिमळे गंध देवगिरिवरी.

भेटाया मी देवा गेलें,
सुवासापरी परतुनि आलें:
गालीं वाहे काजळ, उरला तुरा वाळला करीं.
परिमळे गंध देवगिरिवरी.

कुणा सांगुं ही व्यथा उरींची ?
वाळे कस्तुरि खिन्न युगाची.
हारवला अधिकारच माझा विरक्त ते अंतरीं.
परिमळे गंध देवगिरिवरी.

या हो या, एकदा मोहना,
मृगमद भाळीं लावुनि जा ना,
कस्तूरीसह तनु वाळवितें उभा जन्म बेदरीं.
परिमळे गंध देवगिरिवरी.

(बेदरात एक सावकारकन्या राहत असे. असे सांगतात की ती आपल्या गच्चीवर कस्तुरी वाळवीत असे, तेव्हा तिचा गंध देवगिरीपर्यंत पसरत असे. देवगिरीच्या एका तरूण साक्षात्कारी सरदाराने या सुगंधाचे हे रहस्य आपल्या बादशाहास सांगितले. खातरजमा करून घेण्यासाठी बादशाहाने त्या सावकारकन्येस देवगिरीस बोलावून घेतले. आपल्या कस्तुरीगंधाचे रहस्य ओळखणाऱ्या त्या तरूण, चतुर सरदारावर ती सावकारकन्या अनुरक्त झाली होती. ती लगबग देवगिरीवर आली. त्याच्यापाशी तिने आपले हृदय उघडे केले. परंतु त्या साधुपुरूषाने आपल्या साधनेसाठी तिचा मनोभंग पत्करला. ती भग्न हृदयाने बेदरास परत आली आणि त्याच्या ध्यासात आपल्या गच्चीवर कस्तुरी वाळवीत बसली. अजूनही ती तिथे बसली आहे. कस्तुरी वाळते आहे. तिचा गंध देवगिरीवर पसरत आहे. तो लावणीकार त्या कस्तुरीची कथा गात आहे. त्या लावणीची ही एक केवळ आठवण.)

शब्दांनो, तुम्ही अपंग बनू नका

मी पंगू झालो म्हणून
माझ्या शब्दांनो
तुम्ही अपंग बनू नका.

मला देह आहे म्हणून
व्याधी आहेत त्याच्या,
हात–पाय आहेत म्हणून आहेत
त्यांची दुखणी–बहाणीही.
कधी ठिसूळ चिक्कणमातीचा
तर कधी एकजीव न होणाऱ्या
तटस्थ वाळूचा
हा देह आहे
गळणारा, झडणारा,
कधी पाऊसझडीने
तर कधी
तळपत्या पेटत्या उन्हाने
असा झडतो

कणाकणांनी
क्षणाक्षणांनी
मनुष्य होऊ पाहताना दिसामासांतून,
युगायुगांतून.

परंतु अजून
मनुष्य होता आले नाही,
अंतरातला पशू मात्र
कधीतरी जागा होतो,
गुरगुरतो
पुष्पासवे पिऊन ऋतूऋतूंची,
गाभुळत्या, पिकल्या
ऊनसावल्या दिनमानाच्या.
माझ्या शब्दांनो,
तुम्हांला तर माहीतच आहे
वयच नसते शब्दांना,
देहही नसतो.
काळाची फाटकी वस्त्रे लेऊन
आघात सहन करीत
भीक मागीत
का फिरता
बाजारात मिरवणाऱ्या

पोतराजासारखे–जो
आपल्याच आसुडाचे फटके खात,
आत्मक्लेशाच्या पुरूषार्थी चौकात
थयथया नाचत सुटतो
घुंगरे झंकारीत
भेदांची, द्वेषाची, अंधश्रद्धेच्या बिदीतून!

सुदैवी आहात तुम्ही:
हातपाय नाहीत तुम्हांला
माझ्यासारखे
जे कष्टतात
पोटासाठी,
स्वार्थासाठी
अपंग होतात,
अगतिक बनतात
आपल्या अहंकाराच्या
मोहाच्या आंधळ्या गतीने.

शब्दांनो माझ्या,
स्फुरला आहात तुम्ही
आशा–आकांक्षांच्या प्राणकोषातून,
जन्मला आहात तुम्ही
अंतरीच्या सूक्ष्म नादांतून,
ध्येय–प्रेमाच्या,
त्याग–बलिदानाच्या
हृदयधडकीतून.
कधी विद्युत्भोगी
तर कधी किरणोत्सर्गी,
कधी संहारक तर कधी कल्याणकारक
किरणांमधून:
हृदयस्थ आकाशातल्या
सूर्यबिंबापासून!
तुम्ही आहात स्फुलिंग
मानवी अस्मितेचे:
आघाताने उडालेले
जन्ममरणांच्या
कालोद्भव अन् कालग्राही
अनाहत चकमकीतून!

माझ्या शब्दांनो,
तुम्ही आहात शंखनाद
अनादी प्रणवाचे,
अशान्त तरी आनंदी मुक्तात्म्याचे.
कधी होती उद्दाम विजिगीषू घोष
रणतुऱ्याचे,
कधी आलापितो करूण सूर
मारव्याचे
रंगधूसर, वेदनामंथर
सांजेचे,
कल्लोळती कोण्या क्षणी
शंखनादाचे गगनभेदी घोष
प्राणपणाने त्राहटलेले धर्मक्षेत्रात
जीवनाच्या,
पांडव-कौरवांचे भारतीय युद्ध:
एक रूपक

विश्वात चाललेल्या अनाम संघर्षाचे,
भिजलेले उत्तरेच्या आसवांत
एखाद्या गर्भार विधवा विजयरात्रीत
पांडवांच्या शिबिरातल्या.

शब्दांनो माझ्या,
तुम्ही असता निळे गाणे
पंखांतल्या अस्मानभरारीचे,
तुम्हीच असता मनस्वी प्राण
कुंकुमरंगात उजळणाऱ्या उगवतीचे,
तुम्हीच करूणेचे गर्भार जलद:
तरंगणारे दु:खघन
अनुभवनील आकाशावर.

अनुच्चरित शब्दांनो,
फुलांसारखे दिवस उगवणारे,
धारण करणारे काळाचे कारण,
हिरण्यगर्भ तुम्ही,
तुम्हीच आहांत युद्धगर्जना
शस्त्रत्याग करणाऱ्या
श्रीकृष्णाची,
तुम्हीच योगमायेचे झंकार

ज्ञानदेवीच्या मृदुमवाळ अंत:करणातले,
तुम्हीच सुरवाडता
अस्तगिरीवर अमृताकडे जाणाऱ्या
मरणाचे बोल होऊन
सांध्यरंगात निरंजनाच्या,
तुमच्यामुळेच कविता हसते फुलांत,
सविता उगवतो नभात,
अंकुरतो प्रसाद होऊन
अन्नदेवाच्या भुकेल्यांसाठी.
म्हणून म्हणतो, तुम्ही असे
अपंग बनू नका,
शब्दांनो, तुम्ही अपंग बनू नका
माझ्यासारखे.

शब्दांनो, इथे पाहा,
आपल्या अर्थस्पर्शी डोळ्यांनी
पाहा इथे:

इथे ऐक्याचे, समतेचे नालसाहेब
'दुल्हा–इुल्हा' ओरडत नाचवीत आहेत
राजबिंडे फकीर सत्तेवरले अन्
साजरा करीत आहेत
गरिबाच्या मरणाचा 'मोहरम' !
बेहोष नाचताना
देशाच्या दारिद्र्याच्या 'आलाव्या'त
पायाला लावून रोगण
परदेशातल्या गुप्त गंगाजळीतले,
बडवीत ताशे– ते तडकेपर्यंत–
समाजकल्याणाचे !
खोट्या सन्मानामागे धावून
शिणलेल्या माझ्या शब्दांनो,
आता खरवडून काढा सोनेरी रंग
त्यांच्या आणि माझ्या अंगावरचे
जे सत्य–सौंदर्याच्या नावाने,
जीवनाच्या गावाने
घोषणा देत फिरत आहेत
दिशाहीन,
मतकऱ्यांच्या विटकरी वेशी ओलांडीत,
रसिकतेची सोललेली त्वचा पांघरून,

चोपडून रंग समीक्षेचे
गहन अन्वेषणी
नाचतात तीन दिवस
संमेलनाच्या रिंगणात
साहित्यिक ठरावांच्या
कागदी ताबुतापुढे
वाङ्.मयातले वाघ बनून.
अशा वेळी
शब्दांनो, तुम्ही अपंग होऊ नका,
मी पंगू झालो म्हणून,
माझ्या शब्दांनो,
तुम्ही अपंग होऊ नका,
नका रे, तुम्ही अपंग बनू नका
अशा काळी, अशा ठायी!

माझें काव्यशास्त्र

कधी उगी खरडतां
उभे मागे, आसपास
असतें जें लिहायचें
अनुभूतीपणे त्याचे
स्पर्शतात मला श्वास.
चौदा ब्रम्हांडें ओविलीं
एका गाण्याच्या धाग्यांत,
अनंत या आभाळाला
माझ्या बारीची चौकट.

१९८७ साली औरंगाबाद मुक्कामी आपले जेष्ठ पुत्र श्री. रविंद्र कांत यांच्या निवासासमोर
कविवर्य कांत

कविवर्य कांतांच्या नावे मालाड (प.) मुंबई येथे असलेला चौक
छायाचित्रात - श्री. मु. वा. कांत, सौ. दिप्ती मु. कांत व चि. अभिषेक मु. कांत

बगळ्यांची माळ
(भावगीत संग्रह)

बगळ्यांची माळः

मराठी वांड्.मयात भावगीत या हृदयस्पर्शी काव्यप्रकारात अनेक दिग्गज कवींनी आपल्या प्रतिभेचे श्रेयदान देवून या काव्यप्रकारास नवी ओळख, नवी अस्मिता देवून प्रगल्भ केलं आहे, श्रीमंत केलं आहे. अशा प्रतिथयश भावगीतकारांमध्ये कवी कांतांचा वाटा तसा चमचाभरच, पण हा चमचा तुपासाखरेचा ठरला. कांतांची मोजून पाच–सहा भावगीतंच तबकडीवर मुद्रीत झाली आहेत पण ती सर्वच्या सर्व आजही –कांत इहलोक सोडून गेले त्याला आता पंचवीस वर्षे होवून गेली तरिही– लोकप्रिय झाली आहेत. ती अनुक्रमे–

१. सखि शेजारीणी तूं हंसत रहा –गायक अरूण दाते
२. त्या तरूतळी विसरले गीत – गायक स्व. सुधीर फडके
३. आज राणी पूर्विची ती प्रीत तूं मागू नको– गायक स्व. सुधीर फडके
४. बगळ्यांची माळ फुले अजूनी अंबरात– गायक स्व.पं. वसंतराव देशपांडे
५. राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे– गायक स्व.पं. वसंतराव देशपांडे
६. झुळूक आणखी एक आणखी एक पान गळले – गायक श्रीधर फडके
७. खळेना घडीभरही बरसात– गायीका पुष्पा पागधरे
८. साजणी आज गात असे रात – गायक मंदार आपटे, संगीतः कमलेश भडकमकर

वरील भावगीतांशिवाय आकाशवाणी वरील भावसरगम या "भावगीत स्पेशल" कार्यक्रमात कुंदा बोकील, सुधा मल्होत्रा, महेंद्रकपूर यांनी कांतांची भावगीतं त्या काळी अजरामर केली आहेत. दुर्दैवानं आकाशवाणीवरील सादर झालेली भावगीतं–नाट्यकाव्य आकाशवाणीच्या दूर्लक्षीत कारभारामुळे नामशेष झाली आहेत. साधी "स्वर–फित" पण या सरकारी दफ्तरी जतन करून ठेवण्यात आली नाही हे दुर्दैव.

"बगळ्यांची माळ फुले अजूनी अंबरात" हे स्व. पं.वसंतराव देशपांडे यांनी गायलेलं व आमच्या स्व. खळेकाकांनी संगीतबद्ध केलेलं भावगीत आज चाळीस पंचेचाळीस वर्षानंतरही अजरामर ठरले आहे. कांतांच्या साठ वर्षांच्या काव्यनिर्मिती काळातील काही निवडक भावगीतं वेचून फक्त त्यांचाच एक भावगीत संग्रह छापावा या प्रेरणेनं मी प्रस्तुत संग्रहात कांतांची एकुण ६३ भावगीतांचं संकलन केलं आहे. कुठल्याही संगीतकाराने मनात आणले तर त्याच्या संगीताबरोबर या भावगीतांमधील अर्थवाही भावनाप्रधान शब्दही अमर होवून जातील. कांतांची ग्येय अन् शब्दमधूर कविता "बगळ्यांची माळ" मध्ये एकत्रीतपणे वाचायला मिळते.

खळेना घडिभरही बरसात

खळेना घडिभरही बरसात
दिवस संपला नागिण काळी उतरे सळसळ रात

नक्षत्रांसह दिशा लोपल्या
वाटा अंधाराने गिळिल्या
असेल कोठे सखा ? पाउले वाजति परि थेंबात

गडगडणे थांबवा घनांनो,
कडकडणे आवरा विजांनो,
बायांनो, का तुम्हाहि न कळे स्त्री हृदयाची मात

असेल आला पैल तटावर
येऊ द्या गं त्याला इथवर
संथ वहा ग सरिते तूही येतो माझा नाथ
खळेना घडिभरही बरसात

अंगणी जाई टपटपती

अंगणी जाई टपटपती बाइ ग जाई टपटपती
मंद सुगंधी पदरव त्याचे हृदयी या उठती
अंगणी जाई टपटपती

माथ्यावर हे वेल डंवरले
जणु हिरवे आकाश पसरले
इवली इवली शुभ्र फुले ही नक्षत्रे ढळती
बाइ ग जाई टपटपती

स्मृतिस हरवल्या पाने फुटली
नि:श्वासांची फुले जाहली
परि न सोसवे गंधभार त्यां अगतिक उन्मळती
बाइ ग जाई टपटपती

लतामंडपी व्यथा पालवे
कळ्यांत फुलल्या शब्द हारवे
मरणवेलिवर कोटिजन्म या फुलांपरी फुलती
बाइ ग जाई टपटपती

देऊ नको रे

तू देऊ नको रे तरूणा हृदय कुणाला
भरला ना कधीही इथे कुणाला प्याला

लुटविती फुले ही गंध हृदयिचा सारा
नभ नक्षत्रांचा उधळी दिव्य पसारा
पोचे न साद परि हृदयाची हृदयाला

हे पंतग सारे ज्योती भवती फिरती
घेती न झेप ते वाती विझल्यावरती
आसवेहि होती गोठुनि मेण तळाला

चांदणे सकाळी नयनीचे मावळते
जरि कलावतीचे गाणे ओठी फुलते
त्या स्वरांतुनि शर विंधिति लुब्ध मृगाला

संपताच नाटक रंग मुखीचे पुसती
वाहशी हृदय का नटव्या चरणावरती
राहु दे जवळ ते एकांती रडण्याला

शेजारिणि, तू हसत रहा!

सखि शेजारिणि, तू हसत रहा
हास्यात पळे गुंफीत रहा

दीर्घ बदामी श्यामल डोळे
एक सांद्रघनस्वप्न पसरले
'धूपछांव' मधि यौवन खेळे
तू जीवनस्वप्ने रचित रहा
सखि शेजारिणि, तू हसत रहा

सहज मधुर तू हसता वळुनी
स्मित-किरणी धरि क्षितिज तोलुनी
विषाद मनिचा जाय उजळुनी
तू वीज खिन्न घनि लवत रहा
सखि शेजारिणि, तू हसत रहा

मूक जिथे स्वरगीत होतसे
हास्य मधुर तव तिथे स्फुरतसे
जीवन नाचत गात येतसे
स्मित–चाळ त्यास बांधून पहा
सखि शेजारिणि, तू हसत रहा

वेदनेला सूर दे

राजसा ये ना तुला हें गीत माझे वाहतें
वेदनेला सूर दे रे वाट तूझी पाहतें

हें फुलांचें हास्य नेत्री आज पाणी आणितें
अेकट्या शय्येवरी अन् चांदणेंही पोळतें

प्रीतीचा तो बोल अैसा सोडिला अर्धाच का ?
गीत प्रीतीचें जगी अर्धेच का रे राहतें ?

रात्र ढळली चंद्र माझ्या अश्रुच्या काठी बुडे
मीलनाचें स्वप्न जाग्या लोचनांशी संपते

राजसा ये ना तुला हें गीत माझे वाहतें
वेदनेला सूर दे रे वाट तूझी पाहतें

फांद्यांना फुटले सुर रे

फांद्या फांद्यांना फुटले सुर रे
परि मनि कामुनि हुरहूर रे

वनि फागुन फगवा खेळे
पळसांतुनि केशर उधळे
भिजे ढगांत राधा दूर रे
फांद्या फांद्यांना फुटले सुर रे

तृण मन हे नाचे सगळे
मी चाळ बांधुनी सजले
तुझविणा मुके घुंगुर रे
फांद्या फांद्यांना फुटले सुर रे

तू मी जोडीची पाखरं
ये गाऊ ये घडिभर
चांदणे उन्हात टिपूर रे
फांद्या फांद्यांना फुटले सुर रे

चांदणे ओले तुझ्या का ?

बोल ना फार दिसांनी चार डोळे भेटले
चांदणे ओले तुझ्या का पापणीशी जाहले

स्तब्ध होता काठ, पाणी, गगनही भारावले
झाड डोही आठवांच्या पुष्पभारे वाकले

कालवे पानांत त्याच्या हासणे कुठल्या उन्हाचे
मखमली रात्रीतले का स्वप्न ते नक्षत्रले

पाहशी दचकोनि का गे वाजला वारा वनी
शब्द मोहर जाळणारा हे ऋतू ना बोलले

शुभ्र कलिका मोगरीच्या जांभळी रसभोर द्राक्षे
दिवसरात्री कमलपत्री भोगिले ना भोगिले

सोबतीला गीत माझे

अेकला मी सोबतीला गीत माझे चालते
सावलीही ज्या क्षणाला साथ माझी सोडते.

येथवर आलीस दैवे, खूप हे झाले मला
आज येती आसवांचे चंद्र संगे हासते

अंबरीचा सूर्य तापे, धूळ ही तापे पथी
पळसपुष्पांची डहाळी अेक रानी बाहते.

पांढरा संन्यस्त चाफा गाळितो पाने अुभा
जीवनी निष्पर्ण त्याच्या फूलपण हे जागते

पंथ फुटती पावलांना वाट जेथे खुंटते
सूर्य विझते चेतवाया सूर माझे पेटते.

अेकला मी सोबतीला गीत माझे चालते
सावलीही ज्या क्षणाला साथ माझी सोडते.

ओळ अनोखी

कोण तू आलीस अवचित घरी
ओळ अनोखी कधि कवितेची रूमझुम ओठावरी

उरात दिवसा माळ पेटते
रात्रि रेघ वणव्याची फिरते
सांद्र सावली सर अवकाळी लवलिस जळबावरी
कोण तू आलीस अवचित घरी

कोवळीक विसरली फुलांची
स्मरे न शीतलता चंद्राची
उदास बघतो, फुले वाहतो चांद उंबऱ्यावरी
कोण तू आलीस अवचित घरी

सहज विजेच्या काड्या वेचुनी
बांधिल खोपा प्रलयाघनांतुनि
असे विलक्षण घुमे पाखरू तुझिया डोळा तरी
कोण तू आलीस अवचित घरी

बगळ्यांची माळ फुले

बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात
भेट आपुली स्मरशी काय तू मनात

छेडिति पानांत बीन थेंब पावसाचे
ओल्या रानात खुले ऊन अभ्रकाचे
मनकवडा घन घुमतो दूर डोंगरांत
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात

त्या गाठी, त्या गोष्टी नारळिच्या खाली
पौर्णिमाच तव नयनी भरदिवसा झाली
रिमझिमते अमृत ते विकल अंतरात
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात

हातांसह सोन्याची सांज गुंफताना
बगळ्यांचे शुभ्र कळे मिळुनि मोजताना
कमळापरि मिटति दिवस उमलुनी तळ्यात
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात

तू गेलिस तोडुनि ती माळ, सर्व धागे
फडफडणे पंखांचे शुभ्र उरे मागे
सलते ती तडफड का कधि तुझ्या उरात
बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात

गातें कोण मनांत ?

गातें कोण मनांत,
कळेना, गाते कोण मनांत ?

जरी शतावधि कविता लिहिल्या
शंभरदा वाचिल्या गायिल्या
शब्द कुणाचा, सूर कुणाचा ? अजुनि मला अज्ञात

पुशिले त्याचे नाव फुलाला
गाव तयाचे उषे-निशेला
मिचकावुनि कुणि डोळा जातो, काळ्याभोर जळांत

अभिमानाने कधीं दाटतां
'रचिलें मी हे गाणे' म्हणता
'गीतच रचिते नित्य तुला रे', फुटे शब्द हृदयांत
कळेना, गातें कोण मनांत ?

कणकण माझ्या तनुचा

कणकण माझ्या तनुचा मिरवी या मातीची द्वाही
मनात माझ्या आभाळाची गाते नित्य निळाई

मी या पात्यातून वाढतो
फुलाफुलांतुन मीच हासतो
सूरच माझा नद्या झऱ्यातुनि झुळझुळ वाहत जाई-

स्वप्ने माझी उषा पाहते
सागरात मम हृदय गर्जते
हाळी द्याया सूर्य मला ये तुडवित डोंगर राई

समुद्रवसना हिमकिरीटिनी
भारत भूमी माझी जननी
खडे पसरीले माणिक मोती, होती तिचिया पायी
कणकण माझ्या तनुचा मिरवी या मातीची द्वाही

कळ्या फुलांचे झुरती डोळे

कळ्या फुलांचे झुरती डोळे तुला पाहण्यासाठी
नक्षत्रांचे नेत्र जागती तुला शोधण्यासाठी

दिनरात्रीचे पडदे सारूनि
तुला शोधिले सुरासुरांतुनि
किती जन्म ओलांडुनि आले, पडल्या नाही गाठी
कळ्या फुलांचे झुरती डोळे तुला पाहण्यासाठी

झुळ झुळ रात्री झरा वाहतो तुझ्या बासरी पाठी
अताच इथुनि गेला म्हणते रंग मळ्यांची दाटी
फुला फुलाला नाव विचारित
निळ्या जळाला ठाव विचारित
फिरली हरिणी, बसली थकुनी आपुल्या काजळकाठी
कळ्या फुलांचे झुरती डोळे तुला पाहण्यासाठी

सांग माधवा, किती दूर तू या डोळ्यांपासोनी
घुसमटणारे श्वास तुला हे आणितील ओढोनी
कशास अंती परि माझ्यावर
पांघुरविशि हा हरि, पितांबर ?
हंसतील गोपी या कुब्जेला वळवुनि गोऱ्या पाठी
कळ्या फुलांचे डोळे झुरती तुला पाहण्यासाठी

स्वप्नांत मी तुझ्या रे

ती : स्वप्नांत मी तुझ्या रे, येऊन रोज जाते
तो : असतील पाय थकले, देऊ चुरून का ते ?

तो : स्वप्नांतल्या जगाच्या वाटाच लांब लांब,
संपून स्वप्नवाटा अन् पाहणें रहाते.

ती : तुज निष्ठुरा प्रवास कळतो न वेदनांचा
मी अश्रुच्या खुणाही मार्गी पुसून जातें.

तो : हाती न दान येई स्वप्नांत तुं दिलेले,
निथळून चांदण्याचे नभ कोरडें रहातें.

ती : अदृश्य पुष्पगंध नाही फुलानिराळा,
समजून घे सख्या रे या मर्मबंधनातें.

तो : प्रेमांत का मिळावा मज गाव वेदनेचा ?
ती : रात्रीमधी अशा या जखमांस फूल येतें.

ती : स्वप्नांत मी तुझ्या रे, येऊन रोज जाते
तो : असतील पाय थकले, देऊ चुरून का ते ?

तुला झोपेंत हसूं आलें

एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेत हसूं आलें.
सांगे शहारा पऱ्यांच्या देशी नीज–लतेला फूल आलें

शांत झांकले टपोर डोळे
ओठ हासरे चुंबन–ओले
गोरट्या भाळीं कुरळ गालीं माझ्या नि:श्वासें मंद हाले
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

चंद्र पेंगतो स्तब्ध झाडांत
रात्र जांभळी पिके दर्यांत
हे वारेही नीडबावरे पानापानांत दुखरे झाले
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

मिठींत साऱ्या विरून व्यथा
उरल्या चंद्रा–अमृताच्या कथा
अर्ध्या रात्री शिणल्या गात्रीं सुखऽदु:ख फुला आलें
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

कशी स्मिताची चांदणी वाट
इथे रात्रीला नसतो काठ
या वाटेने दु:ख जागचें युगानुयुगें चालत गेलें
एका रात्रींत माझ्या बाहूंत तुला झोपेंत हसूं आलें

तुज कळले का रे .....

तुज कळले का रे मी आल्यें
प्राजक्तापरि भाव लाजरे तुझ्या पथांत गळाले

घरास येतां गमलें तुझिया
फुलें अश्रुंची होतिल राया,
कोप शाप अपमान बांधुनी पदरीं इथवर आल्यें

झुरत्या श्यामल श्रावणसरिपरि
क्षितिजि फुंदत्या फूलउन्हापरि
आलें, गेलें, परि तव चाफा ना बोले, ना हाले

मृगनाभीचें सुगंध स्पंदन
तारांचे घेऊनि जागरण
दारिं ठाकलें उषा बनोनी, निशा करपुनी झाल्यें

विस्मृत वचनें अधरिं कापती
धडधडत्या उरिं गाणीं पिचती
फुलांत सौरभ धूप होउनी पवनीं जळत उफाळे

फिरतां पुलिनीं उन्हांत कवळ्या
मिळल्या अपुल्या क्षणिक सावल्या
मीलनस्मृति ती मनिं साठवुनी तुडवित जन्म निघाल्यें

उभी मी सदनिं दीप लावुनी

उभी मी सदनिं दीप लावुनी
सख्या रे, सदनिं दीप लावुनी
उठुनि फुलांतुनि ये जवसाच्या रात निळी रंगुनी

प्रभा नितळ सदनांत पसरतां
अंगणांत, तिमिरांत सांडतां
ये मुसमुसुनी जीर्ण रात्रिच्या यौवन गात्रांतुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

निंब बहरला मोहर गळतो
सुवासांत आपुल्या झुरे तो
बनुनि सुगंधित श्यामल क्षण हे भ्रमती शून्यांतुनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

दूर दूर या समयिं कुठे तरि
आठवीत असशील तूं घरी
जवसांच्या पुष्पांत राहिलें निशागीत विसरूनी
उभी मी सदनिं दीप लावुनी

कातरवेळी रोज या क्षणीं
दीप लावितां अपुल्या सदनीं
उजळायाचा दीप तुझ्या घरिं आठवतें मी मनीं
उभी मी सदनिं दीप लावुनी

विझव दीप साजणी

विझव दीप साजणी
मम सदनांतिल तव नयनांतिल ज्योति टाक फुंकुनी

तुझ्या उरींची चंदनलतिका झुरते मम अंतरी
स्पर्शाचा मम मोहर फुलतो तुझिया अंगावरी
या स्पर्शाचे, या लतिकेचे बहर टाक जाळुनी
विझव दीप साजणी

माझ्या मनिंचे निळें कबूतर घुमतें तुझिया घरी
घरटे बांधी माझ्या नयनीं तव चिमणी लाजरी
या चिमणीचे, या घरट्याचे पंख टाक उपटुनी
विझव दीप साजणी

माझ्या घरची वाट रेशमी तुझ्या घरा जोडिते
तुझ्या घराची खिडकी माझ्या दाराशी बोलते
या वाटेचे, या खिडकीचे पाश टाक कापुनी
विझव दीप साजणी

मम दु:खाची श्रावणसर तव अंगणांत बरसते
उंबऱ्यात मम ऊन बसंती प्रिये, तुझें हासतें
या दिवसाची, ऋतुचक्राची गति टाक मोडुनी
विझव दीप साजणी

आरसा हा नको नेऊं

आरसा हा नको नेऊं

ठेव जिंदगी गहाण
सुखें घेई पंचप्राण
मागूं नको भिंग पण
क्षण बिलोरी सुखाचा एवढा हा नको नेऊं

दिसां हास्याच्या धुळीत
रात्रीं अश्रूंच्या धगींत
स्वातीविण पापण्यांत
जपलेला दिठीतिल माझा मोती नको घेऊं

पहिली ती भेट–प्रीत
बिंबली या दर्पणांत
तिच्या फुलून स्मितांत
काठीं रात्रींच्या तरंगे तोच क्षण मेघमऊ

देत जांभई हसत
उभी केस विंचरीत
काया पुनवेची श्रांत
कलणाऱ्या चांदण्यांत पिके हुरमुजी गहू

सखीविण आरशांत
आज पुनवते रात
हसूं फुटे कुंतलांत
प्रतिबिंबीं जगण्याचे माझें वेड नको नेऊं

प्रीत तूं मागूं नको

आज राणी, पूर्विची ती प्रीत तूं मांगू नको,
कालचे वेड्या फुलांचे रंग तूं मांगू नको.

सांज–धूसर पानजाळी, चौभुजांच्या चांद्रधारा,
थिरकला हा जन्म सारा, ये नभालाही शहारा,
त्या तनूचा सोनियाचा गंध तूं मागूं नको.

हर्ष माझे, स्पर्श तुझे: पाकळ्यांचे शब्द झाले,
वाजती गात्रीं सतारी, सूर ओठांतून आले,
त्या स्वरांचे, त्या क्षणांचें गीत तूं मागूं नको.

उघडती डोळे फुलांचे लोचनें मिटतां पहाटे,
ऊन कवळें केवड्यांचे त्यांत स्वप्नांतील दाटें,
त्या उन्हांतिल मीलनाचें स्वप्न तूं मागूं नको.

रोखुनी पलकांत पाणी घाव सारे साहतांना
अन् सुखाच्या आसवांचें मीठ डोळां साचतांना,
राजहंसी, मोतियाचा घास तूं मागूं नको.

बोल हलके बोल: श्वासें चांदणे डहुळेल ना?
ऊर उलतो, उमलतांना सुखहि सोसेना फुलांना,
नित नवी मरणें मराया जन्म तूं मागूं नको,
आज राणी पूर्विची ती प्रीत तू मागूं नको.

मोगरा फुलेतों थांब

जिवलगा, थांब मोगरा फुलेतों थांब

उद्यां पाकळ्या साऱ्या फुलतिल
साद जिवाला सुगंध घालिल
डोळे उघडुनि अंगण पाहिल
मधुमास हंसेतों थांब, मोगरा फुलेंतो थांब

पानांआडुनि गाइं कोकिळा
नभ नभाचा उर गंहिवरला
माझ्याहि उरिं कांटा फुलला
कोकिळा गाइंतो थांब, मोगरा फुलेतों थांब

मध्य रात्रिचें मदिर चांदणे
स्पर्शुनि करितें जादू टोणे
जीव घाबरे हा स्वप्नानें
चंद्रमा बुडेतों थांब, मोगरा फुलेतों थांब

बघ, अवकाळी घन गडगडती
गंध मातिचे वादळ उठविति
विजा चांदण्यामधिं चमचमती
सर पडुनि जाइंतो थांब, मोगरा फुलेतों थांब

प्रवास अवघड, पंथ दूरचा
अरूण उद्यांचा लोळ अग्निचा
क्षण कुसुमित कर विश्रांतीचा
ये घाम पुसेतों थांब, मोगरा फुलेतों थांब, जिवलगा थांब

एकलेंच हे फुला, गळायचें

एकलेंच, एकलेंच हे फुला, गळायचें,
एकलेंच सुख न काय भोगिलें फुलायचे ?

दे प्रकाश नभ वरूनी,
ओल लळे हीं धरणी:
या ऋणांत नसत्याच्या कुठवरी बुडायचे ?

गंध निघे दिशदिशांस,
ओस पाकळ्या उदास,
डोंगरात सूर्याचें फूलही झुकायचे.

पान-फुलें गळल्यावर,
सौंदर्यच ढळल्यावर
का शाश्वत सत्याचें झाड-खोड व्हायचें ?

तोलित देठीं पहाट
नवकलिका उमलतात,
तूं मिटून मातीचे सांजगीत गायचें
एकलेंच, एकलेंच हे फुला, गळायचें.

सूर तूं गीतास द्यावा

गीत देतें मी तुला रे, सूर तूं गीतास द्यावा,
रात्र होतां या तमाला, चांदण्याचा स्पर्श द्यावा.

चालतां वाटांमधोनी, हृदय जेव्हा फाटतें हें
तूं सुवासाचा फुला रे, हासरा विश्वास द्यावा.

वेदनेचें करूनि आळें, रोप दारीं लावियेलें,
मांडवाला गगन द्यावें, तारकांचा बहर द्यावा.

दूरदेशीं मोजतांना, क्षण वियोगाचे कुठे मी
मेघ तूं होवोनि अंतीं, आसवाचा थेंब द्यावा.

सख्या, कां गायिलेंस तें गान

सख्या, कां गायिलेंस तें गान ?
असह्य होतो विद्ध जिवा या तुझ्या स्वराचा ताण

सभेमधी तूं गीत गाइलें
सगळ्यांपरि तें मीं ऐकियलें
वीज शरीरीं शिरली कसली ? कां गळलें रे भान ?
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

सभा डोलली तुझ्या गायनीं
धरा उचलिशी तूं शब्दांनी
मज एकाकिनि केलं कां परि जळिं कमळाचें पान
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

शब्द मधुर तव वातावरणीं
येती सांगत भावकहाणी
विसरें मीही तनुमन सारें, रोमांचांची आण
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

पदर गळाला कसा आठवूं
थरथरत्या उरि कसें साठवूं ?
तृषित तटां स्पर्शून सागरा, परते तुझें उधाण
सख्या, कां गायिलेंस तें गान ?

संपवुनीं तूं कविता जाशिल
कीर्तिफुलांचे गेंद झेलशिल
हेहि सवें ने, उपसुनि देतें मम हृदयांतील बाण
सख्या कां गायिलेंस तें गान ?

एकवार आज फिरूनि मेघ

एकवार आज फिरूनि मेघ भरूनि आले,
ऊनपावसांत प्राण पापणींत न्हाले.

हरवले धुक्यांत ताड,
भान विसरले पहाड,
ऐकुनिया हाक गगन मोरपिसें झालें.

थर–थरकत ये वारा,
रिमझिमती जलधारा:
धारांतुनि तृप्त सूर धरणिचे मिळाले.

रान चिंब, ऊन चिंब,
पक्ष्यांचे पंख चिंब,
चिंबपणीं शब्द नभीं बनुनि खग उडाले.

कां कळेना आज ?

कां कळेना आज माझे प्राण गाती,
सूर कां त्या संपल्या शब्दां बहाती ?

बोललों जे शब्द सारे दु:ख झाले,
फूलशी सोशीक मौनें हासताती.

केशराच्या या सकाळी कां प्रकाशे,
मावळे तारांसवें जो अर्थ रातीं.

तूं दिलें मज प्रीतिचें हें दु:ख ऐसे,
वेदनाही त्या कळ्यांनी डोलताती.

वेच हलके वेच बकुळीची फूलें ही,
हृदय बघ येईल चुकुनी त्यांत हाती.

किति युगे चालतो

किति युगे चालतो किती योजने जाणे
ठाअूक अेवढे जाणे याच पथाने

कोठून निघालो नीट आठवत नाही
जायचे कुठे ते स्मरे न पुरते काही
थरथरली कधि ही वाट तुझ्या स्पर्शाने
ठाअूक अेवढे जाणे याच पथाने.

वाटेवर छाया स्नेहमया या झुलती
स्वप्निचे बोल ते तरूवेलींतुनि फुलती
लिहितात कवडसे उन्हा–मनाचे गाणे
टाअूक अेवढे जाणे याच पथाने.

भुरभुरे कुरळ फडफडे पदर वाऱ्यात
हसताच फुलांचा सडा पडे घाटात
भाळावर मोती चमचमतात अुन्हाने
ठाअूक अेवढे जाणे याच पथाने.

तव कटाक्षापरि तिरपी वळता वाट
घर अुभे दिसे मज दूर तुझ्या नयनात
घे, थकलो आता, सावरून हाताने
टाअूक अेवढे जाणे याच पथाने.

श्रावण झुलला ग

श्रावण झुलला ग श्रावण खुलला
भर उन्हात पाऊस वळला ग

धारा सरसर श्याम तळ्यावर
पाण्यावर पाण्याची चादर
गर्भरेशमी उडते सुंदर
केवडा झडीमधि पिवळा ग
श्रावण हसला.

हिरवी राने लांब पसरली
त्यावर केशर सांज उतरली
शुभ्र पाखरे त्यात उमलली
कवडसा मनामधी हलला ग
श्रावण फुलला

नक्षत्रांच्या जळती ज्योती
ओले डोळे वाट पाहती
धुंद उदवल्या काळ्या रात्री
गंध उरामधी भरला ग
श्रावण भुलला

पुष्कराजस्मितें

फूल मेंदीनं धरिलं
सखे, फिरूनी अंगणीं
तम मोहरे सगंध
गूढ हास्याच्या तुऱ्यांनी

वाके दिशा घनभारें
भेटे धरा आकाशाला
उघडिला मृत्तिकेंत
लाख नक्षत्रांनी डोळा

गंध मातीचा मादक
येई निर्लेप गगना
स्मरे तुज पाहिलेलें
खिडकींत हासतांना

–आणि आज शोधितों मी
इथे खिन्न अंधारांत
तुझी पुष्कराजस्मितें
मुद्रिकेंतल्या खड्यांत.

माझ्या डहाळीला

माझ्या डहाळीला कांहीतरि फुलतंय ग:
कां ग कोंभांत फूलपण सलतंय ग ?

येतो मातीचा खमंग वास,
उतूं उन्हांत ये उल्हास.
कुणि सूर्याचं बी कुठं पेरतंय ग.

तरू वादळांत खडखडती,
मेघांत विजा कडकडती,
जमिनीत खोल कांहि उलतंय ग.

ओठांशी शब्द थरारे,
घुंगरू तनुंत झंकारे,
गाणं मनांत कसं रूमझुमतंय ग.

धिमकिटि धिम घुमत मृदंग,
स्वरतात नसांत तरंग,
पैंजणीं मरणभय सरतंय ग,
माझ्या डहाळीला कांहीतरि फुलतंय ग.

हासशी कशाला ?

डोळ्याच्या डोळ्यांत हासशी कशाला ?

रूळे पाठीवर मुक्त केशभार
काळा धबधबा धुंद धुवाँधार
कोसळले धारेत ? वळून पाहशी कशाला ?

वेणीत फुले माळून आलीस
ओठीचे शब्द खुडून गेलीस
अनाहत नाद ओसाड मनात ठेविशी कशाला ?

सोनेरी स्पर्शाच्या रानात आलेले
राघु मुशाफिर हरवून गेले
दूरच्या गावचे पापणीत दिवे लाविशी कशाला ?
डोळ्याच्या डोळ्यात हासशी कशाला ?

राहिले ओठातल्या ओठात

राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे
भेट होती आपुली का ती खरी की स्वप्न माझे

कापरे ते हात हाती बावरे डोळ्यात आसू
आग पाण्यातून पेटे जाळणारे गोड हासू
दोन थेंबाच्या क्षणांचे प्रीतिचे तकदीर माझे

गर्द हिरवे पाचपाणी रक्त कमळें कुंकुमाचीं
खेळतांना बिंबलेली शुभ्र जोडी सारसांची
आठवे–म्हटलेस ना तू हे हवेसे विश्व माझे

मी म्हणु कैसे फुला रे, आज तू नाहीस येथे
वेल दारी सायलीची रोज अजुनी बार देते
लाख पुष्पे तोडल्याविण–ये भरोनि पात्र माझे

शिशिरगान

हलके हलके हसतें गळतें तरूचें पान न् पान
बाई, तरूचें पान न् पान
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

हिवांत रानें पिवळी पडली
उषा धुक्यामधि ही काकडली
ओठच उलले संध्यालाली
नक्षत्रांची रात शहारे गारव्यांत हैराण
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

पर्णहीन तरूशाखा हलती
कृश विरही बाहूच पसरती
आतुर आलिंगना कांपती
स्मरूनि विरहिणी महाल मिठिचा विकल पाखडी प्राण
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

थंडगार किति पवन झोंबतो
उन्हाच्याहि उरिं काटा उठतो
पानफुलांचा बहर झडपतो
गळेल वाटे चांदण्यात हें निळें नभाचें पान
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

फुले जळालीं पानें गळलीं
फळांत जरि रसधार गोठली
सर्व सृष्टि जरि हिमें करपली
पिवळ्या पानांच्या मनिं फुलतें वसंतस्वप्न महान्
पानझडिंत या ऐकुन घ्या ग शिशिरऋतूचं गान
बाई, शिशिरऋतूचं गान

आणखी एक पान गळलें

झुळुक आणखी एक–आणखी एक पान गळलें

पानीं फुलला सुमनिं बहरला
माझ्या अंगणिं जरि तरू वठला
शुष्क डहाळिंत अंग मोडिती कोंभ नवे इवले
आणखी एक पान गळलें

चंद्रकोर अंगांगीं भरली
दिनदिन कणकण उजळुन खिरली
परि अवसेच्या प्रभांत–ओटिंत सूर्यबिंब भरलें
आणखी एक पान गळलें

चरण एक गीताचे सरले
स्वर अवसानीं शांत जाहले
त्या मौनांतुनि पुढिल चरण परि झंकारा सजलें
आणखी एक पान गळलें

खुशाल गळतां, गळा दळांनो
हसत सरा माझिया क्षणांनो
बघे क्षणांच्या पानझडिंत मी अक्षयपण उमले
आणखी एक पान गळलें

खुलून गाइ

एकदा खुलून गाइ गीत वसंताचे
सांचे जरि तव नसात बर्फ हिवाळ्याचे

पानफूल हे गळूं दे
चंद्र नभीचा ढळूं दे
क्षितीजी अम्लान पान उमलते उषेचे

शब्द गोठले फुटले
सूर कालचे विटले
स्वर मंजूळ फांद्यांना फुटती कोकिळांचे

जोंवरती हसती फुले
गाती मधूर पक्षिकुले
बघ वसंत फुले त्यात मधूर जीवनाचे

येशील तू म्हणोनी

मी वाट पाहताहे येशील तू म्हणोनी
देहात प्राण जागे येशील तू म्हणोनी.

सांजेस शांत स्निग्ध लागे दिवा नभात
शपथेतला सुगंध दाटून ये फुलांत
सानंद नीर धावे–धावे पुढे हसोनी.
मी वाट पाहताहे

'जा संपलेच सारे' रागात बोललीस
वेणीही मोगरीची त्या रात्री फेकिलीस
परि वीज पाठमोरी पडलीस कोसळोनी
मी वाट पाहताहे

अभिमान जाळिताहे कां प्रीतिच्या फुलाला
डोळे मूके दवांचे पुसतात या उन्हाला
माझा गुन्हा सखे तो आला न मज कळोनी.
मी वाट पाहताहे

छाया तुझ्या स्मिताची मी पाहतो फूलांत
निथळे नि अंगकांती या धूंद चांदण्यात
ये उर्वशीपरी ये या सायली मधोनी.
मी वाट पाहताहे

त्या तरूतळी विसरलें गीत

त्या तरूतळी विसरलें गीत
हृदय रिकामे घेऊनि फिरतो इथे तिथे टेकीत

मुक्या मना मग भार भावना
स्वरांतुनी चमकते वेदना
तप्त रणे तुडवीत हिंडतो, ती छाया आठवीत
त्या तरूतळी विसरलें गीत

विशाल तरू तरि फांदी लवली
थंडगार घनगर्द साउली
मनिंची अस्फुट स्मिते झळकती, तसे कवडसे तींत
त्या तरूतळी विसरलें गीत

हिरवळ–तृप्तिच जशी पसरली
फुले अनामिक त्यात विकसली
निळेभोर अव्याज गगन वर, हंसते ढग पिंजीत
त्या तरूतळी विसरलें गीत

जवळ टेकडिंत झरा झाकला
कसातरी वाहतो खळखळा
निकट जिवाची पुरति न कळली, जशी संभ्रमित प्रीत
त्या तरूतळी विसरलें गीत

मदालसा तरूवरी रेलुनी
वाट बघे सखि अधिर लोचनी
पानजाळि सळसळे वळे ती, मथित हृदय कवळीत
त्या तरूतळी विसरलें गीत

पदर ढळे कचपाश भुरभुरे
नव्या उभारिंत ऊर थरथरे
अधरीं अमृत उतूं जाय परि, पदरी हृदय व्यथीत
त्या तरूतळी विसरलें गीत

उभी उभी ती तरूतळिं शिणली
भ्रमणी मम तनु थकली गळली
एक गीत–परि चरण विखुरले द्विधा हृदय–संगीत
त्या तरूतळी विसरलें गीत

मज माझाहि न अधिकार

मज माझाहि न अधिकार
असुनी मी स्वामिनी भिकेस्तव बंद तुझें मज दार

जनवनिंचे मी जाळ विझवितें
स्वयंचंद्रिका अमृत वर्षतें
परि जळतें तव हृदय पाहणें शाप मला अनिवार
मज माझाहि न अधिकार

वागीश्वरि मी शब्दलाघवें
शून्यांतहि वदवीन पारवे
हाय शक्य नच मला छेडणें तुझ्या मनाची तार
मज माझाहि न अधिकार

हिरण्यमयी मी प्रकाशधारा
विश्वाचा उजळीन उंबरा
सांजवात तव घरीं कराया मी दुबळी लाचार
मज माझाहि न अधिकार

वासंतिक मी झुळुक चिरंतन
जळलेलें हें फुलविन त्रिभुवन
हसविंता तुझ्या मनींचे फूल खिन्न सुकुमार
मज माझाहि न अधिकार

जोगी

यांतील तुझें घर वद कुठले ?
बुडतां दिन हें नगर गवसले

फिरलों भ्रमलों बिदींबिदींतुनी
साद घातली सदनीं सदनीं
पडसादहि नच उठले फिरूनी
सुने सुने पथ नेत्रचि थिजले

धूसर काळी भयाण बसती
मुके गवाक्षीं दीप उजळती
प्रतीक्षेंत जणु हृदये जळती
बघ, पश्चिमेंतुनी घन उठले

दिशा ढगें भारावुन गेल्या
गांव वादळीं हलला फुटला
धरिला तरूही पथिं उन्मळला
वीजपदर चाटून चालले

दिवा ही न घरिं तुवां लाविला
खूण ठेविला नच फुलझेला
कां शून्यीं बोलविलें मजला ?
परततां नगरदारही मिटलें

तिमिरांत उमटलीं तेजांची पाउलें

तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें
जाहलीं जगाचीं सलें क्षणांमधि फुलें

प्रगटते उषा जशि अंध तमिस्त्रेंतुनी
मुक्तात्मा स्फुरला दास्याच्या बंधनी
जागलें बंड जें व्यथित जगाच्या मनीं
तें रूप चिरंतन बापूचें आगळें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

वज्राची दिधली धार तृणाला कुणीं
वाकला काळही कुठे शस्त्र टाकुनी
प्राशिलें विष कुणीं जनमनिंचें हासुनी
कारूण्य चिरंतन बापूचें आगळें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

करि गुलामांस जो मानव या भारतीं
प्रीतीस देइ बळ क्रांतींचें भारतीं
करूणेंत उद्यांची करी भव्य निर्मिती
या महामानवाचरणीं उधळा फुलें
तिमिरांत उमटलीं तेजाचीं पाउलें

भेदोनि नभाला विश्वें शोधी पुढे
छेदोनि तुफाना स्वर हा मंजुळ चढे
भरि संजीवनिचे दग्ध जीवनी घडे
रविमुखिंचे याने कनकपात्र सारिलें
तिमिरांत उमटली तेजाचीं पाउलें

उघड ऊर्मिळे कवाड

उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची
सोनपाउलें क्षितिजीं उमटती दिनाचीं

गंधवाह मंद मंद
शांतीचा जणु मरंद
गारवा पिऊनि येई धार अमृताची
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

फुलती फुलें तरूलतांत
रांगोळ्या अंगणांत
किणकिणते प्रेमळता त्यांत कंकणांची
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

गवत डुले केवि अता
प्राणमया जणु कविता
हिरवळते लसलसते तरूण जीवनाची
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

लखलखतें धगधगतें
कनकचक्र नभिं फिरतें
रविबिंब न अनिरूद्धा गतिच युगयुगाचि
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

रात्रींचे तम पिऊन
ये पहाट ही हरखून
विष पचवुनि जयहसितें फुलति शंकराचीं
उघड ऊर्मिळे, कवाड उजळतसे प्राची

कुमारी

कां अधीरता ? कां सुखांत सलतें कांही ?
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

सावळ्या सावलिंत शीतळता निजसुरी
सखि, धुंद मदालस अंग अंग हें करी
अन् उन्हांत काटा गोड उठे तनुवरी
मृदु योवनांगिची ऊब शिवोनी जाई
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

उमलत्या फुलावर सदा कुणी हासतें
त्या दळादळावर नवें स्वप्न उमलतें
ढग–गूज मनींचे भिरभिरतें धावतें
यौवनास घाली शीळ अथांग निळाई
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

चांदण्यांत धूसर गगन धरेला मिळे
कुणि गाढालिंगन मजहि गमे दे बळें
मग चांदणेंही लज्जेंत दिसे रंगलें
कुस्करति चुंबनी गाल, झुळूक कशी ही ?
उमलतें झाकतें हृदय साजणी बाई

साजणी, आज गातसे रात

साजणी, आज गातसे रात

चंद्रकाराने मेघ रंगले
काजळकाठीं अमृत भरलें
तव सोनेरीं नजरेमधली झळक फेसळे त्यांत
साजणी, आज गातसे रात

सरल्या सरिचें साकळलें जळ
पानांतुनि टपटपतें अचपळ
उमटे स्पंदन तुझ्या उरीचें त्या अधीर सलिलांत
साजणी, आज गातसे रात

लपविलेस जें शब्दी हसुनी
प्रगटे तें लज्जेतुनि नयनीं
रूकार तो प्रीतिचा पसरला तृप्ति बनुनि गगनांत
साजणी, आज गातसे रात

खोल व्याधशर घेउनि अंतरिं
पुंज मृगाचा हसे अंबरी
असेंच कांही प्रकाशतें अन् सलतें या हृदयांत
साजणी, आज गातसे रात

सौरभ सुमनांमधुनि निघाले
तंतुबंधनांतुनि स्वर सुटले
स्वप्नें अपुलीं निद्रेमधलीं विमुक्त अवकाशांत
साजणी, आज गातसे रात

चांदणें इथे अश्रु ढाळितें

चांदणे इथे अश्रु ढाळितें
सावल्यांत कवडशांत कोणी व्यथित मनें हिडतें

जे निःश्वासाने कधी न कोमेजलें
आसवीं कुणाच्या जें न कधी चिंबलें
दुःखानलें चुकुनी जें न कधी पेटलें
तेंच चांदणें सुरूतरूतुनि, गुलाबांत स्फुंदतें
चांदणे इथे अश्रु ढाळितें

जे ऊर्वशिच्या चिरतरूणस्मितिं, जन्मलें
विष पिउनि मिरेच्या भजनी जें गुंजलें
रतिनयनीं मदनासवें जळुनि प्रकटलें
तेंच चांदणे पुष्करिणीतटिं मुसमुसुनी क्रंदते
चांदणे इथे अश्रु ढाळितें

स्मरणांत कुणाच्या कुणीं शिल्प बांधिलें
ती बेगम सुंदर, शहा न ते राहिले
सुखविलास त्यांचे फुलांपरी वाळलें
शिलेंत या परि अमर भावना त्यांची नि:श्वासते
चांदणे इथे अश्रु ढाळितें

पुंडरीक मिटलें मूक उभा 'मुकबिरा'
हुंदका आर्त युगविरही हृदयांतला
या आरस्पानी शिलांतुनी उमटला
अमृतें नाहुनि हृदय नभाचें गहिवरतें, दाटतें
चांदणे इथे अश्रु ढाळितें

प्रीतिचं मोल

साजणी बोल, प्रीतिचं काय या मोल ?

जीवन अपुलें हें दोघांचे
श्वास वेणुंतिल दो अधरांचे
नीरव असल्या धुंद सुरांची काय माधुरी बोल ?
प्रीतिचं काय या मोल ?

दोघे जुळलो वादळपूरे
एक नदीची दोन्ही तीरे
यौवनातले तुफान अंधळे चल अनुभवुं घनघोर
प्रीतिचं काय या मोल ?

स्वप्न सहस्त्रे जिथे उमलली
क्षितिजसहस्त्रे जिथे निमाली
त्या डोळ्यांचं सांग साजणी, पाणी किति ग खोल
प्रीतिचं काय या मोल ?

अलिंगन हें एकचि बंधन
श्रेय जीवनी सायंमीलन
युगें देउनी क्षण ये घेऊं बुडतां हा भूगोल
प्रीतिचं काय या मोल ?

ते तुझेंच गाणे ग

ते तुझेंच गाणे ग
युगायुगांतुनि गात चाललो, गातचि जाणे ग
मला ते गातच जाणे ग–

विरह घडो वा मीलन घडुं दे
जन्मोजन्मी तुटी पडूं दे
अकाल, उन्मद बनुनि वेदना रचितो स्वप्ने ग
ते तुझेंच गाणे ग

अथांग तव शर्बती लोचने
क्षितिज हंसें जणु पिउनि चांदणे
तुझें नयन नित नवे घालिती निळे उखाणे ग
ते तुझेंच गाणे ग

गावसिमेवरि तरूछायांतुनि
मूक हालत्या दिशातमांतुनि
गूढ एकलेपणिची हुरहुर हृदयिं थरारे ग
ते तुझेंच गाणे ग

स्वर्गंगेच्या कमरपट्यांतुनि
नक्षत्रांच्या अस्फुट किरणी
उरस्पंदनापरि जे काही धडकत येतं ग
ते तुझेंच गाणे ग

पडें ना पडें जें धरणीवरि
मुग्ध बिजेच्या चंद्रकलेपरी
हास्यलकेरी बनुनि दिशांतुनि जे खसखसते ग
ते तुझेंच गाणे ग

पाडा आल्या फळांत खुपते
उमलूं सजल्या कळ्यात सलते
रसिकास्तव जे रसगंधापरि पवनिं उसासे ग
ते तुझेंच गाणे ग

अग्न न ठावा ज्या हिमकालीं
प्रियालिंगनी ऊब मिळाली
ध्रुवावरिल त्या स्पर्शापरि जें हळूंच शिवतें ग
ते तुझेंच गाणे ग

आज ऊन पडले

आज ऊन पउले फुलांगी, आज ऊन पडले
स्वप्नसृष्टिचें सहज तुरुंबुनि निळाईंत हसले

कृष्ण घनांनी दिशा दाटल्या
धूर–धुळ्यांनी अन् घुसमटल्या
अवघडलेले अंग दिशांचे तरल फूल बनले
फुलांगी, आज ऊन पडले

निळे पारवे मेघ पांगले
रजतरसाने काठ रंगले
प्रावृट नर्तनि गौरांगाहुनि शेले ओघळले
फुलांगी, आज ऊन पडले

ऊन भरे फुलपाख दिशांतुनि
फूलपाखरे उडती फुलांतुनि
ऊन्हें पिउनि पावश्या गातसे स्वर गवतां फुटले
फुलांगी, आज ऊन पडले

पावसातल्या सुखात भिजले
पंख वाळवित पंछी बसले
ये आपणही शेकू तनमन दु:खचिंब अपुले
फुलांगी, आज ऊन पडले

अलबेले पाखरू

अलबेले पाखरूं पाहिले अलबेले पाखरू
उडतांना पंखातूनि त्याच्या वाजतात घुंगरू
पाहिले अलबेले पाखरू

करूणेच्या थेंबांचे डोळे
घेऊनी चढतो तो आभाळे
तप्त जळत्या एकांतातुनि गान लागते झरू
पाहिले अलबेले पाखरू

दु:खाच्या फांदीवर बसते
आनंदाची फळे पिकवते
दग्ध मनि सांजेच्या फुलती प्राजक्ताचे तरू
पाहिले अलबेले पाखरू

पंखांवर आभाळ पेलूनी
पूर्वेवर अंधार कोरूनी
प्रकाशबी अंधारमनातूनी नित्य नवे भास्करू
पाहिले अलबेले पाखरू

(मृत्युपूर्वी फक्त चारच दिवस आधी लिहिलेली कविवर्य वा.रा.कांत यांची अखेरची कविता.)

तृषेचेच गीत मी गात आहे

तृषेचेच गीत मी गात आहे
तृषेचा कवी मी विश्वच भवती तृषाक्रांत आहे

भरतीच्या किती लाटा-लाटा आल्या
सूर्य-चंद्र झेलीत धुक्यात विराल्या
पहाटे रूपेरी झांजर वेळेला तान्हेलाच अंधारकाठ आहे

घागरी घरी आ वासून पडल्या
उतरंडी रित्या डुलल्या, ढळल्या
चुलीवर तवा नुसताच जळतो, उपाशी वाटी ताट आहे

युगंधर मेघ आभाळी उठले
हृदयाची धार वरसले, सरले
रक्ताची उधळण, सुधेची शिंपण कोरडाच ओठाचा काठ आहे

आजही पाताळी अश्व बद्ध आहे
सहस्त्रसर्पोनी तसाच विध्द आहे
सुधाकलशाची, एका सुवर्णांची अजून अदीतीला वाट आहे

ओठांत अद्याप सूर चढत नाही
शब्दांना कोठे लय मिळत नाही
गाण्याचा आग्रह कशाला करता छंदच पोटी धीठ पाठ आहे

स्वातंत्र्याला येथे बंधन फुटते!
पाण्यालाही येथे तहान का लागते?
या पापाला, या शापाला
सांगा अखेर शेवट कुठला?
सवाल असा पंचविशीच्या या थर्थरत्या ओठात आहे
तृषेचेच गीत मी गात आहे.

'तोडी' ची लावणी

थंडिची भरे हुडहुडी, स्मरे घडि घडी, व्याकळुनि सोडी
राया, तुझ्या मिठीची गोडी

गंगथडिचा सुटला वारा, गहू–हरभरा शिवारी पिकला
दंवाचा मोतिचुरा लुटला
आंगणी सायली फुले गंध घमघमतो
अंधार रात्रीचा तलम पोत थरथरतो
जरतार रात्रिची घडी, करून तातडी, कोण ग मोडी
राया, तुझ्या मिठीची गोडी

झोपल्या वृक्ष वल्लरी, जागते वरी शशिविणा रैना
सुखामधि निजल्या राघू–मैना
अर्धीच झोप डोळ्यात बावऱ्या खुपते
भलतेच स्वप्न अन् त्यात जिवाला डसते
मी घाबरूनी एकांति कापऱ्या हाति आपुलीच चादर ओढी
राया, तुझ्या मिठीची गोडी

ऐकिलं युद्ध जिंकुनी 'फीत' मिळवुनी तुम्ही परतला
राघु मग कोणीकडे झुकला
तळमळत रात्रभर उगी कूस बदलिते
हे पान केतकी श्वासाने चुरगळते
किति कवळुनि उरि उशी धरू, जीवनात पडते थोडी
राया, तुझ्या मिठीची गोडी

पाडवा सख्या वरसाचा, सुना जायचा कसा हो असा
आण कि हो चंद्राची राजसा
फुंकुनी उशाचा दिवा जरी विझविला
अधिकची मनामधि जाळ सख्या भडकला
चालली कलुनिया रात विव्हळुनी गात चांदणे 'तोडी'
राया, तुझ्या मिठीची गोडी

रात्रीस चंद्रम्याची

मी गीत गाइलेले तूं ऐकशील कां रे
रात्रीस चंद्रम्याची देशील साद कां रे

घेवून प्राण कंठी बघते दहा दिशांना
सांगू व्यथा कशी या मंदावल्या दिव्यांना
जपते तुझ्याचसाठी निश्वास श्वास सारे
रात्रीस चंद्रम्याची देशील साद कां रे

आले मनास फूल हुरड्यास देह आला
व्यर्थी तुझ्यामुळे रे शब्दास अर्थ आला
शून्यात अन् सख्या रे, आले नभास तारे
रात्रीस चंद्रम्याची देशील सांद कां रे

तूं पाहतोस वाट विश्वास हा मनांत
अंधार दाटती ये नाहून अमृतात
अन् लांब वाट होते बाहू तुझा मला रे
रात्रीस चंद्रम्याची देशी साद कां रे

दिन मावळता

दिन मावळता
मनात येते कांही कांही सांज–समीरण भणभणता

आर्त प्रार्थनेतील हुंदका थंड गोपुरी अडखळता
दहिवर होतो सूर सनइचा पिंपळपानीं डळमळता
दिन मावळता

कधी स्मरे जळ गोदावरिचे फिकट चांदणे झुळझुळता
नाचे कंचनि अंजिठ्यातली नीळ डोंगरी थरथरता
दिन मावळता

गाय हंबरे गोठ्यामधुनी थनात पान्हा तटतटता
दिव्या मनी तारांगण फुलते तुळशीपाशी मिणमिणता
दिन मावळता

शब्दच गळती देठापासुनि गीत तुझे रचता रचता
का रे चाफ्या, पाने झडतीं फुले डहाळीवर फुलता
दिन मावळता

कांचनतरू फुलले

कांचनतरू फुलले
अंगणी कांचनतरू फुलले
सोन्याचे अन् पाणी त्यांचे दिवसांवर चढले

फुले वेचिता आज तरूतळी
सुखदु:खे या, मनि काळवली
पानांवरचे दंव करूणामय नयनदळी सांडले
अंगणी कांचनतरू फुलले

सोनपाकळ्यांवर कधि बसुनी
गेलो आपण नभे लंघुनी
तिथुन पाहिले हसू कांचनी घरिदारीं पसरले
अंगणी कांचनतरू फुलले

झाडाखोडातुन जे अडले
मुक्त गीत ते आपण केले
शब्द–स्वरांतुनि लक्ष तरूने आज पहा बहरले
अंगणी कांचनतरू फुलले

घडी बघाया अशी देखणी
तू नच संगे आज साजणी
दु:खालाही अता उमलती आनंदाचे कळे!
अंगणी कांचनतरू फुलले

हिरवेंहिरवें रान माझें

हिरवेंहिरवें रान माझें हिरवेंहिरवें गाणें
हलतीं–झुलतीं हिरवीं पानें शब्द कापरे रूमझुमणारे

लालकेशरी अर्थ फुलांचे सगंध हासत हारवणारे
निळा स्पर्श वाऱ्यांत नभाचा गवतांतुन संतूर–ताराणे
हिरवेंहिरवें माझें गाणें

फुलपंखी दे उन्हांत ठिपके पिसांत डोळे उघडी मोर
झाडावरती गातो पक्षी चोचिंत त्याच्या पिकतो सूर
मधुकण झरते त्या गाण्यांतिल धरूनि ठेविती दवांत रानें
हिरवेंहिरवें माझें गाणें

पिवळीं पानें धुरकट रानें मोहर सगळा गेला जळुनी
पिसें गळालीं चोचहि झडली गेला पक्षी गाणें ठेवुनि
त्या गाण्यांतिल मीठ अश्रुचें पानझडीमधि जपती पानें
हिरव्या जखमा हिरवी रानें
हिरवेंहिरवें माझें गाणें

मी मस्त कलंदर गायक आहें

मी मस्त कलंदर गायक आहें
रित्या जगाचा रित्या क्षणाचा, मी मस्त कलंदर गायक आहें

मनचें माझ्या आभाळीं उडालें
म्हणे तारामंडळ त्याचेंच झालें
रित्या क्षणाला प्राणाचें ओज देत शिंपल्यांत मोती घडवीत आहें
मी मस्त कलंदर गायक आहे

झाडांना रानीं फुलें लाललाल:
लाखलाख देठासकट उष:काल
हजार पाकळ्या शोधीत त्यांच्या दिवस रात्रींत चालत आहे
मी मस्त कलंदर गायक आहें

डोंगरांत झरे खळखळत आले
त्यांत माझें मन ओघळून गेलें
ओढ्याच्या ओढीने वाहतां वाहतां समुद्राच्या काठीं लागत आहे!
मी मस्त कलंदर गायक आहे

पायाखालची वाट तर संपत नाही
नक्षत्रांनी झोळी कांही भरत नाही
रितेपणा मात्र वाढत वाढत आकाश पोटांत साठवीत आहे!
मी मस्त कलंदर गायक आहें

साजणि, गाया ये मजसंगे

साजणि, गाया ये मजसंगे
जीवनलहरी झळके संगे

सुवर्ण गोरजपटी झाकुनी
सांध्यदीप ये घेउनि रजनि
जीवनि तू तशि येगे साजणि, गाया ये मजसंगे

सघन धनावलि गगनी दाटत
मधुर भावना हृदयी थाटत
मोडि न त्या भ्रूश्रंगे साजणि, गाया ये मजसंगे

शुक्रतेज हळुहळु मावळे
त्यात चंद्रिका कवळी मिसळे
यौवन शैशवसंगे साजणि, गाया ये मजसंगे

ताल धूसरित उभे नदिवरी
मनिच्या शंका दूर ज्यापरी
उन्मद हृदय तरंगे साजणि, गाया ये मजसंगे

नाचुनि नाचुनि रजनी थकली
चाळ वघळले, नभि तारावलि
नाचू तू मी अंगे साजणि, गाया ये मजसंगे

तव नयन मुलायम हलले ग

तव नयन मुलायम हलले ग
हृदयभाव फुलले की दडले काहि न पुरते कळले

झुरेबावरे भुरके डोळे
पलकांच्या छायात तळपले
स्वप्न एक मधि झळकुनि गेले
चंचल जललहरींना बुजुनी मीन काय परतले, ग

स्मृती पापण्यावर थरथरली
असफल मीलनतृषा हासली
स्मिते न कळता तो दहिवरली
व्याकुळतेने मादक मदिरा अधिक नयनि फेसळे ग

बोलुनि शिणलो, हृदय न भरले
अंतरंग अकथिताची उरले
अता मुकेपणि विश्व दाटले
विष अमृत तव सद्‌सद कंठी एकमेळि हिसळे ग
तव नयन मुलायम हलले
हृदयभाव फुलले की दडले काहि न पुरते कळले

पदरंजन

रंगवू नको निज पद रमणी
रंगते धरा ही तव चरणी

आरक्तच तव गुलाब-तळवे
रंग तयांना कशास व्हावे ?
रंग उषेमधि काय भरावे
ये सुवर्ण उधळित जी गगनी !
रंगवू नको निज पद रमणी

सहज मृदुल तव पाउल पडते
तरूण हृदय त्या तिथे चिरडते
रक्त तेच तव पदी लागते !
ही कशास भेदी मग वरूनी ?
रंगवू नको निज पद रमणी

मदभरे पद टाकित जाशी
पदरागाने मने जाळिशी
संध्योषा परि कधी खुलविशी
तू प्रवेशुनी वल्लभ-सदनी ?
रंगवू नको निज पद रमणी !

माझ्या मनांत उभी तूं

माझ्या मनांत उभी तूं
माझें मनचि होऊन
नि:श्वासशी कवनांत
माझी वेदना बनून

नामरूप तुझें घेती
अर्थ माझिया शब्दांचे
दग्ध पानांस दिलें तूं
स्वप्न फूलत्या फुलाचें

ऊब तुझ्या श्वासांतील
शिवे मला एकांतांत
गंध दर्वळे तयाचा
निळ्या रात्रीच्या कोषांत

तुझ्या व्याकुळ लोचनीं
साकळलें दहिवर
दूर क्षितिजीं थरारे
खिन्न सागफुलांवर

मिटे उषेच्या ओठांत
रात–तारांची कहाणी
तुळे आनंदाचा क्षण
गुंफिलेल्या अलिंगनीं

बाहु अतृप्त, आतुर
सारिलेले एकांतांत
बिलगती, बिलगती
सखे अरध्या ओळींत

मेंदीच्या ताटव्याशीं

मेंदीच्या त्या ताटव्याशीं
क्षण थांबलों आपण
दरवळला अंधार
कस्तुरीच्या सुगंधानं

क्षणीं एका त्या हीं मनें
भूत–भविष्यीं धावलीं

जशीं कस्तुरीहरिणें
आत्मगंधें झळंबलीं
निळ्या सजल ढगांची
मध्यरात्र ही मख्मली
काय जपून ठेवील
गूज आपुले सकाळीं
दोन उरांचें स्पंदन
दहा बोटांचें कंपन
ज्यांत गुंफिलें आपण
तुटणार तोही क्षण

परी पुन्हा कधीं येतां
मेंदीपाशी क्षणभर
कस्तुरीच्या सुवासानं
दरवळेल अंधार

कल्पतरूची डहाळी

कल्पतरूची आज डहाळी, झुलली माझ्या शिरी
सख्यांनो, तुम्हि आला हो घरी ।।

शब्द अश्रुंनी जड भिजलेले
ओल्या नयनी हास्य उमलले
शब्दहि अर्थाशी अडखळले
जन्माचे संवाद चालती, परि मौनाचे तिरी
सख्यांनो, तुम्हि आला हो घरी ।।

आनंदाची खिल्लारे किती
गोकुळातले नाच नाचती
गाते राधा कदंब तळवटी
स्मृति वृंदावनि दूर वाजते, कुंजातुनि बासरी
सख्यांनो, तुम्हि आला हो घरी ।।

आनंदाच्या विद्या शोधित
जन्म हिंडलो राने तुडवित
स्पर्श सुखद हे येती सांगत
आनंदाच्या लाख पिसांचे स्पर्श गोड अंतरी
सख्यांनो, तुम्हि आला हो घरी

मनी किरकिरे रात

मनी किरकिरे रात
अनादी मना किरकिरे रात
रात्र असो वा दिवस असू द्या
खंड न पडतो त्यात
अनादी मनी किरकिरे रात

सकाळ पूर्वेवरी उगवते
पितांबराची घडि उलगडते
फुले नाचती पवनतुरे जणूं कवळ्या चंद्र-उन्हात
अनादी मनी किरकिरे रात

सूर्य दुपारी नभी तळपतो
रस चांदीचा दिशात भरतो
उडती पाकळ्या आनंदाच्या स्वैर पक्षि गगनात
अनादी मनी किरकिरे रात

रात चांदणी भरास येते
गाई धरणी चकोर गीते
पिकले सण कवडशांत वेचित चंद्र फिरे झाडांत
अनादी मनी किरकिरे रात

छाया–राया मधुनी झुलती
घूं–घूं रव फांद्यांतुनि घुमति
दशमुख रावण चिता धडकते ऐक तुझ्या कानांत
अनादी मनी किरकिरे रात

कराल उपसा किती रात्रिंचा
बुडे पोहरा सूर्यशतांचा
झुरळापरि तडफडे उताणी पृथ्वी अंधारात
अनादी मनी किरकिरे रात

जय जय देश महान्

जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण
जय श्रमिकांनो, जय कृषिकांनो जय जय देश महान्

दंडकवन श्रीरामपदाने महाराष्ट्र झाले
अश्रुतुनि बाणातुनि त्याच्या तेज नवीन उदेले
द्वारावतिचे स्वप्न भीमकी दे गवळ्यास महान्
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

सूर्यरथा रोखिले ऐकिले कधी सह्यशिखरांनी
कालचक्र बदलले पाहतां आज इथे डोळ्यांनी
पात्यांमधुनी चात्यांमधुनी तळपे नव आव्हान
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

ब्रम्हानंद रसाने भिजली मराठमोळा वाणी
आज विजेच्या शब्दांनी ती लिही उद्याची गाणी
हिरवी गीता पार्था सांगे पानातुंनी भगवान्
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

कठीण काळ्या कातळांतुनि पारिजात फुलवावे
तुलाच ठावे काळ्या–फुलांतुनि लाख दिवे उजळावे
प्राणामधुनी दिवा पेटतो, दिव्या दिव्यांतुनि प्राण
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

कला–हृदय तव साद ऐकते देवांची दगडात
भविष्य तुज मोत्यांचे बाही ज्वारीच्या कणसांत
झरती ओंब्या शेतमळ्यांतुनि चढे लावणी–तान
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

मनी बोलतो श्लोक मनाचा उरी स्मृति शिवबाची
हक्काची जाणीव लोचनी झुंज लोकमान्यांची ।।
गांधीचा कळवळा सुधेचा करि क्षुद्रांस महान्
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

हृदय आम्हाला अखिल जगाची दु:खे सहज धराया
हात आम्हाला डोळ्यामधले अश्रू हळूच पुसाया
दौलत मोठी हीच आमची हाच आम्हा अभिमान
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल–पाषाण

कांतांची नाट्यकाव्ये

गंधवार्ता- नाट्यरूपदर्शन

१) मरणगंध

२) गांधारी

३) विसर्जन

४) दूमार

५) बांसरी

६) चुंबन

७) पाषाणावरील तीळ

८) सूर्याचं वाळवंट

कविवर्य कांत आपल्या अभ्यासिकेत



कविवर्य कांत मराठी विभाग प्रमुख, औरंगाबाद

कांतांची नाट्यकाव्ये:

आधुनिक मराठी कवितेत सर्वाधिक दीर्घकाव्ये कवी कांतांनी लिहिली आहेत. कांतांनी त्याचं "नाट्यकाव्य" असं नामकरण केलं. या नाट्यकाव्यातून लोककथांच्या आधारे व्यक्तिस्वातंत्र्य, जागतिक शांतीसाठी मानवतेचा पुरस्कार, अशा मनोविचारांची अभिव्यक्ती कांतांनी मांडली आहे. आशयाच्या दृष्टीनं त्यांची अकराही नाट्यकाव्य भीन्न असली तरी त्यांचे रचनाप्रकार, आत्मकथन, संवाद, स्वगत, पत्ररूप कथन, संस्मरण, स्वप्नदृष्य ई. लेखनशैलीत लिहलेले आहे. प्रत्येक नाट्यकाव्यात एक वेगळाच उत्स्फुर्तपणा जाणवतो, कारण त्यातील कथासार वाचकाला आपल्यात गुंतवून ठेवतं. मूक्तछंदाचा वापर असूनही त्यात प्रवाही शब्दरचना व एक लयबद्धता आहे. अकरा नाट्यकाव्यांपैकी सहा नाट्यकाव्य ही पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध झाली आहेत तर इतर पाच नाट्यकाव्य विविध मासिकांतून प्रसिद्ध झाली आहेत, ती पुढीलप्रमाणे–

१) चुंबन–दिपावली दिवाळी अंक १९६६
२) दूमार – दिपावली दिवाळी अंक १९६७
३) बांसरी– उत्तम दिवाळी अंक १९७०
४) सूर्याचे वाळवंट– इंद्रधनू दिवाळी अंक १९८७
५) पाषाणावरील तीळ– इंद्रधनू दिवाळी अंक १९८८

नाट्यकाव्यांच्या लेखनकालावरून दिसून येते कि १९६६ ते १९८८ या बावीस वर्षांच्या कालावधीत कांत नाट्यकाव्यलेखनानी भारावलेले होते. तशातही काव्यरचनेमधील एक आगळं वेगळं स्वरूप घेऊन अवतरलेला "दोनूली" हा काव्यसंग्रह याच दरम्यान प्रसिद्ध झाला. शिवाय आकाशवाणीसाठी अनेक नभोनाट्ये कांतांनी लिहली होती. याचवेळी "नॅशनल बूक ट्रस्ट" तर्फे आलेल्या काही हिंदी लेखकांच्या साहित्यकृतींचा मराठी अनुवाद करण्याचं कामही कांतांनी हाती घेतलं होतं. हे सर्व मी इथं नमूद करू शकतो कारण या घटनांचा मी साक्षी आहे, अवलोकी आहे. "मरणगंध" शिर्षकाच्या नाट्यकाव्यसंग्रहात– मरणगंध, गांधारी व विसर्जन ही तीन नाट्यकाव्य संग्रहीत आहेत. उर्वरीत "अग्निपथ" व "अंधार सूर्याने पाहिलेला" ही नाट्यकाव्ये "वाजली विजेची टाळी" या काव्यसंग्रहात समाविष्ट आहेत. या नाट्यकाव्यांमधून महाभारतातील पौराणिक कथांचे अवशेष आढळतात व त्यातील काही व्यक्तिंच्या मृत्युप्रसंगावरही प्रकाश टाकलेला आढळतो. पंडू, कुंती, माद्री, धृतराष्ट्र, श्रीकृष्ण, दूर्योधन या पौराणिक स्त्री–पुरूषांमधील मानसिक संघर्ष, त्यांच्या स्वभावातील खोल व उथळपणा, त्यांच्या मरणप्रसंगातील भेदक नाट्य इथं वाचायला मिळतं. आपल्या प्रास्ताविकात कांत म्हणतात, महाभारतातील व्यक्तिंच्या आधारलेल्या नाट्यकाव्यातून मृत्युच्या क्षणाच्या झरोक्यातून त्यांच्या जीवनाकडे मागे–दूर पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे. मृत्युच्या गुढ व अगम्य अंधाऱ्या क्षणांच्या फटीतून दिसणाऱ्या जीवनाबद्दल माणसं काय सांगतील याचं अल्पकथानक "मरणगंध" मध्ये वाचायला मिळतं. नाट्यकाव्य लिहिण्यामागच्या स्फूर्तीबद्दल कांत म्हणतात की, "मी माझ्या अल्पमतीप्रमाणं गेल्या पन्नास वर्षात भलीबुरी भावकविता लिहिली. भावकवितेत अनुभूतीचे क्षण हाती लागतात पण त्यात साकल्य गवसत नाही आणि म्हणूनच या तळमळीनं मी नाट्यकाव्य लेखनाकडे वळलो. इतर सात–आठ नाट्यकाव्यावर बोलायचं तर "दूमार" आणि "पाषाणावरील तीळ" याचं कथाबीज लोक कथांवर आधारीत आहे. तर चुंबन, बांसरी हे प्रेमभावनेवर आधारीत आहे. ज्यातील प्रेम हे व्यक्तिगत नसून त्यात मानवतेचे व राष्ट्रीय भावनेचे प्रकटीकरणही आहे. "चुंबन" मध्ये १८५७ च्या लढ्याची पार्श्वभूमी असून एका नाकारलेल्या चूंबनामुळे

स्वातंत्र्य संग्रामाची व युद्धाची ठिणगी पेटते तर "बांसरी" मध्ये बंदूकीच्या नळीची बासरी केली तर कसे सूर निघतील या द्वंद्वात्मक कल्पनेतून एका कलाकार दांपत्याची प्रीतीकथा सांगितली आहे. परंतु शेवट असा झाला की, बंदूकीची बासरी झालीच नाही त्यातून संगीताचे सुर उमटलेच नाहीत तर मरणच उगवले, शस्त्र हे शस्त्रच राहिले असे वास्तव दाखवीले आहे.

"सूर्याचे वाळवंट" मध्ये कांतांनी रामायणातील लक्ष्मण व त्याची पत्नी उर्मिला यांच्या क्षूब्ध व उद्विग्न मनस्थितीचे वर्णन केले आहे. आयुष्यभर सेवाव्रत जोपासणाऱ्या लक्ष्मणाला श्री रामांनी निर्वासित केले व लक्ष्मण शरयु नदिकिनारी प्रायोपवेशनासाठी निघतो. सीता, लक्ष्मण, शंबूक, त्राटिका यांच्यावरील अन्यायामुळे सूर्यकुलाचा अस्त झाला, सुर्यकुलाचे वाळवंट झाले. या सर्व प्रकारात अंतर्यामी भाजली गेलेली उर्मिला आपली दाहक वाणीज्वाला लक्ष्मणासमोर प्रकट करते ही घटना कांतांनी इथे समर्पक पण अर्थपूर्ण मांडली आहे. उर्मिलेची ही दोन वाक्य पहा–

"अन्यायाचा आतंक आहे हा
दीन दूर्बल स्त्रीजातीवर
हा अहंकार आहे पुरषी पराक्रमाचा
प्रतिष्ठेच्या काठावर उभारलेला
स्त्रीच्या अबोल सहनशक्तीत रूजलेला"

या नाट्यकाव्यात उर्मिलेचं पात्र अधिक कसदार शैलीत लिहले आहे.

उर्वरीत दोन नाट्यकाव्ये ही शिल्प व शिल्पकार यावर आधारीत आहेत त्यातील एक "पाषाणावरील तीळ" दक्षिणेतील लोककथेवर आधारीत आहे तर "दूमार" हे नाट्यकाव्य वेरूळच्या परिसरातील एका लोकथेवर आधारीत आहे. या दोन्ही नाट्यकाव्यातून शिल्पीच्या जीवनाचा संघर्ष, शिल्पकाराचे कलाप्रेम, सुखदू:ख, त्याच्या जीवनात असलेले कलेचे महत्त्व व स्वातंत्र्य, कलासाधनेचे व्रत इ. विचार कांतांनी खूबीनं मांडले आहेत. कलावंताच्या जीवनसंघर्षाची पकड घेणारे कथानक वाचकांच्या मनाचीही चांगली पकड घेते.

सर्वच नाट्यकाव्यांचं विस्तृत समीक्षण लिहिण्याची ही जागा नव्हे फक्त त्यांची परिकल्पना व प्रेरीत कथाबीजाबद्दल थोडक्यात लिहिण्याचे प्रयोजन होते. कांतांच्या समग्र काव्यप्रवासात त्यांनी हाताळलेल्या या अनोख्या काव्यप्रकाराचा –नाट्यकाव्याचा– टप्पा मराठी काव्येतिहासात दूर्मीळ व कौतुकास्पद आहे.

मरणगंध
(तीन नाट्यकाव्ये)

गंध-वार्ता
(नाट्यरूप दर्शन)

मरणगंध

गांधारी

विसर्जन

मरणगंध

गंध-वार्ता

महाभारतातील काही व्यक्तींच्या मरणघडीवर आधारलेल्या तीन नाट्यकाव्यांचा हा संग्रह आहे. यात मृत्यूच्या क्षणाच्या झरोक्यातून त्यांच्या जीवनाकडं, मागे, दूर पाहण्याचा एक प्रयत्न आहे. मृत्यूच्या क्षणाचा अनुभव गूढ व अगम्य असतो. तसंच अंतकाळची मनोवस्थाही अतर्क्य व अनाकलनीय असते. तरीही मरता बोल खरा, अलिप्त व मानवी अनुभवाचं साकल्यरूपानं दर्शन घडविणारा असतो, असं सामान्यपणे मानलं जातं. अशा अंधाऱ्या, गूढ, गहिऱ्या क्षणाच्या फटीतून दिसणारं जीवन माणसं सांगू लागली, तर ती काय सांगतील व कसं सांगतील त्याचं हे अल्पसं नाट्यरूप दर्शन.

पंडू, माद्री, धृतराष्ट्र, गांधारी आणि श्रीकृष्ण या महाभारतीय व्यक्तींच्या जीवनाचं नाट्यचित्र इथं रेखाटण्यात आलं आहे. परंतु, जीवनाच्या किंवा कलेच्या अंगानं त्याची चर्चा मला इथं अभिप्रेत नाही. या काव्य-प्रकाराकडं मी का व कसा वळलो, याचाच मी फक्त इथं थोडासा शोध घेणार आहे.

गेली पन्नास वर्षे मी काव्याच्या क्षेत्रात वावरत आहे. माझ्या अल्पमतीप्रमाणं बरीचशी भलीबुरी कविता, जशी स्फुरली तशी, मी लिहिली आहे. ही कविता लिहीत असताना मनात सारखं एक असामधान होतं. त्याबरोबरच, मधूनमधून असंही जाणवत होतं, ही भावकविता छान, सुंदर असते. उत्कट भावनिर्भर असते. त्यात क्षण कसा फुलासारखा फुलतो, दवासारखा झुलतो, कवडशासारखा तळपतो. पण त्यात दर्याचा घोष, गती किंवा आकाशाची अथांग स्थिती अनुभवाला येत नाही. तसंही काही तरी शोधता आलं पाहिजे. गवसलं पाहिजे. भावकाव्यात अनुभूतीचे क्षण हाती येतात, पण त्या अनुभूतीचं साकल्य गवसलं आहे असं वाटत नाही. ते कुठं मिळेल? अशी मनाला तळमळ होती. त्यातूनच दीर्घ काव्याकडं, विशेषत: नाट्यकाव्याकडं मी वळलो. सहा-सात नाट्यकाव्यं आणि तीन कथाकाव्यं, १९६२ ते १९७४ या बारा वर्षांच्या काळात लिहिली. त्यापैकी, तीन नाट्यकाव्यं आज इथं संग्रहित करण्यात येत आहेत. त्यातून मला काय साधलं, काय साधलं नाही, हे माझ्या रसिक वाचकांनी ठरवायचं आहे. माझ्यापुरतं म्हणाल, तर साधण्या-गवसण्याचा हा प्रश्न गौण आहे, कारण कला ही गवसण्यापेक्षा शोधच अधिक असते. तो शोध, ते असमाधान अजूनही चालू आहे. तोच माझा आनंदही आहे.

या संग्रहातलं पहिलं नाट्यकाव्य 'मरणगंध' पंडूच्या मृत्यूच्या प्रसंगावर लिहिलं आहे. त्याच्या मृत्यूनं मी कुतूहलकातर होतो. एक दिग्विजयी, संयमी आणि वानप्रस्थाश्रम स्वीकारलेला राजा क्षणिक शारीर सुखासाठी मृत्यूच्या खोल दरीत उडी घेतो. का? माणूस वासनेचा गुलाम आहे, एवढंच जर महर्षी व्यासांना सांगायचं होतं, तर त्यात किंदमाचा शाप वगैरेची गुंतागुंत त्यांनी का निर्माण केली? अटळ नियतीपुढची माणसाची अगतिकता दाखवायची असेल, तेव्हा त्या प्रसंगाच्या मागे शाप-उ:शापाची एक प्रभावळ बहुधा व्यास निर्माण करतात. त्याची म्हणवणारी मुलं (पांडव) कुंतीची आणि माद्रीची होती. त्याचा संबंध नावापुरताच होता त्यांच्याशी. याची खंत, व्यथा त्याला होती, की भयमुक्त जगण्याचा आनंद हा मरणापेक्षा मोठा आहे असं त्याला वाटत होतं? क्षणाच्या आनंदासाठी मृत्यूला कवटाळणारा पंडू कोणत्या धुंदीनं भारला होता? ते केवळ शारीरिक सुखाचं आकर्षण होतं, की त्यामागं वेगळ्या, सौंदर्याचा वेध घेऊ पाहणाऱ्या कलासक्त जिवाची ऊर्मी होती? समाधिसुखाचा व कामतृप्तीचा आनंद समान असतात असंही प्राचीनांनी म्हणून ठेवलं आहे. मग काही कलात्म, निर्माणशील प्रवृत्तीचं वादळ त्याच्या मनात घुमत होतं, की केवळ जगण्यामरण्याच्या अपरिहार्य सक्तीनं तो एक मादीकडं आकर्षिला गेला होता? पार्थिव व अलौकिक आनंदाची सीमारेषा कुठं संपते व कुठं सुरू होते? पंडूच्या मरणघडीचा विचार करताना अशा अनेक प्रश्नांनी मन अस्वस्थ झालं होतं आणि या अस्वस्थतेला वाट करून देताना जो घाट निर्माण झाला, तेच हे नाट्यकाव्य. प्रथम नाट्यकाव्याचीच कल्पना समोर होती. परंतु लिहिताना असं लक्षात आलं, की

सलग नाट्यप्रवेशात मला जे म्हणायचं आहे, ते उमटणार नाही. तरीही लिहिण्याचा प्रयत्न करीतच राहिलो. कुंतीच्या भाषणाच्या काही ओळी लिहिल्यावर कल्पना सूचली, की कुंती, माद्री आणि पंडू यांची स्वगतं परस्परसंबद्ध (Link) होतील, अशा पद्धतनं लिहिली तर?– तसं लिहून पाहिलं. नंतर लक्षात आलं की आशयानं आपलं रूप (Form) शोधून काढलं आहे. (ओघात आलं म्हणून इथं हे सांगायला हरकत नाही की, माझे स्नेही प्रा.व.दि. कुलकर्णी यांना माझी ही काव्यकल्पना आकर्षक वाटली आणि 'उत्तम' दिवाळी अंकासाठी हे काव्य लिहून देण्याचा त्यांनी मला आग्रह चालवला. त्यांचा आग्रह नसता तर कदाचित हे काव्य नेटानं आकार घेऊ शकलं नसतं.)

'गांधारी' नाट्यकाव्यही एका वेगळ्या कल्पनेतून निर्माण झालं. गांधारीचे पट्टी बांधणं आणि सोडणं या दोन बिंदूत महाभारताचा सारा संघर्ष पेटला आणि विझला. या पट्टीच्या प्रतिज्ञेमुळं धृतराष्ट्राला असं वाटलं की गांधारीला आपल्या पातिव्रत्याचा कैफ चढला आहे. उलट गांधारीची अशी भावना झाली की, धृतराष्ट्रानं आपल्याला फसवलं आहे आणि भावनेच्या भरात आपण जी प्रतिज्ञा केली त्याचा फायदा घेऊन, तो आपला सूड घेतो आहे. दोघांचे असे पूर्वग्रह व दुराग्रह आणि पोटी आलेले पापग्रह यांच्या संघर्षात शेवटी सर्वांचाच नाश ओढवला. पतीच्या दु:खी जीवनात वाटेकरी होण्याच्या हेतूनं गांधारीनं पट्टी बांधणं आणि गांधारीला स्वाधीन जीवन जगायला मिळावं म्हणून वानप्रस्थाश्रमात, धृतराष्ट्रानं तिला पट्टी सोडण्याचा आग्रह करणं, ह्या दोन्ही गोष्टी अंती निरर्थकच ठरल्या. पट्टी बांधली काय किंवा सोडली काय नशिबात जे लिहिलेलं असतं ते पाहणं टळत नाही. नियतीचा अनावर रथ त्या दोघांच्याही देहावरून धडधडत निघून गेला. नभोवाणीचे लोकप्रिय नाट्यदिद्धर्शक, माझे मित्र व त्यावेळचे नभोवाणीवरचे सहकारी श्री. बाळ कुडतरकर यांच्यामुळं आकाशवाणीसाठी हे नाट्यकाव्य लिहिलं आणि सौ. सुलभा देशपांडे यांनी आपल्या समर्थ आवाजानं त्यातली सारी वेदना जिवंत केली.

'विसर्जन' हे काव्य प्रसिद्ध चित्रकार व माझे स्नेही कै. दीनानाथ दलाल यांच्यासाठी लिहिलं. पण दैवदुर्विलास असा, की स्वत: त्यांना ते 'दीपावली' त प्रसिद्ध करता आलं नाही. त्यांच्या निधनानंतर 'दीपावली' च्या दिवाळी अंकात ते प्रसिद्ध झालं. श्रीकृष्णानं यादवकुलाच्या संहाराबरोबर स्वत:चंही आत्मविसर्जन केलं. ते का केलं असावं? या प्रश्नाचं चिंतन करीत असताना मला असं जाणवलं की, विसर्जनातही एक सर्जनाचं स्पंदन असतं. सर्जनाचं हे रूप काव्यात्मक, जीवनव्यवहारापलीकडचं असतं का? कदाचित असेलही. एवढं मात्र खरं की विसर्जनात सर्जनाचाही अर्थ असतो. तो कधी सापडतो, तर कधी हरवतो. श्रीकृष्णाचं जीवन हे ह्या गवसण्या–हरवण्यातील द्वंद्वाचं मूर्तिमंत प्रतीक. पुर्वायुष्यात तो निसर्गाच्या सहवासात राहिला आणि आदिम जातीचं मुक्त जीवन जगला. पण उत्तरायुष्यात, तो साधूंचं रक्षण व दुष्टांचा नाश करून धर्माची स्थापना करण्याच्या प्रतिज्ञेशी बद्ध झाला. त्यासाठी द्वारकेचं सत्ताकेंद्रही उभारलं. पण शेवटी धर्मसंस्थापनेच्या कार्यातलं त्याचं यश संशयास्पदच ठरलं. घरातच त्याला पराभव स्वीकारावा लागला. ज्या कर्तव्यकर्माचा त्यानं उद्घोष केला, त्याचाच यादवांना विसर पडला. सत्ता–समृद्धीच्या उन्मादात ते यादवी युद्धाला सिद्ध झाले. विनाशाकडं धावत निघाले (इथंही व्यासांनी गांधारीचा व एका ऋषीचा अशा दोन शापांची पार्श्वभूमी उभी केली आहे.) उद्विग्न, उदास मनानं श्रीकृष्ण या विनाशाला सामोरा गेला. स्वत:चंही आत्मविसर्जन केलं. ऱ्हासापेक्षा कुलाचा विनाश त्यानं पत्करला.

पण त्याच्या विसर्जनाच्या या अंतिम क्षणाला सर्जनाच्या स्वप्नाचाही स्पर्श होतो. हे स्वप्न राधेच्या रूपानं येतं आणि अंतर्धान पावतं. तशी महाभारतात राधा कुठंच नाही. पण एका अर्थानं राधा हे प्रत्येक तरूण, उमलत्या मनाच्या स्वप्नाचं प्रतीक आहे. तसं स्वप्न श्रीकृष्णाच्या जीवनातही असलं पाहिजे. म्हणूनच श्रीकृष्णाच्या पूर्व–जीवनात वास्तव रूपानं आणि शेवटच्या क्षणी स्वप्नरूपात राधा येते, असं मी दाखवलं आहे. नवजीवनाचं फक्त एक स्पंदन राधेच्या रूपानं थरथरून जातं. त्यात सर्जनाचा अर्थ सापडतो का हरवतो, काही समजत नाही. वैफल्याची, नकारात्मतेची कृष्णछायाच त्या क्षणाला शेवटपर्यंत

व्यापून राहाते. एकीकडं श्रीकृष्णाचं असामान्य जीवन व दुसरीकडं क्षुद्र व्याधाच्या बाणानं झालेला त्या जीवनाचा सामान्य अंत ह्या घटना कशाच्या निदर्शक आहेत? महान जीवन आणि क्षुद्र मृत्यू यांच्या दोन टोकांवर, श्रीकृष्णाच्या भव्य जीवनाचंच नव्हे, तर एकंदर मानवी जीवनाच्या नकारात्मतेचं भीषण नाट्य महाकवी व्यासांना रंगवायचं होतं काय?

श्रीकृष्ण हा अवतारी पुरूष होता की ऐतिहासिक पुरूष होता, यापेक्षा त्याचं असामान्य चरित्र हे 'मिथ' च्या पातळीवर जाण्याइतकं विशाल, कालातीत व विविधार्थसंपन्न आहे, यात मला काव्यदृष्टीनं अधिक रस आहे. त्यामुळं त्यांच्या नकारात्मतेच्या नाट्यालाही शेवटी नवनिर्मितीचा शलाकास्पर्शही होतो. त्याचं जीवन 'अकाल कल्पने' सारखं जाणवतं, पण सापडत नाही– 'शून्यापासून नि:शून्यापर्यंत.'

ही तिन्ही काव्यं महाभारतातील घटना–प्रसंगांवर व व्यक्तींवर आधारली आहेत हे एकच समान सूत्र त्यांत नाही, तर जीवनातील वैफल्यात्मक अनुभवाचा एकात्म प्रत्यय त्यातून येतो. माझ्या काव्यविषय झालेल्या व्यक्तिरेखा निरनिराळ्या थरांतल्या आहेत. काही असामान्य आहेत, तर काही सामान्य, काही कर्तव्यभावनेनं प्रेरित व विशाल व्यक्तिमत्वाच्या, तर काही आकुंचित व कुंठित वृत्तीची क्षुद्र माणसं आहेत. त्यांचे प्रकृतिधर्म निराळे असले, तरी आपापल्या प्रकृतिधर्माप्रमाणे जिद्दीनं ते नियतीशी झगडत राहतात, त्यात पराभूत होतात आणि शून्याच्या अंधारात विरून जातात. पंडूचा सौंदर्यानंदाच्या सुखाचा अनुभव मृत्युरसात विरघळून जातो. गांधारीची पुत्रांच्या व कौरवांच्या राज्यपदाची धडपड विनाशाच्या धुळीत मिसळून जाते आणि ती स्वत: व धृतराष्ट्र, रानातल्या झाडाझुडपांप्रमाणे वणव्यात जळून भस्म होतात. तरीही प्रत्येकजण मरणापर्यंत आणि मरणातही आपली शान सांभाळून असतो. मृत्यूनंतर त्यांच्या झुंजीच्या रेखाकृती विजेच्या रेघोट्यासारख्या अज्ञाताच्या गडद अंधारावर मधून मधून चमकत राहातात.

श्रीमद् व्यासांनी सुरूवातीला आपल्या महाभारत ग्रंथाला 'जय' नावाचा इतिहास म्हटलं आहे. परंतु भारतीय युद्धाच्या समाप्तीनंतर, या ग्रंथाच्या अखेरीस धर्मराजाच्या तोंडी जे उद्‌गार घातले आहेत, ते याला पूर्ण विरोधी आहेत: 'जयोऽयमजयाकारो भगवन् प्रतिभाति मे।' महाकाव्य लिहितांना अगदी शेवटी व्यासांच्या अनुभवविश्वात झालेला बदल, जीवनाचा अंतिम प्रत्यय या उद्‌गारात व्यक्त झाला आहे असंच म्हणायचं का? महाभारताची शोकात्म लय असाधारण आहे, असं दुर्गाबाई भागवत म्हणतात ते यामुळंच काय? इरावती कर्वे यांनीही आपल्या 'युगान्त' ग्रंथात अशाच अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. माझ्या दृष्टीनं या महाकाव्यातल्या व्यक्ती म्हणजे मरणाच्या सावलीत फुलणारी निबिड कांतारातली अशी जीवनपुष्पे आहेत, की ज्यांना मरणाचा मंद गंध अखंड येत राहतो. हे मृत्युतत्त्वच जीवनाचा अखेरचा अर्थ आहे का? पण हा प्रश्न मनात उपस्थित होत असतानाच, माझ्या कविमनाला असंही वाटतं की हे तितकंसं खरं नसेल. या गळणाऱ्या फुलांच्या पाकळ्यांत, त्यांच्या गंधकोषात, कुठं तरी फळही लपून बसलं असेल आणि ते विजनातल्या या फुलांच्या हाकेला 'ओ' देईल, अशी जीवनासंबंधीची श्रद्धा कविवर रवीन्द्रनाथ ठाकुरांनी एका कणिकेत व्यक्त केली आहे. त्यांचा हा अदम्य रोमँटिक आशावाद महाभारताच्या कठोर वास्तवापेक्षा मला अधिक जवळचा वाटतो. का? माझ्या मनात जाणवलेला अनुभवार्थ तसाच आहे: गुलाबाच्या फुलांवर उन्हात चमकणाऱ्या कोळिष्टकाच्या कलाबतूसारखा. कोळिष्टकाचं सोडा, पण ते फूल, ते ऊन क्षणभरासाठी का होईना खरं आहे ना?

या काव्याचं लेखन करीत असताना मला असं वाटत होतं की, अनुभवाची अज्ञात पट आपल्यासमोर उलगडत आहे. जीवनाचा सागरघोष ऐकू येत आहे. महाकवी व्यासांच्या वाणीचा पडसाद आसमंतात उठत आहे. 'ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष नच कश्चित शृणोति माम्' लेखनसमयीचा हा अनुभव, हा आनंद मला फार मोठा, मोलाचा वाटतो. त्या मानानं या शब्दाकृतीला दुय्यमच स्थान आहे.

आजकाल जीवनात एवढ्या प्रचंड घडामोडी घडत असताना मी भूतकाळात, पुराणात का धडपडतो, असा प्रश्न माझ्या वाचकांच्या मनात येणे साहजिक आहे. तूर्त त्यांना मी एवढंच सांगू इच्छितो,

की जीवनमरणाची एवढी विविध व विशाल परिमाणं, 'मिथ' च्या लयीला स्पर्श करणारी अर्थसधन परिमाणं, आजच्या धकाधकीच्या यांत्रीक व दुभंगलेल्या जीवनात मला आढळली नसतील!

गांधारी व श्रीकृष्ण यांच्या व्यक्तिरेखा साकार करताना कै. इरावती कर्वे आणि श्रीमती दुर्गाबाई भागवत यांच्या लेखांचा मला आधार मिळाला, हे मी कृतज्ञतेनं नमूद करीत आहे. मराठवाडा विद्यापीठाचे भूतपूर्व कुलसचिव प्रा. म. भि. चिटणीस यांच्याशी झालेल्या अनौपचारिक काव्यचर्चेतूनच दीर्घ काव्याची कल्पना प्रथम माझ्या मनात रूजली. त्यांनी या प्रकारच्या काव्यलेखनाला प्रथम प्रोत्साहन दिलं. अशा काव्यप्रकारातून प्रकट होणाऱ्या अनुभवांच्या कक्षांची जाणीवही मला झाली. डॉ. व. दि. कुलकर्णी आणि बाळ कुडतरकर यांचेही मला आभार मानले पाहिजेत. कै. दीनानाथ दलाल यांचीही या वेळी मला तीव्रतेने आठवण होते. या सर्व मित्रांच्या प्रेमळ व रसिक प्रोत्साहनातून मला लेखनाचं बळ मिळालं आहे.

महाभारतावरची ही नाट्यकाव्यं संकलित करण्याची कल्पना कॉन्टिनेन्टल श्री. अनंतराव कुलकर्णी यांची आहे. त्यांच्या या स्नेहशील सूचनेबद्दल व ती पुस्तकरूपाने सिद्ध करण्यासाठी त्यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

–वा. रा. कान्त

मरणगंध

कुंती

तिच्या सरस–आरस मांड्यात तो मरून पडला होता
आणि तिला रडू फुटत नव्हतं,
फुलत होतं मरणातही एक अद्‌भुत स्मित
राजाच्या मुखावर, जे बघता बघता
तिच्या डोळ्यांत दाटत होते अश्रूच आनंदाचे,
विसावला होता तिच्या कुचमंडलावर त्याचा एक हात
पिवळ्याजर्द आंब्यावरील शुष्क डहाळीसारखा,
सुखानं जड झालं होतं तिचं शरीर,
अजूनही फुलतच होते स्पर्शफुलांचे घोस
तिच्या अंगांगावर रोमवेलीतून,
दंशून झोपला होता फुंफाटणारा भुजंग
तिच्या पाठीच्या पन्हाळीत,
चढत्या विषाच्या गुंगीत कळत नव्हतं तिला
अंतर जीवन– मरणातलं,
धन्य आहे बाल्हिकी, तुझी
इतकी वर्ष सांभाळलं मी पंडुराजाला
पण शेवटी घात केलास तू,
मद्रराजकन्ये, हेवा वाटतो– या दुःखातही– तुझा मला
शेवटी तूच पाहिलाच तो तृप्तीचा आनंद
राजाच्या मुखावरून ओसंडणारा,
घामानं डवरणारा, चांदण्यानं बहरणारा,
छान एकांत साधलास, त्याला भुलवून
कसा घात केलास जाणूनबुजून,
देवा, निष्ठुरा, कसा निर्मिलास मरणगंध
हासऱ्या फुलांतच सुंदराच्या!
माद्री, चांडाळणी!–

माद्री

मी?– मीच चांडाळीण!
खरं आहे बाई, तुमचं म्हणणं
कशाला– कशाला केला मी तो श्वेतशृंगार?
जुईच्या फुलांची ती शुभ्र वेणी,
ती शुभ्र कंचुकी, अनावृत करणारी
झाकता झाकता गौर उरोजांना,
बर्फाचा– हर्षाचा तो शुभ्र पारा,
वितळणारा पर्वतावरून

अंधाराला गुदगुल्या करणारी मंद उन्हे शुभ्र पिसांची
पिसारा पांढरा फुलवून नाचणारा
लांडोरींना भोती भोती घुमवणारा
पांढरा शुभ्र, आनंदघन, उन्मत्त मोर,
क्षितिजावरून तरंगत येणारे
आनंदाला हुरहूर लावणारे
कापूरवड्याचे पांढरे मेघ,
श्वेतसुंदर सकाळ पेटत्या कापराची!–
यांनी– यांनीच ही आग लावली,
पांढऱ्या रंगांनीच ही करणी केली,
भुरळ पाडली मला–मीच चांडाळीण!
महाराज, मीच आपला घात केला
वनात आलात राज्यत्याग करून
शापित जीवन सुखाचं करण्यासाठी
आणि मी दुष्टेनं तुम्हाला मारलं
या वनात आणून, खरंच महाराज,
किती स्वार्थी मी, दुष्ट, हत्यारी!–
देवाऽ–

पंडु

नाही, माद्री, तू हत्यारी नाहीस
प्रिये, माझा तू घात केला नाहीस,
मुक्त केलंस मला मरणभयातून,
कुंती, मला नीट समजावून घे
मृत झालो आहे मी लौकिकात
मृणमयापासून वेगळा झालो आहे,
राग–द्वेष हे मातीचे गुण
सुटले आहेत आता माझ्यापासून
जळला तो कापूर, उरला तो सुवास!
खरं सांगतो कुंती,
माझीच इच्छा होती ती,
पण ती वासना नव्हती
देहाची केवळ आंधळी असोशी नव्हती
आत्म्याची हाक होती ती!
कुंती, तुला तीन पुत्र झाले, माद्रीलाही दोन मुले झाली,
पण त्यांत माझे एकही मूल नव्हते
सृजनाची माझी आकांक्षा अपुरीच राहिली होती
आपलं अस्तित्व चिरंजीव करण्यासाठी
आत्मप्रतिमा निर्माण करून,

काळाला, संहाराला आव्हान द्यायचं होतं मला
पार्थिवाची ही अनिवार जिद्द,
अशाश्वताला शाश्वताचं हे आव्हान
अपार्थिवाला पार्थिवाचं हे आश्वासन
म्हणजेच मानवी कामवासना
तारकासुरापासून स्वर्गाला वाचवण्यासाठी
देवांना उत्पन्न करावा लागला काम
शंकराच्या मनात!
परंतु मला भय वाटत होतं
त्या कामाचं, त्या आव्हानाचं–
किदमाचा शाप माथ्यावर घुमत होता:
अश्वाचं रूप घेऊन, पशु होऊन,
पार्थिवाला भिऊन, निसर्गाला लाजून,
सुंदराचा तिरस्कार करून–
(अजूनही माणसं हेच करतात)–
हा मुनी आपली वासना तृप्त करीत होता
एका अश्विनीबरोबर,
मृगया केली त्याची मी, नकळत, अजाणता
त्या अतृप्त कामानं शापलं मला संतापानं,
'संभोगातच तूही मरशील– माझ्यासारखा!'
तेव्हापासून स्त्रीला मी भिऊ लागलो
दूर दूर राहू लागलो
परंतु या भयानं
अपूर्ण, खुरटं होऊ लागलं जीवन,
मी जगत होतो, की फक्त मरण टाळीत होतो?
पण जगणं म्हणजे मरणाला टाळणं नव्हे
जगण्याचा माझा सारा विचार,
जीवनाचा सारा अर्थच इथं संपुष्टात येत होता,
नष्ट होत हाता, वाळणाऱ्या, वठणाऱ्या डहाळीसारखा,
आणि हा विचार जिथं संपतो,
तिथं सुरू होतो, उद्‌भवतो काम
रक्ताच्या उसळीसारखा
पौरूषाच्या लहरीसारखा:
जिच्यामुळं अंधाराच्या नसांतून तेज फुटून येतं
फांदीच्या हिरव्या शिरांतून फूल उमलतं.
त्याच शक्तीनं फुलून आला कण कण माझ्या देहातला.
नष्ट झाली माझी मरणाची भीती
धुंद दर्शनानं, हिच्या– माद्रीच्या मादक सौंदर्याच्या
भयमुक्त झालो मी!

सौंदर्यापुढं गळून जातं, जळून जातं मरणाचं भय,
नंतर झेपावतो पतंग ज्योतीवर,
किती सुंदर, किती अपरिहार्य
दहनाभिलाषा ही पतंगाची!
प्रत्येक पुरूषात मरतो रोज एक पंडु,
अतृप्त काम, सती जाते माद्रीही
रोज रोज प्रत्येक स्त्रीमध्ये
समजून घे मला कुंती,
माद्रीचा काही दोष नाही
कुंती, काही दोष नाही
काही दोष नाही–

माद्री

'सती जाते माद्रीही रोज रोज
प्रत्येक स्त्री मध्ये'–
महाराजांचाच शब्द हा. इथंच.
इथंच गुंतून पडले आहेत अजून
माझ्या आशेनं, थांबा, महाराज, थांबा,
ही मी आलेच एका क्षणात
सौंदर्यानं नष्ट होते मरणाची भीती,
म्हणून मरण टळत नाही.
ते टळलं असतं तर?–
तर मग सारं माधुर्यच नष्ट झालं असतं
जीवनातलं, स्वप्नातलं,
मरणाच्या देठावरच फुलतं फूल
स्वप्नाचं, सौंदर्याचं!
आज सकाळी हेच घडलं, असंच घडलं:
वसन्ताची उन्हं पसरली पर्वतावर,
वितळू लागलं शिखरावरचं बर्फ,
टेकड्याटेकड्यांतून ठसठसू लागली
पाण्यातून पाझरू लागली
विरही युगुलांची उत्कंठा–वेदना,
डोंगरदऱ्यांतून अवघडलेली,
फांद्याफांद्यावर फुलांचे बाण चढले
गाणे पक्ष्यांच्या गळ्यांत दाटले
महाराजांचंही मन अनिवार झालं
मला किंदमाचा शाप आठवला
भीतीनं काळजाचा थरकाप झाला
मी नको नको म्हणत होते

पण हेच ऐकेनात–
शंकराला दिलेलं मदनाचं आव्हान,
फळासाठी गळणाऱ्या फुलाची निर्भयता,
दिव्यावर झेपावणाऱ्या पतंगाचं वेड,
सारं, सारं महाराजांच्या अंगात संचारलं
पण, नंतर स्वत:च आवेगानं थरथरू लागले
त्यांना माझ्या बाहूंत मी कवटाळून धरलं
घाम पुसला ओठांनी त्यांच्या कपाळावरला
बोटं फिरवली त्यांच्या केसांमधून
त्यांचा सुगंध श्वासांत भरून घेतला
अगदी श्वासानं प्याले घटघटा
तो अनावर, उद्दाम मरणगंध!
अन् त्या सुगंधातून मी त्यांच्या अंतरात्म्यात शिरले
त्याच क्षणी विंधून गेले, भेदून गेले
ते माझा देह
मेघांत शिरणाऱ्या शलाकेप्रमाणे
विदेहाच्या वेगळ्या विश्वात,
शतचंद्र माझ्या डोळ्यांत उगवले
ओटीपोटांतून चांदण्याचे पाट वाहू लागले
फुलांनी डवरला कुंजातला अंधार
झुलु लागलो आम्ही सूर्य–किरणांवर
खाली–वर, खाली–वर
देहाचं गुरूत्वाकर्षण हरवून
केवळ उन्हे होऊन,
झुलता झुलता मी घामानं न्हाले,
त्यांच्या मुखावर तळपू लागली
एक नवी तृप्ती, एक नवा आनंद:
हजार चंद्रबिंबे पाण्यात हेलावणारी
पाझरले चंद्रमण्याचे माझे अंग अंग
आनंद, आनंद, अवघा आनंद
मुक्त झाले महाराज घोर शापातून, मरणाच्या भयातून,
हरवल्या दिशा, हरवला काल
त्वचेच्या रानात,
बेफाम क्षणात आत्मविसर्जनाच्या:
क्षण तो शहारता तीक्ष्ण पोलादाचा
चांदण्याच्या धारेचा
पार्थिवाच्या जयाचा–
जिंकले मरणाला
सुखानं क्षणभर मी डोळे मिटले

आणखी उघडले:
विलगच राहिले क्षितिजाचे विस्मित ओठ
लज्जित आरक्त अधरापासून पुरातन पृथ्वीच्या,

पहिलं चुबंन पृथ्वी–आकाशाचं अपुरंच राहिलं
पाण्यात चंद्रबिंब विरघळून गेलं
अंगावर कोसळलं
फुलांनी फुलणारं झाड, ऊर्ध्वमूल!
आक्रोशू लागली
उमलणारी, फुलणारी
अव्यय फुलं माझ्या देहातली
की माझ्या चितेतली
उद्याची, पेटती!

गांधारी

– गांधारी –

प्रवेश पहिला

स्थळः हिमालयाच्या शिखरांच्या कुशीतला एकांत आश्रम. पर्णकुटीच्या मागे हिरवे देवदार वृक्ष, भोवती बर्फाने झाकलेली उत्तुंग शिखरे, शुभ्र, मौन, लांब झऱ्याची खळखळ, खोऱ्यातून ढगांचे पुंज तरंगत वर येत आहेत. पाण्याच्या आवाजाबरोबर हिरव्या झाडांत वाराही वाजत आहे. बाकी सारे स्तब्ध नीरव.

पात्रेः धृतराष्ट्र आणि गांधारी

धृतराष्ट्र पर्णकुटीतून बाहेर येऊन ओट्याला धरून चाचपडत पुढे येतो आणि त्या झाडाच्या पारावर बसतो. आकाशाकडे पाहात. दृष्टिहीन डोळे चाळवीत काही हातवारे करतो. उगीचच स्वतःशी पुटपुटतो. काही साचल ऐकून मागे वळतो. मन अस्वस्थ, हालचाली अस्थिर, चेहऱ्यावर आठवणींचा ताण. ओट्यावरील झाडाच्या मागच्या बाजूने गांधारी येते. एका हाताने झाडाच्या बुंध्याला टेकून उभी राहते. हात अस्वस्थपणे झाडाच्या बुंध्यावर फिरत असतो. अंगावर शुभ्र पातळ, डोळ्यावर एक काळी पट्टी. तिच्या पायांचा आवाज ऐकून धृतराष्ट्र आपले उत्तरीय खांद्यावर नीट सावरतो. मग एकदम बोलतो–

धृतराष्ट्र – कोण? – विदुरराज?– कुंतीवहिनी?–
कोण आहे तिथं? कुणाची पावलं वाजली?

गांधारी – कुठं कोण आहे? मीच आपली–
मी– गांधारी.

धृतराष्ट्र – गां–धा–री– ? तू?

गांधारी – हो, मीच. गांधारी माझं नाव!
पण माझा गांधार
कधी लागलाच नाही
कंठात कधी तो फुललाच नाही.

धृतराष्ट्र – कसा लागेल, कसा फुलेल गांधारी,
तो गांधार?–मूग गिळून बसल्यावर,
डोळे मिटून घेतल्यावर?

गांधारी – वरून डोळे, महाराज, खरंच मिटले होते
पण अंतरात्म्याचा डोळा! तो उघडाच होता.

धृतराष्ट्र – काय, अंतरात्म्याचा डोळा!
हं: काय उपयोग आहे!
बाहेरचे डोळे मिटतात, तेव्हा
झाकले जातात अंतरात्म्याचेही डोळे–
प्रकाश नाकारणारे डोळे
ते चालवतात अंधाराचीच मिरास!

गांधारी – अंधाराची मिरास! पण स्वामी,
अंधाराचाच गाव तुम्ही आंदण दिला होतात मला!

धृतराष्ट्र – अंधाराचंच राज्य घेऊन,
मी जन्माला आलो

माझ्या गर्भसंभवाचे वेळी
घाबरून डोळे मिटले
माझ्या आईनं
त्या भयाचं, त्या क्षणाचं
आंधळेपण घेऊन
मी जगात आलो
माझं क्षितिज आंधळं
माझा सूर्य आंधळा
फुलंदेखील आंधळी माझी.
वाटलं– वाटलं होतं ही
माझी आंधळी फुलं
डोळे उघडतील
नाही तरी फुलाला फूलपण येतं
ते देखण्या, सुंदर फुलांच्या
डोळ्यांमुळंच
पण ते डोळे तू मिटून
घेतले होतेस.

गांधारी – नाही. आरंभी उघडेच
होते माझे डोळे
दवांनी न्हालेल्या फुलांसारखे
सूर्याची स्वप्ने घेऊन येणारे
स्वप्नांचा सुगंध भरून ठेवणारे
मनाच्या फुलाफुलांत– पण, पण–

धृतराष्ट्र – पण– असं काय झालं ?
झालाच ना संसार ?
दोन आंधळ्यांचा व्हावा तसा.

गांधारी – झाला झाला, नको इतका झाला.
पण जाऊ द्या महाराज, कशाला ती उजळणी ?
हूं: ऽ (सुस्कारा टाकते)

धृतराष्ट्र – का ? का हा सुस्कारा ? का हा दीर्घ नि:श्वास ?
वाईट वाटतं आंधळ्याशी लग्न झालं म्हणून ?

गांधारी– त्याचं नाही वाईट वाटत.
वाईट वाटतं खरीखुरी आंधळी झाले नाही, याचं.
साठ वर्षात हीच का पारख केलीत ?
त्यासाठी नाही सुस्कारा टाकला
अन् टाकून तरी काय उपयोग ?
जिथं सारं जीवनच झालं आहे एक दीर्घ नि:श्वास,
दीर्घ उसासा

एका युगांताचा

धृतराष्ट्र – युगांत! होय तेही खरंच
अंत झाला एका युगाचा
आणि त्याच्या भुताच्या सावल्यांसारखी
आपण बसलो आहोत या शुभ्र हिमालय पर्वतावर!

गांधारी – काही तरीच काय? इथं भुतं कशी राहतील?
ही स्वर्गभूमी, देवदेवतांचं निवास्थान हे.
पट्टी बांधली म्हणून,
नाही तर मी तुम्हांला दाखवली असती
श्री शिवभवानीची पावलं, इथं उमटलेली.

धृतराष्ट्र – त्यांचीच तर मी वाट पाहात आहे.
पण अद्याप नाही दिसली, कुणी दाखविली नाहीत
बरं ते जाऊ दे, काय म्हणालीस?
ही स्वर्गभूमी काय? देवदेवतांचं निवासस्थान!
छान्! म्हणजे आपणही देव झालो की अनायास!

गांधारी – हो तर! झालात देव!
आधी खाली पाहा पायाकडं, ते माखले आहेत,
अठरा अक्षौहिणी सैन्याच्या रक्तानं
अन् धमन्यांतून दाटलं आहे मृगजळ
महत्त्वाकांक्षेचं, हस्तिनापुरीच्या साम्राज्याचं!

धृतराष्ट्र – अन् तुझ्या डोळ्यांत मिटली आहे खोटी खंत
पांडवांच्या वनवासगमनाची,
द्रौपदीच्या वस्त्रहरणाची
खोटी लाज –

गांधारी – आणि तुमचं तरी काय?
पांडवाच्या सूडाचा डोंब अजून उरात उसळतो आहे
अंगाला लागलं आहे पाहा, अजून भस्म
चूर्ण केलेल्या भीमाच्या लोखंडी पुतळ्याचं
ते पुसा आणि मग सांगा,
तेवढं पुण्य आहे का पदरी?

धृतराष्ट्र – नसू दे, नसू दे, पण इथं आलं की वाटतं
आपण देवच आहोत, 'देवातात्मा!'
उगीच नाही म्हटलं त्याला हिमालय! अहाहा!

गांधारी – हिमालय– हिमगिरी!
खरंच किती सुंदर असेल नाही हा पर्वत!
बर्फानं झाकलेली उंच शिखरं
अंगाला स्पर्शणारे धुक्याचे रेशमी पदर,
विसरलेल्या हास्यासारखे, खळाळणारे, मुक्त निर्झर,
वाऱ्याच्या मनातील स्वप्नासारखा मंद सुगंध

देवदारांचा,
आणि हिरवीगार सूचिपत्रं
क्षणात कुजबुजणारी,
तर क्षणात सुस्कारणारी!–
त्या पानांवरून निथळणारी गुलाबी उन्हं:
माझ्या शंभर पुत्रांच्या मुखांवरून ओसंडणारी
कोवळी हास्यं:
खोल दऱ्यांतून क्षितिजाकडे झेपावणारे
शुभ्र पुंज मेघांचे!
अज्ञात संकल्प विश्वात्म्याचे तरंगणारे!
किती सुंदर असेल हे सारं!
वाटलं, वाटलं ही डोळ्यावरची
बांधलेली जन्माची पट्टी सोडावी,
मोडावी प्रतिज्ञा, अन् डोळे भरून पाहावं
हे सारं सुंदर जग, आपल्या मोडलेल्या व्रतासह!
तो व्रतभंगही सुंदर असेल नाही?

धृतराष्ट्र – सुंदर, असुंदर, प्रतिज्ञा, व्रतभंग!
कशालाच काही अर्थ उरला नाही
व्रतभंगही सुंदर ठरला असता गांधारी,
पण तो क्षण आता फार दूर गेला आहे.
आता उरले आहेत हिरवे सुस्कारे,
केवळ देवदारांचे!

गांधारी – देवदारांचे सुस्कारे, तीक्ष्ण टोकदार, हिरवे
हिरवेगार!
ते ऐकूनच मीही सुस्कारा टाकला. नकळत,
माहेरची आठवण झाली असावी मला

धृतराष्ट्र – म्हणजे! गांधारी, तू अजून पोळतेस
माहेरच्या आठवणींनी?

गांधारी – नाही, स्वामी, मुळीच नाही,
पुन्हा चुकलात आपण
माझी स्मृती चाळवली या हिरव्या सूचिपत्रांनी
उठली बारीक कळ, आठवण झाली मला
ती माहेरच्या माणसांची नव्हे,
गांधारच्या प्रदेशाची, माझ्या जन्मभूमीची
लाजाहोमाची ज्वाला
फुलवली मी फुंकरीनं, त्या क्षणीच
जाळून टाकली, त्या लाह्यांबरोबरच, माझ्या
माहेरची आठवण,
भावाशीही कधी बोलले नाही

महालातल्या महालात राहून,
पण अक्रोडाचे ते विशाल वृक्ष,
त्यांच्या घनदाट छाया, तुरट-हिरवे-कच्चे बदाम,
पानजाळीतून झळकणारे लाल केशरी दिवे,
पक्क्या सफरचंदाचे
अजूनही मला बोलावतात, साद घालतात
या भग्न एकाकी जिवाला,
शंभर मुलांच्या मृत्यूचे स्मशान झालेल्या
या उद्ध्वस्त हृदयाला!

धृतराष्ट्र – बरंच दिसतं की या माझ्या 'पट्टीच्या' आंधळीला
अक्रोडांच्या छाया,
फळांचे रंग, सफरचंदांच्या ज्योती!-

गांधारी – दिसत नाहीत, ऐकू येतात स्वामी,
ऐकू येतात रंगाचे नाद, प्रकाशाचे ध्वनी-
सारी सुखं, सारी, स्वप्नं रचीत आले मी,
शब्दांच्या रेघांनी ध्वनींच्या रूपांनी:
शंभर पुत्रांना जन्म दिला मी
पण त्यांना मी पाहिलं नाही, फक्त ऐकिलं.
त्यांचं हसणं, त्यांचं रडणं,
त्यांचे जयनाद, त्यांचे आनंद-कल्लोळ,
त्यांचं आक्रंदन, आणि शेवटी-
त्यांच्या मरणाच्या किंकाळ्या-शंभर किंकाळ्या!
एक नव्हे, दोन नव्हे, शंभर किंकाळ्या!-

धृतराष्ट्र – शांत हो, गांधारी, शांत हो,
थोडा विचार कर, ही विपत्ती, ही दुःखं
तुझी तूच ओढवून घेतली नाहीस का?
ह्या तुझ्या आंधळेपणाप्रमाणे-

गांधारी – नाही, नाही, महाराज, हे आंधळेपण-
मी माझ्यावर ओढवून घेतलं नाही,
लादण्यात आलं ते माझ्यावर.

धृतराष्ट्र – लादण्यात आलं? कुणी लादलं?

गांधारी – तुम्ही! तुम्ही लादलंत ते माझ्यावर.

धृतराष्ट्र – मी? मी लादलं?

गांधारी – हो, तुम्हीच लादलंत,
फसवलंत तुम्ही मला,
असह्य फसवणूक. अघोर वंचना,
साऱ्या दिशा झाकोळल्या
दिवे विझले, फुले मिटली, मिटले माझेही डोळे
गच्च-गच्च! -भयानं

विस्मयांन, भविष्याच्या भयाण जाणिवेनं.
फुलांचं हसणं बघवलं नाही
डोहातलं चांदणं पाहवलं नाही,
त्या फुलांत साप फुंफाटत होता,
विषदंत शिवशिवत होता! चांदण्यात
का केलात माझा असा विश्वासघात?

धृतराष्ट्र – विश्वासघात!–
मी केला नाही, मी केला नाही गांधारी,
मीच शोधीत होतो विश्वास
कुणाच्या शब्दांत, कुणाच्या स्पर्शात–

गांधारी – शब्द, स्पर्श! महाराज,
सारंच खोटं, सारंच फसवं.
शब्द कानाशी संपतो
स्पर्श त्वचेशी थांबतो
पुढे हृदयात सारा अंधार, नि:शब्द निर्जन अंधार!
अजून, अजून, आठवते ती दुपार
हस्तिनापुरीची, पिवळ्या केतकीची
धुंद, सुस्त, आळसावलेली उन्हं
फांद्याफांद्यातून लोंबत होती,
मोत्यांच्या मुंडावळ्यांसारखी!
तटाशी यमुना पेंगत होती
गोपुरं डुलकी घेत होती
नदीच्या गळ्यात गळा घालून
सारं शांत, निस्तब्ध, तरीही हुरहूर लावणारं:
ऊन सावल्यांचं संगमर्मरी फूल!
तडा गेला त्या संगमर्मराला,
भूकंपाची लहरच सरसरत गेली पायांखालून
सारी तनू थरथरली भीतीबरोबर,
पायऱ्यांवरून दासी धावत आली, ओरडली
'घात झाला, पोरी, घात झाला!'

(प्रवेशांतर संगीत)

प्रवेश दुसरा

स्थळ: हस्तिनापुरीतला महाल.

अलकावती– घात झाला, पोरी घात झाला
हस्तिनापूरचा थोरला राजकुमार
तुझा भावी पती जन्मांध निघाला,
राजकुमारी, बेटी, पुरा घात झाला.

गांधारी (तरूणपणातली) काय म्हणतेस ? म्हणतेस काय अलकावती ?
असं कसं होईल ?– फसवतील
असं ?–
कोण ?– कशासाठी ? नाही,
अलकावती, तुझीच काही तरी भूल आहे.
काय ऐकलंस ?– कोण बोललं ?–
पण नाही ! नाही, असं होणार नाही !

अलकावती– पण असं झालं आहे, राजकुमारी.

गांधारी – नाही ग खरं वाटत नाही, अलकावती,
विश्वास बसत नाही माझा या कानांवर.

अलकावती– राजकुमारी, पोरी, माझ्या लाडक्या बाळे,
आता कानांवरच विश्वास ठेवावा लागेल
डोळ्यांनी फसवलं आहे.
अंधाचीच होशील सहधर्मचारिणी तू
खरं आहे, लाडक्या बाळे, खरं आहे हे–
आपली वंचना झाली आहे–
वंचनेचाच साखरपुडा होता तो !
कौरवांचा राजकुमार जन्मांध आहे
खरं आहे गांधारी, मी खरं तेच सांगते आहे–
तू दुर्दैवी आहेस, अन्
कौरवांचा राजकुमार तुझा वाग्दत्त पती
जन्मांध आहे.

गांधारी – जन्मांध आहे ! जन्मांध आहे तो ?
माझा भावी पती, जन्माचा सोबती,
कौरवांचा भावी सम्राट !– खरं आहे हे ?
मग त्यांनी तसं का सांगितलं ?
का लपवून ठेवलं ?
का केली अशी माझी भयंकर फसवणूक ?
खरं का सांगितलं नाही ?

अलकावती– आता का सांगितलं नाही ?–
कोण सांगतो बाळे, आपलं व्यंग ?
पुन्हा ते राजाचं व्यंग !
यालाच राजकारण म्हणतात पोरी !
राजकारणानं बळी घेतला ग तुझा !
बळी घेतला

गांधारी – राजकारण? राजकारण होतं ते!
मुलीचं लग्नकार्य! धर्मकार्य–नव्हतं ते?
तरी पण का सांगितलं नाही– का? अं?
मी बाबांना विचारते, दादाला विचारते,
प्रत्यक्ष भीष्मपितामहांना विचारते,
मला का सांगितलं नाही?
अलकावती– राजकुमारी, का ते कळणार नाही
अन् ते कुणीच सांगणार नाही.
बाळे, अजून तू लहान आहेस,
पराधीन असतो स्त्रीचा जन्म
पुरूषांनी करावं आणि आम्ही भोगावं
हेच स्त्रियांचं जीवन. पुन्हा–
कोण कशाला सांगतील?
आम्हीच शोध घ्यायला पाहिजे होता,
ते आम्हीच आंधळे बनलो,
गांधारी – कशानं?
त्यांच्या संपत्तीनं? त्यांच्या वैभवानं?
की, त्यांच्या राजविलासी मधाळ शब्दानं?
वस्त्रांच्या भेटी! रत्नांचे नजराणे!–
मला काय माहीत त्यांचेही डोळे
दृष्टिहीन आहेत त्या तेजाळ रत्नांसारखे!–
की, ते डोळेच मदांध आहेत, आंधळे झाले आहेत,
सत्तेच्या कैफानं, बळाच्या, पराक्रमाच्या
अहंकारानं!
नाही, त्या दृष्टिहीन रत्नांना,
मदांध डोळ्यांना, नाही–नाही
मी अशी शरण जाणार नाही,
वाकणार नाही ह्या अंध बळापुढं
गांधारराजकन्या
जा, अलकावती, जाऊन सांग त्यांना:
मी अंधाशी लग्न करणार नाही.
होणार नाही हे लग्न.
शकुनी – (प्रवेशून) कोण म्हणतो हे लग्न होणार नाही
म्हणून?
हे लग्न झालंच पाहिजे,
होऊन राहील.
गांधारी – काय दादा? काय म्हणतोस हे शकुनीदादा?
अरे, मी काय फासा आहे द्यूताचा! दादा,
तुझ्या हातातला,

तुझ्या इच्छेप्रमाणे पडायला!
म्हणे हे लग्न झालंच पाहिजे!
कोण तू लग्न करणार माझं? माझ्या मनाविरूद्ध?
नाही, शक्य नाही ते.
मी आंधळ्याला वरणार नाही.

शकुनी – वरणार नाहीस तू आंधळ्याला?

गांधारी – नाही. माझी इच्छा नाही.

शकुनी – गांधारी, कोण विचारतो तुझ्या इच्छेला?
स्त्रीला स्वत:ची इच्छा नसते
ती असते स्वत:च नुसती इच्छा:
एखाद्या पित्याची, एखाद्या भावाची,
किंवा अज्ञात पतीची वा अजात पुत्राची!
नुसती इच्छा, मुकी अजाण!
गांधारी, करावंच लागेल तुला हे लग्न
शब्द दिला आहे मी कौरवांना.

गांधारी – असशील दिला शब्द तू कौरवांना,
भाळला असशील तू त्यांच्या वैभवाला!
भ्याला असशील तू त्यांच्या सामर्थ्याला!
पण दादा, विवाह माझा आहे, मान्य नाही
मला तो,
शरण जाणार नाही मी अशा वंचनेला
तुझ्यासारखी!

शकुनी – शरण! वंचना! व्यर्थ, निरर्थक शब्द!
स्वत:चा अर्थच नसतो ह्या शब्दांना
दुबळ्यांना जी वंचना वाटते, तो–
तो अधिकार असतो समर्थांचा.
हूं: वंचना–कसली वंचना?

गांधारी – वंचनाच नाही तर काय दादा?
तुला हे माहीत होतं साखरपुडा होण्यापूर्वी?
खरं सांग, दादा.

शकुनी – हो, गांधारी, मला हे माहीत होतं.

गांधारी – हाय रे दुर्दैवा! त्याला हे माहीत होतं!

शकुनी – गांधारी, मला हे माहीत होतं,
तू सम्राटाची राणी होणार आहेस,
हस्तिनापूरची सम्राज्ञी!
इंद्रानंही हेवा करावा असं वैभव
अशी सत्ता– तुला मिळणार आहे,
हे मला माहीत होतं–
अंध असला म्हणून काय झालं?

तुझ्याच हाती येणार आहे सारी सत्ता.
त्या आंधळ्यासह! नाही, तसं नाही.
मला म्हणायचंय सत्ता तशी थोडी आंधळीच असते!
नाही का? सम्राटाचा साखरपुडा!
गांधारी, मोठी भाग्यशाली आहेस तू.
साऱ्या साम्राज्याचा साखरपुडा–

गांधारी – साम्राज्याचा साखरपुडा! दादा,
विषाचा पुडा आहे तो मला.
साम्राज्य–वैभवानं तुम्हाला दिपवलं,
सत्तेच्या लालसेनं तुम्हाला भुलवलं.
हिऱ्यामोत्यांनी मढवलंत, म्हणून तुम्ही मला
मिरवत आणलंत, भावी वधू म्हणून
जपून– जपून, पालखीमधून,
डोळ्यातल्या बाहुलीसारखी!–
हसत असतील मनातून मला,
ते पालखीचे भोई,
त्यांना माहीत होतं, तुला माहीत होतं,
साऱ्यांना माहीत होतं,
माहीत नव्हतं फक्त मला
आंधळा आहे माझा भावी पती.
हस्तिनापूरची राणी म्हणून मी थाटात मिरवत
होते,
ते मला मनात हसत होते.
म्हणत होते, एक भिकारीण चाललीय
राणी व्हायला' आंधळ्याची राणी!
पैशाला विकलेली, सत्तेला भुललेली!
एक आंधळी भिकारीण!
किती अपमान, किती विटंबना!
मला हे त्यांनी का सांगितलं नाही?
का लपवून ठेवलं माझ्यापासून?
वंचनाच ही नाही तर काय?
विश्वासघात!
नमणार नाही कधी मी या विश्वासघातापुढं.

शकुनी – पण भीष्मापुढं ही मान लववावीच लागेल.
गांधारी, मोडायची नसेल तर!
भीष्माशी वैर परवडणार नाही
संहार होईल गांधारकुलाचा
बांधून नेतील तुला रथाला,
राजकुमारीची दासी करून

नाही तर मरावं लागेल
अंबेसारखं रानात जळून
आणि मोडून पडेल आमचा शब्द,
आमच्या मानांबरोबर,
विच्छिन्न राजदंडासारखा
पराभवाच्या धुळीत, भीष्माच्या पायाशी.
नाही, नाही, आमचा शब्द, गांधारांचं वचन,
खडा पाषाण हिंदुकुशाचा! अटळ!

गांधारी – आणि त्याच पाषाणावर
डोकं आपटून मीही मरेन शेवटी
हाय – आई ऽ–

अलकावती– धावा, धावा शकुनी महाराज,
धावा, सांभाळा राजकुमारीला,
कोसळली ती भोवळ येऊन–
धावा धावा
(प्रवेशांतर संगीत)

प्रवेश तिसरा

स्थळ – पुन्हा पहिल्या प्रवेशातला हिमालयातील आश्रम.

गांधारी – त्या भोवळीनं मिटलेले डोळे
पुन्हा कधी उघडले नाहीत.
तशीच बोहल्यावर चढले, वावरले सदा
आंधळी म्हणून तुमच्या भोवती, तुमच्याबरोबर,
पट्टी बांधून, आचरलं मी
आंधळ्याचं व्रत, आपल्या पतीचं
नाकारलं मी सारं जग आणि जीवन,
जे नाकारिलं होतं–
माझ्या पतीला, परमेश्वरानं,
पण खरं सांगा मी तुमचा
काय अपराध केला होता?
का ही कठोर शिक्षा मला दिलीत?

धृतराष्ट्र मी नाही दिली तुला ही शिक्षा
सांगितलं नाही मी तुला डोळे बांधायला,
असं धडपडायला, आंधळ्यासारखं,
अपेक्षा होती तू होशील माझी–
आंधळ्याची काठी, माझा सुंदर स्वप्नदीप,
पाहीन म्हटलं मी हे जग त्या प्रकाशात
तुझ्या डोळ्यांनी:
फुलं, तारे,

झुळझुळते झरे, रंग मावळतीचे, उगवतीचे,
चेहरे मुलांचे, ध्वज विजयाचे, साम्राज्य पृथ्वीचं.
सौख्य स्वर्गाचं–
पण छे!
तूही काही कमी शिक्षा केली नाहीस मला.
तू आपलं दु:ख बोलून दाखवलंस,
सांगता येत नाही मला आपली वेदना
तुझ्याही जवळ–
तुझ्या मीलनाची ती पहिली रात्र!–
(प्रवेशांतर संगीत)

विदुर – ती पहिली रात्र, संपून संपत नाही,
ती पहिली, रात्र ! डोळ्यांच्या काठाची,
यमुनेच्या डोहाची, चांदण्यातल्या रासाची,
त्वचेच्या रानात हरवल्या गाईंची,
ती पहिली रात्र– संपून संपत नाही,
पण धृतराष्ट्रा,
तू तर चक्क उठून बसला आहेस
त्या पहिल्या रात्री, एवढ्या सकाळी,
महालाबाहेर
धुक्यात हरवलेल्या कदंबवृक्षासारखा विरक्त,
ज्यावर टांगली होती गोपींची वसनं–
रासाच्या रात्री–

धृतराष्ट्र – गोपींची वसनं, कदंबवृक्षावर!
होय, विदुरा, तसाच उभा होतो मी
केवळ मिरवीत रेशमी वस्त्रं रात्रभर अंगावर!
एकही पान शहारत नव्हतं
उष्ण रक्त उसळत नव्हतं,
डहाळ्या–डहाळ्यांतून फुलं फुलविणारं!
साऱ्या रात्रीच्या चिंध्या चिंध्या झाल्या–

अलकावती– असं काय म्हणता महाराज?
मीच आणलं राजकुमारीला
हात धरून, हळुवारपणानं शय्यागृहाच्या एकान्तात

धृतराष्ट्र – एकांतात! एकांत कसला?
एकांत नसतो आम्हा आंधळ्यांना
उघड्यावर चालतं त्यांचं सारं जीवन
कुणाच्या तरी नजरेच्या पाहाऱ्यात
एकट्याचा, केवळ आपला म्हणता येईल असा,
एकही क्षण नसतो त्यांना.
उघड्यावरच फुलं फुलतात,

पण त्यांचा उमलण्याचा क्षण
कुणी पाहिला आहे का ?
नाही, उमलण्याचा तो गूढ नाजूक क्षण
कुणीच पाहिला नसतो
जगाच्या भेदक नजरेतून निसटला असतो,
वाचला असतो, गूढ अज्ञातच राहतो,
उमलण्याचा तो सर्जनशील क्षण!
पण आम्ही आंधळे–
आमचं सर्वच उघडं नागडं–

विदुर – असं वैतागू नकोस, रागावू नकोस धृतराष्ट्रा,
काय घडलं ते तर सांगशील ?

अलकावती– काय घडायचंय महाराज (हसत)
घडणारंच घडलं असेल

विदुर – गांधारच्या दासीनं, इथं,
कौरवांची मर्यादा सांभाळली पाहिजे, अलकावती.

अलकावती– क्षमा असावी महाराज, मी म्हणत होते
राजकुमारीला मीच पोचवलं शय्यागृहात.
मंचकावरून उतरताना मात्र त्या पडल्या.
पण जाऊ दे ते– मी सांगत होते
शय्याही मीच सजविली होती
रात्र कशी जांभया देत होती! निळ्या आकाशी रेशमी
पडद्यातून.
शय्येवर नाजूक फुलांची जाळी
त्यांच्या रंगांची भुलावण
त्यांचं सुगंधी आमंत्रण
नेत्रांना सुखद जडता आणीत होतं,
गात्रांत एक वादळ निर्माण करीत होतं
रक्तात वीज जागवीत होतं–वीज!
ती वीज अधीर झाली होती.
बेभान मेघाच्या मिठीत चमकायला, चिरडायला–

धृतराष्ट्र – बरोबर बोललीस अलकावती.
ती वीज चिरडलीच गेली
आणि मागे उरली एक जखम, एक जाळ–

विदुर – असा कोड्यात बोलू नकोस कुरूराजा,
काय झालं ते सरळ सांग
जखम बुजवून टाकू, जाळ विझवून टाकू
गांधार आधीच रागावले आहेत, दुरावले आहेत.
तुझी रूष्टता कळाली तर, त्यांना अधिक दु:ख होईल
वंचनेच्या व्रणावर अपमानाचं मीठ चोळलं जाईल.

धृतराष्ट्र – विदुरा, त्याची काळजी नको
हे दु:ख मी आपल्याजवळच ठेवणार आहे.
पण एवढं मात्र खरं विदुरा,
काही जखमा बुजत नाहीत,
विझत नाहीत काही जाळ–
होय जाळ!– सद्‌गुणांनी पाजळलेले,
प्रतिज्ञेनं पेटवलेले
त्यागानं, नि:स्वार्थीपणानं शिलगावलेले!
ही गांधारी, त्या दिवशी – ही गांधारी
डोळे बांधून बोहल्यावर चढली
मला त्याचं काही वाटलं नाही,
वाटलं जाईल हा वेडा हट्टीपणा
पण काल, पहिल्या रात्री
ती पुन्हा डोळे बांधूनच आली
शय्यागारात–
जिथे अंधाराला नक्षत्राचे नेत्र फुटतात,
सुलोचना होतात आंधळ्या वासना!
विश्वाचं सारं रहस्य ज्या गूढ गडद रात्रीत
देखणं, डोळस होतं,
तिथे ही डोळे बांधून आली!
मला वाटलं होतं, तिनं हसत हसत यावं,
ओठांनी, डोळ्यांनी, अगदी सर्वांगांनी
तिनं हसत यावं
आणि मी तिचे हसरे ओठ ओठांनी मिटावे,
तिनं हसत आपले डोळे झाकून घ्यावे
चुंबनावेगानं,
आणि अशा क्षणी स्त्री आपले डोळे का मिटते
याचं रहस्य तिनं नंतर सांगावं
मला आंधळ्याला, आपले सुंदर डोळे मिचकावीत.
मला ते डोळे दिसले नसते
पण त्यावरून मी आपली बोटं फिरवली असती,
स्पर्शानं भोगिली असती,
ती सुंदर उघडझाप
त्या श्रांत, तृप्त डोळ्यांची, मीलनाच्या रहस्याची!
नवसंभवांच्या क्षणाची

विदुर – पण कौरवेश्वरा,
असं रागावून कसं चालेल?
समजावून घ्यायला हवंस तिला तू,
अरे, ती व्रतबद्ध होती

तुला वर्ज्य ते तिलाही वर्ज्य होतं,
आंधळ्यानंच वावरायचं, ठरवलं,
दान दिलं तिनं आपल्या डोळ्याचं, दृष्टीचं, तुझ्या प्रेमासाठी.

धृतराष्ट्र – माझ्या प्रेमासाठी! नाही विदुरा,
आपल्या मोठेपणासाठी!
त्यागाच्या बडिवारासाठी
पातिव्रत्याच्या प्रदर्शनासाठी,
तिनं माझ्या भावनेचा चुराडा केला
मी जन्मांध होतो,
सवय होती मला आंधळेपणानं वावरायची
तिच्या शरीराला तशी सवय नव्हती,
सतीपणाच्या अट्टाहासात ती रंगमहाली आली
आणि धसमुसळेपणानं–
निसटला पूर्तीचा, तृप्तीचा
तो क्षण–

अलकावती– पण महाराज क्षमा करा मला,
तुम्ही तिला सांगितलं का? मोकळेपणानं,
आपल्या भावना बोलून दाखवल्या का?
तुम्ही तिला सांगायचं होतं, विनवायचं होतं–
मानला असता तिनं तुमचा शब्द.

धृतराष्ट्र – दासी, बोललीस पुन्हा तू,
कैवार घेऊन धनिणीचा
का विनवायचं होतं मी तिला?
तिला माझं हृदय कळत नव्हतं?–
आणि ती माझा शब्द मानणार!
सतीपणाचा कैफ चढला होता ना तिला–
सतीपणाचा तोरा आड आला तिचा

विदुर – पण कौरवेश्वरा, तुझं राजेपण! ते कुठं गेलं होतं?
तू राजा होतास, आपल्या राजधानीत होतास,
आणि ती तुझी प्रजा होती,
आज्ञा करायची होतीस,
ओरबाडून काढायची होतीस ती पट्टी–

धृतराष्ट्र – विदुरा,
मला अधिकार वापरायचा नव्हता
बळाचा उपयोग करायचा नव्हता
तिनं आपणहून ते करायला हवं होतं.
माझं मन ओळखून,
माझं प्रेम पारखून. पण ती–
सतीपणाच्या अभिमानानं चेतली होती

प्रतिज्ञेच्या चुडानं पेटली होती
पातिव्रत्याच्या, नाही, –सूडाच्या
ज्वाळेनं जळत होती,
किती भयानक होती ती रात्र,
तो शृंगार, वाटलं,
वाटलं, गळा दाबून प्राण घ्यावा तिचा!
(प्रवेशान्तराचं वाद्यसंगीत)

प्रवेश चवथा

स्थळः **हस्तिनापुरातच - पन्नास वर्षांनी**

गांधारी – बरं झालं असतं,
गळा दाबून प्राण घेतला असता त्या रात्री, तर–
बरं झालं असतं, फार बरं झालं असतं
पुढचं सारं महाभारत टळलं असतं.
हे वैर, हे युद्ध, हा संहार, हे दुःख
सारं, सारं टळलं असतं
परंतु तेव्हा यांना गळा दाबायची बुद्धी झाली नाही
अन् मलाही, विदुरा, पट्टी सोडायची बुद्धी झाली नाही
पण आज मी पट्टी सोडणार आहे– आणि
खरं सांगू विदुरभावोजी–
आता खरं सांगायला काही हरकत नाही–
सुख दुःख सर्व वाहून गेलं
जय–पराजय सारखे झाले
तिथं आता कशाला भ्यायचं?
विदुरभावोजी, खरं म्हणजे यांना–
यांना मनातून तसं वाटतच नव्हतं

विदुर – म्हणजे! कसली भलतीच कल्पना
गांधारी वहिनी, तुमची–

गांधारी – खरं तेच सांगतेय–
मी पट्टी सोडावी, असं यांच्या मनातच नव्हतं.
दुर्योधन जन्मला तेव्हाची गोष्टः
किती तळमळत होतं माझं मन पुत्रमुख पाहायला
मांडीला त्याचा फुलाचा स्पर्श जाणवत होता
बोटांतून रेशमी जावळ भुरभुरत होतं
त्याचे अर्थहीन बोलः जिवाला सुखवीत होते
अधीर करीत होते,
हृदयाशी धरून त्याला पाजवताना
सर्वांगाचे डोळे होत होते,

अन् पंचप्राण बंद डोळ्यांतून फुटू पाहात होते,
पण यांनी कधी म्हटलं नाही,
पट्टी सोड म्हणून–
ह्यांच्या मनातच नव्हतं,
माझा मत्सर वाटत होता यांना
मुलाचं मुख मला पाहता येत नाही
याचा आनंदच होत होता यांना

विदुर – गांधारी वहिनी, ही तुमची काहीतरीच कल्पना
नयनहीन असला, तरी इतका हृदयहीन नाही
हा आमचा धृतराष्ट्र.

गांधारी – तुम्ही म्हणा तसं. मी नाही म्हणणार.
मी सांगत्ये, यांना माझी वंचना केली होती
तरी हे म्हणत होते
डोळे बांधून मी त्यांचा सूड घेते म्हणून
आणि हेच माझा असा सूड घेत होते–
माझ्या शब्दानं, माझ्या कृत्यानं
माझाच गळा ते आवळीत होते! शेवटी– शेवटी–
काय झालं पट्टी सोडली नाही म्हणून?
दु:ख पाहायचं थोडंच टळलं नशिबातलं?

अलकावती– शांत हो, राजकुमारी शांत हो,
काय होणार आहे, आपल्या दैवाचा दोष
दुसऱ्याच्या कपाळी घासला म्हणून?

गांधारी – शांत कशी होऊ अलकावती?
आणि ए– तू मला राजकुमारी काय म्हणतेस?
चांगली राणी झाले! सम्राज्ञी झाले
हस्तिनापूरची!
आई झाले, सासू झाले. आजी–पणजीही झाले,
तरी अजूनही तू मला राजकुमारीच म्हणतेस?–
पण मी आज राजकुमारीही नाही,
एक पराभूत स्त्री आहे मी– एक पराभूत स्त्री!
माझी नव्याण्णव मुलं मेली आजपर्यंत
एकाचंही तोंड मला पाहता आलं नाही
येणारा प्रत्येक दिवस,
माझ्या हृदयाचा लचका तोडूनच उगवतो
प्रत्येक पहाटेला मी घाबरून विचारते
'किती उरले आज? ' 'किती उरले?–'

विदुर – पण महाराणी, हा तुमचाच दोष नाही का?
तुमच्या पापाचंच फळ नाही का?
पांडवांशी युद्ध करू नका,

त्यांचा न्याय्य वाटा देऊन टाका त्यांना,
त्यांच्यावर अन्याय करू नका,
परोपरीनं सांगितलं, पण तुम्हांला पटलं नाही
खोट्या कपटी द्यूताला तुमची संमती होती,
पांडवांच्या वनवासाचे तुम्ही मूक साक्षीदार होता,
भरसभेत द्रापैपदीची विटंबना झाली,
प्रत्यक्ष तुझ्या सुनेला विवस्त्र करण्याचा
घाट घातला तुझ्या पुत्रांनी
तरीही तुझं हृदय हललं नाही,
तुझ्या डोळ्यांवरची पट्टी
किंचितही ढळली नाही, गांधारी –

गांधारी – ढळून तरी काय उपयोग होता विदुरभावोजी ?
आमच्या मुलांचे अपराध
दिसत का नव्हते आम्हाला ?
पण आम्ही त्यांचे मातापिता होतो,
न्यायाधीश नव्हतो.
त्यांना विरोध करणं,
पापापासून विनाशापासून त्यांना वाचवणं,
शक्य नव्हतं आम्हाला
त्यांच्याबरोबर चिरडून नष्ट होणंच
फक्त आमच्या हाती होतं
त्या सर्वनाशाच्या क्षणाचीच
प्रतीक्षा करीत आहे मी आज.

विदुर – डोळे बांधून ?

गांधारी – हो, डोळे बांधून.
एवढा मोठा विनाश पाहायची, आज
शक्ती नाही या उघड्या डोळ्यांत !

विदुर – असं होतं तर, मग गांधारी,–
मघाशी कशाला दोष दिलास धृतराष्ट्राला ?

गांधारी – दोष नाही देत विदुर भावोजी, आता
त्यांची इच्छा म्हणून मी पट्टी सोडणार नाही
मी आज पट्टी सोडणार आहे, ती
त्यांची अवज्ञा करण्यासाठीच
माझ्या मुलाला डोळे भरून पाहणार आहे मी
माझा मुलगा – माझा पहिला– (हुंदका)
आणि तोच आता शेवटला, एक–उरलेला मुलगा,
इतक्यात इथं येणार आहे
त्याला पहिल्यांदा आणि शेवटचा मी बघणार आहे,
त्यांना न विचारता, आपल्या मनानं.

विदुर – काय दुर्योधन इथं येणार आहे ?
युद्धभूमीवरून ?
गांधारी – होय, त्यानं कृपाला अभिषेक केला आहे
सेनापतीपदाचा
आणि आता तो इथं येणार आहे
माझा सुयोधन इथं येणार आहे
माझ्या भुक्या डोळ्यांचं पारणं फेडणार आहे
तो जन्मला तेव्हा फार पाहावंसं वाटलं होतं त्याला,
पण माझ्याच शपथेत मी गुंतले होते,
आशाळभूतपणे वाट पाहात होते
यांच्या एका शब्दाची
पण तो एक शब्द यांनी नाही उच्चारला,
नाही उच्चारला!–
मीही माझ्या इच्छा
मनातच चिणून टाकल्या!
पण आज ते व्रत मी मोडणार आहे
माझ्या बाळाला एकदा पाहणार आहे
बोलावलं आहे इथं मी त्याला
ये, बाळा सुयोधना ये, किती उशीर हा!
तुझ्या आईच्या म्हाताऱ्या डोळ्यांत
आता फार त्राण उरला नाही रे–
दुर्योधन – (प्रवेशून) हा आलो मी आई, इकडे पाहा,
तुझा सुयोधन तुझ्यासमोर उभा आहे.
अलकावती– अग बाई, खरंच दुर्योधनमहाराज,
पण असे कसे ? सारी राजवस्त्रं काय केली ?
दुर्योधन – मी दुर्योधन वंदन करतो विदुरतातांना.
विदुर – सुयोधना, वत्सा तुझा विजय असो!
दुर्योधन – माझा अजून पराभव झालेला नाही, तात!
विदुर – पण हे काय सुयोधना, का त्याग केलास असा
राजचिन्हांचा, तुझ्या राजवस्त्रांचा!
दुर्योधन – आई, तुला वंदन करतो आहे.
तुझा सुयोधन.
गांधारी – कुठं,कुठं, आहे माझा सुयोधन ? माझा बाळ ?
बाळा, ही पाहा मी पट्टी सोडली.
ये बाळा, माझ्याजवळ ये असा
तुझ्या अंगावरून हात फिरवू दे मला
कुरवाळू दे, हुंगू दे तुझं मस्तक
बाळा, मला स्पष्ट दिसत नाही रे,
जवळ ये ना जरा,

माझ्या डोळ्यांना आजच जन्मलास तू
जन्मत: जसा होतास,
तसाच तुला पाहायचा आहे मला, तसाच,
अगदी तसाच.

दुर्योधन – हा मी इथं उभा आहे आई
तू सांगितलं तसाच आलो आहे,
अगदी जन्मलो तसा!

गांधारी – विजयी हो बाळा, ये, जवळ ये,
डोळे भरून पाहू दे तुला
निवू दे तहान माझ्या डोळ्यांची,
या तान्हेल्या, भुकेल्या डोळ्यांचं सारं पुण्य,
माझ्या व्रताचं सारं फळ मी तुला देणार आहे.
वज्रदेही करणार आहे तुला एका दृष्टिक्षेपात!

दुर्योधन – म्हणूनच मी असा आलो आहे–
सांगितलं तसा, अगदी जन्मलो तसा आई.
माझ्या या धृष्टतेबद्दल
मला क्षमा करा, तात.
मरणही कसं निर्लज्ज बनवितं तात, माणसाला!
छे, नको होता तात,
असा भित्रेपणा करायला मी,
विजयातही टोचत राहतील काटे होऊन
ही फुलं!

गांधारी – (पट्टी सोडून पाहात) ही फुलं! खरंच, हे काय
सुयोधना?
कुणी दिलं हे फुलांचं कटिवस्त्र? घात झाला बाळा, घात झाला!
कुणी दिली ही बुद्धी तुला?

दुर्योधन – श्रीकृष्णानं, आई. त्यानंच दिलं हे फुलांचं कटिवस्त्र
म्हणाला, आई झाली म्हणून काय झालं?
तिच्याकडं असं अगदी नग्न जायचं?–
मला पसंत पडलं त्याचं म्हणणं
हे तात इथं असतील याची कल्पना नव्हती मला.

विदुर – त्याची खंत करू नको सुयोधना,
पण मला तुझी दया येते.
फुलांनीच इंदुमतीचं मरण ओढवलं,
अन् तीच फुलं आडवी आली आज विजयाच्या मार्गात
तुझ्या आणि गांधारीच्या!

गांधारी – वत्सा, सारा घात झाला.
नियतीलाही तेच पसंत आहेसं दिसतं.
माझी मात्र जन्मभराची तपश्चर्या व्यर्थ गेली–

फुकट गेलं सतीचं पुण्य.
मीच चुकले, नको होतं मलाच– व्रत मोडायला
पट्टी बांधली काय अन् सोडली काय
होणारं टळत नाही.
जा. जा. आता माझ्या समोरून,
क्षणभरही इथं उभा राहू नकोस
तो फुलांचा मांड्यांचा भाग सोडून,
सर्व शरीरानं वज्रदेही झाला आहेस तू,
पण त्या मांड्यांवरच भीमाची गदा बसेल
आणि पूर्ण होईल नियतीची इच्छा,
संपूर्ण क्षय होईल कौरव कुळाचा.
उगीच, उगीच पाहिलं तुला
कृष्णानं मात्र आपला डाव साधला
पूर्ण कुलक्षय केला त्यानं कौरवांचा
पण त्याचंही कुल असंच नष्ट होईल,
आपल्यांतच लढून मरतील सारे यादव
दर्भाच्या पात्यानं, जा तू आता.
नियती कठोर आहे, अटळ आहे
हे श्रीकृष्णालाही कळून येईल.
मी मस्तक नमवलं आहे तिच्या संहारचक्रासमोर!
शत शतकांचा, युगायुगांचा चुराडा करणारं ते
विराटचक्र
माझ्याही मस्तकावरून गडगडत निघून जाईल.
पट्टी बांधली आहे पुन्हा मी–
तरी तो रथ मला दिसतो आहे
झगमगत, धडधडत येतो आहे
कर्ण–द्रोणांच्या शवांवरून
माझ्या शंभर पुत्रांच्या प्रेतांवरून!
कसं थांबवणार त्याला
माझे दुबळे आंधळे हात?
कसं थांबवणार मी त्याला? कसं?
सुयोधना, जा तू आता,
त्या चक्राखाली चिरडलं जाणारं तुझं मस्तक
मला पाहवत नाही. जा, तू जा आता.

दुर्योधन – आई, तू चिंता करू नकोस
अमर नसलो, तरी मी अजिंक्य आहे
माझ्या मुखावरील अभिमानाचं स्मित
कुणीच हिरावून घेऊ शकणार नाही.
जातो मी.

विदुर – गांधारी वहिनी, शोक आवरा जरा
काहीच अगोचर नाही तुमच्या दृष्टीला
अलकावती– धीर धर, दुर्दैवी राजकुमारी.
तूच आपणहून आंधळ्या नियतीला वरलं आहेस.
गांधारी – शोक आवरला, सारेच आवरलं आहे
आता विदुरा,
शोक तरी कशाचा करायचा ?
सगळं संपलं आहे, सगळं शांत आहे
आता शांतच व्हायला पाहिजे, राहायला पाहिजे
माझे पुत्र होते, जेव्हा त्यांच्या दु:खानं
हे हृदय फुटत होतं, कढत होतं,
आता कुणी नाही, काही नाही
चालले आहे मी पलीकडे, खूप खूप पलीकडे,
सुखदु:खाच्या पलीकडे (हुंदके देते) दूर! – दूर–
धृतराष्ट्र – गांधारी, गांधारी काय आहे हे ?
कसला गलबला, कसली रडारड आहे ?
काही वार्ता आली का ? माझ्या सुयोधनाचं क्षेम आहे ना ?
बोल, बोल गांधारी, गांधारी–
गांधारी – म्हणजे! अग बाई हे!
यांना तर विसरलेस होते मी,
हा माझा नवरा आणि मी ह्याची बायको
आंधळी, डोळे बांधलेली,
टेकत चाललेली!–
आता कसली जाते सुखदु:खाच्या पलीकडे ?
(करूण वाद्यसंगीत
त्यानंतर गदायुद्धाचे आवाज
'शाबास भीमा', 'शाबास दुर्योधना' अशा
मधून मधून आरोळ्या – गदायुद्धाचे आवाज तीव्र व जलद
होत जातात–
मग मांडीवर थाप मारल्याचा आवाज. त्या–
बरोबरच
'हा अधर्म आहे भीमा, श्रीकृष्णा' अशी आरोळी
'युद्धात धर्म कुठला बळीरामा ?'
'याने तरी कुठे धर्म पाळला ?' इत्यादी गर्जना.
एक जोरदार गदेचा आघात– एक वेदनेची
किंकाळी– त्यानंतर एकदम सर्व शांत.
काही क्षणानंतर करूण वाद्यसंगीत
प्रवेशांतर.)

प्रवेश पाचवा

स्थळः (पहिल्या प्रवेशातला हिमालयातील आश्रम. वाऱ्याचा आवाज बर्फवृष्टीचा पानांतून हलकासा शब्द.)

धृतराष्ट्र – सुखदु:खाच्या पलीकडं नाही,
तरी पुष्कळच दूर झालो आहो आपण
गांधारी,– या एकांत आश्रमात,
देवदारांच्या हिरव्या छायांत,
हिमालयाच्या तप:शीतल कुशीत
इथे झरतो बर्फ वासनांसारखा,
आणि सूर्यबिंबे तळपतात हिमशिखरांतून
इंद्रियोपभोगांतून झळकणाऱ्या अलिप्त आत्म्यासारखी!
रत्नकांत!–

गांधारी – खरंच स्वामी, पुष्कळ गोष्टी ओलांडल्या आपण
गदेचे आघात, विधवा सुनांचे आक्रोश,
दु:खाचे घास आणि अश्वमेघाचे पुरोडाष,
आप्तांचे मोह पायथ्याशीच थांबले,
सेवकांचे सेवासुख खालीच राहिले,
इथं निवांत कुटीत उरलो तुम्ही आणि मी,
एकाच शुष्क कवचात दोन जुळे बदाम!

धृतराष्ट्र – वा! दोन जुळे बदाम! पण गांधारी कडू की गोड?

गांधारी – परमेश्वराला माहीत. पण–
थट्टा पुरे झाली स्वामी,
आता थोडे गंभीर व्हा. हिमालयाच्या शिखरांच्या
सावलीत–

धृतराष्ट्र – तू गंभीर आहेस तेवढं पुरे आहे
पण गांधारी, हे बरीक नवल हं,
माहेरच्या बदामाची सय अजून विसरली नाहीस.

गांधारी – काय करायचं,
सासरचे बदाम कडू निघाले तर?

धृतराष्ट्र – सासरचे बदाम कडू निघाले तर!
गांधारी, तुझा राग गेला नाही अजून,
सासरच्या माणसांवरचा
मलाही तू अजून क्षमा केली नाहीस

गांधारी – क्षमा महाराज! कुणी क्षमा करायची?
आणि कुणाला? पण जाऊ द्या ते स्वामी,
गेलं ते गंगेला मिळालं. अन् खरंच महाराज,
आज आपण गंगेच्या काठाशीच उभे आहोत
किती सुंदर, नीरव, निवांत आहे हे स्थळ!–

तुम्ही आणि मी, कुंती आणि विदुरभावोजी–
दुसरा मानवी शब्द ऐकू येत नाही
ऐकू येते पानांची सळसळ,
गंगेचा खळाळ,
पक्ष्यांची किलबिल,
आणि फुलांवर झुलणाऱ्या भ्रमरांचा गुंजारव
मानवी ईर्षेचा स्पर्श नाही यांना–
या शब्दांना, सारं सहज, उत्स्फूर्त, निर्हेतुक
आणि या शब्दांमागं
उभं हिमालयाचं मौन,
अचल, उत्तुंग, अथांग, हिमशुभ्र!–
ज्यात कसली अपेक्षा नाही, खंत नाही,
फक्त आहे अढळ श्रद्धा. शून्याला भेदून उभे राहण्याची,
ऋषींच्या प्रार्थनेसारखी
स्वामी, इथं बसलं म्हणजे वाटतं
काही घडायचं नाही, काही घडलं नाही
कुरूक्षेत्राचं ते युद्ध, तो संहार
झाला नाही– कधीच झाला नाही–

धृतराष्ट्र – गांधारी अन् ती सुईच्या अग्रावरली जमीन,
दु:शासनाच्या रक्तानं माखलेली ती द्रौपदीची वेणी,
दुर्योधनाच्या मांडीवर झालेला तो गदेचा आघात,
परीक्षितीच्या गर्भाभोवती फिरणारं अश्वत्थाम्याचं
ब्रह्मास्त्र,
त्या ज्वालांनी पेटलेली पृथ्वी, आकाश,
कशाच्याच खुणा नाहीत इथं

गांधारी – सारं असत्य होतं, काही खरं नव्हतं ते महाराज,
की सारंच भीषण स्वप्न होतं.
असं वाटतं या हिमालयाच्या कुशीत–
मौनाच्या शुभ्र मुशीत!

धृतराष्ट्र – असं असूनही गांधारी,
तुला त्या वंचनेचा विसर पडत नाही.
मी आणि तुझ्या माहेरच्यांनी
तुझी फसवणूक केली,
कोटी कोटी अन्याय केले तुझ्यावर,
कबूल. पण तूही काही कमी केलं नाहीस
तू देखील कोटी कोटी सूड घेतलास
त्या अन्यायाचा.

गांधारी – पाहिलंत महाराज, पुन्हा तो विषय काढलात,
तुम्हालाच ते कुठंतरी सलतंय

कसं सांगू स्वामी ? त्या किशोर वयात,
स्त्रीची जी वंचना होते,
ती फार अघोर असते,
कधीच ती, ती विसरू शकत नाही
उद्‌ध्वस्त होतं तिचं सारं जीवन
त्या एका विश्वासघातानं,
इतकंच नाही, पुढच्या पिढ्याही जळून जातात
त्या वंचनेच्या ज्वाळांत–

धृतराष्ट्र – आम्ही कुरूकुलातल्या पुरूषांनी,
कबूल, गांधारी, कबूल
फार अन्याय केले तुम्हा स्त्रियांवर,
आणि त्याचं प्रायश्चित्तही आम्हाला मिळालं.
भीष्म अंबेच्या रागात जळाला,
मी तुझ्या कोपात जळतो आहे
माझी मुलंही त्यातच जळून मेली !
पण –कुंती !
मी तुझ्यावर अन्याय केला,
पंडूनंही कुंतीवर अन्यायच केला,
पण ती कुंती !– त्या कुंतीनं

गांधारी – त्या अन्यायाचा सूड घेतला नाही,
असंच म्हणायचं ना तुम्हाला स्वामी ?
कुंतीचं लग्नदेखील व्यंग माणसाशी झालं
पण तिनं पत्नीचंच कर्तव्य पार पाडलं,
हेच सांगायचं ना तुम्हाला ?

धृतराष्ट्र – नाही, वेगळंच म्हणायचंय मला,
मी तुझ्यावर अन्याय केला,
पंडूनं कुंतीवर अन्याय केला,
पण मला आणि पंडूला जे दु:ख, जी विफलता
भोगावी लागली, ती कोणामुळं ?
कुणाचा अन्याय आम्हाला भोवला ?
आमच्या आयांचा मूक, अगतिक तळतळाट तर
आम्हाला भोवला नाही ? बिचारा विदुर ?

गांधारी – विदुर बिचारा का ?
फार थोडा महात्मा आहे तो

धृतराष्ट्र – ते खरं, पण तरीही तो बिचाराच,
कसं सांगू ?– तो अंगानं सुदृढ होता,
बुद्धीनं चतुर होता, त्याच बापाचा होता,
परंतु दासीपुत्र होता,
म्हणून त्याला राज्यावर बसवलं नाही

शेवटी घोर वंचना झाली त्याची!
दासीपुत्र, हा का त्याचा गुन्हा होता?
पण त्यानं या वंचनेचा, या वैफल्याचा सूड
कुणावर घेतला नाही
उलट त्यानंच फार काळजी वाहिली कुलाची
सतत जागरूक राहिला, झिजत राहिला,
कुंतीही तशीच, कल्याणच पाहिलं तिनं कुलाचं
कुणाच्या अन्यायांचा सूड घेतला नाही.

गांधारी – महाराज ती फार थोर माणसं
दु:ख सोसणारी, कुणाचा राग न करणारी,
धर्मात्मे आहेत ते
आम्हा पामरांना त्यांची सर कशी येणार?

धृतराष्ट्र – विदुर, कुंती आणि मी
तीन पिढ्यांतली आम्ही तीन माणसं
आम्ही तिघंही वंचित आहोत गांधारी.

गांधारी – वंचित झाला म्हणून महाराज,
दुसऱ्याची वंचना करण्याचा अधिकार तुम्हाला
कसा प्राप्त होतो?

धृतराष्ट्र – थांब, गांधारी, मला बोलू दे,
क्षमा हवी म्हणून हे बोलत नाही मी.
तुझ्यासाठीच सांगायचं आहे हे
आयुष्याशी चाललेला तुझा झगडा मिटावा,
माझ्यावरचाच नव्हे, जगावरचा तुझा राग
सरावा,
म्हणून बोलत आहे मी हे
मी केला असेल अन्याय तुझ्यावर,
म्हणून मुलाबाळांवर, साऱ्या संसारावर
अन्याय करायचा अधिकार तुला मिळतो काय?
अन्यायानं, अन्यायाचं परिमार्जन होतं काय?
गांधारी, पाहा–

गांधारी– काय पाहू? मी तर पट्टी बांधली आहे महाराज.

धृतराष्ट्र – तेच म्हणतोय मी गांधारी,
आता तरी ते वस्त्र सोड डोळ्यावरचं
सर्व आयुष्य डोळे बांधून जगलीस
मरू तरी नकोस डोळे बांधून
उघड्या डोळ्यांनी मर,
साठवीत डोळ्यांत हे निळं निळं आकाश!
ती पट्टी, तो राग, सोड जगावरचा गांधारी,
त्यांच्याकडं निरपेक्ष दृष्टीनं पाहायला शीक

गांधारी, गांधारी–
पाहा किती आनंद असतो गांधारी, नुसतं निर्भय
पाहाण्यात.

गांधारी– (अचानक) – हे पाहा महाराज, मी डोळे सोडले आहेत.
स्वामी, मला नीट दिसत नाही
पण मी डोळे सोडले आहेत
हे पहा, इथं–इथं हे डोळे– (त्याचे हात हातात घेऊन)
इथं हात लावा हं, चांगलं हात लावून पाहा,
सांगा सोडलेत ना मी डोळे? –स्वामी–

धृतराष्ट्र – गांधारी, गांधारी – (तिचे डोळे चाचपीत)
खरंच गांधारी तू डोळे सोडले आहेस!
किती मोठे आहेत ग तुझे डोळे! तुझ्या पापण्या!–
गांधारी, किती सुंदर आहेत हे तुझे डोळे!
अहाहा! किती आनंद झाला!– गांधारी,
गांधार लागला आज जीवनात!–
गांधारी हेच जर पूर्वी, फार पूर्वी–
त्या पहिल्या रात्री घडलं असतं तर!

गांधारी– तर काय! घडलं नाही झालं, जाऊ द्या ते
पण खरं सांगा, अगदी खरं सांगा हं–
हसू नका हं– बघा,
आवडले ना तुम्हाला माझे डोळे?

धृतराष्ट्र – (हसत) आवडले, आवडले, खूप खूप आवडले,
म्हणूनच उघडायला सांगितले गांधारी,
पुन्हा एकदा हात फिरवू दे या रेशमी पापण्यांवरून.
या दिपत्या डोळ्यांवरून,
डोळ्यांतल्या श्रांत कमळावरून
कमळातल्या सरत्या रात्रीवरून

गांधारी – चला, पाहील कुणीतरी
म्हातारपणी असं वेड शोभतं का?

धृतराष्ट्र – आंधळ्याला शोभतं गांधारी.
कमळांना डोळे उघडायला लावणारा सूर्यही
माझ्यासारखाच अंध असावा
म्हणून फुलांचे डोळे उघडण्यात–
रोज रोज असे उघडण्यात–
त्याला इतका आनंद होत असावा. (डोळ्यांवरून
हात फिरवतो)

गांधारी – आता पुरे हं. नाहीतर रागवेन मी
पण महाराज सूर्याला अंध कसं म्हणता?
जगाचा नेत्र आहे तो.

धृतराष्ट्र – असूदे. तू माझा नेत्र आहेस एवढं खरं.
गांधारी, एक सांगू ?
गैरसमज करायचा नाही, तू लहान आहेस
माझ्यापेक्षा. मी जरठ–जीर्ण झालो आहे
मी गेल्यावर,
स्वतंत्रपणे राहता येईल तुला
आता संपला तुझा परावलंबीपणा.

गांधारी – हं–हं– असं अभद्र काय बोलता स्वामी ?
या परमोच्च आनंदाच्या वेळी–
इतका आनंद मी कधीच पाहिला नाही–
हा हात मी आता सोडणार नाही
मी जे डोळे उघडले आहेत ना ?
ते माझ्यासाठी नाहीत,
ते आपल्या दोघांसाठी आहेत.
हे तुमचेही डोळे आहेत स्वामी.

धृतराष्ट्र – कबूल, कबूल, गांधारी, सारं कबूल
पण तुम्हा डोळसांना जे दिसत नाही,
त्याचा आम्हाला वास येतो, ऐकूही येतं ते !
रानात कुठं वणवा लागला आहे का ?
सकाळपासून मला धुराचा वास येतो आहे
भ्याड पाखरांची चिवचिव वाढते आहे
मला वाटतं, नदीच्या ह्या काठाला,–
आपल्या मागं, कुठं रान पेटलं आहे,
उष्ण झळाही शिवून जात आहेत

गांधारी – ख़रंच महाराज, पर्णकुटीमागे,
केवढं तरी रान पेटलं आहे स्वामी,
पाहा कशा वळवळत येत आहेत
लाल पिवळ्या जिभा फडफडत्या ज्वाळांच्या !
बावरली पाखरं धुरात गरगरताहेत,
पुन्हा आगीकडेच झेपावून जात आहेत
त्या वणव्याची सहस्त्र प्रतिबिंबे वाहात येत आहेत,
नदीच्या पाण्यातून लाल लाल, जवळ जवळ–

धृतराष्ट्र – म्हणूनच गांधारी, तुला जड जाणार आहे,
वाटतं त्यापेक्षा जड जाणार आहे धरून ठेवणं,
माझा हात असा, शेवटपर्यंत.
मी थांबणार आहे इथंच,
सहज जाता येईल तुला नदीपार
कंटाळा आला आहे मला बसून राहण्याचा,

या आश्रमात वाट पाहात रोज मरणाची
आता ते सहज पुढून येत आहे,
थांबणार आहे मीही इथंच त्या वणव्याला भेटायला
तू जाऊ शकतेस, तुला डोळे आहेत,
मोकळे, स्वतंत्र.

गांधारी – नाही, स्वामी नाही, शक्य नाही ते.
वणव्याला पाहून भिऊन पळणारे
हे डोळे नाहीत, अजाण हरिणांचे–
अन् वणवे तरी काय थोडे पाहिले आहेत
महाराज, आतापर्यंत–
नाही, मी हात सोडणार नाही.
कुरूराज, क्षत्रिय आहो आपण
इथं बसून वाट पाहण्यापेक्षा
वणव्यालाच आपण सामोरे गेलो तर!

धृतराष्ट्र – जशी तुझी इच्छा
चल तर मग गांधारी–
शेवटी गांधारी, तू डोळे उघडलेस
तो हा वणवा पाहण्यासाठीच का?
जीवन नव्हे, मरण बघण्यासाठीच का?

गांधारी – असं पाहा महाराज, हा आपला माणूस
आईच्या कुशीतून जेव्हा बाहेर येतो,
रडतच डोळे उघडून पाहतो,
आईच्या मांडीवर मधूनच हसतो,
तेव्हा त्याला वणवे दिसत नसतात,
कारण त्याच्याही डोळ्यांवर बांधलेली असते
एक अदृश्य पट्टी,
अज्ञाताची, नियतीची!

धृतराष्ट्र – आणि आता ती पट्टी तू
सोडली आहेस–
असंच ना गांधारी? मग म्हणूया– ही प्रार्थना,
ओम् नमो अग्निनारायणाय–

गांधारी – ओम् नमो अग्निनारायणाय!
हे अग्निनारायणा,
आमच्या डोळ्यांत जे तेज आहे,
जी दृष्टी आहे,
तोच तू हा वणवा आहेस
अग्नी आहेस
ओम् नमो अग्नि नारायणाय!

धृतराष्ट्र – तूच या फुलांत हसतोस
फळांत पिकतोस
नक्षत्रांत विलसतोस
सूर्यात तळपतोस
अग्निनारायणा, तोच तू हा वणवा आहेस,
ओम् नमो अग्निनारायणाय!

गांधारी – आमच्या पोटात तू जठरानल आहेस
आमच्या रक्तात तू प्राणांची ऊब आहेस
आमच्या बुद्धीत तू महत्त्वाकांक्षा आहेस
प्रेम आहेस आमच्या हृदयात
आमच्या जीवनात तूच झळकतोस
आमच्या मरणात तूच प्रकाशतोस

दोघे – ओम् नमो अग्निनारायणाय
हे अग्निनारायणा तुला नमस्कार असो,
नमस्कार असो.
(दोघेही वणव्याच्या दिशेने चालत जातात
काही क्षण पावलांचा आवाज–नंतर ज्वाळांचा
धडधडाट. खिन्न करूण संगीत. तेही हळूहळू विरत
जाते. सूर्याच्या आवरत्या किरणांसारखे).

विसर्जन
एक श्रीकृष्णांतीका.....

विसर्जन

दृश्य -पहिले

स्थळः द्वारकेजवळचा समुद्रकाठ- प्रभासवन, उद्धव व अक्रूर बोलत येत आहेत.

अक्रूर – उद्धवा, कुठं आहेत श्रीकृष्ण ?
पाहिलंस तू त्यांना ?

उद्धव – नाही अक्रूरा, शोधतो आहे मी त्यांनाच
आता इथं होते बोलत बलरामाशी

अक्रूर – बलराम! त्यांनी समुद्रतीरावर
केव्हाच विसर्जन केला आपला देह
निरोध करून प्राणांचा, बाहेर पडला
त्यांच्या मुखातून एक सहस्त्रमुख सर्प
समुद्रात तो अदृश्य झाला,
तेजाच्या झोतासारखा सळसळत
झळाळून उठली लाटालाटांतून लाल आरूणी प्रभा
त्याच्या मस्तकावरील मण्यांची
की त्याच्या खदिरांगार डोळ्यांची ?

उद्धव – भगवान शेष अन्तर्धान पावले
पण भगवान द्वारकाधीश कुठं आहेत ?
का सोडलं त्यांनी आम्हांला
या विनाशाच्या वेळी ?

अक्रूर – विनाश! अरे प्रलयकाळ ओढवला आहे उद्धवा,
मदिरेनं बेभान झालेले यादव
घालीत आहेत कंठस्नान परस्परांना
आवरत नाहीत ते कोणालाच
अशा वेळी श्रीकृष्ण गुप्त झाले!

उद्धव – गुप्त नाही झाले अक्रूरा,
गेले असतील महालात
आकांत मांडला आहे तिकडे यादव-स्त्रियांनी!
पण अक्रूरा, काही बरी नाहीत ही चिन्हं
पहा ऊन कसं पिवळं पडलं आहे,
कावीळ झाल्यासारखं!

अक्रूर – अन् ते पहा, सूर्यबिंबाभोवती
कबंधं नाचत आहेत, एकमेकांना मागीत
आपली तुटलेली मस्तकं,
उद्धवा, लाटालाटांतून समुद्राच्या
भुंकत आहेत भालू!

उद्धव – ही दुश्चिन्हं सतत होत आहेत
गेल्या आठ दिवसांपासून

श्रीकृष्णाला सांगितलं तेव्हा–

अक्रूर – काय म्हणाले ते उद्धवा ?

उद्धव – काही नाही, हसले आणि पाहू लागले
गवाक्षांतून रक्तरंजित संध्येकडं,
आपल्याच भळभळत्या जखमेकडं पाहणाऱ्या
स्तब्ध नजरेनं.

अक्रूर – काय आहे त्यांच्या मनात
कळत नाही, उद्धवा ,
भीषण संहारात कुरूक्षेत्राच्या
ते निष्कंप होते,
हे एक वेळ समजू शकतं
न्यायाचा, कर्तव्याचा प्रश्न
पणास लागला होता तिथं–

उद्धव – पण इथं–इथं बघवतात तरी कशा त्यांना
अक्रूरा, आपल्या अपत्यांच्या मरणकळा ?
ते स्तब्ध आहेत उभे:
आपल्या झडत्या पिवळ्या पानांकड पाहणाऱ्या
निभ्रान्त वृक्षासारखे

अक्रूर – त्या वृक्षाला उद्धवा, ऐकू येत असते
येणाऱ्या वसंताची चाहूल,
आपल्या फांद्याच्या नसानसांतून
तारे गाळणारं आकाश निश्चिंत असतं
उद्धवा, आपल्या अंधारात,
सकाळच्या सोनेरी किरणांविषयी
यादवांच्या या रक्ताच्या थारोळ्यांत
त्यांना दिसतात बिंबलेल्या
कुठल्या नभाच्या केशरी कडा ?

उद्धव – त्या वृक्षाप्रमाणे, त्या आभाळाप्रमाणे
या श्रीकान्तालाही दिसत असेल का अक्रूरा,
तो हिमान्ताचा क्षण, ती निशान्ताची घटिका ?

अक्रूर – ते मला माहीत नाही उद्धवा,
पण एवढं जाणतो मी,
विसर्जनाची अनिवार कला आहे
श्रावणाच्या मेघाची ! ह्या घनश्याम व्यक्तित्वात
विसर्जनाच्या क्षणातच स्फुरतं सर्जन
त्याच्या भव्य जीवनाचं,
कर्तव्याच्या क्षणानं भरतो तो जीवनाचा अमृतकलश
आणि हा कलश भरता भरता, प्राशन करतो

स्वतः हलाहलाचा प्याला
कळू न देता आपल्याही ओठाला,
ओठावरच्या हास्याला!
गोकुळाहून निघालो मी घेऊन बाळकृष्णाला
तेव्हा अडविला रथ गोपिकांनी
राधिकेनं तर लोटला आपला सोन्याचा देह
रथचक्राखाली, म्हणाली–
(दृश्यांतराचे गंभीर सूर)

दृश्य-दुसरे

(त्या स्वरांच्या पार्श्वभूमीवर संथपणे येणारा रथाचा आवाज)

राधा – मुकुंदा, जाऊ नकोस रे गोकुळ सोडून,
परदेशी करून आम्हाला
गोपाळा, का रे निष्ठुर झालास?
विसरलास वृजलाला, आम्हाला?–
गळ्यातल्या फुलमाळा सुकल्या नाहीत तोच,
वृक्षावरली चंदन-चित्रे पुसली नाहीत तोच–
मेघश्यामा, राहणार नाहीत हे प्राण तू गेल्यावर
माधवा ऐक, ऐक, आमच्या हृदयाची ही हाक–

श्रीकृष्ण – पण राधे, ऐकू येत आहे मला
दुसरीही एक हाक– मथुरेची हाक–
खड्गाच्या जिभांची, ज्वालांच्या शब्दांची
रथचक्राच्या घनघोर गडगडाटाची हाक–
त्या हाकेलाही 'ओ' दिली पाहिजे मला.

राधा – म्हणजे आमच्या हाका काहीच नव्हेत
म्हणजे आम्ही कोणीच नव्हत माधवा, तुझ्या!
बारा गाव वणव्यातून, मुसळधार पावसातून
का वाचवलंस आम्हाला? का तोललास तो गोवर्धन?
कोसळू का दिला नाहीस आमच्यावर? –म्हणजे
आम्ही राहिलोच नसतो, राहिला असतास मोकळा तूही
या हाकांच्या दिशेनं जाण्यासाठी–त्या–त्या–
कुब्जेकडं–

श्रीकृष्ण – राधे, असंच तुला वाटत असेल तर
राहतो इथं धेनु राखीत, वेणु वाजवीत
आणि पुन्हा धेनूच राखीत!

राधा – काही नको, जा तू, खुशाल जा,
मात्र जाताना बुडवून जा आम्हांला
या काळ्या डोहात यमुनेच्या!
हेच तुला करायचं होतं वनमाली, तर
का लोटलं नाहीस मला त्याआधी

त्या कालियाच्या मुखात ?
कळलं नसतं कुणालाही ही मेली
कालियाच्या विषानं !–
की विरहाच्या जहरानं !

श्रीकृष्ण – राधे, दु:खानं असं उलू नकोस
भलतं बोलू नकोस, अन् उलायचंच तर
माणसानं उलावं डाळिंबाप्रमाणं,
इंद्रधनूच्या रंगाचे रसमधुर दाणे पोटी धरून.

राधा – गोविंदा, बोलायला सोपं आहे हे फार
डाळिंबाचं भाग्य साऱ्यांनाच लाभत नाही,
काहींची नशिबं दगडांचीच असतात,
तापून उलतात, फुटतात
स्त्रीचं भाग्य असंच असतं
बरसत्या घनाचा, लसलसत्या पात्याचा
शीतळ, हिरवा दिलासा मिळतो काही काळ,
नंतर सारा उन्हाळा–भाजणारा, जाळणारा !
माधवा, खरंच का असा उन्हाळा
लिहून जाणार आहेस आमच्या भाळी ?
यमुनेचा तो सुंदर काठ,
मुरलीचे ते धुंद मंथर सूर,
स्वरांच्या काठावरील त्या चांदण्या रात्री,
कदंबातळीचे चांदण्याचे कवडसे,
त्या कवडशांच्या शपथा !–
सारं सारं विसरलास तू ? गोपाला सांग,
सांग ते सारं खोटं होतं का ?

श्रीकृष्ण – ते सारं खोटं नव्हतं राधे,
आणि हेही खोटं नाही.
दिवसाला सामोरे जाताना हरवून जातात
चांदण्याचे कवडसे

राधा – कवडसे हरवले म्हणून नंदलाला,
माणसं हरवत नाहीत,
त्यांची हृदयं हरवत नाहीत,
सूर हरवले, तरी गिरिधरा,
त्यांचे अर्थ हरवत नाहीत.
असा भलत्याच गावाला का जातोस गोविंदा,
वेड पांघरून मोत्यांच्या घोंगडीचं ?
राधेचा कंटाळा आला तुला ?
सरलं तुझं प्रेम ?

श्रीकृष्ण – माझं प्रेम राधे, सरलं नाही
पण ते आटेल असं वाटतं,
तुझ्या या वेडेपणामुळं–
तुझ्या या हट्टामुळं–

राधा – नाही, नाही माधवा, नाही
तुझा विरह चालेल, पण तुझ्या प्रेमाचा मृत्यु–
नाही, मला तो सहन होणार नाही
माधवा, सहन होणार नाही रे. मुकुंदा–

श्रीकृष्ण – राधे, माहीत होतं मला,
तू हेच म्हणणार, हे मला माहीत होतं
म्हणूनच मी तुझ्यावर प्रेम केलं, प्रेम करतो–
वयाची, लोकांची, साऱ्या लौकिकाची बंधनं तोडून,
मी तुझ्यावर प्रेम करतो–
सार्थक झालं त्या प्रेमाचं.
खरं प्रेम जीवनाला वाट करून देतं! खरं ना?–

राधा – (अस्फुटपणे)– मनमोहना, ब्रिजलाला–

श्रीकृष्ण – तुझं प्रेम, तुझं सुंदर दुःख घेऊन मी जात आहे
ठेवून जात आहे माझं प्रेम, माझं दुःख
तुझ्या हृदयात, वेणूच्या स्वरासारखं,
मधुर, अमर होणारं, आपल्या अबोल व्यथांनी.
अक्रूरा, हाकार रथ लौकर पुढं–

राधा – थांब, मुकुंदा, थांब,
क्षणभर पाहू दे तुझं रूप
हृदयात साठवून घेऊ दे, आणि–
ती वेणु तेवढी मला दे,
तिच्या मुक्या मुखातून फुलत राहतील
प्रीतीचे सूर, नक्षत्रांसारखे माझ्या एकाकी रात्रीत
त्या रात्रीत मी विरत राहीन
क्षणाक्षणाने, कणाकणाने
तुझी उद्याची प्रभात होण्यासाठी.
आणखी एकच शब्द
तू आठवण काढशील तेव्हा मी येईन–
धावत येईन
तेवढी अनुज्ञा दे, एवढं ऐक माझं–
काढशील माझी आठवण?

श्रीकृष्ण – तुझी आठवण नेहमीच राहील राधे,
ती कशी विसरणार?–
पण त्या आठवणीला नसतील शब्द
रूंझी घालणाऱ्या सागराची,

पृथ्वीला कवटाळून रिते राहणाऱ्या
समुद्राच्या मिठीची, राधे–

राधा – माधवा–माधवा–

(दृश्यांतराचे करूण सूर, रथ धडधडत जाताना.)

दृश्य तिसरे

(पुन्हा समुद्रकाठ, पहिल्या दृश्यातला, उद्धव अक्रूर बोलत असतात.)

अक्रूर – मीलनाच्या धुंद, उत्कट क्षणीच उद्धवा,
विसर्जन केलं त्यानं आपलं प्रेम असं
आणि तो पुढे निघाला–
नद्या–पर्वत लंघून, मथुरेच्या वेशी फोडून,
कंस–चाणूरांच्या प्रेतावरून
सिंहासने तोडीत, छत्र–चामरे मोडीत
अष्टनायिकांच्या फुलमाळा गुंफीत, मधून मधून–
तो निघाला पश्चिम समुद्राकडं
अन् लाटांच्या तुफान वादळात बांधली,
त्यानं एक नगरी सोन्याची,
रानटी ऋक्ष–जांबुवंताशी त्यानं नातं जोडलं,
सोयरीक केली वनवासी पांडवांशी,
बंधमुक्त केले बावीस हजार राजे
जरासंधाच्या बंदीवासातून
शिशुपालाचा वध करून,
मुक्त केली पृथ्वी चक्रातून दमनाच्या
जिंकले राजे,
परंतु राज्याचा, भूमीचा अपहार केला नाही
जुलूम संपताच पुन्हा शस्त्र हातात धरलं नाही
योद्धा म्हणून मिळवलेली कीर्ती
विसर्जित केली त्यानं कुरूयुद्धात
शस्त्रसंन्यास अवलंबून
अन् अश्वांचे रश्मी हातात धरून
नि:पात केला कौरवांचा
न्याय मिळवून दिला पांडवांना
न्यायालाही शेवटी अर्थ उरला नाही त्या,
अश्वत्थाम्याच्या अमानुष संहारापुढं
गर्भाकडं उत्तरेच्या प्रेरिलं त्यानं
ब्रह्मास्त्र अनावर झालेलं.
अठरा अक्षौहिणी सैन्याच्या विनाशानंतर
उत्तरेच्या गर्भात उगवलेला उद्याचा अंकुर,

संस्कृतीचा कोंभ
जळू पाहात होता त्या अस्त्राच्या ज्वालेत,
तेव्हा श्रीकृष्णाला आठवण झाली
आपल्या सुदर्शनाची
(दृश्यांतराचे सूर, जलद होत जाणारे)

(कुरूक्षेत्राजवळच्या जंगलातील एक शिबिर. सभोवती रान पेटलं आहे. श्रीकृष्ण, द्रौपदी, धर्म आणि अश्वथात्मा)

श्रीकृष्ण– थांब, अश्वत्थाम्या, अधमा, थांब,
तुला असा जाळू देणार नाही
हा उद्याचा अंकुर उत्तरेच्या गर्भातला
क्षणभर आवर ते ब्रह्मास्त्र
मी सुदर्शनाचं स्मरण करीत आहे

अश्वत्थामा– भगवंता, अनावर आहे ते मला.

श्रीकृष्ण– अश्वत्थामा, तुम्ही योद्धे म्हणवता
शस्त्रांची उपासना करता
परस्परांच्या पराभवासाठी
पण ते शस्त्र उलटलं, अनावर झालं,
म्हणजे खुशाल चालवता दुबळ्या जिवांवर
निष्पाप गर्भावर,
मानवतेच्या, संस्कृतीच्या उगवत्या पिढ्यांवर.
नाही, मी हे घडू देणार नाही.
पुन्हा शस्त्र धरीन, रक्षण करीन
गर्भाचे नव्या जगाच्या,
प्रतिज्ञा मोडूनही शस्त्रसंन्यासाची

अश्वत्थामा– नका, प्रतिज्ञा मोडू नका भगवन्,
या दुबळ्या धर्माच्या जगासाठी.
धर्मानं जगावं आपल्याच तत्त्वावर
वासुदेवा, धर्माला राज्य मिळालं
द्रौपदीला लाज मिळाली
आणि पांडवांना मिळाला न्याय,
पण त्यांचा धर्म अक्षुण्ण राहिला नाही, अक्षत राहिला नाही
म्हणून त्या लज्जेचा, त्या न्यायाचा वंशच
आता संपण्याची वेळ आली आहे
शस्त्रानंच नष्ट होणार आहे,
शस्त्रानं जिंकलेलं
तुम्ही आपली प्रतिज्ञा का मोडता त्यासाठी
मधुसूदना?

श्रीकृष्ण– धर्मा, प्रतिज्ञा करायच्या असतात
न्यायाच्या, कर्तव्याच्या रक्षणासाठी
आणि त्यासाठीच
मोडायच्याही असतात त्या कधी कधी
भीष्मानं हे ओळखलं नाही
म्हणूनच झाला तो संहार कुरूक्षेत्रावर

द्रौपदी– बरोबर आहे श्रीकृष्णा, तू ऐकू नकोस या धर्मराजाचं
अश्वत्थाम्याचं अस्त्र निष्फळ झालं पाहिजे
उत्तरेच्या गर्भाचं रक्षण झालं पाहिजे,
मी म्हणते आवरत नाहीत तर
धरतात कशाला शस्त्रं–अस्त्रं हे वीर ?

अश्वत्थामा– द्रौपदी, साऱ्याच शस्त्रधरांची
शोकांतिका आहे ही ! सूड असतो मनात
शस्त्र हातात असेपर्यंत, पुढं
शस्त्र गेलं तरी सूड जात नाही

द्रौपदी– अश्वत्थामा, आम्हाला नको सांगूस
पराभवाचं हे शहाणपण
अरे द्रोणपुत्रा, धृष्टद्युम्नाचा तू वध केलास,
मारलेस झोपेत माझे पाच पुत्र, भ्याडपणानं, अन्यायानं,
इथपर्यंत समजू शकले मी सूडाचा अर्थ,
परंतु उत्तरेच्या गर्भावर आघात !–
नाही, कोणाही स्त्रीला, कुठल्याही मातेला
हा आघात सहन होणार नाही.
श्रीकृष्णा, या अघोरकर्म्याला
मिळालं पाहिजे अघोर शासन त्याच्या भ्याडपणाचं,
भेकड शस्त्रबळाचं
प्रतिशोधालाही एक वेळ क्षमा करता येईल,
पण या भ्याड विश्वासघाताला,–
अविचारी क्रौर्याला, हिंसेला क्षमा–

धर्म – द्रौपदी, असा भेदभाव नसतो क्षमेपाशी
क्षमा सर्वश्रेष्ठ तशी समदर्शीही असते

द्रौपदी – हे पटायचं नाही तुम्हा अक्रोधाला,
अजातशत्रूला, पण धर्मराज,
ती क्षमा या अधमासाठी नाही.
यानं अंत केला साऱ्या माणुसकीचा
जाणुनबुजून हा नाश करू पाहतो आहे
नव्यानं जन्मास येऊ पाहणाऱ्या
एका निरागस जीवात्म्याचा,
ज्याचा संबंधही नाही याच्या हिताहिताशी

जयापजयाशी.
श्रीकृष्णा, अजयाकार झाला
आमचा जय
ह्याच्या या अघोर कृत्यानं
धर्मानं क्षमा केली, तरी
एक आई त्याला क्षमा करू शकणार नाही,
कधीही नाही.

अश्वत्थामा– द्रौपदी, मलाही नको आहे तुमची क्षमा
हे प्राणही नको आहेत
परंतु या चिरंजीवित्वानं माझा नाश केला आहे
मी ब्राह्मण उरलो नाही, क्षत्रियही बनलो नाही,
विद्या हरलो, शौर्य विसरलो
पिता, मित्र सारे गमावून बसलो
प्रेमाचा तर स्पर्शच झाला नाही
कुणी माझ्यावर प्रेम केलं नाही
मी कोणावर प्रेम करू शकलो नाही.
सर्व जग माझा तिरस्कार करीत आलेलं आहे
आता मलादेखील माझी घृणा वाटत आहे
एखाद्या कुष्ठरोग्यासारखी!
मी कोण आहे हेच मला समजत नाही
असह्य आहे ही आत्मविस्मृती
स्वत:लाच जाणवणारं हे भयंकर परकेपण,
वैरीपण आपलं आपल्याशी
नको आहे मला असं कोंडलेलं,
विकृत जीवन!

श्रीकृष्ण – तेच तुला भोगलं पाहिजे
तुला जिवंत राहिलं पाहिजे अश्वत्थामा,
फार भयंकर असतात, मृत्युपेक्षाही –
या विकृत आत्मविस्मृतीच्या यातना
त्या तुला भोगल्या पाहिजेत!
हिंडत राहिलं पाहिजे तुला
पिशाच होऊन आपल्याच उद्ध्वस्त हृदयात,
दारोदार तेल मागीत,–
आपल्या जखमेसाठी चिरंतनाच्या
धर्मा, याच्या मस्तकातील मणि काढून घे
याला भटकू दे पिशाच होऊन, कल्पांतापर्यंत

अश्वत्थामा– फार कठोर शिक्षा आहे ही श्रीकृष्णा,
पण ती मी स्वीकारतो
माझ्या पापाचं प्रायश्चित म्हणून,

असंच भटकावं लागतं पिशाचाला, शस्त्रपिशाचाला
परंतु या पिशाचानं पराभव केला एका तत्त्वज्ञाचा,
शस्त्र धरायला लावलं त्याला

श्रीकृष्ण – हरकत नाही पिशाचा,–
ते शस्त्र हत्येसाठी नाही, रक्षणासाठी आहे

अश्वत्थामा– तरी पण एकच ते–एकच ते यादवेंद्रा,
कुठं रक्षण होतं, कुठं हत्या–
जातो मी
(विकट हसतो)

सत्यभामा– (प्रवेशत) घात झाला महाराज, घात झाला
अजून तुम्ही इथंच थांबलात ?
तिकडं उत्पात मांडलाय यादवांनी द्वारकेत

द्रौपदी– काय झालं भामे ?

सत्यभामा– काही नाही, तुम्हा पांडवांच्या नादानं, पांचाली,
ह्यांनी संहार ओढवून घेतलाय यादवांचा

श्रीकृष्ण – काय सांगतेस काय ? सत्यभामे,
शुद्धीवर आहेस ना ?

सत्यभामा– सारे यादव बेफाम झालेत मद्य पिऊन
त्यातली थोडी मलाही चढली असेल महाराज,
तर आश्चर्य कसलं !

द्रौपदी – आल्यापासून भामे, काय मांडलंस हे
काय बोलते आहेस भलतंसलतं, तोंडाला येईल ते ?
थोडं बस, प्रवासानं शिणली असशील
आधी थोडं रस–सेवन कर अन् मग बोल

सत्यभामा– या द्राक्षासवानेच प्रलय मांडला आहे
उन्मादात एकमेकांची हत्या करीत आहेत
ते यादव द्रौपदी, नको मला हे द्राक्षासव.

श्रीकृष्ण – भामे, मद्यानं नाही, सत्तेनं उन्मत्त झाले आहेत ते !–

सत्यभामा– म्हणजे स्वत:ला कल्पना आहे तर
तरीही स्वस्थ बसलात ! यादव कोण तुमचे ?–
सारे काही पांडव, पांडव !

द्रौपदी – अग ते निघालेच होते–
पण भामे, इतका द्वेष का करतेस पांडवांचा तू ?
त्या अश्वत्थाम्यामुळं, पांडवपुत्रांची हत्या करणाऱ्या त्या
अश्वत्थाम्यामुळं–

सत्यभामा– मी पण तेच म्हणत होते द्रौपदी,
सदा कदा पांडव, पांडव–पुत्र–
त्यामुळंच ह्यांचं यादवांकडं लक्ष राहिलं नाही

तुमच्या युद्धात यादवांतल्या दुहीचाही
त्यांनी विचार केला नाही
आज हा प्रसंग उभा ठाकला!
यादव उभें आहेत बाण रोवून
एकमेकांच्या कंठांवर
बाण नसेल तर लव्हाळ्यांनी मारीत आहेत
परस्परांना, अन् त्या लव्हाळ्याला,
समुद्रातल्या 'एरका' गवताला
प्राणांतिक धार आली आहे सुडाच्या तरवारीची

द्रौपदी – भामे, हा तो शाप भोवतो आहे
सांबाला मिळालेला, त्या तपस्व्याचा–

सत्यभाम– कुणास माहीत द्रौपदी, त्या ऋषीचा का गांधारीचा?
मला वाटतं गांधारीचाच असावा
आणि ह्या महाराजांनीच घेतला तो विकत,
तुम्हा पांडवांच्या हितासाठी, विजयासाठी,
किंमत देऊन यादवांच्या विनाशाची.

श्रीकृष्ण– भामे, पुरे झाला तुझा शहाणपणा
उगीच दोष देऊ नकोस पांडवांना
आपले भोग आपण भोगले पाहिजेत

सत्यभामा– ते सांगू नका मला
निवारण नसतं का करता आलं
त्या शापाचं तुम्हाला?
पण तुमच्या मनातच नाही– अन्
आमचं ऐकतं कोण?

श्रीकृष्ण – पुष्कळ आहे माझ्या मनात, पण ते
भामे, कळणार नाही तुला
शापाची भीती नसावी मनात,
भीती असावी पापाची,
तीच यादवांनी सोडली आहे

सत्यभामा– पण जबाबदार कोण त्याला? तुम्हीच नाही का?

श्रीकृष्ण – मी कसा? भामे, राज्य वसुदेवाचं,
ते चालवताहेत बलरामदादा,
आणि प्रत्यक्ष सत्ता नांदते आहे यादववीरांच्या हाती
मी कोण तिथं? माझा फक्त सल्ला
मानला तर मानला, नाही तर खाल्ला
श्रीखंडाबरोबर!

सत्यभामा– काही तरीच तुमचं बोलणं द्वारकाधीशा,
शेला झटकणं चाललंय नुसतं!
खरं म्हणजे तुम्ही असता कुठं जागेवर?

द्रौपदी – श्रीकृष्णा, ही थट्टेची वेळ नव्हे
भामा दु:खानं व्यथित झाली आहे
प्रसंग मोठा गंभीर आहे.
पण भामे, म्हणून तुला शोभत नाही
इतकं लाघट बोलणं श्रीकृष्णाला

सत्यभामा– द्रौपदी वन्सं, चुकलं माझं
पण काय करू भानच राहात नाही
मला रागात.

द्रौपदी– बरं, वहिनी आता बसा थोडं,
श्रीकृष्णही थकले आहेत फार
अश्वत्थाम्यामागं करून धावपळ
आलात तसं धारेवरच धरलंत त्यांना
आता थोडं पादसंवाहन करा,
मी आता जाते तुमची सिद्धता करायला.

धर्म – भगवंता, मीही आलोच पाहून सिद्धता
तुमच्या प्रयाणाची (दोघे जातात.)

श्रीकृष्ण – आता बोल भामे,
काय, झालं काय तुला इतकं रागवायला
बिचाऱ्या पांडवांवर ?

सत्यभामा – नाथ, यादवांचा गुण नाही तरी वाण लागला मला
पण तुम्हीच सांगा, रागवू नको तर काय करू ?
इतकी काळजी घेता आहा तुम्ही
पांडवांच्या त्या टिचभर गर्भाची,
ज्यानं अजून प्राणही पुरते धरले नाहीत
आणि तिकडे प्राणान्त होत आहे कोट्यवधी यादवांचा!
पण तुम्हांला सवड होत नाही बघायला
तुम्ही सदा इकडे इंद्रप्रस्थात,
पांडवांच्या कल्याणात गुंतलेले!

श्रीकृष्ण – हूं–पांडव आणि यादव ? भामे,
खरं म्हटलं तर दोघांतही मी गुंतलो नाही
मी मुक्त आहे. पण ती मुक्ती ?–
छे, तीही खरी नाही, माणूस केव्हाच मुक्त नसतो
तो जन्मला की गुंतला
स्वत:चं वर्तन, कर्तव्य आणि सामाजिक संबंध
यांनी बद्ध होतो तो, जन्मापासून
या कोंडीत सापडतो
आरंभी घडतात काही कृत्यं त्याच्या हातून,
आपल्या ध्येयाच्या, कर्तव्याच्या प्रेरणेनं
पण पुढं त्यांना स्वत:चीच एक दिशा लागते,

त्या कृत्याचंच
एक अटळ चक्र चालू होतं, ओढला जातो
माणूस त्या भोवऱ्यात अगतिकपणे
अन् गमावून बसतो स्वत:चं स्वातंत्र्य–
पण जाऊ दे ते, पांडवांच्या कल्याणासंबंधी
काही तरी सांगत होतीस ? बरोबरच बोललीस तू
पांडवांत गुंतलो मी, ते पीडितांच्या रक्षणासाठी
साधूंच्या, धर्माच्या परित्राणासाठी,
अन् गुंतलो यादवांत, निर्माण करण्यासाठी
या परित्राणाचं एक पीठ, एक केंद्र,
सोन्याची द्वारका !–
पृथ्वीला सोडून, तिचा स्पर्श टाळून,
समुद्र–वादळात उभारलेली, ती सोन्याची द्वारका!
माझ्या स्वप्नाचं प्रतीक!–
सारी स्वप्नं अशीच असतात भामे,
वादळात उभारायची
अन् अश्रूंत जिरवायची–सावकाश.
सोन्याची द्वारका, माझ्या स्वप्नाची द्वारका–

अक्रूर – (प्रवेशून) ती द्वारका धोक्यात आहे, द्वारकाधीशा,
आज तुमची द्वारका संकटात आहे, ती डळमळत आहे,
प्रक्षुब्ध सागरात, झंझावातात विनाशाच्या!

श्रीकृष्ण– माहित आहे मला अक्रूरा, त्या स्वप्नाला
पहिला तडा गेला कौरवांच्या युद्धाच्या वेळी,
यादवांत दुही पडली तेव्हा,

अक्रुर– त्या दुहीचा यादवेंद्रा, आज कळस झाला आहे
भीषण हत्याकांड मांडलं आहे यादवांनी

श्रीकृष्ण – हत्याकांड! अक्रूरा,
दुहीनं पोखरलेले, सत्तेनं उन्मत्त झालेले,
समृद्धीनं बेभान झालेले यादव
वेगळं काय करू शकणार यापेक्षा ?
सत्तामदानं, ते माणसं ओळखेनासे झाले आहेत
देव– ब्राह्मण, आपले–परके,
काहीच दिसेनासं झालं आहे त्यांना
भोज, अभीर हे आमचे लोक
आम्हीही मूळचे त्यांतले, त्यांच्यातूनच आम्ही वर आलो,
यादव राजवंश स्थापन केला, पण या यादवांनी
राजवंशाच्या अभिमानानं
त्या अभीरांनाच छळायला सुरूवात केली
त्यांची घोषवनं जाळली, स्त्रिया पळविल्या

ऋषि–मुनींचा उपहास केला, विटंबना केली,
तो मुसळाचा शाप, ती लोहार्गला!–
अनर्गल सत्तेचंच फळ आहे समजलास?

अक्रूर– महाराज, त्या लहान क्षुद्र भांडणांना–
आपल्यातल्याच,
आता भयंकर युद्धाचं रूप आलं आहे
वाटतं आता थांबतील ते नि:पात करून
सर्व कुळाचा,
त्वरित बोलावलं आहे आपल्याला,
बलरामदादांनी.

श्रीकृष्ण– निघालोच आम्ही अक्रूरा,
तुम्ही निरोप करा तसा पुढे जाऊन
द्वारकेत, पण अक्रूरा, आधी हे सांग
कशी सुरूवात झाली याची.

अक्रूर– सांबाचं ते मुसल–प्रकरण द्वारकेशा,
माहितच आहे आपल्याला,
बलरामानं फेकून दिलं समुद्रात त्या मुसळाचं पीठ करून
नगरात द्वाही फिरवली कोणी कुठंही
मद्य पिऊ नये म्हणून, खरं ना उद्धवा?

उद्धव– हो. पण हे यादव, श्रीकृष्णा, गेले प्रभासवनात
आणि स्त्रियांसह प्याले मद्य
अभीरांच्या घरांतून लपवलेलं–
त्या धुंदीतच भांडणाला सुरूवात झाली

श्रीकृष्ण– पण कुरापत काय काढली अक्रूरा, भांडणासाठी?

अक्रूर– तसं काही विशेष नाही, नेहमीच्याच गोष्टी
शैनेय सात्यकीनं अंधक कृतवर्म्याला डिवचलं,
उपहास केला,
निद्रिस्त पांडुपुत्रांचा वध करणाऱ्या त्याच्या हीन शौर्याचा
कृतवर्म्यानं टोमणा दिला सात्यकीला उलट,
ठार केल्याबद्दल ध्यानस्थ भूरिश्रवाला,
झालं, सुरूवात झाली द्वंद्व–युद्धाला
त्यांच्या साह्याला आले भोज, अंधक, अभीर
आणि 'एरका' च्या गवती तरवारी:
हिरव्या लहरी लोकांच्या प्रक्षोभाच्या!

सत्यभामा– आणखी अक्रूरा, ते सांगा ना यांना, यदुनाथा,
तुमचाही उद्धार केला सात्यकीनं या भांडणात
त्यानं आरोप केला तुमच्यावर
स्यमंतकाच्या चोरीचा, म्हणाला,
तुम्हीच केलात वध माझ्या पित्याचा.

श्रीकृष्ण– अस्सं! सत्राजिताचा वध मी केला काय?
तो केला जांबुवंतानं हे सर्व जगाला माहीत आहे
अन् त्या वधाचा आरोप माझ्यावर करतो, आज,
हा सात्यकी! इतकी मती भ्रष्ट झाली,
एवढा उन्मत्तपणा आला! मग
मरणालाच योग्य आहेत हे यादव.

सत्यभामा– महाराज, शांत व्हा, विचार करा,
तुम्हीच त्यांना दंडायला निघालात संतापात
तर, मग कसं व्हायचं?
कुणी या संहाराला आळा घालायचा?
ही यादवी शांत करावी म्हणून सांगायला आले,
तुम्हीच संतप्त झालात,
शब्दांचा सूड शस्त्रानं घ्यायला निघालांत, तर–

श्रीकृष्ण– भामे, हे मदांध, आतताई,
उन्मत्तपणानं तुझा नि माझा अपमान करणारे,
हे यादव –नाही, त्यांना क्षमा नाही
प्रायश्चित्त मिळालंच पाहिजे त्यांना
ह्या अपराधाचं.
भ्रष्ट, उन्मत्त सत्ता नष्ट झाली पाहिजे
नाही, ही यादवी शांत होणार नाही
यादव गेले तरी उरणार ही यादवी
प्रत्येक युगात. चला, निघालो आम्ही
उद्धवा– अक्रूरा,–
आमच्या प्रस्थानाचे शंखनाद करा.

(शंखनाद–रथांचा गडगडाट–दृश्यांतराचे सूर)

दृश्य चवथे

(शंखनाद विरत असताना समुद्राच्या लाटांचा घोष चढत वाढत येतो. समुद्रकाठी, एका वृक्षातळी श्रीकृष्ण बसला आहे.)

श्रीकृष्ण– हे शंखनाद विरण्यापूर्वीच
मी इथे येऊन पोचलो
पण त्यापूर्वीच बाणासारखा काळ पोचला होता जाऊन,
ह्या युगान्ताच्या सीमेवर
विसर्जनाच्या टोकावर.
युगान्ताचा क्षण, काळाचं एक टोक,
निश्चल भासणारं आपल्या अनिवार गतीत:
सोन्याच्या शरासारखं, स्थिर, सर्पमुख,
उभं आकाशाला भेटून,
ज्यावर थरथरत असतो अज्ञाताचा एक आरक्त थेंब

ज्ञाताचं सर्व अवकाश गिळून,
अश्रु पिऊन!
काळाच्या गतीत एक क्षण असा येतो, जड अचेतन,
जिथं गोठून जातं सारं चैतन्य,
एका दिशेनं, एका प्रेरणेनं सळसळत येणारं,
विजेसारखं,
गोठून जातं फुलाचं हास्य, सूर्याचं तेज
त्या गोठण्यात अपार वेदना असतात,
आज सहन करीत आहे मी
त्या साऱ्या वेदना युगान्ताच्या,
विसर्जनाच्या!
आवतीभोवती मरून पडले आहेत सारे यादव,
माझे आप्त, माझेच पुत्र–पौत्र
माझ्याच काळजाचे छपन्न कोटी तुकडे,
आपल्याच शस्त्रानं छिन्नछिन्न झालेले
पलीकडून उठत आहेत यादव– स्त्रियांच्या– किंकाळ्या–
मूढ, भयचकित, आकाशात पसरत आहेत
भोगाच्या आंतर्व्रणासारख्या!–
पुढं कोसळत आहेत हुडे–गोपुरे
सोन्याच्या द्वारकेची,
शकले उडत आहेत माझ्या सिंहासनाची,
जे मी उभारले होते साधूच्या परित्राणासाठी,
धर्माच्या स्थापनेसाठी
या माझ्या स्वप्ननगरीत!
ते स्वप्नच कोसळून पडत आहे
मी आता वाट पहात आहे कशाची?–
आणखी कशाची?–
युगान्ताची की युगारंभाची?
(एक बाण येऊन श्रीकृष्णाला लागतो.)
हाय!– की या–या बाणाची?
हा घुसला पायात, कुणाचा बाण?

व्याध– (धावत येत) माझा, माझा, प्रभो. क्षमा करा मला
माहित नव्हतं मला प्रभो, पण तो माझा बाण–
माझा–

श्रीकृष्ण– तुझा बाण! तुझा बाण? कोण तू?

व्याध– मी जरा– जरा व्याध प्रभो, नीट दिसलं नाही
चूक झाली माझी– तो मी– माझा तो –
माझा बाण– तो प्रभो.

श्रीकृष्ण– तू जरा व्याध, आणि हा तुझा
बाण व्याधाचा? (हसतो) की काळाचा?
व्याध– नाही प्रभो, माझाच बाण तो
हरिण समजून बाण मारला–
श्रीकृष्ण– हरिण समजून बाण मारलास अं! छान!
मी हरीण, तू व्याध, वा!
(उद्धव–अक्रूर बोलत येत आहेत. त्यांचे शब्द आता जवळ जवळ येतात.)
अक्रूर– तर उद्धवा, प्रभासवनात सोडले मी श्रीकृष्णांना
अन् द्वारकेत गेलो बलरामांना निरोप द्यायला
परत आलो तर श्रीकृष्ण दिसेनात
तेव्हापासून शोधतो आहे, अन् इकडे हा कल्पांत!
प्रेतंच प्रेतं मेलेल्या यादवांची
रक्ताचे पाट, रत्नमण्यांचे खच, बाणांची टोकं,
तलवारींचे तुकडे
आणि मांसात रूतलेली हिरवीगार लव्हाळी!
एरका! हिरवे सर्प वैराचे!
रणक्षेत्र झालं प्रभासाचं आणि द्वारका झाली
एक भास, एक आभास, काळ्याकुट्ट अंधारात विरणारा,
केवढा संहार, कुरूक्षेत्रापैकी भयंकर!
डोळे फिरताहेत, कुठं दिसणार भगवान श्रीकृष्ण
एवढ्या उत्पातात?
उद्धव– सारं वन पाहात आलो आपण
कुठंच त्यांचा थांग लागत नाही
किती हिंडलो? बोलता बोलता अक्रूरा,
तुझी श्रीकृष्णकथाही संपली,
परंतु काही शोध लागत नाही.
अक्रूर– कशाचा शोध लागत नाही म्हणतोस
उद्धवा? श्रीकृष्णाचा?
निसटून जायची सवयच आहे त्याला
कथेत काय, कुठंच सापडत नाही तो
ना वनात, ना मनात!
पण हा कसला शब्द येत आहे?
कुणी बोलत आहे ह्या जाळीपलीकडे?
ते पहा, त्या वृक्षाखाली–
श्रीकृष्ण– व्याधा, तू जा आता,
ते लोक इकडे येण्यापूर्वी.
छान हरिण समजलास मला उदा उदा!–
व्याध– चूक झाली माझी प्रभो.
पण किती सुंदर भास,

गुडघ्यावरील पीतांबरावर टेकलेला
आपला तो निळा निळा पाय, आरक्त तळवा,
वर निळी निळी बोटे, नभाच्या गाभ्याची,
वाटलं विसावलाय एक नीलकांत हरिण
बाण मारला मी, चूक झाली माझी–

श्रीकृष्ण– चूक म्हणजे, प्रचंड चूक.
त्रैलोक्याची पारध करणारा व्याध मी
हरिण वाटलो तुला! –बरोबर आहे
हीच युगान्ताची लक्षणं असतील कदाचित–

अक्रूर– अरे ते पहा, श्रीकृष्णच आहेत ते
त्या वृक्षाखाली बसलेले
जवळ कोणी उभं आहे?

उद्धव– कोण असेल तो? काही समजत नाही इथून
चल, लवकर चल तिकडे
थकल्यासारखे दिसताहेत प्रभू.

व्याध– प्रभो, मला नीट दिसत नाही
म्हातारपणामुळं, क्षमा करा,
पोटाचा धंदा आहे माझा, हरिण मारणं.

श्रीकृष्ण– व्याधा, सांगितलं ना,
आधीच क्षमा केली आहे तुला. तू पोटासाठी हरिण मारतोस
आम्ही माणसं मारतो, उगाच–भुकेशिवाय!
माणसं काही कुणी खात नाही भुकेला, तरीही–
जा व्याधा, अभय आहे तुला.

व्याध– पण–पण तो बाण?

श्रीकृष्ण– राहू दे तो, तो काही शब्द नाही
जखम करून परत– घ्यायला,
आणि तूही दु:ख नव्हेस
जिव्हारी जखम करणारं,
अन् बाणच नव्हे, तर त्याची खूण पण घेऊन जाणारं!
जा आता, उशीर करू नकोस,
यादव असतील ते, तर
जिवंत ठेवणार नाहीत तुला
जा, पळ लवकर, (व्याध जाऊ लागतो)

अक्रुर– (पुढे येऊन) कोण रे तू? अन् कुठं चाललास
असा पळून चोरासारखा?
पण हे काय प्रभो, आपल्या पायात
हा बाण कुठून रूतला?

श्रीकृष्ण– बाण? कुठला बाण?

अक्रूर– तो काय, ह्या उजव्या पायात?

श्रीकृष्ण– तो होय? तो रूतला
चालता चालता–
उद्धव– नाही प्रभो, कुणीतरी मारला
या व्याधानंच मारलेला दिसतो
अक्रूर– खरंच, या व्याधानंच मारला असेल तो बाण
श्रीकृष्ण– म्हणून काय झालं? तुम्ही यादवांनीच
मारावे सारे बाण असं थोडंच आहे!
केवळ तुम्हालाच अधिकार नाही बाण मारण्याचा
उद्धव– ते खरं, पण तुम्ही का वाचवताय त्याला
का क्षमा करताय त्याला प्रभो?
किती खोल रूतलाय पायात तो बाण!
श्रीकृष्ण– अरे उद्धवा, तुम्ही माणसांनी
असंख्य बाण मारलेत मला
भात्याचे संपले तर शब्दांचे मारलेत!–
ह्यानं तर एकच बाण मारला
अन् तोही चुकून, नाही का व्याधा?
व्याध– होय प्रभो, चुकून, अगदी चुकून
हरिण समजून–
अक्रूर– हरिण समजून, चांडाळा, थांब, हरिण समजून काय?
तुझाही अजापुत्र करून टाकतो एका क्षणात!
श्रीकृष्ण– हां, अक्रूरा हात आवर
हे क्रूरपण शोभत नाही तुझ्या नावाला.
जा व्याधा, जा, माझं तुला अभय आहे (व्याध जातो)
अक्रूरा–उद्धवा, आता माझं ऐका,
ह्या व्याधाचा काही दोष नाही,
शक्तीही नाही त्याची
त्या मुसळाच्या तुकड्यापासून
त्यानं हा बाण केला होता,
समुद्रात, माशाच्या पोटात सापडला
त्याला तो तुकडा,
तेव्हा त्या मीनकेतनाचा
प्रत्यक्ष प्रलयंकर महाकालाचा हा बाण,
त्याचा प्रहार कसा चुकवणार मी?
समजा हे केवळ निमित्त
टळणार नाही युगान्ताची हाक
जा, तुम्ही दु:ख करू नका
आता आपल्या घरी जा.
अक्रूर– आम्ही जायचं, तुम्हाला इथं टाकून?
तसाच ठेवून हा बाण?

श्रीकृष्ण– इतकंच ? मग तो काढून जा,
माझ्या पायात रूतलेला हा बाण
शोभत नाही मला, नाही का ?
उत्पत्ती–स्थिती–लयकर्ता मी काल, मी हंता,
एका व्याधाच्या बाणानं विद्ध झालो ! हूं:
(हसतो)

उद्धव– असं का बोलतां प्रभो ?
का लाजवता आम्हाला ?

अक्रूर– परंतु प्रभो, एक सांगा
हा विनाश टाळता आला नसता का ?
पदरात घालायच्या होत्या आमच्या चुका,
पण हा विनाश ! प्रभो, गोकुळातून
तुम्ही बाहेरच आला नसतात तर !–
रमला असतात त्या वृंदावनात
त्या गोधनांत, मुरलीच्या स्वरसाधनेत
राधेच्या प्रिय भाषणात, यमुनेच्या कलरवात
आणि रासाच्या नृत्यगायनात–
डोंगरावरून झरणाऱ्या चांदण्यासारखे
यमुनेवरून वाहणाऱ्या पवनासारखे !– तर–
पण मीच करंटा, मीच निघालो
तुम्हाला घेऊन, गोकुळातून, द्वारकाधीशा–

श्रीकृष्ण– अक्रूरा,– वेडा आहेस
तुला असं वाटतं का
टळला असता हा विनाश,
गोकुळातून तू मला आणलं नसतंस तर !
गोकुळातून निघताना अक्रूरा,
तुला कल्पनाही आली नसेल की
अंती आपण इथं पोचू,
या बाणाच्या टोकाशी,
या बुडत्या स्वप्नाच्या नगरीशी,
कालसमुद्राच्या काठाशी,
जळवायूने कोरलेल्या अवकाशातल्या
काळ्या भयाण शून्याशी !–
एका भकास जागृतीच्या किनाऱ्याशी !–

अक्रूर– श्रीकृष्णा, मनमोहना, हे बोल
घरं पाडतात माझ्या काळजाला.
गोकुळातून तुम्हाला मी आणलं,
खरोखरच, ही चूक झाली माझी
असं वाटतं मला.

श्रीकृष्ण– शांत हो, अक्रूरा,
नसती शंका घेऊ नकोस,
तुझा काही दोष नाही ह्यात,
चूक, अचूक असं काही नसतं जीवनात
जीवन असतं एक कर्तव्य,
कर्तव्याचा एक क्षण, त्या क्षणाची आणीबाणी–
आरूढ व्हायचं त्या क्षणावर
(तेव्हा मी तुझ्या रथावर आरूढ झालो होतो ना,–तसा!)
आणि आपलं कर्तव्य करायचं
फलाची आशा न धरता अन् एकदा
त्या क्षणीचं कर्तव्य केलं, की माणूस,
बंदीवान होतो त्या क्षणाचा,
त्या क्षणाच्या, त्या ध्येयाच्या दात्यांत सापडतो तो
वाहात जातो प्रवाहात,
जेव्हा त्याला वाटत असतं–ठाम–
आपण उभे आहो आपल्या ध्येयाच्या माथ्यावर!

अक्रूर– परंतु महाराज, आपण बाहेर पडलात
कंसवधासाठी, शिवाच्या–सत्याच्या रक्षणासाठी,
आपण केलंत ते चांगलंच केलंत,
शिव, मंगलच केलंत जगाचं, मग
आपल्याला का पाहावा लागला
हा विनाश?

श्रीकृष्ण– कारण, मला दिसलं नाही,
आकळलं नाही संपूर्ण–जीवन
अक्रूरा, जगात निखळ चांगलं, निखळ शिव, मंगल,
असं काही नसतं,
सत्य–असत्य, भव्य–क्षुद्र, मंगल–अमंगल
यांनी हे जीवन आकाराला येतं
त्यांत मिसळतात आपली दिव्य ध्येयं, आपल्या आकांक्षा,
कालवतात त्यात आपल्या क्षुद्र इच्छा,
आपले स्वार्थ, आपले काम क्रोध,
आणि या सर्वांची बेरीज–वजाबाकी करता करता,
बहुधा हाती शून्य उरतं शेवटी
आता हेच पहा,
द्वारकेची ही सत्ता मी स्थापन केली
साधूंच्या, धर्माच्या परित्रणासाठी
पण ती सत्ताच भ्रष्ट झाली,
काम–मोहाच्या पाशात सापडून
अंध झाली स्वार्थानं, विलासानं

उन्मत्त बनली, येऊन पोचली
विनाशाच्या टोकावर अपरिहार्यपणे,
अर्थच नष्ट झाला सत्तेतला,
सत्त्वाच्या त्राणासाठी झटणारी ती सत्ता–
पण तिनंच गिळायला सुरूवात केली
साऱ्या अस्तित्वाला
म्हणूनच आता अटळ आहे नाश
त्या सत्तेचा, साऱ्या यादवांसह,
म्हणूनच मी भोगतो आहे मुकाट
अपत्यनाशाच्या कोटी कोटी यातना
त्या अपत्यांबरोबर करीत आहे मीही
स्वत:चं विसर्जन, अक्रूरा–

अक्रूर– पण, नारायणा, आपली कृति विशाल आहे
आपली प्रतिभा अनंत आहे
तिच्या सर्जनाला मर्यादा नाहीत
हा नाश टाळणं शक्य होतं आपल्याला

श्रीकृष्ण– अक्रूरा, प्रत्येक कृतीच्या, प्रत्येक प्रतिभेच्या
सर्जनाचाही एक वेग असतो
तो वेग संपला की विनाश सुरू होतो
तोच युगान्त. त्यातूनच होतो पुन्हा
नवीन युगारंभ.
विसर्जनात हरवतो सर्जनाचा अर्थ
आणि सापडतोही,–
राधेला प्रेमात सापडला तसा!–
हो– राधा. ती येते म्हणाली होती?–
तिची वाट पाहात थांबणार आहे मी,
अक्रूरा, जाताना,
एवढा हा बाण मात्र काढून घे.
फार रूततो आहे तो पायात.

अक्रूर– प्रभो, हा बाण काढला की–

श्रीकृष्ण– अक्रूरा, मी म्हणतो बाण काढून घे,
उपस तो बाण न् जा तुम्ही.

उद्धव/अक्रूर– प्रणाम प्रभो, प्रणाम वासुदेवा, प्रणाम,
जातो आम्ही. (जातात)

श्रीकृष्ण– गेले हे उद्धव अक्रूर– विझत्या आशेसारखे,
अन् पायातले शल्यही गळालं सरत्या कर्तव्यासारखं!
पण मनातलं शल्य! ते गळत नाही
अधिकच खोल जातं ते,
कधी त्याची फुलं होतात,

कधी व्यथा.
आता उरलो मी, एकटा, एकाकी,
फांदीवरील फुलासारखा, फुलावरील
आकाशासारखा
राधेच्या तृप्त हृदयातील गीतासारखा?–
कदाचित् व्यथेसारखा त्या गीतातल्या–
परंतु राधा, राधा कुठं आहे?
कुठं आहे ती? ती येते म्हणाली होती ना?
मी आठवण केल्याबरोबर?
परंतु हे असं काय होतंय?
स्वरासारखी झाडं वरवर जाताहेत!
चांदणं झिरपत आहे माझ्या रक्ताच्या थेंबाथेंबातून
अन् हे आकाश खाली येत आहे
माझ्या मनासारखं, माझं मनच होऊन,
त्याच्या गाभाऱ्यात भरून राहिले आहेत
मातीचे गंध, कालिंदीचे स्पंद
मंद–मधुर सूर वेणूचे,–
बालपणी ऐकलेले, श्वासांनी फुलवलेले
मी स्वत:च कधी,
राधेच्या सहवासात– तिच्या निश्वासांत–
(वेणूचे स्वर आसंमतात भरतात.)
पण राधा? – ती आली नाही
शेवटी ती आलीच नाही (सुस्कारा)

राधा– नाही कशी? ही मी आले
पहा, डोळे उघड, मी आले आहे
तू आठवण करताच आले आहे
मी राधा आले आहे, गोपाला,
तुझी राधा–

श्रीकृष्ण– राधा–राधा? तू आलीस राधा?
गोकुळातली राधा?
माझ्या बाळपणातली राधा!
माझ्या मुरलीच्या स्वरातली राधा!
शून्यातली मोहनबाधा! तू आलीस!
पण मी तुझा गोपाल नाही,
मी आहे द्वारकाधीश, श्रीकृष्ण!–
अष्टनायिकांच्या सहवासात एकाकी असलेला,
यादवांच्या प्रेतांच्या ढिगाऱ्यात,–
एकटा पडलेला
पाकळ्यांत कोंडलेल्या भ्रमरासारखा

भ्रमरामधल्या गाण्यासारखा,
मागे विनाशाचा तिमिर दाटला आहे
पुढे पसरला आहे नियतीचा दाट अंधार:
हेतूच्या अभावातून जन्मलेला
असतेपणातला अर्थ गमावलेला
अंधार–अंधार–

राधा– त्या अंधारालाच अर्थ द्यायला
आले आहे मी वृजलाला.

श्रीकृष्ण– आता कशा–कशाला अर्थ देणार तू राधे?–
सोन्याची द्वारका धडधडा कोसळत आहे
समुद्रात बुडत आहे
छपन्न कोटी यादव मरून पडले आहेत
धर्मसिंहासन नष्ट झालं आहे
कर्मे लुप्त झाली आहेत आपल्याच प्रेतांच्या ढिगाऱ्यांत
यांना काय अर्थ देणार?
जीवनाच्या विध्वंसाला
मनाच्या या उद्ध्वस्ततेला
कसला अर्थ देणार तू?

राधा– माधवा, तसा बाहेर नसतोच अर्थ!–
तो असतो स्वत:च्या आतच
तिथं त्याला शोधायला हवं
आठवतं तुला नंदलाला,
तू गोकुळ सोडून निघाला होतास,
तेव्हा मी म्हटलं होतं–
(राधेचे शब्द– स्मृतीतले, घुमणारे प्रतिध्वनीसारखे)
"नाही, नाही, माधवा नाही,
तुझा विरह चालेल, पण तुझ्या प्रेमाचा मृत्यू
नाही, तो मला सहन होणार नाही,
माधवा, सहन होणार नाही रे,–"

राधा– तो प्रीतीचा अर्थ त्या गोकुळात नव्हता
वृंदावनात नव्हता, रासात नव्हता
चांदण्यात नव्हता, माझ्या देहात नव्हता
की तुझ्यातही नव्हता,
तो होता माझ्या अंत:करणात:
फुलांतल्या सुवासासारखा, अदृश्य,
तोच अर्थ आज मी इथं घेऊन आले आहे.

श्रीकृष्ण– राधे, आता फार उशीर झाला त्या अर्थाला
त्या वेळी का आली नाहीस द्वारकेत?
मथुरेत का आली नाहीस?

राधा– का कुणास माहीत? आले नाही.
श्रीकृष्ण– पण त्या वेळी हे तू का बोलली नाहीस?
राधे, तेव्हा– तेव्हा–
यमुनेच्या डोहात बुडायच्या गोष्टी केल्यास
कालियाच्या मुखात जायला तयार झालीस
त्यावेळी – त्या वेळी – राधे –
राधा – त्यावेळी मुकुंदा, हे मला कळत नव्हतं
ते वयच नव्हतं तसं माधवा,
त्यावेळी प्रेम करायचं कळत होतं,
प्रेम मागायचं कळत होतं,
पण त्या प्रेमाचा अर्थ कळत नव्हता
श्रीकृष्ण– पुष्कळ गोष्टी फा ऽ र उशीरा कळतात
आणि हा उशीर राधे–
त्यातच शोकांतिका आहे मानवी जीवनाची
तू जो अर्थ आपल्या उरात पाहिलास,
तो मी बाहेर शोधीत होतो:
मल्लांच्या उत्तुंग बाहुताडनात
जरासंधाच्या तनूत्पाटनात
त्याच्या महाद्वारीच्या घनघोर भेरी–भंगात
अष्टनायिकांच्या फुलमाळांत
स्यमंतकाच्या रत्नशलाकांत
पांडवांच्या वनवासात
द्रौपदीच्या विस्कटल्या केसांत
दुर्योधनाच्या उरूभंगात, धर्माच्या परित्राणात
शंखचक्रात, गदापद्मात
पुरूषोत्तम वासुदेवाच्या वैजयंतीमाळांत–
पण तो अर्थ कुठंच सापडला नाही,
कुठंच नाही,– उलट तो अधिकच हरवला!
राधे, त्या वेळी तू का आली नाहीस?
राधा– त्या वेळी आले नाही ते बरंच झालं
मलाही तू हरवून टाकलं असतंस मुकुंदा!–
हरण्या–हरवण्याच्या कसल्या गोष्टी करतोस
हे बोलणं शोभत नाही तुला,
गीता सांगणाऱ्या भगवंताला.
घे, ही वेणु घे, आणि वाजव ती माधवा–
तिच्या सुरांत सापडेल तो अर्थ
कदाचित् –

श्रीकृष्ण– धन्य आहेस, राधे, तू धन्य आहेस,
उगाच नाही म्हणत लोक–
तू माझा गुरू आहेस म्हणून,
हे सूरच खरे आहेत, या आभाळासारखे
या जळासारखे
जाईजुईच्या फुलांसारखे, पाखरांसारखे
तुझ्या हंसऱ्या कुंडलांसारखे, त्याहूनही
तुझ्या उरातील प्रीतीसारखे, खरे, अगदी खरे.
हे प्रेम कधी मिळतं, कधी मिळत नाही,
पण त्यात असतात अनंत सर्जने,
सर्जनाचे प्राणमंत्र–

राधा– हां हां, गोपाळा थांब, थांब–
ही सर्जने–तर्जने काही मनात आणू नकोस
फक्त ही मुरली वाजीव
मी शांतपणे ऐकते
वाहू दे ते सूर, पसरू दे ते चांदणे
दु:खकालिंदीच्या काठाकाठाने
झरू दे या झाडांतून चांदण्याचे ते कवडसे,
कवडशांच्या शपथा
कुजबुजू दे या पानापानांतून
वाजीव ती मुरली, फुलव ते सूर,
चांदण्याच्या चोळीचाही ज्याने दाह होतो,
आळव ते आलाप,
बारा गाव वणवे ज्याने शांत होतात,
मग बरसतात श्रावणधारा
जळत्या गोवर्धन पर्वतापाशी
मुरलीधरा, ते सूर छेड
गांधाराचे आरोह भिडू दे निषादाला,
विषादाला विसरून, रेलताना धैवतावर,
धूसर जीवनाच्या
गोविंदा, कणाकणांतून, नसानसांतून
हिंदोळू दे ते सूर, धुंद मंथर,
अन् मग माझ्या डोळ्यांत पहा
त्या स्वरांचा आनंद, शिंपल्यातल्या मोत्यांसारखा
थरथरणारा–
खवळलेल्या समुद्राच्या तळाशी–
हं, वाजीव ती मुरली मोहना.

श्रीकृष्ण– खरंच, राधे, भेटेल तो आनंद मला
शिंपल्यातल्या मोत्यासारखा,

या खवळलेल्या सागराच्या तळाशी ? खरं हे ?–
की त्या मोत्यांच्या पाण्यातही असते
दुसरे एक तुफान, गोठलेले–अश्रूंचे !
असूदे, नसूदे–
वाजवतो वेणू मी
राधे, राधिके, आण ती वेणू
कुठं आहे, कुठं आहे ती वेणू ?
राधे, राधे ऽऽ – राधे !–
आणि राधा तरी कुठं आहे ?
ती आली नाही, की गेली नाही–
मग मी तरी कुठं आहे ?–
मी श्रीकृष्ण मेघासारखा गर्जून, वरसून,
पूर्ण होणारा आपल्या रितेपणात,–
तो मी तरी कुठं आहे ?–
मी आहे एक अकाल कल्पना:
हिरण्यगर्भ,
सवितृमंडलातून स्फुरणारी,
सोन्याच्या रथात बसून येणारी,
–शून्यापासून निर्शून्यापर्यंत–
फडफडणारी, गरूडध्वजाप्रमाणे
असीम दिगंतात, मोरपंखी ?

दुमार
(शिल्पकाराची "कल्पना" आणि राणी.....)

दुमार

दुमार – आता महाराणी, जपून दान टाका
या काजव्याच्या सरत्या दिव्याच्या हिरव्या प्रकाशात बिचारे काजवे!
प्राणांचे दिवे जाळितो आम्ही
क्रीडाविलासाच्या प्रकाश सुखाच्या एका क्षणासाठी

माणकावती– अहो बुद्ध भिक्षु, पुरे, आधी खेळा
हातातला डाव,
दुमार मला फार आवडतात
या काजव्यांचे धपापते दिवे
गूढ ओल्या, निळ्या कर्दळीच्या पावसाळ्या रात्रीत

दुमार – मृत्युचेही क्षण उजळून टाकतात
काजवे, आपल्या बेभान धुंदीत
सूर्यही जिथे हरवून बसतो आपला प्रकाश
अस्ताच्या वेळी.

माणकावती– काजव्याचे व्हावेत
असेच, आपलेही मरणाचे क्षण
दुमार, तुला नाही असे वाटत?
परंतु, कसले मृत्युचे विचार, भलत्याच वेळी,
डोळ्यातली धुंदी, प्याल्यातली मस्ती उडवून टाकणारे,
टाकले मी दान, आधी खेळा पाहू–

दुमार – पहा पहा राणी,
उजळते मरण क्रीडेच्या काठावर
झळकतात कसे काजव्यांचे पुंज
शुभ्र स्तनाकार स्फटिकाच्या पात्रात
अप्सरांच्या गोऱ्या गोऱ्या मुठीतील चंद्रमण्यांसारखे

माणकावती– चंद्रमण्यांसारखे!
छे, दुमार, जळत आहेत ते
ज्वाला कमळांच्या ठिणग्यांसारखे!
माझ्या रक्तात

दुमार – विझवा त्या ठिणग्या रक्तातल्या रक्तात
अन् महाराणी, आधी दान द्या,
काजव्याचे दीप विझण्यापूर्वी
वाचवा ही नरद, कटीवर बसवा.
दान काय पडलं?

माणकावती– कुठलं दान दुमार?
एकाद्या हाताला दानच पडत नाही
पिकलेली नरद माझी जुगत नाही
पहा किती पडले? अवघे दोन
पंच प्राणाच्या कवड्या करून!

दुमार – चिडू नका राणी,
बेभरोशाचा पट चौसरचा, दैवाच्या धाग्यांचा
आता मला पहा, दोन दहा अन् पडला सहा,
दुसऱ्या 'पौ' ने ही पहा, मेली तुमची नरद
माणकावती– मोठी भाग्यवान ती! मेलेली नरद
तेवढे भाग्य कपाळी या नाही:
असे मरण्याचे तुमच्या हातून
पण सांभाळा हं! शेवटी हरतो आधी जिंकणारा!
दुमार – जन्म–मरणाची कशाला ही भाषा
या सारीपाटात? बिचारी नरद
पहाते वाट तुमच्या हातींच्या उदार दानाची
टेकले पहा जयस्तंभावर मृगाचे नक्षत्र
धावून धावून,
स्तिमित होऊन
व्याध उभा आहे विसरून शरसंधान
धबधब्यालाही गुंगी आली आहे सरत्या रात्रीची
मलाही जाण्याची घाई झाली आहे
माणकावती– दुमार, तुला सदाचीच घाई
कधी मांडण्याची, कधी मोडण्याची
तुला कधी घाई नसते रे कशाची?
दुमार – अगदी खरं, पण–
म्हणूनच पूर्ण हा कैलास झाला ना?
म्हणूनच तुझा प्राण वांचला ना ?
माणकावती– वांचवले प्राण आता कां घेतोस?
कारे छळतोस दुमार असा?
मी देखील का पाषाणच आहे
एलापूरच्या या काळ्या डोंगराचा?
नाही,– पण त्या पाषाणावरही
दुमार, तुझं फार प्रेम आहे!
मिळाला असता त्याचा एखादा कण मला तर!
दुमार – खरंच राणी, अधिक प्रेम करतो–प्राणापेक्षाही
आम्ही मूर्तिकार पाषाणावर–
पण तसा पाषाण नसतो तो–
त्याच्यात असते सौंदर्याची मूर्ति
ईश्वराची कीर्ति
अंतरीची पूर्ति
अनंताची शक्ति
केवळ कलेची–छेद देणारी स्थलकालाला
अवघ्या सांताला!

तिच्यावर जडतो आमचा जीव

माणकावती– जडावावर जीव तुझा जडत नाही,
जडतो पाषाणावर
पाथरवटाला खरंच कशाची रत्नाची पारख ?
अहिल्या दिसते निष्प्रेम वनी एखाद्या रामाला
एखाद्या शिलेत उपेक्षिलेल्या.

दुमार – असतीस अहिल्या तर, दिसलीही असतीस
मला अंधारात दाट उपेक्षेच्या
चंद्रकिरणाच्या अरूवार छिन्नीने
मुक्तही तुला केले असते मी
शिलेच्या जड कवचा मधून
परंतु जसा मी राम नाही,
नाहीस अहिल्या त्रेतायुगाची तूही तशी
माणकावती– तू, महाराणी
राजाधिराज परमभट्टारक दंतिदुर्गाची,
पृथ्वीवल्लभाची,
सेऊण देशाची तू राजलक्ष्मी !

माणकावती– वा ! वा ! खरंच, बरंच कळतं
दगडात रमणाऱ्या पाषाणवर्म्याला
पृथ्वीवल्लभ गेले स्वर्गलोकी
देशी विराजती आता श्रीवल्लभ कृष्णदेवराय
त्यांची मी वहिनी, राजश्री त्यांच्या प्रौढप्रतापाची
माणकावती मी–
आणि दुमार, नेमिले तुम्हाला मीच, कैलासाच्या
माणकेश्वराच्या शिल्पमंदिराच्या निर्मितीसाठी

दुमार – त्याची आठवण आता या दासाला
करून देण्याचे कारण नाही काही महाराणी,
संपूर्ण झाले ते शिल्पमंदीर
आणखी आपल्या श्रीचरणांशी रूजू केली आहे
विनंती माझी सेवामुक्तीची
पण ती प्रार्थना होत नाही मान्य अजून श्रीदेवींना

माणकावती– कशी मान्य होईल ?
अपूर्ण आहे मंदिराचे शिल्प.

दुमार – आता शिल्पकाम माणकेश्वराचे उरलेले नाही
अनुज्ञा राणीची तरी मिळत नाही
निघून गेलो शेवटी वैतागून
सैनिकांच्या हाती पुन्हा धरून आणलंत
जुलमानं चौसर खेळायला बसवलंत,
तुला वाचवलं,

संपवलं तुझं प्रायोपवेशन ते मरणान्त,
प्रतिज्ञा तुझी पूर्ण करून,
एका रात्रीत कळस कोरून,
माणकेश्वराच्या शिल्पमंदिराचा!–
मुस्क्या बांधून धरून आणलंस
त्यालाच एखाद्या चोर–वधिकासारखं
का हा अपमान? विटंबना का ही
तुझ्या उदार प्राणदात्याची, एका महान कलावंताची?
ब्रह्मदेवानं जिथं नमावं,
काळानंही वाकावं जिथं शस्त्र टाकून
अशाश्वताला आम्ही शाश्वताचं वरदान देतो
सुगंध देतो अश्रूलाही, विझवून आग,
कलाकैवल्याच्या, प्रसादचंद्राच्या, चांदण्यानं आम्ही!

माणकावती– अरे, म्हणून तर तुझ्यावरून
प्राण ओवाळून टाकले आहेत
उतरून टाकीन लिंबलोणही साऱ्या ब्रह्मांडाचा,
जिवीच्या माझ्या जिवलगावरून
खरंच रागावलास? धरून आणलं म्हणून?
काय करू? करमत नाही
धरवत नाही प्राण मला तुझ्याशिवाय
दुमार, माझं मन कळत नाही अजून?
दिलेले तुझे हे प्राणाचे दान
तुझ्यावाचून कुणाला वाहू मी?
ये माझ्या राजसा, फार जागले आहे
फार थकले आहे, भटकून भटकून
त्वचेच्या रानांत कामनांच्या रात्री
जवळ घे मला
भेटून, भेदून देहाला शेवटी तुझ्या आलिंगनात
विसावू दे मला
खुडून घे माझे हे फुललेले फूल, देहाच्या देठीचे!

दुमार – नाही महाराणी, शक्य नाही ते
भलते बोलून भलतेच मागून,
कलेसाठी माझे घेतलेले व्रत
असे भंगून टाकू नकोस.

माणकावती– नको रे होऊस निष्ठुर असा
दगड का बनलास, दगडात राहून,
माझ्या देवा?

दुमार – दगड असतो तर बरं झालं असतं
झालो असतो देव

किंवा गेलो असतो फुटून, चुरा होऊन,
एकाच घावाने!

माणकावती– नको ग बाई, मी काही राया, तशी दगड नाही
पण खरं सांग,
अपारदर्शी कसा रे असा तू?
सह्याद्रीच्या निष्ठुर काळ्या पाषाणासारखा!
कोण आहे तुझ्या या काळ्या मनात–
काळ्या जळातल्या गाण्यासारखं?
आषाढ घनांच्या स्वप्नासारखं?

दुमार – खरंच सांगतो शपथ घेऊन गंगाधराची
शिव धूजंटीची–

माणकावती– नको, नको, त्याची शपथ नको तू घेऊ
महेश्वराच्या त्या धूजंटीच्या जटेतच गंगा लपलेली आहे,
तिरप्या नेत्रांची कमळे फुलवीत!
मला त्याची शपथ मुळीच नको
घे, माझी–माझ्या– गळ्याची शप्पथ!

दुमार – खरंच, तुझ्या गळ्याची शपथ
तसे माझ्या मनात
कुणीही नाही– तिरप्या डोळ्यांच्या कमळासारखं
कमळातल्या काळ्या भ्रमरासारखं!

माणकावती– कुणी नाही? खोटं! माझी मूर्ति आहे
तुझ्या नकाराच्या पाकळ्यात लपलेली!

दुमार – नाही, नाही राणी, त्रिवार नाही
कितीदा सांगू मी?
एवढा डोंगर कोरून, अजून राहिले आहे
माझे हृदय शून्य, अजून राहिले आहे
कुठे रेघ नाही, कुठे तडा नाही

माणकावती– अगदी खरं? मग सांगा पाहू लक्ष्मीची मूर्ति
सलज्ज, आतुर विरघळण्यासाठी विष्णूच्या बाहूंत
कुणासारखी कोरलीत?

दुमार – लक्ष्मीदेवीसारखी,
कमळामधून अवतरणाऱ्या
सूर्याच्या नेत्रांत विलीन होणाऱ्या कमलेसारखी!

माणकावती– आणि ती पार्वती?
कमलवनाच्या पाणभुईवरून,
हातानं धरून, श्री शंकराला
ती आणीत आहे,
चालताना स्वत:च हरवून जात आहे, उभी राहात आहे,
एक शिलाबद्ध कमल होऊन कमलवनात!

संभ्रमाचं फूल अशी ती पार्वती
शिल्पिलीत कशी ? कोणावरून ?
कुठं पाहिलीत अशी लज्जावती ?

दुमार – पाहिली मी माझ्या कलासमाधीत !
कमळांच्या पानात उभी ती अपर्णा:
"देवं भूत्वा देवं यजेत्,"
योगच आहे तो कलाकाराचा !
प्रत्यक्ष दिसते ती कलावस्तु
आम्हाला आमच्या सावलीसारखी–
इंद्रवज्रेसारखी ! *
सूर्याच्या प्रभेने रंगलेल्या धुक्यात
इंद्रधनुष्याच्या त्या ध्यानभूमीत.

माणकावती– अहो, योगीराज त्या ध्यानभूमीत
बिंबली नाही कधी माझी छाया ?

दुमार – तुझी मूर्ति राणी, कधीच नाही आली
हिरण्यगर्भ त्या ध्यानभूमीत माझ्या कलेच्या

माणकावती– फार फार तुम्ही दुष्ट आहात दुमार,
तुमच्या कलेच्या त्या ध्यानभूमीत,
तुमच्या हृदयात,
मिळाला नाही मला कधी प्रवेश,
सोडणार नाही तरीही स्वप्नात
कधीच तुम्हाला.
म्हणून खेळ मांडला आहे चौसरबाजीचा
चला, डाव टाका, रात्र टळली तरी
पणास लावले आहे पहा, रात्रीने सारे तारांगण
एका पहाटेच्या धूसर क्षणासाठी.

दुमार – खेळतो राणी, खेळतो
मोहणाऱ्या, जाळणाऱ्या कवड्या हातात घेतो
विखारी नागिणी ! तुझ्या डोळ्यासारख्या
पुन्हा एकदा पण एका अटीवर

माणकावती– मान्य आहेत महाराणीला तुझ्या सर्व अटी
निर्दय जिवलगा, उच्चारण्यापूर्वी.

दुमार – अट एवढीच जाऊ द्यावेस मला तू इथून
मुक्त करावेस तुझ्या प्रेमाच्या बंधनांमधून
जिंकलो मी तर– आणि हरलो तर–
दास होऊन वागेन तुझा, तुझ्या इच्छेने.
कौरवांनी पण लावला तेव्हा

* सूर्योदयाचे वेळी पूर्वेकडे पाठ करून उभे राहिले असता डोंगरमाथ्यावरील प्रकाशगर्भ धुक्यांत स्वत:ची जी सावली उमटते तिला 'इंद्रवजा' म्हणतात.

पांडवांना आपले दास करण्यासाठी
मी मला पणास लावीत आहे आज
माझ्या मुक्तीसाठी
बंधमोचनासाठी माझ्या कलेच्या!

माणकावती– मान्य आहे मला, माझाच डाव आहे
आधी मी खेळते, हे पहा पडले
प्रेमाचे पंचवीस.

दुमार – पृथ्वीपर्यंटन करा खुशाल राणी,
मेली नाही माझी एकही नरद.
हे पहा दहा आणि एक सहा
हे वर चार, अन् हा इथे दहाचा 'पौ'
पोटघरात, मेली तुझी बघ
पिकलेली नरद, माझी नरद
घरात जाऊन झोपली – जिंकलो मी.
जिंकलो मी राणी, जिंकलो मी!
हरलात तुम्ही.

माणकावती– दुष्ट, दुष्ट आहेस तू
खोटं खोटं खेळलास
मी तुला मुक्त कधीच करणार नाही
माझा आहेस तू!

दुमार – नाही, महाराणी, वचन फिरवू नका
मी तुझा नाही.
या देहावर अधिकार आहे माझ्या कल्पनेचा.

माणकावती– कोण ही कल्पना?
अन् इतकी वर्षे का लपवून ठेवलेस
हे माझ्यापासून

दुमार – उघडाच होता
चंद्राच्या उरीचा रात्रीचा डंख!

माणकावती– निर्दय, वंचक, पुरा घात केलास
भंगून टाकलेस हे माझे स्वप्न जीवनभराचे
विश्वासानं तुझ्या हाती निरवलेले!
पुरा सूड घेईन या वंचनेचा
नाही, अजून हरले नाही मी.
सर्वस्व माझे उधळून देईन,
अर्ध्या डावासारखे– या उधळलेल्या!

दुमार – उठून जाते अशीच रात्र उधळून देते
तारांचा डाव, चिडून अंधारात.
दिसत नाही तिला पहाट झालेली
कधीच– कधीच!

(प्रवेश दुसरा)

स्थळः दुमार लेणे-

(महालातून एका बाजूने कैलासाचे भव्य मंदिर दिसत आहे. दुसऱ्या बाजूस कातळातून पडणारा धबधबा. पलीकडे सकाळचे आकाश-)

दुमार - निरोप द्या आता
एलापूरच्या काळ्या पाषाणांनो!
अद्‌भूताच्या गूढ कृष्णकौतुकांनो!
काळाला दिलेल्या अवकाशाच्या माझ्या आव्हानांनो!
मला निरोप द्या.
अपार प्रेम केलंत माझ्यावर तुम्ही
कठोर कातळांनो,
काळीज आहे, हृदय आहे तुम्हाला
स्त्रीच्या उन्नत कुचमंडलाहून मृदु, अरूवार
करस्पर्शाने स्फुरणारे, चुरणारे,
विरघळणारे सृजनाच्या इच्छेने,
सुंदर वेगळ्या जगाच्या वेडाने!
थरथरणारे,
रूपाकृतींच्या नवनवीन स्वप्नाने
अरे, अज्ञाताच्या अभंग मौनांनो!
तुम्ही माझ्याशी हसलात, बोललात,
ऐकलंत माझ्याही मनीचं रहस्य,
कान लावून माझ्या छिन्नीला
साकार केलीत ही अपरा सृष्टि,
ब्रह्माला दिपवणारी
विष्णूला मोहणारी
विसरायला लावणारी शिवाला, त्याचे संहार-तांडव!
तुमच्या या दगडी आवरणाखाली
फुलांची वनें हसताना दिसलीं
ऐकिलीं गाणीं गंगा-यमुनाच्या लाटांची, फेनांचीं
पाहिलीं शिलात समुद्रमंथनें प्रक्षुब्ध युगांचीं
उषारहस्यें तीं रती-पार्वतीच्या अळुमाळ लज्जेचीं!
मनातले पीळ, जाळ हृदयींचे,
अविराम संग्राम तमाचे, तेजाचे,
सगळे सगळे पाहिले इथे कोरिले, शिल्पिले
तयांचे भारत, त्यांचे रामायण
तुमच्या त्रिकालदर्शी शिलांतून!
निर्मिले मी तुमच्याच बळाने
माझ्या अस्तित्वाचे विश्वात्म, सुंदर, आनंदरूप

असीमपणात अवकाशाच्या!
माझ्या शिलाबद्ध प्राचीन मित्रांनो,
माझ्या रक्तात वाहात आहेत तुमचे स्थाणु,
पाषाणाच्या तुमच्या त्वचेच्या खाली
माझेच रूधिर रंगते आहे, उसळते आहे
या छिन्नीने सूर्याचाही रथ अडविला होता
काळही क्षणैक खिळविला होता!–
तोच काळ मला आता ओढून नेत आहे
राहते कला, पण कलावंत वाहात जातो
काळाच्या प्रचंड असीम धारेत,
मलाही असचं वाहात गेलं पाहिजे
अनवरत, एकाकी–
होय एकाकी–एकाकीपणाच–रिता भयाण
वाट्याला येतो:
शापच असतो
तो वरदायी कलावंताला!
माणकावती वेडी मला सांगते
स्त्री पुरूषाची पूर्ति असते
अपूर्ण जीवन दोन जिवांचें
पूर्ण होतें गाढ आलिंगनात
दोन देहांच्या–दोन प्रेमिकांच्या
वेडे राणी, कुणीही कुणाची
अशी परिपूर्ति करू शकत नाही या जीवनात.
अंतर असतं, तसंच राहातं
परंतु राणी, दिसत नाही ते
धुंदीत डोळे मिटून घेतल्यामुळे!
माणकावती, आठव त्या रात्री,
दोन देहांच्या चार बाहूंच्या
दोन उरांच्या गोऱ्या धडकीच्या
नक्षत्रें ज्यात मावळलीं होतीं
अनोळखी पहाट फटफटली होती, शेवटी कशी?
एकवसना, एकाकी, अपूर्ण! भेटून, लंघून दोन देहांना!
म्हणूनच ना तू कवळू पाहतेस
नव्या आलिंगनात माझा नवा देह?
नाही महाराणी, असेच राहणार माझे जीवन
एकाकी अपूर्ण चंद्रकलेसारखे
क्षयवृद्धीच्या आंतर वेदनेत तळमळणारे!
ते पूर्ण कधी करता येणार नाही

कुणा कुणालाही
तुलाही नाही, माणकावती!

माणकावती– (प्रवेशून)– माणकावती? काय म्हणालात?
कुणाला घातलीत व्याकुळ साद?

दुमार – माझ्या नियतीला, जाऊ द्या ते–
पण महाराणी, आकस्मिक कृपा
कशी केलीत या शुभागमनाची?

माणकावती– माहित नाही अजून शुभ की अशुभ
मी आले आहे मुद्दाम पाहायला
तुझ्या कल्पनेला.

दुमार – मोठा अनुग्रह महाराज्ञीचा
पण ती सध्या–सध्या इथे नाही,
बाहेर गेलीय ती उद्यानात– फुलें वेचायला:

माणकावती– थांबते मी इथे ती येईपर्यंत
माझे डोळे तहानले आहेत तिच्या दर्शनाला
थांबू ना दुमार?
मोठी पुष्पवेडी दिसते ही पोर!
अगदी तुझ्यासारखी

दुमार – तसं नाही काही– थांबावं राणी–
सहज गेलीय ती डोंगरावर
शोधायला वेडी नादाचे रंग झऱ्याच्या शब्दांत
तिला ऐकू येते आभाळ–गाणे उषेच्या रंगात
रेखते त्यांचीं चित्रेहीं काही.

माणकावती– छान! म्हणजे तुझी ती प्रिया
चित्रकार आहे!
चित्र–शिल्पाचा अपूर्व संगम!
आभाळवेडी दिसते तशीच
ऊंच निळाईत विलीन होणाऱ्या डोंगरासारखी–
फार आवडतात नाही का तुला अबोल डोंगर?
मी वेडी, बडबडी–

दुमार – पार गोठून गेलंय माझं डोंगराचं प्रेम
चाळवणार नाही, बोलणार नाही
आता कुठल्याही छिन्नी –हातोड्याने
–केव्हा परतेल ती कुणास ठाऊक?
महाराणीनं ग्रहण करावं आसन इथं
अनुज्ञा असावी, आलोच मी आतून
सुचना देऊन काही सेवकाला.

माणकावती– सुचना कशाची?

दुमार – माझ्या प्रयाणाची
निघणार आहे दोन घटकांनी पट्टादिकलला,
मायभूमीला, जिनं दिलं वेड शिलाशिलांत स्वप्न पाहण्याचं
माणकावती– कुठलं प्रयाण? जाणार कसे
माणकेश्वराचं शिल्प पूर्ण झाल्याशिवाय?
दुमार – विदितच आहे महाराणींना
पूर्ण झालंय कैलासमंदीर
माणकावती– देऊळ झालय, कुठं आहे देव?
शिवलिंगाच्या स्थापनेशिवाय
जाता येणार नाही तुम्हाला इथून.
दुमार – माझा करार फक्त मंदिराचा.
वचन दिलं नव्हतं देवाच्या मूर्तीचं
आणखी एक सांगू महाराणी? निर्मिता येत नाही
माणसाला देव–निर्मिला तरी!
निर्मिलं आहे मी भव्य मंदीर, विशाल सुंदर
घृष्णेश्वराच्या देवालयाहून
पूर्ण झालं ते दिलेलं वचन.
माणकावती– मंदिर ते रितं राहणार असेल,
या माझ्या रित्या हृदयासारखं,
तर दुमार, तुला जाऊ दिलं जाणार नाही
या क्षणापासून स्थानबद्ध आहेस
आज्ञा आहे ही महाराणीची राष्ट्रकूटांच्या!
दुमार – असं आहे तर! धन्य महाराणी,
कारण सकाळच्या या श्रीचरणाचं,
तरीच पहाटे पुष्करणीचं पाणी
रूद्ध श्वासासारखे धपापत होते
हिरव्या पिवळ्या सावल्याच्या तळात
झोपलेले नाग क्रंदत होते–
क्षमा करा राणी, बोलत नाही मी
तुमच्या हिरव्या शृंगाराबद्दल
मी म्हणत होतो आपली हीच आज्ञा असल्यास
कैलासाच्या या शिखरावरून
करावी लागेल मला आत्महत्या.
माणकावती– आत्महत्या! शी: इतका का दुमार
तू भ्याड आहेस? का पुरूष आहेस?
दुमार – माझ्या मनात नाही मरणाची भीति
निर्मित असता,
गद्‌गदा कैलास हालविणारा दशकंठ रावण,
कोसळली शिला, चेंगरलो मी तिच्या भाराखाली,

प्रकाशाच्या झाल्या
शिलेच्या बाहुल्या माझ्या डोळ्यांतल्या–
शिवले नाही तरीही मला मृत्यूचे भय
आनंद होता एक जीवनाचा, कलानिर्मितीचा
मृत्यूच्या क्षणीही सागराऐसा!
परंतु आज दंवाने न्हालेल्या फुलाफुलांत
चैतन्याच्या झुळझुळत्या क्षणांत
भयाण मृत्यु दिसतो, हंसतो फुटत्या रक्ताच्या गुळणीसारखा!

माणकावती– म्हणूनच म्हणते स्वीकार कर माझा
सारे जीवन सुंदर होईल
आकाशालाही अन् फूल येईल!
आहेच मी तशी सुंदर रूपशी,
दुसरी ऊर्वशी
आलेली वाहात मी अभिलाषांच्या कल्लोल–समुद्रीं
प्रीतीच्या शुभ्र मोत्यांच्या शिंपल्यात
सोडून मागे अवघा जन्म लज्जेसारखा
श्यामल काठाशी तुझ्या बाहूच्या
सृष्टीच्या अनादी कामनेसारखी!
फुलतो वसंत माझ्या अंगांगांत
करीन फुले त्वचेचीं, क्षणांचीं
मातींची ओढ आहे माझ्या मांड्यांत
घनाढ्य अनंत नभें भोगण्याची!
उत्कट रहस्यें नयनीं माझ्या
शिवगौरीच्या मीलननृत्यांचीं
सांगना, कधी मदनमहेशा, कोरणार आहेस
तीं सारीं लास्यें अजून अस्फुट
माझ्या आरस्पानी गौरागांतून?

दुमार – लास्यें नाहींत माणकावती, तीं
प्रलयंकारी तांडवें आहेत सृष्टीच्या अंताचीं!
खचतील गिरी, कोसळतील तारे,
चिंध्या होतील फाटून फाटून अफाट आभाळाच्या,
साऱ्या भावमूर्ति खाली धडधडा भंगून पडतील,
माणसे वराह होऊन फिरतील
हुंगीत अंधार उध्वस्त लेण्यांत आपल्याच आत्म्याच्या!
पाहिले होते मी हे स्वप्न तेव्हाच–
क्षीण मिटणाऱ्या कृष्णकमळाच्या त्या तुझ्या डोळ्यांत,
मरणाच्या उदास पसरत्या सावल्यांत –
बिंबली जेव्हा कलशाकार ती शिखराकृति
नुकतीच कोरलेली मी डोंगरामध्ये!–

ज्याचा अजून येत होता मला ओला ओला गंध
आताच तोडलेल्या चंदनासारखा!

माणकावती– त्या पाषाणाला खरंच येतो पुरातन गंध
नृत्याने फुललेल्या, घामाने भिजलेल्या,
शिव–पार्वतीच्या श्रांत गौरांगाचा,
चितेच्या भस्माचा, निळ्या कमळांचा,
फुंफाटणाऱ्या विषारी सर्पांचा,
अन् तोच गंध मला येत आहे
आता तुझ्या या तरूण देहाला
पिऊन घेऊंदे एकदा हा गंध श्वासाश्वासांनी
भरून, माझ्या प्राणाप्राणांतून

दुमार – थांब महाराणी, स्पर्शू नको मला
व्रतभंग होईल, हरवून जाईल, वितळून जाईल.
माझ्या बोटांतील कलेचे चैतन्य
फेकावा लागेल निष्प्राण हा देह
त्रिभुवनसुंदर या शिल्पावरून.
माझी कलाभूमि होईल माझी मृत्युभूमीही!
काही दया कर अल्लड भोळ्या त्या कल्पनेवर,
मरेल ती, राणी, वाचवा तिला.

माणकावती– इतकी आवडते तुला ती कल्पना?
खरंच एवढी पवित्र वाटते तुला तिची प्रीत?
मनात तुझ्या एवढी करूणा!
तिच्यासाठी भीक मागतोस दयेची–
आणि माझ्यापाशी!–
जाळीत होती जी तुझ्यासाठी सारे आयुष्य
एकाकी विषण्ण सोन्याच्या समईचे वर्षानुवर्षे!
आता मला तिचा वधच केला पाहिजे.
विसरलास वाटते, माझी कालची
सूडाची प्रतिज्ञा
कुठे आहे तुझी लाडकी कल्पना?
बागेत? डोंगरात? कुठे आहे ती?
चित्रकार आहे ती, तूंच म्हणालास ना?
कधीच काढता आले नाही जिला
नियतीचे चित्र
रेखून देते, रंगवून देते तिच्याच कोवळ्या तरूण रक्ताने
(धावत जाते.मग दुरून शब्द येऊ लागतो).
छान पहा ती, इकडे येत आहे
कैलासीच्या निळ्या कबूतराप्रमाणे
रहस्य विसरून अमरपणाचे!

दुमार – थांब, थांब, थांब माणकावती,
करतेस वध कुणा निष्पापाचा ?
थांब तिथेच,

माणकावती– मला माहीत, कल्पनाच आहे ती
पायाला आळिता हातात फुलें,
डोळ्यांत रंग अनंत आशांचे
अग खुळ्या पोरी,
कल्पना नाही तुला समोरून येणाऱ्या मृत्यूची
चांडाळणी, तूच घात केलास माझ्या प्रेमाचा
आपल्या प्रीतीच्या पूर्तीसाठीच ना ?
हा घे वार–नीट छातीत
बघू दे कुठे ते दुमारचें प्रेम तुझ्या हृदयात ?
फुलांतल्या अदृश्य वेड्या सुवासाचें!
प्रहार दुसरा हा घे कुशीतून,
कुठें आहे पाहू ते तुझें हृदय ?
फुलांच्या बाणांनी सहज विंधणारें!
काय हे ? एक तपकिरी पिशवी!
अन् धार रक्ताची!
दुमार, पहा तुझी ही कल्पना!
पहा तिचे हें ऊन ऊन हृदय
कसें धडधडतें,
कळसावर घुमणाऱ्या पारव्यासारखें!
पहा तर खरी–
(ती स्वत:च रक्तात न्हाऊन बाहेर आलेली दिसते)

दुमार – कुणाचं हे रक्त ? कुणाला मारलंस ?
हे काय तुझ्या हृदयाला जखम!
किती रक्त वाहातंय
अरे देवा– कैलासपती–
काय हे राणी– काय स्वत:चाच तू वध केलास ?

माणकावती– नाही दुमार, वध केला आहे मी
तुझ्या कल्पनेचा!

दुमार – कुणाची कल्पना ?
नाही, नव्हती–कुठं होती ती ?

माणकावती– इथंच होती ती! तुझ्या–नाही– माझ्याच हृदयांत–
ती दुष्ट कल्पना!

दुमार – राणी, राणी, शुद्धीवर ये,
तू वार केलास आपल्याच काळजावर

माणकावती– अरे वेड्या, मला कां एवढं कळत नाही तें ?
हृदय माझंच, रक्तही माझंच हे वाहात आहे!

नाही रे, जीवन प्रेमानं भरून, परिपूर्ण होऊन
उसळत आहे!–
तू म्हणालास ना? – खरंच होतं ते!–
पूर्णता येत नाही, पूर्ती होत नाही दोन जिवांची
शेवटी काही उरतंच अंतर: रिता अवकाश
गूढ, मुलायम कमळातल्या दोन पाकळ्यांतल्या इतका!
पण दुमार, देहच हा नष्ट केला तर?
जाऊ दे, नकोरे, नको कष्टी होऊस,
एकच इच्छा, कल्पना आणि तू आता सुखी व्हा.
खूप प्रेम करा, चांदण्यात नहा, फुलांत रहा,
नाचा वीणेचे झंकार बनून, आपल्याच देहाचे!
आणखी–आणखी शिवलिंग स्थापा
माणकेश्वराच्या रित्या गाभाऱ्यात
जाते मी आता रागवू नको रे–
दुमार, दुमार, सुखी–हो–राजा
स्फटिकाच्या पात्री! –काजव्याच्या रात्री!–
उजळीन,– उजळीन मी– कल्पना–
(मरते).

दुमार – कल्पना, कल्पना! कुठली कल्पना?
कुणीच नव्हती! खरंच! बोल,
बोल माणकावती, काही तरी बोल,
खोटी होती ती–
माझी कल्पना, निवळ रचलेली
फसवण्यासाठी!– मला की तुला?–
नाही, नाही, मुक्त होण्यासाठी तुझ्या पाशांतून
दर्शनासाठी, साक्षात्कारासाठी नवीन कलेच्या!
नवीन कला! नवीन दर्शन !
होय, राणी, उलटी खूण कलेच्या घरची!
आधी कळस नंतर पाया!–
कैलास नव्हे चिंचेच्या पानावर सारे त्रैलोक्य
दिव्य सौंदर्याचा, नव्या निर्मितीचा चिरंतनाचा
माझा अभिमान सूर्यासारखा!
कोसळला खाली! – एका फुलापुढें–
प्रकाशासाठी भिरभिरणाऱ्या
उरीच्या पाकळ्या उसवीत फिरणाऱ्या
सूर्यफुलापुढे!–
माझी कला, दिव्य अद्‌भुत ही प्रतिसृष्टि
मीच का निर्मिली?
नाही–नाही– विश्वास बसत नाही

छे छे, मी तो–तो शिल्पी नाही!
कोण तो– कलावंत?– का ही प्रगटली
तुझ्या देहातून? तुझा देह धरून?
शिवपार्वतीची हीं सहस्त्र नर्तनें!
रति–मदनाची शृंगारमिथुने
लक्ष प्रतिबिंबें का तुझ्या प्रीतींचीं?
सृजनानंदाची, फुलांच्या जातीचीं
सूर्याच्या नात्याचीं!
उडाला का तुझ्या क्रुद्ध नेत्रातून
त्रिपुरांतकाचा गभस्तीचा बाण?
अन् तपस्विनी मानिनी उमा उभी राहिली
तुझ्या मिटलेल्या विरही डोळ्यांतून ओघळून!
मग माझी प्रतिभा?–
अहंकाराचा, माझ्या अस्मितेचा प्रचंड हुंकार!
कुठे गेला तो? कुठे हरवला?
पण हे काय? ह्या साऱ्या मूर्तीच
हरवून बसताहेत आपल्या रेषाकृति!
एका अजस्त्र दगडाच्या खोंगीत
विरजून, गोठून जात आहे ऊन
ढगाढगांतून,
मृत्युच्या धुक्यात सारे मंदीर तरंगते आहे
डळमळते आहे! गिळू येत आहे
शिवालयाचे रिते गर्भागार मला मरणासारखे
पसरून आपले विक्राळ तोंड!
धरित्री कापते आकाश धपापते
अंधार, अंधार, घुसमटणारा काळा अंधार
त्याच्या लाटावर, बुडत्या कळसावर
रूद्र नाचतो आहे खांद्यावर घेऊन
कोणाचा देह? पिकल्या शेवंतीचा!
फुटल्या डाळिंबाचा! माणकावतीचा?
नको माणकावती, नको असे हंसू
फुलातल्या अज्ञात मरणासारखें
इंदुमतीच्या!
– आणि हे कोण? काय विचारीत आहे
फुटल्या मूर्तीसारखें
बुडत्या घागरीसारखें
"देहात, देहाहून देहाच्यादेहात, या विभक्तीपलीकडें
प्रीतीच्या व्यथेला, विरहमीलनाला
साऱ्या अस्तित्त्वाच्या अनादी शब्दाला,

आनंद रूपाच्या आकृतीबंधाला,
काय अर्थ आहे? काय अर्थ आहे?
कळलं का तुला?
सांग, सांग मला– कळलं का तुला?"
मला माहित नाही. मला माहित नाही!
दगडाला विचार, या डोंगराला विचार
डोंगरावरल्या सूर्याला विचार
पण सूर्यच उतला! डोंगर फुटला.
मीही कोसळलो– चाललों खाली
खोल पाताळात, भयाण अरूपात!
पाताळात, खोल आकाश कसें आलें? –
माणकावतीच्या गोऱ्या गोऱ्या मांड्या
त्याही तिथेच! – त्यांना फुटलेले
अर्धे फूल! – अर्धा डोळा! रडणारा हसणारा
अजून त्यांत काजवे पेटत आहेत.
मीही एक त्यातलाच काजवा!
आंनदरुपाचा, अमृतात जळणारा!

बांसरी

बांसरी

"कधी कधी मला वाटतं
पाऊस बरसला नाही, वारा वाहिला नाही,
सूर्य उगवला नाही, तरीही
ही फुलं फुलतील
'प्रभाती'च्या सांद्र कांतिमान स्वरांनी,
तिच्या स्वरांना रंग असेल
गुलाबी उषेचा, केशरी संध्येचा
पारिजाताच्या देठांना असतो तसा,
ही भैरवी–
चंद्रविकासी नीलकमलांची माळा घालणारी
ही भैरवी –हिच्या आलापांनी
निद्रिस्त जगाला फुलांची जाग येईल,
मृत्युला लागेल चांदणी झोप:
ज्यांत तो पाहील स्वप्न
लसलसत्या हिरव्या पात्याचे,
मोठे सुरेल आहे हे जग,
हे विश्व, ह्या ग्रहमाला
बांधल्या आहेत अशाच सुरांच्या धाग्यांनी,
त्यांच्या आधारानेच त्या फिरत आहेत,
आनंदरूपाचे फेर धरत आहेत,
प्रत्येकाचा सूर निराळा, गीत निराळे,
पृथ्वीलाही आहे स्वताचा निराळा सुर,
रक्ताचे निराळे गीत
ह्या गीताचा, ह्या स्वरांचा शोध म्हणजेच जीवन!
मी शोधीत आहे हे गीत, त्याचे स्वर
गवताच्या पात्यांत, जळाच्या कोषांत
किरणांच्या जाळ्यांत
ह्या गीताचा पहिला षड्ज
वेळुवनाने झेलला! –तीच बासरी
पृथ्वीच्या गीताचा पहिला सूर बासरी,
म्हणूनच श्रीकृष्णाने पसंत केली ती वेणु:
तिच्या स्वरात थरथरली
राधेची धुंद मधुर प्रीतीची रात्र, गोपाळांचे प्रेम,
अर्जुनाची अनन्य भक्ति,
कडाडून उठला संतप्त अभिशाप
दासीपणा नाकारणाऱ्या अर्धनग्न द्रौपदीचा,
विजेच्या वस्त्राप्रमाणें,

निनादले त्यांत रक्तरंजित कुरूक्षेत्रीचे आक्रंदन
ब्रम्हास्त्राच्या ज्वाला
आणि शेवटी, मुरली हरवलेल्या श्रीकृष्णाचा अंत,
करूण एकाकी:
समोर आसवांनी भरलेला डोळा नाही,
प्रेमाने थरथरणारा भयातुर स्पर्श नाही,
पायात सलतो आहे फक्त अज्ञात व्याधाचा बाण,
कानात घुमतो आहे घनघोर नाद
समुद्रात बुडणाऱ्या सोन्याच्या द्वारकेचा,
या बासरीनेच धरिला तोलून
ब्रम्हांड भेदून जाणारा निषाद
त्या महान एकाकी जीवनाचा!
:२:
मला फार आवडते बासरी
आद्य वाद्य संगीतांचे,
किती प्रकारच्या , किती आकाराच्या
बासऱ्या आहेत माझ्या घरी,
तरी ही आज मी बनवणार आहे
एक नवी बासरी,
शिवाय घरची आहेच एक वेगळी, आगळी बासरी
मोठी सुरेल, मोठी हटेल
किंचित् चढेल आणि मोठी रसेली पण,
तिच्या हालचालीत डुलतो हिरवागार
षड्जाचा सूर
वाणीत पिकतो चचंल कोकिळेचा,
आणि डोळ्यांत विसावतो ऊंच निषाद चांदण्या रात्रीचा.
अशी जेव्हा भांडते माझ्याशी, ही बासरी माझी प्रिय शिष्या
माझी सखी,
तेव्हां मालकंस फुलतो तिच्या रागात,
प्रेमव्हिवळ होऊन कुशीत शिरते, तेव्हा
मेघ मल्हार बरसतो
आणि मी भिजून चिंब होतो
आनंदाच्या, तृप्तीच्या सजल धारांनी,
खास तिच्यासाठीच करणार आहे
ही नवीन बासरी बंदुकीच्या नळीची,
होय बंदुकीची नळी–
:३:
म्हणतात ना 'वटवृक्षातळी नवल वर्तले'
तशीच ही कहाणी,

ही नळी गंजलेली सापडली मला
ओढ्या जवळच्या वडाखाली
दूर मैदानात रणमैदानात ग्वाल्हेरीच्या:
इथेच जखमी झाली
विद्युत–दुहिता स्वातंत्र्य–युद्धातली
झाशीची महाराणी लक्ष्मीबाई,
तिचा घोडा अडला याच ओढ्याकाठी,
पलीकडे होती वडाजवळ गंगागीर महाराजाची झोपडी,
त्या जवळच्या गंजीतूनच उठली
शेवटची गगन ग्रासिनी ज्वाला स्वातंत्र्यसंग्रामाची
राणीचा देह पेटवून,
असं काही काही आठवू लागलं
अन् सहज मनात आलं
बासरी केली तर, या बंदुकीच्या नळीची,
घासून घासून लख्ख करू लागलो ती नळी.
इतक्यात काळोख झाला वडाखाली,
शब्द आला काळोखाच्या पानापानांतून,
आण, आण ती नळी इकडे, माझी आहे ती
माझ्या बंदुकीची–हो–हो–बंदू ऽ ऽ क
ही मी रोखिली होती, या इथे,
या ग्वाल्हेरीच्या रण मैदानात,
दूर दगडी किल्ला भिजला होता– काळा, काळा
हा ओढाही वाहात होता, भीत भीत
साचल न करतां,
या ओढ्यापाशीच मी बंदूक रोखली
त्या गोऱ्या सार्जेंटावर, तिसऱ्या प्रहरी, जेव्हा–
वार करण्यासाठी उचलली तलवार
महाराणी लक्ष्मीवर त्या सार्जेंटानं
ओढ्या काठी घोडा अडला होता पाण्याला पाहून
(एकी पानांत बिंबल्या भवितव्याला पाहून)
लढत होती राणी मूल पाठीला बांधून
घोडा वळताच, डावीकडून
वार करण्यासाठी
तरवार उचलली त्या सार्जेंटानं,
त्याचक्षणी मी बंदूक चालवली
धडाड् धूम
परंतु, त्या आवाजाबरोबर खाली कोसळली
माझीच बंदूक!–
कलम केला होता माझा हात कोपरापासून

मागून येणाऱ्या घोडेस्वाराने
जमीनीवर पडलो– माझ्या छाताडावर
हासत उभा होता तो दुसरा फिरंगी,
पुढे उन्हात थयथयत्या घोड्यावर
तळपत होती महाराणी लक्ष्मी
आणि तिच्याभोती अनेक समशेरी
तळपत होत्या,
भर उन्हात विजा लखलखत होत्या,
त्यावरती भरजरी फडफडाट
जरीपटक्याचा– नंतर काळोख,
भर मध्यान्ही सूर्य अस्ताला गेला,
झाडावर कावळे ओरडत होते
ओढ्याकाठी गिधाडे किंचाळत होती
फिरंगी बिगुलांच्या आवाजात.
त्यानंतर एक मोठा जाळ त्या आवाजांतून फुटला,
गगनाला भिडलेला–
तेव्हापासून मी त्या फिरंग्याला शोधतो आहे
माझी बंदूक धुंडतो आहे,
माझा तुटका हात शोधतो आहे
या झऱ्यापाशी त्या वडाखाली,
महाराणीवरील हल्ल्याचा, तिच्या अन्यायी वधाचा
मला सूड घ्यायचा आहे,
आण इकडे ती नळी
बस्स, सापडली बंदूक
आता त्या फिरंग्याला गाठतो
एका गोळीत चिंध्या करतो त्याच्या,
तेव्हाच मुक्ति मिळेल या रणनवऱ्याला.
महाराणीच्या अंगरक्षकाला,
आण, आण ती नळी इकडे
हा माझा हात कुठे आहे
नसूदे,–नसूदे, ती बंदूक तर आण आधी."
"नाही, ती मी तुला देणार नाही
माझी आहे ती, मला मिळालेली.
तिची– तिची बासरी करणार आहे मी.
मंजुळ मंजुळ सूर फुलविणारी
माझ्यातून खोल आवाज आला.
"नाही, अशक्य, अशक्य
हाः हाः हाः – अशक्य
ती बंदुकीची नळी आहे

सुडाने घुमसते आहे
संहाराच्या ज्वालेने पेटते आहे
फेक, फेक ती नळी– मला दे.
ती बंदूक"
"नाही, नाही, मी देणार नाही
माझी बासरी आहे ती. ती नाही देणार."
"नाही देणार ? देणार नाही,
मग तिच्यातून सूरही फुलणार नाही,
शापित सुडाची भयंकर नळी
मरणच उगवेल तिच्यातून–
हा: ऽऽ कुणी माझा हात द्या,
माझी बंदूक द्या,
अरे कुणी माझा तुटका हात द्या,
हात द्या, तुटका हात द्या
फांद्याफांद्यातून आवाज फुटत होते.
एकदम विजेसारखी वडाची पाने फडफडली,
गगनाला भिडला
भुइनळ्यातून उडाल्यासारखा एक जाळ
जाळाचा ताड–ऊंचच ऊंच!

:४:
किंचाळून मी डोळे उघडले
धडपडत उठलो
लख्ख ऊन पडले होते
जाळ, गडगडाट, काही नव्हते,
थरथरत होते मात्र माझे अंग
अंगरखा घामाने भिजला होता
नळी घट्ट हातात धरलेली,
धावतच मी निघालो,
पाठीमागे ते वडाचे झाड, आता दिसत होते
म्हाताऱ्या चेटकिणीच्या हिरव्या कुबडासारखे
मी झपाझप चालतच होतो
अजून ते शब्द माझा पाठलाग करीत होते:
"माझी बंदूक द्या
माझा तुटका हात द्या
बंदूक द्या – हात द्या"
आता उन्हाचे चटके बसत होते
कातडी बरोबर बधिर मनही तापलं
आठवलं–

गावकरी सांगत होते त्या वडाखाली
एक भूत फिरतं उन्हात, भर दुपारी
काळजात काही पोळत होतं
ओठात काही झुळझुळत होतं.
:५:
बंदुकीची बासरी!
किती विलक्षण, किती अद्‌भुत कल्पना!–
काय म्हणाले होते ते भूत, वडाखालचे?
पण ते मी खोटं पाडणार आहे,
जिथून गोळ्या सुटल्या होत्या
जिथून ज्वाळा भडकल्या होत्या
सूड, मरण उगवले होते, जिथून,
तिथून– तिथून मी सूर उगविणार आहे
हिरवे हिरवे गार
वेळूच्या लखलखत्या पात्यासारखे,
अरूवार नभाच्या गाभ्यासारखे
निळे निळे,
रसाळ झुळझुळत्या जळासारखे,
काळे काळे, कुरळे कुरळे सूर
बासरीच्या मुक्त केशकलपासारखे,
लाल आरूणी
तिच्या वारूणी डोळ्यासारखे,
ज्यातून सात सुरांची सात विश्वे उजळत होती
आणि पुन्हा मिटत होती
तिच्या अर्धनीमिलित डोळ्यांत,
कमळासारख्या डुलणाऱ्या बाहूत,
लयीत नाचणाऱ्या पावलांत,
अळितां लावलेल्या तळव्यात,
निमूळत्या लाखिया बोटांत,
तिच्या सर्वांगातून स्वरलयींची वर्तुळं
उमलत होती, फिरत होती
चंद्रबिंबाप्रमाणे,
आणि ती नाचताना दिसत होती
पुन्हा त्या प्रत्येक चंद्रबिंबावर,
जिथे तिचा देह विरघळत असतो
चक्राकार धावणाऱ्या लयदार प्रकाशकणांत
रूणझुणत्या,
तेव्हा तुम्ही बसले असता,
केवळ साक्षी,

तटस्थ दिव्याप्रमाणे,
किंवा धूपदाणीतील जळत्या उदबत्तीप्रमाणे
दग्ध जाणिवांची राख झाडीत!
प्रत्येक वेळी असाच अनुभव येतो
तिचे नृत्य पाहताना,
आणि ते नृत्य तिला मीच शिकविले असते.
ती नाचते– नवी सृष्टि निर्माण करते
मी नुसता विरतो, मृदंगाचा बोल होऊन.
ती आरती नृत्य करते
तेव्हा शुभ्र कमळे होतात तिच्या सर्वांगाची,
निरांजनाशिवाय, पात्राशिवाय,
रिती आरती ओवाळते ती अवकाशातं,
त्यावेळी तिच्या लाखिया नखांच्या,
बोटांच्या कळ्यांच्या
होतात झगझगत्या दीपज्योती,
तिच्याच अधरीच्या मंद हास्याने पेटणाऱ्या!
मग तिला पावा ऐकू येतो
मथुरेला जाणारी राधा कुंजवनाकडे वळते,
गोरसाचे भान विसरते,
यमुनेचा घाट, डोईवरचा माठ,
माठाने लवणारा कमरेचा काठ,
नितंबाची लयबद्ध हालचाल
सोन्याच्या खरवसाच्या हंड्याच डोलताहेत,
चोहीकडून मुरलीचे सूर बरसताहेत
कृष्ण कुठे आहे? इकडे कुंजात?
तिकडे कदंबाखाली?
मुरलींच्या स्वरांनी तिला पूर्ण वेढले आहे
पण तो मुरलीधर कुठे आहे?
स्वत:भोवतीच ती फिरते,
दिशादिशांना पाहते, कावरी बावरी,
कृष्ण कदंबाखाली उभा असतो, हासत,
धावतच तिकडे जाते, परंतु एकाएकी
थांबतात मुरलीचे सुर,
कदंबातळीचा कृष्णही अदृष्य होतो,
दु:खाने राधा वेडी होते.
झाडाझाडाला ती आलिंगन देते,
कुंजाकुंजाला त्याचा ठाव विचारते,
अकस्मात् डोंगरावर मेघ गरजू लागतो,
विजा चमकतात, खळखळा पाऊस बरसतो,

ती चिंब होते भिजून जलधारात,
दिशा धुंद करतात,
"मी कशी येऊ ?
कृष्णा, मी कशी येऊ तुझ्यापाशी ?
गोपाळा, तू कुठे आहेस ?– कुठे आहेस रे ?"
व्याकुळ राधा साद घालते
शेल्याचे सोगे मेघासारखे उडू लागतात,
राधेची, मिरेची हृदये त्यांत धपापत राहतात:
'गगन मंडलमे पीव हंमारा
किसबिध मिलना होय
सूली ऊपर शेज पिया की
किसबिध सोना होय'
स्वरालाच आता कान फुटतात,
पुरतीचे सूर–
तिच्या गात्रागात्रातून झंकारू लागतात,
तन्मय राधा त्या सुरांबरोबर नाचू लागते
रूणझुणू लागतात पायातले चाळ,
वाढत जाते त्यांची लय–
दुगन– तिगन
मृदुंग घुमतात
कणाकणात लयकारी भरतात
वाढत जाते काळापुढे चाळांची लय
आणि–
यमुनेचा शेला कमरेला बांधून
कृष्ण उभा असतो– आभाळा एवढा,
सूर झालेली राधा
त्याच्या पायाशी लीन होते
वेदनेची पाकोळी होऊन, पृथ्वी एवढी
पिवळी, सोनेरी,
पाकोळींच्या त्या वेदनेत
हळुवारपणे झंकारत असतात
बासरीच्या निश्चल पायातले घुंगुर,
झोपेत चाळवल्यासारखे
'झन्‌न् झन्‌न् पायल बाऽजे'
:६:
परवाची सहल ही अशीच आठवते,
नंदीवनाच्या रानातली, तिथे
तिने मांडला होता अनारकलीचा नाच,
नुकताच बसवलेला,

बरसून गेली होती श्रावणाची फुलपंखी सर,
रेशमी शिरवे रानभर धावते काळेकाळे,
मधून मधून,
बीन झंकारतात पानापानात
साकळलेल्या थेंबाचे, फिरताच
वाऱ्याची कुशल अंगुली,
डोंगरात घुमतात मेघाचे मृदंग,
त्या नादाने दऱ्या खोल, अतळ होतात
गडद होतात गूढ निळे डोंगर,
सूर्य अजून झाकलेलाच असतो,
तरी त्याची प्रभा कालवते ढगाढगांतून,
अन् झाडाझाडावर
प्रकाशाचा हिरवा–निळा पिसारा फुलवून
नाचतो–
सृष्टीच्या निमालेपणाचा श्यामल क्षण–
मृत्यूचा मोर–!
घनदाट गूढ रानात,
निस्तब्ध डोंगराच्या काठाकाठाने
निद्रिस्त निळाईत,
व्यथेच्या या श्यामल हुरहुरत्या छायेत,
नाचत होती बासरी
अनारकलीचे शेवटचे नृत्य,
मरण काळचे,
ती जिवंत बुरूजात चिणली जात होती,
सलीमला शेवटची साद घालीत होती
कोंडल्या आवाजात,
ढळला नव्हता सलीमवरचा तिचा विश्वास
मरण समोर दिसत असताना,
येईल, आत्ता येईल, यादेतून अवतरेल माझ्या
सारे प्राण गोळा झाले होते
त्याला पाहण्यासाठी, एका डोळ्यात,
दुसऱ्या डोळ्यात नाचत होतां
मृत्युचा मोर, श्रावण घनासारखा.
पुकारत होता तिला
रानारानात, डोंगराडोंगरात,
ती त्याच्याकडे ओढली जात होती,
अनवरत, प्रत्येक थिजल्या पावलाबरोबर,
–रानाचा हिरवा श्वासच ओढीत होता तिला आपल्याकडे–

घुंगराची किणकिण थिजत चालली होती
गुलमोहराची झाडे फुले ढाळत होती:
वाटत होते तिच्याभोती विटावर वीट चढत आहे
पण आपले प्राण गुदमरून जात आहेत,
आपल्याभोतीच चढत आहेत
त्या अदृष्य विटा–
'वाहवा, बहोत खूब, मेहरबा, बासरी, मेहरबा'
आज तिला तेच नृत्य करायला सांगायचे,
अगदी स्वत:साठी– खास स्वत:साठी
आणि या नव्या बासरीच्या साथीत
मीच वाजवणार बासरी, धुंद, बेफाम:
तिच्या प्रत्येक सुरात असेल
मृत्युची अनावर ओढ:
ओहोटीच्या आकर्षणासारखी
अथांग, समुद्रनील!
पण तिला मुजऱ्याला जायचे होते आज
नबाबसाहेबाकडे, देवढीवर,
गेली असेल? नाही, नाही,
आज कुठेच जायचे नाही,
आज खास माझ्यासाठी नृत्य करायचे,
माझ्या दरबारात, बिरजू महाराजाच्या दरबारात,
कुठे जायचे नाही आज
बुलावा आला तरी–
–आणि ती गेली असली तर?
नाहीच पण, घरात चाळ वाजताहेत,
पण घरात कुणाची सावली पडते आहे?
कुंजनवनाकडे जाणारी राधा?
मृत्यूच्या बुरूजांकडे जायला निघाली
अनारकली?–
पण ही तर दोन्ही हातांनीं
सुखाची फुले लुटीत निघाली आहे
कसे ऐटीत पडत आहे
दाराबाहेर गोरे पाऊल
सोनेरी रेशमी सुरवार, तंग
हलका गुलाबी कुडता,
वक्षस्थळाच्या गोलार्धावरून उडणारा,
जरतारी बुट्टयाचा निळा दुपट्टा,
तारांकित, आभाळाचा पदर फडफडतो आहे
तांबूस शिवायला टाचांना धडपडतो आहे:

किणकिणली हातात सोन्याची कंकणे
वाऱ्यात उलगडली
नादाची एक सोनसळी रांगोळी,
माथ्यावर बिंदी, डोळ्यात सुरमा,
नीलांबरी रात्र जांभई देत आहे
ओठावर हंसू फुलते आहे
चांदणे विरघळते आहे चतुर्थीच्या चंद्रकोरीचे,
आणि पायात झुलतो आहे सुरूचा डौल,
आकाशीचे चांदणे माळणारा
नाद झेलणारा
पाऱ्याच्या कणात, मुंगीच्या पायात
रूणझुणणाऱ्या घुंगरांचा:
बासरीच ही
"बासरी ? कुठं निघालीस ?
पाठीमागून कोण येत आहे ?
पाण्यातल्या वेळुच्या सावलींसारखा
वाकडा तिकडा, काळ्यानिळ्या सापासारखा ?
हाशमू ?
हाशमू–जीहां हाशमच. आम्ही निघालो. देवडीवर.
नबाबाच्या मुजऱ्याला,
कंटाळल्या तुमची वाट पाहून,
शेवटी निघाल्या,
हो की नाही बासरीबाई ?
बिरजु: पण बासरी, थोडं थांब.
थांबशील थोडा वेळ ?
हाशम: नाही, आता थांबणं शक्य नाही.
आधीच उशीर झालाय खूप
बिरजु: बासरी, थांबता नाही येणार ?
खरंच, थोडावेळ, अगदी थोडा वेळ ?
हाशम: नाही, आता वेळ नाही
सारा दरबार खोळंबळाय तिकडे
अन्–
बिरजु: थांबरे तू, तिला बोलू दे–
खोळंबू दे दरबार, मला पर्वा नाही त्याची
हाशम: परंतु बासरी बाईला आहे ना ?
बिरजु: थांब तू–
बोल बासरी, थांबशील थोडा वेळ ?
एक गत आणि दोन तोडे
नवीन गत रचलीय आज एक,

एकदोन नवीन तुकडे, नवीन चक्रदार
बांधलेत.
(बासरी स्तब्धच)

बिरजुः बासरी, बासरी तू बोलत का नाहीस ?
रागावलीस ?
आपल्या उस्तादवर रागावलीस ?
एका क्षणात तुझा राग घालवतो,
ही गत ऐकलीस की दिल खुष होऊन जाईल तुझा.

बासरीः नाही रागावले नाही पण
इतका उशीर का केलात ?

बिरजुः अस्सं मला वेळ झाला म्हणून रागावलीस ?
वेडी, एका क्षणात एका सुरात
तुझा राग विरघळून टाकतो.
हे काय आणलंय ?– पाहिलंस ?
बासरी– ही–ही–ही–

बासरीः ती तर इथंच आहे!
ती काय आणायचीय,
अन् काय दाखवायची
भलतीच थट्टा,
आम्ही नाही जा–

बिरजुः (हंसत) अग, ती नाही, ती नाही–ही.
ही माझ्या पिशवीत.

बासरीः बघुबघु ही कसली बासरी ?
चला, काय ही थट्टा ? भलत्यावेळी ?
ही तर लोखंडी नळी!

हाशमः ही तर दिसते बंदुकीची नळी
बिरजू महाराज,
आम्हाला नाही वेळ फालतू गोष्टीत लक्ष घालायला
तूच वाजवीत बस ती
चला बासरीबाई,

बिरजुः तुला बंदूकच दिसणार
हाशम, त्याला डोळे पाहिजेत, सुरांचे
जा तू. तुला घाई असेल तर,
बासरी थांबेल थोडा वेळ.
या बासरीसाठीच वेळ झाला
रागावलीस म्हणून, वेडे थांब थोडं
या बासरीचे आलाप सुरू झाले की–
तुझ्या अंगांगात फुले नाचू लागतील,
आपोआप चाळ झंकारू लागतील

यातून सूर फुटू लागताच–
मधाने ओथंबून येईल आकाशात–
तारांचे मोहळ,
ओहळ भरून वाहतील चांदण्याचे, तृप्तीने,
कणाकणात, क्षणाक्षणात हसेल
आनंदाची, शांतीची लवलव
आणि – आणि –
मोडकी बंदूक मागणारे,
तुटके हात परत द्या म्हणणारे ते रण नवरे,
टाळूसाठी तेल मागणारे जखमी अश्वत्थामा,
सारे, शांत होतील, तृप्त होतील,
समाधानांने आनंदाने डोलू लागतील,
रणनवऱ्याला हात मिळतील,
ताल करण्यासाठी,
अश्वत्थाम्याला तेल मिळेल–
जगाच्या जखमा बुजवण्यासाठी,
बासरी, आहेस कुठे तू?
ह्या स्वरांबरोबर,
बासरी, तू एकदा नाच, फक्त एकदा–आज,
आज मी नवीन तान बांधलीय
चांदणी केदारात, पहा तर खरी
त्या स्वराच्या मस्तीत नाचू लाग
अनार कलीचा नाच,
त्या बुरूजाच्या विटा धडधडा निखळतील
अनारकली जिवंत होऊन येईल
सलीमही तिकडून धावत येईल
त्यांचे मीलन घडेल
या चांदणी केदाराच्या चांदण्यात
बस्स–

बासरी: अहा हा!
नियतीलाही बदलतील, उस्ताद, हे सूर?
खरच उस्ताद इतकी सुंदर
इतकी धुंद–मस्ताना, आहे ही नवीन गत?
मग मी नाचते त्या स्वरांच्या लहरीवर,
या नव्या बासरीच्या सतेज सुरावर
परंतु, उस्ताद, किती उशीर केलात,
लवकर का नाही आलात?
मी खूप नाचले असते,
रात्रीचे तारांचे चाळ ओघळेपर्यंत
पायांना तोड्याचे बोल फुटेपर्यंत

या प्राणांना गीताचे पंख मिळेपर्यंत!
उस्ताद–चला आत,
हाशम, मी नाचते थोडा वेळ यांच्याकरिता–
नाही माझ्या करिता घाबरू नको,
फार वेळ लावणार नाही, थांब

हाशमः बासरी बाई
हा काय तमाशा मांडलाय?
तिकडे दरबार खोळंबलाय,
नबाब रागाने आग बगोला झालेत,
आणि तुम्हाला नाच सुचतोय
या कलंदराच्या लहरीसाठी

बासरीः काय करू उस्ताद?
इकडे आकाश बोलवतंय
आनंदाचे तंबोरे लावून
तिकडे पोट ओढतय
भुकेचे दोर बांधून ज्वाळांनी विणलेले,
पण नाही,मी नाचणार, उस्ताद,
मी नाचणार!
या नव्या बासरीच्या सुरावर,
चांदण्याच्या किरणावर
जीवनाच्या तालावर, मृत्युचा शेला पांघरून!

हाशमः बाई, तुम्ही नाचत बसा इकडे
तिकडे तुमची सुरांची झोपडी
जळून जाईल नबाबाच्या रागात.

बिरजुः हाशम, घाबरू नकोस
आमच्या बासरीचा एक सूर
असे कितीक वणवे विझवील.

बासरीः आणि झोपडी जाळण्याचा धाक
कुणाला सांगतोस,
झोपडी फुंकूनच आम्ही बाहेर पडलो आहोत
कलेची सेवा बांधायला

बिरजुः शाबास, बासरी, शाबास
शोभतेस खरी माझी शिष्या,
ही लगन पाहिजे.

हाशमः सांभाळा, बासरीबाई,
तुम्हाला नाही तरी मला आहे तुमची काळजी
जरा विचार करा
या कलंदर, भंगड उस्तादाचं काय ऐकता

मुजरा चुकला तर–
तैनात जाईल, बेअब्रू होईल दरबारात,
रस्त्यावर पडाल.
नबाबाचा आधार धरलात तर–
तर असे हजार उस्ताद
तुम्हाला विकत घेता येतील,
अन् तुम्ही रस्त्यावर आलात
की हा उस्ताद, तुम्हाला सोडून,
चवन्नीच्या तालावर नाचेल नबाबाच्या,
भर दरबारात, तुम्हाला उघडी करून
अश्राफी सारखी, अश्रफी बरोबर.

बिरजुः हां, हाशम्, खबरदार,
फार दराज हीन चालली आहे जबान

हाशमः नबाबाच्या हाता इतकी दराज नाही
उस्ताद, माझी जबान
त्यांच्या हातात, तुमची जिंदगी
तुमची शान, तुमची कला
आणि तुमच्या ह्या बासरीचा
कवळा देह पण–

बिरजुः हरामखोर, बदतमीज
आपली पायरी विसरत चाललास.

हाशमः तुम्हा साजिंद्याची पायरी कळते बिरजु महाराज

बिरजुः कमीने, या बासरीनेच तुझं तोंड फोडून टाकतो.

बासरीः थांबा उस्ताद, थांबा
असा जुलूम करू नका
ती बासरी– गाण्यासाठी– उस्ताद –थांबा–
हाय राम ऽ– अग आई ग. (कोसळते)

हाशमः हाय गजब हो गया
डोकं फुटलं हिचं–
कहरे खुदा, बासरीबाई,
कशाला मधे आलात, हाय, खून झाला–
खून केला, बासरीबाईचा खून केला
या बिरजू महाराजांनी,
हाय, गजब हो गया– धावा, धावा –
पकडा याला.

बासरीः काय केलंत हे उस्ताद! काय केलंत ?
नाही, काही नाही, उस्ताद,वाजवा
तुमची बासरी वाजवा,
मला अजून ऐकू येतंय तोपर्यंत–

त्याच्या सुरांनी माझा देह नाचू लागेल
पुन्हा उठून, वाजवा–ती–
–ती–नवी–बा–स–री
बिरजु: बासरी? –बासरी – बासरी,
काय केलं मी हे!
दारात तुझा देह पडला आहे,
रक्तानं उंबरा रंगला आहे,
तुझी शुद्ध हरपत चालली आहे,
आणि आता मी बासरी वाजवू? बासरी!
पण कुठची बासरी? कुठंय बासरी?
बंदूकच राहिली ती
तिची बासरी झाली नाही–
झालीच नाही.
मरण उगवले
सूर उगवलेच नाहीत तिच्यातून
हिरवे हिरवे गार, लसलसते
वेळूच्या पात्याचे, किरणाच्या नात्याचे
लोळते आहे रक्ताने माखलेली बासरी
आपले सूर हरवून
दारात पडला बासरीचा देह संध्या प्रकाशात
सारे लास्य गमावून,
डमरूतून निघालेले शब्द
डमरूत विरले,
मेघात वीज विझली
दक्षाच्या यज्ञकुंडात विझलेल्या उमेसारखी,
उदो भैरवाचे संहार तांडव
आता उरला अंधार– अंधार–
अंधार– सृष्टीच्या जन्मापूर्वीचा
सगल गहन गंभीर
आकाशाला भिडलेला,
खदखदणारा घुसमटणारा अंधार
–आणि त्यात तडफडत आहे.
साळीतील तांदळासारखा
रश्मिरेखेसारखा
एक अजात अनंत आत्मा
आपल्या जोडीदाराला शोधणारी
नृत्याचे बोल हुडकणारी
व्यथित, एकाकी.
माझी बासरी .....

चुंबन
(१८५७ चा एक लढा)

चुंबन

निवेदक

मीरत–

२३ एप्रिल १८५७ ची संध्याकाळ–

अगोदर, दुपारी, घोडदळाच्या तिसऱ्या पलटणीतल्या शिपायांनी नवीन काडतुसे वापरण्याचे नाकारले होते आणि या शिपायांना बंडखोर ठरवून, इंग्रज सेनापतीने त्यांना कोर्टमार्शल केले होते.

ह्या घटनेचा हिंदी शिपायांच्या मनावर परिणाम झाला होता. पण तो बाहेरून दिसत नव्हता, किंवा ते दाखवीत नव्हते. नेहमीसारखेच ते किंचिंत् असंतुष्ट, म्हणून बेमुर्वत आणि काहीसे बेफाम दिसत होते. चेहरे थोडेसे कठोर, ताठर बनलेले. एवढेच त्यांच्या मनावर पडलेल्या ताणाचे दृश्य चिन्ह.

संध्याकाळ झाली. रोजच्या प्रमाणे आपल्या तनामनाचा ताण सैल करण्यासाठी आणि मरणाच्या सावलीत मिळेत ती मौज साधण्यासाठी ते शहरातील वेश्यांच्या वसतीत शिरले. वेश्यांनी आपल्या घरांची दारे, त्यांना पाहताच, बंद केली. शिपायांना आत घ्यायला त्यांनी आज नकार दिला. शिपाई भडकले.

तेव्हा त्या म्हणाल्या, "कोर्टमार्शल होऊन कैदखान्यात पडलेल्या आपल्या भावांना आधी सोडवा आणि मग इकडे या. आपल्या भावाचा बदला घ्यायला भिणाऱ्या नामर्दाना आम्ही आमच्या देहाला स्पर्श करू देणार नाही. आमची चुंबने भ्याडांना मिळणार नाहीत."

आधीच त्रस्त झालेले, दुखावलेले ते बेदिल सैनिक या शब्दांनी भयंकर चिडले. हा अपमान त्यांना असह्य झाला. मनाच्या दु:खाला देहाचाही दिलासा मिळणार नाही. मनाची आग अधिकच वाढली. संतप्त झाले ते. जुलुमी इंग्रजाविषयी त्यांच्या मनात जी चीड होती, तिला आता त्वेषाची, विरोधाची धार आली. निरपराध देशबांधवांवर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्याची ईर्षा त्या धारेत लकाकली. छावणीतली दुपारची घटना त्यांच्या मनात वेगळ्या स्वरूपात सजीव झाली. वेगळ्या, नवीन भावनेच्या कढत लाटा त्याच्या रक्तात उसळल्या. इंग्रजांना हाकलून हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा जो उठाव देशभर चालू आहे, तो त्यांच्या अंत:करणाला येऊन भिडला एकदम, आणि ती दुपारची घटना म्हणजे त्या देशव्यापी स्फोटाचा उद्रेक आहे अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली. आवेशाने त्यांनी आपल्या दोस्तांना ललकारले–

"भाइयो चला, ताबडतोब घोड्यावर स्वार व्हा. आणि जेलखान्यावर हल्ला बोला. आपल्या भावांना आधी सोडवू आणि मग–"

झाले, छावणीच्या रोखाने त्यांचे घोडे दौडत निघाले.

चुंबनामधून अशी एक ठिणगी उडाली आणि सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाने रात्रीतून पेट घेतला. त्या संध्याकाळची ही गोष्ट.

(प्रवेश पहिला)

(**स्थळ**–बन्नो वेश्येच घर. संध्याकाळची वेळ. दार लागलेलं आहे. दाराशी गुलबशीचा ताटवा फुलला आहे. त्याचे लाल पिवळे रंग संध्या रंगाशी स्पर्धा करीत आहेत.कुंवरसिंग प्रवेश करून दारावर थाप देत आहे.)

कुंवर – दार उघड बन्नो, प्यारी उघड दार
चंद्रकोर मनोऱ्यामागे हंसते आहे
गुलबशीच्या फुलांची सांज फुलते आहे
बन्नो उघड दार.

बन्नो– (दाराआडून)
नाही कुंवर आज सांज पेटते आहे
बदमस्त शराबी डोळ्यांनी जळते आहे
भीतीने दिव्यासारखे काळीज कापते आहे
नाही कुंवर नाही दार उघडणार नाही
कळ्यांची भीड मला पडणार नाही.
कुंवर– कळ्याचेच शब्द मी खुडून आणले आहेत
ओठी 'जामेजमशेद' भरून आणले आहेत
बन्नो उघड दार
बन्नो– 'जाम' मधी मला जाळ भडकताना दिसतात
बंदुकीच्या गोळ्या सणसणून उडतात
सारेच प्याले मग खळबळून फुटतात
उद्याचे जग मला त्यात दिसत नाही
नाही कुंवर नाही दार उघडणार नाही
कुंवर– आंगणात गुलबशीत पहा सांज सांडते
कालच्या तुझ्या चुंबनासारखीच मिटते
पहा पहा इथे कपाळावर गालावर
अजुन त्याची सारखी फुले होत आहेत
पहा दार उघड
बन्नो– चुंबनाच्या गोष्टी ना ? जा आता विसरून.
दातांनी काडतुसे पहा जरा तोडून
ऐक कसा सणसणत शब्द येत आहे
सारे आंबेवन पेटून उठत आहे
जल्दी जा, छावणीत लपा कुठेतरी
नाही कुवर नाही दार उघडणार नाही
कळ्यांची भीड मला पडणार नाही
कुंवर– लपण्यासाठी नाही असे परदेशी आलो
प्राण आम्ही भात्याला टांगूनच निघालो
मृत्यु–हातामधला मोतियाचा गजरा
धुंदीत त्या तुझ्याशी भिडवल्यात नजरा.
बन्नो– पुरे पुरे कुणाची नजर लागेल बाई
तरीच केलीत काडतुसे तोडण्याची घाई.
दुपारी कोर्टमार्शेल झाले भाईबंद.
अंगरख्याचे आता का हो तोडता बंद.
नाही कुंवर आज दार उघडणार नाही
कळ्यांची भीड मला पडणार नाही
कुंवर– आम्हालाही त्या भाईचा फार ख्याल आहे
आम्हालाही संकटांचा त्यांच्या जाळ आहे

तीच धग आम्हाला विसरायची आहे
इष्कात दीनदुनिया बुडवायची आहे
बन्नो उघड दार, उघड ना दार ?
बन्नो- पुरे पुरे कुंवरसिंग, इष्काची बात
हंसेल चौकाचौकांत ताऱ्यांची रात
लाल होतात शर्मेने रस्त्यातले कंदील
सरकार चला सावरून डोईचा मंदील.
पुरे खुशीच्या दारी टिचकी चांदण्याची !
हालत नाहीत हत्तींनी दारे नाराजीची.
नाही कुवर नाही दार उघडणार नाही
कळ्यांची भीड मला पडणार नाही.
कुंवर-उघडत्या दाराला आम्ही टाकू तोडून.
बन्नो- हुकुम फिरंग्यांचा आधी या पण घेऊन.
कुंवर- पुरे झाली मस्करी आता जीवघेणी
माझाही राग अजून पाहिला नाही कोणी
बन्नो- रागाचा निखारा तो आणखी फुलवा
शूर साथी घेऊन पुकारा ना 'बलवा'
बंडाचे निशाण छावणीमधे चढवा
तिसऱ्या पलटणीचे बहाद्दर सोडवा
रणमर्दांनी त्या जेव्हा हुकुम मोडला
हातात तेव्हा बांगड्या तुम्ही का हो भरल्या ?
कुंवर- बंडाचाही वक्त येईल पण आज
रंगली आहे इष्काच्या विड्यासारखी सांज
बन्नो- विड्यांतून कोणाचे पहा रक्त गळते
तुम्हाला त्या रक्ताची मी आण घालते
परतून जा आधी, घ्या सूड त्या रक्ताचा
ठेवते मी करून विडा पंचप्राणाचा
कुंवर- बनू नकोस बन्नो हे चालणार नाही
विडा घेतल्याशिवाय आम्ही जाणार नाही.
इज्जतीने उघड दार वेळ नको लावू.
दारासह इज्जतही उडवून देऊ ?
बन्नो- कुंवर मला इज्जत कधी कुठे होती ?
मला -अब्रूपेक्षाही चिंधी महाग होती
एका चिंधीसाठी मी नग्नपणा विकला.
लाचार कुडीत भरला इष्काचा प्याला
आठवते मी पांघरून रात्र झोपले होते.
आज रेशमी साडीत नागवीच वाटते.
बळजोरीचा धाक इथे कोणाला घालता.
धरित्रीला पदर आहे माझ्यापुरता

देशद्रोह्यांना पण इथे थारा नाही
भ्याडांना इथे चुंबन मिळणार नाही.
नाही कुंवर नाही दार उघडणार नाही.
तल्वारीची भीड पण पडणार नाही.

(प्रवेश दुसरा)

(स्थळ: तुरूंग– बेड्यांनी जखडलेला कुंवर गजाच्या दाराशी उभा आहे. बन्नो येते.)

बन्नो: कुंवर इकडे पहा
मी आले आहे
ल्याले आहे साडी तुझ्या आवडीची
पिवळ्या गुलबशीची
पहा ना जरा?–
मी आले आहे.

कुंवर– कशाला आलीस बन्नो, आता जा
फार वेळ झाला
सुकली आहे सारी गुलबशी
रणरणती दुपार झालीय् सांजेची

बन्नो– आले आहे ना मी?
डोळ्यात सांज घेऊन,
फुलले आहे फुलांनी माझे अंग अंग
मी आले आहे चुंबन देण्यासाठी
तुझे राहिलेले

कुंवर– मला त्याची बन्नो, गरज नाही आता
चुंबिले आहे मृत्यूने मस्तकी
उमटले आहे
होऊनिया चंद्र ते शेवटीचे
चुंबन शीतल गोड अमृताचे
बन्नो तू जा आता सुखाने रहा.
विसरून जा अन् दाराशी तुझ्या
बोललेले बोल, दुष्ट कठोर–

बन्नो– त्याच बोलाची रे माळून फुले
आले आहे मी
राया, तुझे प्रेम नाही ओळखिले
घायाळ केले कठिण शब्दांनी–
मला क्षमा कर
बोल पुन्हा बोल, बोल रागावुनी
तोडून का नाही टाकलेस दार?
आता टाक तोडून
ही सारी बंधने, ही पृथ्वी आकाश
आंथरिन देह तुझ्या पायाखाली .... क्षमा कर मला.

कुंवर– कसली क्षमा वेडे मागतेस
उतराई होऊ मीच कसा तुझा ?
तुझ्या शब्दे प्राण देहात जागला.
प्राणात सूर्य नवा उगवला.
त्यानेच दाविला हा धन्य दिवस
देशासाठी देह वाहण्याचा !
बन्नो जा इथून
तुलाही हरामी करतील ते कैद.
बन्नो– त्यांनीच मला इथे पाठविले
असा भिऊ नको, बावरू नकोस.
दिलदारा माझ्या.
कुंवर– त्यांनी पाठविले ? आलीस तू कां ?
का इथे आलीस ? दुष्टांच्या हातात
मृत्यूच्या दाढेत–
बन्नो– अरे कुंवर राजा, घाबरतोस किती ?
म्हटले ना आले मी
चुंबन देण्यासाठी तुझे राहिलेले
ऋण जन्मोजन्मीचे.
कुंवर– थट्टा नको बन्नो, अवेळी निष्ठुर.
शब्द शब्द तुझा खरा केला आहे.
करोनी मुक्त तिसऱ्या पल्टणीला
फिरंग्याची शिरे वाहून देवीला
शहीदांच्या रक्तांचा घेतला मी सूड,
लवविले नाही उभारिले निशाण.
फडकत ठेवीन सूर्यलोकांतही
चढोनी फाशीच्या उद्या तक्तावर.
सुखी रहा फुला
फुलात फलापरी
शेवटचा शब्द ऐक हा एवढा
निघून जा, या नरकांतून.
जा ना ? जा, जा म्हणतो ना ?
बन्नो– जाऊ मी कशी रे
जाऊ देणार नाहीत ते मला
त्यांनी – त्यांनी– मला ?
कुंवर– त्यानी –इथे– काय ?
बन्नो– होय त्यांनी –होय.
आणलीय् इथे मला कैद करून.
जाणार तरी आता मी कुठे रे ?–
घरच त्यांनी माझे जाळून टाकिले

इंदर्, चंदर् सल्मा गेल्या खऱ्या.
तिथून पळून.
अरे तुला ते पकडायला आले
आग लावून गेले.
अंगणातली सारी गुलबशीची फुले
बघ ना मेल्यांनी तीही जाळून टाकली
फुलात का तिथे तूं दडून होतास?
बिचारी फुले!
कुंवर- जळली ती फुले!
बन्नो- जळली नाही तर!
पण नाही कुवर, जळलीच नाहीत ती
लपवून ठेवली, मी त्या सांजेत
मावळतीकडे बघ, रोज फुलतात.
सांगून ठेवलंय मी- कुंवरला फार फार
आवडतात म्हणून.
कुंवर- बन्नो, बन्नो, थांब,
वेड लागलंय तुला! काय बडबड करतेस
इंदर् चंदर् सल्मा गेल्या तेव्हां,
तूही पळून का नाही गेलीस.
सांग-सांग तू का गेली नाहीस पळून?
बन्नो- रागावू नकोरे
सांगते, सांगते सारं काही सांगते
लावायची होती ना? मला पुन्हा गुलबशी-
थांबले मी म्हणून.
कुंवर- इथे कशी आलीस?
बन्नो- मी कसली येत होते
त्यांनीच आणलं माझ्या मुस्क्या बांधून.
गेले होते. मी गावच्या वेशीवर
चपात्या घेऊन
ललकारून म्हटलं.
"दोन दोन घ्या आणि दहा दहा द्या
पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत
उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत
दाही दिशांना हा संदेश न्या
दोन दोन घ्या आणि दहा दहा द्या."
तेवढ्यात तिथे चार गोरे आले
आणि म्हणाले, "तू बागी आहेस"
मग मी म्हटलं "तुम्हीच बागी आहात
आमच्या देशात आम्ही कसे बागी?"

कुंवर- शाबास बन्नो, शाबास शाबास.
म्हणूनच खाली वाकलं आकाश
असं धन्य होऊन.
बन्नो- हो ना कुंवर.
वाटलंच मला असंच तू म्हणशील.
नाही तरी आमचा वेश्याचा जन्म
कुणाला तरी देह दान द्यायचा
दिलवर धनी तू या माझ्या देहाचा
बादशहा माझा या जीवनशाहीचा
तुही निघून गेलास
देशालाच दिले मी जन्माचे दान
कुंवर- तुझं हे दान देशाला पावलं.
गावोगावी नेलास संदेश स्वातंत्र्याचा
शब्द अन्नदेवाचा
हुकुम जगन्नाथाचा
पोचवलास घरोघर, शाबास बन्नो.
पण – पण बन्नो,
आता ते तुला ? तुला ठार मारतील.
बन्नो- मारणारेच मरतील.
धीर धर कुंवर
मरणाच्या दारात आपण उभे आहोत
माझ्या मरणाच्या कल्पनेनं भितोस ?
कुंवर- पण बन्नो,
पाहवत नाही ग फुलांचं मरण
नसतातच फुलं अशी मरणासाठी
बन्नो- कसं मरावं हें फुलालाच कळतं.
अबोलपणे गळतं, मातीत मिसळतं
पुन्हा मातीमध्ये डोळे उघडतं.
अंधारांत तारांना वाकुल्या दावतं.
मीहि तुला वाकुल्या दाखवीत होते ना ?
अश्याच- अश्याच.
कुंवर- थांब, थांब बन्नो, बोलायची थांब
मलाही आता तूं वेड लावशील
असं बोलून बोलून.
आधी मला सांग.
मरणाच्या गुहेत का शिरलीस तू ?
बन्नो- मी बरी मागे का म्हणून राहीन ?
तू गेल्यावर.
अन् खरंच कुंवर.

त्या रात्रीचा पराक्रम तुझा
मी पाहिला आहे
खोलीत माझ्या, अंधारात बसून
खूप डोळे भरून–
रागावून तुझ्यावर दार बंद केलं
अन् काळीज लकलकलं
भीतीनं जिवाचं पाणी पाणी झालं.
मी दार उघडलं
पण खरंच वेड्या तू गेला होतास
मोत्याचा चारा टाकून गेला होतास
खरंच का चोचीत दुखावला होतास
माझ्या राजहंसा ?
त्याच रात्री छापा छावणीवर घातलास.
त्या रावणाच्या बंदीवासातून
सोडवलेस देवांना तिसऱ्या पल्टणीच्या.
धडधडा छावणी जळत होती रात्रभर
रात्रभर सणसणून गोळ्या सुटत होत्या
नक्षत्रांच्या लाह्या जशा फुटत होत्या
रात्रभर तुमचे अन् घोडे धावत होते
या माझ्या डोळ्यांत
आभाळापासून आभाळापर्यंत
या माझ्या डोळ्यांत
चंद्र उगवला मध्य रात्रीनंतर
तरीही तुमचे घोडे धावत होते
चंद्रबिंबावर
या माझ्या डोळ्यात हो – माझ्या डोळ्यात
कुंवर– होय रात्रभर घोडे धावत होते
सकाळीच परंतु त्यांना घेरले होते
जालीम गोऱ्यांच्या तोफखान्याने
तेव्हा डोंगरावर सूर्य आला होता.
तोफेचा गोळा तोही लाल लाल.
धगधगणारा.
परंतु आम्ही डगमगलो नाही
म्हटले द्या उडवून तोफेला बांधून.
आम्हा सर्वांना.
गनिमापुढे ही मान लवणार नाही
तरवार ही आता म्यान होणार नाही
खल्क खुदाका, मुल्क बादशहाका
और हुकुम रानी लक्ष्मीबाईका

नाना पेशवेका
हात त्यांना कलम करून दिले आहेत
जुळणार नाहीत ते
आता दुसऱ्यापुढे
बन्नो- मग त्यांनी घातल्या
बेड्या तुझ्या हातात
कोंडून घातलं गजाच्या दारांत
कुंवर- अन् म्हणतात आता.
फाशी देणार उद्या
सूर्य – उगवल्यावर.
बन्नो- कुंवर माझ्या राजा,
म्हणून तर आले
तुला देण्यासाठी – राहिलेले चुंबन
अखेरचेच ते.
कुंवर- पण बन्नो, पहा
मधे उभे आहेत लोखंडाचे गज.
बन्नो- माझ्या जन्मापासून
आभाळी भिडून
मधे उभे आहेत असेच हे गज
जन्माचे जातीचे, उच्चनीचतेचे
पापाचे पुण्याचे
मीच कमनशीबी,
तू आला होतास
ओठी गजल फुलवून
फुलांचे हात घेऊन
मीच उभे केले आपल्यात हे गज
खोट्याच शब्दाचे, नसलेल्या हाकांचे
दैवाने आता
रोविले आहेत
पृथ्वीपासून आभाळापर्यंत
गज पोलादाचे
जन्म–मरणाचे
नाही, नाही हे टाकीन तोडून
डोके आपटून.
कुंवर- बन्नो थांब, थांब
आवर हे दु:ख, मी काय करू ?
तूंच खचल्यावर आभाळासारखी ?
माझ्या जिंदगीची प्रेमाची तुर्बत
वाहून जाईल या तुझ्या अश्रूत

तूंच हाती दिलेस बंडाचे निशाण
तूच मला केलेस पाईक स्वातंत्र्याचा
उद्या मी शहीद होणार देशासाठी
नको काढून घेऊस अशी माझी हिंमत
धीर दे मला.
बन्नो- तुला धीर दिला
संदेश दिला रोट्यांच्या कमळाचा
खेड्यापाड्यांना डोंगरदऱ्यांना
जगन्नाथाचा रथ येत आहे
विजेच्या चाकांनी
प्राणाच्या हाकांनी
वेगाने धडधडत
रगडीत शत्रूचे हजार हजार देह.
दिल्लीत उद्या ते निशाण लागेल
हवाया सुटतील
दिवे उजळतील.
जगमग जगमग कळ्याफुलातून
प्राणा प्राणांतून
पण माझे घर रितेच राहील
जखम ही माझी वाहातच राहील.
माझी गुलबशी राखच राहील.
माझं गमावलेलं
कोण मला देणार ?
कुंवर- म्हणजे तूं त्यांना शरण
जाणार आहेस
माझ्या प्राणासाठी
चुंबनासाठी जळलेल्या फुलाच्या
शरण गेली आहेस ?
बन्नो- नाही नाही, शरण गेले नाही
जाणारही नाही.
माहीत आहे तुला ?
काय म्हणाले मी ? विचारलं त्यांनी
"राणीच्या विरूद्ध बंड का केलंस ?"
"बंड म्हणजे काय ?" विचारलं मी त्यांना-
त्यांनी मला मग कापड दाखवलं.
- "कुंवरला दिलेलं हेच निशाण ना ?
खरं सांग बन्नो."
- "त्यांत काय सांगायचं !"
मीच ते दिलं.

– "कां दिलंस त्याला"
– "मागितलं म्हणून
दिलं मी शिवून"
–"बंडाचं निशाण आहे ते बन्नो."
–"असेल काही तरी मला काय करायचंय
तो जे सांगतो त्याला जे आवडते
तेच मी करते
मलाही आवडते
कारण माझं त्याच्यावर खूपखूप प्रेम आहे
एवंढ कसं कळत नाही
यालाच बंड म्हणायचं असेल तर
खुशाल म्हणा मेल्यांनो."
यावर गोरे सारे आधी हंसले
रागात मग ते लाहीलाही झाले.
राहुटीत त्यांनी मला बांधून टाकले.
तिथूनच आले त्यांचा डोळा चुकवून
तुला इथे भेटायला.
मी काय जाते शरण त्या गोऱ्यांना !
हा पहा आलाच एक गोरा मेला.
सैनिक– ओ बन्नो, अशी इकडे का आलीस
पळून जाण्यासाठी ?
कुंवरला भेटायला.
उद्या सकाळच्याला फाशी देऊ त्याला
खुशाल मिठ्या मार त्याच्या प्रेताला
कुंवर– फाशीची भीति कोणाला सांगतोस ?
जन्मलोच आम्ही एक फाशी तोडून
आपल्या नाळेची.
आता भीति नाही दुसऱ्या या फाशीची.
देशासाठी देह पडतो आहे गळून
जातो आहे जळून
मूठभर माती कृतार्थ होत आहे
मायभूमीच्या मंगलासाठी
प्राणांची आरती
ओवाळली पहिली
मंगल पांड्याने.
त्याचेच आम्ही शूर साथीदार
सैनिक– बंद कर जबान.
पांजी बंडखोरा.

कुंवर– बंडखोर आहात तुम्हीच या देशात
गोऱ्या सैतानांनो,
अजिंक्य, अमर हा आमचा देश
दृढ उभा आहे चौपाईवरती तुलसीदासाच्या
अन् याचे शेले
फाटणार नाहीत जळणार नाहीत
विणले आहेत ते
कबीराच्या खड्या दोह्याच्या पदरांनी
येथेच घुमले शब्द नानकाचे प्रेमाचे शांतीचे
अभंग नाम्याचे
त्याच्या भेटी आले
आंधळा कोहीनूर रणजीतसिंहाचा
अंगार बनून पेटला येथे.
सिराजुद्दौलाचे कबंध फिरते
मागत दान वंचनेने छिन्न झाल्या मस्तकाचे
बोडक्या झाडांना फुटतात बोटे
हजार हजार तुम्ही तोडलेली
सूत वळणारी
मूठी वळतात पेलाया समशेरी
फिरंग्यानो, पहा
दम उरला नाही तुमच्या दमदम्यात
प्राणांची भीक मागा प्रभूपाशी
लंदनला थेट भिडते आहे पहा.
तेग हिंदुस्थानची
पेशव्यांची पुकार
राणीची ललकार
त्यांतच हुंदका बन्नोचा माझ्या
थोडा दबलेला–
सैनिक– खामोश कुंवर.
बडबड पुरे कर, दया येते तुझी.
जिभेला शेंडा फुटलाय भीतीचा
अजब आहे देश तुमचा हा स्वप्नांचा
कुंवर–बन्नो जा आता
हंसत जा–
दुःखी होऊ नको.
भेटेन फुलात उद्या गुलबशीच्या!
बन्नो– कुवर या जन्मी
मीहि अतृप्त
तसेच राहिले–

कुंवर– घेतलेले चुंबन
जाळीत राहते फक्त दोन देह
परंतु बन्नो,
न घेतलेले एकादे चुंबन
कुठे फुल होते, कुठे सूर्यबिंब
डोंगर माथ्याशी
अश्रूच्या काठाशी!

पाषाणावरील तीळ
(एक शिल्पायन)

पाषाणावरील तीळ

प्रवेश १ ला

(स्थळ: राजसभागृह, सुरूवातीला ते रिकामंच आहे. प्रतिहारी एकटा आपल्या डावीकडे पाहात ललकारी देण्याच्या पवित्र्यात उभा आहे. परंतु कुणीच येत नसल्यामुळे ओशाळून तो उजवीकडे बघतो, तोच तिकडून विदूषक प्रवेश करतो. त्याच्या हातात बारीकसे टाळ आहेत. ते तो मधूनच वाजवतो. खुषीत आला म्हणजे, किंवा त्याला काही नवीन मजेदार सुचलं म्हणजे. आल्या आल्याच टाळ वाजवीत तो प्रतिहारीला म्हणतो–)

विदूषक– अरे शुंभा, प्रतिहारिका
असा का रे उभा
पडत्या प्रासादाला टेकू देणाऱ्या
अनघड खांबासारखा? छे, छे
लाकडी रे, विद्रूप.

प्रतिहारी– लाकडी! विद्रूप! मग कसा उभा राहू?
तुझ्या विनोदी शब्दांसारखा,
हंसवण्यासाठी उगाच धडपडणाऱ्या
आणि कुणी हंसले नाही तर स्वत:च हंसणाऱ्या
की रडणाऱ्या तुझ्या शब्दांसारखा
केविलवाणा, नव्हे, नव्हे, लांगूलवाणा!

विदूषक– लांगूलवाणा! अरे, लांगूलवाणे असतील शब्द
तुझ्या सामंतांचे, सरदारांचे
जे फुटतात लाचार ओठातून
मिशांनी झाकलेल्या,
लांगूलचालनातून जन्मत नाही माझा शब्द
तो फूटतो तप्त उपहासातून (टाळ वाजवत)
दगडातून उमटणाऱ्या पुतळ्यासारखा,
कठिण, हंसरा
वस्त्रे फेडणारा कृत्रिमतेची, ढोंगाची,

प्रतिहारी– हो, बरी आठवण झाली
तो पुतळा– विदूषकमहाराज

विदूषक– विदूषकमहाराज! भले, विदूषक आणि महाराज
कुठला समास रे हा?
अरे प्रतिहारका,
चेष्टा करतोस काय माझ्या नांवाची?
का वाळू घालतोस मासळ्या शेवयांबरोबर
काठीवर माझ्या नांवाचा?
मी ब्राह्मण, महाराज क्षत्रिय, शिवाय
कधीच घडवणार नाही मी मूर्ति

माझ्या बायकोची तिरूमल्लरायासारखी.

प्रतिहारी– तेच तर मी म्हणतोय,
झाल्याचं मेण वळतोय, विदूषकमहाराज

विदूषक– अरेच्या, पुन्हा विदूषकमहाराज,

प्रतिहारी– नाही, चुकलो, नुसतं विदूषक–साधा–

विदूषक– साधा! विदूषक साधा, नाही–हांऽ!
तुला काय सामान्य वाटला तो?
अरे, सत्तेची संपत्तीची भीक नाही मागत तो.
या सामंत– सरदारांसारखी
उलट प्रत्यक्ष महाराजच भिक्षा मागतात
चिमुटभर हास्याची त्याच्याजवळ
तोही ते लुटतो दोन्ही हातांनी
खदखदा हंसून, तोंडे वाकडी करून
कोलांट–उड्या मारून
मधली सामान्य माणसेच आम्ही
म्हणजेच विदूषकच (टाळ वाजवून)
दोरीवर चालतो, दोन घोड्यांवर बसतो
प्रतिष्ठेची छत्री उघडून
आणि मरतो तेव्हा खांदा देतो
आम्हीच आमच्या प्रेताला!
प्रसंगी आम्ही फुटतो
एखाद्या चुकार हास्यलकेरीसाठी

प्रतिहारी– बरोबर विदूषका, अरे हेच सांगणार होतो मी
दगड–हो शिलेचीच गोष्ट ती
पण तूं सांगूच देत नाहीस–

विदूषक– काय सांगणार तूं दगड!
अन् मी काय ऐकून घेत नाही?
आणि त्यात बिघडणार काय?
अरे, प्रतिहारी, सांगण्यात आणि ऐकण्यात
अंतर असतं फक्त एका तोंडाचं
जाऊ दे ते ! तूं काय सांगत होतास?

प्रतिहारी– ते मी नंतर सांगतो.
पण आधी तुला असं विचारतो
हे राजे पुतळे कां रे घडवतात?

विदूषक– का म्हणजे? अरे मग ते दुसरे काय करणार?
प्रतिहारी, हे राजे एक पुतळे घडवतात
किंवा बसतात स्वत:च पुतळे होऊन
तडकल्यासारखे–

प्रतिहारी– हां अगदी बरोबर, तेच सांगत होतो मी
त्या तडकल्या पुतळ्यासंबंधी
पुतळाच नाही, महाराजही तडकले आहेत
त्याचीच सभा आहे आज
न्याय करण्यासाठी त्या शिल्पकाराचा,
शैलेन्द्राचा आणि त्या फुटत्या पुतळ्याचा पण!

विदूषक– फूट तिकडे, अरे प्रतिहारिका
जडच आहेस तूं, आपल्या हातातल्या दंडासारखा
म्हणे फुटणाऱ्या पुतळ्याचा न्याय!
पुतळा फुटतो, मी हंसतो
त्याचा काय न्याय करणार?

प्रतिहारी– मला नाही कळत पण तो असतो,
दगडालाही न्याय असतो,
मी फक्त ललकाऱ्या देतो, सावधान सावधान!
या सामंताला विचारा, सिद्धप्पा श्रेष्ठीला
इकडेच येत आहे तो

विदूषक– तो काय सांगणार?
त्याला माहित फक्त सोन्याचा भाव
राजदंडाचा घाव
काळजाचा ठाव काय कळणार
त्याला मूर्तिकलेचा?
अलंकाराची शोभा, सुंदरता
थोडीच समजते पासंगाच्या दगडाला? (हसतो)

प्रतिहारी– विदूषक, तो दगड ठेवा आता सांभाळून
अन् टाका ताजव्यात न्यायसभेच्या
पासंग दिसेल तेव्हा. पहा,
सामंतमंडळी येऊ लागलीत, हे सिद्धप्पा
आणि ते –

सिद्धप्पा– काय विदूषका फार हसतो आहेस
फुटलेल्या उंबरासारखा.
उंबर कितीही हसले तरी आळ्याच दिसतात,
आळ्याच असतात त्यात.

विदूषक– उंबरच दिसणार तुम्हाला
डाळिंबं दिसणार नाहीत,
डोळे असतात एकेकाचे
पाखरांना रत्नेही दिसतात
डाळिंबांच्या दाण्यासारखी
आणि रक्ताळतात त्यांच्या चोची
ते दाणे टिपतांना.

सिद्धप्पा– ती काळजी घ्यावी चोचदार पाखरांनी.
पण काय रे विदूषका, तुला काही कळलं ?
बाकी नवल आहे हं.

विदूषक– काय नवल आहे सिद्धप्पा ?
थोडं पासंग टाका त्यात,
नवलात–

सिद्धप्पा– पाचकळपणा पुरे कर तुझा
नवल असं आहे विदूषका, खरं सांग
दिसतो कुणाला तीळ पाषाणावरती ?

विदूषक– असेल, असेल, काही सांगता येत नाही.
या तिळाचं आजकाल.
झाडाला तीळ येतात, मग
पाषाणांनीच काय पाप केलंय ?
धरतीचीच लेकरं दोन्ही. पण–पण
हा तीळ दिसला कुणाला ?

सिद्धप्पा दुसऱ्या कुणाला ? राजाच्या त्या थोर
शहाण्या माणसाला, त्या महान् कलाकाराला
शैलेन्द्राला–

विदूषक– त्याला दिसला तीळ, ठीक आहे.
दिसूद्या, पण तुमच्या डोळ्यात
तिखट का गेलं त्यामुळे ?

सिद्धप्पा– अरे, भोतच आहेस तूं विदूषका,
पाषाणावर तीळ उमटतो का कुठ ?
अन् लक्षात ठेव विदूषका,
महाराज फार क्रुद्ध आहेत, हंसणार नाहीत
तुझ्या पाणचट विनोदाला

विदूषक– अरे तुला दगडाला, बरोबर आहे
कसली चव त्या पाण्याची ?
त्यासाठी काही असावं लागतं फुलणारं
उगवणारं मातीतल्यासारखं– आणि महाराज
न हसोत बापडे, मी तर हंसेन पोटभर
अन् खरं सांगू, व्यर्थ असतं हंसवणं दुसऱ्याला
फसतंच ते–
स्वत: हसावं, खूप हसावं, स्वत:च स्वत:वर
म्हणजे आपल्याबरोबर दुसरेही हंसतात.

प्रतिहारी– थांबा, पुरे करा, शान्त रहा
महाराज येत आहेत राजसभेत
मुद्रा कठोर, अनाकलनीय
अशिल्पित पाषाणासारखी, (उच्च स्वरात)

सावधान, सावधान
त्रिभुवनकीर्ती दिग्पालमूर्ती
शिल्पचिंतामणी राजाधिराज
तिरूमल्लराय नायक येत आहेत हो ऽऽ
सावधान, दक्ष, दक्ष.
(शिंग तुताऱ्यांचा आवाज, तिरूमल्लराय सेनापतीसह प्रवेशतात. सभाजनांच्या अभिवादनाची गडबड)

सिद्धप्पा– महाराजांचा जयजयकार असो

तिरूमल्लराय– काय सिद्धप्पा श्रेष्ठी, कुशल आहे ना

विदूषक– मित्रा तिरूमल्ला, विजय असो तुझा.
एक सूचना आहे माझी.

तिरूमल्लराय– आल्याआल्याच सूचना!
फार सावध दिसतोस विदूषका,
काय सूचना आहे तुझी?

विदूषक– काही नाही, म्हणजे असं आहे
तशा नसतातच काही सूचना आमच्या
असतात आज्ञा तुमच्या महाराजांच्या
तरी पण–

तिरूमल्लराय– तरी पण काय विदूषका?
आम्ही ऐकतो ना तुमच्या सूचना?
नाही तरी काय, त्या फक्त
ऐकायच्याच असतात राजानं

विदूषक– तरीपण मी सांगतोच महाराज
म्हणजे असं, मित्रा–
हे थोर जयजयकार, मेघांच्या गर्जनांसारखे
शिल्पित करावेत, शिलाबद्ध करावेत
नाहीतर, नाहीतर ते उडून जातील
भटकत्या पाखरांसारखे.

सेनापती– विदूषका, मर्यादा सुटते आहे.

विदूषक– छे, छे, मर्यादा म्हणजे काय धोतर आहे
सुटायला– माझं सेनापती.

सेनापती– महाराजांच्या शिल्पकलेच्या प्रेमाची
थट्टा होते आहे ही
दुसरे कुणी हे शब्द बोलते तर–
छाटली असती त्याची जीभ
आणि उभारले असते शिल्प
त्या रक्तरंजित जिव्हाखंडाचे चव्हाट्यावर
अंत दाखवण्यासाठी बेताल जिभेचे

विदूषक– वा, वा, सुंदर सुंदर सेनापती
एवढी कल्पना सुचावी तुमच्या जातीला
आश्चर्य आहे हं, आश्चर्य तरी कसलं ?
कल्पना हातामधून सुचते
डोक्यातून नाही असं वाटू लागलंय
आज तुम्हाला पाहून

तिरूमल्लराय– मित्रा, फार गंभीर आहोत आम्ही
समस्याही फार गंभीर आहेत आमच्यापुढे

विदूषक– महाराज, गंभीर म्हणता येणार नाही
या समस्येला, या तिळाच्या समस्येला
फार झालं तर स्नेहल म्हणा, फक्त स्नेहल

तिरूमल्लराय– मित्रा प्रसंग गंभीर आहे
जागा नाही तिथे विनोदाला

विदूषक– प्रत्येक ठिकाणी विनोदाला जागा असते महाराज
पण डोळा नमतो पहाणारा

तिरूमल्लराय– गरज नाही त्याची आम्हाला
आम्हाला गरज आहे फक्त
न्यायदृष्टीची.

विदूषक– क्षमा असावी महाराज,
अशा वेळीच खरी गरज असते हास्याची
सागरात तुफाने असतात
पण काठाशी असते फेसाळ हंसू लाटांचे
विजा असतात ढगात
पण किनाऱ्याशी असते चंदेरी लकेर
दुधाळ चांद–

तिरूमल्लराय– पुरे कर, तुझी बडबड.
त्यासाठी नाही ही सभा आजची
कवट्यांचे विचकलेले दात म्हणजे हसू नव्हे त्यांचे.

विदूषक– राहिलं माणसाचे हंसू हंसूच असते नेहमी
अशीही खात्री देता येत नाही.

तिरूमल्लराय– सेनापती–

सेनापती– आज्ञा महाराज,

तिरूमल्लराय– अमात्य नीलकंठ दिक्षित
नाही आले अजून ?

सेनापती– ते दर्शनाला गेले आहेत
मीनांबिकेच्या मोहिनी उपवनात

तिरूमल्लराय– ठीक मग आम्हीच सूत्रे
हाती घेतो आजच्या सभेची.

विदूषक– सांभाळून महाराज
ही सभेची जात मोठी विचित्र असते
खोड्याळ घोड्यासारखी.

तिरूमल्लराय– आमची मांड पक्की आहे. सेनापती
उपस्थित करा आरोपीला

सेनापती– आज्ञा महाराज सैनिकांनो,
जा घेऊन या शैलेन्द्राला.

सामंत १– खरंच क्रुद्ध आहेत महाराज फार

सामंत २– आणि दिसतात आलेले एकटेच

सिद्धप्पा– राणी तिलोत्तमा नाही दिसत बरोबर ?

सामंत २– बसल्या असतील शिल्पकाराबरोबर
शिल्पासाठी शिल्प होऊन (हळूच) प्रेमांचे.

सामंत १– मूर्ख आहेस, अरे, त्या शिल्पकारालाच
आणताहेत इकडे आरोपी म्हणून

विदूषक– ती गोष्ट उडाली सामंताच्या डोक्यातून
दगडाच्या चिपेसारखी आरोप खोदतांना

प्रतिहारी– सावधान, आरोपी सभेत आला आहे.
सुरू होत आहे कामकाज
न्यायदानाचं. सावधान–

शैलेन्द्र– (प्रवेशून) विजय असो महाराजांचा

तिरूमल्लराय– तुझ्या शुभेच्छांची शैलेन्द्र
गरज नाही आम्हाला.
आरोपी आहेस तूं.

विदूषक– बरोबर आहे, राज्ये चालत नसतात
सदिच्छेवर गुन्हेगारांच्या–

तिरूमल्लराय– गप्प विदूषका, आरोपी आहेस तू

विदूषक– मी आरोपी महाराज!
तेही बरोबर सत्ताधीश समजतात
माणसाला जगता येत नाही
विदूषक किंवा आरोपी बनल्याशिवाय
राजदरबारात–

तिरूमल्लराय– अरे विदूषका, तूं नव्हे, हा शैलेन्द्र
आरोपी आहे.

शैलेन्द्र– आरोपी!– मी ? काहीच समजत नाही

सेनापती– समजेल समजेल

शैलेन्द्र– काय समजेल महाराज, कालपासून
पडलो आहे बंदीशाळेत
कसला आरोप आहे माझ्यावर ?
कसला गुन्हा केला आहे मी ?

कोणीच सांगत नाही, कोणीच बोलत नाही.
क्षमा करा महाराज, मला
दगडाचं हृदय कळतं, पण माणसाचं मन
अजून कळलं नाही मला.

सेनापती– दगडाचं मन कळतं, बरोबर
दगडच आहेस ना तूं

विदूषक– माणसाचा दगड केव्हा होतो,
हेही कळत नाही माणसाला
खरं ना महाराज ?

तिरूमल्लराय– विदूषका धार लावू नकोस तुझ्या जिभेला
मिळेल त्या दगडावर–
सेनापती, सांगा शैलेन्द्राला त्याचा अपराध

सेनापती– शैलेन्द्रा, पूर्ण केली आहेस का तूं
मूर्ती महाराणीची ?

शैलेन्द्र– नाही अजून नाही.

सेनापती– कां ? का असं ?
किती दिवस झाले आज्ञा देवून ?

शैलेन्द्र– बरेच दिवस झाले, वर्ष– अधिक झालं असेल.

सेनापती– मग का नाही झालं पालन
त्या राजाज्ञेचं.

विदूषक– सेनापती त्या कलाकृती नसतात
ज्या पूर्ण होतात आज्ञेप्रमाणं
ते असतात शिलालेख
शरणार्थी हातांचे– हात ! ज्यांना
डोळे नसतात अश्रूंनी भरणारे हास्याने फुलणारे
ते सतत दूर असतात,
दोन हात, त्या डोळ्यांपासून

तिरूमल्लराय– तुम्ही विचारा सेनापती,
लक्ष देऊ नका या बडबडीकडे
विदूषकाच्या.

सेनापती– सांग, शैलेन्द्रा सांग. का केलं नाही पालन
महाराजांच्या त्या आज्ञेचं.

शैलेन्द्र– पालन ? नाही– तसं नाही.
ती मूर्ती– सेनापती, पण नकोच
खरं म्हणजे ती मूर्ती पूर्णच होणार नाही.

सेनापती– म्हणजे ! हा जाणून बुजून भंग आहे
महाराजांच्या आज्ञेचा असंच ना ?

शैलेन्द्र– तसं नाही. आज्ञेचा भंग नाही हा
सेनापती, तो भंग आहे– पण छे
कसं सांगू तुम्हाला ?

सेनापती– तूं वचन दिलं होतंस महाराजांना
मग का पूर्ण होत नाही ती मूर्ती ?

शैलेन्द्र– वचन दिलं होतं महाराजांना
खरं, महाराजांनी मुक्त करावं
मला त्या वचनातून

तिरूमल्लराय– शक्य नाही ते शैलेन्द्र
ती मूर्ती पूर्ण झाली नाही तर
कीर्तीला कलंक लागेल तुझ्या आणि माझ्या

शैलेन्द्र– ती अपकीर्ति मी सहन करीन पण–

तिरूमल्लराय– पण मला ती सहन होणार नाही
शैलेन्द्रा नीट विचार कर
तुझे वचन, राजाची प्रतिष्ठा
दोन्हींचा भंग करणार आहेस तू.

शैलेन्द्र– क्षमा करा महाराज
मी असमर्थ आहे, असमर्थ आहे अगदी.

तिरूमल्लराय– अस्सं ! मग बंदिवासच आहे
जन्मभर तुझ्या नशिबी

शैलेन्द्र– बंदिवास, जन्मभर ! राजन्
का हा जुलूम माझ्यावर ?
का अशी सक्ती सत्तेची
कलेवर कलावंताच्या ?
घडवायची नाही मला ती मूर्ती
तुमच्या महाराणीची.

सेनापती– पण का ?
काही कारण सांगशील की नाही ?
शैलेन्द्रा, पुन्हा विचार कर
धोक्यात आहेत तुझे प्राण या क्षणी
सांग सरळ, आणि लवकर

शैलेन्द्र– महाराज, काही कारण नाही तसं
खरंच, अगदी खरं. कारण
फक्त माझी इच्छा, सार्वभौम,
विघुदुद्दाम असते इच्छा कलावंतांची,
महाराज, काय घडवावं,
काय घडवू नये हा प्रश्न
खरा असतो कलावंताचा
या स्वातंत्र्यावर कलावंतांच्या

नसतं कुणाचं बंधन मानीत नाही ते कारण
महाराज, तुम्हाला काय वाटलं
महाराणीची, तुमच्या पत्नीची
मूर्ती घडवतोय मी ? नाही
सुतराम नाही.

विदूषक- महाराज, बरोबर आहे त्याचं म्हणणं
तो शोधीत होता आकार, आकृतिबंध
आपल्या सौंदर्यानुभूतीचा
महाराणीच्या देहाच्या त्या गोल
वक्र रेषात! खरं की नाही शैलेन्द्र

शैलेन्द्र- विदूषका असा हिणवू नकोस मला,
होय, विदूषका मी तेच शोधत होतो
पण सापडला नाही तो आकृतिबंध
दिला सोडून तो विचार.
यात येतोच कुठे संबंध त्या राजाज्ञेचा ?

तिरूमल्लराय-नाही कसा शैलेन्द्र ?
कला जेव्हा जोडते संबंध जीवनाशी
त्या आदर्शात जीवन व्यवहाराच्या,
कला पाहू बघते स्वत:चं रूप बिंब
तेव्हा तिला असा खरवडून टाकता येत नाही
पारा त्या आदर्शाचा.
कलेचे रूपच मावळते त्यात

विदूषक- पण महाराज, हे जेव्हा त्यांना साधत नाही
तेव्हा हे कलावंत म्हणतात
आदर्शच भंगलेले आहेत.

शैलेन्द्र- विदूषका, तूं नसता विनोद करू नकोस
महाराज, इथं आदर्श फुटला नाही
प्रतिबिंबच तडकलं आहे.

विदूषक- हे मात्र नवल आहे. बिंब अभंग
प्रतिबिंब तडकलेलं!
नवं गुपित आहे कलेचं

शैलेन्द्र- विदूषका, उगीच तोंड खुपसू नकोस
भलत्याच गोष्टीत. महाराज अशुभ असते
भंगलेली मूर्ती, असं तुम्हीच
म्हणाला होतात

तिरूमल्लराय-शैलेन्द्र, विदूषकाचं म्हणणं खोटं नाही.
मूर्ति भंगत नाही, पाषाण भंगतो
शोधायचे असते दुसरे पाषाणखंड
दोष असतो शिलेत किंवा मूर्तिकारात

शैलेन्द्र– दहा पाषाणखंड झाले महाराज आत्तापर्यंत
प्रत्येक पाषाणखंड फुटला
आता मीच राहिलो फुटायचा तेवढा
तिरूमल्लराय– मग मी तुला विचारतो.
का फुटतो तो पाषाणखंड ?
शैलेन्द्र– तेवढे विचारू नका, महाराज
आणि मी ते सांगणार नाही.
तिरूमल्लराय– का का सांगणार नाहीस ?
शैलेन्द्र– नाही महाराज,
नाही, भलता आग्रह करू नका
वदवू नका भलतेच माझ्याकडून
लादू नका माझ्यावर एवढे भयंकर पाप!
सेनापती– पाप ? पाप असेल तर वाचा फुटली पाहिजे
नाहीतर फोडली पाहिजे त्याला
कुणाचं पाप ? सांग, कुणाचं पाप ?
शैलेन्द्र– पाप ? कुणाचं नाही. नसतंच ते कुणाचं
अनेकदा नसतं. कदाचित असतं,
बोलणंच पाप, कदाचित कळणंही असू शकेल
पाप ठरतं ज्ञान देखील कधी कधी,
नाही पण, त्याचं ज्ञान पाप असणार नाही
महान् ज्ञानी –द्रष्टे–
तिरूमल्लराय– कोण ज्ञानी ?
कोण द्रष्टा ?
शैलेन्द्र– आपले अमात्य
नीलकंठ दीक्षित, नाही पण
त्याचं ज्ञान पाप कसं असेल ?
माझंच बोलणं पाप–
तिरूमल्लराय– जाणणं पाप नाही. बोलणं आहे
आणि ते अमात्य दीक्षित– त्याचं काय ?
काय संबंध त्यांचा इथं ? म्हणे
त्यांचं ज्ञान पाप नाही, याचं बोलणं मात्र
पाप होईल! – काय घोटाळा आहे हा ?
विदूषक– कसला घोटाळा महाराज ?
जाणणं पाप नसतं असंच म्हणावं लागतं
कारण मरण वाढलेलं असते
जाणणाऱ्यापुढे.
शैलेन्द्र– हा बोलणाराही मरणाला
तयार आहे न बोलता
खरंच विदूषका, बोलणं पाप ठरेल,

संकट येईल त्यामुळे राजकुलावर

तिरूमल्लराय- संकट! राजकुलावर! हं-
तुला नको त्याची चिन्ता
पण शैलेन्द्र, खरं सांग,
अमात्य दीक्षितांचा काय संबंध यात?

विदूषक- ज्ञानाचा संबंध नसतो कुठं महाराज?
विनोदाशीही असतो तो.
मी ज्ञानी आहे असं नाही वाटत आपल्याला?
विसंगतीकडे पाहून हंसणं हे ज्ञान. खरं ज्ञान.
मूर्ती तडकणं आणि राजकुलाला धका लागणं
यात केवढा विनोद आहे महाराज!

तिरूमल्लराय- गप्प रे विदूषका! माझं डोकं फुटूं पाहतंय
संतापानं, आणि तुला विनोद सुचतोय
शैलेन्द्रा, खरं सांग अंत पाहूं नकोस
आमच्या क्रोधाचा
सेनापती, महाराणीलाही पाचारण करा
आजच्या सभेतच सोक्षमोक्ष होऊ द्या
या साऱ्या प्रकरणाचा

सेनापती- प्रतिहारी, जा, अंत:पुरात जा
आणि महाराणीला कळवा
आदेश महाराजांचा

शैलेन्द्र- खरं तेच सांगतोय महाराज,
तमा नाही मला माझ्या प्राणांची
परंतु सत्य सांगणं नेहमीच योग्य नसतं
न्याय्य नसतं, अन्यायही होतो कोणावर
नाही, मी सांगणार नाही ते
अन्याय करणार नाही अमात्यांवर
आणि महाराणीवर तर नाहीच नाही.

तिरूमल्लराय- अमात्यांकडून वळलास आता महाराणीकडे
महाराणी त्या सत्याचा, त्या पापाचा
भाग आहेत की बळी आहेत?
तेवढं सांग शैलेन्द्र, लवकर सांग.

शैलेन्द्र- असा अविचार करू नये महाराजांनी
संशय घेऊ नये असा.
महाराणी शुद्ध आहेत, पवित्र आहेत

तिरूमल्लराय- चोराला चोराची साक्ष
आग भडकवून, आता शैलेन्द्रा
पाणी ओतू पाहतोस त्यावर?
खोटं बोलतोस तू शिल्पकारा, खोटं बोलतोस.

दगड घडवता घडवता दगडच झालास का तू?
माणूस असून–

विदूषक– पण महाराज
मोठाच फरक असतो माणसात आणि दगडात
दगडाच्या होतात मूर्ती, माणसांच्या, देवांच्या
पण माणसांची उरतात फक्त हाडे
चिखल रक्त मांसाचा, सडलेला दुर्गंधी!

तिरूमल्लराय– पण या माणसानं दगडातून निर्मिला आहे
व्यभिचार, विनाश एका सुंदर जीवनाचा
शैलेन्द्रा, तू अधम, व्यभिचारी आहेस
महाराणीही–आहे एक कुलटा, जारिणी
लपवता येणार नाही हे पाप कलेच्या नावाखाली

शैलेन्द्र– महाराज, काय बोलता हे?
मला वाटेल ती शिक्षा करा,
पण महाराणीची विटंबना करू नका अशी

तिरूमल्लराय– विटंबना! कोणाची विटंबना?
तुमची का आमची?
कशाला भ्यायचं या विटंबनेला?
महाराणी, तिलोत्तमे, काय केलंस हे!
मोती कितीही पाणीदार असला
तरी त्यात नसतो ओलावा जळाचा
नसते शीतलताही आसवांची,
तो हंसत असतो कोरडा उन्मादात
सौंदर्याच्या. हंसू दे हंसू दे, परंतु शैलेन्द्रा,
तुझ्या पापाचा घडा भरला आहे
सिद्धप्पा, समोर या, सांगा ह्याला
ह्याचे पाप.

सिद्धप्पा– मी काय सांगू महाराज
सारे विदितच आहे आपल्याला,
सांगायला देखील लाज वाटते मला.
परंतु, क्षमा करावी महाराजांनी,
राजकुलाचा अभिमान आहे आम्हाला
प्राणही देऊ त्याच्या इभ्रतीसाठी
पण ह्याने घाला घातलाय
त्या इभ्रतीवरच. नीचा, चांडाळा,
कुठे फेडशील हे पाप?
गावात असं ऐकलंय महाराज–
पण नाही, कसं सांगू?
ही जिव्हा भाजते आहे नुसत्या कल्पनेने ...त्या शब्दांच्या महाराज–

तिरूमल्लराय– सिद्धप्पा, सारे स्पष्ट सांगा–
तुम्ही न्यायदेवतेसमोर उभे आहा–
सत्य सांगितले पाहिजे तुम्हाला–

सिद्धप्पा– गावात असं ऐकलं महाराज,
म्हणजे लोक असं कुजबुजतात
राणीच्या डाव्या मांडीवर तीळ आहे
आणि तो यानं, शैलेन्द्रानं पाहिला आहे.

शैलेन्द्र– खोटं आहे, महाराज, हे खोटं आहे.
मी असे कुणालाच काही सांगितले नाही
कुठेच बोललो नाही. पण हे खरे आहे.
आणि आता सांगतो महाराज,
त्यामुळेच ती प्रतिमा फुटते आहे
तडा जातो आहे तिळाच्या जागी.

तिरूमल्लराय– चांडाळा, तुला कसं कळलं हे ?
राणीच्या देहाचं हे रहस्य,
तिला आणि मलाच माहित असलेलं हे रहस्य
कसं कळलं तुला ?

शैलेन्द्र– महाराज, ते मला विचारू नका
पूर्वीच विनंती केली मी महाराजांना
ती मूर्ती भंगते मांडीत
हे मी पूर्वीचं सांगितलंय आपल्याला
तिथे टक्का उडतो, तडा जातो पाषाणाला
आणि माझे हात थांबतात विवश होऊन
अपूर्ण राहते ते शिल्प

तिरूमल्लराय– मूर्ती भंगते हे सांगितलंस
पण कारण सांगितलं नाहीस
का लपवून ठेवलंस ते माझ्यापासून ?

शैलेन्द्र– (गप्प)

तिरूमल्लराय– का आता का वाचा बसली ?
बोलत का नाहीस आता ?
का लपवून ठेवलीस ती गोष्ट–
राणीला वाचवायला की झाकायला आपलं पाप ?

शैलेन्द्र– दोन्हीही नाही महाराज

तिरूमल्लराय– मग स्तब्ध का राहिलास ?

शैलेन्द्र– क्षणभर विचार करीत होतो
विश्वास ठेवा माझ्यावर
आपल्याजवळ बोललो तेव्हा
मलाही माहीत नव्हतं हे रहस्य

तिरूमल्लराय– मग केव्हा कळलं तुला ते.

शैलेन्द्र- अमात्यांना विचारलं तेव्हा.
तिरूमल्लराय-काय अमात्यदेखील?- शैलेन्द्र,
नीट विचार कर. सांभाळून बोल
सत्य तेच सांग. तू प्राणाशी खेळत आहेस
महाराणीच्या आणि अमात्यांच्या.
त्याने तुझे प्राण वाचणार नाहीत.
शैलेन्द्र- माझे प्राण मी बांधून ठेवले आहेत
सुळावर आपल्या लौकिकासाठी
मी खरं तेच सांगतो आहे, मला विश्वास आहे
आपली कीर्ती निष्कलंक राहील
आपल्या शिरावर असेतोपर्यंत
छत्रछाया अमात्याच्या पुण्याईची!
तिरूमल्लराय-अमात्यांची पुण्याई! त्यांची छत्रछाया-
त्याचाय संशय येऊ लागलाय मला,
काय अमात्य देखील वाटेकरी आहेत
या पापात? ते देखील इतके नीच,
इतके कृतघ्न बनावे काय?
शैलेन्द्र- महाराजांनी शांत व्हावं, ते वाटेकरी नाहीत
कुठल्याच पापात, पाप घडणारच नाही
त्यांच्या हातानं. ज्ञानी, द्रष्टे पुरूष आहेत ते
मात्र ती मूर्ती भंग पावत होती
तुम्हालाही अशुभ वाटत होती ती
म्हणून मी अमात्यांना विचारलं
या पाषाणभंगाचे रहस्य
तिरूमल्लराय-मग काय म्हणाले ते?
तुम्ही कलावंत ते द्रष्टे!
शैलेन्द्र- असा उपहास करू नका
त्या द्रष्ट्या पुरूषाचा
कुंपणापर्यंत धावता तुम्ही
म्हणून पंख तोडू नका त्या गगनगात्री गरूडाचे
तिरूमल्लराय-गरूड का पापी सरडा, नहुषाच्या औलादीचा
ते नंतर ठरेल, तू फक्त सांग
काय म्हणाला तो वृद्ध कपि
शैलेन्द्र- ते म्हणाले तुझी कला
सत्वच घेऊन येत आहे
तो पाषाण फुटतो तिथे तीळ आहे
त्या जागेवर-महाराणीच्या मांडीवर,
आणि तो उमटतो पाषाणावर तडा बनून
महाराज, हे मी तुम्हाला कसं सांगणार?

माझ्यात तेवढं धाडस नव्हतं अन्
तुमचाही विश्वास बसला नसता त्यावर

तिरूमल्लराय- आताही विश्वास बसत नाही
हे सर्व पाखंड आहे, थोतांड आहे
कलेचं, द्रष्टेपणाचं- नाही, हे सर्व
कारस्थान आहे. नीच, पापी,
तुम्ही तिघेही पापी, आहात
गुन्हेगार आहात-

प्रतिहारी- महाराज, महाराणी क्षमाप्रार्थी आहेत
त्या म्हणतात क्षमा असावी
सभेत येऊ शकत नाहीत त्या,
परंतु त्यांना शिरसावंद्य आहे
महाराज देतील तो न्याय,
त्यांना विश्वास आहे
महाराज चुकणार नाहीत.

तिरूमल्लराय- अस्सं! त्यांना लाज वाटते आहे
भीति वाटते आहे सभेत येण्याची
अमात्यही गेले आहेत देवदर्शनाला
ही सभा चुकवण्यासाठी.
दोघेही दोषी आहेत, अपराधी आहेत.
अपराधाला भीति वाटते समोर उभे राहण्याची
पण तोंड चुकवले तरी, चुकवता येणार नाहीत
त्यांना हे कठोर, विश्वसंचारी पाश
न्यायाचे

सेनापती- क्षमा असावी महाराज,
इतकी घाई करू नये महाराजांनी
अमात्यांची वाट पहावी, ते आल्यावर-

तिरूमल्लराय- वाट पहावी! का?
अधिकार नाही त्या अपराध्याला
आता न्याय करण्याचा
आमची सहनशीलताही संपली आहे
सहन होत नाहीत, या यातना
ही अपकीर्ति
शीलाचा संशय महाराणीच्या
जाळतोय आम्हाला हा अपवाद
सूर्यकुलोत्पन्न आहोत आम्हीही
आमच्याही अंगात रक्त खेळत आहे
त्याच राजा रामचन्द्राचे

विदूषक– बरोबर आहे. आणि प्रत्येक रामचन्द्राच्या राज्यात
असतो एक परीट धुवायला राजवस्त्रे
या सिद्धप्पासारखा.

तिरूमल्लराय–सिद्धप्पा परीट असेल, नसेल,
पण हा अमात्य मात्र रावण आहे
लक्ष्मणरेषा मोडून, शिरलेला तपस्व्याच्या वेशात,
सेनापती, कैद करा अमात्यांना
आणि महाराणीची रवानगी करा बंदीशाळेत
उद्या त्यांना निर्वासित करण्यात येईल
आणि या शैलेन्द्राला सुळावर द्या
उद्या सूर्योदयापूर्वी.

सेनापती– आज्ञा प्रमाण. पण महाराजांनी
पुन्हा विचार करावा
क्रोधाला रात्र आडवी धरावी

शैलेन्द्र– घोर अविचार होतो आहे महाराज
महाराणी निर्दोषी आहे, अगदी निर्दोषी
अमात्यही निर्दोष आहेत, पुण्यचरित आहेत
ही आज्ञा मागे घ्या, महाराज,
वाट पहा अमात्यांच्या परत येण्याची

तिरूमल्लराय–का शैलेन्द्रा, भीती वाटते काय मरणाची ?

शैलेन्द्र– मृत्यूची भीती वाटत नाही
पण खंत वाटते, कुणालाही कळत नाही
कलेतले सत्य, सत्य जीवनातले
कुणालाही कळत नाही

तिरूमल्लराय–पुरे कर तुझी ही बडबड
जीवनाची –कलेची
अनाचार मांडलाय सारा
सैनिकांनो घेऊन जा ह्याला
आणि त्या महाराणीलाही
बंदीशाळेतील तळघराकडे–

प्रवेश २ रा

(**स्थळ**– तुरूंगाची एकांत खोली, खिडकीमधून उष:कालचा प्रकाश अंधुक दिसत आहे. वर शुक्राचा तारा तळपत आहे. दगडी आसनावर शैलेन्द्र एकटाच बसला आहे. एका कोपऱ्याकडे नजर रोखून. तिथे काही हालचाल दिसते. एक संगमर्मरी शिला सरकत समोर येते. शैलेन्द्र चकित होऊन बघतो. शिलेवर छायाप्रकाशाच्या लाटा उसळत आहेत.)

शैलेन्द्र– (आश्चर्याने) कोण ? – कोण आहेस तू ?

शिला– मी शिला एक संगमर्मरी
जड, निराकार

शैलेन्द्र– जड, निराकार शिला! पण तू बोलतेस?

शिला– हो बोलते की
निराकार असले की बोलते
आकार आला की मुकी होते–

शैलेन्द्र– आलीस कुठून? कोसळलीस या
समोरच्या शुक्रताऱ्यांतून?

शिला– नाही, शुक्रावरून नाही.
आले मी खाणीतून पाषाणाच्या.

शैलेन्द्र– कशाला आलीस? कशाला हे
उपकार केलेस माझ्यावर?

शिला– ए असं काय बोलतोस
शिल्पकार तू? शैलेन्द्रच ना रे?

शैलेन्द्र– मेला तो शिल्पकार, तो शैलेन्द्र
तू कशाला आलीस तेवढं सांग.

शिला– मरणार नाही. तो अं ऽ हं
मी– ही शिला असेतोपर्यन्त

शैलेन्द्र– हसू नकोस, तत्त्वज्ञान सांगू नकोस
आलीस कशाला ते बोल.

शिला– हे रे काय विचारणं?
मूर्ति घडवणार आहेस ना तू? माझ्यातून
महाराणीची?

शैलेन्द्र– मूर्ती ? महाराणीची? बापरे!–
नाही, कधीच नाही
प्राण गेला तरी नाही.

शिला– (हसत) का ? भ्यालास?–

शैलेन्द्र– भ्यालो नाही. कशाला भ्यायचं?
पण–पण तू केला आहेस ना नाश,
हो, नाशच, एका सुंदर जीवनाचा

शिला– नाश आणि मी? छे, छे, मी नाही
तुझ्या कलेनं, तुझ्यातल्या कलावंतानं
केला आहे तो,

शैलेन्द्र– खोटं– तुला काय कळतं कलेतलं
म्हणे, नाश केला कलेनं, असत्य
माझी कला अशी नाही
माझी कला अवकाश कोरते
उभा करते एक काळ, एक सत्य
जे भोगलं असतं जीवनान
एका क्षणाच्या अवकाशात

शिला– त्या भोगलेल्या क्षणाचं अस्तित्व
लीन झालं असतं एका अलौकिक कल्पितात
पण–तुला सत्यच पाहायचं होतं
सत्याचाच आग्रह होता तुझा.

शैलेन्द्र– हो. सत्यच असतो
मूलस्त्रोत जिवंत कलेचा

शिला– असं ना? मग जा वहात त्या मूलस्त्रोताकडं
मरणाकडं म्हणाले होते मी तुला
सोड नाद त्या सत्याचा, विसरून जा तो तीळ
आणि निर्माण कर मूर्ति कल्पिताची
अभंग, अभिजात
पटलं नाही तुला. सत्याची ओढ होती ना?

शैलेन्द्र– खरंय ते. सत्याचा आधार नसलेलं कल्पित
मान्य करीत नाही खरा कलावंत
मग जीवन संपलं तरी चालेल.

शिला– (हसत) असं? अरे काही खरं सांग
खरंच, ए ती ओढ सत्याची होती?
की महाराणीच्या अरूवार गोऱ्या मांड्याची?

शैलेन्द्र– (दचकून) काय? काय म्हणालीस तूं?

शिला– कां इतकं दचकायला काय झालं?

शैलेन्द्र– काही नाही, पण तुला काय माहीत?
नुसती जड शिला आहेस तूं–
दगड! –पापी दगड–

शिला– पापी नसतं कलावंता, कलेचं माध्यम
साधनं असू शकतील,
कदाचित तू, कदाचित महाराणी देखील!

शैलेन्द्र– ए, बुद्धी जागेवर ठेऊन बोल,
नुसती बुद्धिहीन, हृदयहीन आहेस
शेवटी दगडच ना तूं?

शिला– असा चिडू नकोस रे, आम्ही शिला
फार कठोर दिसतो ना
पण फार कोमल असतो रे काळजात
चन्द्रकिरणाच्या कोमल आघातंही
फुटतो आम्ही. पण जाऊ दे,
एक विचारू? रागावशील नाहीतर?

शैलेन्द्र– बरं नाही रागावत
विचार, खुशाल विचार

शिला– खरं खरं सांग हं. त्या दिवशी–
कशाला गेला होतास तू

त्या उद्यानातील पुष्करणीकडे ?

शैलेन्द्र– का– काय ? कधी ? तुला काय माहित ?
कुणी सांगितलं तुला ?

शिला– कुणीही सांगो, गेला होतास ना ?
खरं सांग, शपथ आहे माझी.
फुटेन नाहीतर मी तुझ्या नुसत्या नजरेनं

शैलेन्द्र– हो – हो गेलो होतो

शिला– कशाला ? महाराणी तिथं
जलविहाराला गेली होती,
म्हणून– म्हणूनच गेला होतास ना तिकडं–
तिचं देहसौंदर्य पाहायला
बघायला पूर्णविराम त्या सौंदर्यावरला
पण तेव्हा तुला कळलं नाही,
अरे कलाकारा,
माझ्या भोळ्या सौंदर्योपासका,
सौंदर्य, सौंदर्य असं काही नसतं
तो फक्त आरंभ असतो एका भयानकाचा
आता तरी कळलं ना ?

शैलेन्द्र– खोटं, खोटं आहे ते
दुष्ट, दुर्मति आहेस तू.
मी गेलो होतो हे खरं
पण ती नग्नता पहायला नाही
पहायला परीक्षा अमात्यांच्या वचनाची
त्यांच्या खरे खोटेपणाची.

शिला– खोटं सांगतो आहेस शैलेन्द्रा,
अजूनही फसवणूक करीत आहेस
तूं स्वत:ची, शैलेन्द्रा,
तो तीळ नव्हता, तो होता डोळा
कालसर्पिणीचा काळानिळा विषारी डोळा
लपवून बसलेला आपली भयंकर फणी
त्या गोऱ्या गोऱ्या त्वचेखाली.
खरं सांग मित्रा,
ती कलेची प्रेरणा होती तुझी की वासना,
सुप्त, दडपलेली.
खरं सांग, आता कोणी नाही इथं,
अरे, मी एकटी आणि शिला, केवळ शिला:
फक्त तुझ्याशीच बोलू शकते,
बाहेर मुकी असते, कायमची (हसते)
आता तरी खरं सांग.

शैलेन्द्र– दुष्ट पापी आहेस तू.
अन् हंसतेस किती भयंकर!
आत डोकावूं पाहतेस तूं
फाडून कातडी माझ्या मनाची?
पण कलांवताचं मन म्हणजे एक कांदा असतो.
कांदा! पाकळ्या पाकळ्या सोलीत गेलात
तर शेवटी काहीच हाती लागणार नाही.
फक्त एक पोकळी?
पण मी–मी तुझीच साल खरवडून काढली आहे
तुला हेवा वाटतो माझ्या कलेचा,
कलेच्या स्वातंत्र्याचा द्वेष करतेस तूं
तिरस्कार करतेस वास्तवतेचा, तिचं अस्तित्व
सहन होत नाही तुला
थांब, चूर्ण चूर्ण करून टाकतो तुलाच
या टाकीच्या धावांनी.
दुष्ट, निर्बुद्ध शिला, पापी दगड!

(तो टाकी हातात घेऊन धावतो. शिला गरगरत भोवळ आणणाऱ्या वेगानं पडते. टाकीचे आवाज, क्षणभर शांतता. नंतर हुरहुर लावणारे मंद मधुर सुर. त्या स्वरांवर एक स्त्री तरंगत येते.)

स्त्री– का? का फोडता ती सुंदर शिला?
शुभ्र, अरूवार, श्वेत कमळासारखी,
चन्द्रकिरणांच्या गाभ्यासारखी शिला?
का फोडता ती?

शैलेन्द्र– कोण तूं? तुला काय करायचंय?
मी फोडीन, तोडीन, नाहीतर
फेकून देईन नदीत
माझी शिला आहे ती.

स्त्री– शिला असेल तुमची,
पण तिच्यापासून घडणारी मूर्ती?
ती माझी आहे ना?
कशाला फोडतोस तिला? फोडायचं,
तर मलाच फोडून टाक.
माझ्या नियतीच्या शिल्पकारा.

शैलेन्द्र– तूला फोडू? का? कशाला
कोण आहेस तूं?

स्त्री– ओळखत नाहीस मला?
नखशिखांत पाहिलंस मला

नग्न निर्लज्ज करून,
तीळदेखील शोधून काढलास मांडीवरचा
आणि तो शिलेवर कोरताना
थरथरला नाही तुझा हात
आणि आता ओळखत नाहीस मला
माझी वाताहत झाल्यावर ?

शैलेन्द्र– कोण, महाराणी ? – महाराणी तिलोत्तमा ?
तू ? नाही– तुम्ही कशा इथं ?

तिलोत्तमा– चांचरू देऊ नका जीभ कलाकारा
हातासारखी
कशाला तुम्ही, तूच म्हणा शैलेन्द्र,
माझ्या कुशल मूर्तिकारा
आणि माझ्या कठोर मूर्तिभंजका
आता अस्तित्व नाही रे मला
तुझ्याशिवाय.

शैलेन्द्र– महाराणी तिलोत्तमादेवी, कशा आलात
तुम्ही ? अन् का आलात यावेळी
या एकान्तात बंदीशाळेच्या ?

तिलोत्तमा– एकान्तात, बंदीशाळेत ?
घर मोडलं माझं शैलेन्द्र,
कुठे जाऊ आता मी ?
ध्यानात वा स्वप्नात, कुणास ठाऊक
नग्न पाहिलं तुम्ही मला
त्या कलेच्या जगात,
टराटरा फाडलीत माझी सगळी वस्त्रं
कलावंत नजरेनं आणि उघडी केलीत मला
आता जाऊ कुठे मी ?

शैलेन्द्र– मी पाहिलं तुला विवस्त्र, पण ते कल्पनेत
कलेच्या ध्यानभूमीत
त्याला स्पर्श नव्हता प्रत्यक्षाचा वास्तवाचा,
या मलिन व्यवहारी जगाचा,
महाराणी, तुम्ही जावं आपल्या पतीकडं
तीच तुमची जागा आहे. इथं आलात,
बरं नाही केलंत हे.

तिलोत्तमा– कसं शक्य आहे ते ? न्यायसभेत
पाहिलंत ना तुम्ही ? मला कुलटा ठरवलं
तुमच्या महाराजानं, माझ्या पतीनं,
निर्वासित करणार आहेत उद्या
कुठं जाऊ मी ? कोण आहे मला तुमच्याशिवाय

कशी राहीन मी एकटी, निराधार
अपमानित, पातकी–

शैलेन्द्र– पातकी ? पातकी नाही तुम्ही
तुमचं मन शुद्ध आहे
आत्मा पवित्र आहे

तिलोत्तमा– आत्मा पवित्र, शुद्ध–पण–पण
कोण विचारतो आत्म्याला
स्त्रीचा देहच तिची नियती ठरवतो
त्यानंच आणलं इथं–
कलंकित होऊन मरायचं,
तर तुमच्या संगेच का मरू नये ?
तुम्हालाही मी हवी होते ना ?
आता, स्वीकार करा माझा
आहळले मी तुमच्या वासनेनं
आले तुमच्याजवळ
शिशिरात झेपावणाऱ्या तुटल्या पानागत
कराल ना स्वीकार ?

शैलेन्द्र– विश्वामित्र नाही मी स्वप्नातलं राज्यदान मागणारा
छळणारा लीलाव करणारा माणसाचा !
तू जा इथून

तिलोत्तमा– असं म्हणूं नका शैलेन्द्र,
आत्तापर्यंत माझं नखही
दिसलं नाही कुणाला ?
तुम्ही मात्र मला नग्न पाहिलंत ध्यानात
की एकान्तात, जिवाच्या अकान्तानं
तेव्हाच तुमची झाले मी
तुम्ही घडवलेली मूर्ती पाहिली अन वेडीच झाले
माझ्या अस्मितेच्या मूर्तिकारा,
किती खोल रूतले आहे मी तुमच्या मनात
नका हलवू तिथून मला
इतका सुंदर आकार दिलाय त्या दगडाला
तुमच्या कलावंत हातांनी !
मग किती सुंदर रूप द्याल तुम्ही
माझ्या या बद्ध, रूक्ष जीवनाला,
जीवनात मी बद्ध होते
आता मुक्त स्वतंत्र झाले आहे या प्रस्तरात
आपल्या सौदर्याच्या साक्षात्कारानं

शैलेन्द्र– फार खोटी कल्पना आहे महाराणी,
तुम्ही मुक्त असाल स्वप्नात
परंतु मी बद्धच आहे,
कलावंताचे हात समर्थ ठरतात
कलेच्या क्षेत्रात,
परंतु प्रत्यक्ष जीवन साकार, सुंदर करण्यात
ते यशस्वी होतातच असं नाही.

तिलोत्तमा– ते अपयशही पत्करीन मी शैलेन्द्र,
जीवनातलं कलावंताच्या,
ते दु:खही सोशीन मी, परंतु
राज्ञीपदातली ती मानहानी,
तो खोटा दंभ, सौंदर्याला येणारी
मत्तेची कळाहीनता, सहन होत नाही मला.
आणि ते राज्ञीपद!
ते तरी कुठं हवं होतं मला?
सौंदर्यही मागितल नव्हतं मी
ते मिळालं, नियतीनं दिलं,
तिनंच ओढून आणलं मला
या सिंहासनापर्यंत
राजानं मला पाहिलं, त्याला मी हवी होते,
अन् वहात वहात
त्याच्या अभिलाषेच्या लाटांवर
इथं येऊन पोचले उर्वशीसारखी
नग्न, ओलेती!
हो, त्यावेळीही नग्नच वाटत होतं मला
त्या वैभवात, सत्तेच्या त्या कोंदणात–

शैलेन्द्र– पण महाराणी, तुमच्यावर
फार प्रेम आहे महाराजांचं, म्हणूनच
तुमची प्रतिमा घडवायची ठरवलं त्यांनी
अमर करायचंय त्यांना
आपल्या प्रेमाचं स्मारक.

तिलोत्तमा– प्रेमाचं स्मारक की
सौंदर्यावरली मालकी?

शैलेन्द्र– फार कठोर बोलता महाराणी
प्रेमाचं स्मारकच!
मृत्युवर पाय देऊन उभं राहणार आहे
तुमच्या प्रीतीचं ते अमर स्मारक
माझ्या कलेतून, त्या प्रतिमेच्या रूपानं

तिलोत्तमा– कुणास माहीत शैलेन्द्र ? अक्षय कला !
अमर प्रेम ! कळत नाहीत मला,
या गोष्टी नीटशा शैलेन्द्र,
साधी स्त्री आहे मी एक
मला स्पर्श कळतो, शब्द कळतो
स्पर्शानं अंगअंग मोहरलं पाहिजे
रोमारोमातून प्राजक्ताचा सडा पडला पाहिजे
आणि शब्दातून, कसा चन्द्र उगवला पाहिजे
या स्वच्छ शीतल मनात,
निरभ्र अथांग मनात–
पण तसं कधी घडलं नाही,
कधी चन्द्र उगवला नाही,
कधी फुलं झडली नाहीत,
भवती उभा होता पहारा
ऐश्वर्याचा, संपत्तीचा
सत्तेच्या प्रदर्शनाचा सोस, अहंकार
आता मला या मूर्तीतदेखील
छळतोय तोच अहंकार !
खरंच ती मूर्तीही मला नको होती.

शैलेन्द्र– मग का आलीस तू इथं ? या राजवाड्यात
काय हवं होतं तुला ?

तिलोत्तमा– काय हवं होतं ? कुणास कळे,
मला मूर्ती नको होती प्रेमाची, जड प्रदर्शनीय
हवं होतं मला प्रेम उबदार हळुंवार
समर्पित, परस्परांच्या बाहूत लपणारं
निवांत सावल्यात झोपडीच्या,
आणि त्या झोपड्याही फुलांच्या,
तिथं कोवळ्या उन्हासारखा शिरणारा
अर्ध झाकल्या डोळ्यांना दिपवणारा,
सुखवणारा सहवास,
न डहुळणारा, प्रतिहारींच्या ललकाऱ्यांनी
सामंतांच्या स्वार्थी मुजऱ्यांनी
सत्तेच्या रक्तपिपासू महत्त्वाकांक्षांनी.
असा नवथर सहवास
वाऱ्यासारखा अमूर्त, अदृश्य,
तरीही देहाला कणकण फुलवणारा
कोकिळेच्या कंठात सूर रूजवणारा,
वसंताचा अनंग सहवास हवा होता मला !
नाही, नाही, नकोय मला ती मूर्ती

आणि त्या भोवतीचा, शैलेन्द्र,
तुमच्या कलेचाही हा देव्हारा!–

शैलेन्द्र– महाराणी, तुमची प्रकृति ठीक दिसत नाही
विश्रांती हवीय तुम्हाला.

तिलोत्तमा– नाही, मला हवेत तुमचे हात
शैलेन्द्र, फक्त तुमचे सुंदर हात
दगडालाही सुंदर स्त्रीचे रूप देणारे,
मातीतून गव्हाची लोंबरं उगवणारे
आसक्ती न ठेवणारे, सृजनशील हात.

शैलेन्द्र– गव्हाची लोंबरं उगवणारे हातही
महाराणी स्वार्थी असतात,
त्यांनाही भाजक्या रोट्यांचा वास येतो.
नि:स्वार्थी असतात हात
आकाशात नक्षत्रे पिकवणारे
परंतु ते असतात अदृश्य, निराकार
आणि ते कुणाच्याही हाती लागत नाहीत.

तिलोत्तमा– तेच हात मला हवेत शैलेन्द्र
काळाला अवकाशाचे रूप देणारे,
तृषेचा दाह शमवणारे
उपभोगाचा डंख मोडणारे हात
असे हात!– असा स्वीकार
कराल तुम्ही माझा?

शैलेन्द्र– नाही, ते शक्य नाही महाराणी,
पाण्यालाही तहान देणाऱ्या या जमिनीवर
ते शक्य नाही– महाराणी
महाराजांचं तुमच्यावर फार प्रेम आहे.

तिलोत्तमा– ते कळलं. पण माझ्या प्रेमाचं काय?
ते केव्हाच नष्ट झालं, जेव्हा
माझा संशय घेतला अकारण
त्यांना मी कुठं हवीय,
हवंय माझं सौंदर्य
त्यांना हवीय फक्त माझी मूर्ती
तीही त्यांच्या ऐश्वर्याचं, अधिकाराचं
त्यांनी केलेल्या एका शिकारीच्या
पुरूषी अहंकाराचं प्रतीक म्हणून!
ती मूर्तीच प्रिय त्यांना माझ्यापेक्षा,
म्हणून तर त्याग करायला,
मला निर्वासित करायला निघालेत ते
खरं प्रेम नाही त्यांचं माझ्यावर–

शैलेन्द्र– प्रेम असं, महाराणी
हाती लागत नाही, फूल गवसत नाही असं
पाकळ्या पाकळ्या वेगळ्या करून
क्षणाचा सुगंध की सुगंधाचा क्षण,
काही म्हणा– तो उडून जातो
हाती उरतो रिता पुष्पकोष–
म्हणून म्हणतो– त्यासाठी काही सोडावं लागतं.
बरंच सोसावं लागतं–

तिलोत्तमा– ते तुम्ही नको मला सांगायला
प्रजेपुढे झालेला अपमान
असह्य आहे मला,
त्या ज्वाळात जळाल्या माझ्या भावना
मी त्यांना मागितली नव्हती ती प्रतिमा
मग का बांधला हा अपमान, ही दुष्कीर्ति
हा निखारा माझ्या पदरात ?
स्त्रीचं प्रेम, तिचं मन कळलंच नाही त्यांना
त्यांना दिसली आपली मत्ता
आणि त्याचं प्रतीक ही मूर्ती–
नाही, मी आता त्यांची राहिले नाही
माझीही राहिले नाही.

शैलेन्द्र– तरीही महाराणी,
तुमचा स्वीकार मी करू शकत नाही
माझेही हात मातीचे आहेत.
नका, पाडू नका मला भलत्या मोहात,
भ्रष्टावेल माझी कला
अन् कोसळेल माझं जीवन!
कल्पनेत पाहिलेल्या प्रत्येक स्त्रीचा
असा स्वीकार करू लागलो तर–

तिलोत्तमा– हो का ? अगबाई, मग त्या पुष्करणीकडं
कशाला आला होतात ते ?
कल्पनेत, स्वप्नात किंवा चोरून
पहायला,भोगायला बरं वाटतं सत्य,
परंतु प्रत्यक्षात स्वीकार करवत नाही.
त्या सत्याचा कलावंताला.
तेवढं धैर्य नसतं त्याला
असंच ना ? काय बोला की
गप्प का आता शैलेन्द्र ?
बोला ना ?

तिरूमल्लराय– (प्रवेशून) तो काय बोलणार ?

तिलोत्तमा- मग तुम्ही बोला (पाहून) आ! कोण?-
महाराज तुम्ही? इथं?

शैलेन्द्र- कोण? साक्षात् महाराज, राजाधिराज
तिरूमल्लराय नायक? यावेळी इथं?
या तुरूंगात?

विदूषक- आश्चर्य कसलं यात
तुरूंगात नसतात, तेव्हाही
ते तुरूंगातच असतात
आपणच निर्माण केलेल्या
पण त्यांना कळत नाही.
त्यांना काय, कुणालाच कळत नाही.

तिरूमल्लराय-विदूषका, तू आलास मागोमाग
सावलीसारखा.

विदूषक- सावलीसारखा! कसं शक्य आहे-
पण सत्यही असेल एखाद्यावेळी
संस्कृत नाटकातून असंच असतं म्हणे-
राजाची सावली असतो विदूषक!
तुमची सावली पडली नसती ना,
तर तुम्ही देवच झाला असतात
सावली पडत नाही म्हणतात ना देवाची?

तिरूमल्लराय-बरं बाबा, गप्प रहा आता
माझी सावली पडते, नव्हे
मला ती ग्रासूनही टाकते
माझा संशय बनून
होय शैलेन्द्र, मी तिरूमल्लराय नायक
कतुमकर्तुम् राजा तुमचा
पण मी काय बोलू?
सत्यानं अवाक् करून टाकलंय मला!

तिलोत्तमा- सत्यानं की परंपरेच्या नजरबंदीनं?
खरंच, तुम्ही तरी काय बोलणार महाराज?
तुमच्या पत्नीच्या देहाचं रहस्य
बाहेर आलं, चारचौघांना कळलं,
चोरीला गेली दोन रत्नं
जमादारखान्यातली, तुमच्या मालकीची
बस्स, एवढंच, इतकंच दु:खं तुम्हाला
आपल्या पत्नीची लाज उघडी पडली,
एका परक्या पुरूषापुढं,
काहीच वाटलं नाही तुम्हाला त्याचं!
सलला नाही तो अपमान खोल,

आपल्या पत्नीचा!
या परक्या मूर्तिकारानं
माझं वस्त्रहरण केलं,
नागडी–उघडी पाहिली कल्पनेत त्याचं शल्य
बोचलं नाही तुम्हाला?
आणि हा शिल्पकार!
तो आता माझा स्वीकार करीत नाही
काय हे अपमानित जीवन!
पण तुम्ही स्वस्थच बसलात
मनात संशय ठेऊन,
मलाच हद्दपार करायला निघालात
पुरूष असाल तर महाराज,
कंठस्नान घाला त्याला
सूड घ्या माझ्या अपमानाचा,
विनयभंगाचा–

तिरूमल्लराय–महाराणी, उद्या न्यायसभेत
तेच होणार आहे.
निश्चित प्राणदंड मिळेल त्याला.

तिलोत्तमा– नाही आताच्या आता ठार करा,
तेवढा धीर नाही मला.
आग होतेय माझ्या अंगाची
उपसा ती तलवार.

तिरूमल्लराय–कसं शक्य आहे ते? खून होईल तो.
राजाला तसं करता येत नाही
धर्मानं बांधला आहे तो.

तिलोत्तमा– भित्रे, स्वार्थी आहात तुम्ही
स्त्रीची अब्रू महत्त्वाची वाटत नाही तुम्हाला
चार चौघात ती उघडी पडू नये
याचीच धास्ती तुम्हाला,
शैलेन्द्रा, तूं तरी मर्द हो

विदूषक– खरंच शैलेन्द्रा हो मर्द, पाषाणवर्म्या,
तुला माहीत आहे एका यवन राजाला
आपली सुंदर राणी
न्हात असतांना पुष्करणीत
दाखवली लपवून प्रधानाला.
या राणीचं सौंदर्य माहीत नाही कोणाला
कुणी आपला मत्सर करीत नाही
अशी विचित्र खंत होती त्या राजाला
स्नान करतांना राणीला

दिसली प्रधानाची पावलं पडद्याआडून,
आणि ती संतप्त झाली या अपमानानं
ताबडतोब राजाचा शिरच्छेद करण्याची
आज्ञा केली त्या लज्जासंतप्त सुंदरीनं
आणि पुष्करणीच्या पाण्यात तळपली
त्या प्रधानाची समशेर
सौंदर्याच्या ज्या ओढीनं पुष्करणीकडं आलास
त्या ओढीची शपथ आहे तुला
उडव शिर त्या नादान माणसाचं
मी तुझी होईन, येईन तुझ्यामागून,
पुष्करणीचं पाणी लाल झालं अन्
त्या लज्जावतीच्या डोळ्यात
पोहत होता एक राजहंस–
शैलेन्द्रा, सौंदर्याचे नियम अतर्क्य असतात
ती त्या प्रधानाच्या बाहून विसावत होती
अन् तो त्या पुष्करणीपाशी येऊन
अश्रू ढाळीत होता, शैलेन्द्रा–

तिलोत्तमा– या विदूषकाचं काय ऐकतोस! शैलेन्द्रा,
पापडाला हंसणारा फोडेल म्हणून!
माझ्या नियतीच्या शिल्पकारा
उपस आपली तलवार, भद्रबाहू
ही विटंबना सहन होत नाही मला
एक पुरूष संशय घेतो,
दुसरा घाबरतो आपल्याच इच्छेला
नाही, नाही, शैलेन्द्रा, उचल ती तलवार
मग खुशाल झोप माझ्या अंकावर
कुरवाळीत काळे मुलायम तीळ
चन्द्रबिंबावरचे!

शैलेन्द्र– प्रमाण आहे मला तुझी आज्ञा.
स्वीकारले मी तुझे आव्हान.
तिलोत्तमे, प्रिये, हे बघ
केलं धडावेगळं शिर या भित्र्या राजाचं
पण–पण हे काय
तरवारच निघत नाही म्यानातून
थांब, थोडं थांब, तिरूमल्लनायका–
थांब थोडं

(तरवार हिसकाहिसकीचे आवाज. कुणाचं तरी हंसणं)

प्रतिहारी– अरे शैलेन्द्रा, उठ उठ जागा हो
काय ओरडतो आहेस ओढीत
बेड्या आपल्याच पायातल्या
शैलेन्द्र– थांब, थांब फक्त एक घाव,
धांब तिरूमल्ला, पहा पहा महाराणी–
प्रतिहारी– अरे जागा हो पाथरवटा झोपेतून
काही स्वप्न बिप्न पडलं की काय ?
पुकारा करतोस व्यर्थ,
राजा राणीच्या नांवाचा
पहा, दिवस किती वर आला
ताबडतोब राजसभेत बोलावलंय तुला
महाराजांनी, चल लवकर
महाराणीलाही चालवलंय तिकडेच.

(बेड्यांचा आवाज– सनई चौघड्याचे सूर)

प्रवेश ३ रा

(**स्थळ**– राजसभा–एकटा विदूषक स्वत:चा गळा दोन्ही हाताने पकडून ओरडत प्रवेश करतो)

विदूषक– ओय, ओय, अरे धावा, धावा
हा राजा, हा माझा मित्र
फाशी देतोय मला. गेलो मेलो ऽऽ
सोडवा कुणीतरी धावा ऽऽ
तिरूमल्लराय– (मागून धावत) – कोण कोण त्रास देतोय
माझ्या मित्राला ? कोण आहे ते ? –कोण ?
काय कुणीच नाही ? (सुस्कारा टाकून)
काय झालं मित्रा ?
का ओरडतोस असा ? निष्कारण–
विदूषक– वा ! निष्कारण ओरडतोय म्हणे ! हं– कोण ?
राजा ? – राजा तिरूमल्लराय ?
तू–तू तिरूमल्ला ! दूर हो, दूर हो माझ्यापासून
माझा मित्र म्हणवतोस,
अन् मलाच फाशी देतोस ?
पुन्हा तूच सोडवायला येतोस मला ?
छान ! छान कथा–
धावा–धावा, फाशी दिलं मला
या राजानं. मेलो ऽ मेलो ऽ धावा–
तिरूमल्लराय– अरे कुणी फाशी दिलं तुला ?
का उगाच ओरडतोयस ?
विदूषक– तूच–तूच फाशी दिलंस मला
पिचलं माझं नरडं, कोंडला माझा श्वास

काय हा मानभावीपणा?
तूच सोडवायला येतोस, मला फाशी देऊन!
कुठं फेडशील ही पापं?
मित्रघातक्या, चल, दूर हो.

तिरूमल्लराय- अरे, असं काय करतोस वेड्यासारखं
वेडबीड तर नाही ना लागलं तुला?

विदूषक- छान, छान, मित्रा
वेडच लागलंय मला!
त्यातच तुझी सुटका आहे
पावसानं झोडपलं, राजानं बडवलं
फिर्याद कुठं द्यायची? वेडंच म्हणायचं.

तिरूमल्लराय- वेडंच नाही तर काय?
गळ्यात दोर नाही काही नाही
फास कसा बसणार?

विदूषक- वरून हे नाटक! छान
हा पहा हा दोर (दाटलेल्या श्वासात)
गळा आवळत आवळत चाललाय माझा
तुला काय! माझा श्वास घुसमटतोय-

तिरूमल्लराय- मित्रा पुरे झाला तुझा विनोद

विदूषक- विनोद काय? अरे मित्रा
माझा प्राण चाललाय इकडं
आणि तुला तो विनोद वाटतोय
परदु:ख शीतळ असतं राजा,
त्यात पुन्हा विदूषक आम्ही.

तिरूमल्लराय- अरे मित्रा तुझ्या या विनोदानं
माझा मात्र श्वास गुदमरायला लागला.
महाराणीनं वंचना केली
अन् तू असा धावत सुटलास
वेड पांघरून, माझी विटंबना करीत
मित्रघातकी ठरवून मला
अरे मित्रा, तूही फिरलास?
कुठं गेलं तुझं हसणं- हसवणं?
नाही, सहन होत नाही रे हे
अरे तुझ्या हास्यानं फुलं होत होती
काट्यांची या राजमुकुटातल्या
विदूषका, मित्रा हास थोडा हांस
ओरडू नकोस असा, हांस रे थोडा-

विदूषक- हंसू? कसा हसू?
हसत हसत फाशी जायला मित्रा,

मी काही हुतात्मा नाही
साधा विदूषक आहे मी
हसणारा, हसविणारा, मरण दूर असेपर्यंत
मान मोडते आहे या फाशीनं
घुसमटले शब्द, कासावीस झाले प्राण

तिरूमल्लराय- अरे, काय भलतंच वेड डोक्यात घेतलंस? मित्रा,
भ्रम झालाय तुला, भ्रम-
पहा, गळ्यात दोरखंड नाही, मानेला ओरखडा नाही

विदूषक- वा! दोरखंड नसला म्हणून काय झालं?
दोर दिसतो, वेदना दिसत नाहीत
म्हणून खोट्या म्हणायच्या का त्या?
अरे, तूंच मला फाशी दिलंस
स्वप्नात-
चांगलं आठवतंय मला
आवळलीस माझी मान दोरखंडानं
स्वप्नात -खास सकाळच्या स्वप्नात-
अन् सकाळची स्वप्नं खरी होतात.

तिरूमल्लराय- अरे वेड्या, विदूषका,
भ्रम झालाय तुला केवळ भ्रम
स्वप्नं का कुठं खरी असतात?

विदूषक- खरी नसतात! स्वप्नं खरी नसतात?
मग कशी दिलीस आज्ञा तू
अमात्याचे डोळे जाळण्याची?
आणि निघालास राणीला निर्वासित करायला
स्वप्नाच्या आधारावर?-

तिरूमल्लराय- अरे मित्रा, ते स्वप्न नव्हे,
कलेचं ध्यान, साक्षात्कार म्हणतात त्याला

विदूषक- तेच ते, स्वप्न काय अन साक्षात्कार काय?

तिरूमल्लराय- विदूषका, असं हे कारस्थान आहे तर!
तुझ्या या फाशीच्या सोंगाढोंगा मागं
फसायचा नाही मी त्याला
माझा निर्णय अटळ आहे
अमात्याचे पापी डोळे जाळून
राखुंडी करणार आहे मी
कलावंताचे ध्यान, दिव्य दृष्टी, साक्षात्कार
फसवणूक आहे सारी, सारं खोटं आहे
घोर वंचना. तो एक पडदा
वासना झाकणारा.

विदूषक- शुद्धीवर ये राजा, शुद्धीवर ये
आता मात्र तुझी शुद्ध जात चाललीय,
अरे मित्रा आठव चांगलं
'जे न देखे रवि ते देखे कवि'
'देवं भूत्वा देव यजेत्' विसरलास तू
पाठ केलेलं पाठशाळेत
अरे हे तर कलेचे मंत्र आहेत,
तंत्र आहे ते
आणि पुन्हा सर्वतंत्र-स्वतंत्र असते
ती कला
भानावर ये, अजूनही भानावर ये मित्रा

तिरूमल्लराय- मला नकोय ते भान यायला
(पाहून) बरं झालं,
अमात्यच स्वत: इकडे येत आहेत
माझं भान येण्यापूर्वी

विदूषक- खरंच, अमात्य निलकंठ दीक्षित इकडे येत आहेत.
पण असं का चालताहेत
अडखळत, अडखळत, डोळे आल्यासारखे
सारखे डोळे झाकीत आहेत उत्तरीयानं
आणि सारखे झोक जात आहेत,
काल मोहिनीवनातली
मोहिनी तर जास्त नाही झाली यांना ?
आणि हे बघ मित्रा,
शैलेन्द्र आणि महाराणीही आल्या इकडून
अगदी नाटकात यावं तसं.

तिलोत्तमा- बरोबर आहे विदूषका, बरोबर आहे.
मनुष्य आयुष्यात येतो तो नाटकातल्यासारखा
पण तिथून जातो मात्र
उपटल्यासारखा जीवनातून,
महाराज, वंदन करते आपणाला,
खरं तर लाज वाटतेय मला,
हे कलंकित तोंड दाखवायची
ह्या उगवत्या सूर्याला
ह्या सूर्याला, ज्यानं
सदा हेवा केला माझ्या सकाळच्या
पारोशा कुंकंवाचा!
शेवटी हेच खरं महाराज,
सौंदर्यावर प्रेम करणारे, मनातून
मत्सरच करतात त्याचा

म्हणूनच संशयाचा चिखल उडवतात!
नको, नको हे जिणे सुंदराचे!
इथं फुलं सुकतात धरल्या देठावर
आणि क्षयी होतो चन्द्र या जगात जाता-येता
उबग आलाय या जिण्याचा महाराज
लवकर सूळी द्या मला
उन्हें पसरण्यापूर्वी
या चौकात राजवाड्याच्याच.

शैलेन्द्र- महाराज, मलाही घृणा आली आहे
या दुबळ्या कलाजीवनाची
तिरस्कार वाटतो त्याचा
विटाळते ज्याची कला वासनेच्या छायेने
सुप्त दडपल्या वासनांचा डंख
पसरतो कलावंताच्या अंगावर
विटाळली माझीही ध्यानदृष्टी
माझ्या अतृप्त वासनांच्या छायांनी
इच्छा नाही आता जगण्याची गोंजारीत
ही दुबळी कला
स्वातंत्र्य कलेचं कोसळलं खाली
कुष्टी झडणाऱ्या बोटांसारखं
शिरच्छेद करा माझा. ताबडतोब
शिरच्छेद करा.

अमात्य नीळकंठ- (प्रवेशून) कोण म्हणतो शिरच्छेद करा म्हणून
शैलेन्द्र, तूच का बोलता आहेस ? हो
तुझाच आवाज हा, ओळखला मी.
न देखता ओळखणं हेच खरं ओळखणं,
हृदयाचं पाहणं हेच खरं पाहणं
किल्मिष असतं डोळ्याच्या पाहण्यात
धूळ असते धरणीची त्यात,
पाण्याचा काळिमा, वाऱ्याचा उन्मत्तपणा
अन् अग्नीची दाहकता, नाही म्हटलं तरी,
डोळ्यात मिसळते ती.
पापण्यांनी कितीही वारलं तरी
शैलेन्द्र, शैलेन्द्र, कुठे आहेस तू?

शैलेन्द्र- असं काय करता अमात्य?
मी हा समोर तर उभा आहे,
दिसलो नाही तुम्हाला? (जवळ जाऊन)
पण हे काय अमात्य!
रक्त ठिबकतंय तुमच्या डोळ्यातून!

तिरूमल्लराय– रक्त! कसलं रक्त! अरे देवा,
जाळून घेतलेत तुम्ही आपले डोळे
अमात्य, काय केलंत हे?
कुणी केलं हे दुष्टकर्म?
बोला अमात्य, बोला–

अमात्य– कुणी नाही राजा, कुणी नाही
मीच केलं पालन तुझ्या आज्ञेचं.

तिरूमल्लराय– माझी आज्ञा! काय म्हणता अमात्य?
माझी आज्ञा! माझी?

अमात्य– हो, तुझी आज्ञा

तिरूमल्लराय– समजत नाही मला अमात्य
माझी आज्ञा? अशक्य अगदी अशक्य
अशी आज्ञा दिलीच नाही मी.

अमात्य– तरीही ती तुझी आज्ञा होती
हे तुला माहिती आहे, मलाही ठाऊक आहे
क्षमा कर राजा, म्हणूनच
उशीर झाला मला यायला थोडा
देवपूजेत होतो तेव्हाचं तुझा निरोप आला
आरती व्हायची होती
त्याच आरतीनं पेटवले डोळे
झालं ना तुझ्या आज्ञेचं पालन
महाराज, हीच होती ना तुमची आज्ञा?

तिरूमल्लराय– होय–पण–पण–नाही
तशी आज्ञा मी कुणालाच नाही दिली
कुणालाच सांगितले नव्हते जाळायला तुमचे डोळे
तुम्हाला देखील
तसा हुकुम केलाच नव्हता मी
कोणाला, कुठेही.

अमात्य– म्हणून काय झालं?
मनातल्या मनात उच्चार तर केलात
तुम्ही त्या आज्ञेचा, पालन केलंच पाहिजे मग
दासानं त्या राजाज्ञेचं
आणि मी ते केलं साक्षीनं
या निरंजन ज्योतीच्या
राजा, उगीच कष्टी होऊ नकोस
महाराणी तिलोत्तमे जवळ ये अशी
फार मानहानी, अपार यातना
भोगल्यास तूं बाळे, शैलेन्द्राच्या कलापूर्तीसाठी

तिलोत्तमा– आणि महाराजांनी तरी
काय कमी वेदना सोसल्यात, आमच्यासाठी
शैलेन्द्र– रात्रंदिवस जळाले महाराज
संशयाच्या मन:स्तापाच्या ज्वाळात,
महाराज, क्षमा करा या पाथरवटाला
दगडाच्या सहवासात दगडच बनलो होतो मी
तिलोत्तमा– अमात्यमहाराज, येवढं दिव्य का केलंत
माझ्यासाठी ? का पेटवून घेतलेत डोळे
विझवण्यासाठी एका स्त्रीचा पेटता पदर ?
अशी साक्ष द्यायची गरज नव्हती
महाराज, काहीच गरज नव्हती.
विदूषक– महाराणी, आपण असं म्हणतो
पण पदराचा आडोसा करतोच
तेवणाऱ्या दिव्यासाठी
आणि सकाळचे ओठ पुटपुटतात ओशाळत्या उन्हात
त्यांची गरज नव्हती, काही गरज नव्हती
अमात्य– गरज होती आणि नव्हती
सर्व घटना गरजेप्रमाणंच घडतात
असं थोडंच आहे.
विदूषक– बरोबर आहे, इतक्या उन्हाची
एवढ्या चांदण्याची आपल्याला कुठे गरज असते!
अमात्य– विदूषका त्यांचा जन्म गरजेपोटी नसतो
तो असतो जीवनाच्या सर्जनाच्या, उत्साहापोटी
तसं म्हटलं तर महाराणी,
या शिल्पाची तरी कुठं गरज होती ?
काय खरं आहे की नाही राजा ?
तिरूमल्लराय– मी काय सांगू अमात्य ? शरम वाटते
या महाराणी म्हणतील, माझ्या अहंकाराचा
स्पर्श होता त्याला, तरीही वाटतं मला
कलेच्या अपेक्षा, प्रक्रिया असतात मोठ्या गूढ
अतर्क्य. त्यात माणूस
कुठे चुकतो, भटकतो कुठे.
अमात्य– काय शैलेन्द्रा, तुलाही असंच वाटतं ना ?
वेगवेगळ्या असतात ना
जीवनाच्या नि कलेच्या अपेक्षा–प्रक्रिया ?
शैलेन्द्र– मला नाही कळत अमात्यमहाराज,
मला कळलं ते येवढंच, अमात्य,
मांडीवरचा तीळ पाषाणावर उमटत नाही
तडकतं फक्त मन, पाषाणासारखं
उमटतो एक तडा–

तो जीवनाचा की कलेचा,
हे ही सांगता येत नाही.

तिरूमल्लराय– ते सांगता आलं नाही तरी चालेल
पण अमात्य, तुम्ही माझा प्रश्न का टाळता आहा
सारखा ?
कशी कळली तुम्हाला माझी आज्ञा
न दिलेली !
सांगा अमात्य कशी कळली ती तुम्हाला ?
आश्चर्य आहे–

अमात्य– आश्चर्य कसलं त्यात राजा,
क्रीडा आहे ती निरंजन दृष्टीची हृदयाच्या प्रतीतीची
तिलोत्तमेच्या मांडीवरचा तीळ
जसा दिसला, तशीच कळली मला
आज्ञा महाराजाची
आरतीच्या ज्वाळात, जाळून घेतले नेत्र
अन्याय घडू नये म्हणून !
दग्ध दृष्टीलाच दिसते
विदग्ध विश्व कलेचे, कलावंताचे

तिरूमल्लराय– क्षमा करा मला, अमात्य क्षमा करा
अपराधी आहे मी आपला
नसता संशय घेतला, अन्याय केला आपल्यावर
घोर अपराधी आहे, वाटेल ती शिक्षा करा

विदूषक– आणि न केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा भोगणाऱ्या
या पहिल्या राजाची प्रतिमा, शैलेन्द्र,
तुम्ही आता खुशाल निर्माण करा.

अमात्य– आता तुझीच प्रतिमा निर्माण करायला
सांगेन विदूषका या शैलेन्द्राला
शिलाखंड आणून चन्द्रावरून

विदूषक– नको अमात्य नको तेवढी शिक्षा करू नका
नाही नाही, त्या शिक्षेची भीति नाही मला
तुम्हाला कुठेच दिसणार नाही
हसणारा दगड माझ्यासारखा
आधी विचार करा महाराजांच्या शिक्षेचा

अमात्य– अरे राजा, शिक्षा कसली अन् अपराध कसला ?
कुणाचा काही दोष नाही
फार विश्वास ठेवतो आपण डोळ्यांवर
हृदयानं बघायचं माहीतच नाही आपल्याला
काय खरं ना शैलेन्द्र ?
अरे बोल काहीतरी.

शैलेन्द्र– मी काय बोलू अमात्य,
मूर्ती शिलेत असते की मनात असते,
रंगात असते की अंतरंगात असते
तसाच तुमचा प्रश्न आहे हा
अशिल्पित कड्यासारखा उभा
काळावर पाय देवून, टेकून असीमाला!
कसं पाहता येईल त्या असीमातलं शिल्प
भावाकुल हृदयाला, या काळ्या शापित डोळ्यांशिवाय
ही माझी व्यथा आहे अमात्य,
मी काय बोलू?

विदूषक– तुम्ही कुणीच काही बोलू नका
सांगू नका
जाळून घेतल्या डोळ्यांनीच जगायचं असतं
जीवनात जगायचं असतं आंधळ्यानेच
सत्त्याकडे
या विदूषकासारखं!
कोणी जाळण्याची आज्ञा करतात
कुणी जाळून घेतात डोळे
कुणी धावतात पुष्करणीकडं
तर कुणी निर्वासन पत्करतात
नग्नतेच्या नुसत्या कल्पनेनं
पण कुणालाच काही कळत नाही
आपण सारेच नग्न आहो किंवा
विदूषक आहो–
हो विदूषकच!
मनाच्या मंचावर.

सूर्याचं वाळवंट

(अर्थात् एक स्वप्नरामायण)

सूर्याचं वाळवंट

-नाट्यकाव्य-

Fantasy

स्थळ- उध्वस्त अयोध्येचा महाद्वाराशी

पात्रे- वास्तुपुरूष आणि शरयू

(महाद्वाराशी वास्तुपुरूष सचिंत उभा आहे. त्या नगरीला खेटूनच शरयू नदी वहाते आहे. या नदीची जलदेवता शरयू काठावर येऊन वास्तुपुरूषाशी बोलत उभी आहे. तिचे अर्धे अंग वाळूचे तर दुसऱ्या अर्ध्या अंगावरील पाण्याचा पदर पायापर्यंत लोळत आहे. त्याचा काही भाग लाटांबरोबर हेलावत आहे. पदर चिंब भिजला आहे. पदराखालून उन्नत उरोज दिसत आहेत. बोलतांना एकाच पायावर भार पडल्यामुळे तिचा छातीचा एक भाग अधिक उभारून आला आहे आणि डाव्या कमरेवरील वळ्या पारदर्शक पदरातून रेखांकित होत आहेत. तिचे त्याकडे लक्ष नाही.

महाद्वारापलीकडे शहराचा भाग धुक्यात झाकून गेला आहे. कुठल्यातरी मंदिरातून लांबून घंटानाद धुक्यातून तरंगत घुमत येत आहे. परंतु ध्वनीचे उगमस्थान उमगत नाही. धुकाळ, जड, उदास वातावरण सभोवती पसरले आहे. काठावरच्या व्यक्तीचे भाषणही धुक्यासारखेच गूढ वाटत आहे. इतक्यात उगवतीचे ऊन त्यांच्या अंगावर हळू हळू पसरत जाते. त्यांचे चेहरे आता ऊजळू लागतात. आणि त्याबरोबर शब्दही.)

शरयू- वंदन वास्तुपुरूषा, आज
लक्ष नाही तुझं माझ्या बोलण्याकडं
कसल्या चिंतनात
गढून गेलास इतका? वंदनही
घेतलं नाहीस माझं.

वास्तुपुरूष- कोण शरयू?
मला कशाला करतेस वंदन?
वंदन कर तू
त्या श्रीराम प्रभूला

शरयू- ती पदे अंतरली आम्हाला वास्तुपुरूषा,
दिसतच नाहीत आता
तशी वंदनीय पदारविंदे,
केला नमस्कार तुम्हाला
वडील म्हणून,
हे प्राचीन वास्तुपुरूषा,

वा.पु.- कसला वडील मी? मी-
एक वास्तु, पडझड झालेली जीर्ण शीर्ण
उभी असलेली कशीबशी
स्मरण करीत श्रीरामाचे
माझ्या आधीपासून तू वहात आहेस

कश्मल धुवून नेत आहेस
अयोध्येचे. श्रीराम गेले
निर्जन नगर झाले
लोपले आपल्याच भग्न अवशेषात
आता उरली कमळे आणि कश्मल
सवे भयाण उध्वस्तता
एक उद्विग्नता
लक्तरे ती महान रामराज्याची
सत्ययुगाची: सीतेच्या
पैठणीच्या धांदोट्यासारखी

शरयू- धांदोट्या ? म्हणजे ?

वा.पु- धांदोट्याच उरल्या आहेत
त्या दैदीप्यमान युगाच्या. आकाशावर
लोंबणाऱ्या

शरयू- हे तुझे दु:ख बोलत आहे
चिरंतन राहील रामचंद्राचं नाव
मला सांग, किती काळ तू
उभा राहणार आहेस
अशी वाट पाहात ?
कधीही परतणार नाहीत
आता ती पावले
त्या सोनेरी दिवसांप्रमाणेच
मग कोणाची ? कशाची प्रतीक्षा ?

वा.पु.- माहीत नाही शरयू
हेच वरदान मिळालंय
वाट पहाण्याचं
तिष्ठत उभं राहण्याचं
त्या रघुकुलभूषणापासून

शरयू- पण आता गेलं ते सत्ययुग
त्या पुण्यश्लोकाचं, माझ्या वाहत्या या
पाण्यासारखं.

वा.पु.- कळतं मला ते शरयू,
वाट पाहात आहे मी आपल्या नियतीची
माझ्या कोसळत्या अर्थहीन अस्तित्वाची.

शरयू- त्याची कसली वाट पाहायची !
कोसळतच आहेस तूं
अवकाशपुरूषा, कणाकणाने
क्षणाक्षणाने
पहा या आपल्या देहाकडे

दगडवाळूचा तुझा देह–

वा.पु.– हे मलाही समजतं शरयू,
पण हे झडणारे कण नाहीत
क्षण आहेत त्या ऊर्जस्वल युगाचे
सूर्याच्या मावळत्या प्रभेचे
त्या रामराज्याचे
स्वप्नातले तुझ्या–माझ्या

शरयू– काही समजत नाही हे अपंग अवकाशा,
काळानं गती दिली,
इतिहास दिला, सरलं ते सारं
सीतादेवी भूमीत गुप्त झाल्यापासून
आता उरली केवळ धूळ त्या भूमीची
भूमीकन्येची
तीही सरणार, विझणार तुझे डोळे
श्रीरामाच्या व्याघ्रमुख बाणासारखे
तळपणारे, लाल अंगार
शेवटची खूण तुझ्या अस्तित्वाची
आता विश्रान्ती घे,
टेकून या महाद्वारालाच
बस ना थोडा ?

वा.पु.– अवकाश आणि काळ तसे आपण दोघे, जाऊ मिळून
हातात हात घेऊन. तूंही थांब अंमळ,
मला सांगतेस घ्यायला विश्रान्ती
पण तू का थांबत नाहीस ?

शरयू– काय सांगू ? सांगता येत नाही
मला कळतं वहाणंच फक्त
मीच निर्मिलेल्या लाटांबरोबर
मी बंदिवान आहे त्यांची
त्या कालगतीची–कालशक्ती ऋषीची
ज्याने संपविला रामावतार
जानकीला भूगर्भात लोटून
निर्वासित करून लक्ष्मणाला
दाखवून वाट आत्मविसर्जनाची

वा.पु.– लक्ष्मणामागोमाग
उडी टाकली श्रीरामप्रभूंनीही
तुझ्या डोहात, प्रात:काळी
सूर्योदय होत असतानाच,
अस्त झाला सूर्याचा
सूर्यकुलभूषणाचा

शरयू- सीतादेवी अन्तर्धान पावली
समाप्ती झाली रामराज्याची
हे मी सारं पाहात होते
अश्रू ढाळीत वाहात होते
थांबता आलं नाही तेव्हा देखील
आता कशी थांबू ?
अवकाशपुरूषा,
विसरता विसरत नाही
ती नम्र प्रभात
कल्पांत तो सूर्यास्ताचा
क्षणार्धात नगरी उध्वस्त झाली
कल्पांतच तो
ऐक अजूनही ऐकू येत आहे ती हाक
'हाय सीते! – हाय लक्ष्मणा'
सर्वसमर्थ श्रीरामाची
ती असहाय हाक
सूर्यमंडल भेदून जाणारी
अवकाशाचे पडदे फाडणारी

वा.पु.- पलीकडे बघ, शरयू, तुझ्या काठावर
त्या डोहाच्या डाव्या बाजूला
महाराज लक्ष्मण उभे आहेत
तिथे झाडाखाली
झाडच होऊन
पहा ऊर्मिलाही येत आहे
मागोमाग
ठेचाळत लगबगीत

शरयू- खरंच, सूर्यकुलाच्या लक्ष्मीचं
संवर्धन करणारे लक्ष्मण महाराज
सूर्यकुलाचं संहारापासून रक्षण करण्यासाठी
सेवेच्या, व्रतभंगाचा आरोप स्वत:वर
ओढवून घेणारे प्रतापी रामचंद्रानुज
स्वीकारून स्वत: निर्वासनदंड, कुलासाठी
हुतात्मा झालेले लक्ष्मणमहाराज
कसे खिन्न दीन दिसत आहेत
या तापस वेशात खिन्न, एकाकी
ती शस्त्रधारी मूर्ती
सदा तळपणारी
प्रत्यंचेवर चढलेल्या स्वर्ण शरासारखी

वा.पु.- त्या डोळ्यात पेटत आहेत विस्मृत वणवे
दंडकारण्यातले,
तिथेच एकीकडे
अश्रु ढाळीत आहेत, अशरीरी,
करूण, भयभीत डोळे शूर्पणखेचे:
जणु प्रश्न विचारीत आहेत–
हीच काय अखेर फलश्रुती, महाराज
तुमच्या जन्मभराच्या सेवाव्रताची
उदासीनता पसरत आहे त्यासरशी
त्या तेजस्वी मूखावर, ज्याला
कधीच शिवली नव्हती अशी खिन्नता
वनवासास निघताना
वा जखमी होऊन कोसळतांना रणांगणावर
अमोघ शक्तीने इंद्रजिताच्या
काय हा खेळ दैवगतीचा–

शरयू- पहा वास्तुपुरूषा, येऊन पोचली ऊर्मिलाही
समुद्रांबरा, कुकुमांकिता संध्या
काहीशी ढगाळलेली,
आपल्याच विस्कटल्या केशात हरवलेली
व्याकुळ मुद्रा विशीर्ण कमळाची

वा.पु.- उमगत नाही पण ती बोलते आहे
काही लक्ष्मणाशी, थरथरत
वाऱ्याशी झगडणाऱ्या रानदलाप्रमाणे

शरयू- तरीही धग आहे तिच्या डोळ्यात
चौदा वर्ष सोसलेल्या नि:शब्द विरहाची
मुग्ध, क्षुब्ध प्रेमाच्या अबोल ज्योतीची
वेदना डोळ्यात युगायुगातील आदिम परित्यक्तेची
ऐका, माझ्या आटत्या निळ्या पाण्यातून
येत आहेत अस्पष्ट पडसाद.

वा.पु.- नको शरयू, आपण जाऊ इथून
आता तरी मिळू दे त्यांना थोडा एकान्त
दुर्मिळ झालेल्या असिपत्र–वनात
सेवेच्या, चल शरयू

शरयू- खरंच जाऊ या
पण ते शब्द कसे पाठलाग करीत आहेत
जळात पसरत आहेत
विझत्या सूर्याची बिंबे होऊन
पंख होऊन

घरटे शोधणाऱ्या पाखराचे
आयुष्याच्या अस्तमानी
(प्रवेशानंतर वाद्याचे खिन्न सूर)

ऊर्मिला– इथे येऊन बसलात महाराज?
का? राजमहाल नव्हता विश्रांतीला?
का आलात इथं, यावेळी
करकरत्या तिन्हीसांजेला–
टाळण्यासाठीच ना मला?

लक्ष्मण– थांब ऊर्मिले थांब जरा,
श्वास घेऊ दे मला थोडा, जाऊ नकोस
एकदम अशी वाकड्यात

ऊर्मिला– मी जात नव्हते, तुम्हीच आणलंत
मला इकडे, स्वत: शिरून अरण्यात
शरयूतटीच्या

लक्ष्मण– नाही ऊर्मिले, नाही कधीच टाळलं नाही मी
माझं कर्तव्य आणि तुझं प्रेम,
या दोन्हीतूनच साकारले आहे माझं जीवन,

ऊर्मिला– (हसून) खरं सांगताय अगदी?
ऐकेल कुणी तरी अन् मग पस्तावाल.

लक्ष्मण– ऐकू दे, मला कोणाची भीती नाही–

ऊर्मिला– निदान स्वत:ची तरी– पण तीही
नसेल म्हणा, कारण लोक म्हणतात
शेषावतार आहात तुम्ही–
आणि सर्पाला कानच नसतात म्हणे!

लक्ष्मण– (रागात) ऊर्मिले, ही काय चेष्टा चालवली आहेस?
मी सरळ बोलतोय, सरळ उत्तर दे
शेषावतार वगैरे आणू नकोस मधे
नाग नाही माणूस आहे मी,
माणसासारखं बोल

ऊर्मिला– अग बाई, केवढा राग आला! लोक काय बोलतात
ते सांगितलं तर–

लक्ष्मण– तू लोकांशी बोलत नाहीस
सर्पालाच का तू भेटतेस रोज शयनागारात?

ऊर्मिला– हा काय फाजिलपणा? अशान बोलायचीच नाही मी.

लक्ष्मण– मग सांग, ते लोक मूर्ख आहेत म्हणून

ऊर्मिला– विनोदही समजत नाही तुम्हाला! पण
अशानं मी फसणार नाही अन्
हसणार तर नाहीच नाही. म्हटलं–
आम्हालाही राग येतो, खरं तर,

मीच रागवायला पाहिजे, अन् तुम्हीच
चवताळलात, आपल्या रहस्याच्या शेपटीवर
पाय पडल्यासारखे

लक्ष्मण– तू असंच बोलणार असशील तर चाललो मी.

ऊर्मिला– आता का? आता का असा फणा काढता?

लक्ष्मण– पुन्हा तोच विनोद, मला नकोय असा विनोद.

ऊर्मिला– अहो, तुम्हाला विनोद आवडत नाही. प्रेमाचं भाषण
आवडत नाही, बायकोही आवडत नाही
म्हणूनच निघालात वनात जायला, झाडे
वेली, ही तुमची प्रेमाची माणसं, पण म्हटलं
त्यांनाही कान असतात, तेव्हा हळू बोला.

लक्ष्मण– निरर्थक बडबड बंद कर ही
मी बसलोय इथं प्रायोपवेशनाला, अन् तुला.
सुचतोय विनोद– थोडी गंभीर हो–

ऊर्मिला– साऱ्या जीवनाचा जिथं विनोद झाला
तिथं आणखी काय होणार!
मी सारं सहन केलं, पण तुम्हाला
एक एवढासा शब्द सहन होत नाही
काय करू? तुमच्या रागाचं
हसूच येतंय मला, प्रायोपवेशन करणाराला
अजून क्रोध आवरता येत नाही!
तुम्ही कसा निरोध करणार प्राणांचा?
अहो ही झाडाची पानं पहा (हसत)
तीही विनोदीच दिसतात. काहीच
कसं समजत नाही त्यांना? तुम्ही– तुम्ही
प्राणांचा निरोध करायला आलात इथं
आणि या पानांना वारा सुटतोय नाही–
नाही सुचतोय.

लक्ष्मण– आता मात्र अगदी हद्द झाली!
आवर हा आपला 'पाण' चट विनोद
मर्यादा असते प्रत्येक गोष्टीला.

ऊर्मिला– अस्सं होय– हे नव्हतं मला माहीत
पण काय हो? हद्द तुम्हीच गाठली आधी
हे नाही अजून लक्षात येत
तुमच्या? – अन मला म्हणता
हद्द गाठलीस म्हणून?
प्रेमानं बोलून
विनोद करून
तुमचा राग घालवायचा यत्न करीत होते मी,

तर तुम्ही मर्यादेची भाषा सुरू केलीत,
वैदेहींना शिकवावी लागत नाही मर्यादा
कोंडमारा झाला त्या मर्यादेनं,
एकीनं वैतागून गाठला धरणीचा ठाव
आता दुसरी मी– मला तुम्ही
गोष्टी सांगता मर्यादेच्या– ?
सरळच विचारते मी–
तुम्ही कोणती मर्यादा पाळलीत
निर्णय घेताना प्रायोपवेशनाचा ?
बायकोला एका शब्दानं तरी कळवलंत का ?
मला न सांगता,
राजमहालात न येता
सरळ इकडे आलात शरयूकाठी–
आणि मी प्रतीक्षा करीत
बसले महालात, हीच का तुमची मर्यादा ?

लक्ष्मण– काय संबंध आहे माझा
त्या राजमहालाशी ?
एक निर्वासित मी– निर्वासित केलंय मला
श्रीरामचंद्र प्रभूंनी–

ऊर्मिला– ते कळलंय मला. सुमतांनी सांगितलं वाटेत
तुम्ही का नाही आला ?
माझा निरोप घ्यायला माझ्या महालात ?
निर्वासन म्हणजे बंदी नाही कुणाला भेटायची ?
सरळ आहे. तुम्हाला भीती वाटली ?
नाहीतर गरज नाही वाटली
माझा निरोप घेण्याची. मी कोण ?

लक्ष्मण– उगीच नसते कुतर्कं करू नको
'मा कुतर्क्यताम' समजून घे मला

ऊर्मिला– खूप समजून घेतलंय महाराज,
समजूनच घेत आले जन्मभर,
मला मात्र कुणीच समजून घेतलं नाही–
प्रत्यक्ष पतीनंही नाही. (हुंदका)

लक्ष्मण– काय समजून घ्यायचं आता
माणूस निर्वांसित झाला ऊर्मिले,
म्हणजे माणसातूनच उठतो तो
तुटतो त्याचा आणि समाजाचा संबंध.

ऊर्मिला– परंतु पती–पत्नी म्हणजे समाज नव्हे
पण इथं कशाला चर्चा नदीकाठी उघड्यावर
महालात चला महाराज.

लक्ष्मण– नाही मी येणार नाही तिथं–
ऊर्मिला– ठीक आहे इथंच सांगते
पती–पत्नी म्हणजे समाज नव्हे
जिवाभावाचे असतात बंध, अग्नीसाक्ष बांधलेले
ते असे तोडता येत नाहीत रस्त्यावर
शिवाय आडकाठी नव्हती केली
कुणी तुम्हाला ?
लक्ष्मण– आडकाठी होती माझीच मला
काही संबंध राहिला नाही माणसांचा,
मुकलो मी साऱ्या माणसाना
ऊर्मिला– पण माणुसकीला नाही महाराज
पत्नीविषयक जबाबदारीला नाही
वाटेत म्हणालं कुणीतरी
प्रायोपवेशनाला निघालात
तुम्ही शरयूतीरावर,
धावत ठेचकाळत आले मी
जिवाचं रान करून
दासींना मागे टाकून
महाराज, निर्वासन म्हणजे प्रायोपवेशन नव्हे
आत्मविसर्जन तर मुळीच नव्हे.
मला न सांगता न संवरता–
निरोप तर लांबच–
निर्णय घेतला तुम्ही
प्रायोपवेशनाचा, कुठला धर्माचार हा ?
या रामराज्याचा! या सत्ययुगाचा!
संन्यास घ्यायचा तर
संमती घ्यावी लागते पतीला
आपल्या धर्मपत्नीची
आणि तुम्ही तर प्राणत्यागाला
सिद्ध झालात
न सांगता एका शब्दानेही
आपल्या धर्मपत्नीला
हाच का न्याय तुमच्या राम राज्यातला ?
आज्ञाधारक बंधु तुम्ही श्रीरामाचे
मग त्यांची तरी आज्ञा घेतलीत का ?
याचा अर्थ हाच की उर्मिलेची
गरज नाही तुम्हाला, कुणी नाही
तुमची ती
ना पत्नी, ना सहचारिणी, साथ नको

तिची ना जगण्यात ना मरणात
आजचं नाही हे
तेव्हाही असंच केलंत
वनवासाला निघताना–

लक्ष्मण– आता कशाला आठवण
त्या दुर्दैवी प्रसंगाची

ऊर्मिला– कशाला म्हणजे ?
माझ्या सौभाग्यावरही
उरला नाही का अधिकार माझा ?
वनवासाच्या प्रसंगात
चौदा वर्षानंतर तरी भेटाल
ही आशा होती
आता तर निघालात मृत्युकडे
कायमचे सोडून मला, तरीही
नको विचारू ?
काय अपराध होता माझा ?

लक्ष्मण– ऊर्मिले उगीच जिवाचा संताप
करून घेते आहेस.
मी येवढंच म्हणेन तो प्रसंग दुर्दैवी होता
वनवासाला निघालो तो केवळ
पितृवचनाच्या रक्षणासाठी
इक्ष्वाकु कुलाच्या कीर्तीसाठी
शिवाय त्या शापात की वरात.
समावेश नव्हता तुझा
म्हणून योग्य नव्हते वनवासास नेणे सांगाती
तुला– या माझ्या लाडकीला
नुसत्या तिरपेनं आळणाऱ्या या प्रीतीच्या फुलाला
त्या दारूण वनवासात ?

ऊर्मिला– राहू द्या महाराज राहू द्या
आता या प्रेमाच्या गोष्टी,
आता तितकी भोळी नाही राहिले मी
खूप शिकवलंय मला या रामराज्यानं
सत्याच्या चक्रावर धावणाऱ्या या धर्मरथानं
आठवलंच असेल तुम्हाला
शिवधनुष्य मोडलं रघुकुलभूषणानं, तेव्हा
त्याच्या गगनभेदी निनादात
कळलं नाही
केव्हा आणि कसे झाले आमचे विवाह
मंगलाष्टकं, सप्तपदी, होम–हवनाचे मंत्र

सर्व बुडाले त्या धनुर्भंगाच्या
घरघरत्या घनघोर आवाजात!
पुढे ओढवला वनवास
मृत्यु दशरथ महाराजांचा
सारी अयोध्या बुडाली शोकात
आणि चालला तुम्ही दंडकारण्याकडे
आनंदाने भोगला तुम्ही वनवास
आणि महालात सहन केल्या
मी यातना वनवासाच्या
एकांतात, नि:शब्द
काय अपराध केला होता
मी तुमचा ?
अपमानही केला माझा तुम्ही
क्षुद्र दासीसमोर
एक शब्दही न बोलता निरोपाचा
गेलात निघून
काय समजल्या असतील त्या मला
तुमची दारा, की नुसतं दार–
उघड टाकलेलं मागं
ओठावरील रिकाम्या सताड हास्यासारखं–
फक्त एक लाकडी दार
ज्याला लाकडी अधिकारही नव्हता
नुसत्या करकरण्याचा – कुरकुरण्याचा

लक्ष्मण– किती अर्थ काढतेस ऊर्मिले
एका माझ्या क्षुल्लक कृतीतून
जी घडली अनवधानाने
आणि जी विसरूनही गेलो मी पुढे–
केवढा अर्थाचा अनर्थ होतो आहे हा?
उगीच कष्ट कशाला
निष्पाप जनक नंदिनीला
म्हणून बरोबर नेलं नाही तुला
शप्पथ, संबंध नव्हता तुझ्या त्या वराशी

ऊर्मिला– समजते महाराज, मला ही संपादणी
सीतेचा कुठे संबंध होता त्या वराशी
सासूबाईंच्या? तरी ही
संमती दिली रामचन्द्रांनी
प्रेम होतं त्याचं आपल्या पत्नीवर
आणि तुम्ही ओलांडून निघालात मला
सहज दारीच्या दारवंट्याप्रमाणे

प्रेम नव्हतं तुम्हाला माझं
नव्हतं दु:ख माझ्या दूरतेचं
कीव–करूणा नव्हती माझ्या
विरहयातनांची–

लक्ष्मण– ऊर्मी, एखाद्या सामान्य असंस्कृत
स्त्रीसारखं बोलावंस तूं
याचा खेद होतो मला
शोभत नाही तुला हे

ऊर्मिला– हा शोभेचा नाही अन्त:करणाचा
प्रश्न होता, पण अंत:करणच कुठाय तुम्हाला ?
अन् मला ऊर्मी म्हणू नका यापुढे
मेली ती ऊर्मी !

लक्ष्मण– असं काय बोलतेस हे आज
इतक्या दिवसांनी– क्षणात कशी बदललीस

ऊर्मिला– राहू द्या ती साखरपेरणी,
वाळला आहे ऊस आता !

लक्ष्मण– ऊर्मिले, ऊर्मिले, हे शोभतं नाही तुला
एका विदेहात्मजेला, तपस्विनीला–
मला माहीत आहे– अगदी खरं सांगतो
आठवून पूर्वजांचे पाय,
अगदी निराहार राहिलीस तू
चौदा वर्षे या महालात
चक्क टक लावून, अनिमिष नेत्रांनी
बघत सूर्याकडे
कंठीत दिवस विरहाचे
आचरीत दारूण तपस्या,
तुझे ते तप श्रेष्ठ आहे
दिव्य आहे
माझ्या वनवासातील सेवाव्रतापेक्षाही
माझा वनवास साहिला मी
केवळ तुझ्या तपाच्या बळावर
त्यागी, मानिनी,
संरक्षक देवता होतीस तू माझी
बसलेली शेकडो योजने दूर
माझे शुभ चिंतीत.
तुझ्याच पुण्याईने केला मी
नाश दैत्याचा
तूच होतीस माझी संजीवनी
सती तपस्विनी

बसली होतीस साठवीत सूर्याचे तेज,
त्याबरोबरच वेदना माझ्या विरहाच्या
आशा मीलनाच्या, शुभकामना कल्याणाच्या
क्लान्त पुष्करणीत उभी राहून ;
कमला शुभ्रवसना शुभ्रहासिनी
लाजवीत सगरपुत्राना
भस्मीभूत झालेल्या, अशी तू कल्याणी
पद्मिनी विरक्त अनुरागिणी
जळणारी क्षणाक्षणानी
आतपतापात, एकही निश्वास न टाकता
मनात शिलगणाऱ्या विरहात
प्रिय संगिनी–

ऊर्मिला– आता राहू द्या महाराज हे शब्द
कापूस ढगाचे कापूर चांदण्याचे
कामी येतील कधी तरी
दुसऱ्या कुणा भाग्यवतीसाठी
मला ते असह्य होतात
पोळतात विपरीत अनुभवामुळे
म्हणे संजीवनी ! हं
संजीवनी असते तर,
असे आला नसतात इकडे
प्रायोपवेशनासाठी
मृत्यूला कवळण्यासाठी
नाकारून अधिकार माझ्या सौभाग्याचा.
बसले आहे मी
दुसरी सोन्याची मूर्ती होऊन
पहिली सीता, जी बसली होती
यज्ञमंडपात ;
अन् मी महालात,
प्रतीक्षेत जळणारी
काजळी झाडीत बसणारी
सूर्यकुलाच्या ज्योतीवरची
आज अशी मृत्यूच्या दारात !

लक्ष्मण– काय बोलतेस हे ऊर्मिले
जाळायला निघालीस संतापाच्या निखाऱ्यात
केवळ मलाच नाही,
तर सर्व सूर्यकुलाला
कल्पना नाही तुला या क्रोधात
अवहेलना होते कोणाची ?–

पुण्यश्लोक राजा रामचंद्राची
साध्वी सीतामातेची
भागीरथी पृथ्वीवर आणणाऱ्या
भागीरथाची, अवघ्या रघुकुलाची !

ऊर्मिला– मला त्याची पूर्ण कल्पना आहे महाराज
अवहेलना झाली असेल रघुवंशाची
सूर्यकुलाची, तर क्षमा करा मला
दुष्टपणा आहे हा माझ्या दैवाचा
जन्मापासून पूजलेल्या दाहक सत्याचा
वडाच्या डहाळीबरोबर !
मला कुणाला दोष द्यायचा नाही
कहाणीही सांगायची नाही
माझ्या दु:खी स्त्रीजन्माची
जमलं तर क्षमा करा मला
प्रत्येक पुरुष जोपासतो प्रथम
आपल्या पराक्रमाचा अभिमान
प्रतिष्ठेचा अहंकार,
अपवाद कसे ठरतील त्याला
सूर्यकुलातले पुरुष, जे
सर्वाधिक दडपले गेले आहेत
आपल्या कुलकीर्तीच्या भाराने !

लक्ष्मण– किती अपमान करशील स्वत:च
आपल्या सूर्यकुलाचा
मर्यादा पुरूषोत्तमाचा, नाव न घेता
पुरे कर, थांबव आता.

ऊर्मिला– आता मात्र थांबवू नका मला,
पापात बुडले आहे तर,
पुरती बुडू द्या, कुलनिंदेच्या
मी काही म्हटलं तरी
स्त्री जन्माचा ताप
त्याचा शाप
संपणार नाही, युगे, संपली तरी

लक्ष्मण– ऊर्मिले, आवर, सावर आपल्याला
काय काय कुंभांड रचते आहेस तू
श्रीरामासारख्या पुण्यशील नृपतीवर
कुठे गेली तुझी शालीनता
एक पाय फुलात,
तर एक पाय निखाऱ्यात
जळत ठेवणाऱ्या तुझ्या समबुद्धी जनकाची

जनक महाराजाची
रघुवंशाच्या प्रतापापुढे लीन होणारी
त्या निगर्वी, त्यागी विदेही राजाची
अभिजात नम्रता.
सारं सार विसरलीस
य:काचित स्त्रीदु:खाचा
बडिवार उगाळतांना

ऊर्मिला– महाराज, मला क्षमा करा
इतकं क्षूद्र नगण्य वाटतं
स्त्रीचं दु:ख! जे
राजधर्माच्या, पुरूषी राजनीतीच्या
पलीकडं आहे ते दु:ख ! खरं आहे
कुणालाच कळत नाही ते
कोणीच पोहचू शकत नाही तिथं
जिथं रडत असत स्त्रीजातीचं दु:ख
अश्रु ढाळीत
आपल्याच अन्त:करणाच्या काठावर–

लक्ष्मण– असं गूढात बोलू नकोस
सरळ सांग, सरळमार्गी आहे मी
बाणासारखा

ऊर्मिला– ते मला माहित आहे
म्हणूनच तुमच्यावर प्रेम करते
अन् भीतीही वाटते
रागवाल म्हणून
सरळ सांगितलं तर ;
त्यापेक्षा मुक्यानेच जळू द्या
मौन ज्योतीसारखं
चौदा वर्षाच्या, नव्हे हजार हजार वर्षांच्या
कोंडलेल्या या स्त्रीजीवनाला.
शक्यता नाही कधीच त्याला
निर्भय वाचा फुटण्याची
ते ऐकायला कानही नाहीत
कृत त्रेतादि चाऱ्ही युगांना !
आणखी एक सांगते
केवळ कोपाने पूर्तता करू नये
या प्रश्नाची

लक्ष्मण– फार झालं हे, हे सत्यवादिनी
स्वयंघोषित न्यायदेवते
सिद्ध हो आपल्या मरणाला

क्षमा नाही सुर्यकुलाचा
त्याच्या परंपरेचा
अपमान करणाऱ्याला

ऊर्मिला– मी तयार आहे आत्मबलिदानाला
पण त्यापूर्वी
एकच प्रार्थना करते
बांधली जाऊ नये ही वाणी
बहुजनांच्या अविवेकी
विधिनिषेधाने
गुंतू नये तिने
भयाच्या वा प्रेमाच्या जाळ्यात
रागावू नका,
मरण्यापूर्वी कळेल का मला
आपल्या मुखातून
कारण सीतेला वनात पाठवण्याचं

लक्ष्मण– मी उभा नाही तुझ्यासमोर
साक्षीदार म्हणून
तरीही सांगतो दयेने
पूर्ण करावी अखेरची इचछा
मृत्यूदंडित अपराध्याची

ऊर्मिला– फार उपकार झाले–

लक्ष्मण– देवी विषयीच्या संशयाची
वार्ता आणली गुप्तचराने

ऊर्मिला– म्हणजे देवीला डोहाळे लागण्या आधीच
संशयाचा गर्भ राहिला होता
प्रजेच्या मनात !
आणि त्या क्षुद्र परिटाच्या
शब्दावर विश्वासून,
केवळ प्रजानुरंजनासाठी !
संमती दिली
श्रीराम प्रभूंनी
युगधर्माच्या त्या थोर पूजकानी.
तिच्या डोहाळ्याचं निमित्त साधून,
शिक्षा दिली,
वनवासाची देवीला,
निराधार गर्भवतीला
सोडण्याची अरण्यात
मुनी वाल्मिकीच्या आश्रमात
एकवचनी रामाच्या वचनावर

विश्वासणाऱ्या
भोळ्या जिवाला ठंकवून !
(प्रवेशांतर)

सीता– भावोजी वंदन सांगा
माझे प्रभुला
सवड काढली महाराजांनी
राजकारणातून
पुरवायला माझे डोहाळे–
माझा एक बायकी हट्ट
राजकाजाच्या अजस्त्र व्यापातून,
आता एकांन्तात झुरत असतील
रंभाभवनात बसले असतील
अश्रु ढाळीत शिलातलावर
पण हे काय ?
तुमच्याही डोळ्यात अश्रु
तुमचंही मन पारा पारा
असे अश्रु काढू नका भावोजी,
मी सुखात नहात आहे.
प्रभुच्या प्रेमाच्या वर्षावात
तुम्ही का दु:खी होता
काही दिवसांचा तर प्रश्न आहे
जा, सुखाने जा,
धीर द्या राघवाला,
पण तुम्हीच अश्रु ढाळल्यावर– ?
जा अयोध्येला परत जा
पण आधी सांगा मला
कुठे आहे मी या वनात ?

लक्ष्मण– क्षमा करा वहिनी,
माझ्या वेडेपणाला– तो आश्रम
जवळच आहे इथून समीर
गोदावरीच्या काठी

सीता– तुम्ही नाही येणार
तिथपर्यंत ?

लक्ष्मण– कशाला उगीच ? पहा
समोर उभ्या आहेत मुनिकन्यका
तुमच्या स्वागतासाठी
निघतो आता–

सीता– या सुमंत वाट पहात असतील
थांबला असता तर

बरं वाटलं असतं
वाल्मिकी मुनींनाही
हे काय पुन्हा आसवे डोळ्यात
फारच हळवे आहात भावोजी
मी काय इथेच रहाणार आहे
कायमची ?
का प्रभूंची काळजी वाटते ? सांगा
केव्हा येणार न्यायला मला ?

लक्ष्मण– आज्ञा होताच येईन
रथ घेऊन

सीता– लवकरच परतायचंय् मला
केव्हा येणार ते सांगितलं तर–

लक्ष्मण– माहीत नाही ते मला
क्षमा करा, वहिनी,
आश्रमात सोडून ये
एवढीच आज्ञा दिली– (खिन्नपणे)
सांगायचं नव्हतं तुम्हाला
पण मला राहवत नाही
प्रजेच्या संशयाचं,
लोकापवादाचं,
निरसन होईपर्यंत
रहावं लागेल तुम्हाला इथेच
असं दिसतंय–

सीता– अरे देवा,
माझा त्याग तर नाही ना करायचा
त्या सूर्यकुलभूषणाच्या मनात ?
खर सांगा भावोजी ?

लक्ष्मण– तसा भलता संशय आणू नका मनात
शांत मनानं आश्रमात रहा
हेही दिवस जातील
वनवासातील चौदा वर्षांप्रमाणे

सीता– चौदा वर्षाचं काय म्हणता भावोजी ?
मला तर काही समजत नाही
परित्यक्ता बनून
किती दिवस रहायचंय मला वनात ?
पाहिलंत पुन्हा आणलेत अश्रु डोळ्यात
हाच का तो लक्ष्मण, ज्याने
इन्द्रजिताचा अमोघ शक्तिप्रहार केला सहन,
तुम्ही रडू नका हो असे

भीती वाटते मला

लक्ष्मण– धीर धरा वहिनी
पश्चात्ताप होईल प्रजेला
बदलेल प्रभूचंही मन
त्यांना थोडंच राहवणार आहे
फार दिवस तुमच्याविना

सीता– माझाही तसाच विश्वास आहे
भावोजी, पण धीर सुटतो
तुमच्या डोळ्यातले हे अश्रु बघून

लक्ष्मण– खरं आहे, पण तो लोकापवाद
प्रजेचा संशय, निंदा
परीटासारख्या क्षूद्र लोकांची–
रामराज्याची प्रतिष्ठा
सिंहासनाचं पावित्र्य
अपकीर्तीची भीती
रामराज्याच्या राजलक्ष्मीची अवहेलना
सहन होत नाही रामचंद्रांना–
सूर्यही नभात जळत आहे
लपवीत आहे आपले डाग
आपल्याच ज्वलनात,
काळवंडत आहे चिंतेने सूर्यकुलाच्या!
काही काळ वहिनी
रहावं लागेल तुम्हाला दूर,
अज्ञात स्थळी
येवढं करणार नाही तुम्ही
आपल्या पतिदेवासाठी?

सीता– काय म्हणता भावोजी?
माझे प्राणही देईन
त्यांच्या प्रतिष्ठेसाठी
परंतु येवढं सांगा प्रभुला–
पण नकोच– मला सांगता येत नाही
लाज वाटते, पहा एकदा
माझ्याकडे वर माझ्या मुखाकडे
म्हणजे समंजेल तुम्हालाच
हे काय, खाली मान घालून
काय उभे राहता सारखे सारखे
एकदा वर पहा अश्रु आवरून
त्या अश्रूतून फुटेल हंसू
तुमच्या ओठावर?
मी कसे सांगू?

पहा ना एकदा वर माझ्याकडे–

लक्ष्मण– वहिनी, श्रीराम सन्निध असतांनाही
मी कधी नाही पाहिलं
तुमच्या मुखाकडे मान वर करून
अवलोकिले फक्त तुमचे चरण
श्रीपादाभिवंदनासाठी,
पाहिलेत नुपुर तेवढे
तुमच्या पायातले,
आणि आता इथं, या एकान्तात,
रामचंद्र प्रभु नसताना,
तुमच्या मुखाकडे पाहाण्याचं धाडस करू ?
अतिक्रमण होईल ते मर्यादेचं

सीता– (हसत) अतीच! काही तरी तुमचं भावोजी ?
भारीच शालीन तुम्ही
ऊर्मिलेकडे तरी पाहता की नाही
डोळे भरून कधीमधी

लक्ष्मण– वहिनी, प्रसंग कोण गंभीर
आणि आशावेळी
कसला हा विनोद ? वहिनी,
विचारा ते ऊर्मिलेलाच.
अशा विनोदानं
अधिक व्याकुल होतो– ऊर्मिला!
अहो माहीत नाही तुम्हाला
ती तर नुसती शरधारा आहे
अभिमंत्रिलेली अग्न्यास्त्राने,

सीता– तुमचे हे उद्‌गार
ऊर्मिलेनं ऐकले तर!

लक्ष्मण– त्या ऊर्मिलेचं राहू द्या,
आधी आपला विचार करा
किती माया आहे वहिनी
तुमची माझ्यावर
नको वहिनी, नको
पात्र नाही त्याला मी

सीता– बरं बाई, सांगायचे नसेल तर
नका सांगू, पण एवढं तरी
सुचवाल त्यांना– हो, पण काय सुचवाल ?
कसं सांगायचं ? –छे, नाहीच जमत
एखादवेळी ऊर्मिलेला सांगितलं असतं
पण तुमच्यासमोर!

नाही सांगता येत– त्यांना म्हणावं
पहा कशी नवी कांति सांडते आहे
गात्रागात्रावर माझ्या,
एका नव्या सूर्योदयाची
म्हणावं माझा– ऋतु, टळला आहे
म्हणून म्हणते लवकर यायचं
अन् सांभाळून रहायचं.
जा भावोजी, सांगा सुचेल ते
सांगा त्यांना– आणि जा पाहू,
अधिक लाज आणू नका मला
जा लवकर इथून कसे
सुमंतही खोळंबले असतील

लक्ष्मण– चाललो वहिनी, खरंच
वाट पहात असतील सुमंत
फार वेळ झाला. ते पहा
वाल्मिकीमुनीही आले आहेत
प्रवेशद्वारावर
बरोबर ऋषिकन्यकाही आहेत
फुले घेऊन, फुले होऊन
स्वागतासाठी,
वहिनी, येतो आता–
लवकरच रथ घेऊन
काळजी, करू नका.

–प्रवेशान्तर–

ऊर्मिला: आणि तुम्ही निघून आलात
सीतेला सोडून एकटेच
अश्वमेघाचा वारू हरवून आलेल्या
वीरासारखे

लक्ष्मण– वारू हरवून आलो नाही
तो तर सोडायचा आहे, अजून
परतलो मी
श्रीरामाच्या पुत्राच्या आगमनाची
शुभवार्ता घेऊन
ऊर्मिले, पहा,
कुठे ती सीतादेवीची
अमृतवाणी
आणि कुठे तुझ्या जिव्हेचे
हे तेजाबपाणी

माझ्या ह्या सातजन्मीच्या
सहचारिणीचे!

ऊर्मिला– होय, सहचारिणीच आहे मी, पण
पालनच अशक्य करून सोडलंत तुम्ही
माझ्या त्या धर्माचं
निघालात तुम्ही प्रायोपवेशनाला
अनुमती न घेताच पत्नीची
पुरूषांना आपला धर्म असतो
परंतु स्त्रियांना, दीनदुबळ्यांना
अशक्य होतं पालन करणं आपला धर्म
त्यांचा तो अधिकार तुडविला जातो
पायातळी याच पुरूषांकडून
कधी बळाचा आश्रय करून
उभारून जाईचा मंडप
पडदा फुलांचा धुंद सुगंधी धुक्याचा
आमच्या भोवती.

लक्ष्मण– म्हणजे पुरूषांचं प्रेम खोटं असतं
वंचना असते, असंच म्हणायचं तुला

ऊर्मिला– रामराज्यांची लक्ष्मीची वृद्धी करणारे
श्रीमान धीमान तुम्ही
तुम्हाला काय सांगू मी

लक्ष्मण– तुझ्या प्रशंसेची गरज नाही.

ऊर्मिला– मी कुठं तुमची प्रशंसा करते आहे
कथा सांगते आहे
तुमच्या अन्यायाची
असमानतेची

लक्ष्मण– रावणाच्या नाजुक गुप्तचराला
कंठस्नान घालण्यात
कोणता अन्याय आहे?

ऊर्मिला– पण मला दिसतो अन्याय तिथे
पुरूषी पराक्रमाचा
अहंकार वंशाच्या, कुलाच्या प्रतिष्ठेचा
त्याच्या रक्षणासाठी रचले आहेत त्यांनी
बुरूज कुलकीर्तीचे, राजनीतीचे
युगधर्माचे! खोटे देव्हारे
आपली युद्धाची लालसा
विजयाची तृष्णा शमविण्यासाठी,
कुलकीर्तीचा अहंकार जपणारे
लोकापवादाच्या कलंकाला पुसणाऱ्या

खोट्या तटबंद्या उभारतात
आर्यांच्या संस्कृतीच्या घोषणा करून.
रावणाशी मांडले युद्ध
कुलावरचा कलंक पुसण्यासाठी
आर्यसंस्कृतीच्या रक्षणाची घोषणा देऊन
सीताशुद्धीच्या बहाण्याने
केली व्यूहरचना
सीतेच्या अग्निदिव्याची
वानरांच्या, काही रानटी अनार्यांच्या
अत्याचारी नरभक्षक राक्षसांच्या
लोकापवादापासून
स्वत:ला वाचविण्यासाठी
तरीही त्या विजयी रामचंद्राचं
समाधान झालं नाही
अग्निलाच लाज वाटली
त्यानं राखलं तिच्या गजऱ्याचं
ताजेपण, सुभगपण
आणि साध्वी सीतेच्या सतित्वाचं
अक्षय अम्लान फूलपण
जळू दिलं नाही!
त्या निष्पाप भूमिकन्येला
जाल पाहणाऱ्या त्या व्रात्य
दांभिक अग्नि ज्वालांना
लंकेच्या त्या सुवर्णभूमित.

लक्ष्मण– बंद कर ही बाष्कळ बडबड
पाखंड आहे, कारस्थान आहे
तुझ्या कुजक्या बुद्धीनं निर्माण केलेलं

ऊर्मिला– मला कितीही शिव्याशाप द्या
परंतु त्या साध्वीवर लादू नका अपवाद
एका क्षुद्र परीटाच्या निंदेचा
आश्रय घेऊन

लक्ष्मण– तुला काय कल्पना आहे
राजनीतीच्या गुंत्याची

ऊर्मिला– राजनीती कळत नाही मला
मला कळतो राजधर्म
दुर्बल, पीडितांचं परित्राण करणारा
असुरक्षित साध्वीचं शील राखणारा
ज्ञात नाही मला राजनीती
जी लोकापवादाच्या भीतीतून निपजते

आणि दुर्बलांच्या रक्षणाकरिता
असमर्थ असलेल्या
धैर्याच्या अभावातून जन्मते
प्रतिष्ठेच्या खोट्या अहंकारातून वाढते
श्रीरामांनी (बोलवत नाही मला,
तरीही बोलते)
प्रभुरामचंद्रांनी दिग्विजयी रघुवीरांनी
हेच केलं एका दुर्बल क्षणी
युगधर्माच्या नावाखाली,
राज्याच्या प्रतिष्ठेचं
सिंहासनाच्या पावित्र्याचं
कारण सांगून,
प्रजानुरंजनाच्या तकलादू राजनीतीला
प्रतिज्ञेच्या अमानुष अहंकाराला,
बळी पडून,
या राजनीतीपायी पहिला बळी पडला
भोळ्या अल्लड शूर्पणखेचा
कल्पनेतल्या प्रेमाला भुललेल्या
अजाण कोवळ्या पोरीचा
दुसरा सीतादेवीचा
या सत्यवादी साम्राज्याच्या महाराणीचा
अयोध्येच्या राज्य-लक्ष्मीचा
डोहाळ्याचं केवळ नाटक करून
हा बळी दिला तुमच्या हातानं
रामचंद्रानं
नि स्वत: केलं यश संपादन
अश्वमेघ यज्ञाचं कंकण बांधून
सीतेची सुवर्ण-मूर्ती स्थापून
पुण्याहवानाच्या प्रसंगी
आणि मिरवली द्वाही त्रैलोक्यात
आपल्या एकपत्नि व्रताची
हे तुमचं राजराज्य!
हे तुमचं सत्ययुग?
ह्या राजनीतीला कंटाळून
त्या अनाथ निष्पाप साध्वीनं
शेवटी आवाहन केलं
एका स्त्रीलाच
आपल्याच धरित्रीमातेला,
आपल्या शीलाचं, पावित्र्याचं

रक्षण करण्यासाठी
धावत आली ती धरणी माता
आपल्या कन्येसाठी
पर्वताची कपाटे फोडीत, नद्यांचे कटाह छेदीत
आपल्या क्षुब्ध भूमिकंपनात
आणि अंतर्धान पावली पुन्हा त्या विवरात
त्या भूमिकन्येला निरवलं आपल्याला
आपल्या वत्सल मातेच्या कुशीत
आपल्या दु:खांसह
आपल्या यातनांसह
भूमिसारखेच मौन निस्तब्ध होऊन
पोटात साठवून
आपली व्यथा, आपली कथा
अबाधित राखून
तुमचं राज्य. तुमचं सत्ययुग
पचवून सारे अन्याय
साहून सारी दु:खे
स्त्रीजन्माची
तुम्हाला कळलंच नाही, दिसलंच नाही हे
आज्ञापालनात
सेवाधर्मात
लीन झालेल्या तुमच्या डोळ्यांना.

लक्ष्मण– ऊर्मिले, आता गप्प रहा
तू माझी पत्नी नाहीस
चांडाळिंणी, कैदाशिणी
कैकेयीच अवतरलीस दुसरी
ग्रास करण्यासाठी
या रामराज्याचा
पुण्यपुरातन सत्ययुगाचा
आधीच छाटायला पाहिजे होती
तुझी जीभ– चुकलं माझं
तुकडे तुकडे करायला पाहिजे होते
या पापी नागिणीचे
आता काही उपयोग नाही
आता काय संपले प्रभुरामचंद्र
संपलं त्यांचं राज्य आणि सत्ययुग
नागीणीहूनही विषारी आहे
तुझी ही वाणी
पेटेल त्यानं शरयूचं पाणी

वाल्मिकी मुनींची श्लोकवाणी
मीच जातो इथून
पण नाही, उपयोग नाही
हिला जिवंत सोडून
(खड्ग घेऊन ऊर्मिलेवर धावतो)
(इतक्यात आवाज येतो अंतराळातून)
आवाज– थांब लक्ष्मणा थांब
महामना लक्ष्मणा थांब
आवर ते शस्त्र
करू नकोस स्त्री–हत्या
एका तपस्व्याच्या हत्त्येनंतर
हे सूर्यकुलात्मजा–

ऊर्मिला– मी थांबते झाडाखाली
जात नाही पळून, पहा
हा कोण बोलतो आहे ?

लक्ष्मण– (थांबून)
कोण बोलतो आहे कुणाला माहीत
मला तर दिसत नाही कुणी कुठे ?

आवाज– थांब, राघवानुजा थांब
जरा वर पहा
आणि ऊर्मिलादेवी, तुम्हीही थांबा.

ऊर्मिला– कोण तू मला थांब म्हणणारा–
मला, ऊर्मिलेला
अयोध्येच्या मानी राजस्नुषेला
अपमान आहे हा तिचा,
बोला तुम्ही महाराज लक्ष्मणांशी,
वाटेल तर

लक्ष्मण– कोण तू ?
कुठे दिसत नाहीस, कुठून बोलतो आहेस ?
लपलास कुठे भ्याडासारखा
भक्ष्य व्हायचं काय तुला
या लक्ष्मणाच्या बाणाचं ?

शंबूक (नुसतं मुंडकं) क्षमा करा महाराज,
तपस्विनी ऊर्मिलादेवी
शेजारी उभा नाही मी
जरा वर पहा, मी तुमच्या
मस्तकावर तरंगतोय, वर पहा
दिसेल तुम्हाला ह्या आवाजाच्या जनक

लक्ष्मण– कोण तू?– माणूस नाहीस तू
एक मुंडकं आहेस देहाशिवाय?

शंबूक– हो, हे उपकार आहेत श्रीरामचंद्रांचे
विभक्त केलंय मला त्यांनी
आपल्या धडापासून, मुक्त करण्यासाठी मला
माझ्या पापापासून.

ऊर्मिला– काय बोलतोस तू?
श्रीरामानं शिरच्छेद केला तुझा
कशासाठी?

शंबूक– खरंच सांगतो मी ऊर्मिलादेवी,
वध केला माझा प्रभुरामचंद्रांनी

लक्ष्मण– चांगला ऋषीमुनी सारखा दिसतोस
असत्य भाषण करतोस!
तुझ्या असत्यवादी मुखाची
खांडोळी करून टाकीन
तुझ्या मस्तकासह

शंबूक– त्यानं काही फरक पडणार नाही
जिवंत आहे मी धड गमावून
तेव्हा आता मरण नाही मला
हे जाणलंच असेल तुम्ही
तपस्वीच आहे मी
तुम्ही म्हणता तसा
पाप ठरलं माझं तेच
या रामराज्यात!
म्हणूनच मस्तक तोडलं माझं
रामचंद्रांनी
कारण अधिकारी नव्हतो मी
तपाचा, पुण्यकर्मही पाप ठरतं
या सत्ययुगात

लक्ष्मण– शंबूक का तू?
क्षूद्र असूनही
ब्रह्मकर्म करीत होतास ना?

वाल्मिकी– योग्यच केलं श्रीरामांनी
तप हे ब्राह्मणांसाठी आहे
शूद्रातिशूद्रासाठी नव्हे
तो दंड होता तुझ्या पापाचा
प्रायश्चित त्याचं, न्याय्यच होतं ते.

शंबूक– महामुनी वाल्मिकी! प्रणाम
आश्चर्य आहे मुनिवर्य

तुम्ही बोलताहात हे ? आश्चर्य, महदाश्चर्यं!
ऋषी वाल्मिकी, आठवा आधी
तुम्ही कोण होतात ते–
एक निषाद एक वाटपाडे मारेकरी
तुमच्या पापाचा हिशेब करण्यासाठी
पापाचे रांजण रिते करावे लागले
जे भरले होते तुमच्या खुनी खड्यांनी
परंतु ब्रह्मर्षी नारदांनी कृपा केली
तुम्ही झालात महामुनी
आदिकवी बनलात
ब्रह्मकर्म करून, तपश्चर्यां करून–
मग तुम्हीच पहिले अधिकारी आहात
या पापाचे
प्राणदंडाच्या प्रायश्चित्ताचे!

ऊर्मिला– महामुनी नमस्कार करते
मी, जनककन्या
स्नुषा रघुकुलाची

वाल्मिकी– ओळखलं मी तुला
पिता कसा विसरेल आपल्या मुलीला ?
आशीर्वाद आहे तुला माझा
मानसकन्ये

ऊर्मिला– विसरलात तुम्ही मला, हेच खरं
आता कशाला आशीर्वाद, संपतांना
हा जन्म! इतकंच सांगते,
माझ्यावरही अन्याय झाला
आपल्या हातानं नकळत ?

वाल्मिकी– तुझ्यावर अन्याय! काय बोलतेस मुली ?
अन्याय ? तो कशाचा ?

ऊर्मिला– महामुने, आदिकवे, मिरवले लग्नात
मी वधू म्हणून लक्ष्मणमहाराजांची
रघुकुलाची, त्यानंतर ? – त्यानंतर
मी बंदीतच पडले, आपल्या महालात,
माझी वाचाही बंद केली
वंशकुलकीर्ती यांच्या अहंकाराने
प्रतिज्ञेच्या प्रतिष्ठेने, शाप वराच्या भ्रमजालाने
जळत राहिले आपल्या विरहाग्नीत
मुकी वनवासिनी आपल्याच महालात
चौदा वर्षे, अनाम, अज्ञात
रामायणातली दुर्दैवी वनवासिनी

विस्मृत, निर्वासित रामायणातून
जन्म देऊन नाकारलंत मला जीवन तुम्ही
अन्याय नव्हे का हा माझ्यावर ?

शंबूक- आणि सदाचरण, तपश्चर्या करणाऱ्या
आपल्या ज्ञातिबांधवाला, एका शूद्राला
प्राणदंड दिलात
सत्यव्रत रामचंद्राच्या हातांनी
विसरून आपली जन्मकथा
आपली पातके आणि
माझा शिरच्छेद करविलात
साधूंचं परित्राण करण्यासाठी अवतरलेल्या
महाविष्णूच्या हातांनी,
हा तर भयंकर अन्याय आहे
माझ्यावर, तसाच
त्या प्रभुरामचंद्रावर, सांगा,
तुम्ही कोण होतात ?
शूद्रच होतात तुम्ही अनधिकारी
ब्रह्मकर्माचे, तपश्चर्येचे,
मुक्तिसाधनेचे,
आज तुम्ही पुण्यात्मे महर्षी ठरलात
महाकवी म्हणून मिरवलात
आणि तुमच्या त्या महाकाव्याच्या राज्यात
आम्ही ठरलो पातकी
अधिकारी मृत्युदंडाचे
हा अन्याय नाही का
मर्यादापुरूषोत्तम रामचंद्रावर
त्याने निर्मिलेल्या सत्ययुगावर ?

वाल्मिकी- वत्सांनो, रागावू नका असे एकदम
या तुमच्या कवीवर,
समजावून घ्या आधी
या तुमच्या मुनीला, तुमच्या वनवासी कवीला
या ऊर्मिलेवर जो अन्याय झाला
तो कलेतील न्यायामुळे
कारण ऊर्मिलेचं अस्तित्व
रामायणात अनावश्यक होतं पुढे
आणि तुझ्यावर जो अन्याय घडला
तो ज्या काळात व ज्या परिस्थितीत
मी जगत होतो
त्यांच्या दडपणामुळे

कवीला द्रष्टा म्हणतात खरं,
परंतु द्रष्टाही
फार पुढे जाऊ शकत नाही
आपल्या काळाच्या
हा काळही मोठा बहुरूपी आहे
स्वत: पुढे धावतो अन्
कवीला मागे खेचतो!

ऊर्मिला- महामुने, मनीषी कवे, हे उत्तर
समाधानकारक नाही
परिस्थितीवर, काळावर मात करून
द्रष्ट्या कवीनं मार्ग दाखवला पाहिजे
उज्वल भविष्याचा
अंधारात चाचपडणाऱ्या
मानवतेला

शंबूक- अन्यायाचं निर्दालन
दलित-पीडितांचं पुनर्वसन, पुनरूत्थान
केलं पाहिजे कवीच्या प्रतिभावंत वाणीनं
नाहीतर काय उपयोग
त्याच्या द्रष्टेपणाचा
त्याच्या उर्जस्वल प्रतिभेचा

वाल्मिकी- तुम्ही एका विचारवंताच्या
तत्वप्रणालीच्या, प्रचारकाच्या
दृष्टीकोनातून बघत आहात,
एका विचारप्रणालीचा आग्रह धरीत आहात
एका सांप्रदायाची सक्ती करीत आहात
परंतु असं करता येत नाही
कवी-कलावंताना
तो फुलाचं रूप पाहतो, सुगंध अनुभवतो
आणि सौदर्यांच्या आनंदाचा शोध घेतो
परंतु त्यासाठी वेगळ्या वेगळ्या करीत नाही
तोडून, चुरगाळून त्याच्या पाकळ्या,
पटणार नाही हे तुम्हाला
पण स्वच्छंद स्वतंत्र कलेलाही
नियम असतात
मर्यादा असतात प्रतिभावंतालाही

ऊर्मिला- कलावंतावर आम्ही
सक्ती करू शकत नाही, परंतु तुम्हीही
हे मान्य कराल, प्रकाशाला रोधू शकत नाही
कुठलाही अंधार

दिशातला वा मनातला

वाल्मिकी- आभारी आहे मी
तुमच्या सौजन्याचा, सुजाणपणाचा
पण त्याबरोबर तुम्ही ऐकावे
कवीचेही मनोगत
त्याच्या आंतर कथा-व्यथा
आणि मग बोला, वत्सांनो,
माझं रामायण म्हणजे
कोणा राजाचं किंवा रामाचं
चरित्र नाही, इतिहास नाही
ती करूण कहाणी आहे मानवी जीवनाची
व्यथा आहे त्याच्या दु:खाची
ती कहाणी आहे
एका अनादी क्रूर व्याधाची
व्यथा आहे
असावधपणे अचानक सुटलेल्या
एका अलक्ष्य बाणानी
विरही विद्ध क्रौंच-पक्षीयुगुलाची
अजाणता होतो मी बाण त्या निषादाचा
कठीण नियतीचा
राम आणि सीता होतात व्यथा-विलाप
पक्षीयुगुलाचा, आक्रोश एका
अनादी, अनंत
विरही प्रेमाची, एक गाथा
कालाधीन अनपेक्षित दु:खी
जीवनाची, कथा एका
नियतीने बद्ध झालेल्या,
श्लोकरूपाने अवतरलेल्या
एका शोकाची
दु:खपर्यवसायी काव्य दोन आत्म्यांचं
जे सापडले दोन परस्परविरोधी
उच्छृंखल खळाळत्या प्रवाहात,
ज्याचे उगम नाहीत
ज्यांचे विसर्जनही दिसत नाही
तीरहीन सागरात
आकाशाला ग्रासणाऱ्या असीमाला
काळाच्या
जो भेटला रामचन्द्राला
अनपेक्षितपणे कालशक्तीच्या रूपात,

ऊर्मिला- मुनिवर, तुमचं प्रवचन
सुंदर आहे पण अगम्य
आकाशावरील नक्षत्रांकित
अधोरेखितांप्रमाणे

वाल्मिकी- ही अधोरेखिते ज्याला टिपता येतात
त्यालाच द्रष्टा म्हणतात
पण त्याला देखील ती स्पष्ट दिसत नाहीत
त्याभोवती जमलेलं असंत धुकं
अबोध जाणिवांचं, त्यांच्या संचिताचं,
म्हणूनच सुखाचे राजविलास
जीवनातले जयापजय
ऐश्वर्ये मूर्धाभिषिकं विजयाची
गीते विरहमीलनाची,
जखमा फुलांना झालेल्या
गीतमाधुर्याने माखलेल्या
अपूर्ण तरी अपूर्व सौंदर्यदर्शने
अनुभवाला येणारी
अनुभूतीपणाने
अंती सारे सारे मिळणारे मातीला
मातीतून उगवणाऱ्या फुलासारखे
भूमिकन्या सीतेसारखे.

ऊर्मिला- जे वारूळ वाढले होते महामुने
सहस्त्र वर्षाच्या तपाचे
त्या मातीचे शब्द आहेत हे,
की तपस्वी दार्शनिकाचे ?
सूर नाहीत आत्ममग्न नारदाच्या
वीणावादनाचे, आनंदमय आलाप त्याचे
ते अर्थ आहेत अश्रुसिक्त मृण्मयाचे
यात परिमार्जन नाही अन्यायाचे
अतिरेक आहे, वेडा आटापिटा आहे
अफाट अशक्य मूल्य जपण्याचा
त्या ध्येयाच्या ध्यानभूमीत,
जिथे मूल्ये होतात अर्थहीन
जीवनात,
आणि माणसे धावतात विजनात
अंध होऊन आपल्याच अहंकाराने

वाल्मिकी- बेटी, तू म्हणतेस त्यात
बरेच तथ्य आहे
पण ते अर्धसत्य आहे

मातीचे शहाणपण मी विसरलो नाही
डोक्यावरील वारूळ झडून गेले तरी
जे जीवन आपण भोगतो अनुभव स्वरूपात
त्याच्या क्षणभंगूर फेसाळ लहरीवर
आनंदाचे सोने चमकते
आकाशातील सूर्यकिरणांच्या प्रभेमुळे, की
आकाशाच्या आनील अथांग रंगामुळे ?
तसेच या रामायणाचे आहे,
कुणी म्हणतात हा संघर्ष आहे
आर्य–अनार्यांचा, हे आक्रमण आहे,
सांगतात कुणी, कृषिप्रधान संस्कृतीचे
वन्य संस्कृतीवर दक्षिणेतल्या.
तर कुणी बोलतात हा संग्राम आहे
क्षुब्ध झालेल्या रघुवीर रामांचा
त्रिभुवनाला त्रस्त करणाऱ्या जुलुमी रावणाशी,
संग्राम
न्यायाचा अन्यायाशी
सत्याचा असत्याशी
तेजाचा तिमिराशी, आणि–
तू म्हणशील–

ऊर्मिला– होय, मी म्हणते अन्यायाचा आतंक आहे हा
दीन दुर्बल स्त्री जातीवर
हा अहंकार आहे पुरूषी पराक्रमाचा
प्रतिष्ठेच्या काठ्यांवर उभारलेला
स्त्रीच्या अबोल सहनशक्तीत रूजलेला

शंबूक– मी म्हणतो जुलूम सवर्णांचा
तथाकथित नीचवर्णियांवर
धर्माचा माणुसकीवर
सत्तेचा सत्ताहीनांवर

वाल्मिकी– बाळांनो, तुम्हा सर्वांचेच म्हणणे
खरे आहे एका मर्यादेपर्यंत
पण तेवढेच सत्य नव्हे
मर्यादा आहेत त्याला,
म्हणून या भिंती पाडण्यासाठी
झगडणाऱ्या रामचंद्राला
पुरूषोत्तम म्हणतात, कारणं
त्यालाही मर्यादा होत्या
हे जाणले होते त्याने
जशा तुम्हाला आहेत

तुमच्या अन्वयार्थाला आहेत
काव्याच्या, जीवनाच्या
आजन्म विरहदु:खात
तळमळणारा राम थांबला
आपल्या वाटचालीत
नियतीच्या सीमेवर
अंतर्धान पावताच सीता भूमीत!
लक्ष्मण बसला प्रायोपवेशनाला
आपल्या सेवाव्रताची भीषण शोकांतिका बघत
अगतिकतेने,
आणि रामायणभर मूक राहिलेली ऊर्मिला
झाली वाणीची दाहक ज्वाला
सत्यासत्य जाळणारी
ओले सुके सगळ्यांचेच भस्म करणारी

ऊर्मिला- मग उरले काय महाकवे?

वाल्मिकी- उरले जीवन,
त्याहूनही सुंदर काव्य
त्या काव्याचे गायन करणारा
वाल्मिकी मुनी, एक निषाद
क्रौंच पक्षाचे क्रंदन ऐकणारा
आपल्या पापाची वारूळे डोक्यावर वागवणारा
राम थांबले तिथेच काव्य थांबले
एक अनादी अनंत वेदना होऊन
मानवी जीवनाची
क्षणभंगुर दु:खमग्न धरणीची
तरीही माझी भावना आहे
शोक होवू नये श्लोकांचा, उलट
रचावा श्लोक त्या शोकाचा
फुलासारखा फुलणारा
नक्षत्रासारखा तळपणारा
शब्दांच्या डहाळीवर,
उद्याच्या कवे
तुझ्या अजात काव्यासाठी!
लक्ष्मणा, तू असा स्तब्ध का
केव्हापासून?

लक्ष्मण: (रागाने) क्षमा करा महामुने
किंवा आदिकवे-जे काय असेल ते
या अज्ञात बालकाला
हे फसवे शब्दजाल काव्याचे

मान्य नाही, लक्ष्मणाला
ध्येयाच्या, सत्याच्या, असिधारेवर
चालणाऱ्या ध्येंयवाद्याला,
युयुत्सू क्षत्रियाला

वाल्मिकी– माझे श्लोकही थांबले
शोकरूप होऊन,
आता उगवतील आनंदाची फुले
कुश लवाच्या गायनाने, त्यातून
या गोदावरीच्या तीरावर, जिथे
स्फुरला श्लोक एका रानटी निषादाचा
क्रौंचपक्षिणीला जखमी करणाऱ्या
व्याधाच्या बाणाचा
त्या बालकांच्या कोवळ्या स्वरवेलीवर
फुलांनी झाकलेल्या धरणीच्या व्रणावर
नादतील फिरून माझे श्लोक
फडफडाट, तडफडाट
त्या क्रौंच पक्षाचे
टणत्कार एकबाणी रामाच्या धनुष्याचे
सीतेचे सूर करूण–मधुर विराणीचे
गात राहू द्या या लवकुशांना
उद्याच्या वैतालिकांना
ढाळू द्या अश्रु
सहृदय, रसिकांना

लक्ष्मण– हे सारे असह्य आहे
पुरे झाले राहणे
असत्याने काळवंडणाऱ्या
या काव्याच्या नंदनवनात
भ्रमिष्ठांच्या,
निघालो मी निजधामाला
क्षीरसागराला,
अर्थ नाही उरला आता माझ्या निर्वसनात
वा प्रायोपवेशनात
विस्कटला सारा अर्थ जीवनाचा
त्यातील मूल्यांचा
जगणे आणि मरणे
दोन्ही होतात जिथे
अर्थहीन
चाललो मी सहस्त्रमुख शेष होऊन
निजरूपात

फूत्कारत, वेटाळत
कृतान्त काळाच्या वेगाने
सावरण्यासाठी या धरणीची दु:खे
आपल्या मस्तकावर
श्रीराम पुढे गेले आहेत
बहुधा कंटाळून माझ्यासारखेच
आपल्या रामावताराला
सत्ययुगाचा अंत पाहून
ही पृथ्वी पातकी दु:खी पंकिल
कशीही असली तरि
तिचे पालन करण्यात
तिला धनधान्यसंपन्न बनवण्यात
तिला कंटकहीन राखण्यात
माझा आनंद आहे
माझे काव्य आहे

ऊर्मिला– महाराज लक्ष्मणांना मी
नमस्कार करते,
क्षमा करा मला
माझ्या कठोर अनाधिकारी भाषणाबद्दल
माझ्या दु:खाच्या आवेगात
एकटे राहणे हीच माझी नियती आहे
कळले मला

लक्ष्मण– तुला कशाला क्षमा
क्षमाच आहेस तू
घटकेत हिरव्यागार शेतासारखी
हसणारी,
ज्वालामुखीसारखी पेटणारी,
धरा कंपनात
मी असा उतावळा रांगडा धनुर्धारी
जन्मलो ना ?
आता राहिला नाही
शांतविणारा, धीर देणारा
तो दयामय हात रामचंद्राचा
तूं प्रलयांकिता, कापत रहा
क्रोधाने थरथरत रहा
या मानवतेच्या, नियतीच्या पुत्रांवर !
माझ्या क्रोधांगार सहवासात
कधीच लागलं नाही
सुख तुला

तूच क्षमा कर मला

(प्रवेशांतर)

जलद सूर वाद्यांचे

शरयू- वास्तुपुरूषा, बाजूला हो
सरक मार्गातून
हा शेषनाग निघाला आहे
क्षीरसागराकडे
जाळीत आसमंत आपल्या फुत्काराने
आकाश वितळते आहे
पृथ्वी डळमळते आहे
त्याच्या घन-विद्युत् वेगाने
पहा धगधगत आहेत त्याचे डोळे
कल्पांतीच्या खदिरांगारासारखे
तर कधी पाताळातील रत्नमण्यांसारखे
हो, बाजूला हो, सांभाळ स्वत:ला
या अग्नीच्या लोळापासून

वा.पु.: शरयू, काळजी करू नकोस
त्याच्या विक्राळ केसाळ
शेपटीच्या पहिल्याच आघाताने
कोसळलो आहे मी कधीच
भूकंपात कोसळणाऱ्या स्तंभांप्रमाणे
संपले माझे कंटाळवाणे
उभे राहणे
कदाचित याचीच वाट बघत होतो
हे अखेरचे दंडवत
त्या श्रीरामप्रभुला

(प्रवेशानंतर- वाद्यांचे सूर आवेगपूर्ण)

धनंजय- धावा, धावा, मेलो- मेलो
केवढा हा प्रचंड नाग
या तुरूंगाच्या कोठडीत! बापरे
मेलो-धावा-वाचवा,
दया करा या गरीब कैद्यावर
गुन्हेगार नाही मी तसा
आणि असलो तरी
लोटू नका या महासर्पाच्या मुखात
कायद्यानें शिक्षा द्या
गुन्हेगार ठरलो तर अशी शिक्षा
कुठल्याच कायद्यात नाही हो
लोटू नका काळसर्पाच्या मुखांत

आणि हे काय–बापरे
हे काय फिरते आहे डोक्यावर ?
मेलो–भयानक मुंडके जिवंत !
आणि तेही धडाशिवाय
रक्त ठिबकते आहे त्यातून !
आत्ताच कापलेले दिसते आहे
अगदी ताजे !
गरगरते आहे अधांतरी !–
काय भुताटकी आहे ही !
वाचवा वाचवा या भयानक संकटातून
धावा–धावा कुणीतरी

ऊर्मिला– (प्रवेशून)– काय ! झालं काय
असं किंचाळायला
कशाला ओरडताय उगीच–
घाबरता कशाला ?
मी आलेय ना ?

धनंजय– कोण ? ऊर्मिला वहिनी ?
झालं भरली आता शंभरवर्ष !
तू कशाला आलीस इथं ?
नाही तू ऊर्मिला नाहीस–

ऊर्मिला– अहो मी ऊर्मिलाच आहे
तुमची वहिनी–
चांगले डोळे उघून पहा– जागे व्हा झोपेतून
खसाखसा, चांगले डोळे धुवा आधी
मग पहा– ऊर्मिलाच आहे मी.

धनंजय– तू ऊर्मिला ! मग ती कोण होती ?
कुठे गेली ती दुसरी ऊर्मिला ?
ती राजकन्या होती
कसलं दैवी तेज झळकत होतं
तिच्या मुखावर !
ती तपस्विनी होती
राजकन्या सूर्यकुलाची
स्नुषा रघुकुलाची
पत्नी लक्ष्मणाची
सुवर्णदेहिनी मानिनी
मुखावर तेज चंद्राचे, अन्
जमीनवर लोळणारा पदर
भर्जरी, सळसळणारा विजेप्रमाणे
कुठे गेली ती

दुसरी ऊर्मिला ?
तिच्यासमोर नू नुसती
बाहुली दिसतेस सावळी खुळी–

ऊर्मिला– काय बडबडताय ? ऊर्मिलाच मी
स्वप्न पडलं की काय झोपेत ?
शुद्धीवर या

धनंजय– अहा हा ! काय ते शब्द
काय तो आवाज
काय वाक्‌ताडन करीत होती ती लक्ष्मणाला
लक्ष्मणही धिप्पाड, ताडमाड उंच
गौर देह, आकर्ण नेत्र
पाठीशी धनुष्य
हातात तळपते बाण
पण ती जाम भीत नव्हती त्याला
त्याच्या रक्तरंजित लालकमळाच्या डोळ्यांना
त्याच्या काळ्या केसाळ भुवयांना
फूत्कारत्या उष्ण श्वासाना
शेवटी तोच घाबरून पळाला
ती अन्तर्धान पावली ढगातल्या चपलेप्रमाणे
कुठे गेली ती ऊर्मिला ? ती दुसरी ?
तो फूत्कारत निघाला
काळसर्प होऊन
फुफाटत, आग ओकीत
सहस्त्रफणांनी ?

ऊर्मिला– असं काय बरळताय काहीतरी
मला बाई भीति वाटतेय
तुमच्या बोलण्याची, घाबरण्याची
भयंकर स्वप्न का
पंडलं तुम्हाला ?
तारवटलेले डोळे
थरथरते घामेजले अंग
काय झालंय तुम्हाला ?
नीट सांगा, भीतीनं
प्राण जातोय माझा
सांगा हो, स्वप्न पडलं का भयंकर ?

धनंजय– अग स्वप्न कसलं ?
खरं होतं सगळं !
पण तू कशाला आलीस इथं
तुझ्यापेक्षा काळसर्प बरा तो

एकदम गिळून टाकील मला
सुटेन एकदाचा,
या तुझ्या तुरूंगाच्या शिक्षेतून
तूच आणून डांबलस मला
या कैदेत, आता पुन्हा कशाला आलीस ?

ऊर्मिला– अहो धनंजय, तेच सांगतेय मी
पण तुम्ही ऐकतच नाही

धनंजय– काय ऐकायचंय ? किती शिक्षा झाली
हेच ना ?
पण मी नाही जाळलं तिला
खोटं आहे ते– मी सांगतोय –खोटी
आहे तुझी समजूत

ऊर्मिला– अहो धनंजय, तेच सांगण्याचा
यत्न करतेय मी तेव्हापासून
पण तुम्ही ऐकलंच नाही–
अहो निर्दोष सुटलात तुम्ही
जळिताच्या आरोपातून

धनंजय– काय, मी निर्दोष सुटलो
परेश्वरा किती उपकार तुझे !

ऊर्मिला– व्यर्थ होता माझा संशय
मीच चांडाळीण– वाटलं
तुमचीच फूस (हुंदका)

धनंजय– मग मी का सांगत होतो तुला
घरी आलो ऑफिसातून
आणि अटक केली मला
पोलिसांनी– अन् संशयानं,
तुझी वाचा बंद– त्यांनी
डांबून टाकलं मला इथे आणून
या तुरूंगात

ऊर्मिला– इथं कुठं आहे तुरूंग
हा तर तुमचाच पलंग

धनंजय– निर्दोष सुटलो ना मी
मग चलायचं का इथून
नको नको हा भयाण तुरूंग
लवकर घेऊन चल इथून
वहिनी, आधी जरा नीट बघ
तो सर्प तर नाही कुठे
घरात दडून ?

ऊर्मिला– त्या सर्पाचं वेड
काढून टाका बघू डोक्यातून
नीट शुद्धीवर आलात ना
इथं कुठे आहे तुरूंग
हे तुमचं घर आहे घर–
हा तुमचाच पलंग–
कसलं दुष्ट स्वप्न ते
किती घाबरून टाकलेत मला
आणि हे काय उशाला ?
कसलं तरी खंडकाव्य दिसतंय
हेच वाचत होता मी गेल्यावर ?
कसलं भयंकर लिहितात हे कवी !
ते आपले समीक्षक– काय त्यांचं नांव–
जटाशंकर
समींदर–वाडीचे
तेही असंच म्हणतात
कवी म्हणजे बालीश
नुसते बालीशच नाहीत
तर दु:स्वप्न भयंकर !
वाचाल काव्य आता ?

धनंजय– छे, छे, काव्याचं नाव नाही काढणार
वाटल्यास अंकलिपी वाचीन
वाल्मिकीपासून
ज्ञात–अज्ञात साऱ्या कवींना
स्मरून सांगतो, काव्य बंद यापुढे,
अगदी तुझी शपथ वहिनी,
पण आधी चल इथून

ऊर्मिला– कुठं जायचं इथून, घर सोडून ?
आलात ना बाहेर स्वप्नातून ?
मग बसा पेशन्स खेळत
मी चहा टाकते जाऊन.....चांगला कडक
मांझंही डोकं चढलंय
तुमची बडबड ऐकून
आता येतील सर्व कोर्टातून
बाईही येतील इस्पितळातून परत
आठ दहा दिवसात.
संकट टळलं जिवावरचं आणि कोसळलं माझ्यावर
तुमच्या स्वप्नरूपानं ....चला शुद्धीवर आलात ना चांगले ?
थोडा चहा घ्या, बरं वाटेल.

कांतांच्या काही अखेरच्या कविता

एन ४०३४---४४

दिन मावळता

दिन मावळता
मनात येते काही काही सांज समीरण भणभणता

आर्त प्रार्थनेतील हूंदका थंड गोपूरी अडखळता
दहिंवर होतो सूर सनईचा पिंपळपानी डळमळता
दिन मावळता

कधि स्मरे जळ गोदावरीचे फिकट चांदणे झूळझूळता
नाचे कंचनी अजिंठ्यातली नीळ डोंगरी थरथरता
दिन मावळता

गाय हंबरे दाण्यासाठी थनात पान्हा तटतटता
दिव्यामनी तारांगण फुलते तुळशीपाशी मिणमिणता
दिन मावळता.

शब्दच गळती देठांपासूनी गीत तुझे रचता रचता
कां रे चाफ्या पाने झडती फुले डहाळीत फुलता फुलता
दिन मावळता

कल्पतरूची डहाळी

कल्पतरूची आज डहाळी झूलली माझ्या शिरी
सख्यांनो, तुम्ही आला हो घरी

शब्द अश्रूंनी जड भिजलेले
ओल्या नयनी हास्य उमलले
शब्दही अर्थाशी अडखळले
जन्माचे संवाद चालती परि मौनाच्या तिरी
सख्यांनो तुम्ही आला हो घरी

आनंदाची खिल्लारे किति
गोकुळातले नाच नाचती
गाते राधा कदंब तळवटी
स्मृति वृंदावनी दूर वाजते कुंजातूनी बासरी
सख्यांनो तुम्ही आला हो घरी

आनंदाच्या विहगा शोधीत
जन्म हिंडले राने तुडवित
स्पर्श सुखद हे येती सांगत
आनंदाच्या लाख पिसांचे स्पर्श गोड अंतरी.. सख्यांनो तुम्ही आलो हो घरी..

विंचरीत केस

विंचरीत केस जरा तूं उभी रहा
फिरवी फणी हळूं सजणे
गुंती असतील मने
क्षण तिरपे, कुरळातुनि वळूनिया पहा

निमगोऱ्या पाठीहूनि
नाग निघे सळसळूनी
चंदनात विसरूनी परि दंश झूलत हा

आनितंब कच काळे
मरण जीवनी लोळे
स्मित वर्षत जहराने जीववी गृहा

विंचरीत केस जरा तुं उभी रहा

मृत्युपत्र

अंतकाळि मजजवळ नसावी आप्तजनांची छाया
नकोत कोणी मित्र –सखेही शोकाश्रू ढाळाया
फुले साजिरी समोर असु द्या खिडकीमधि हसणारी
उन्हे, येऊ द्या सदने वदने गगने उजळविणारी
किरणांच्या पालखीत बसुनी दिंगतात जाईन
सूर्यासनिच्या महातेजसा छायेपरि वंदीन
पवनभोवरे वाहटुळीचे उंच नभी उठतील
तनकाड्या मनमाड्या त्यातुन सनकाड्या उडतील
अरूणतरुणसे कोंभ नवे मग तुटतिल श्वासोच्छ्वासी
विश्वसतिल कविता त्यातुन शब्द जसे आकाशी
चैतन्याची आनंदाची इतुकी पुरे मिरास
पैल पृथ्वीच्या जाता जाता, ती अर्पिन तुम्हास
शब्द –सुर ओलांडोनी
स्वर्गंगा तीराहूनी
मी करिन तुम्हा विनवणी
कुठेही गेलो नक्षत्रांच्या जरी दूर देशात
तरूवेलीपरि जपेन आंतर–बहर शुष्क शाखांत
फुलेल कधितरी कविता, फिरूनी तप्त दग्ध हृदयात
आत्म्याचा कधि वसंत येता फुलावया गाण्यात

रिक्त

१

या शालीवर जाऊ नका
विरक्त नाही मी,
रिक्तच आहे
पहा! या शालीच्या रेशमी घडीत
फुलत आहेत प्रणयरंग
आत्ताच इथून गेलेल्या "गुलाबीचे"
नि:संकोचपणे
रिक्त विरही रात्रीच्या जागरणाप्रमाणे
उषेच्या अनासक्त रक्तिमेप्रमाणे
वेचणारे पूर्वेच्या परडीत
फुलांचे मार्दव
दंव मध्यरात्रीचे
राधेने न टिपलेल्या आसवांसारखे
कुणी पाहिलेले, कुणी न पाहिलेले
आळिव डोळे आर्द्र झाल्यामुळे
हेच ओले क्षण ठिबकता
"पूर्वे"च्या स्वरांत कुणा गायिकेच्या
प्रमाथी प्रमाथी

२

रिक्तंच आहे की
मखमली अंधारासारखा
जरी आकाश नक्षत्रांनी फुलते आहे
हसते आहे बालकाच्या ओठावरील
अपूट हास्यासारखे
जे अजून नासले नाही
या दुनियेच्या दुपारझळ्यांनी
तापून भांड्यात, मनात

३

खरंच मी रिक्त आहे
कन्याकुमारीच्या काठावरल्या
अरूण तरूण सागरिकेप्रमाणे दक्षिणेतल्या
जी रितीच राहते सदा
उगवता सूर्य
मावळता चंद्र

दोन्ही कवळून
क्षितिजाच्या लांब लांब बाहूत
स्पंदन मंथर त्यांच्या सुरंगी बिलोर मिठीत
तृषार्त, अपार आक्रोशात
गगनातील लाटात
अनादी सकाळच्या

४.
ओळखलेत तुम्ही विरक्त नाही मी
रिक्तच आहे मी
संतप्त भृगुच्या
कोपिष्ठ दुर्वासाच्या
रित्या झोळ्या घेऊन
लक्ष्मीच्या आणि द्रौपदीच्या
दारासमोर

५
पाहिलीत ही माझी भगवी वस्त्रे
ज्यातल्या धौत गुलाबी रंगात
उमलतात लाखो गुलाब
ज्यांचा प्रणयरंग
फिकटत नाही कधीच
राधेच्या जागलेल्या डोळ्यातील लालिमेला
घृणा वाटते मला या भगव्या वस्त्रांची
जी वासना झाकण्याचे कार्य करतात
कधीच उजळत नाहीत
नि:संकोचपणे वा संकोचाने
उषेच्या रक्तिमेप्रमाणे
वेचीत पूर्वेच्या परडीत
फुलांचे मार्दव
सकाळचे दंव
राधेने पुसलेल्या
पण कुणी न पाहिलेले
अश्रू–
आपल्या रेशमी पदरात
ज्यात झुंजमुंजत असतात
संध्या रंगाच्या काठाने
अलक्ष्य क्षण
चारी युगांचे

कुणा गायकाच्या "पूर्वाच्या" स्वरात
सावकाश झुलत असतात
हिरव्या जांभळ्या तुळशीमंजिऱ्यांप्रमाणे
दंवस्नान
अन्
उभा आहे मी रिक्त
पूर्ण होऊ पाहणाऱ्या
आश्वासनात
सकाळशीतल झुळुकांच्या
झुंजुकी त्यात
लाल सूर्यबिंबात क्षितिजाशी
ज्याला अजून किरणे
फुटलेली नसतात

शंभर वर्षानंतर

दिव्याचे तेज डोळ्यांचे वेज कोण तिथे जाळीत आहे
शंभर वर्षानंतर कोण माझी कविता वाचीत आहे ?

माझी उन्हे मावळली आहेत
माझी फुले कोमेजली आहेत
कालचा प्रकाश कालचा सुवास मात्रा वेलांटीत शोधीत आहे
शंभर वर्षानंतर कोण माझी कविता वाचीत आहे ?

इथे देवांचे दगडच बनले
ध्येयच दु:ख होऊन राहिले
आकार उकारात हरवलेला ओंकार मी माझ्या मरणात भोगीत आहे
शंभर वर्षानंतर कोण माझी कविता वाचीत आहे ?

नको ! माझी कविता वाचू नका
शब्दात मला बांधू नका
ओझे घेऊन चालू किती ? वाटच घराला लोटीत आहे
शंभर वर्षानंतर कोण माझी कविता वाचीत आहे ?

आजची फुले आजच्या उन्हात
पाखरांचा शब्द पिकला रानात
माझी कविता तिथे वाचा जिथे ती दिनरात घडत आहे
शंभर वर्षानंतर कोण माझी कविता वाचीत आहे ?

पुरस्कार

(शा.म.मु.) एन ४०३४---४५ (११००--९-२०१७)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मराठीतील वाङ्मयनिर्मितीला राज्य पुरस्कार

१९७७-७८

हा पुरस्कार

श्री. ..... वा. रा. कान्त ..... यांना

..... प्रौढ ..... वाङ्मय विभागात ..... काव्य .....
(कवि केशवसुत पारितोषिक)

लेखन प्रकारातील स्पर्धेसाठी आलेल्या

पुस्तकांपैकी उत्कृष्ट ठरलेल्या

..... मरणगंध ..... या

पुस्तकासाठी देण्यात येत आहे.

सचिव
शिक्षण विभाग

शिक्षण विभाग

मुंबई

दिनांक १७-३-१९८०

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मराठीतील वाङ्मयनिर्मितीला राज्य पुरस्कार

१९८०-८१

हा पुरस्कार

श्री. वा. रा. कान्त यांना

प्रौढ वाङ्मय विभागात काव्य
(कवि केशवसुत पारितोषिक)

लेखन प्रकाशतील स्पर्धेसाठी आलेल्या

पुस्तकांपैकी उत्कृष्ट ठरलेल्या

दोनुली या

पुस्तकासाठी देण्यात येत आहे.

शिक्षण मंत्री

मुंबई

दिनांक २४-३-१९८४

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मराठीतील वाङ्मयनिर्मितीला
राज्य पुरस्कार

१९८९-९०

हा पुरस्कार

श्री. कै. वा. रा. कान्त यांना

प्रौढ वाङ्मय विभागात काव्य (कवी केशवसुत व गोलकवी पुरस्कार)

लेखन प्रकारातील स्पर्धेसाठी आलेल्या

पुस्तकांपैकी उत्कृष्ट ठरलेल्या

मावळते शब्द या

पुस्तकासाठी देण्यात येत आहे.

शिक्षण मंत्री

मुंबई
दिनांक १-
५/३/९२

जीवनपट व साहित्यसंपदा

कविवर्य कै. वा.रा. कांत
जीवनपट व साहित्यसंपदा

जन्म: ६ ऑक्टोंबर १९१३, नांदेड

पूर्ण नाव: वामन रामराव कांत

लेखक / कवी नात्याने घेतलेली टोपण नावे: रसाळ वामन, अभिजित

शिक्षण: प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नांदेड येथे. १९३१ साली हैदराबाद येथे इंटरपर्यंत झालेले शिक्षण सोडावे लागले.

विवाह: १९३० सौ. लक्ष्मीबाई- पूर्वाश्रमीच्या गंगूबाई कुर्डूकर.

पत्नीचे निधन-१९६५

नोकरी: व्यवसाय

१) 'विहंगमाला' या नियतकालिकाचे संपादन (१९२८), तसेच 'विहंग' प्रेसचे व्यवस्थापन.

२) निजाम सरकारच्या शेतकी खात्यात लिपिक म्हणून नोकरी (१९३३-४५)

३) निजाम सरकारच्याच आकाशवाणी हैदराबाद व औरंगाबाद येथील केंद्रांत मराठी विभागप्रमुख (१९४५-६०)

४) भारतीय आकाशवाणीच्या विविध केंद्रांवर मराठी विभागप्रमुख (१९६०-७०)

५) आकाशवाणी मुंबई केंद्रावरून सेवानिवृत्त (१९७०)

६) मृत्यू: ८ सप्टेंबर १९९१

काव्यलेखन:

१) १९२५ काव्यलेखनास प्रारंभ

२) १९२८ 'मंदारमाला' मध्ये पहिली कविता बाई कलिके या शीर्षकाने प्रसिद्ध

३) १९३० 'पहाटतारा' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित (प्रकाशक: विचारविहार मंडळ, नांदेड)

४) १९३३ 'फटत्कार' कवितासंग्रह (प्रकाशक: विचारविहार मंडळ, नांदेड)

५) १९४७ 'रूद्रवीणा' कवितासंग्रह (प्रकाशक: प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद)

६) १९५० 'शततारका' कवितासंग्रह (प्रकाशक: ध्रुव प्रकाशन, परभणी)

७) १९६२ 'वेलांटी' कवितासंग्रह (प्रकाशक: मौज प्रकाशन, मुंबई)

८) १९६५ 'वाजली विजेची टाळी' (प्रकाशक: मौज प्रकाशन, मुंबई)

९) १९७६ 'मरणगंध' नाट्यकाव्य (प्रकाशक: कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे)

१०) १९७९ 'दोनुली' कविता संग्रह (प्रकाशक: मौज प्रकाशन, मुंबई)

११) १९८८ 'मावळते शब्द' कवितासंग्रह (प्रकाशक: मौज प्रकाशन, मुंबई)

१२) २०१० 'बगळ्यांची माळ' भावगीतसंग्रह (गार्गीज् प्रकाशन, वसई)

अनुवादित साहित्य प्रकाशन

१) १९७१ 'सुलताना रझिया' डॉ. रफिक झकेरिया यांच्या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद

२) १९७५ 'मनुष्याची रूपं' श्री. यशपाल शर्मा यांच्या हिंदी कादंबरीचा अनुवाद (प्रकाशक: नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली)

३) १९७६ 'कालचे लखनौ' मौलाना अब्दुल हलीम 'शर्र' यांच्या उर्दू कादंबरीचा अनुवाद (प्रकाशक: नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली)

४) १९८० 'मिर्जा गालिब'- चरित्र व काव्य श्री. हैदर यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद (प्रकाशक: साहित्य अकादमी, दिल्ली)

५) १९८१ 'वेमना' श्री व्ही. आर. नार्ला यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद (प्रकाशक: साहित्य अकादमी, दिल्ली)

६) १९८७ 'एक चादर मैली सी' डॉ. राजेंद्रसिंह बेदी यांच्या कादंबरीचा अनुवाद (प्रकाशक: विमल प्रकाशन पुणे) पून:प्रकाशन २०१० (गार्गीज् प्रकाशन मुंबई)

७) २०१० 'मध्यस्थ' श्री ए.डी. गोरवाला यांच्या कादंबरीचा अनुवाद (प्रकाशन: गार्गीज् प्रकाशन, वसई)

८) 'कागद आणि कॅन्व्हास' श्रीमती अमृता प्रीतम यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद (दुसऱ्याच एका कवयित्रीनं श्रीमती अमृता प्रीतम यांच्याकडून अनुवाद हक्क घेऊन कवितासंग्रह प्रसिद्ध करून टाकल्यामुळे हा अनुवाद हस्तलिखित स्वरूपात)

९) शोक सांबर झालेल्या मुलाचा: 'अज्ञाताच्या दाराशी' फेरेन्स जूहास या हंगोरियन कवीच्या 'The boy changed into a stag clamours at the gate of secrets' या दीर्घकाव्याचा अनुवाद (अप्रकाशित)

१०) 'मै हूं अपनी शिकस्तकी आवाज' मिर्जा गालिब यांच्या मूळ उर्दू निवडक गजलांचा अनुवाद (प्रकाशन: मौज, दिवाळी अंक, १९७८)

११) 'मालिनी' डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या नाट्यकाव्याचा अनुवाद (प्रकाशन : साधना: रवींद्र शताब्दी विशेषांक, १९६१)

१२) श्री. गजानन मुक्तिबोध यांच्या निवडक कवितांचा अनुवाद (प्रकाशक: पंचधारा हैदराबाद)

नाट्यकाव्य लेखन

१) दुमार –दीपावली, दिवाळी अंक १९६७

२) पाषाणावरील तीळ- इंद्रधनू, दिवाळी अंक १९८८

३) अंधार सूर्याने पाहिलेला

४) आशिया- युगवाणी, नोव्हेंबर १९४७

५) चुंबन- दीपावली, दिवाळी अंक १९६६

६) बासरी- उत्तम, दिवाळी अंक १९७०

७) सूर्याचे वाळवंट- इंद्रधनू, दिवाळी अंक १९८७

८) अग्निपथ

आकाशवाणी केंद्रावर गाजलेली नाट्यकाव्ये

१) हवन
२) मुक्तीच्या बेड्या
३) लागा चुनरी में दाग
४) विसर्जन
५) बनारसची सकाळ
६) भस्मासुर मोहिनी
७) रूपमती– संगीतिका
८) दुल्लही पिया– महाकवी कालिदास यांच्या मालविकाग्निमित्र या नाटकाचे नभोनाट्य

ललित लेखनसंग्रह

१) हरवलेले आकाश २०१० गार्गीज् प्रकाशन, वसई

अप्रकाशित साहित्य

१) 'पराभवाचा शब्द' मिर्जा गालिब यांच्या प्रेमजीवनावर आधारित दोन अंकी स्वतंत्र नाटक
२) 'पाषाणावरील तीळ' नाट्यकाव्यसंग्रह
३) स्फुट कवितासंग्रह (पुस्तक स्वरूपात १०० कविता प्रकाशित होतील एवढी संहिता उपलब्ध)
४) सहज लिहिता लिहिता –ललितलेखसंग्रह)

सन्मान, पुरस्कार इत्यादी

१) १९५३ मराठवाडा साहित्य संमेलनातर्गत कविसंमेलनाचे अध्यक्ष
२) १९६२ मराठवाडा नांदेड कविसंमलेनाचे अध्यक्ष
३) १९६५ परभणी येथील मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष
४) १९६२–६३ 'वेलांटी' काव्यसंग्रहास महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार
५) १९७७–७८ 'मरणगंध' या नाट्यकाव्यास महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार
६) १९७९–८० 'दोनुली' काव्यसंग्रहास महाराष्ट्र राज्याचा केशवसुत पुरस्कार
७) १९८९–९० 'मावळते शब्द' काव्यसंग्रहास महाराष्ट्र राज्याचा केशवसुत पुरस्कार
८) मराठवाडा विद्यापीठातर्फे १९७२/७४ साली मराठी अभ्यासमंडळावर निमंत्रित सल्लागार
९) महाराष्ट्र राज्य शासनातर्फे काही वर्षे विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून सन्मान
१०) महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे तर्फे उत्कृष्ट वाङ्.मयसेवेचा सन्मान १९८८
११) महाराष्ट्र साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैदराबादतर्फे उत्कृष्ट वाङ्.मयसेवेबद्दल सन्मान १९८९
१२) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रदीर्घ वाङ्.मयसेवेबद्दल गौरववृत्ती देऊन सन्मान १९८९
१३) अमृत महोत्सव सत्कार सोहळा १९८८

मृत्यू: ८ सप्टेंबर १९९१ मुंबई येथे

कै. कविवर्य वा.रा.कांत यांच्या इतर प्रकाशित साहित्याची सूची
साहित्य प्रकार ... समीक्षात्मक लेख

क्र.	नियतकालिकाचे नाव	लेखाचे शीर्षक	दिनांक
१	साधना	रंगबावरी–कवितासंग्रह–इंदिरा संत	२ जाने.१९६५
२	लोकसत्ता	महाकवी सावरकर–अनंताचा रथयात्री	१३ जून १९६५
३	लोकसत्ता	अखेरचा रविकिरण–रवींद्रनाथ टागोर	१२ मे १९६८
४	सत्यकथा	संध्याकाळच्या कविता	सप्टें. १९६८
५	महाराष्ट्र टाईम्स	केशवसुत–प्रकाशाची वेदना	२० जाने.१९६९
६	महाराष्ट्र टाईम्स	प्रीतीच्या वाटचालीचा एक धुंद आविष्कार– गीतांजली	१६ ऑगस्ट १९७०
७	महाराष्ट्र टाईम्स	अस्वस्थ युगाची अस्वस्थ कविता अस्वस्थ सूर्यास्त	२५ ऑक्टों. १९७०
८	महाराष्ट्र टाईम्स	ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व–निरामय आनंदाचा शोध	२१ नोव्हें.१९७१
९	महाराष्ट्र टाईम्स	ज्योतीच्या जळत्या वाटेनं वाटचाल करणारी कविता– मनवृंदावन	९ जाने. १९७२
१०	महाराष्ट्र टाईम्स	मराठवाड्याची आजची कविता	१६ जुलै १९७२
११	महाराष्ट्र टाईम्स	अस्तित्वाच्या अपरिहार्यतेचं अटळ भान नवकवितेच्या प्रवासाचे एक पूर्ण आवर्तन– योगभ्रष्ट	१० सप्टें.१९७२
१२	महाराष्ट्र टाईम्स	इंदिरा संत यांची कविता निस्तेज होत आहे	२४ सप्टें.१९७२
१३	सत्यकथा	दिठी–मिठीच्या उत्सवाची कविता– प्रियाळ	मे १९७४
१४	महाराष्ट्र टाईम्स	खांब–एक अमृतानुभव	२४ आक्टो. १९७०
१५	ललित	१९७४ सालातील कविता	एप्रिल १९७५
१६	ललित	१९७५ सालातील कविता	ऑगस्ट १९७५
१७	महाराष्ट्र टाईम्स	ढासळल्या समाजाचं, मनाचं चित्रण करणारे काव्यसंग्रह– अपभ्रंश, कल्लोळ व तृषार्त	३० मार्च १९७५
१८	महाराष्ट्र टाईम्स	प्रेमलहरी व साय: नव्हाळ काव्यसंग्रह	१ जून १९७५
१९	महाराष्ट्र टाईम्स	अभ्र– एक निरभ्र कविता	२४ ऑगस्ट १९७५
२०	नवशक्ती	प्राचीन वाङ्.मयाचा नवा अर्थ	२८ सप्टें. १९७५

क्र.	नियतकालिकाचे नाव	लेखाचे शीर्षक	दिनांक
२१	महाराष्ट्र टाईम्स	नक्षत्राचे देणे: एक अभेद गाणे	२३ नोव्हें.१९७५
२२	महाराष्ट्र टाईम्स	जाहिरनामा: कलात्मकता व बराकरीकरण यांच्या सीमारेषेवरील कविता	११ जुलै १९७६
२३	महाराष्ट्र टाईम्स	तेच आव्हान–तीच माती: एक सुंदर संदर्भग्रंथ	
२४	महाराष्ट्र टाईम्स	परि हरि हा ब्रह्मचारी: लक्षणीय ललित निबंधसंग्रह	
२५	महाराष्ट्र टाईम्स	थँक्यु मिस्टर ग्लाड: निरूत्तराला स्पर्श करणारी कादंबरी	
२६	भाषण	रवीद्रांची नाट्यशल्ये: आकाशवाणी मुंबई	
२७	वसंत मासिक	कट्यारीचे अश्रू: महाकवी गालिब	जून १९६९
२८	महाराष्ट्र टाईम्स	मासिक कविसंमेलन: एक अवलोकन	२७ जून १९७६
२९	भाषण	भारत भारती– मिर्जा गालिब, आकाशवाणी, मुंबई	

ललित लेख

क्र.	नियतकालिकाचे नाव	लेखाचे शीर्षक	दिनांक
१	महाराष्ट्र टाईम्स	महाबळेश्वरी: रंगरेषेच्या पैलतीरी	१५ नोव्हें.१९६४
२	दीपावली	सूर्य वेचणारी कोंबडी	जुलै १९६५
३	लोकसत्ता	कवीच्या दृष्टिकोणातून राजघाट	मार्च १९६८
४	लोकसत्ता	श्री संत नामदेव महाराज यांसी अनावृत पत्र	८ नोव्हें.१९७०
५	महाराष्ट्र टाईम्स	रवींद्रांची नाट्यकाव्ये	४ मे १९६९
६	महाराष्ट्र टाईम्स	आकाश हरवलेली माणसे	१२ नोव्हें.१९७०
७	महाराष्ट्र टाईम्स	स्वामी रामानंदतीर्थ: हैदराबादच्या मुक्ती संग्रामाचा संन्यासी सेनापती	२० जाने.१९७२
८	महाराष्ट्र टाईम्स	एक नक्षी फुटक्या कपबश्यांची	२५ जून १९७२
९	मराठवाडा मित्रमंडळ स्मरणिका	चिंचेच्या पानावर बांधिले देऊळ: कैलास	
१०	दीपावली	कुंतीचा गर्भ	मे १९६५
११	भाषण– आकाशवाणी, मुंबई	आमचा देश, आमची परंपरा: गोदावरी	५ मार्च १९६७
१२	प्रतिष्ठान	आरूणी आणि आरण्यक	मे / जून १९७६
१३	प्रतिष्ठान	कवितेची प्रतीक्षा	सप्टें./आक्टो.१९७६
१४	प्रतिष्ठान	कवितेची प्रतीक्षा	
१५	आकाशवाणी, मुंबई	चार नवे कवी	
१६	मधुघट रसदर्शन प्रतिनिधीक	मग विसर हवा तर क्षण हा गे	
१७	एका पिढीचे आत्मकथन	काव्यविषयक भूमिका	
१८	सत्यकथा	शब्दांनाही वास येतो	जुलै १९६७
१९	राजस	रामराव शिकरवान	फेब्रु.१९७६
२०	लोकसत्ता	नव्या नांदीचे नवे सूत्रधार: मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण	१४ जुलै १९७५
२१	गावकरी	कुसुमाग्रज नावाचे नाशिकचे तीर्थक्षेत्र – कुसुमाग्रज गौरवग्रंथ (अखेरचा इस्पितळात लिहिलेला लेख)	२७ मार्च ९०

टोपणनावाने लिहिलेले ललित लेख

क्र.	नियतकालिकाचे नाव	लेखाचे शीर्षक	दिनांक
१	महाराष्ट्र टाईम्स	लाल नदी, निळे डोंगर–एक प्रत्ययकारी प्रवावर्णन	२१ फेब्रु.१९६५
२	महाराष्ट्र टाईम्स	भोजनभाऊ, वहाटूळ: मिरासदार भालेराव यांचे कथासंग्रह	३ जाने.१९६६
३	महाराष्ट्र टाईम्स	महाकवी टी.एस्. इलियट	
४	महाराष्ट्र टाईम्स	मृत्युची भीती झुगारणारा कवी लोर्श	६ डिसें.१९६४
५	महाराष्ट्र टाईम्स	जिथे कविता करणे हा गुन्हा ठरतो	
६	महाराष्ट्र टाईम्स	शब्दजंजाळातून निसटू पाहणारी 'शब्दूली'	१५ नोव्हें.१९६४
७	महाराष्ट्र टाईम्स	इंदिरा: एक वेदनेची वाटचाल	

(या लेखांसाठी कै. कविवर्य वा.रा.कांत यांनी 'अभिजित' किंवा 'रसाळ वामन' हे टोपणनाव वापरले.)

प्रस्तावना

क्र.	नियतकालिकाचे नाव	लेखाचे शीर्षक	दिनांक
१	काव्यसंग्रह	मनस्विनी: सौ. अंजली सावले	
२	काव्यसंग्रह	बोलकी अबोली: सुरेश सावंत	
३	काव्यसंग्रह	मनाचा डोह: गोविंद कुलकर्णी	
४	काव्यसंग्रह	'शूर्पणखा' कै. मनाठकर	

कै. कांतांनी अनेक प्रस्तावना लिहिल्या आहेत परंतु त्याची सूची उपलब्ध नसल्यामुळे ही सूची अपूर्ण आहे.

आंध्र प्रदेश मराठी भाषिक संमेलनातील सत्काराप्रसंगी कविवर्य कांत

आपल्या अभ्यासिकेत कविवर्य कांत

कविसंमेलनात कविता सादर करतांना कविवर्य कांत

कविवर्य कांत यांच्या अखेरच्या कविता संग्रहाला - "मावळते शब्द"ला - महाराष्ट्र राज्याचा उत्कृष्ट वांङ्मय निर्मितीचा केशवसूत पुरस्कार मिळाला (१९८८)
परंतु पुरस्कार वितरणापूर्वीच कांतांचे निधन झाल्यामुळे त्यांचा नातू चि. अभिषेक याने हा पुरस्कार स्विकारला तो क्षण

परळी वैजनाथ येथील महाविद्यालयात काव्यवाचन

कविवर्य कांत एका सत्काराप्रसंगी

घरगुती काव्यमेळाव्यात "दोनुली" मधील कविता सादर करीत असतांना

कविवर्य कांत आपल्या जेष्ठ चिरंजीवां सोबत
अनुक्रमे : सौ. सिंधू रविंद्र कांत, नातू : चि. सुधिर व सुनिल
श्री. रविंद्र वा. कांत



कविवर्य कांत आपल्या द्वितीय चिरंजीवां सोबत
अनुक्रमे : सौ. मिरा प्रकाश कांत, नात कु. शलाका व शर्मिला, श्री. प्रकाश वा. कांत

नागपूर आकाशवाणीवरील कविसंमेलनात (१९५९)

डावीकडून : ना. घ. देशपांडे, कांत व वसंत बापट

मित्रांच्या सहवासात

मंगेश पाडगावकर, रामदास भटकळ, कांत, कै. दिनानाथ दलाल व दा. गो. देशपांडे

‘तरीही वाटते - निरंजनात - केव्हातरी आपण उरतो
दिशांच्या दूरतेत भरणाऱ्या चांदण्याइतके जवळ...’

कविवर्य वा. रा. कांत

कै. सौ. लक्ष्मीबाई वा. कांत

‘चरण एक गीताचे सरले, स्वर अवसानी शांत जाहले
त्या मौनातुनि पुढिल चरण परि झंकारा सजले...’

आपल्या अभ्यासिकेत कविवर्य कांत

मराठी सारस्वतांचा दरबार व दरबारातील नवरत्न

उभे अनुक्रमे : मंगेश पाडगावकर, वसंत बापट, ग. दि. माडगुळकर, वा. रा. कांत
बसलेले : संजीवनी मराठे, पद्मा भोळे, यशवंत, बा. भ. बोरकर, कुसुमाग्रज

१९८९ साली कविवर्य कांतांना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा तर्फे
मान्यवरांनी निवासस्थानी जाऊन गौरववृत्ती दिली तो क्षण

परळी वैजनाथ येथील महाविद्यालयात आपल्या
काव्यविषयक भुमिके संबंधानं बोलतांना कांत



पूत्र मु. वा. कांत याच्या विवाहाप्रसंगी कविवर्य कांत
अनुक्रमे डावीकडून : जावई डॉ. विजय मुळजकर, मु. वा. कांत, सून सौ. दिप्ती मुकुंद कांत
कन्या सौ. कविता विजय मुळजकर व नातू चि. मंगेश व राजेश





कांतांच्या प्रकाशित पुस्तकांचे मुखपृष्ठ



कांतांच्या प्रकाशित पुस्तकांचे मुखपृष्ठ

कविवर्य वा. रा. कांत यांचा 'शब्दधर्म'-
त्यांच्या टेबलावरची एक फ्रेम

कविवर्य कांतांचे वडिल श्री. रामराव कांत यांचे एक रेखाचित्र.
कांतांचे वडिल निजाम दरबारी मोठे पोलिस अंमलदार होते.
कणखर व शिस्तशीर असल्यामुळे लोक त्यांना आदराने "रामराव शिक्खान" म्हणून संबोधित



मालाड येथील चौकात कविवर्य वा. रा. कांत
यांची अखेरची कविता कोरलेली आहे.

नाव : मुकुंद वामन कांत (मु. वा. कांत)
जन्म : २३ सप्टेंबर १९५३, औरंगाबाद
शिक्षण : बी.कॉम (ऑन) मुंबई विद्यापिठ
व्यवसाय : युनियन बँक ऑफ इंडिया येथून शाखाधिकारी म्हणून निवृत्त
साहित्यिक कार्य : १९६९ साली "लोकसत्ता" दैनिकात पहिली कविता प्रसिद्ध
"पोरके आभाळ" (कवितासंग्रह) १९८३

प्रातिनिधिक कविता संग्रह :
१) काव्यलता – सुषमा प्रकाशन, सावंतवाडी
२) कविताविश्व – वंदना प्रकाशन, मुंबई
३) विसाव्या शतकातील कविता– वंदना प्रकाशन, मुंबई
४) विरह–अंतदृष्टि प्रकाशन, पुणे
५) मराठी कवितेतील घर– शब्दरत्न प्रकाशन, पुणे
६) हितगुज करणाऱ्या कविता – उमंग पब्लिकेशन, मुंबई

प्रस्तावना लेखन :
१) 'रूद्रवीणा', 'वेलांटी' – कविवर्य वा.रा. कांत लिखीत काव्यसंग्रहांसाठी मराठवाडा विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक दृष्टिकोनातून लिहिलेल्या प्रस्तावना.
२) कविवर्य वा.रा.कांत लिखीत– 'बगळ्यांची माळ' (भावगीत संग्रह)
'हरवलेले आकाश' (ललितलेख संग्रह)
'मध्यस्थ' (अनुवादीत कादंबरी)

इतर साहित्यिक कार्य : काव्यवाचन –
१) आकाशवाणी मुंबई, पुणे, हैदराबाद व औरंगाबाद केंद्र, दूरदर्शन, मुंबई
२) उपनगर साहित्य संमेलन, मुंबई
३) अखिल भारतीय साहित्य संमेलन ठाणे व नांदेड
४) सर्व भाषिक काव्यसंमेलन, परभरणी
५) लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, गावकरी, प्रतिष्ठान, पुढारी, लोकमत व इतर अनेक दिवाळी अंकातून, दैनिकांतून काव्यलेखन ललित लेखन पुस्तक परिक्षणे कथालेखन प्रसिद्ध.

आगामी : १) 'कविवर्य' (कविता संग्रह)
२) 'मी पराभवाचा शब्द'– कविवर्य वा.रा.कांत लिखीत मिर्झा गालिब यांच्या प्रेम–जीवनावर आधारीत दोन अंकी नाटकाचं संपादन
३) 'बनारसची सकाळ'– आकाशवाणीवरून प्रसारीत कविवर्य वा.रा.कांत लिखीत नभोनाट्यांचं संपादन